सत्यमेव जयते

वसई विरार मनपा

लेखा परीक्षण अहवाल

2012-2013

सह संचालक, (मनपा लेप), स्थानिक निधी लेखापरिक्षा, नवी मुंबई
रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

अस्वीकृती प्रमाणपत्र

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे वसई विरार मनपा यांनी 2012-2013 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

वसई – विरार शहर महानगरपालिका 2012-13 या वित्तीय वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल.

जा.क्र. स्था-18/ब/वसई विरार शहर महानगरपालिका/ले.प.अ.12-13/522.

सहसंचालक, (मनपालेप)
स्थानिक निधी लेखापरिक्षा
7 वा मजला, रायगड भवन,
सी.बी.डी. (बेलापूर)
नवी मुंबई : 400 614
दिनांक :- 01/06/2015

प्रति,
आयुक्त,
वसई – विरार शहर महानगरपालिका,
विरार (पूर्व).

वसई – विरार शहर महानगरपालिकेचे वित्तीय वर्ष 2012-13 चे लेखापरिक्षण श्री. प्र. म. वैवुडे, लेखापरीक्षा अधिकारी, यांच्या पथकाने दिनांक 20/05/2014 ते 15/12/2014 या कालावधीत पूर्ण केले असून श्री. प्र.म. वैवुडे, लेखापरीक्षा अधिकारी यांनी लेखापरीक्षण अहवाल तयार केला आहे.

श्री. सिताराम काळे, उपसंचालक (मनपालेप), उपविभाग दोन, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी दिनांक 20/05/2015 रोजी आयुक्त, वसई – विरार शहर महानगरपालिका यांचे समवेत सदर अहवालावर चर्चा करुन अहवालाचे अंतिमीकरण केले आहे. लेखापरिक्षण कालावधीमध्ये खालील अधिकारी व पदाधिकारी कार्यरत होते.

नाव	**पदनाम**	**कालावधी**
श्री. राजीव यशवंत पाटील	महापौर	दि. 01/04/2012 ते दि. 04/01/2013
श्री. नारायण लखु मानकर	महापौर	दि. 05/01/2013 ते दि. 31/03/2013
श्री. किशोर हिराजी बोर्डे	महापालिका आयुक्त	दि. 01/04/2012 ते दि. 31/03/2013

अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण 1

I PART I : भाग १ 3

मागील लेखा परीक्षण अहवाल 3

PART II 9

कलम ९ अ खालील आक्षेप 10

1 2012-13 वित्तीय वर्षाअखेर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत 11

2 अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत. 15

3 महानगरपालिकेने केलेल्या गुंतवणुका बाबत. 17

4 महानगरपालिकेने व्दिनोंदी पध्दतीने लेखे ठेवण्यासाठी सनदी लेखा पालाची नेमणुक केली आहे. 20

5 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रदान करतांना ठेकेदाराकडून आयकर व सुरक्षा अनामत रक्कमा कमी वसुली केल्याबाबत 22

6 आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत केलेल्या कामाविषयी अनियमीतता 23

7 नालासोपारा (प.) श्रीप्रस्थ कॉम्प्लेक्स पंप रुम मध्ये सेंट्रीफयुगल होरीजंटल स्पीट केसींग पंप (140 LPS, HEAD 35M) आणि 10 HP चा वॉल्युम पंप पुरविणे व बसविणे. 26

8 नालासोपारा (प.) श्रीप्रस्थ कॉम्प्लेक्स भुमिगत टाकी जवळ 315 KVA ट्रान्सफार्मर पुरविणे व बसविणे 28

9 भुमिगत टाकीवर स्वयंचलित (AUTOMATIC) पॅनल बोर्ड पुरविणे व बसविणे. 30

10 प्रभाग कार्यालयाकडुन पाणी पुरवठा मलनिस:रण योजनेची कामे करताना झालेल्या अनियमिततेबाबत. 31

11 एकात्मीक तलाव संवर्धन योजना खर्च न झालेले अनुदान व मत्स्यविकास महामंडळाकडून प्राप्त अनुदानातुन खर्च केलेल्या बाबींचे अभिलेखे प्राप्त् न झालेबाबत. 33

12 अग्निशमन विभागाकडील प्रलंबीत वसुलीबाबत. 33

13 लेखापरीक्षणास अभिलेख सादर न केल्याबाबत. 41

14 उदयान विभागाच्या माहे मार्च, 2013 मध्ये झालेल्या खर्चातील 14 प्रमाणकांच्या खर्चाचा अभिलेख सादर न केल्याबाबत. 42

15 पाणी पुरवठा विभागाने मोजमाप पुस्तके उपलब्ध करुन दिली नाहीत. 43

16 वसई प्रभाग कार्यालय ई चे वित्तीय कामाबाबत. 44

17 नवघर-माणिकपूर प्रभाग कार्यालय ड चे वित्तीय कामाबाबत. 49

18 महिला व बाल कल्याण विभागाने रुपये 82,73,673/- झालेल्या खर्चाचा अभिलेख लेखापरीक्षणास सादर न केल्याबाबत. 53

19 महापालिका क्षेत्रात सुधारीत सागरी क्षेत्र व्यवस्थापन आराखडाबाबत. 55

20 मालमत्ता कराचे रिफॉर्म तयार करणेच्या खर्चाबाबत. 56

कलम ९ ब खालील आक्षेप.....59

21 घनकचरा व्यवस्थापन कामासाठी वापरलेल्या मजुर पुरवठ्याच्या / लेबर कॉन्ट्रॅक्ट मधील अनियमितता 60

22 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पध्दतीने नाले खोदाई करणे बाबत. 62

23 दशलक्ष शहरांच्या उपशहरांच्या नागरी पायाभुत सुविधांचा विकास कार्यक्रम - सॅटेलाईट सिटी (योजने अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन) मधील अनियमितता 67

24 वसई येथील रुग्णालयातील प्रसुति विभागातील रुग्णांसाठी दुध, बिस्कीटे, अंडी व भोजन पुरवठा करणेबाबत.....71

25 केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा निर्माण करणेची योजना- भुयारी मलनिस:रण.....72

26 नगर रचना विभागाकडील बांधकाम परवानगी नस्ती तपासणीत आढळून आलेल्या अनियमितता. 75

27 मत्स्य विकास महामंडळाकडून मिळालेले अनुदान व त्यातून महापालिकेने केलेल्या कामाविषयी अनियमीतता. 77

28 वसई -विरार शहर महानगरपालिका हददीतील वालीव,सातीवली, गौराईपाडा, नवघर (पूर्व) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये मुलभूत सुविधा (रस्ता, गटारे व पूल) निर्माण करणे बाबत. 80

29 मनपा विविध कार्यक्रम, चहापान-भोजन तसेच मंडप व विद्युत, साऊंड इत्यादी व्यवस्था करणे. 84

30 उदयान परिरक्षण कामामधील मुद्रांक शुल्क कमी वसुल केल्याबाबत.....86

31 धुकटन येथील जलशुध्दीकरण केंद्र येथे विकसीत करण्यात आलेल्या रोपवाटीकांच्या त्रुटींबाबत.....88

32 उदयान विभागाच्या वृक्ष गणनेच्या कामातील अनियमितता. 91

33 विकास निधी अंतर्गत सुर्या योजना व इतर भांडवली कामातील अनियमीतता 94

34 वसई विरार शहर मनपा मुख्यालयामध्ये पाणीपट्टी कराची वसूली करताना झालेल्या अनियमितता.....96

35 वसई-विरार मनपा अग्निशमन विभागामध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत. 98

36 प्रभाग समिती कार्यालयामध्ये विविध तांत्रीक व कार्यालयीन कामे करण्यासाठी प्रभाग निहाय मनुष्यबळ पुरविणे. 99

37 प्रभाग समिती कार्यालयामध्ये मजूर पुरवठा करणे. 104

38 विविध प्रभागामधील विकास कामांसाठी अभियांत्रिक सेवा पुरविणे कामी अभिकर्ता नेमणे कामातील अनियमितांबाबत. 106

39 महापालिकेच्या नवघर प्रभागातील आस्थापना विभागाच्या अनियमितता.....108

40 महानगरपालिकेच्या मालमत्तांची निगा राखण्यासाठी शिपाई पुरविणे या कामातील अनियमिततांबाबत.....112

41 प्रभाग समिती - अ - विरार विभागातील तलाव लिलाव प्रकरणांतील अनियमितता. 114

42 प्रभाग समिती - ई - वसई विभागातील तलाव लिलाव प्रकणांतील अनियमितता. 118

43 प्रभाग समिती - ब - पेल्हार विभागातील तलाव लिलाव प्रकरणांतील अनियमितता.....120

44 प्रभाग समिती - ड, नवघर माणिकपूर विभागातील भाडयाने देण्यात आलेल्या मालमत्तांमधील त्रुटींबाबत. 123

45 प्रभाग समिती - क, नालासोपारा विभागातील भाडयाने देण्यात आलेल्या मालमत्तांच्या थकीत भाडयाबाबत. 124
46 प्रभाग समिती - ड - नवघर माणिकपूर विभागातील तलाव लिलाव प्रकरणांतील अनियमितता.....125
47 प्रभाग समिती - अ, बोळींज विभागातील मालमत्ता भाडयाने देण्यातील अनियमितता.....128
48 पाणीपट्टी कर विभाग वसई प्रभागामधील अनियमितता.....129
49 पाणीपटटी कराची वसूली मंजूर उपविधीनुसार न करणे 130
50 जुन्या मालमत्तांच्या करांची थकबाकी रक्कम वसुली न केलेबाबत 132
51 क प्रभाग नालासोपारा मालमत्ता कर विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितताबाबत.....133
52 मालमत्ता कराच्या थकीत रक्कमाबाबत. 135
53 'अ' प्रभाग विरार विभागाचे मालमत्ता कर लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितताबाबत. 138
54 'अ' प्रभाग बोळींज विभागाचे मालमत्ता कर आकारणीत आढळून आलेल्या अनियमितताबाबत. 141
55 जाहिरात कराबाबत 145
56 विरार पूर्व व पश्चिम आठवडे बाजार व दैनंदिन बाजार फी वसुली ठेका लिलावाबाबत 146
57 खर्च प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत. 148
58 ड प्रभाग पे आणि पार्क ठेक्याबाबत.....150
59 नवघर-माणिकपुर प्रभाग समिती "ड" मधील कला क्रिडा महोत्सव कार्यक्रम. 152
60 प्रभाग 'क' कला क्रिडा महोत्सव खर्चाबाबत 154
61 प्रभाग 'अ' बोळींज-विरार कला क्रिडा महोत्सव खर्चाबाबत. 161
62 वाहन भाडयाने घेण्यांबाबत ठेकेदारास झालेल्या अतिप्रदानाबाबत ... .164

कलम ९ क खालील आक्षेप.....167

---------- निरंक ---------- 168

कलम ९ ड खालील आक्षेप.....170

63 ड प्रभागातील कोल्ही (ग्रापं)उपविभागाच्या कामातील अनियमितता. 171
64 ड प्रभागातील चिंचोटी (ग्रापं)उपविभागाच्या कामातील अनियमितता.....175
65 ड प्रभागातील देवदळ (ग्रापं)उपविभागाच्या कामातील अनियमितता.....178
66 ई प्रभागातील नायगांव (ग्रापं)उपविभागाच्या कामातील अनियमितता. 182
67 ड प्रभागातील सातिवली (ग्रापं)उपविभागाच्या कामातील अनियमितता.....185
68 ई प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर सांडोर उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता.190
69 ड प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर वालीव उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता 193
70 ड प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर ससू नवघर उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता 196
71 ड प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर बापाणे उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता198

72 ड प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर राजावली उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता 201
73 अ प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर आगाशी उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता 203
74 ब प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर पेल्हार उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता 206
75 क प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर वाघोली उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता 209
76 क प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर निर्मळ उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता 212
77 अ प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर बोळींज विभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता...215
78 ड प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर उमेळा उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता 219
79 ब प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर चंदनसार उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता 223
80 वसई विरार मनपा प्रभाग अ मधील पाणीपटटी कर विभागातील अनियमितता.....226
81 पाणीपटटी कराची वसूली करताना झालेल्या अनियमितता.....227
82 ड नवघर प्रभाग मालमत्ता कर विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततताबाबत. 228
83 प्रभाग 'ड' गोखिवरे विभागाचे मालमत्ता कर आकारणीत आढळून आलेल्या अनियमितता.....229
84 लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध न झालेबाबत.....231
85 मालमत्ता विभागाची संगणक प्रणाली वापरून ठेका पद्धतीने दैनंदिन कामकाज व कर बिले वाटप खर्चाबाबत. 232
86 घरपट्टी विभागाची संगणक प्रणाली वापरून ठेका पद्धतीने विभागाचे दैनंदिन कामकाज स्टेशनरीशिवाय करण्याचे कामाचे प्रदानातील अनियमितता. 235
87 केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा निर्माण करणेची योजना- भुयारी गटार मलनिस:रण ...236
88 नगररचना विभागाकडील उपलब्ध न झालेल्या माहितीबाबत.....239
89 श्री.वाय.एस.रेड्डी उपसंचालक नगररचना यांचे नियुक्ती व वेतननिश्चितीबाबत.....241
90 अण्णासाहेब वर्तक चौक ते पी.डब्ल्यु.डी. ऑफिसपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. 244
91 वालीव येथे फणसपाडा (KT) ते गावदेवी वसाहत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.....245
92 वॉर्ड नंबर 63 मध्ये सातीवली नाका ते कमळाकर गायकवाड यांचे घरापर्यंत संरक्षण भिंत बांधणे 246
93 वॉर्ड नंबर 61 मध्ये वालीव येथे ब्रिगैन्झा यांचे घर ते सिल्हर अर्च बंगला नाला बांधणे. 247
94 वार्ड नंबर 58 मध्ये आचोळे गाव ते एव्हर शाईन सिटी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. 249
95 लोहिया नगर येथे नाला बांधणे. 250
96 सुयोग नगर स्मशानभूमी ते चुळणा ब्रिज रस्त्याची साईट पट्टी डांबरी करण करणे. 252
97 सातमादेवी किरवली रोड ते फलकाव घरापर्यंत (ब्रितम परेरा मार्ग) रस्ता डांबरीकरण करणे. 253
98 पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पुर्व येथील प्रेसिला अपार्ट ते मुख्य रस्त्यापर्यंत पाईप गटार बांधणे.....254
99 नालासोपारा पूर्व येथील डॉन लेन मुख्य रस्त्यालगत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे. 256

100 पेल्हार रस्त्यावरील पेट्रोलपंप ते ओम मेडीकल पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे.....258
101 अशोक सिंग चाळ ते धनंजय प्लॉट पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे.....260
102 प्रभाग क्र. 6 श्री. देवराम शिनवार पाटील यांचे घर ते चिखल डोंगरी पाण्याची टाकी पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरी करण करणे. 261
103 देयके मंजूर करताना बांधकाम विभागातील मोजमाप पुस्तकात प्रतीसंदर्भ नमूद केला नाही व मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही.....263
104 नालासोपारा पूर्व मनवेलपाडा तलाव ते साई प्लाझा अपार्टमेंट पर्यंतचा 40 मी. डी.पी.रोड खडीकरण करणे.264
105 तुळींज मेन रोड ते विजयनगर रिक्षा स्टँड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. 265
106 नालासोपारा (पू) येथील साई सुमन बिल्डिंग ते शिवम अपार्टमेंट (ओसवाल नगरी) पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. 267
107 नालासोपारा प्रभाग समिती (क) हद्दीतील विधि रस्त्यांचे डांबरीकरण व पॅचवर्क करणे. 268
108 देयके मंजूर करताना पाणी पुरवठा विभागातील मोजमाप पुस्तकात प्रतीसंदर्भ नमूद केला नाही व मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही.....271
109 पाणी पुरवठा योजना - पाण्याचे देयकाबाबत 272
110 कामाच्या नस्त्या, नोंदवहया, मोजमाप पुस्तके उपलब्ध करुन दिली नाही. 274
111 स्टेशनरी खरेदी आणि छपाई विषयी अनियमीतता. 276
112 शहरातील पाणी पुरवठा क्लोरीनेशन व्यवस्था व ॲलम खरेदीविषयी अनियमीतता. 278
113 दिवे व दिवाबत्ती साहित्य खरेदीविषयी अनियमीतता. 280
114 पाणी पुरवठा- वितरण व्यवस्था व देखभालीसाठी पाईप, प्लबिंग फिटींग साहित्य इत्यादी खरेदी.....282
115 ई-गर्व्हनस अमंलबजावणी, मालमत्ता कराची डिमांड रजिस्टर, मागणी बिले, नोटीसा, पावत्या इत्यादी कामे. 284
116 संगणक देखभाल दुरुस्ती बाबत 286
117 जंगम मालमत्ता पुस्तकातील नोंदीबाबत. 287
118 क प्रभाग अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितता ..289
119 ब प्रभाग अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितता ...293
120 ई प्रभाग अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितता ...294
121 अ प्रभाग अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितता ..297
122 परिवहन ठेक्यातील अनियमितता 301
123 पेल्हार प्रभाग कार्यालय (ब) चे कामाबाबत.....304
124 नालासोपारा प्रभाग कार्यालय (क) चे कामाबाबत.....306
125 बोळींज प्रभाग कार्यालय अ चे वित्तीय कामाबाबत.....309
126 वसई प्रभागातील आस्थापना विभागातील अनियमितता.....312
127 पेल्हार प्रभागातील कर्मचाऱ्यांना परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजना लागू न करणे 314

128 महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाचे लेखा परिक्षण करताना सेवा पुस्तकात आढळुन आलेल्या उणीवाबाबत. 315
129 महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाचे लेखा परिक्षण करताना सेवा पुस्तकात आढळुन आलेल्या उणीवा बाबत. 318
130 लेखा विभागाने ठेवलेल्या आगाऊ रकमा व ठेवींची नोंदवही नमुना नं. 147 बाबत 319
131 महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कडे प्रलंबित असलेली अग्रीम रक्कमाबाबत. 321
132 बँक बाकी ताळमेळ पत्रकाबाबत....322
133 महानगरपालिकेने घेतलेल्या कर्जा बाबत. 325
134 विरार प्रभागातील वाहन दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा झालेला जादा खर्च....326
135 नवघर - माणिकपुर प्रभागातील वाहन दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा झालेला जादा खर्च 328
136 महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ब पेल्हार कार्यक्षेत्रासाठी महापालिकेच्या मालकीचे मैला टँकर चालविण्याच्या ठेक्यातील अनियमीततेबाबत....330
137 वसई "ई" प्रभागाकडील वाहन दुरुस्ती व देखभालीवर 2012-13 आर्थिक वर्षात वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्च केल्याबाबत... 331
138 वसई विरार महानगरपालिका अंतर्गत पेल्हार "ब" प्रभागाकडील वाहन दुरुस्ती व देखभालीवर 2012-13 मधील वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्चाबाबत 332
139 प्रभाग समिती "ई" वाहने साहित्यासह दुरुस्ती करण्याबाबत 334
140 वसई विरार शहर मनपामधील जन्म मृत्यू नोंदणी विभागातील अनियमितता....335
141 मुंबई नर्सिंग होम ॲक्ट, 1949 अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रुग्णालये व चिकित्सालये इ. यांच्या नोंदणीबाबत 336
142 कत्तलखाने व पशु-आवारे यावर दुकान-भाडे, भाडे आणि फी बसविणे. 337
143 वसई येथील रुग्णालयातील पॅथॉलॉजिकल सेवा कंत्राटी पध्दतीवर पुरविणेबाबत....338
144 आरसीएच कार्यक्रमांतर्गत ठेवण्यांत आलेल्या रोखवही, उपयोगिता प्रमाणपत्र, इ. बाबतची अनियमीतता....339
145 स्थानिक संस्था कराबाबत....341
146 मुद्रांक शुल्कासोबत अतिरीक्त 1% अधीभारामुळे जमा होणा-या रकमेबाबतची थकीत रक्कम 343
147 वसई विरार शहर महानगरपालिका - स्थानिक संस्था कराच्या वसुलीबाबत....344
148 पेल्हार प्रभागातील मांडवी बाजार कर लिलाव ठेक्यांबाबत....345
149 विधी विभागाकडील खर्चाबाबत....347
150 प्रभाग 'क' मनपाच्या मालमत्तांची निगा राखणेकामी शिपाई पुरविणे. 348
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र 352

विवरणपत्रे व जोडपत्रे....2

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण

विभाग	९अ	९ब	९क	९ड
आयुक्तालय				
सामान्य प्रशासन	13	59, 60, 61		150
नगर सचिव				
शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम	6	27, 28		90, 91, 92, 93, 94, 95, 96, 97, 98, 99, 100, 101, 102, 103, 104, 105, 106, 107
शहर अभियंता आणि विद्युत विभाग				
पाणी पुरवठा व मल निसा:रण	7, 8, 9, 10, 11	33, 34		108, 109, 110
लेखा विभाग	1, 2, 3, 4			130, 131, 132, 133
लेखापरीक्षण				
नगर रचना	19	25, 26		87, 88, 89
जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर				145, 146, 147
कर निर्धारण व संकलन	20	48, 49, 50, 51, 52, 53, 54		63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70, 71, 72, 73, 74, 75, 76, 77, 78, 79, 80, 81, 82, 83, 84, 85, 86
आरोग्य	5	21, 22, 23, 24		141, 142, 143, 144
भूमी व मालमत्ता विभाग		40, 41, 42, 43, 44, 45, 46, 47		
वाहन विभाग		62		134, 135, 136, 137, 138, 139
नागरी वाहतूक				122

वसई विरार मनपा

विधी विभाग				149
भांडार		29		111, 112, 113, 114, 115, 116, 117
परवाना व मंडई विभाग		55, 56		148
अनधिकृत बांधकाम प्रतिबंध विभाग		57, 58		118, 119, 120, 121
महिला व बालकल्याण विभाग	18			
अग्निशमन विभाग	12	35		
प्रभाग कार्यालये	15, 16, 17	36, 37, 38, 39		123, 124, 125, 126, 127, 128, 129
उद्यान विभाग	14	30, 31, 32		
जन्म मृत्यु नोंदणी विभाग				140

I Part I : भाग १

मागील लेखा परीक्षण अहवाल

13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे व त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपक्रमांचे वैधानिक लेखापरिक्षण वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. स्थानिले-1010/प्र.क्र.26ब/विमाप्रशा, दिनांक 31-03-2011 अन्वये संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय यांचेकडे सोपविण्यांत आले आहे. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेचे 2011-12 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण सुरु करण्यांत आले आहे. प्रलंबित परिच्छेदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

प्रलंबित परिच्छेद वर्ष 2011-12

परिच्छेद क्रमांक	विषय
*1	उपार्जित द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे (Accrued based Double Entry System)
2	अंदाजपत्रक : अर्थसंकल्पीय अंदाज
3	महानगरपालिका सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेची इतिवृत्त नोंदवही न ठेवणे.
4	चिखल डोंगरी गावात व्यायाम शाळा बांधणे (आमदार निधी)
*5	वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या दवाखाना, रुग्णालयासाठी डॉक्टर व परिचारीका यांची सेवा ठेक्याने घेण्यातील अनियमितता.
6	महानगरपालिकेच्या विविध योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प राबविणेकामी सल्लागार नेमणे.
7	महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरीता सन 2011-12 करीता स्वच्छता साहित्य पुरवठा करणेचा ठेका.
8	सन 2011-12 अग्निशमन दलाकरिता केलेल्या साहित्य खरेदीमधील अनियमितता.
9	महानगरपालिकेच्या विविध बालोद्यानात सन 2011-12 मध्ये नविन खेळणी पुरवठा करणेचा ठेक्यातील त्रुटींबाबत
10	वसई- विरार शहर महानगरपालिका अंतर्गत असलेल्या स्मशानभूमीसाठी जळावू लाकूड खरेदी करणेबाबत
11	जनगणना 2011 या शासन योजनेवर झालेला खर्चाचे लेखा परिक्षण.
12	प्रभाग समिती 'ड' मधील वॉर्ड क्र. 69 मध्ये DG नगरमध्ये लहान मुले व जेष्ठ नागरिकांसाठी पार्क तयार करणे.
13	प्रभाग क्र. 4 मध्ये विरार (पू) शंकर विलास हिंदू हॉटेल समोर नाल्याचे बांधकाम
14	वॉर्ड क्र. 61 मध्ये वाळीव मुख्यरस्ता ते धुमाळनगर पर्यंत रस्ता डांबरीकरण
15	धुरी कॉम्लेक्स येथील उद्यान विकसित करणे
16	"ड" प्रभागातील वॉर्ड क्र. 75 मध्ये आनंदनगर उद्यान दुरुस्तीच्या नस्तीमधील त्रुटींबाबत.
17	चुळणा ते गास पर्यंत रस्त्याची साईड पटटी करणे.

18	एव्हर शाईन सिटी एव्हन्यू ते स्कायहाईटस पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.
19	नालासोपारा नगरपरिषद हददीतील स्मशानभूमि ते समेळ अपार्टमेंट पर्यंत नाला बांधणे (सा.क्र. 183 ते 286 मी) (नागरी दलित वस्ती सुधारणा योजना)
20	गास चुळणे पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे (12 वा वित्त आयोग)
21	नवघर-माणिकपूर विभागातील वसई रोड येथील रस्ता डांबरीकरण दुरस्ती करणे.
22	नालासोपारा (प) येथे लक्ष्मीबेन छेडा मुख्य रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.
23	निर्मल एम.एम.आर योजने अंतर्गत भास्कर आळी सुरुच्या बागेकडील रस्त्या लगत 18 सिटसचे शौचालय बांधणे. निर्मल एम.एम.आर योजने अंतर्गत.
24	निर्मल एम.एम.आर योजने अंतर्गत वसई नगरपरिषद रुग्णालयाच्या मागील जागेत 12 सिटसचे शौचालय बांधणे.
25	नालासोपारा (पूर्व) येथे लक्ष्मीनगर येथील विरार मुख्य रस्ता ते साई रेसिडेंसी पर्यंत के.जी.एन कॉलनी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.
26	चुळणा भाबोळपाडा येथे निर्मल महानगर अभियान अंतर्गत शौचालय बांधणे.
27	निर्मल एम.एम.आर अभियान अंतर्गत उमेळमान घरत आळी येथे शौचालय बांधणे.
28	निर्मल अभियान अंतर्गत संभाजी नगर येथे गावडे यांचे घराजवळ 18 सिटचे शौचालय बांधणे.
29	नालासोपारा चक्रेश्वर तलाव येथील मंदीराच्या बाजूला रस्ता कॉंक्रिट, पाथवे बांधणे.
30	राजीव गांधी शाळा ते ठाकुर विद्यामंदिर पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.
*31	उमेळे गावातील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे
32	प्रभाग समिती ‘ई’ कार्यालय क्षेत्रातील सातमा देवी मंदिर ते पापडी नायगाव रस्ता डांबरीकरण करणे.
33	जुचंद्र पाझर तलाव येथे पाणी शुध्दीकरणासाठी प्रेशर फिल्टर पुरविणे व बसविणे.
34	तामतलाव येथील शेट्टी जनरल स्टोर फलकाव क्रॉस सातमादेवी मंदीर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.
35	वसई-विरार (नागरी) पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती करणे (उसगाव).
36	प्रभाग ‘क’, ‘ड’, ‘इ’ बांधकाम विभागातील रस्ते बांधकामाच्या विशिष्ट बाबींच्या चुकीच्या दरपृथःकरणामुळे (रेट ऍनॅलिसिस) ठेकेदारास झालेल्या अतिप्रदानाबाबत.
37	वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत विभागीय कार्यालय नवघर-माणिकपूर, नालासोपारा येथे ठेके पध्दतीने तारतंत्री पूरवठा करणे.
38	वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत रुग्णालयाकरीता लागणारी विविध औषधे खरेदी
39	रुग्णालयासाठी दूध, अंडी, भोजन पुरवठा करणे.
40	प्रभाग समिती 'ड' व्हॅक्यूम क्लिनर ने सेप्टी टँक साफ करणेची नोंदवही अनियमितता.
*41	वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या दवाखाना, रुग्णालयासाठी डॉक्टर व परिचारीका ठेक्याने पुरवणे.
42	वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वसई विभागीय रुग्णालयासाठी प्रशिक्षित दायी पुरविणे.
43	पल्स पोलीओ लसीकरण मोहीम नस्ती व प्रमाणके तपासणीमध्ये आढळुन आलेल्या त्रुटी.
44	महानगरपालिका हददीतील मोकाट व जखमी श्वान पकडून त्यांचेवर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया

	करणे व रॅबिज प्रतिबंधक लस देणे.
45	जंतू नाशके, किटक नाशके खरेदी बाबत.
46	नवघर-माणिकपुर, प्रभाग 'ड' यांचे वाहन दुरुस्तीवरील खर्च.
47	महापालिकेसाठी वाहन भाडेतत्वावर घेणे.
48	वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या भागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- वसई विभाग.
49	वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नवघर- माणिकपुर (पुर्व)
50	वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- विरार (पश्चिम) (अ)
*51	वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नवघर- माणिकपुर (पश्चिम)
52	वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नालासोपारा पुर्व (ब)
53	वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नालासोपारा (पश्चिम)
54	वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका – नालासोपारा पुर्व (क)
55	वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- विरार पुर्व (अ)
56	वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- नालासोपारा पुर्व (अ)
*57	वसई-विरार शहर महनगरपालिकेच्या नवघर-माणिकपुर,नालासोपारा, विरार व वसई या विभागात दैनंदिन साफसफाई,गटार सफाई, शौचालय व मार्केट सफाई करुन कचरा वाहतुक करणे या कामीचा ठेका- विरार पुर्व (ब)
58	सन 2010-11 च्या दराने खेळणी खरेदी करावी लागल्याने झालेल्या जादा खर्चाबाबत.
59	दिवाबत्ती साहित्य खरेदीमधील त्रुटींबाबत.
60	सार्वजनिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम व महोत्सवासाठी चहापान, भोजन, खुर्च्या, मंडप यावरील

	खर्च
61	प्रशासकीय कामासाठी सन 2011-12 करीता आवश्यकतेनुसार किरकोळ स्टेशनरी व आवश्यक साहित्य पुरविणेबाबत.
*62	वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागास पाईप प्लंबिंग फिटिंग इत्यादी साहित्य पुरवठा करणे.
63	सुरक्षा रक्षक पुरविणेचा ठेका देण्याच्या प्रक्रियेत आढळुन आलेल्या त्रुटी.
64	प्रभाग समिती "अ" मधील दावे व खटले नस्तीचे लेखा परिक्षणात आढळुन आलेल्या त्रुटी.
65	प्रभाग समिती "ड" मधील दावे व खटले नस्तीचे लेखा परिक्षणात आढळुन आलेल्या त्रुटी.
*66	मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 नियम क्र. 260 व 267 नुसार अनधिकृत बांधकामांवर कारवाई न केल्याबाबत.
67	महिला व बालकल्याण अंतर्गत अंगणवाडी व शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे
68	अग्निशमन विभागातील व्यवस्थापन ठेका (फायरमन) नवघर-माणिकपूर विभाग
69	उद्यानातील खेळण्यांच्या दुरुस्तीबाबत.
70	"ड" विभागातील कृष्णा टाऊनशिप येथील सुर्या उद्यान सुशोभिकरण करणे
71	महानगरपालिकेने जतन केलेल्या भविष्य निर्वाह निधीमधील त्रुटी.
72	क्रिडांगणे, वृक्षारोपण आणि उद्यानाच्या कामांसाठी मजूर पुरविणेबाबत.
73	श्रीमती रश्मी विजय घरत, लिपिक, यांचे सेवा पुस्तकातील त्रुटीबाबत.
74	'अ' प्रभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील त्रुटींबाबत.
75	श्रीमती पद्मीनी मेहेर, लिपिक "क" प्रभाग यांच्या वेतन निश्चितीबाबत.
76	'क' प्रभागातील श्री. शशिकांत रत्नाकर गायकवाड, शिपाई यांचे वेतन निश्चितीबाबत.
77	'क' प्रभागातील सर्वश्री. अं.जि. सरवदे, लिपिक, दुष्यंत दा. ठाकुर, सहाय्यक फायरमन आणि ब.रा. फापे, वाहनचालक यांचे सेवापुस्तकातील त्रूटींबाबत.
78	'क' प्रभागातील श्री. सु.ओं.चव्हाण, स,फायरमन आणि श्रीमती. सावित्री गायकवाड, सफाई कामगार यांचे सेवापुस्तकातील त्रूटींबाबत
79	'क' प्रभागातील सर्वश्री. रमेश राऊत, प्रकाश गोवारी, शशिकांत पाटील, विनयसिंग दात्रे यांचे सेवापुस्तकातील त्रूटींबाबत.
80	'ड' प्रभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांतील त्रूटींबाबत.
81	श्री. अनिल दे. मोहिते, फायरमन यांचे वेतन निश्चिती बाबत.
82	कै. श्री. मनोज रत्नाकर जाधव, क्लिनर यांचे सेवानिवृत्ती प्रकरण.
83	'ड' प्रभागातील कर्मचारी श्री. संजय वसंत मोहिते, लिपिक यांच्या वेतननिश्चितीतील त्रुटींबाबत.
84	'ड' प्रभागातील कर्मचारी सौ. गीता राऊत, लिपिक यांच्या सेवा पुस्तकाबाबत
85	श्रीमती सुशिला सतिश तावडे (झाडू कामगार) यांच्या सेवापुस्तकाच्या तपासणीबाबत
86	'क' प्रभागातील श्रीमती संध्या व. पाटील व श्री. ल. पा. भोईर यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत.
87	निवृत्ती वेतन प्रकरणे महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता 1971 नियम क्र. 136 (8) नुसार सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर न केल्याबाबत
88	श्री. प्रकाश बा. बाविस्कर, लिपिक (सेवानिवृत्त) यांचे सेवानिवृत्ती लाभ विषयक

89	श्री. सुकदेव च. दरवेशी, स्वच्छता निरीक्षक यांचे सेवापुस्तकाबाबत
*90	शहरांतर्गत वितरण व्यवस्था या शिर्षांतर्गत देण्यात आलेल्या मजुर ठेक्याच्या नस्ती व प्रमाणके लेखा परिक्षण पथकास उपलब्ध करून न देणेबाबत
*91	पाणीपुरवठा/बांधकाम विभागाने लेखा परिक्षण पथकास अभिलेखे उपलब्ध करून न देणेबाबत
92	महानगरपालिका प्रभाग समिती 'ड' नवघर-माणिकपुर येथे उपविधी 2011 प्रमाणे पाणीपट्टी बिलाची सुधारीत दराने आकारणी न केल्याबाबत
93	निवृत्ती वेतन अंशदान दरमहा अंशदान निधीत जमा न करणे.
94	परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना
95	भोगवटा प्रमाणपत्राची प्रत अनुपलब्ध असणे आणि जुन्या मालमत्ता करात प्रत्येक पाच वर्षानी दरवाढ करणेबाबत. ड प्रभाग नवघर-माणिकपूर क्षेत्र
96	वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग 'अ' मधील मालमत्ता कराच्या थकबाकीबाबत
97	रुग्णालयाकरीता दैनंदिन व किरकोळ कामकाज सेवा पुरविणे98 रुग्णालयासाठी ऑक्सिजन सिलिंडर रिफिंलींग करणे
98	रुग्णालयासाठी ऑक्सिजन सिलिंडर रिफिंलींग करणे
99	वसई-विरार शहर महानगरपालिका LPT-909-EX वाहनावर हायड्रोलिक लॅडर बसविणे
100	निविदेमधील न्यूनतम व उच्चतम दर यामधील अवास्तव तफावतीबाबत
101	प्रभाग समिती "ब","क" व "इ" मधील दावे व खटले नस्ती लेखा परिक्षणास सादर न करणे
102	राज्य शासनाच्या सुवर्ण जयंती रोजगार योजनेकरीता प्राप्त अनुदान व खर्चाच्या नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन न देणेबाबत
103	"आग सुरक्षा निधी" तील प्रत्यक्ष जमा रक्कमांच्या तफावतीबाबत.
104	अग्निशमन विभागाकडुन मागविण्यात आलेले व उपलब्ध न झालेले दस्तावेज
*105	उद्यान/वृक्षप्राधिकरण विभागाकडुन अभिलेखे उपलब्ध न होणे

उपरोक्त नमुद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या पुढील वर्षाचे अभिप्रायामध्ये नमुद करण्यांत आलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यांत यावेत. " * " अशा चिन्हाने चिन्हांकित केलेले परिच्छेद नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालात अंतर्भुत करण्यांत आलेले आहेत.

1. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालात अंतर्भुत परिच्छेदांची संख्या - 11

2. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालाव्यतिरीक्त परिच्छेदांची संख्या - 94

एकुण - 105

वसई विरार मनपा

Part II

भाग एक

गंभीर अनियमितता

कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

कलम ९ अ खालील आक्षेप

1 2012-13 वित्तीय वर्षाअखेर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत

आर्थिक स्थिती / वार्षिक लेख्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

महापालिकेचे 2012-13 आर्थिक वर्षाचे मत्ता व दायित्व विवरण पत्रातील आकडेवारी महापालिकेच्या संबंधीत अभिलेख्याशी जुळत नाही. न वटविण्यात आलेल्या धनादेशाची माहिती उपलब्ध झाली नाही. पाणी पुरवठा व जल नि:सारण सेवा, मल नि:सारण व कचरा विल्हेवाट, सार्वजनिक परिवहन सेवा, दिवाबत्ती सेवा या स्वयंधारित नाहीत. वार्षिक लेखे वेळेवर सादर केले नाहीत.

महापालिकेने 2012-13 चे लेखा परिक्षणास दप्तरी अभिलेखे सादर केले आहेत. त्यानुसार लेखा परिक्षण करण्यात आले. महापालिकेकडे असलेल्या निधींचे बाबत वेळोवेळी शिल्लक रकमांच्या गुंतवणूका केल्या असून, गुंतवणूक नोंदवही नुसार गुंतवणूक केलेली एकूण रक्कम रु. 46125.92 लक्ष आहे. 2012-13 मत्ता व दायित्वे विवरण पत्र (नमुना नं. 29) चे अवलोकन करता मत्तेचे दायित्वावर आधिक्य रु. 48552.33 लक्ष आहे. वसई - विरार शहर महानगरपालिकेची एकंदरीत आर्थिक स्थिती चांगली असल्याचे दिसुन येते. महापालिकेच्या आर्थिक वर्ष 2012-13 अखेरच्या आर्थिक स्थितीबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.155, दि.30/10/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र.निरंक, दि.07/11/2014 रोजी केलेला खुलाशानुसार प्रशासन अहवालाचा मसुदा अनिश्चीत आहे, वार्षिक लेखे व प्रशासकिय अहवाल सादर करणेकामी महानगरपालिकेसाठी निश्चित मुदत नाही. महालेखाकार यांना अभिलेखे दाखविले आहेत, असा खुलासा केला. प्रत्यक्षात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 94 व कलम 106(3) नुसार - एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरात लवकर / प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर वार्षिक लेखे व प्रशासन अहवाल स्थायी समितीस सादर करण्याची तरतूद आहे. परंतु सदर तरतुदीचे पालन केले नसल्याने विभागाचा खुलासा मान्य करता येत नाही. लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) कर विभागाने मागणी वसुली व थकबाकीच्या नोंदवहया प्रभागानुसार वेगवेगळया ठेवल्या आहेत. त्याचे एकत्रिकरण मुख्यालयात केले जात नाही. महानगरपालिका अस्तित्वात आली - तेव्हा भुतपूर्व 4 नगरपरिषदा - वसई, नवघर-माणिकपूर, नालासोपारा, विरार व 53 ग्रामपंचायती त्यात समाविष्ट करण्यात आल्या. 4 नगरपरिषदांचे मालमत्ता कराचे दर सारखे केले आहेत. मात्र ग्रामपंचायत विभागाचे कराचे दर जुने आहेत. तसेच पाणी पटटी कराचे दर प्रत्येक प्रभागानुसार वेगवेगळे आहेत.

जाहिरात कराचे दर भिन्न भिन्न आहेत. महापालिकेचे 2012-13 चे मत्ता दायित्व विवरण पत्र (नमुना क्र. 29) नुसार वसुल न केलेले कर / फी इत्यादी ची एकुण रक्कम रु. 4214 लक्ष दाखविली आहे. परंतु विभागाच्या / प्रभागाच्या मागणी वसुली थकबाकीची विवरण पत्रे संबंधीताने सादर न केल्याने, प्रत्यक्षात नोंदवहया सोबत थकबाकीच्या रकमा तपासून पाहता आल्या नाहीत. त्यामुळे मत्तेची नेमकी स्थिती निश्चित करता येत नाही.

स्थानिक संस्था कराचे बाबत अंदाजपत्रकात जमा बाजुला रु. 26000 लक्ष तरतुद करण्यात आली होती. प्रत्यक्षात 2012-13 मधील वसुली रु. 16940 लक्ष करण्यात आली आहे. म्हणजेच थकबाकी रु. 9060 लक्ष इतकी आहे. परंतु मत्ता दायित्व विवरण पत्रात वसुल न केलेल्या कराच्या रकमेत सदरची रक्कम दाखविली नाही. याबाबत विभाग प्रमुखासोबत चर्चा केली असता स्थानिक संस्था कराची आकारणी (असेसमेंट) न झाल्याने या कराची मागणी निश्चित झाली नाही. त्यामुळे वसुल न झालेली रक्कम मत्ता बाजुला दाखविली नाही, असे समजते. 2012-13 या वर्षाचे असेसमेंट करण्यासाठी महानगरपालिकेच्या संबंधीत विभागाने सनदी लेखापालाचे पॅनल ठेका पध्दतीने घेतले असतानाही सदरचे काम झाले नाही. त्यामुळे मत्तेची नेमकी स्थिती निश्चित करता येत नाही.

2) बांधकाम व पुरवठयाच्या संदर्भात प्रलंबित देयकांची रक्कम रु. 345.73 लक्ष आहे.

3) मनपाकडे ठेवलेल्या ठेवींची शिल्लक नोंदवही नुसार (नमुना नं. 147) रु. 6946.20 लक्ष आहे. परंतु दायित्व बाजुला ठेवींची शिल्लक रु. 5994.33 लक्ष दाखविली आहे. दोन्ही आकडेवारीत तफावत रु. 951.87 लक्ष आहे.

4) महानगरपालिकेने विभाग प्रमुखांना कामासाठी दिलेल्या अग्रीमांची थकीत (अग्रीम नोंदवही नुसार) रक्कम रु. 642.56 लक्ष इतकी आहे. परंतु मत्ता बाजुला अग्रीम रु. 642.66 लक्ष दाखविली आहे. फरक रु. 0.10 लक्ष आहे. महापालिकेचे 2012-13 चे मत्ता दायित्व विवरण पत्र अभिलेख्याशी जुळत नाही.

5) मत्ता दायित्व विवरण पत्रात अखर्चीत अनुदानाची रक्कम रु.4345.69 लक्ष इतकी आहे. महापालिकेने विवरण पत्र क्र. 2 लेखा परिक्षणास सादर केले आहे. त्यानुसार ती रक्कम जुळते. केंद्र व राज्य प्राप्त् अनुदानातुन वेळीच कामे झाली नाहीत असे दिसुन येते. तसेच अनुदानाच्या अखर्चीत रकमावर मिळणारे व्याज हे महापालिकेचे उत्पन्न नसुन, भविष्यात व्याजाच्या रकमेइतके अनुदान कमी मिळणार आहे. याचा विचार होणे आवश्यक आहेत.

6) न वटविण्यात आलेल्या धनादेशाची माहिती लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही.

7) वार्षिक जमा खर्च व मत्ता दायित्वे विवरण पत्राचे अवलोकन करता, महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम, 2011 कलम 95 (अ) नुसार पाणी पुरवठा व जल नि:सारण सेवा, मल नि:सारण व कचरा विल्हेवाट, सार्वजनिक परिवहन सेवा, दिवाबत्ती सेवा या स्वयंपूर्ण नाहीत. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

रुपये लाखात

अ.क्र.	सेवेचे नाव	2012-13 उत्पन्न	2012-13 खर्च	एकुण तुट	शेकडा तुट	शेरा
1.	पाणी पुरवठा व जल नि:सारण सेवा	3589.54	5174.14	-1584.60	-30.63	सदरची तुट नवीन नळ जोडणी / जोडणी आकार / विकास

						शुल्कातुन, भरुन काढण्याचे प्रस्तावित.
2.	मल नि:सारण व कचरा विल्हेवाट	862.38	7264.02	-6401.64	-88.13	सदरची तुट मालमत्ता कर, स्थानिक संस्था कर, बाजार फी यातुन भरुन काढण्याचे प्रस्तावित.
3.	सार्वजनिक परिवहन सेवा (बांधा वापरा हस्तांतरीत करा)	0	89.05	-89.05	-100	योजनेपासुन रॉयल्टी स्वरुपात नाम मात्र उत्पन्न प्राप्त होणार आहे. भांडवली खर्च हा थेट परिवहन सेवेवरील खर्च नाही. अनुषंगिक महसुली खर्च मालमत्ता कराच्या उत्पन्नाच्या 15% अनुज्ञेय असल्याने यातुन भरुन काढण्याचे प्रस्तावित.
4.	दिवाबत्ती सेवा	0	1351.09	-1351.09	-100	दिवाबत्ती सेवे वरील तुट मालमत्ता कर व स्थानिक संस्था कराच्या उत्पन्नातुन भरुन काढण्याचे प्रस्तावित.

उपरोक्त अर्थ सहाय्य देऊन पुरविलेल्या सेवा बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 95 (अ) नुसार - विभागाने स्थायी समितीला अहवाल सादर केल्याचे समजते. याबाबत स्थायी समितीच्या निर्णयाची / ठरावाची प्रत उपलब्ध झाली नाही.

8) **<u>वार्षिक लेख्याबाबत :-</u>**

अ.क्र.	वित्तिय वर्ष	प्रशासनाने वार्षिक लेखे स्थायी समितीकडे सादर	स्थायी समितीने मंजूरी दिल्याचा ठराव क्र. व	शेरा

		केल्याचा दिनांक	दिनांक	
1	2010-11	नमुद नाही	04, दि. 23/08/11	मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 94 व कलम 106(3), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर मागील वर्षाच्या संपुर्ण लेख्या वरील अहवाल/वार्षिक लेखे स्थायी समिती पुढे सादर करुन मंजुर करुन घेणे आवश्यक.
2	2011-12	नमुद नाही	709, दि. 30/11/12	
3	2012-13	नमुद नाही	813, दि. 25/09/13	

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 कलम 94 नुसार वार्षिक लेख्या सोबत प्रशासन अहवाल स्थायी समितीस सादर केला नाही.

ब) मागील तीन आर्थिक वर्षात महानगरपालिकेचे वार्षिक लेखे स्थायी समितीकडे उशिरा सादर केले आहेत असे दिसून येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2011 कलम 94 नुसार एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर लवकरांत लवकर मागील सरकारी वर्षातील जमा-खर्चाचे लेखे स्थायी समितीस सादर करावयाचे आहेत. वरील विवरणपत्रानुसार मागील तीन वर्षे ते अनुक्रमे ऑगस्ट, नोव्हेंबर, व सप्टेंबर महिन्यात सादर केल्याचे दिसून येते.

कराची नियमित वसुली केल्यास व कराच्या दरात समानता आणल्यास, स्थानिक संस्था कराचे वेळीच असेसमेंट केल्यास, मालमत्तांच्या भाडयाच्या दराचे नियमित नुतनीकरण केल्यास, प्रचलित बाजार भावाचा विचार करुन उत्पनाचे स्त्रोत वाढविण्याचे प्रयत्न केल्यास, महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊन जुन्या कर्जाचे दायित्व कमी होण्यास मदत होईल. वसई-विरार शहर महानगरपालिकेची स्थापना 03 जुलै, 2009 रोजी झाली. त्यापुर्वी अस्तीत्वात असलेल्या चार नगर परिषदांनी दीर्घ मुदतीची कर्जे घेतली होती. सदरची कर्जे दीर्घ मुदतीची असल्यामुळे प्रलंबित आहेत.

DATPMVM6001 (Ref No : 85, Hmm No : 155)

2 अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत.

अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

महापालिकेने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा वसुलीचे प्रमाण कमी आहे. शासकिय अनुदाने वेळीच प्राप्त होण्यासाठी पूरेसे प्रयत्न केल्याचे दिसुन येत नाहीत.

वसई विरार शहर महानगरपालिकेचे 2012-13 वित्तिय वर्षाच्या अपेक्षित उत्पन्नापेक्षा कमी रक्कम जमा झाली, आणि मंजुर अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जादा खर्च झाला होता. त्यासाठी महापालिकेने सुधारित अर्थसंकल्पाव्दारे त्यास मंजूरी दिली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका वित्तिय वर्ष 2012-13 यावर्षाचे वार्षिक लेखे व अंदाज पत्रकाचे अवलोकन केले असता खालील प्रपत्रात नमुद केल्यानुसार महापालिकेला अर्थ संकल्पीय तरतुदीनुसार अपेक्षित उत्पनापेक्ष कमी उत्पन्न प्राप्त झाले आहे. **त्याचा तपशिल पुढील प्रमाणे-**

रुपये लाखात

अ.क्र.	जमा बाबीचा तपशिल	2012-13 सुधारित अंदाज रू.	2012-13 प्रत्यक्ष जमा रक्कम रू.	तफावत रू.
1	**2**	**3**	**4**	**5**
1.	एकत्रित मालमत्ता कर व दिवाबत्ती	5832	5212	620
2.	स्थानिक संस्था कर	26000	16940	9060
3.	जाहिरात कर	52	44	08
4.	मोकळया बिनशेती जमिनीवरील कर	15	02	13
5.	विशेष अग्निशमन कर	134	127	07
6.	नगररचना छाननी शुल्क	300	279	21
7.	नगररचना विकास शुल्क	6300	4860	1440
8.	नगररचना पुर्नवैधिकरण शुल्क	12	10	02
9.	नगररचना सुरक्षा अनामत	500	420	80
10.	नगररचना व्याज	215	174	41
11.	फायर प्रोटेक्शन फी	1700	1666	34
12.	हस्तांतरणीय चटई क्षेत्र प्रिमियम	500	0	500
13.	इमारत भाडे व गाळा भुई भाडे	40	31	09
14.	वैद्यकिय संस्थाचे उत्पन्न	94	90	04

वसई विरार मनपा

15.	बाजार फी/हातगाडी फेरीवाले	297	295	02
16.	तलाव लिलाव, नौका विहार	134	52	82
17.	बी.ओ.टी. त्ववावरील रॉयल्टी	05	0	05
18.	जमिन महसुल अनुदान	100	0	100
19.	वाचनालय अनुदान	06	0	06
20.	रस्ता अनुदान	325	60	265
21.	करमणूक कर अनुदान	500	13	487
22.	शिक्षण कर रिबेट	18	11	07
23.	सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना	25	10	15
24.	जुन्या भांडाराची विक्री	54	34	20
25.	निविदा फॉर्म व प्रकाशने विक्री	122	91	31
26.	जनगणना सर्व्हेक्षण प्रतिपूर्ती	200	124	76
27.	कंत्राटदार व पुरवठादार दंडाची रक्कम	06	01	05
28.	रुग्णालय व इतर ना-हरकत दाखला नुतनीकरण	11	08	03
29.	नवीन इमारत गाळा भाडे व अधिमुल्य रक्कम	100	0	100
30.	एम.एम.आर.डी.ए. कडुन उडडाण पुल अनुदान	300	100	200
31.	एम.एम.आर.डी.ए. रेल्वे फाटक क्र. 41 अनुदान	300	0	300
32.	भविष्य निर्वाह निधी	296	292	04
33.	वसुली योग्य अग्रीम	12596	21	12575
34.	सुरक्षा अनामत	22	0	22
35.	सॅटे लाईट सिटी योजना राज्य अनुदान	331	166	165
36.	सॅटे लाईट सिटी योजना केंद्र अनुदान	2649	1325	1324
37.	असाधारण जमा	500	03	497
38.	पाण्यावरील विशेष कर	3901	3484	417
39.	विशेष स्वच्छता कर	762	0	762
40.	नळ जोडणी फी/शुल्क	18	07	11
41.	पा.पु.अनधिकृत नळ जोडणी दंड	04	0	04
42.	मैला टँकर भाडे	05	0	05
43.	सुलभ शौचालय भाडे	03	0	03
44.	रस्ते खोदाई शुल्क	11	05	06
एकुण		**65295**	**35957**	**29338**

लेखा परिक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र 170, दि. 05/11/2014 अन्वये खुलासा विचारला होता. मुख्य लेखाधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र. निरंक, दि. 07/11/2014 अन्वये खुलासा केला आहे. त्यानुसार कराचे उत्पन्न मागणीनुसार गृहीत धरले असुन वसुलीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत, 100% वसुली करण्याची नोंद घेतली आहे, खर्चाचे बाबत अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्च झालेला नाही, त्यासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार केलेले आहे, असे नमूद केले आहे. म्हणजेच वसुलीसाठी पुरेसे प्रयत्न झाल्याचे आढळून येत नाही. याबाबत लेखापरीक्षणाचा अभीप्राय पुढील प्रमाणे आहे. वरील प्रमाणे वसुलीसाठी वापरलेले मनुष्यबळ व त्यावर झालेल्या खर्चाची तुलना करता वसुलीसाठी पुरेशी कार्यवाही झाल्याचे आढळुन येत नाही. तसेच शासकिय अनुदाने वेळीच प्राप्त होण्यासाठी पाठपुरावा केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे एकत्रीत मालमत्ता कर, स्थानिक संस्था कर, नगरविकास शुल्क, इत्यादि कराची मोठी थकबाकी शिल्लक राहिली. रस्ता अनुदान, करमणूक कर अनुदान, जनगणना प्रतिपुर्ती अनुदान, उडडाण पुल अनुदान, रेल्वे फाटक अनुदान वित्तीय वर्षात पुर्णपणे प्राप्त झाले नाही.

महानगरपालिकेला जी शासकिय अनुदाने प्राप्त झाली आहेत. त्यातुन वेळीच खर्च केला नाही. सुधारित जमेचे अंदाजपत्रक रु. 93221 लक्ष रुपयाचे असताना प्रत्यक्षात जमा रु. 62522 लक्ष झालेले आहे. तर सुधारित खर्चाचा अंदाज रु. 92876 लक्ष रुपयाचा असताना प्रत्यक्षात खर्च रु. 41479 लक्ष केला आहे. एकंदरीत अंदाज पत्रकानुसार जमा किंवा खर्च केलेला नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 95 व महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम, 2011 कलम 95 नुसार जमा रकमा व उत्पन्नाचा अंदाजानुसार काम न झाल्याने अर्थसंकल्पानुसार उत्पन्न प्राप्त न झाल्याने खर्च करता आला नाही. म्हणजेच महागनरपालिकेने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकानुसार वसुली झाली नाही. कामे/खर्च झाला नाही.

DATPMVM6001 (Ref No : 89, Hmm No : 170)

3 महानगरपालिकेने केलेल्या गुंतवणुका बाबत.

गुंतवणुका बाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

महापालिकेने शिल्लकी पैशांची गुंतवणुक राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, खाजगी बँकेमध्ये केली आहे. परंतु सहकारी बँकेत व खाजगी बँकेत गुंतवणुक करतांना शासनाची मंजूरी घेतली नाही.

महानगरपालिकेच्या 14 निधींची गुंतवणूक वेळोवळी केल्याचे दिसुन आले. यासाठी गुंतवणूक नोंदवहीची तपासणी करता त्यात दि. 31/03/2013 अखेर पुढील प्रमाणे गुंतवणूका असल्याचे आढळुन आले.

वसई - विरार शहर महानगरपालिका		
गुंतवणूक नोंदवहीचा गोषवारा		
निधीचे नाव		गुंतवणूक नोंदवहीची शिल्लक असलेली रक्कम रुपये
सर्वसाधारण निधी		
सर्वसाधारण रोकडवही	एकुण	4215218302.39
प्रभाग समिती 'ब'	एकुण	35000000.00
जल मल प्रवाह निधी	एकुण	196690753.00
वृक्ष निधी	एकुण	0.00
कर्ज निवारण निधी	एकुण	0.00
सॅटेलाईट सिटी	एकुण	6610718.00
	एकुण	**4453519773.39**
इतर निधी		
भविष्य निर्वाह निधी	एकुण	72707515.00
पाणी पुरवठा राखीव निधी	एकुण	0.00
वेतन राखीव निधी	एकुण	37989887.39
प्राथमिक शिक्षण निधी	एकुण	20100579.00
वैयक्तीक शौचकूप निधी	एकुण	0.00

घसारा निधी	एकुण	1702870.00
सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना निधी	एकुण	3104148.00
निवृत्ती वेतन निधी	एकुण	23392210.00
परिभाषित अंशदान	एकुण	75000.00
	एकुण	**159072209.39**
	एकुण एकंदर	**4612591982.78**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 92 नुसार शिलकी पैशाची गुंतवणूक करावयाची आहे. शक्यतो गुंतवणूक करताना राष्ट्रीयकृत बँकेत करणे गरजेचे आहे. सहकारी बँकेत किंवा खाजगी बँकेत गुंतवणूका करताना शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे. याबाबत लेखा परीक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 171, दि. 05/11/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्रमांक निरंक दि. 07/11/2014 अन्वये खुलासा केला आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या स्थापनेपुर्वी तत्कालीन संस्थांनी केलेल्या गुंतवणुका 2012-13 पर्यंत सुरु होत्या, त्यांपुढे टप्प्या-टप्प्याने वटवलेल्या असून अन्यत्र गुंतवलेल्या आहेत, कराची खाती विविध स्थानिक खाजगी बँकेत उघडली असून त्यांना ठराविक कालावधी नंतर रक्कमा मुदत ठेवीत वर्ग करण्यरासाठी प्राधिकृत केले आहे. असे नमुद केले आहे. म्हणजेच सहकारी बँकेत व खाजगी बँकेत महापालिका निधीची खाती असून अशा बँकात गुंतवणुका केलेल्या आहेत. याबाबत लेखापरीक्षणाचा अभीप्राय पुढील प्रमाणे आहे. महानगरपालिकेने शिलकी निधीची गुंतवणूक केल्याचे लेखा परिक्षणाच्या वेळी आढळुन आले. काही गुंतवणूका सहकारी बँका उदा. टी.डी.सी. बँक, बसीन कॅथलिक बँक, पत पेढया यामध्ये केल्याचे दिसुन येते. तसेच खाजगी बँका उदा. ॲक्सीस बँक, एच.डी.एफ.सी. बँक यामध्ये केल्याचे दिसुन येते. या प्रकरणी विभाग प्रमुखासोबत चर्चा केली असता, खाजगी बँका महानगरपालिकेला चांगली व जलद सेवा उपलब्ध करुन देतात. तसेच जुन्या ग्रामपंचायत कालीन सहाकरी बँकेतील गुंतवणूकांची फेर गुंतवणूक केल्याचे सांगण्यात आले. तथापि अशा सहकारी बँकामध्ये किंवा खाजगी बँकामध्ये गुंतवणूक करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 92 व महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम, 2011 कलम 92 नुसार शासनाची मंजुरी घेतलेली नाही. त्यामुळे अशा ठिकाणी ठेवलेल्या गुंतवणूकीमुळे भविष्यात काही नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहील.

DATPMVM6001 (Ref No : 90, Hmm No : 171)

4 महानगरपालिकेने व्दिनोंदी पध्दतीने लेखे ठेवण्यासाठी सनदी लेखा पालाची नेमणुक केली आहे.

व्दिनोंदी पध्दतीने लेखे ठेवण्यासाठी सनदी लेखा पालाची नेमणुक करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

विभागाने जुनी पध्दती व व्दिनोंदी पध्दतीने लेखे ठेवले आहेत, परंतु त्यासाठी संबंधीत मोडयुल तयार केली नाहीत. गुंतवणूकीचे यादीत अॅक्रुड (Accrued) व्याजाची परिगणना केली नाही. कराच्या येणे रकमा/ दायित्वाबाबत विभाग प्रमुखाच्या अहवालानुसार नोंदी घेतल्या आहेत. अग्रीमाच्या समायोजन नोंदी वेळीच घेतल्या नाहीत. लेखा विभागाप्रमाणे इतर विभागाने दुहेरी नोंद पध्दतीने लेखे ठेवण्याचा प्रयत्न केला नाही.

योजना संकेतांक : 043-2490 शाखा संकेतांक : 07 लेखा विभाग

महानगरपालिकेने व्दिनोंदी पध्दतीने (Accrual Based Double Entry Accounting System) लेखे ठेवण्यासाठी सनदी लेखापालाची नेमणुक केली आहे.

निविदा नोटीस दि. 09/11/2010 नरवीर चिमाजी
निविदा मंजुरी आयुक्तांनी दिली आहे.

प्राप्त निविदा अ) मे चतुर्वेदी अॅण्ड पार्टनर मुंबई	रु. 1326600
ब) मे. व्हेलेरीयन रॉड्रीक्स अॅण्ड कंपनी, विरार	रु. 1655000
क) मे. चतुर्वेदी अॅण्ड कंपनी मुंबई	रु. 1103000

या पैकी एल 1 निविदा म्हणुन चतुर्वेदी अॅण्ड कंपनी मुंबई यांची निविदा स्विकारली आहे. करार दि. 19/11/2010 कार्यादेश क्र. 6326, दि. 23/11/2010

सनदी लेखापालाने महागनरपालिकेच्या सर्व मालमत्तांची यादी करणे, पडताळणी करणे, मुल्य निश्चित करणे, व्दिनोंदी लेखा पध्दती अमंलबजावणी करुन कामकाज करणे, नॅशनल म्युनिसिपल अकाऊंट मॅन्युअल प्रमाणे मनपाचे लेखे पारदर्शी व सत्य परिस्थिती दर्शविण्याचे काम करावयाचे आहे. त्यांना ओपनिंग बॅलन्स शिट दि. 03/07/2009 ची करावयाची असुन सन 2009-10, 2010-11, 2011-12 पर्यंत काम देण्यात आले होते.

लेखा परिक्षण कालावधीच्या पुर्वी रु. 400000 प्रदान केले.
प्रमाणक क्र. 4519, दि. 30/03/13 रु. 400000 प्रदान

2013-14 मध्ये उर्वरित रु. 313300 चे प्रदान केले आहे.

2012-13 चे काम उपरोक्त सनदी लेखापालाला दिले नव्हते. 2012-13 पासुन नवीन सनदी लेखा पाल म्हणून मे. टंडन अर्बन सेल्युशन प्रा.लि. यांची नेमणूक केली आहे. (मासिक रु. 190000 + सेवा कर) 2012-13 नंतर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्याने लेखा परिक्षण कालावधीत त्याना प्रदान केले नाही. 2012-13 ची बॅलन्स शिट लेखा परिक्षणास सादर केली. याबाबत लेखा परिक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 163, दि. 31/10/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र. निरंक, दि. 07/11/2014 अन्वये खुलासा केला आहे. त्यानुसार मालमत्तेची प्रत्यक्ष पडताळणी करुन नोंदी घेतल्या आहेत. मत्ता दायित्व पत्रकात गुंतवणूका व बचत खात्याच्या शिलकेचा मेळ घेतला आहे, येणे रकमाबाबत / दायित्वाबाबत विभाग प्रमुखाने अहवाल दिले आहेत, अग्रीम समायोजनाबाबत नोंदी घेतल्या आहेत, अन्य विभागाने दुहेरी नोंद पध्दतीने लेखे ठेवण्याची नोंद घेतली आहे, असे नमुद केले आहे. म्हणजेच याबाबतचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) लेखा विभागाने दोन्ही पध्दतीने म्हणजे जुनी पध्दती व व्दिनोंद पध्दतीने लेखे ठेवण्याचे काम केले आहे. परंतु महानगरपालिकेचे इतर विभागानी त्यांचे कामासाठी संबंधीत मोडयूल तयार करुन त्यांचा वापर केलेला दिसुन येत नाही. त्यामुळे प्रत्यक्षात व्दिनोंदी पध्दतीचे काम प्रभावीपणे झालेले नाही. मनपा प्रमाणित केलेल्या फिक्स असेटची नोंद ते प्रत्यक्ष ताब्यात मिळाल्याच्या तारखेची किंवा कामाच्या मुल्यानुसार घेतली आहे. त्याचा ऐतिहासिक डाटा मिळाला नाही. किंवा घसारा दाखवताना नॅशनल म्युनिसिपल अकाऊंट मॅन्युअल प्रमाणे दाखवला नाही. मनपाने स्ट्रेट लाईन् घसारा दाखवला आहे. विभाग प्रमुखाने प्रमाणित केल्यानुसार पुर्ण झालेल्या कामाच्या नोंदी घेतल्या आहेत. फिजिकल व्हेरीफिकेशन झाले नाही. म्हणजे नोंदी परिपुर्ण नाहीत.

2) गुंतवणुकीची यादी विभागाने दिली आहे. त्यासोबत Interest Accrued But Not Received Till Date याबाबतची माहिती दिली नाही. करंट असेट बाबत बँकेच्या पासबुकात असलेली शिल्लक आणि प्रत्यक्षात कॅशबुकात दाखवलेली बँकेची शिल्लक यात तफावत आहे. बँक ताळमेळ पत्राचा विचार करुन करंट असेट दाखविता येत नाही. याचाही विचार होणे जरुरीचे आहे.

3) रिसिवेबल अमाऊंट जसे इस्टेट, प्रापर्टी टॅक्स, वॉटर टॅक्स, विभाग प्रमुखाच्या अहवालानुसार नोंदी घेतल्या आहेत. तसेच स्थानिक संस्था कराचे बाबत संबंधीत विभागाने आकारणी (असेसमेंट) न केल्याने त्याची रक्कम रिसिवेबल अंमाऊंट म्हणून दाखविली नाही.

4) दायित्वाबाबत विभाग प्रमुखाच्या प्रमाणपत्राच्या आधारे लेख्यात नोंदी घेतल्या आहेत. महानगरपालिकेमध्ये थर्ड पार्टी लेखा परिक्षणाची पध्दत नाही.

5) अग्रीमाबाबत समायोजित नोंदी प्रलंबित आहेत. तसेच मोबीलायझेशन ॲडव्हान्स बाबत वसुलीच्या नोंदी बांधकाम विभागाने देयक सादर करुन प्रदान होईपर्यंत समायोजित होत नाहीत. त्यामुळे ताळमेळ पत्रकात (बॅलन्स शिट) परिपुर्ण नोंदी होत नाहीत.

वसई विरार मनपा

6) लेखा विभागाने दुहेरी नोंद पध्दतीने लेखे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या अन्य विभागाने लेखे ठेवणे आवश्यक आहे.

एकंदरीत नॅशनल म्युनिसिपल अकाऊंट मॅन्युअल प्रमाणे महानगरपालिकेने आपले लेखे व्दिनोंदी पध्दतीने ठेवले नाहीत

DATPMVM6001 (Ref No : 92, Hmm No : 163)

5 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रदान करतांना ठेकेदाराकडून आयकर व सुरक्षा अनामत रक्कमा कमी वसुली केल्याबाबत

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता,गटारे,नाले सफाईचा ठेका

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :आरोग्य मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 4759750.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4710750.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 49000.00/-

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता,गटारे,नाले सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे नाले खोदाई कामाचे प्रदान करतांना देय रक्कमेवर होणाऱ्या आयकर व सुरक्षा अनामत रक्कमेची वसुली कमी केली आहे.

घनकचरा व्यवस्थापन योजने अंतर्गत ठेकेदाराला प्रदान करतांना अनियमितता आढळून आल्या. याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.16 दि.18/06/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाचे पत्र क्र.55 दि. 24/06/2014 नुसार खुलासा केला. परंतु सर्व बाबींचा खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. प्रमाणक क्र. 3779, दि.08/02/2013 रु.47,59,750/- मे. साई गणेश एंटरप्रायझेस यांना

घनकचरा व्यवस्थापनाचा ठेका,

नालासोपारा प्रभागातील झोन क्र. ब,

ठेकेदाराला महानगरपालिकेच्या मालकीचे कॉम्पॅक्टर वापरण्यासाठी उपलब्ध करुन दिली होती. त्याचा दर स्थायी समितीने ठरवल्याप्रमाणे वसुल करावयाचा होता. आरोग्य विभाग नालासोपारा प्रभागाने स्थायी समिती ठराव क्र. 713, दि. 07/12/2012 अन्वये मे. साई गणेश एंटरप्रायझेस यांच्याकडून कॉम्पॅक्टर भाड्याची वसुल करावयाची रक्कमरु.7,00,000 दाखविली आहे. ठेकेदाराच्या देयकातुन सदरची रक्कम वसुलपात्र असल्याची दिसून येते. घनकचरा व्यवस्थापन ठेकेदारास देय असलेल्या रक्कमेवर प्रथम होणाऱ्या आयकराची रक्कम रु.95195/- व सुरक्षा अनामत रक्कम रु.237988/- अशी एकुण रक्कम रु. 333183/- वसुल करून, उर्वरित रक्कम रु.4426567/- देय होती. त्या देय रकमेतुन कॉम्पॅक्टर भाड्याची रक्कम रु.700000/- वसुल करणे आवश्यक होते. परंतु देयकात लेखा शाखेकडून केलेल्या सुधारणांचा विचार करता एकूण देयकातुन (रु.4759750) प्रथम कॉम्पॅक्टर भाड्याची रक्कम वसुल केली आहे आणि त्यानंतर उर्वरीत रक्कमेवर (रु.4059750) आयकराची व सुरक्षा अनामतेची वसुली केली आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

	होणारी आयकराची	होणारी सुरक्षा अनामतीची	कपात केलेली	कमी वसुली
एकूण देयकाची रक्कम रु. 4759750/-	95195	-	81195/-	14000/-
कॉम्पॅक्टर भाड्याची रक्कम रु. 700000/-		237988/-	202988/-	35000/-
रु. 4059750/-				

महानगरपालिकेच्या मालकीच्या कॉम्पॅक्टरच्या भाड्याची रक्कम देयकातुन वसुली केल्यानंतर उर्वरित रकमेनुसार आयकराची व सुरक्षा अनामतेची रक्कम वसुल केली आहे. त्यामुळे या रक्कमांची वसुली कमी झाली आहे. उपरोक्त कमी वसुली केलेली आयकराची रक्कम रु.14000 संबंधिताकडून वसुल करून शासनाच्या आयकर खाती भरणा करावी व सुरक्षा अनामतीची कमी वसुली केलेली रक्कम रु. 35000 संबंधिताकडून वसुल करून सुरक्षा अनामत लेखा शिर्षाखाती जमा करावी.

2) अशा प्रकारे किती देयकांचे बाबत आयकर व सुरक्षा अनामत रक्कमेची कमी वसुली केली आहे याची पडताळणी करावी व अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

DATPMVM6001 (Ref No : 6, Hmm No : 16)

6 आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत केलेल्या कामाविषयी अनियमीतता

आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग राज्य शासन अनुदान निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 19767000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3810400.00/-

अनुदानाची रक्कम वित्तिय वर्षअखेर अखर्चीत राहीली, 1 ते 2 वर्कींग सिजण मध्ये काम पूर्ण झाले नाही. योजनेचे स्वतंत्र हिशेब व रोखवही ठेवली नाही आणि रक्कम रु.3810400/- खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

मा. जिल्हाधिकारी यांचेकडील आदेश क्र. 642. दि. 31/03/2012 अन्वये रक्कम रु. 19767000/- उपलब्ध करून दिली आहे व सदरच्या 18 कामांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे.

अ.क्र.	कामाचे नांव	गावाचे व तालुक्याचे नांव	प्रशासकीय मंजूरीची रक्कम रु. (लाखात)	प्राकलन रु.	ठेकेदाराचे नांव	खर्च रु.	कामाची स्थिती
1	मौजे बोळींज स.नं.492 मध्ये सामाजिक सभागृह बांधणे	मौजे बोळींज स.नं.492	15.00	2101135	मे. बाबा कंस्ट्रक्शन	-	कार्यादेश दि. 22/01/13 अपुर्ण
2	बोळींज येथील रानपाडा येथे स्मशानभूमि बांधणे	बोळींज रानपाडा	5.44	544183	मे. जय कंस्ट्रक्शन	574969	काम पुर्ण
3	बोळींज प्रभाग समिती हद्दीतील उमराळा, करमाळा येथील स्मशान भूमीचे शेड बांधणे.	बोळींज उमराळा, करमाळा	15.00	1831660	मे. बाबा कंस्ट्रक्शन	-	कार्यादेश दि. 03/10/13 अपुर्ण
4	अण्णासाहेब वर्तक वसाहत येथे सामाजिक सभागृह बांधणे.	अण्णासाहेब वर्तक वसाहत	5.07	507282	-	-	फेर निविदा
5	बोळींज येथील साई समर्थ नगर येथे उद्यान विकसीत करणे	बोळींज साई समर्थ नगर	9.81	981732	मे.संजय कंस्ट्रक्शन	-	कार्यादेश दि. 03/10/13 अपुर्ण
6	वर्धमान नगर येथेतलावाचे कुंपण, तलाव स्वच्छ करणे, प्रकाश योजना व मार्गिका करणे.	वर्धमान नगर	5.00	7478552	मे. बाबा कंस्ट्रक्शन	-	कार्यादेश दि. 01/02/13 अपुर्ण

7	प्र.क्र.49 मधील आचोळे बकीजवळ नाना नानी पार्क (उद्यान) विकसित करणे	प्र.क्र.49 आचोळे	10.00	1407102	मे. व्दारका कंस्ट्रक्शन	-	कार्यादेश दि. 12/10/12 अपुर्ण
लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.151, दि.27/10/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र.निरंक, दि.11/11/2014 अन्वये केलेला खुलासा तपासला. प्रभागाने केलेल्या गुंतवणूकीच्या पावत्या तपासल्या अनुपालन व संबंधीत नोंदवहया तपासल्या. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे देण्यांत येत आहेत.

1) सर्व साधारण रोखवही दिनांक 31/03/2013 अखेर शिल्लक

2) बँकेचे नाव रोखवहीतील रक्कम पास बुकातील रक्कम तफावत

युनियन बँक रु. 59490354 रु. 83283600 रु. 23793246

बचत खाते (क्र. 320602010061937)

रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही. बँकेतील शिल्लक रोखवहीतील शिल्लकेपेक्षा रु.23793246 ने जादा आहे.

रोखवहीत 31 मार्च 2013 रोजी प्रभारी लेखापाल यांची सही आहे. परंतु महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता,

1971 नियम 51 नुसार रोखडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्यांने स्वाक्षरी केली नाही. माहे मार्च, 2013 मधील कोणत्याही दिवशी प्राधिकृत अधिकाऱ्यांने स्वाक्षरी केली नाही.
2) महानगरपालिका अंतर्गत लेखा परिक्षा विभागाने सदर रोखवहीतील तपासणी केल्याचे दिसुन येते. परंतु त्यांच्या कडील अहवाल अप्राप्त आहे.

3) परिभाषिक रोखवहीबाबत - दि. 31/03/2013 अखेर शिल्लक

बँकेचे नाव	रोखवहीतील रक्कम	पास बुकातील रक्कम	तफावत
युनियन बँक	रु. 889640	रु. 841106	रु. 48534

बचत खाते (क्र. 320602010061939)
रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही. बँकेतील शिल्लकेपेक्षा रोखवहीतील शिल्लक रु.48534/- ने जादा आहे.

4) भविष्य निर्वाह निधी - दि. 31/03/2013 अखेर शिल्लक

बँकेचे नाव	रोखवहीतील रक्कम	पास बुकातील रक्कम
युनियन बँक	रु. 19729713	रु. 3298169

बचत खाते (क्र. 320602010061942)
रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ लेखा संहिता 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही.
भ.नि.नि. च्या शिल्लक रकमेवर कर्मचाऱ्यांना व्याज दयावे लागते. 2012-13 वित्तीय वर्षात व्याजाचा दर सुमारे 8.50% आहे. त्यामुळे या खात्यातील रक्कम जास्तीत जास्त व्याज देणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणे आवश्यक आहे. पासबुकात दिसणारी रक्कम रु.3298169 आहे. यापैकी सुमारे रु.2000000 ची अल्पमुदतीमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही प्रभागाने केली नाही.

5) निवृत्ती वेतन निधी - दि. 31/03/2013 अखेर शिल्लक

बँकेचे नाव	रोखवहीतील रक्कम	पास बुकातील रक्कम	तफावत
युनियन बँक	रु. 1253183	रु. 1289552	रु. 36369

बचत खाते (क्र. 320602010061940)
रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही.

6) पाणी पुरवठा रोखवहीबाबत - - दि. 31/03/2013 अखेर शिल्लक

बँकेचे नाव	रोखवहीतील रक्कम	पास बुकातील रक्कम	तफावत
युनियन बँक	रु. 1610849	रु. 3084682	रु. 1473833

बचत खाते (क्र. 320602010061938)
रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही.

7) अनामत रोखवही बाबत - दि. 31/03/2013 अखेर शिल्लक

बँकेचे नाव	रोखवहीतील रक्कम	पास बुकातील रक्कम	तफावत
युनियन बँक	रु. 10033092	रु. 9961880	रु. 71212

बचत खाते (क्र. 320602010061943)

रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही.

अ) प्रभाग समिती बांधकाम विभागाने 9 सामान्य पावती पुस्तके वापरल्याचे समजते. परंतु त्यांची नोंद साठा नोंदवहीत घेतलेली नाही.

ब) सामान्य पावती क्र. 30730, दि. 25/02/2013 रक्कम रु. 342075/-. श्री. विनोद भा. पाटील विरार यांना भंगार साहित्याची विक्री केली म्हणुन रु. 342075/- वसुली केल्याचे दिसुन येते. सदरची नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही. कोणते भंगार साहित्य विकले, किती विकले याचा तपशिल उपलब्ध झाला नाही. विक्री केलेल्या साहित्याबाबतची जंगम मालमत्ता नोंदवहीतील नोंद उपलब्ध झाली नाही. प्रभागास किती मर्यादेपर्यंत भंगार विक्रीचे अधिकार आहेत. याबाबतचे स्थायी आदेश उपलब्ध करुन दिले नाहीत.

क) अनामत रोखवहीत जमा बाजुला पुढील प्रमाणे रकमांची नोंद आहे.

दि. 30/03/2013 - बांधकाम विभाग सुरक्षा अनामत-	रु. 725242
(दि. 02/02/13 ते 30/03/13) बांधकाम विभाग इसारा रक्कम-	रु. 149556
(दि. 06/02/13 ते 30/03/13) आरोग्य विभाग इसारा रक्कम-	रु. 5000
भांडार सुरक्षा अनामत रक्कम-	रु. 15000
भांडार इसारा रक्कम-	रु. 15000
अतिक्रमण सुरक्षा रक्कम -	रु. 30000
आरोग्य विभाग इसारा रक्कम- (दि. 04/12/12 ते 05/12/12)	रु. 70000
एकुण रकक्म	1009798

या जमा रकमाच्या बाबत - वसुलीच्या पावत्या व चलने लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दिली नाहीत. तसेच विभागाच्या जमा रकमांची दाखविलेली तारीख जी कंसात दाखविली आहे ती पाहता या रकमा वसुल केल्यानंतर सुमारे दोन महिन्यानंतर महानगरपालिका फंडात रकमा जमा केल्याचे दिसुन येते.

ड) अनामत नोंदवही नमुना नं. 147 नुसार दि. 31/03/2013 रोजी असलेली शिल्लक अनामतीची रक्कम रु. 10302862 आहे. अनामत रोखवही नुसार दि. 31/03/2013 रोजी असलेली अखेर शिल्लक रक्कम रु. 10033092 इतकी आहे. तफावत रु.269770/- आहे. म्हणजेच नोंदवहीतील शिल्लकेपेक्षा

रोखवहीतील शिल्लक रु.269770/- ने कमी आहे.
8) प्रभाग कार्यालयाचे काम करण्यासाठी आयुक्तांचे आदेशानुसार/ लेखापाल/वरिष्ठ लिपीकाची नेमणुक केली आहे व उपायुक्तांना प्रति स्वाक्षरीचे अधिकार दिले आहेत. प्रभाग कार्यालयात रोखवही लिहीण्याचे काम लेखापालाकडुन केले जाते. रोखवहीवर लेखापालाची स्वाक्षरी आहे. सहाय्यक आयुक्तांना कोणतेही आर्थिक अधिकार दिले नाहीत त्यांची स्वाक्षरी रोखवहीत नाही. उपायुक्त धनादेशावर सही करतात. त्यामुळे महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधिल नियम क्र. 62 (2) नुसार महिन्यातुन किमान एकदा तरी उपायुक्तांने रोखवहीतील शिल्लक पडताळुन पाहिली पाहिजे. परंतु वित्तिय वर्ष 2012-13 मध्ये उपायुक्ताने कधीही रोखडवहीतील शिल्लक पडताळुन पाहिली नाही. रोखवहीवर त्यांची स्वाक्षरी नाही.
नियम 40 नुसार रोखवहीतील जमा व संवितरणे यांचा मेळ जमा व खर्चाच्या मासिक गोषवाऱ्याबरोबर घेतला नाही. नियम 51 नुसार रोखवहीतील लेखे बंद करुन त्यांचा ताळमेळ घेतला नाही.

DATPMVM6001 (Ref No : 83, Hmm No : 151)

18 महिला व बाल कल्याण विभागाने रुपये 82,73,673/- झालेल्या खर्चाचा अभिलेख लेखापरीक्षणास सादर न केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

मनपा निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 8273673.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8273673.00/-

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाचा 2012-2013 या वित्तीय वर्षामध्ये झालेल्या रुपये 82,73,673/- रकमेचा अभिलेख सादर करण्याची महानगरपालिकेची जबाबदारी असूनही स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 प्रमाणे अभिलेखाची मागणी अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 135, दिनांक 04.10.2014 अन्वये केली होती. तथापि विभागाने अभिलेख उपलब्ध न केल्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण विभागाने 2012-2013 या वित्तीय वर्षाकरीता एकूण रुपये 8,01,28,370/- इतक्या रक्कमेची तरतुद केली असुन रुपये 3,02,76,217/- इतका खर्च झालेला आहे. सदर खर्चाचा अभिलेख सादर करण्याची महानगरपालिकेची जबाबदारी असूनही स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 प्रमाणे अभिलेखाची मागणी अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 135, दिनांक

04.10.2014 अन्वये केली होती. तथापि विभागाने अभिलेख उपलब्ध न केल्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही.

1) महानगरपालिकेने 2012-2013 या वित्तीय वर्षाकरीता रुपये 8,01,28,370/- इतक्या रकमेची तरतुद केली असताना रुपये 3,02,76,217/- इतका खर्च झाला आहे. म्हणजेच फक्त 38% उद्दिष्ट साध्य झालेले आहे.

2) महिला व बाल कल्याण विभागाच्या झालेल्या खर्चाचे लेखापरीक्षण केले असता खालील बाबींवर झालेल्या रुपये 82,73,673/- खर्चाचा अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेला नसल्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही. तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	**विषय**	**खर्च (रुपये)**
1	महिला व मुलींना तांत्रिक प्रशिक्षण देणेबाबत.	67,50,323/-
2	आहिल्याबाई होळकर योजनेच्या धर्तीवर इयत्ता 10 वी पर्यंत शिक्षण घेणा-या मुलींना एस.टी. ने दिल्या जाणा-या सवलतीच्या पासाची योजना राबविणे.	3.41.350/-
3	हुंडाबंदि या विषयावरील विविध आयोजित स्पर्धेत पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना बक्षिसे धनादेशाने अदा करणेबाबत.	1,57,000/-
4	निराधार, विधवा, परितक्त्या महिलांच्या मुला / मुलींकरीता शैक्षणिक अर्थसहाय्य देणेबाबत.	2,75,000/-
5	ऑक्टोबर दिवाळी ऑर्डर फेस्टिवल साजरा करणेबाबत.	5,00,000/-
6	शुक्रवार दिनांक 8 मार्च, 2013 रोजी जागतिक महिला दिन साजरा करणेबाबत.	2,50,000/-
	एकुण खर्च	**82,73,673/-**

उपरोक्तबाबत महिला व बाल कल्याण विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 135, दिनांक 04.10.2014 अन्वये निर्गमित करण्यात आले असुन विभागाकडून अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

(आक्षेपाधीन रक्कम रुपये **82,73,673/-**)

DMASGDM7201 (Ref No : 79, Hmm No : 135)

19 महापालिका क्षेत्रात सुधारीत सागरी क्षेत्र व्यवस्थापन आराखडाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : जीआयएस मॅपींग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 3000000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3000000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 19100.00/-

सेस, केरळ या संस्थेबरोबर करारनामा करून मुद्रांक शुल्क वसुली केली नाही. संस्थेने प्रस्तावात दिलेला दर व महानगरपालिकेने मंजूर केलेला दर रु. ५०,०००/- प्रति किलोमीटरप्रमाणे ४०० किलोमीटर कामाची लांबीनुसार एकुण करावे लागणारे प्रदानासाठीच्या आकडेवारीबाबत आयुक्त यांना खात्री नाही. सेस या संस्थेने काम पूर्ण केल्याचा अंतिम अहवाल, नकाशे, इत्यादी लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. विभागाने अग्रिमाचे समायोजन विहीत मुदतीत ३ महिन्यात न करता विलंबाने ३० महिन्यानंतर केले आहे.

वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात सुधारीत सागरी व्यवस्थापन आराखडा (CZMP) तयार करणेचे कामासाठी प्रमाणक क्रमांक ६४ दिनांक २०/०४/२०१२ अन्वये रक्कम रु. ३०,००,०००/- चे प्रदान सेस, केरळ येथील संस्थेस केले आहे. केंद्र शासन पर्यावरण व वन मंत्रालय दिल्ली यांचे दिनांक ०६/०१/२०११ रोजीचे सीआरझेड बाबतच्या अधिसूचनेनुसार नव्याने सागरी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (CZMP) दोन वर्षाचे आत माहे जानेवारी २०१३ पूर्वी तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र शासनाने सिडकोला एखाद्या अधिकृत एजन्सीकडून १:३९६० या प्रमाणामध्ये सागरी विनियम क्षेत्र नकाशा तयार करणेस कळविले होते. सिडकोने याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही म्हणून सचिव पर्यावरण यांच्या दिनांक ०८/०३/२०११ रोजीच्या पत्रान्वये सदरचे काम पूर्ण करण्यासाठी सेस, केरळ (Center for Earth Sciences)या संस्थेची नेमणूक केली आहे.

सेस, केरळ या संस्थेने सदरचे काम २४ महिन्यात पूर्ण करणेस सहमती दिली व सदरचे काम ते माहे जानेवारी २०१३ पर्यंत पूर्ण करतील. सेस संस्थेने दिनांक २६/०५/२०११ चे पत्रान्वये सागरी नकाशे तयार करणेस व याकामी अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव दिला त्यात सदरचे काम तीन प्रकारे, तीन स्वतंत्र दर प्रति किलोमीटर उच्चतम भरती रेषा (HTL) प्रति दिला. महानगरपालिकेने दिनांक २२/०७/२०११ चे पत्रान्वये सेस, केरळ संस्थेने यापूर्वी काही झालेले काम लक्षात घेऊन दर कमी करणेस कळविले त्यानुसार सेस संस्थेने दिनांक ०४/१०/२०१११ चे पत्रान्वये उच्चतम भरती रेषा (HTL) प्रति किलोमीटर दर रु.५०,०००/- दिला आहे. एकूण लांबी ४०० किलोमीटरसाठी अंदाजित रक्कम रु. २ कोटी खर्चास सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ०६ दिनांक ०९/०१/२०११ अन्वये मान्यता दिली आहे. सदर कामासाठी अग्रिम रु.३०,००,०००/- प्रदानाबाबत, कामाबाबत अर्धसमास पत्र क्र. १८९ दिनांक ०४/१२/२०१४ अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सेस, केरळ या संस्थेबरोबर महानगरपालिकेने करारनामा केल्याचे आढळून आले नाही. सदर कामाची

अंदाजित रक्कम रु. २ कोटी असल्याने शासन नियमानुसार करारनामा मुल्यावर महसुल मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर प्रकरणी रक्कम रु.१९,१००/- ची वसुली करणे आवश्यक आहे.
२) आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका यांचे पत्र क्र. वविशम/न.र./२१८४/२०११-१२, दि. ३१/०१/२०१२ श्री. के.व्ही.थॉमस, सेस केरळ यांना लिहिलेल्या पत्रात "It is requested that these figures (उच्चतम भरती रेषा (HTL) ४०० किलोमीटर लांबी) be given as we are not aware of the total length of HTL in VVSR and not possible to calculate the amount at this stage" असे नमूद केले आहे. त्यामुळे सदर सागरी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा (CZMP) कामासाठी सागरी उच्चतम भरती रेषा (HTL) ४०० किलोमीटर लांबी सेस, केरळ या संस्थेने कशाच्या आधारे ठरविली व त्यानुसार संस्थेने प्रस्तावात दिलेला दर व महापालिकेने मंजूर केलेला दर रु. ५०,०००/- प्रति किलोमीटरप्रमाणे उच्चतम भरती रेषा (HTL) ४०० किलोमीटर कामाची लांबीनुसार एकुण अंदाजित रक्कम रु. २ कोटी अचूक असल्याबाबत लेखा परीक्षणाची साधार खात्री पटली नाही.
३) सदरचे काम पूर्ण झाल्याचा संबंधित संस्थेचा अंतिम अहवाल, नकाशे, इत्यादी लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.
४) संबंधित संस्थेस रक्कम रु. ३० लक्ष इतकी अग्रिम रक्कम दि. २०/०४/२०१२ रोजी दिले आहे. सदर कामाचा करारनामा केला नसून प्रदानाच्या अटी व शर्ती उपलब्ध झाल्या नाहीत. सेस, संस्थेस दिलेल्या अग्रिमाचे समायोजन महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ चे नियमान्वये ३ महिन्यात करणे आवश्यक होते. सेस, केरळ या संस्थेने बिल क्र. सी-६८९, दि. १९/०५/२०१२ अन्वये महानगरपालिकेस दिले असून नगररचना विभागात आवक क्र. ७७५, दि. २५/०६/२०१२ रोजी प्राप्त् झाल्याचे दिसुन येते. संबंधित संस्थेने वेळीच बिल नगररचना विभागास सादर केलेले असताना देखील सदर बिलाचे समायोजन वर्ष २०१२-१३ व २०१३-१४ या वित्तीय वर्षात न करता विलंबाने माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये केले आहे. सबब नगररचना विभागाने अग्रिमाचे समायोजन विहीत मुदतीत ३ महिन्यात न करता विलंबाने ३० महिन्यानंतर केले आहे.
५) सेस, केरळ या संस्थेने सदरचे काम सचिव पर्यावरण यांच्या दिनांक ०८/०३/२०११ रोजीच्या पत्रानुसार काम २४ महिन्यात माहे जानेवारी २०१३ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. त्यानुसार त्यांनी सदरचे काम केव्हा पूर्ण केले व त्याबाबतचा प्रारुप अहवाल महानगरपालिकेस केव्हा सादर केला, व तो जनतेच्या सल्ल्यासाठी केव्हा खुला ठेवण्यात आला. याबाबतची माहिती लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे दिलेल्या अग्रिमानुसार कामकाज संस्थेने पूर्ण केले आहे याबाबतची खात्री लेखा परीक्षणात झाली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 135, Hmm No : 189)

20 मालमत्ता कराचे रिफॉर्म तयार करणेच्या खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : कर आकारणी मालमत्ता स मनपा निधी निधी

वसई विरार मनपा

अनियमितता कलम : 9अ

गुंतलेली रक्कम रु. 41686062.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 41686062.00/-

निविदाधारकांची तांत्रिक कागदपत्रे, दराचे लिफाफे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. खर्चाची मूळ प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहींत.

केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सिटीं ना पायाभूत सुविधा निर्माण करणेकामी विविध रिफॉर्म करणेपैकी मालमत्ता कराचे रिफॉर्म अंतर्गत खालील कामांचा समावेश होता.

1) Preparing the Base Map database using satelite image.
2) Property details & information about its occupants and owners etc.
3) Generation of Slope drainagae planning maps for Network Utility Technology.
4) Creation of Network Infrastructure and Utility Database using GPS technology.
5) Data entry & creation of data base.
6) Taking photographs of site/properties etc. in digital format & supplied in database in jpg format with VGA resolution.

महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.२६६ दिनांक १४/०३/२०१० अन्वये सदर कामास प्रशासकीय मंजुरी दिली आहे. स्थायी समिती ठराव क्र. ०२ दिनांक १०/१०/२०१० वित्तीय मंजुरी दिली आहे. सदरकामी जाहीर सूचना क्र.वविशम/६५९५/२०१०-२०११ दिनांक १०/१२/२०१० अन्वये दैनिक 'महाराष्ट्र बुलंद टाईम्स' व दै. 'सामना' मध्ये दिनांक ११/१२/२०१० रोजी प्रसिध्दी केली होती. निविदा कालावधी दिनांक १०/१२/२०१० ते २०/१२/२०१० इतका दिला होता व निविदा स्विकृती दिनांक २४/१२/२०१० होता. सदर कामासाठी अर्हताप्राप्त निविदाधारकांची निविदा पूर्व बैठक दिनांक २१/१२/२०१० आयोजित केली होती. सदर निविदेत एकूण १९ बाबी (Activity/Work) होत्या. त्यातील सर्व बाबी/Activity यांचे दर प्रति नग, प्रति हेक्टर, प्रति रनिग कि.मी.,प्रति पृष्ठ, प्रति फिल्ड, प्रति लायसन्स, लायसन्स सेट, प्रति टीबी, प्रति मालमता, प्रति घर/प्रति महिना, प्रति मनुष्य, असे नमूद आहेत. सदर कामी एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या १) सेह निर्माण, २) मे.पी.एन.शिदोरे आणि कं. व ३) मे. राणे मॅनेजमेंट कन्सल्टंट प्रा.लि. त्यापैकी मे.सेह निर्माण या संस्थेचे निविदेतील सर्व १९ बाबींचे दर कमी होते. सदर प्राप्त दरांशी वाटाघाटी करून दर स्विकारले आहेत. मे. सेह निर्माण या संस्थेस क्र. वविशम/ससि/९२/२०११-२०१२ दिनांक ०१/०३/२०१२ अन्वये कार्यादेश दिला आहे. संस्थेशी करारनामा केला आहे. या कामासाठी सुधारित तरतूद महासभा ठराव क्र.०२ दिनांक २२/०३/२०१२ अन्वये रक्कम रु.४ कोटी इतकी केली आहे. सदर कामावर वर्ष २०१२-१३ जमा खर्च विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे रक्कम रु.४,१६,८६,०६२/- इतका खर्च झाला आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र. १६८ दिनांक ०५/११/२०१२ व १९९ दिनांक ११/१२/२०१४ अन्वये कळविले असता विभागाने त्याबाबत दिनांक १५/१२/२०१४ चे पत्रान्वये खुलासा केला आहे. सदरचा खुलासा विचारात घेता लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सदर निविदा प्रक्रियेत भाग घेतलेल्या निविदाधारकांची मूळ तांत्रिक कागदपत्रे, दराचे लिफाफे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. सदर खर्चाची झेरॉक्स प्रमाणके तपासणीसाठी लेखा परीक्षणास उपलब्ध झाली. मूळ प्रमाणके प्रभागात असल्याचा खुलासा विभागाने केला. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा

वसई विरार मनपा

अधिनियम १९३० चे कलम ६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०७अ नुसार लेखा परीक्षणास अभिलेखे, प्रमाणके उपलब्ध करून देणे बंधनकारक असतानाही मूळ प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध केली नाहीत.

DGPVTTM7001 (Ref No : 142, Hmm No : 199)

कलम ९ ब खालील आक्षेप

21 घनकचरा व्यवस्थापन कामासाठी वापरलेल्या मजुर पुरवठ्याच्या / लेबर कॉन्ट्रॅक्ट मधील अनियमितता

घनकचरा व्यवस्थापन- लेबर कॉन्ट्रॅक्ट.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :आरोग्य मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 662000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 662000.00/-

साफसफाईच्या कामासाठी मागविलेल्या मजुर पुरवठ्याच्या कामास वारंवार मुदतवाढ दिलेली आहे. किमान मजुरीदर रु. 205/- असतांना कमी दराने रु.176/- दराने मजुराकडून काम करून घेतले आहे. मुदतवाढीनंतर नव्याने करार केला नाही इत्यादी....

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत महानगरपालिका ग्रामीण क्षेत्रात केलेल्या कामासाठी लेबर कॉन्ट्रॅक्टर कडून मजुर घेतले आहेत.

कामाचे नांव :- लेबर कॉन्ट्रॅक्ट

निविदा तारीख:- दि. 19/03/2007, दै. लोकमत, दै. समाचार

2008-09पासुन 2012-13 पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

एल-1 निविदा:- मे. स्वागत लेबर कॉन्ट्रॅक्टर - कुशल मजुर-185, अकुशल -176

मे. चिराग लेबर कॉन्ट्रॅक्टर - कुशल मजुर-185, अकुशल -176

निविदा मुदतवाढ:- स्थायी समिती ठराव क्र. 17, दि. 28/12/2011 नुसार मुदतवाढ पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत

स्थायी समिती ठराव क्र. 289, दि. 06/06/2012 नुसार मुदतवाढ पुढील निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत

कार्यादेश:- दि. 28/12/2011, 31/07/2012

मजुर पुरवठा, त्यांचे दर,किमान वेतन इत्यादि बाबत अर्धसमास ज्ञापन पत्र.क्र. 17, दि. 21/06/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाचे पत्र.क्र. 66, दि. 30/06/2014 रोजी खुलासा केला आहे. याबाबत लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) 2006-07 व 2007-08 मध्ये तत्कालीन नगरपारिषदेने साफसफाईच्या कामासाठी निविदा मागवून मजुर पुरवठयाचे काम मे. स्वागत लेबर व मे. चिराग लेबर यांना दिले होते. नंतरच्या काळात म्हणजे महापालिकेच्या काळात 2012-13 पर्यंत निविदा प्रक्रिया न करता संबंधित ठेकेदारांना वारंवार मुदतवाढ देऊन त्यांच्याकडून मजुर

पुरवठ्याचे काम करून घेतले आहे. शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 8.3 (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारीत मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये - पुनर्प्रत्ययी आदेश देतांना ते 6 महिन्याच्या अवधी करीताच दयावयाचे आहेत. सदरचे आदेश तात्कालीक / आकस्मिक स्वरूपाचे असावेत, असे आदेश देतांना बाजारातील किंमती मुळ आदेशापेक्षा कमी नसल्याची त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने / निविदा मंजुरी समितीने मंजूर करणे आवश्यक आहे, असे असतांना त्यानुसार उचित कार्यवाही न करता मुदतवाढ 2008-09 ते 2012-13 एकुण 2 वेळा दिल्याचे दिसून येते. विभागाने याबाबत केलेल्या खुलाशानुसार महापालिकेची स्थापना 03/07/2009 रोजी झाली. 2010 मध्ये सार्वत्रिक निवडणूका झाल्या. अत्यावश्यक काम असल्यामुळे मुदतवाढ देण्यांत आली असे नमुद केले आहे. परंतु महानगरपालिकेने मजुर पुरवठा कामी वारंवार नियमबाह्य मुदतवाढ दिल्याचे दिसून येते.

2) मजुर पुरवठयाची निविदा 2008-09 मध्ये मंजुर झाली होती. पुढील काळात त्याच निविदाकारास मुदतवाढ दिली आहे. पुर्वीच्या मंजुर दरात 2012-13 मध्ये ठेकेदाराने काम केले आहे. कामगार आयुक्त यांचेकडील आदेश क्र.28,दि.17/10-2012 अन्वये 2012-13 करीता कुशल मजुर दर रु.215/- व अकुशल मजुर दर रु.205/- असा कळविला आहे. जिल्हा दर सुचिनुसार सदरचे दर समान असल्याचे दिसते. कामगार आयुक्तांचे आदेशानुसार देय दरापेक्षा कमी दराने मजुरांना मजुरी देता येणार नाही. असे असतांना पुर्वीच्या दरातच ठेकेदारांस मजुर पुरवठ्याचे काम दिले आहे. किमान मजूरी दरापेक्षा (कामगार आयुक्तांनी जाहीर केलेल्या) कमी दरात मजुराकडून काम करून घेणे ही गंभीर अनियमितता आहे. विभागाने केलेल्या खुलाशानुसार अत्यावश्यक सेवा असल्याने व तात्काळ कामे करावयाची असल्याने मुदतवाढ दिली आहे. परंतु मजुरी दराबाबत खुलासा केला नाही.

3) या कामाचा ठेका देतांना अपेक्षीत खर्चाची गणना केली नव्हती. त्यामुळे रु.100/- च्या महसुल मुद्रांकावर ठेकेदारासोबत करार केला होता. त्यामुळे पुढील पाच वर्षासाठी स्वतंत्र करार करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही न केल्याने शासनाच्या महसुल मुद्रांक रु.500/- चे नुकसान झाले आहे. याबाबत विभागाने केलेल्या खुलाशानुसार जुन्या करारात मुदतवाढीनंतर नव्याने करार करावा असे नमुद नसल्याचे कळविले आहे. हे कारण संयुक्तिक नाही. करारनामा न केल्याने कामाची विधीग्राह्यता रहात नाही.

4) मे. स्वागत लेबर कॉन्ट्रॅक्टर

प्र.क्र. 3651, दि. 29/01/2013 रु. 1,32000 वसई प्रभाग ई मधील कामे

प्र.क्र. 3650, दि. 29/01/2013 रु. 1,27000 --//--

प्र.क्र. 3649, दि. 29/01/2013 रु. 1,36400 --//--

मे. चिराग लेबर कॉन्ट्रॅक्टर

प्र.क्र. 2931, दि. 23/11/2012 रु. 2,66,600 वसई प्रभाग ई मधील कामे

महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन कामी नेमलेल्या ठेकेदाराकडून शहरातुन साफसफाईचे काम केले आहे. ग्रामीण स्तरावरील ग्रामपंचायती महानगरपालिकेत समाविष्ठ झाल्याने काम वाढले आहे.म्हणून मजुर पुरवठयाचे कामाचा ठेका देवून सफाईचे वाढीव काम केले आहे. विभागाच्या खुलाशानुसार या व्यतिरिक्त खर्च झालेला नाही. परंतु महापालिकेच्या 5 प्रभागात समाविष्ठ असलेल्या ग्रामपंचायत कामासाठी महापालिकेने वेळोवेळी मजुर घेतले आहेत. अशा मजुर पुरवठ्यासाठी खर्च केला आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत साफसफाई करण्याचे काम ज्या ठेकेदाराला दिले आहे, त्यांच्याकडूनच वाढीव काम करून घेणे अपेक्षित आहे. तथापि ग्रामीण स्तरावर

मजुर घेऊन त्यांचे मार्फत कामे करून घेतली. त्यांमुळे साफसफाईच्या कामावर विभागाला नियंत्रण ठेवता आले नाही.

उपरोक्त उणीवांची पुर्तता करेपर्यंत रक्कम रु. 662000 लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 7, Hmm No : 17)

22 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता,गटारे,नाले,सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पध्दतीने नाले खोदाई करणे बाबत.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत स्वच्छता व सफाई करणे

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :आरोग्य मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 528871437.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 528849137.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 22300.00/-

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सफाईचे कामासाठी 15 स्वतंत्र ठेकेदार निश्चित केले. ठेकेदारास नियमबाह्य मुदतवाढ दिली. नव्याने करार केला नाही. मुद्रांक शुल्काची कमी वसुली केली. कॉम्पेक्टर व टिपरच्या भाड्याची नोंदवही दाखविली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 कलम 332 नुसार कत्तलखाने, पशु अवजारे यांचेवर दुकान भाडे/फी ची वसुली केली नाही. ठेकेदार मध्येच काम सोडून गेल्यावर त्याचेवर दंडात्मक कारवाई केली नाही. क्षेपन भूमिवरील अभिलेखे विभागाची टिप्पणी, आयुक्त यांचे अभिप्राय उपलब्ध झाले नाहीत.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत केलेल्या कामाबाबत

कामाचे नांव	घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता सफाई, ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पध्दतीने नाले खोदाई
प्राकलन	52.89 कोटी
प्रशासकीय मंजुरी	महासभा ठराव क्र. 10, दि. 03/03/2011, महासभा ठराव क्र. 15, दि. 09/03/2012 अन्वये मुदतवाढ
तांत्रिक मंजूरी	-
निविदा तारीख	दि. 02/06/2011, मुंबई सकाळ, सन 2012-13 या वर्षात मुदत वाढ दिली आहे.

एल-1 निविदा :-

अ.क्र.	विभागाचे नाव	मंजुर निविदाधारक	मंजुर मासिक दर (रुपये)
1	नवघर-माणिकपूर पुर्व (प्रभाग क्र.	रिलायबल एजेन्सी	रु. 41,34,072/-

	56,65,60,64,62,63,78,28,61)		
2	नवघर-माणिकपूर पश्चिम (प्रभाग क्र. 54,55,66,67,68,69,70,71,73,74,75,76,77,80)	रिलायबल एजेन्सी	रु. 62,53,390/-
3	नालासोपारा पुर्व (ब) (प्रभाग क्र. 26,29,30,31,41,42,43)	साई गणेश एंटरप्रायझेस	रु. 42,52,621/-
4	नालासोपारा पुर्व (क) (प्रभाग क्र. 47,48,49,50,57,58)	बि.पी.तांडेल	रु. 27,26,438/-
5	नालसोपारा विभाग पुर्व (अ) (प्रभाग क्र. 39,40,44,45,46,59)	दिनेश बी. संखे	रु. 31,95,000/-
6	नालासोपारा पश्चिम (प्रभाग क्र. 32,33,37,38,34,36,52)	लोकसेवा सर्विसेस	रु. 33,25,580/-
7	विरार पुर्व(अ) (प्रभाग क्र. 4 ,5 ,14, 15,16,17)	अनंत एंटरप्रायझेस	रु. 30,53,115/-
8	विरार पुर्व (ब) (प्रभाग क्र. 19, 20,21 ,25)	उजाला लेबर कॉन्ट्रक्टर	रु.40,43,724/-
9	विरार पुर्व (क) (प्रभाग क्र. 1,3,27)	स्वागत लेबर कॉन्ट्रक्टर	रु. 9,79,626/-
10	विरार पश्चिम (अ) (प्रभाग क्र. 11,12, 13,18,22,23)	अनंत एंटरप्रायझेस	रु. 25,53,115/-
11	विरार पश्चिम (ब) (प्रभाग क्र. 6,10 ,24)	अनंत एंटरप्रायझेस	रु. 11,84,383/-
12	वसई विभाग (प्रभाग क्र. 81,82,83, 85,86,87,88,89)	एम.ई.प्रोजेक्ट	रु. 13,50,480/-

ई प्रभागातील एम.ई.प्रोजेक्ट या ठेकेदाराच्या तक्रारी येत असल्याने मनपाने 02/06/12 रोजी निविदा प्रसिध्द करून 01/9/2012 पासुन खालील ठेकेदाराची नेमणूक केली.

अ.क्र.	विभागाचे नाव	कमी दराच्या निविदाधारकाचे नांव	मंजुर दर (रुपये)
1	वसई विभाग (अ) (प्रभाग क्र. 82,83 मुख्य रस्त्याच्या उत्तरेकडील भाग व प्रभाग क्र. 85,86,87,88,89)	मे. चिराग	रु. 25,50,000/-
2	वसई विभाग (ब) (प्रभाग क्र. 80,81व क्र.83 मुख्य रस्त्याच्या दक्षिणेकडील भाग	मे. आर. बी . इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.	रु. 14,50,000/-
3	वसई विभाग (क) (प्रभाग क्र. 72,84)	मे. दिनेश संखे	रु. 7,50,000/-

निविदा मंजुरी	स्थायी समिती ठराव क्र. 13, दि. 07/09/2011 व क्र. 14, दि. 27/09/2011, मुदत वाढ महासभा ठराव क्र. 15, दि. 09/03/2012, पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत मुदत वाढ दिली आहे.
करार	01/10/2011 (मुदत 31/03/2012 पर्यंत)
कार्यादेश	क्र .535, दि. 01/10/11,मुदतवाढीचा कार्यादेश दि.31/03/12,व नविन ठेकेदारास दिलेला कार्यादेश दि. 31/08/12
मुदत	मुदत 31/03/2012 पर्यंत. मुदत वाढ महासभा ठराव क्र. 15, दि. 09/03/12 अन्वये नविन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत जुन्या ठेकेदारास मुदत वाढ दिली आहे.
काम पुर्ण	काम पुर्ण 31/03/2013
खर्च	एकूण खर्च 52.89 कोटी

लेखा परीक्षणाचे वेळी निवडक प्रमाणके तपासली. त्याचा उदाहरणादाखल तपशील खालील प्रमाणे आहे.

प्रमाणक क्रमांक	दिनांक	रक्कम	तपशील
4458	26/03/13	34,26,789/-	श्री अनंत एंटरप्रायजेस जानेवारी, 13, अ प्रभाग क्र.4,5,14,15,16,17
4457	26/03/13	28,90,627/-	श्री अनंत एंटरप्रायजेस फेब्रुवारी, 13, अ प्रभाग क्र.11,12,13,18,22,23.
4825	30/03/13	44,05,344/-	मे. उजाला लेबर कॉंट्रक्टर, फेब्रुवारी, 13 ब प्रभाग क्र.19, 20
4826	30/03/13	44,44,089/-	मे. उजाला लेबर कॉंट्रक्टर, जानेवारी 13 ब प्रभाग क्र.21,25
4087	07/03/13	47,10,673/-	मे. साईगणेश एंटरप्रायजेस, फेब्रुवारी, 13 क प्रभाग क्र.26,29,30,31,41,42,43.
4088	07/03/13	30,63,950/-	मे. बी.पी. तांडेल, फेब्रुवारी, 13, क प्रभाग क्र.47,48,49,50, 57,58.
4121	13/03/13	45,11,752/-	मे. रिलायबल एजन्सीज, फेब्रुवारी, 13, ड (पुर्व) प्रभाग क्र.56,65,60,64,62,63,78,28,61.
4122	13/03/13	68,64,116/-	मे. रिलायबल एजन्सीज, फेब्रुवारी, 13, ड (पश्चिम) प्रभाग क्र.54,55,66,67,68,69, 70,71,73,74, 75,76,77,80.
4884	30/03/13	26,14,490/-	मे. चिराग, फेब्रुवारी, 13, ई प्रभाग क्र.82,83,85,86, 87,88,89.

वसई-विरार शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ सुमारे 312 चौ.कि.मी. आहे. या महानगरपालिकेची स्थापना 03, जुलै 2009 रोजी झाली. त्यात वसई, विरार, नवघर-माणिकपूर व नालासोपारा या चार नगरपरिषदा व 53 गावांचा समावेश आहे. शहर मुंबई लगत असल्याने झपाट्याने नागरीकरण व औद्योगिकरण झाले आहे. विकसित होणारे माठे रस्ते, अंतर्गत रस्ते, डिपी रस्ते, उघड्यावरील बाजार इत्यादी दैनंदिन साफसफाई करावी लागते. महापालिका हद्दीत स्वच्छता करणे, धूर फवारणी करणे, औषधांची व जंतुनाशकांची फवारणी, गटार सफाई, कचऱ्याची वाहतूक, गटारातील गाळ काढणे व कॉंक्रिट इत्यादीची वाहतूक करणे यासाठी महापालिकेकडे स्वत:चा कर्मचारीवृंद पुरेसा नाही. विभागाच्या टिपणीनुसार दररोज सुमारे 450 ते 500 मॅट्रिक टन कचरा निर्माण होतो. या कामाकरीता प्रभाग क्रमांकाचे गट करुन महानगरपालिकेने वार्षिक ठेका देऊन काम करून घेतल्याचे दिसून येते.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत साफसफाईचे कामाबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 18,दि. 23/06/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने पत्र क्र. 61,दि. 30/06/2014 रोजी खुलासा केला आहे. याबाबत लेखा

परीक्षणात पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1) घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2000 अन्वये रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता व सफाई करीता ठेका व भाड्याच्या वाहनांद्वारे यांत्रिक पध्दतीने नाले सफाई करण्यासाठी महानगरपालिकेने जाहीर निविदा 2011-12 मध्ये मागविल्या.नव्याने निर्माण झालेली महानगरपालिका, विभागाने यासाठी किती खर्च येईल, कामाचा आवाका काय, 5 प्रभाग व 89 नगरसेवक वॉर्ड असलेल्या शहरात प्रत्यक्षात किती कचरा होणार आहे,उचलावा लागणार आहे, यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता किती, किती साहित्य/यंत्र सामुग्री, सुविधा, कचरा वाहतूक करणारी वाहने इत्यादी बाबतचा अंदाज केलेला नव्हता. निविदा मागवितांना आवश्यक ती पुर्व तयारी केलेली दिसत नाही.सदर विभागाकडे निविदा मागविण्यापुर्वी कामावर किती खर्च येईल याचा अंदाज नव्हता. महापालिकेच्या मुख्यालयात सार्वजनिक आरोग्य विभागाचे मुख्यालय नाही. व्यवस्थापन कौशल्याचा अभाव आहे. स्वच्छता व सफाईचे एकच काम विभागुन केले आहे. याचा परिणाम निविदा मागविण्यावर झाल्याचे दिसून येते. कारण प्रत्येक प्रभागाच्या गटानुसार निविदाकाराने वेगवेगळे दर दिले आहेत. त्यातुन किफायतशीर दर असणारे 15 स्वतंत्र ठेकेदार निश्चित करण्यांत आले आणि त्यांचे कामावर नियंत्रण ठेवणे विभागाला शक्य झाले नाही. परिणामी वसई प्रभागातील मे. एम.ई. प्रोजेक्ट या ठेकेदाराच्या तक्रारी येत असल्याने वसई प्रभागासाठी महापालिकेला 02/06/2012 रोजी निविदा सुचना प्रसिध्द करून 01/09/2012 पासुन या विभागात अ,ब,क असे तीन ठेकेदार निश्चित करावे लागले. त्यामुळे खर्चात वाढ झाली आणि आर्थिक नुकसान झाले. विभागाच्या खुलाश्यानुसार खर्चात वाढ झाली तरी नागरिकांच्या आरोग्याविषयी तक्रारी संपुष्टात आल्या. हा खुलासा संयुकतिक नाही.

2) उपरोक्त कामासाठी जाहीर निविदा मागवून 2011-12 मध्ये ठेकेदार निश्चित केले आहे.निविदेतील अटीशर्ती पाहता निविदा ही 1 वर्षासाठीच होती. परंतु महानगरपालिकेने 2012-13 या वित्तिय वर्षासाठी महासभा ठराव क्र. 15, दि. 09/03/2012 नुसार मुदतवाढ दिलेली आहे. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या टिपणीचे अवलोकन करता टिपणीवर विभाग प्रमुखाची म्हणजे स्वच्छता निरिक्षकाची स्वाक्षरी नाही. उपायुक्त आरोग्य यांनी मुदतवाढीच्या प्रस्तावावर मार्गदर्शन व्हावे असा अभिप्राय 21/01/2012 रोजी नमुद केलेला आहे. अतिरिक्त आयुक्त यांनी Need to Discuss असे नमुद करून 29/01/2012 रोजी स्वाक्षरी केल्याचे दिसून येते. पुढे या कामी 09/03/2012 रोजीच्या महासभेत पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत कार्यरत असलेल्या ठेकेदारास कामाची मुदतवाढ देण्यांस मंजूरी दिलेली आहे. म्हणजेच आयुक्तांच्या शिफारसीशिवाय कामास मुदतवाढ दिल्याचे दिसून येते. शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 8.3 (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारित मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये - पुनर्प्रत्ययी आदेश देतांना ते 6 महिन्याच्या अवधी करीताच दयावयाचे आहेत. सदरचे आदेश तात्कालीक / आकस्मिक स्वरूपाचे असावेत, असे आदेश देतांना बाजारातील किंमती मुळ आदेशापेक्षा कमी नसल्याची त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने / निविदा मंजुरी समितीने मंजूर करणे आवश्यक आहे, असे असतांना त्यानुसार उचित कार्यवाही न करता मुदतवाढ दिल्याचे दिसून येते. याबाबत विभागाने केलेल्या खुलाशानुसार आयुक्तांशी मौखिक चर्चा करून महासभेकडे प्रस्ताव ठेवण्यात आला, आणि काम अत्यावश्यक असल्याने मुदतवाढ देण्यांत आली असे नमुद केले. याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधीनियम अध्यादेश, 2011 कलम 06 नुसार आवश्यक ते अभिलेखे, विभागाची टिप्पणी, आयुक्तांचे अभिप्राय मागणी करुनही उपलब्ध झाले नाहीत.

3) मुदतवाढ दिल्यानंतर 2012-13 करीता संबंधित ठेकेदारासोबत नव्याने करार करणे आवश्यक होते. परंतु

महापालिकेने पुनर्प्रत्ययी आदेश निर्गमित केले आहेत. वित्तीय वर्षासाठी नव्याने करार केले नाहीत. त्यामुळे कामाची विधी ग्राहयता दिसून येत नाही. विभागाने केलेल्या खुलाशानुसार- मुळ करारात मुदतवाढीनंतर नव्याने करारनामा करावा असे नमुद नव्हते. हा खुलासा परिपुर्ण नाही.

4) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/- (कमाल 5 लाख)

प्रभाग/विभाग निहाय वॉर्ड सफाई करणेसाठी 15 गटातील ठेकेदारास दि. 01/10/2011 पासुन कार्यादेश दिलेला आहे. या कामासाठी ठेकेदाराने महानगरपालिके सोबत करार ही केले आहेत. करारासाठी अनुज्ञेय असलेल्या मुद्रांक शुल्कापेक्षा कमी मुद्रांक शुल्क वापरले आहे. त्याचे परिशिष्ट क्र.1 सोबत जोडले आहे. विभागाने केलेल्या खुलाशानुसार 2011-12 च्या लेखा परीक्षणाच्या वेळी रु.2,36,210 मधील फरकाची रक्कम शासन खाती भरणा केली असून ई प्रभागातील 2012-13 मध्ये मंजूर केलेल्या 3 ठेकेदारांकडून मुद्रांक शुल्काची कमी वसुली केलेली रक्कम रु. 22,300 संबंधितांकडून वसुल करून शासन खाती जमा करण्यांत येईल असे कळविले आहे. तथापि रक्कम शासन खाती भरणा न केल्याने 2012-13 मधील मंजूर झालेल्या 3 ठेकेदाराकडून कमी वसुली केलेली मुद्रांक शुल्काची रक्कम रु. 22,300 संबंधितांकडून वसुल करून शासन खाती भरणा करावी आणि अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे.

5) स्थायी समिती ठराव क्र. 713, दि. 07/12/12 नुसार सॅटेलाईट सिटी योजनेच्या अंतर्गत महापालिकेने खरेदी केलेल्या कॉम्पॅक्टर व टिपर चे मासिक भाडे ठरविण्यात आले आहे.प्रति कॉम्पॅक्टर चे मासिक भाडे रु. 65,000/- व मिनी हायड्रोलिक प्रति टिपर भाडे रु. 15,000/-. महापालिकेच्या प्रत्येक (5) प्रभागात किती कॉम्पॅक्टर व टिपर आहेत याची नोंदवही लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही.त्यापैकी किती यंत्र सामुग्री कोणत्या ठेकेदाराने वापरली, कोणत्या कालावधी साठी वापरली, किती भाडे वसुली केले, किती थकित आहे याची माहिती विभागाकडे प्राप्त झाली नाही. संबंधित अभिलेखे नोंदवह्या उपलब्ध करून देण्यांत आल्या नाहीत. विभागाने केलेल्या खुलाशानुसार याबाबतची नोंदवही ठेवण्यांत आली आहे असे कळविले आहे.तथापि नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही.

6) महानगरपालिका हद्दीत असणारे कत्तल खाने, दुकान भाडे, हॉटेल,व्यवसायिक, हॉस्पिटल यांच्या कडून मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. हा कचरा महापालिकेला उचलावा लागतो. परंतु अशा व्यवसायिकांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 332 नुसार महापालिकेने भाडे किंवा फी ची आकारणी केलेली नाही. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत होणाऱ्या खर्चाचा विचार करता स्थायी समितीच्या मंजुरीने अशा व्यवसायिकां कडून फी किंवा भाड्याची वसुली करण्याचा विचार व्हावा. विभागाने केलेल्या खुलाशानुसार महापालिका क्षेत्रात सणा निमित्त तात्पुरत्या कत्तल खान्याची फी वसुली केली जाते. तथापि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 332 नुसार आकारणी करून वसुली केली नाही.

7) वसई विभागात एम.ई.प्रोजेक्ट यांची निविदा दरमहा रु.13,50,480/- या दराने मंजुर झाली.परंतु ठेकेदाराच्या तक्रारी येत असल्याने त्या विभागासाठी नवी निविदा 02/06/2012 अन्वये प्रसिध्द केली आणि 01/09/2012 पासुन वसई विभागात अ,ब,क असे उपविभाग करून तीन ठेकेदार अनुक्रमे मे.चिराग प्रति महिना रु. 25,50,000/-, मे. आर.बी.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. 14,50,000/-, मे. दिनेश बी.संखे रु. 7,50,000/- या रक्कमेस

दिले आहे. म्हणजेच 13,50,480/- चे काम रु. 47,50,000/- या रक्कमेस दिले आहे. या कामात प्रति महिना 33,99,520 जादा खर्च झालेला आहे. म्हणजेच वर्षाला रु. 4,07,94,240/- इतका जादा खर्च होत आहे. जर जुना ठेकेदार म्हणजे मे.एम.ई. प्रोजेक्ट सोबत नव्याने करारनामा (2012-13) केला असता तर निविदा अटी व शर्ती क्र. 8 नुसार सदर कामापोटी येणाऱ्या जादा खर्चाची रक्कम जुन्या ठेकेदाराकडून वसुल करता आली असती किंवा त्याची सुरक्षा अनामत ही जप्त करता आली असती. जुन्या ठेकेदारास महापालिकेने नोटिसही दिलेली नाही. विभागाने केलेल्या खुलाशानुसार मे. एम.ई.प्रोजेक्ट यांच्याकडून नागरिकांच्या तक्रारी नुसार, व स्वच्छता निरीक्षकाचे अभीप्रायानुसार रु. 185818 दंडाची रक्कम वसुली केली आहे. तथापि निविदेमधील अटी व शर्ती क्र. 8 नुसार जादा होणाऱ्या खर्चाची वसुली केली नाही.

8) ई प्रभागातील घन कचरा व्यवस्थापनाची प्रमाणके तपासता प्रभागाने कॉम्पॅक्टर व टिपर चे भाडे 2012-13 या वित्तीय वर्षात ठेकेदाराकडून वसुली केली नाही असे दिसते. सदर भाडयाची 2012-13 या वित्तीय वर्षातील रक्कम रु.650000/- वसुल केलेली नाही. याचा खुलासा करतांना उपायुक्त, आरोग्य यांनी वसुली करावयाची रक्कम मे.एम.ई. प्रोजेक्ट यांच्या अनामत रकमेतून करण्यांत येईल असे कळविले आहे. ठेकेदारास कधीपासुन महानगरपालिका मालकीचे कॉम्पॅक्टर व टिपर देण्यांत आले याची नोंदवही, थकबाकी बाबतची नोंदवही लेखा परिक्षणास अवगत केली नाही.

9) करारातील अटी व शर्ती क्र.11 नुसार घनकचरा विल्हेवाट नेमून दिलेल्या क्षेपण भूमी वाहन रिकामे केल्याबाबत संबंधित कर्मचाऱ्याकडून नोंदी घेतल्याबाबतचे रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. त्यात वाहन क्र., वाहन चालकाचे नांव, वेळ व क्षेपण भूमीवरील नेमलेल्या कर्मचाऱ्याची सही इत्यादी बाबी अंतर्भत असणे आवश्यक आहे. सदर नोंदवहीच्या छायाप्रती देयका सोबत घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे. परंतु प्रमाणके तपासता अशा प्रकारच्या छायाप्रती देयकासोबत जोडलेल्या दिसून येत नाहीत. विभागाने केलेल्या खुलाश्यानुसार संबंधित नोंदवह्या ठेवल्या आहेत. परंतु लेखा परीक्षणास नोंदवह्या दाखविल्या नाहीत.

उपरोक्त उणीवांची पुर्तता करेपर्यंत लेखा परीक्षणात रक्कम रु. 22,300 वसुलपात्र ठेवण्यांत येत आहे व रक्कम रु. 52,88,49,137 आक्षेपाधिन ठेवण्यांत येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 8, Hmm No : 18)

23 दशलक्ष शहरांच्या उपशहरांच्या नागरी पायाभुत सुविधांचा विकास कार्यक्रम - सॅटेलाईट सिटी (योजने अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन) मधील अनियमितता

सुवरेज सिस्टिम व यांत्रिक वाहन खरेदी सह सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट खर्च

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :आरोग्य केंद्र,राज्य,मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 18483000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 13977900.00/-

वसई विरार मनपा

वसूलपात्र रक्कम रु. 4505100.00/-

सॅटेलाईट सिटी योजने अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन कॉम्पॅक्टर व टिपर, 1100 लीटर क्षमतेच्या कचरा कुंड्या खरेदी करणे कामी प्रसिध्दी माध्यमाचा पुरेसा वापर केला नाही. मुद्रांक शुल्काची कमी वसुली, कॉम्पॅक्टर व टिपर यांचा प्रभागात वापर केल्याचे अभिलेखे दाखविले नाहीत आणि त्याच्या भाडयाची पुर्ण वर्षाची वसुली केली नाही, त्रयस्थ संस्थेकडून लेखा परीक्षण केले नाही.

केंद्र शासनाने सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा पुरविणे योजने अंतर्गत वसई-विरार महापालिकेची निवड झाली असून महापालिकेने नोडल एजन्सी मार्फत विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून राज्य शासना मार्फत केंद्र शासनाकडे पाठविला होता. केंद्र शासनाने घनकचरा व्यवस्थापन व भुयारी योजनेच्या कामास मंजूरी दिली आहे. या योजने अंतर्गत मिळणारे अनुदान-केंद्र हिस्सा 80%, राज्य हिस्सा 10%, मनपा हिस्सा 10% या प्रमाणे आहे. महापालिकेला 2011-12 व 2012-13 या वर्षात पुढील प्रमाणे अनुदान मिळाले आहे आणि त्यातुन महापालिकेने खर्च केला आहे.

(रक्कम रु. हजारात)

अनुदान	2011-12	2012-13	31/03/13 पर्यंत एकूण	खर्च	2011-12	2012-13	एकूण
घनकचरा व्यवस्थापन				घनकचरा व्यवस्थापन			
केंद्र हिस्सा	63453	-	79317		61251	18483	79734
राज्य हिस्सा	7932	-					
मनपा हिस्सा	7932	-					

	2011-12	2012-13	31/03/13 पर्यंत एकूण	खर्च	2011-12	2012-13	एकूण
भुयारी मलनि:सारण				भुयारी मलनि:सारण			
केंद्र हिस्सा	-	132452	165564	सल्लागार समिती सदस्यांना मनधन	-	300	125836
राज्य हिस्सा	-	16556					
मनपा हिस्सा	-	16556					
				मे. घारपुरे इं.	-	114093	
				मे. टंडन अर्बन प्रकल्प सल्लागार	11443	-	

घनकचरा व्यवस्थापन कामाबाबत.

<u>कामाचे नांव</u> :- सॅटेलाईट सिटी योजने अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन. कॉम्पॅक्टर

टिप्पर व 1100 लीटर क्षमतेच्या कचरा कुंडया पुरविणे.

प्राकलन :- रु. 7,97,33,567

प्रशासकीय मंजुरी :- प्रशासकीय ठराव 290, दि. 25/03/10
स्थायी समिती ठराव क्र. 4, दि. 18/07/11
प्रशासकीय ठराव क्र. 4, दि. 20/07/12

तांत्रिक मंजूरी :- -

निविदा तारीख :- 09/09/2011, मुंबई सकाळ, तरुण भारत व नरविर चिमाजी

एल-1 निविदा :- मे. ॲन्थनी मोटर्स प्रा. लि.

निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र. 4, दि. 18/07/2011

करार :- 07/10/2011

कार्यादेश :- 11/10/2011

मुदत :- 3 महिने

काम पुर्ण :- पुर्ण. 09/01/2013.

खर्च :- 2011-12 मधील खर्च रु. 61251 (रक्कम हजारात)
2012-13 मधील खर्च रु. 18483 (रक्कम हजारात)

प्रमाणक क्रमांक 02, दिनांक 16/05/12, रुपये 48,70,000/- मे. एम इ प्रोजेक्ट कचराकुंडया पुरविणे.

प्रमाणक क्रमांक 03, दिनांक 16/05/12, रुपये 1,36,12,500/- मे. अँथोनी मोटर्स प्रा. लि. यांना चेसीवर बॉडीज करणेसाठी

घनकचरा व्यवस्थापनासाठी टाटा मोटर्स यांच्याकडून चेसिज खरेदी केल्या. ॲन्थनी मोटर्स यांच्याकडून मोटर बांधणी करून घेतली. तर एम.ई.प्रोजेक्ट प्रा.लि. यांच्याकडून कचरा कुंडया घेतल्या. 27 कॉम्पेक्टर, 20 टिपर, 1100 कचरा कुंड्या. या बाबत अधर्समास ज्ञापन पत्र क्र. 23, दि. 26/06/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाचे पत्र क्र. 15, दि. 03/07/2014 रोजी खुलासा केला आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512/)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून स्पर्धात्मक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा दै. मुंबई सकाळ, तरुण भारत व नरविर चिमाजी या स्थानिक पातळीवरील वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही. विभागाने केलेल्या खुलाशानुसार अ वर्गाचे वृत्तपत्रात जाहीरात दिली असून वाजवी दरास स्थायी समितीने मंजूरी दिली आहे. तथापि प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक असतांना विभागाने तशी कार्यवाही केली नाही.

2) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/- (कमाल 5 लाख)

बॉडी बिल्डिंग साठी ॲन्थनी मोटर्स यांना काम दिले आहे. 15 गाड्यांचे काम रक्कम रु. 20418750/- व 12 गाड्यांचे काम रक्कम रु. 16335000/-. त्यामुळे होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम 35100/- असतांना प्रत्यक्षात करारासाठी 30000 रुपयाचे मुद्रांक वापरले आहेत. रक्कम रु. 5100/- चे कमी मुद्रांक वापरले आहे. सबब एकूण रक्कम रु. 5100/- मुद्रांक शुल्काची रक्कम संबंधिता कडून वसुली करून शासन खाती भरणा करावी आणि अनुपालन लेखापरिक्षणास पाठवावे. याबाबत विभागाने केलेल्या खुलाशानुसार रक्कम रु. 5100/- शासन खाती भरणा करण्याचे मे. ॲन्थनी मोटर्स यांना कळविले आहे. परंतु प्रत्यक्षात रक्कम वसुल केली नाही.

3) योजने अंतर्गत 27 कॉम्पेक्टर, 20 टिपर व 100 कचरा कुंड्या खरेदी केलेल्या आहेत. याची नोंद भांडार साठा नमुना 114 मध्ये घेतली आहे. विनियोग म्हणून प्रभागातील आरोग्य निरिक्षकांच्या स्वाक्षऱ्या घेतलेल्या आहेत. परंतु आरोग्य निरिक्षकांनी त्याच्या प्रभागात या साहित्याचा वापर कुठे केला याबाबत प्रभागाच्या नोंदवह्या लेखा परिक्षणास प्राप्त झाल्या नाहीत. विभागाने केलेल्या खुलाशानुसार संबंधिसत प्रभागाच्या आरोग्य निरिक्षकांनी रजिस्टर ठेवले आहे. सदरच्या नोंदवह्या लेखा परीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

4) योजने अंतर्गत खरेदी केलेल्या 27 कॉम्पेक्टर, 20 टिपरचे भाडे घनकचरा व्यवस्थापन कामासाठी नेमलेल्या ठेकेदाराकडून वसुल करावे, यासाठी स्थायी समिती ठराव क्र. 713, दि. 07/12/12 अन्वये मंजूरी दिलेली आहे व भाडे ठरविले आहे. प्रति कॉम्पॅक्टरचे दरमहा भाडे रु. 65000, प्रति टिपर भाडे दर महा रु. 15000. म्हणजेच 27 X 65000 = 1755000 + 20 X 15000 = 300000 भाड्याची दरमहा वसुली होणे आवश्यक आहे. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रभागवार नेमलेल्या ठेकेदारांची देयके तपासता 2012-13 मध्ये काही महिन्यांचे भाडे वसुली केल्याची देयकात नोंद असून एकूण प्रदानातून सदरची रक्कम वसुल केली आहे (वजाती खर्च). परंतु कोणत्या तारखेस कॉम्पेक्टर व टिपर सारखी यंत्र सामुग्री मिळाली, याची नोंदवही ठेवून, कोणत्या तारखेस ठेकेदारास सदरची वाहने दिली, 31 मार्च 2013 अखेर यापैकी किती महिन्यांच्या भाड्याची वसुली केली आणि किती महिन्यांची रक्कम शिल्लक राहिली, याची माहिती/नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. सदरची नोंदवही उपलब्ध करून आली नाही. विभागाने दिलेल्या थकबाकीच्या परिशिष्टानुसार कॉम्पॅक्टर व टिपर यांची मार्च 2013 अखेर थकबाकी रु. 4500000/- इतकी आहे. थकबाकी वसुलीसाठी विभागाने कोणतीही कार्यवाही केली नाही. ठेकेदारास वसुली न करता प्रदान केले आहे. थकबाकीची रक्कम परिशिष्ट क्र. 02 नुसार संबंधित ठेकेदाराकडून त्वरीत वसुल करून महापालिका फंडात जमा करावी आणि अनुपालन लेखा परीक्षणास सादर करावे.

5) शासन निर्णय नगरविकास विभाग क्र. संकिर्ण2008/1338/प्र.क्र.171/08/नवि-20, दि. 02/03/2009 अन्वये विकास कामांसाठी त्रयस्थ संस्थेकडून (Third Party Techinal Audit) तांत्रिक लेखा परिक्षण करून घेणे अनिवार्य आहे. ड वर्ग महापालिकेचे बाबत 50 लाखा पेक्षा अधिक रक्कमेची कामे असल्यास त्यांचे त्रयस्थ लेखा परिक्षण करून घेणे आवश्यक आहे. परंतु त्यानुसार कार्यवाही केली नाही.

वसुलपात्र रक्कम आक्षेपाधीन रक्कम रु. 13977900

मुद्रांक शुल्क रु.5100

कॉम्पॅक्टर टिपर भाडे थकबाकी रु.4500000

एकुण रक्कम रु.4505100

---

24 वसई येथील रुग्णालयातील प्रसुति विभागातील रुग्णांसाठी दुध, बिस्कीटे, अंडी व भोजन पुरवठा करणेबाबत...

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : रुग्णालय आहार मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 292277.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 292277.00/-

महानगरपालिकेच्या वसई येथील रुग्णालयातील रुग्णांना आहार सुविधा पुरविण्याकरीता 2011-12 मध्ये मागविण्यांत आलेल्या निविदा करीता व्यापक प्रसिध्दी देण्यांत आली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झाला नाही. तसेच सदर ठेकेदारास आहार सुविधा पुरविण्याकरीता 2012-13 करीता नियमबाहय मुदतवाढ देण्यांत आली आहे.

वैदयकीय आरोग्य विभागांतर्गत वसई रुग्णालयातील प्रसुति विभागातील रुग्णांसाठी 2011-12 मध्ये निविदा मागविण्यांत आल्या, मे. न्यु छाया श्री. किसनलाल पुरवठाधारकास काम देण्यांत आले. 2012-13 मध्ये मुदतवाढ दिली असुन रक्कम रु.229277/- चे प्रदान केले आहे. दुध, बिस्कीटे, अंडी व भोजन पुरवठा करणे बाबतची नस्ती तपासली. याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.स्था.18ब/लेप/वसई विरार मनपा/12-13/159, दिनांक 30/10/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. विभागाने याबाबत कोणताही खुलासा केला नाही लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार कल्याण विभाग- भाखंस/2512/1088/उदयोग-6, दिनांक 2-1-1992 मधील परिच्छेद क्र.10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी /निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधीकाधीक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणे अधीक श्रेयस्कर ठरते. अशा प्रसिध्दीव्दारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातुन दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा दैनिक नवशक्ती, दैनिक महाराष्ट्र बुलंद टाईम्स या स्थानिक वृत्तपत्रात दिनांक 25-5-2012 रोजी प्रसिध्द केली असल्याने स्पर्धात्मक दरांचा फायदा झाला नाही.
2. या कामासाठी स्थायी समिती सभा दिनांक 25-5-2012 ठराव क्रमांक 218 अन्वये सन 2012-13 करीता मुदतवाढ देण्यांत आली आहे. शासन निर्णय क्र. भाखंस/2512/1088/उदयोग-6, दिनांक 2-1-1992 मधील परिच्छेद क्र.8.3 (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारित मार्गदर्शक तत्वे परिशीष्ठ सात अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश देतांना ते सहा महिन्याच्या अवधीकरीता दयावयाचे आहे. सदरचे आदेश तात्कालीक/आकस्मीक स्वरुपाचे असावेत. असे आदेश देतांना बाजारातील किमती मुळ आदेशापेक्षा कमी

नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने/निविदा मंजुरी समितीने बाजारभावाशी तुलना करुन मंजुर करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने त्यास पूर्ण वर्षासाठी मुदतवाढ दिली आहे. म्हणजे उचित कार्यवाही न करता मुदतवाढ दिल्याचे दिसून येते.

DATBBPM6301 (Ref No : 115, Hmm No : 159)

25 केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा निर्माण करणेची योजना- भुयारी मलनिस:रण

सुवरेज सिस्टिम भुयारी गटार/जल निस:रण

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :नगररचना केंद्र/राज्य मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 17209486.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 7615686.00/-

सॅटेलाईट सिटी योजनेतंर्गत भुयारी गटाराचे काम करतांना प्रकल्प सल्लागारासोबत करार करताना महसुल मुद्रांक कमी रक्कमेचे वापरले, प्रकल्प अहवाल तयार करण्याकामी यापुर्वी भूतपुर्व नगरपरिषदांनी खर्च केलेली रक्कम महापालिकेने नव्याने नेमणूक केलेल्या प्रकल्प सल्लागाराकडून वसुली केली नाही.

केंद्र शासनाने सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा पुरविणे योजने अंतर्गत वसई-विरार महापालिकेची निवड झाली असून महापालिकेने नोडल एजन्सी मार्फत विस्तृत प्रकल्प अहिवाल (DPR) तयार करून राज्य शासना मार्फत केंद्र शासनाकडे पाठविला होता. केंद्र शासनाने घनकचरा व्यवस्थापन व भुयारी योजनेच्या कामास मंजूरी दिली आहे. या योजने अंतर्गत मिळणारे अनुदान-केंद्र हिस्सा 80%, राज्य हिस्सा 10%, मनपा हिस्सा 10% या प्रमाणे आहे. महापालिकेला 2011-12 व 2012-13 या वर्षात पुढील प्रमाणे अनुदान मिळाले आहे आणि त्यातुन महापालिकेने खर्च केला आहे.

(रक्कम रु. हजारात)

अनुदान	2011-12	2012-13	31/03/13 पर्यंत एकूण	खर्च	2011-12	2012-13	एकूण
घनकचरा व्यवस्थापन				घनकचरा व्यवस्थापन			
केंद्र हिस्सा	63453	-	79317		61251	18483	79734
राज्य हिस्सा	7932	-					
मनपा हिस्सा	7932	-					

	2011-12	2012-13	31/03/13	खर्च	2011-12	2012-13	एकूण

वसई विरार मनपा

			पर्यंत एकूण				
भुयारी मलनि:सारण				भुयारी मलनि:सारण			
केंद्र हिस्सा	-	132452	165564	सल्लागार समिती सदस्यांना मनधन	-	300	125836
राज्य हिस्सा	-	16556					
मनपा हिस्सा	-	16556					
				मे. घारपुरे इं.	-	114093	
				मे. टंडन अर्बन प्रकल्प सल्लागार	11443	-	

भुयारी मलनि:सारण :-

कामाचे नांव:- केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा निर्माण करणेची योजना (UIDSSMT)तसेच केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या व भविष्यात जाहिर होणाऱ्या योजनेकामी वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये अनुषंगिक कामांच्या सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व त्यास संबंधित प्राधिकरणांची मान्यता प्राप्त करून घेणे व प्रकल्प राबविणे कामी प्रकल्प सल्लागार (प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंसी सर्व्हिसेस) नेमणे.

प्राकलन :- प्राकलन दराच्या 5.40% + सेवा कर

प्रशासकीय मंजुरी:- सर्वसाधारण सभा ठराव 15, दि. 20/12/2010

तांत्रिक मंजूरी :- _

निविदा तारीख :- 16/01/2011, दै.सामना, दै.लोकराजा, दै.सकाळ, दै.पुढारी

एल-1 निविदा:- मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा. लि. 5.40% + सेवा कर

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 9, दि. 09/03/2011

करार :- 17/06/2011

कार्यादेश :- 17/06/2011

मुदत :- प्रकल्प पुर्ण हाईपर्यंत

काम पुर्ण :- काम अपुर्ण

खर्च :- -

सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा देण्यासाठी महापालिकेने प्रकल्प सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा. लि. यांची नेमणूक केली आहे. याबाबत लेखा परीक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.24, दि. 24/06/2012 अन्वये प्रकल्प सल्लागार नेमणूकीबाबत खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र. निरंक, दि.10/07/2014 अन्वये खुलासा सादर केला आहे. याकामाबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/- (कमाल 5 लाख)

प्रकल्प सल्लागारास काम देतांना एकूण प्राकलन रक्कमेच्या 5.40% + सेवा कर या दराने कामाचा ठेका

दिला आहे. त्यामुळे सॅटेलाईट सिटी कामाच्या आदेशाचा विचार करता मुद्रांक शुल्काची रक्कम रु. 5 लाख (कमाल) होत असतांना मे. टंडन सोबत रु. 100 च्या महसुल मुद्रांकावर करार केला आहे. म्हणजेच अनुज्ञेय असलेल्या मुद्रांक शुल्कापेक्षा कमी रक्कमेचे मुद्रांक वापरले आहे. सबब एकूण रक्कम रु. 499900/- वसुलपात्र आहे. तरी संबंधिताकडून वसुली करुन शासनाचे मुद्रांक महसुल खाती भरणा करावे आणि अनुपालन लेखा परिक्षणास दाखवावे.

विभागाने केलेला खुलासा विचारात घेता मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 कलम 63 च्या संज्ञेनुसार केवळ संपत्तीच्या हस्तांतरणावरच मुद्रांक शुल्क लागु होतो. मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा. लि. यांचे काम केवळ सेवा पुरविण्याचे आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्काची वसुली केली नाही असे कळविले आहे. तसेच महापालिकेने पत्र क्र. 03, दि. 03/04/2014 रोजी मुद्रांक उप रजिस्टार, जिल्हा कोषागार ठाणे यांना पत्र पाठवून मुद्रांक शुल्क लागु होतो का याची विचारणा केली आहे. परंतु उपरजिस्टार यांच्याकडून कोणताही खुलासा प्राप्त झाला नाही. हा खुलासा समर्पक नाही. म्हणून रक्कम रु.499900/- वसुल करुन अनुपालन दाखवावे.

2) कामाबाबतची संबंधित नस्ती व स्थायी समिती ठराव क्र. 9, दि.09/03/2011 अन्वये- पुर्वी भुयारी गटार योजनेसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अन्य प्राधिकरणास दिले होते. त्यांने काही कामही केले होते. त्याचे त्यांना एकुण रु.17209486/- प्रदान केले होते. त्यांमुळे त्यांनी केलेल्या कामाची कागदपत्रे नविन ठेकेदाराला देऊन त्याच्या देयकातुन पुर्वी प्रदान केलेली रक्कम वळती करावी, यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडील डीपीआर बाबतचे व तात्कालीन नियोजन प्राधिकरण सिडको कडील भुयारी गटार योजनेचे मास्टर प्लान व अनुषंगिक कागदपत्रे, दस्त मे. टंडन यांना हस्तांतरीत करण्यांत यावेत असे उपरोक्त ठरावानुसार ठरले. त्यामुळे योजनेच्या प्रकल्प अहवालासाठी पुर्वी खर्च झालेली रक्कम कमी करून ठेकेदाराला प्रदान करावयाचे ठरले. सविस्तर प्रकल्प अहवालापोटी देय होणाऱ्या पहिल्या फेज च्या बिलातुन रक्कम रू. 17209486/- वजा करून घेण्यांत यावी असे ठरले असून त्यास ठेकेदाराने मंजुरी दिली आहे. परंतु सदरची रक्कम वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये वसुल केली नाही.

विभागाने केलेल्या खुलाशानुसार पहिल्या टप्प्याचा मलनिसा:रण प्रकल्प अहवाल रु. 557 कोटी चा सादर केला. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला तत्कालीन विरार नगरपरिषदेने रु. 4650500 इतके प्रदान रु.100 कोटीच्या विरार झोन 1 व 2 करीता केले होते. म्हणजेच प्रत्यक्षात तत्कालीन निरनिराळ्या नगरपालिका, विरार, नालासोपारा, नवघर-माणिकपुर यांनी प्रत्येकाने STP च्या कामासाठी निरनिराळ्या सल्लागारांना प्रदान केले होती. याची एकूण रक्कम रु. 17209486/- चे प्रदान झाले आहे. असे विभागाच्या टिपणी व खुलाशानुसार समजते. या नगरपालिकेसाठी केलेले निरनिराळ्या प्रकल्प अहवालाची कागदपत्रे महापालिकेच्या सल्लागाराला देऊन त्याच्या प्रदानातुन सदरची रक्कम वसुल करावयाची होती. असे वाटाघाटी दरम्यान मे. टंडन यांनी मान्य केले होते. परंतु मे. टंडन यांना प्रकल्पाची किंमत रु. 150 कोटी पेक्षा कमी झाल्यास वजावट आर्थिक दृष्ट्या नुकसान कारक असल्याने DPR करणे कामी कमीत कमी रु. 45 लाख इतकी रक्कम निश्चित करण्यांत आली व उर्वरित रक्कम नंतर कापून घेण्याचे ठरले. विभागाच्या अहवालानुसार प्रकल्प अहवाल तयार करणे कामी रु.1.40% दराने रु. 100.67 कोटीच्या नुसार रक्कम रु. 1,40,93,800/- देय होती. त्यापैकी फक्त रु. 45,00,000/- चे प्रदान केले आहे. म्हणजे महापालिकेकडे रक्कम रु. 95,93,800/- मे. टंडन यांची शिल्लक आहे. सदरची रक्कम महानगरपालिकेने वसुली केल्याचे मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा. लि. यांनी महापालिकेला दि. 05/07/2014 रोजी दिलेल्या पत्रानुसार मान्य केले आहे.

विभागाच्या खुलाशानुसार काम पुर्ण होईपर्यंत शिल्लक असणारी रक्कम रु. 76,15,686/- वसुल करून

वसई विरार मनपा

अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे.

तरी रक्कम रु. 76,15,686/- लेखा परीक्षणात वसुलपात्र ठेवण्यांत येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 10, Hmm No : 24)

26 नगर रचना विभागाकडील बांधकाम परवानगी नस्ती तपासणीत आढळून आलेल्या अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : नगररचना मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 3674919.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3674919.00/-

कामगार कल्याण उपकराची रक्कम रु.३६७४९१९/- वसूल केली नाही. बांधकाम परवानगी देताना अग्निशमन विभागाचे नाहरकत दाखले घेतले नाहीत. विकास नियंत्रण नियमावली २००१ मधील नियम २.१५.१ नुसार sub division करणेसाठी जिल्हाधिकारी/उप विभागीय अधिकारी यांची परवानगी घेतली नाही.

नगर रचना विभागाचे लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

१) नस्ती क्र.VP०८८६ विरार सर्व्हे न.२८८अ, हिस्सा न.१/२ पैकी १अ/३ येथील जमिनीवर बांधकाम आरंभ व अकृषिक ना हरकत दाखला दिला असून सदर दाखला देताना कामगार कल्याण उपकराची रक्कम वसुली केली नाही. सदर जागेची सुधारित विकास परवानगी देताना कामगार कल्याण उपकर रक्कम रु. ४३३३३३/- ची परिगणना बांधकाम क्षेत्र x रेडीरेकनर मधील बांधकाम दर x १% याप्रमाणे केली आहे. परंतु पावती क्र. १६९९२७ दिनांक २८/०१/२०१४ अन्वये केवळ रक्कम रु.५००००/- वसुली केल्याचे दिसून आले आहे. तरी उर्वरित रक्कम रु.३८३३३३/- ची वसुली करणेबाबत अर्धसमास पत्र क्र.५१ दिनांक १७/०७/२०१४ अन्वये विचारणा केली असता विभागाने त्याचे उत्तरात शिल्लक रक्कम रु. ३८३३३३/- विकासकाकडून २% व्याजाने भोगवटा प्रमाणपत्र देण्याच्या आधी वसूल करण्यात येईल असे कळविले आहे. सदरची रक्कम सुधारित बांधकाम परवानगी देताना वसूल करणे आवश्यक होते त्यामुळे केलेला खुलासा संयुक्तिक नाही. तसेच सदर जागेवर G+6 माळ्याची इमारत प्रस्तावित असताना अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला बांधकाम प्रारंभ दाखला देताना घेतला नाही. त्यामुळे महाराष्ट्र आग सुरक्षा प्रतिबंध व जीव सुरक्षा उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ११(१) अन्वये वसूल करावयाची अग्निशमन शुल्क वसुलीची खातरजमा करता आली नाही. याबाबत अग्निशमन अधिकारी यांचा नाहरकत दाखला सादर करण्याचे अटीवर सुधारित परवानगी

दिली आहे. हे विभागाचे उत्तर समाधानकारक नाही.

२) नस्ती क्र. VP०५२७ आचोळे सर्व्हे क्र.१५३ब या जागेवर इमारत क्र.२ ला बांधकाम प्रारंभपत्र ३३४२ दिनांक ११/०३/२०१३ तर सुधारित विकास परवानगी ०२२० दिनांक ११/०३/२०१३ अन्वये तर व सुधारीत परवानगी व बदल सर्व्हे क्र.१५३ व १५४/pt या जागेवर इमारत क्र. १ व २ ला आदेश क्र. VVCMC/TP/RDP/VP-527/163/२०१३-१४ दिनांक १५/०७/२०१३ अन्वये दिली आहे. सदर प्रकरणी दोन्ही इमारतींचे कामगार कल्याण उपकराची रक्कम, बांधकाम क्षेत्र २९६०९.०५ चौ.फुट x १२०००/- रेडीरेकनर बांधकाम दर x १% = रु. ३५५३०८६/- इतकी येत आहे तथापि सदरच्या रक्कमेपैकी रक्कम रु.२६१५००/- इतकी वसुली केल्याचे दिसून आले आहे. उर्वरित रक्कम रु. ३२९१५८६/- वसुली केली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक ५१ दिनांक १७/०७/२०१४ अन्वये विचारणा केली असता विभागाने त्याचे उत्तरात उपकाराचा भरणा करण्याची कार्यवाही सुरु केली आहे. विकासकाकडून २% व्याजाने उपकराची रक्कम वसूल करण्यात येईल असे कळविले आहे. सदरची रक्कम सुधारित बांधकाम परवानगी देताना वसूल करणे आवश्यक होते त्यामुळे केलेला खुलासा सयुक्तिक नाही.

३) नस्ती क्र.VP०७७८ विरार सर्व्हे न.१९५, हिस्सा न.१ व २ येथील जमिनीवर एकूण १२ इमारतींना बांधकाम आरंभ दाखला दिला आहे. परंतु इमारत क्र.१२ चे बांधकाम क्षेत्र १९७५.६२८ चौ.फुट वर कामगार कल्याण उपकर रक्कम रु.२३७०७५/- ची आकारणी करून वसुली केली नव्हती. लेखा परीक्षणात अर्धसमास पत्र क्र.५१ दिनांक १७/०७/२०१४ अन्वये कळविले असता विभागाने पावती क्र.२२७०१२ दिनांक.३०/०७/२०१४ अन्वये भरणा करून घेतले आहेत. सदर जागेवर इमारत क्रमांक ३ ते १३ या stilt+७ मजल्याच्या असताना अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला, बांधकाम प्रारंभ दाखला देताना घेतलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र आग सुरक्षा प्रतिबंध व जीव सुरक्षा उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ११(१) अन्वये वसूल करावयाची अग्निशमन शुल्क वसुलीची खातरजमा करता आली नाही. विभागाने दिलेल्या उत्तरात विकासकाने सीएफओ एनओसी साठी अर्ज केला आहे. ते उत्तर समाधानकारक नाही.

४) नस्ती क्र.VP०९४२ बिलालपाडा सर्व्हे न.४५/४, ५०/२/२, ५०/५ येथील जागेवर औद्योगिक इमारत बांधकाम परवानगी आदेश क्र. १०७७ दिनांक ११/०७/२०१२ अन्वये दिली आहे. सदर नस्तीत ४०४३.३० प्रस्तावित बांधकाम क्षेत्रास मान्यता दिली होती परंतु विकासकाने sub division of plot चा प्रस्ताव सादर केला. त्यास मान्यता दिली आहे. विकास नियंत्रण नियमावली २००१ मधील नियम २.१५.१ नुसार sub division करणेसाठी जिल्हाधिकारी/उप विभागीय अधिकारी यांची परवानगी घेणेची असताना ती घेतलेली नाही. सदरचा sub division of plot प्रस्तावित विकास नियंत्रण नियमावली २०११ नियम ३०(१) खाली नमूद असलेल्या कोणत्या कारणामुळे करण्यात आला ते स्पष्ट झाले नाही. त्यामुळे विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ३२ नुसार सदर जागेचे निव्वळ क्षेत्र ५४३९ चौ.मीटर असल्याने १५% RG चे क्षेत्र ८१५.८५ चौ.मी.व ५% CFC चे क्षेत्र २७१.९५ चौ.मी. चा फायदा संबंधित विकासकास झाल्याचे दिसून आले आहे. तसेच सदर बांधकाम औद्योगिक प्रकारचे असताना देखील अग्निशमन नाहरकत दाखला न घेता बांधकाम प्रारंभ पत्र दिले आहे. त्यामुळे महाराष्ट्र आग सुरक्षा प्रतिबंध व जीव सुरक्षा उपाययोजना अधिनियम २००६ मधील कलम ११(१) अन्वये वसूल करावयाची अग्निशमन शुल्क वसुलीची खातरजमा करता आली नाही. याबाबत अर्धसमास पत्र

क्रमांक.५१ दिनांक १७/०७/२०१४ अन्वये विचारणा केली असता विभागाने विकास नियंत्रण नियमावली २००१ मधील नियम २.१५.१ हा शेतीसाठी वापर होत असलेल्या मिळकतीसाठी आहे. ह्या उत्तरात संबंधित विकासकाने केलेले बांधकाम हे शेतीसाठी वापर होत नसलेल्या जमिनीवर केले आहे असे नमूद केले आहे. तथापि याबाबत लेखा परीक्षणाची साधार खात्री पटविणे आवश्यक असल्याने केलेला खुलासा मान्य करता येत नाही. तसेच अग्निशमन नाहरकत दाखला भोगवटा दाखला देण्यापूर्वी घेतला जाईल हे उत्तर समाधानकारक नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 45, Hmm No : 51)

27 मत्स्य विकास महामंडळाकडून मिळालेले अनुदान व त्यातून महापालिकेने केलेल्या कामाविषयी अनियमीतता.

विकास निधी अंतर्गत बहुउददेशिय मार्केट बांधकाम

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग राज्य शासन अनुदान निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 14372900.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 90353.00/-

आगाशी व बोळींज येथे मच्छी मार्केटचे बांधकाम कामी ठेकेदारांकडून स्वामित्व धनाची रक्कम रु.9353/- वसुल केली नाही. बोळींज मार्केटच्या दुसऱ्या धावत्या देयकातून दोनदा स्वामित्व धनाची रक्कम वसुल केली.

वित्तिय वर्ष 2012-13 मध्ये -

प्राप्त् अनुदानाची रक्कम रु. 16135200 एकूण खर्च रु. 14372900

महानगरपालिकेस मत्स्य विकास महामंडळाकडून वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये प्राप्त् झालेल्या रु.16135200/- अनुदानातून - बहुउददेशिय मार्केटचे (आगाशी व बोळींज) बांधकाम केले आहे. सदर कामावर अनुक्रमे रु. 6723426/- व रु.7693756/- खर्च केला आहे. लेखापरीक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.83, दि.22/08/2014 अन्वये खुलासा विचारला होता. परंतु विभागाने खुलासा केला नाही. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) आगाशी येथे मच्छी मार्केटचे बांधकाम करणे.

प्राकलन:- रु. 2,21,68,291/-

प्रशासकीय मंजुरी:- सर्वसाधारण सभा ठराव क्र. 15, दि. 19/01/2011

वसई विरार मनपा

तांत्रिक मंजूरी:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण क्र. 25/2011-12,दि. 04/07/2011

निविदा तारीख :- 02/08/2011 सामना/लोकमत

एल-1 निविदा:- मे. सुहास एंन्टर प्रायझेस 4.70% जादा दराने

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 03, दि. 20/09/2011

करार :- 19/10/2011

कार्यादेश:- 1060, दि. 05/11/2011

मुदत :- 180 दिवस, मुदत वाढ 31/12/2013 पर्यंत

काम :- अपूर्ण

खर्च: **पहिले धावते - प्रमाणक क्र. 913, दि. 28/06/2012 रु. 2547124**
मोजमाप पुस्तक 142 पृष्ठ क्र. 1 ते 15
दुसरे धावते - प्रमाणक क्र. 3001, दि. 27/11/2012 रु. 2178441
मोजमाप पुस्तक 142 पृष्ठ क्र. 23 ते 46
तिसरे धावते - प्रमाणक क्र. 4058, दि. 04/03/2013 रु. 1997861
मोजमाप पुस्तक 142 पृष्ठ क्र. 46 ते 65
एकूण रक्कम 6723426

लेखा परिक्षण काळात काम अपूर्ण आहे. पहिले धावते देयक तपासले असता त्यातून स्वामित्व धनाची रक्कम वसुल केली नाही.
मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरात येणारे उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, दगडांची भुकटी, गोटे, बारीक खडी, मुरुम, वाळू यावर स्वामित्व धनांची रक्कम प्रति ब्रास रु 200 वसूल करुन शासन खाती महसूल व वन भरणा करावयाची आहे महापालिकेने कामाबाबत ठेकेदारांचे जे खालील प्रमाणे 95.08 ब्रास साहित्य वापरले त्या साहित्यावरील गौण खनिजांची रक्कम रु. 30886/- वसुल केलेली नाही असे दिसून आले. खालील दर्शविल्या प्रमाणे गौण खनिज स्वामित्व धनांची रक्कम (रॉयल्टी) वसूल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दाखवावे.

	रेती	167.97 cum
म्हणजे	59.35 ब्रास X 400 =	23740
मेटल/खडी	101.12 cum	
म्हणजे	35.73 ब्रास X 200 =	7146

एकूण रक्कम रु. 30886

2) बोळीज येथे मच्छी मार्केटचे बांधकाम करणे.

वसई विरार मनपा

प्राकलन:- रु. 2,35,02,373/-

प्रशासकीय मंजुरी:- सर्वसाधारण सभा ठराव क्र. 15, दि. 19/01/2011

तांत्रिक मंजूरी:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण क्र. 24/2011-12,दि. 04/07/2011

निविदा तारीख :- 02/08/2011 सामना/लोकमत

एल-1 निविदा:- मे. ज्योती कंस्ट्रक्शन 4.94% जादा दराने

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 02, दि. 20/09/2011

करार :- 30/10/2011

कार्यादेश:- 1093, दि. 14/11/2011

मुदत :- 180 दिवस,

काम :- अपूर्ण

खर्च: **पहिले धावते - प्रमाणक क्र. 117, दि. 26/04/2012 रु. 3715497**
मोजमाप पुस्तक 134 पृष्ठ क्र. 1 ते 43
दुसरे धावते - प्रमाणक क्र. 3955, दि. 21/02/2013 रु. 3978259
मोजमाप पुस्तक 162 पृष्ठ क्र. 27 ते 42
एकूण रक्कम 7693756

लेखा परिक्षण काळात काम अपूर्ण आहे. पहिले धावते देयक प्रमाणक क्रमांक 117, दि.26/04/2012 रक्कम रु.3715497/- तपासले असता त्यातून स्वामित्व धनाची रक्कम/ वसुल केली नाही.

मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरात येणारे उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, दगडांची भुकटी, गोटे, बारीक खडी, मुरुम, वाळू यावर स्वामित्व धनांची रक्कम प्रति ब्रास रु 200 वसूल करुन शासन खाती महसूल व वन भरणा करावयाची आहे महापालिकेने कामाबाबत ठेकेदारांचे जे खालील प्रमाणे 223.41 ब्रास साहित्य वापरले त्या साहित्यावरील गौण खनिजांची रक्कम रु.59467/- वसुल केलेली नाही असे दिसून आले. खालील दर्शविल्या प्रमाणे गौण खनिज स्वामित्व धनांची रक्कम (रॉयल्टी) वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दाखवावे.

	रेती	209.18 cum
	म्हणजे	73.91 ब्रास X 400 = 29566
	मेटल/खडी	423.11 cum
	म्हणजे	149.50 ब्रास X 200 = 29901

एकूण रक्कम रु. 59467

3) बोळींज मार्केटचे दुसरे धावते देयक प्रमाणक क्रमांक 3955, दि.21/02/2013 रु. 3978259 या रकमेचे आहे. मोजमाप पुस्तक क्र. 162 पृष्ठ क्र. 27 ते 47 मधील नोंदी पाहता बांधकाम विभागाने एकूण देयकातून स्वामित्व धनाची रक्कम रु. 44283/- वळती करुन देयक रु. 3933976/- मंजूरीची शिफारस केली आहे.

लेखा विभागाने देयक पारित करताना त्यातून पुढील प्रमाणे वजावटी केल्या आहेत.

सुरक्षा अनामत	रु.	214808
आयकर	रु.	78680
वॅट	रु.	78680
स्थानिक संस्था कर	रु.	39340
कामगार कल्याण उपकर	रु.	39340
स्वामित्व धनाची	रु.	44283
एकूण वसुलीची रक्कम	रु	495131
निव्व्ळ प्रदानाची रक्कम	रु	3438845
एकूण एकंदर	रु	3933976

मोजमाप पुस्तकांचा एकूण एकंदर रक्कम रु. 3978259/- मधून स्वामित्व धनाची रक्कम रु. 44283/- वसुली करुन शिल्लक रक्कम रु.3933976/- दाखविलेली आहे. त्यामुळे ठेकेदाराच्या देयकातून स्वामित्व धनाची रक्कम दोन वेळा वसुल करण्यात आली.

उपरोक्त उणिवांची पुर्तता करेपर्यंत रक्कम रु. 90353 लेखा परिक्षणात वसुलपात्र ठेवण्यांत येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 32, Hmm No : 83)

28 वसई -विरार शहर महानगरपालिका हददीतील वालीव,सातीवली, गौराईपाडा, नवघर (पूर्व) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये मुलभूत सुविधा (रस्ता, गटारे व पूल) निर्माण करणे बाबत.

विकास निधी अंतर्गत रस्ते बांधणे व गटार बांधणे, इतर विकास कामे.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 75617976.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 3333777.00/-

निविदा मंजूरीचा ठराव उपलब्ध झाला नाही. ठेकेदाराला वाटाघाटीला बोलावल्याचे दस्तऐवज उपलब्ध झाले नाहीत. भू-भाडे व अनामत रक्कम वसुल केली नाही. ठेकेदारास दिलेल्या अग्रीमाचे व्याज वसुल केले नाही. गौण खनीजाची रक्कम वसुल केली नाही. जादा प्रदानाची रक्कम वसुल केली नाही.

कामाचे नांव :- वसई –विरार शहर महानगरपालिका हददीतील वालीव,सातीवली, गौराईपाडा, नवघर (पूर्व) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये मुलभूत सुविधा (रस्ता, गटारे व पूल) निर्माण करणे.

योजना संकेतांक :- 210-4133-1 **योजनेचे नांव:-** विकास निधी अंतर्गत रस्ते बांधकाम

010-4130 इतर विकास कामे

111-4132 विकास निधी अंतर्गत गटार बांधकाम

शाखा संकेतांक :- 04 **लेखाशिर्ष** :- सार्वनिक बांधकाम

06 पाणी पुरवठा व मल:निसारण

प्राकलन :- रु. 39,10,03,486/-

प्रशासकीय मंजुरी :- महासभा ठराव क्र. 12, दि. 20/07/2011.

9 ते16, दि. 18/08/2011.

04, दि. 04/11/2011.

तांत्रिक मंजुरी :- एकुण 14 कामांना शहर अभियंता यांनी दि. 08/11/2011 रोजी तांत्रिक मंजूरी दिली आहे. (DSR- 2011-12)

निविदा तारीख :-दि. 21/11/2011, दैनिक लोकमत व महाराष्ट्र बुलंद टाइम्स (निविदा उघडल्या दि. 19/12/2011)

एल-1 निविदा :- मे. एन.जी.प्रोजेक्ट लि. 14.11% जादा दराने, वाटाघाटीने 4.95 % जादा दराने

निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र. 33, दि. 12/03/2012

करार :- दि. 21/03/2012 मुद्रांक रु. 3,90,200

कार्यादेश :- क्र . वविशम/श.अ./बां.वि./14/11-12, दि. 21/03/2012

मुदत :- 1 वर्ष, मुदतवाढ दि. 15/11/2014 पर्यंत दिली आहे.

कामाची स्थिती :- काम अपूर्ण

खर्च :- कामासाठी दिलेले अग्रीम पुढीलप्रमाणे -

जल-मल निधी- प्रमाणक क्र. 69, दि. 16/05/2012 रु. 1,00,00,000 मुलभूत सुविधा (गटारे) निर्माण करणे. मोबीलायझेशन अग्रीम विकास निधी अंतर्गत गटार बांधणे.

सर्वसाधारण निधी-प्रमाणक क्र. 357,दि. 16/05/2012 रु. 2,90,00,000 मुलभूत सुविधा (रस्ते) निर्माण करणे. मोबीलायझेशन अग्रीम (विकास निधीतून 1 कोटी व इतर विकास कामामधून 1.90 कोटी) प्रमाणक क्र. 3802,दि. 12/02/2013 रु. 1,70,00,000 औद्योगिक वसाहतीमध्ये मुलभूत सुविधा निर्माण करणे. मशीनरी अग्रीम- रस्ते बांधकाम

प्रमाणक क्र. 3803,दि. 12/02/2013 रु. 25,00,000 औद्योगिक वसाहतीमध्ये मुलभूत सुविधा निर्माण करणे.मशीनरी अग्रीम - इतर विकास कामे

एकुण अग्रीमाचा खर्च रु. 5,85,00,000

एम.बी. – अग्रीम प्रदानाची नोंद मोजमाप पुस्तकात घेतली नाही.

तसेच झालेल्या कामाचे पुढील प्रमाणे प्रदान केले आहे.

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	लेखा शीर्ष	तपशील
2390	25/10/12	3467861	इतर विकास	मे. एन.जी.प्रोजेक्ट लि.

			कामे. सर्व -किर्द	प्रथम धावते देयक, MB NO. 218 पृष्ठ 1 ते 31, व्याज वसुली रु. 693572, रॉयल्टी वसुली नाही.
451	----//-----	1215236	गटार बांधणे, जल-मल किर्द	-----//------ व्याज वसुली रु. 243047 रॉयल्टी वसुली नाही.
869	18/03/13	10167819	----//-----	NO. 218 पृष्ठ 32 ते 76, व्याज वसुली नाही, रॉयल्टी वसुली नाही.
4291	----//-----	1493091	इतर विकास कामे. सर्व -किर्द	व्याज वसुली नाही, रॉयल्टी वसुली नाही.
4292	----//-----	773969	रस्ते बांधणे, सर्व साधारण किर्द	व्याज वसुली रु. 453412, रॉयल्टी वसुली नाही.
एकुण		**17117976**		**1390031**

दि. 31/03/13 पर्यंत ठेकेदारास एकुण अग्रीम रु. 5,85,00,000 चे प्रदान केले आहे झालेल्या कामापोटी रक्कम रु. 1,71,17,976 चे प्रदान केले आहे. ठेकेदाराचे बीलातुन अग्रीमाची वसुली केली नाही. अग्रीमावरील व्याजापैकी रक्कम रु. 13,90,031 इतकी वसुली केली आहे. करारातील अटी शर्तीनुसार ठेकेदाराला प्रदान करतांना अग्रीम समायोजन करणे आवश्यक होते. विभागाने तशी कार्यवाही केली नाही.

या कामासाठी जाहीर निविदा मागविल्या असता एकुण 5 निविदा प्राप्त झाल्या.

मे. एन.जी.प्रोजेक्ट लि. 14.11% जादा दराची, वाटाघाटी नंतर 4.95 % जादा दराने

मे. चेतक इंटरप्रायझेस लि. 19.60 % जादा दराने

मे.विशाल इन्फास्टक्चर लि. 17.10% जादा दराने

मे. एन.ए.कनस्ट्रक्शन 22.10% जादा दराने

मे.चिराग इन्फ्रा प्रा.लि. अपात्र

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.190, दि.08/12/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) निविदा मंजूरीचा स्थायी समिती ठराव क्र. 33, दि. 12/03/2012 ची प्रत मागण्यासाठी उपरोक्त अर्धसमास पत्र देण्यांत आले होते, परंतु विभागाने मंजुर ठरावाची प्रत उपलब्ध करुन दिली नाही.

2) या कामासाठी 5 निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी 4 पात्र असताना मे. एन.जी.प्रोजेक्ट लि. यांच्या सोबत दि. 17/01/2012 रोजी वाटाघाटी करुन 4.95% जादा दराने यांची निविदा स्वीकारण्यात आली. परंतु त्यांना वाटाघाटीला बोलावल्याचे पत्र, त्यांचे मंजूरीचे पत्र अभिलेख्यात उपलब्ध झाले नाही. वाटाघाटी झाल्याचे अधीकृत दस्तऐवज नाहीत.

3) विभागाची दि. 08/10/2013 ची टिपणी पाहता भाडयाची 1 वर्षाची मुदत दि. 05/06/2013 रोजी संपली असल्याने ठेकेदाराने मुदत वाढ मागितली आहे. परंतु भाडयाची वसुली केलेली नाही. सबब 16194 x 2 = 32388 व अनामत रु. 50,000 अशी एकुण 82,388 इतकी रक्कम वसुलपात्र आहे.

4) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता प्रकरण 10 बांधकाम लेखे 'घ' कंत्राटदाराना आगाऊ रकमा देणे, परिच्छेद 10.2.21, 10.2.22 अन्वये - नियमानुसार कंत्राटदाराला आगाऊ रकमा देण्यास मनाई आहे. जागेवर आणलेल्या सामानाच्या मुल्याच्या 75% पेक्षा अधीक नसेल, इतक्या आगाऊ रकमा मंजूर करता येतील. त्यासाठी ठेकेदारांने जागेवर आणलेल्या सामानाची नोंद मोजमाप पुस्तकात घेऊन, त्याचे प्रमाणात अग्रीम दिल्याची नोंद घेणे जरुरीचे आहे.

महापालिकेच्या निविदेतील अटी/ शर्ती पाहता पृष्ठ क्र. 144 नुसार मोबीलायझेशन अग्रीम, इक्वीपमेंट अग्रीम, सीक्युअर्ड अग्रीम देण्याची तरतुद असून द.सा.द.शे 12% व्याजाने अग्रीम देण्याची तरतुद नमूद केली आहे. लेखा परिक्षण काळात एकुण रु. 5,85,00,000 अग्रीम देण्यात आले आहे. (रु. 390 लाख मोबीलायझेशन व रु. 195 लाख मशीनरी अग्रीम) सदरचे अग्रीम निरनिराळया दिनांकास दिले आहे. त्याची नोंद मोजमाप पुस्तकात घेण्यात आली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 नियम 189 नुसार दिलेले अग्रीम व वसुलीबाबतच्या नोंदी नमुना नं.147 मध्ये घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही विभागाने केली नाही. दि. 31/03/2013 अखेर या अग्रीमाच्या व्याजाची होणारी एकुण रक्कम रु. 43,97,917/- आहे. त्यापैकी रु. 13,90,031 ठेकेदारातील देयकातुन वसुल केली आहे. उर्वरित व्याजाची रक्कम रु. 30,07,886 प्रदान करतांना वसुल केली नाही.

5) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरात येणारे, उत्खननाव्दारे किंवा गोळा करुन काढलेले दगड, दगडाची भुकटी, गोटे, बारीक खडी, मुरुम, वाळु यावर सामित्व धनाची रक्कम प्रती ब्रास रु. 200 वसुल करुन शासन खाती (महसुल व वन विभाग) भरणा करावयाची आहे.

विभागाने लेखा परिक्षण काळात ठेकेदारास एकुण प्रदान रु. 1,71,17,976 इतके केले आहे. परंतु त्यातुन रॉयल्टीच्या रकमा वसुल केल्याचे दिसुन येत नाही. त्याचा तपशील पुढील प्रमाणे -

माती 133 ब्रास x दर 200 =	रु. 26,600
रेती 236 ब्रास x दर 400 =	रु. 94,400
दगड/खडी/डबर 1966 ब्रास x दर 200 =	रु. 3,93,200
एकुण	रु. 5,14,200

कामाबाबत लेखा परिक्षणाचे वेळी अर्ध समास ज्ञापन पत्र क्र. 190, दि. 08/12/2014 अन्वये खुलासा विचारला होता. शहर अभियंता यांचेकडील पत्र क्र.निरंक, दि. 10/12/2014 अन्वये अनुपालन सादर केले. ठेकेदाराने स्वामीत्व धनाची एकुण रक्कम रु. 2,80,000 शासन खाती भरणा केल्याची चलने दाखवली व त्याच्या प्रमाणीत प्रती लेखा परिक्षणास सादर केल्या. ठेकेदाराने अद्याप रक्कम रु. 2,34,200 गौण खनीजाची रक्कम शासन खाती भरणा केली नाही. सबब रक्कम रु. 2,34,200 ठेकेदाराकडुन वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दाखवावे.

6) प्रमाणक क्र. 4292, दिनांक 18/03/2013 रक्कम रु. 7,73,969
मोजमाप पुस्तक क्र. 218, पृष्ठ क्र. 32 ते 76 (रस्ते बांधणे, सर्व साधारण किर्द)
या प्रमाणकात Sub Work No. 5 मोजमाप पुस्तक क्र. 218, पृष्ठ क्र. 51 वरील नोंदी तपासता - प्रत्यक्षात मोजमाप पुस्तकातील परिमाणापेक्षा देयकात जादा परिमाणाची नोंद केल्याने जादा प्रदान झाल्याचे दिसुन येते.

Item No. 5 Compaction of Metal 523.80 MB मध्ये नोंद आहे.

वसई विरार मनपा

604.05 बीलात नोंद आहे.
80.25 जादा
म्हणून 80.25 x दर 13.65 = रु. 1095.41 जादा प्रदान.
Item No. 8 Supply 40mm Metal 523.80 MB मध्ये नोंद आहे.
532.80 बीलात नोंद आहे.
9.00 जादा
म्हणून 9 x दर 911.95 = रु. 8207.95 जादा प्रदान.
सबब एकुण जादा प्रदानाची रक्कम रु. 9302.96 वसुल करावी.

7) काम लेखा परिक्षण कालावधीत अपूर्ण आहे. कामास मुदतवाढ 15/11/2014 पर्यंत दिली आहे. काम पूर्ण झाल्यानंतर अभिलेख्यासह लेखा परिक्षणास दाखवावे.

तरी लेखा परिक्षणात रक्कम रु. 33,33,777 वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

वसुली रकमांचा तपशील

भू- भाडे वसुली रक्कम	रु. 32,388
भाडे अनामत रक्कम	रु. 50,000
अग्रीम व्याजाची रक्कम	रु. 30,07,886
गौण खनीज वसुली रक्कम	रु. 2,34,200
जादा प्रदान रक्कम	रु. 9,303
एकुण	रु. 33,33,777

DATPMVM6001 (Ref No : 120, Hmm No : 190)

29 मनपा विविध कार्यक्रम, चहापान-भोजन तसेच मंडप व विद्युत, साऊंड इत्यादी व्यवस्था करणे.

सत्कार समारंभ, महापौर चषक, सांस्कृतिक कार्यक्रम

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : भांडार विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 28157734.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 11000.00/-

महापालिका सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तिय मंजुरी घेतेली नाही. जादा प्रदान केलेली रक्कम रु.11000/-वसुल करावी.

कामाचे नांव:- मनपा विविध कार्यक्रम, चहापान-भोजन तसेच मंडप व विद्युत, साऊंड इत्यादी व्यवस्था करणे.
योजना संकेतांक :- 524-2742-2571 **योजनेचे नांव:- सत्कार समारंभ, महापौर चषक, सांस्कृतिक कार्यक्रम**
तरतूद:- रु. 136 **लक्ष** **खर्च:- रु.** 1,35,02,383
योजना संकेतांक :- 3179 **योजनेचे नांव:- महापौर मॅरेथॉन**
तरतूद:- रु. 153 **लक्ष** **खर्च:- रु.** 1,46,55,351
प्राकलन :- 75 **लक्ष**
प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती सभा ठराव क्र. 31, **दि.** 12/03/2012
निविदा तारीख:- दि. 18/08/2012, **वार्ताहर व बुलंद टाईम्स.**
एल-1 निविदा:- मे. आकाश इंटरप्रायझेस, मे. लवबर्ड मंडप डेकोरेटर्स, मे. शार्वी कॅटरर्स
निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 525, **दि.** 17/09/2012
करार:- उपरोक्त सहा ठेकेदारासोबत प्रत्येकी रु. 6600 **मुद्रांकांवर करार केला आहे.**
कार्यादेश:- आवश्यकतेनुसार वेळोवेळी कार्यादेश दिलेले आहेत.
मुदत :- 1 **वर्ष**
सदरची निविदा दि. 17/09/2012 **रोजी मंजूर झाल्याने वित्तिय वर्ष** 2012-13 **च्या सुरुवातीच्या काही महिन्यासाठी जुन्या ठेकेदारास मुदतवाढ दिलेली आहे.** (**स्थायी समिती ठराव क्र.** 31, **दि.** 12/03/2012)

लेखापरीक्षणाचे वेळी निवडक प्रमाणके तपासली. त्याचा उदाहरणादाखल तपशील पुढील प्रमाणे.

प्रमाणक क्रमांक 3507, दि. 15/01/13, रुपये 5,64,300/- मे. आकाश एंटरप्रायजेस
3618, दि. 23/01/13, रुपये 10,68,980/- मे. लव्हबर्ड मंडप डेकोरेटर्स.

लेखा परिक्षणाचे वेळी या कामाच्या दप्तरी अभिलेख्याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 99, दि. 03/09/2014 व क्र. 109, दि. 09/09/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचेकडील पत्र क्र. 1431, दि. 12/09/2014 रोजी खुलासा सादर केला आहे. या कामाबाबत लेखा परिक्षणास पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 73 नुसार कामाचा खर्च रु. 75 लाखापेक्षा अधिक असल्यास, प्रशासकीय व वित्तिय मंजूरी देण्याचा अधिकार महासभेला आहे. या कामासाठी स्थायी समितीची प्रशासकीय व वित्तिय मंजूरी घेताना खर्च रु. 75 लाखाचे मर्यादेत दाखविला होता. प्रत्यक्षात निविदा मंजूर ठेकेदाराला महापालिकेने इतरही कामे दिली आहेत. त्यामुळे सत्कार समारंभासाठी/महापौर चषकासाठी व महापौर मॅरेथॉनसाठी केलेल्या खर्चाचा विचार करता एकुण खर्च 135 लाख सत्कार समारंभासाठी केला आहे व एकुण खर्च 147 लाख महापौर मॅरेथॉन साठी केला आहे. त्यामुळे सर्वसाधारण सभेची मंजूरी घेणे आवश्यक होते. परंतू विभागाने वेगवेगळया कार्यक्रमासाठी स्वतंत्र रित्या स्थायी समितीची मंजूरी घेऊन सर्वसाधारण सभेपुढे हा विषय ठेवुन त्यास मंजूरी घेतली नाही.

2) प्रमाणक क्र. 3507, दि. 15/01/2013, रक्कम रु. 564300 मे.आकाश इंटरप्रायझेस यांना खुर्च्या,

टेबले,विद्युत जनित्र,साऊंड सिस्टिम इत्यादी करीता गणेश उत्सव कार्यक्रम खर्च म्हणून प्रदान.
गणेश उत्सव कार्यक्रमासाठी 4 दिवस खुर्च्या, टेबले, विद्युत जनित्र, साऊंड सिस्टिम इत्यादी करीता ठराव क्र. 525, दि. 17/09/2012 नुसार प्रदान केले आहे. प्रत्यक्षात ठरावाने मंजूर कलेले दर आणि केलेले प्रदान यात तफावत आहे. म्हणजे मंजूर दरापेक्षा ठेकेदाराने जादा दराचे देयक सादर केले. देयकाची तपासणी करता गणेशउत्सवासाठी इतर सर्व साहित्या 4 दिवसासाठी घेतले असताना जुचंद्र विभागासाठी पुरविलेल्या प्लॅस्टिक खुर्च्या, सांऊड सिस्टिम व राजावली विभागासाठी पुरविलेल्या विद्युत जनित्र 5 दिवसासाठी वापरले म्हणून देयक सादर केले आहे. म्हणजेच इतर साहित्य 4 दिवसासाठी घेतले होते व काही साहित्य् 5 दिवसासाठी घेतले होते अशी विसंगती दिसून येते. गणेशोत्सवासाठी ठेकेदाराने पुरविलेले साहित्य एकतर 4 दिवसासाठी असु शकेल किंवा 5 दिवसासाठी असु शकेल. म्हणजेच एकाच देयकात/एकाच कार्यक्रमासाठी दर्शविलेल्या दिवसांमध्ये विसंगती आहे. या देयकाची तपासणी महापालिका मुख्यालयातील लेखा शाखा, अंतर्गत लेखा परीक्षा शाखा यांनी केल्याचे दिसुन येत नाही.

जुचंद्र विभागासाठी पुरविलेल्या प्लास्टिक खुर्च्या जादा प्रदान रु. 600/-
-//- साऊंड सिस्टिम जादा प्रदान रु. 6000/-
राजावली विभागासाठी पुरविलेल्या विद्युत जनित्र जादा प्रदान रु. 4400/-
एकूण रु. 11000/-

सदर जादा प्रदानाची रक्कम संबंधितांकडून तात्काळ वसुल करून महापालिका फंडात जमा करावी.
लेखा परीक्षणाच्या वेळी निवडक प्रमाणके तपासता जादा प्रदानाचे प्रकरण आढळून आले आहे. म्हणजेच गणना न करता, ठरावानुसार मंजुर दर न पाहता, दिवसातील विसंगती न पाहता प्रदान केल्याचे दिसुन आले. अंतर्गत लेखा परीक्षा विभागाने व लेखा विभागाने याबाबीकडे लक्ष दिल्याचे दिसुन येत नाही. एकंदरीत अंतर्गत तपासणी (Internal Checks), अंतर्गत लेखा परीक्षण (Internal Audit), अंतर्गत नियंत्रण (Internal Control) चा अभाव अल्याचे दिसुन येते.
उपरोक्त उणिवांची पूर्तता करेपर्यंत लेखा परिक्षणास रक्कम रु. 11,000 वसुल पात्र ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 53, Hmm No : 109)

30 उदयान परिरक्षण कामामधील मुद्रांक शुल्क कमी वसुल केल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :03 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 5200.00/-

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या 67 उदयानांच्या परिरक्षणाकरीता तयार केलेल्या करारनाम्याकरीता रुपये 5,200/- मुद्रांक शुल्क कमी वसुल केले आहे.

वसई विरार मनपा

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या 67 उदयानांचे 2011-12 या वित्तीय वर्षाच्या कालावधीकरीता परिरक्षण करण्याकरीता निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. महानगरपालिकेची खालील प्रमाणे विभाग निहाय एकूण 67 उदयाने आहेत.

1) विरार : 20
2) नालासोपारा : 14
3) नवघर माणिकपूर : 29
4) वसई : 4

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक : 4, दिनांक 8.2.2012 अन्वये खालील निविदाकारांना विभागनिहाय उदयान परिरक्षणाचे काम मंजुर करण्यात आलेले आहेत.

अ.क्र.	**संस्थेचे नांव**	**विभाग**	**दर प्रतीमहा रुपये**
1	रेन्बो कंन्स्ट्रक्शन.	विरार	2,26,455/-
2	शार्प इंटरप्रायजेस.	नालासोपारा	2,99,345/-
3	शिवम इंटरप्रायजेस	नवघर माणिकपूर	2,46,302/-
4	श्री. अनंत इंटरप्रायजेस	वसई	83,214/-

महानगरपालिकेने संबंधीत संस्थैंबरोबर रुपये 500/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा केलेला आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या मक्त्याच्या रकमेवर संबंधीत ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दिनांक 1.5.2006 पासुन पुढील प्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

1) कामाची रक्कम रुपये 10 लाखापर्यंत. : मुद्रांक शुल्क रुपये 100/-

2) त्यानंतर प्रत्येक लाखाकरीता.. : मुद्रांक शुल्क रुपये 100/-

तथापि महानगरपालिकेने संबंधीत निविदाकारांकडून मुद्रांक शुल्काची रक्कम कमी वसुल केलेली आहे.

वसई विरार मनपा

त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	संस्थेचे नांव	दर प्रती महिना रुपये	वार्षिक खर्च रुपये	देय मुद्रांक शुल्क रुपये	करारनाम्याकरीता वापरलेले मुद्रांक शुल्क रुपये	कमी वसुल केलेले मुद्रांक शुल्क रुपये
	विरार विभाग					
1	रेन्बो कंन्स्ट्रक्शन.	2,26,455/-	27,17,460/-	1,900/-	500/-	1,400/-
	नालासोपारा विभाग					
2	शार्प इंटरप्रायजेस.	2,99,345/-	35,92,140/-	2,700/-	500/-	2,200/-
	नवघर माणिकपूर					
3	शिवम इंटरप्रायजेस	2,46,302/-	29,55,624/-	2,100/-	500/-	1,600/-
	वसई विभाग					
4	श्री.अनंत इंटरप्रायजेस	83,214/-	9,98,568/-	100/-	500/-	--
	एकूण					**5,200/-**

उपरोक्त मुद्रांक कमी वसुल केल्याबाबत उदयान विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 45, दिनांक 16.7.2014 निर्गमित करण्यात आले असुन विभागाकडून अनुपालन सादर करण्यात आलेले नाही. सबब निविदाकारांकडून मुद्रांक शुल्काची रक्कम रुपये 5,200/- वसुलपात्र आहे.

(वसुलपात्र रक्कम रुपये 5,200/-)

DMASGDM7201 (Ref No : 65, Hmm No : 45)

31 धुकटन येथील जलशुध्दीकरण केंद्र येथे विकसीत करण्यात आलेल्या रोपवाटीकांच्या त्रुटींबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :03 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 7980000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7980000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 5400.00/-

वसई विरार शहर महानगरपालिकेने धुकटन येथील जलशुध्दीकरण येथे विकसीत करण्यात आलेल्या रोपवाटीकेच्या करारनाम्याकरीता रुपये 5,100/- कमी मुद्रांक शुल्क घेतले असुन 790000 रोपे वाटपाअभावी शिल्लक राहील्यामुळे महानगरपालिकेचे रुपये 79,80,000/- गुंतून राहीले आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिकेने त्यांचे शहरामध्ये वृक्षांची लागवड करण्याकरीता धुकटन येथील जलशुध्दीकरण केंद्र येथे रोपवाटीका विकसीत केली आहे. विविध प्रकारच्या वृक्षांची रोपे तयार करण्याकरीता महानगरपालिकेने निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1) निविदा प्रसिध्द दिनांक 4.5.2012 दैनिक लोकमत.

2) मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक : 272/19, दिनांक 6.6.2012

3) वृक्ष प्राधिकरण समिती ठराव क्रमांक : 03, दिनांक 17.2.2011

4) कामाचा तपशिल :-

अ) रोपवाटीकेच्या जागेमध्ये चरखोदाई, संरक्षण कुंपण व जमिन सपाटीकरण.

आ) 7 लक्ष रोपांची निर्मिती करुन 90 दिवस संगोपन करणे.

इ) तयार होणा-या रोपांचे स्वत:कडील साहित्याचा वापर करुन संगोपन करणे.

5) कामाचा कालावधी 90 दिवस.

6) मे. सावे ट्रि प्लांटेशन यांना निविदा मंजूर.

7) करारनामा दिनांक 7.6.2012.. मुद्रांक शुल्क रुपये 500/-

मे. सावे ट्रि प्लांटेशन यांनी सादर केलेला दर मंजूर करण्यात आला असुन महानगरपालिकेने

जा.क्र.74/2012, दिनांक 7.06.2012 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर संस्थेच्या मंजुर दरानुसार 7 लक्ष रोपांच्या निर्मितीकरीता करावा लागणारा खर्च खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	**कामाचा तपशिल**	**दर प्रति लक्ष रुपये**	**7 लक्ष रोपांकरीता रुपये**
1	रोपवाटीकेच्या जागेमध्ये चरखोदाई, संरक्षण कुंपण व जमिन सपाटीकरण.	3,50,000	24,50,000
2	7 लक्ष रोपांची निर्मिती करुन 90 दिवस संगोपन करणे.	5,80,000	40,60,000
3	तयार होणा-या रोपांचे स्वत:कडील साहित्याचा वापर करुन संगोपन करणे (प्रति महा).	30,000	2,10,000

रोपवाटीका विकसीत करणे व विविध प्रकारच्या वृक्षांची रोपे तयार करणेबाबतच्या नस्तीची तपासणी केली असता, लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) महानगरपालिकेने मे. सावे ट्रि प्लांटेशन यांचे सोबत केलेला करारनामा रुपये 500/- रकमेच्या मुद्रांक शुल्कावर करण्यात आलेला असुन मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या मक्त्याच्या रकमेवर संबंधीत ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दिनांक 1.5.2006 पासुन सुधारीत दरानुसार मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर कामाची रक्कम रुपये 67,20,000/- असल्याने मुद्रांक शुल्क रुपये 5,900/- देय आहे. तथापि सदर कामाचा करारनामा रुपये 500/- च्या मुद्रांक शुल्कावर केल्यामुळे शासनाचे रुपये 5,400/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे रुपये 5,400/- संबंधीत संस्थेकडून वसुल करणे आवश्यक आहे.

2) मे. सावे ट्रि प्लांटेशन यांचे सोबत करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार काजू : 2 लक्ष, करंज : 2 लक्ष, जांभुळ : 1 लक्ष, आंबा : 1 लक्ष व इतर : 1 लक्ष अशा प्रमाणे 7 लक्ष रोपांची निर्मिती करावयाची होती. दिनांक 30.3.2013 अखेर नमुना क्रमांक : 116 मालपुस्तकाची तपासणी केली असता दिनांक 20.8.2012 रोजी 5,000 व 15.1.2013 रोजी 5,000 रोपांचे म्हणजेच एकूण 10,000 रोपांचे वितरण केले असुन 7,90,000 रोपे शिल्लक

असल्याचे निर्देशनास आले आहे. त्यामुळे वाटपाअभावी 790000 रोपे शिल्लक असल्याने महानगरपालिकेने 7 लक्ष रोपांच्या निर्मितीकरीता केलेला खर्च व माहे सप्टेंबर, 2012 ते मार्च, 2013 या कालावधीकरीता संगोपनावरील झालेला खर्च रुपये 79,80,000/- गुंतून राहीला आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	**कामाचा तपशिल**	**दर प्रती लक्ष**	**7 लक्ष रोपांकरीता**
1	रोपवाटीकेच्या जागेमध्ये चरखोदाई, संरक्षण कुंपण व जमिन सपाटीकरण.	3,50,000	24,50,000
2	7 लक्ष रोपांची निर्मिती करुन 90 दिवस संगोपन करणे.	5,80,000	40,60,000
3	तयार होणा-या रोपांचे स्वत:कडील साहित्याचा वापर करुन संगोपन करणे. (माहे सप्टेंबर, 2012 ते मार्च, 2013 एकूण 7 महिने)	30,000 (प्रती महा)	14,70,000 (सात महिन्यांकरीता)
	एकूण		**79,80,000**

उपरोक्तबाबत उदयान विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 45, दिनांक 16.7.2014 निर्गमित करण्यात आले असुन विभागाकडून अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

(वसुलपात्र रक्कम रुपये 5,400/-)

(आक्षेपाधीन रक्कम रुपये 79,80,000/-)

DMASGDM7201 (Ref No : 66, Hmm No : 45)

32 उदयान विभागाच्या वृक्ष गणनेच्या कामातील अनियमितता.

झाडे तपासणी

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :उदयान मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 167000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 167000.00/-

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील वृक्ष गणनेचे काम मे.टेराकॉन इकोटेक प्रा.लि. यांना देण्यात आले असुन कामाबाबत केलेला करारनामा रुपये 23,000/- इतक्या कमी मुद्रांकावर करण्यात आले असुन करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार विहित कालावधीत ठेकेदाराने काम पूर्ण न केल्यामुळे त्यांचेकडून रुपये 1,44,000/- वसुल करण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र नागरी क्षेत्र (झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम) 1975, कलम 7 (ख) अन्वये प्रत्येक 5 वर्षातुन एकदा झाडांची गणना करण्याबाबत नमुद आहे. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेने शहरातील झाडांची गणना करण्याबाबत निविदा प्रसिध्द केली असुन सदरचे काम टेराकॉन इकोटेक प्रा.लि. यांना मंजुर करण्यात आलेले आहे. वृक्ष गणनेच्या कामाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

1	अर्थसंकल्पीय तरतुद.	रुपये 55 लक्ष
2	वृक्ष प्राधिकरण विषय क्रमांक	2 / 25.5.2011
3	मा.सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक व दिनांक	5 / 1.2.2012
4	मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक व दिनांक	759 / 3.1.2013
5	जाहिरात दिनांक	26.11.2012 ते 5.12.2012
6	वृत्तपत्र	दैनिक नरवीर चिमाजी, दैनिक हमारा महानगर
7	कार्यादेश क्रमांक व दिनांक	वविशम/302/वृक्ष प्राधिकरण, 5.1.2013
8	निविदाकाराचे नाव	टेराकॉन इकोटेक प्रा.लि.
9	करारनामा दिनांक	निरंक
10	कामाचा कालावधी	दिनांक 5.1.2013 ते 4.7.2013 (पावसाळा वगळता 6 महिने)
11	अनामत रक्कम	रुपये 6 लक्ष.

12	निविदेतील मंजूर दर... - प्रति वृक्ष - कांदळवन गणना प्रति चौ.कि.मी.	रुपये 22.50 रुपये 23,090/-

उपरोक्त कामाच्या निविदेची तपासणी केली असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) वृक्ष गणनेचे काम हे रुपये 50 लक्ष रक्कमेपेक्षा जास्त रकमेचे असुन सदर कामाची जाहिरात दैनिक नरवीर चिमाजी व दैनिक हमारा महानगर या स्थानिक वृतपत्रात देण्यात आली असुन प्राप्त निविदाकारांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	**निविदाकाराचे नांव**	**कामाचा प्रकार**	**परिमाण**	**प्राप्त दर रुपये**
1	टेराकॉन इन्फोटेक प्रा.लि., मुंबई.	1) वृक्ष गणना करणे व जीपीएस / जीआयएस प्रणाली विकसित करुन महापालिकेत 5 वर्षापर्यंत देखभाल करणे.	प्रती वृक्ष	22.50
		2) कांदळवनाची गणना करणे. 3) सॅटेलाईटमार्फत प्रतिमा. 4) इंटरप्रिटीशन.	प्रती चौरस किमी	28,090/-
2	ग्रीन ॲण्ड क्लीन.	1) वृक्ष गणना करणे व जीपीएस / जीआयएस प्रणाली विकसित करुन महापालिकेत 5 वर्षापर्यंत देखभाल करणे.	प्रती वृक्ष	25.50
		2) कांदळवनाची गणना करणे. 3) सॅटेलाईटमार्फत प्रतिमा. 4) इंटरप्रिटीशन.	प्रती चौरस किमी	31,460/-
3	ग्रीन स्पेअर ॲग्रो इंडिया प्रा.लि.	1) वृक्ष गणना करणे व जीपीएस / जीआयएस प्रणाली विकसित करुन महापालिकेत 5 वर्षापर्यंत देखभाल करणे.	प्रती वृक्ष	29.00
		2) कांदळवनाची गणना करणे. 3) सॅटेलाईटमार्फत प्रतिमा. 4) इंटरप्रिटीशन.	प्रती चौरस किमी	30,350/-

महाराष्ट्र शासन, उदयोग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक : भाखंस 1088 (2512)/उदयोग-6, दिनांक 02.01.1992 मधील परिच्छेद क्रमांक-108 नुसार निविदा प्रसिध्द करताना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. त्यानुसार जाहिरात राज्यस्तरीय वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

2) वृक्ष गणना कामाचा करारनामा हा रुपये 500/- इतक्या रकमेच्या मुद्रांक शुल्कावर करण्यात आलेला आहे. दिनांक 10.9.2014 ची कार्यालयीन टिपणी तसेच टेराकॉन इकोटेक प्रा.लि. यांचे दिनांक 30.7.2014 च्या देयकानुसार टेराकॉन इकोटेक प्रा.लि यांनी दिनांक 18.4.2014 पर्यंत एकूण 10,49,052

वसई विरार मनपा

इतक्या वृक्षांची व 30.50 चौ.कि.मी. कांदळवनाची गणना करण्यात आलेली आहे. त्यानुसार कामाची देय रक्कम खालील प्रमाणे आहे.

1. वृक्ष गणना : 10,49,052 X 22.50 = 2,36,03,670
2. कांदळवन गणना : 30.50 X 23,090 = 7,04,245

एकूण 2,43,07,915

मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या मक्त्याच्या रकमेवर संबंधीत ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दिनांक 1.5.2006 पासुन पुढील प्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

1. कामाची रक्कम रुपये 10 लाखापर्यंत. : मुद्रांक शुल्क रुपये 100/-
ब) त्यानंतर प्रत्येक लाखाकरीता.. : मुद्रांक शुल्क रुपये 100/-

टेराकॉन इकोटेक प्रा.लि. या संस्थेबरोबर करावयाचा करार हा कामाची देय रक्कम रुपये 2,43,07,915 या रकमेनुसार रुपये 23,500 इतक्या रकमेच्या मुद्रांक शुल्कावर करणे आवश्यक होते. तथापि रुपये 500 रकमेच्या मुद्रांक शुल्कावर करारनामा केला असत्याने रुपये 23,000/- संबंधीत संस्थेकडुन वसुलपात्र आहेत.

3) महानगरपालिका व टेराकॉन इकोटेक प्रा.लि. यांचेमध्ये वृक्ष गणना कामाबाबत झालेल्या करारनाम्यातील अट क्रमांक: 12 अन्वये वृक्ष गणनेचे काम विहीत मुदतीत पूर्ण न झाल्यास प्रत्येक दिवसास रुपये 500/- दंड आकारण्याची तरतुद नमुद आहे. टेराकॉन इकोटेक प्रा.लि. यांनी दिनांक 18.4.2014 पर्यंत एकूण 10,49,052 इतक्या वृक्षांची गणना केलेली आहे. म्हणजेच संबंधीत संस्थेने विहित कालावधीत काम पूर्ण केले नसुन 288 दिवस विलंब केलेला आहे. परंतु करारनाम्यातील अट क्रमांक: 12 अन्वये रुपये 500/- प्रति दिन प्रमाणे रुपये 1,44,000/- दंड वसुल केलेला नाही.

उपरोक्तबाबत उदयान विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक: 176, दिनांक 07.11.2014 अन्वये निर्गमित करण्यात आले असुन विभागाकडून अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

(एकूण वसुलपात्र रक्कम रुपये 1,67,000/-)

DMASGDM7201 (Ref No : 109, Hmm No : 176)

33 विकास निधी अंतर्गत सुर्या योजना व इतर भांडवली कामातील अनियमीतता

विकास निधी अंतर्गत सुर्या योजना व इतर भांडवली कामे

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : पा.पु. व मल: निसारण मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1377600.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1347064.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 30536.00/-

कामाची मुदत संपल्यावर करारानुसार विलंब दंडाची आकारणी केली नाही. जादा खर्चासाठी महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 167 (2) नुसार सुधारित अंदाजपत्रक तयार केले नाही. जादा खर्चाची रक्कम रु.13736/- वसुल केली नाही. प्राकलनात नसलेल्या बाबींवर खर्च केला आहे.

कामाचे नांव :- वसई विरार उप प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (सुर्या उदभव) सुर्या पाणी पुरवठा योजनेतील मासवण येथील उदंचन विहिरीतील अशुध्द पाण्याचे jyoti Make V-T-pump set 5503/1 stg 300 HP **चे दोन पंप ओव्हर ऑईलिंग करणे व आवश्यक दुरुस्ती करुन पंपाचा डिस्चार्ज वाढवणे**.

प्राकलन :- रु.2577200/-

प्रशासकीय मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र. 21 **दि**.17/10/2011

तांत्रिक मंजुरी :- का.अ. 8/85 **दि**.07/02/2012

निविदा तारीख :- 29.02.2012 **वसई समता**, **नवशक्ती**

एल-1 निविदा :- मे. ए.आर.एन्टरप्रायजेस 1**टक्का कमी दराने**

निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र 24 **दि**.19/03/2012

करार:- दि. 02/04/2012 **मुद्रांक रु**. 1700

कार्यादेश :- श.अ./पा.पु./1/1/12-13 **दि**.02/04/2012 **मुदत** 2 **महिने**

खर्च:- प्रमाणक क्र. 613, **दि**. 18/12/2012 **रु**. 13,77,600/-(**दुसरे धावते**) **एम.बी**. 136 **प** 6 **ते** 13 (**एकूण खर्च रु**.4290800/-)

काम पूर्ण :- दि. 16/11/2012

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.129, दि. 24/09/2014 निर्गमीत केले. शहर अभियंता यांचे पत्र क्र.निरंक, दि.01/10/2014 अन्वये खुलासा सादर केला. त्यानुसार विभागाने चुकीची नस्ती लेखापरीक्षणास सादर केली आहे. परंतु खुलाशात नमुद केल्यानुसार मुळ नस्ती दाखविली नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) कामाची मुदत 2 महिने होती. करारातील अट क्र 5 नुसार विलंबासाठी प्रती दिन रु.100 दंडाची तरतूद करण्यांत आली आहे. त्याप्रमाणे विलंब दंडाची रक्कम दि. 01/06/2012 ते 16/11/2012 पर्यंत 168 x 100= 16800 संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 167 (2) नुसार जेव्हा मुळ अंदाजामध्ये 10 टक्केपेक्षा अधिक वाढ होण्याचा संभव असेल, अथवा संकल्प चित्रात वा योजनेत फेरफार प्रस्तावित केला असेल, तर सुधारित अंदाज तयार केले पाहिजे व त्यास मंजूरी घेतली पाहीजे. या कामाचे प्राकलन रु.2577200/- असताना खर्च रु.4290800/- झाला आहे म्हणजे 10 टक्के मर्यादेपेक्षा जास्त झाला आहे. परंतू सुधारित

वसई विरार मनपा

प्राकलन तयार केले नाही.

देयकाची रक्कम	रु.4290800
पहिले धावते	रु. 2917200
	रु 1373600

निविदा 1 टक्का कमी दराने मंजूर झाली आहे त्यामुळे प्रदानाच्या रकमेतून 1 टक्का रक्कम रु.13736 वसूली करणे अपेक्षित असताना तशी कार्यवाही केली नाही सबब रक्कम रु 13736 वसूल करणे आवश्यक आहे.

3) कामाचे मोजमाप पुस्तक व देयकांची तपासणी करता बाब क्र (आयटम) 23 प्रोव्हायडिंग ॲन्ड फिक्सिंग एक्सायटिंग फॅन म्हणून 5 नगांची रक्कम रु 85000 दराने एकूण खर्च रु.425000 दाखवला आहे. प्राकलनात नसलेली मोठी बाब कामात, मोजमाप पुस्तकात दाखवून त्याचे प्रदान केले आहे. तसेच कामाच्या प्राकलनात दाखवलेले दर हे डि.एस आर चे नसून बाजारातले दर आहेत. असे असताना नविन बाबीवर झालेला खर्चाचे दर कसे ठरविले याचा खुलासा केला नाही. नवीन बाबीवर खर्च रु.425000 केला आहे.

उपरोक्त उणिवांची पूर्तता करेपर्यंत लेखा परिक्षणात रक्कम रु. 30536 वसुल पात्र ठेवण्यात येत आहे आणि रक्कम रु. 1347064 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम - आक्षेपाधीन रक्कम रु.1347064/-

विलंब दंडाची वसुली रु. 16800

1% कमी दराने ठेका

दिल्याने वसुली करावयाची रु. 13736

एकुण रु. 30536

DATPMVM6001 (Ref No : 72, Hmm No : 129)

34 वसई विरार शहर मनपा मुख्यालयामध्ये पाणीपट्टी कराची वसूली करताना झालेल्या अनियमितता

पाणीपुरवठा

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : पाणीपुरवठा व मलनिस्स मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

वसई विरार मनपा

वसूलपात्र रक्कम रु. 41224000.00/-

पाणीपट्टी कराव्दारे मिळालेले उत्पन्नापेक्षा पाणीपुरवठा योजनेवर झालेला खर्च जास्त असल्याने निर्माण झालेली तूट भरुन काढलेली नाही, प्रत्येक प्रभागामध्ये पाणीपट्टी कराची भिन्न दरांने वसूली केली आहे, ग्रामपंचायत रहिवाश्यांकडून अत्यंत कमी दराने पाणीपट्टी कराची वसूली केली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेतील पाणीपटटी कर विभागाचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमीतता आढळून आल्या.

वसई विरार शहर महानगरपालिकेची 2012-13 वित्तीय वर्षामधील पाणीपटटी कराची मागणी रु.3862.99 लक्ष इतकी असतांना पाणीपटटी कराची रु.3450.75 लक्ष इतकी वसुली झाली आहे. नळजोडणी आकार, सार्वजनिक पाणीआकार याव्दारे रु.138.75 लक्ष इतके उत्पन्न मिळालेले असुन 2012-13 चे पाणीपटटी कराचे एकत्रीत उत्पन्न रु.3589.54 लक्ष इतके आहे. तसेच पाणी पुरवठयापोटी महाराष्ट्र जीवन प्राधीकरणास प्रदान केलेली देयके, आस्थापना विभागातील कर्मचा-यांचे वेतन, निवृत्तीवेतन, अंशदान व अन्य फायदे, पाणीपुरवठा राखीव निधी, घसारा निधी, देखभाल दुरुस्ती, विदयुत देयके, जलशुध्दीकरण इ. बाबींवर 2012-13 मध्ये झालेला खर्च
रु.5174.14 लक्ष आहे. वित्तीय वर्ष 2012-13 ची पाणीपटटी कराची मागणी, वसुली व थकबाकी पाहता दिनांक 31/03/2013 अखेर थकबाकी रु.412.24 लक्ष इतकी आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.183, दि.26/11/2014 अन्वये खुलासा विचारला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केला नाही. याबाबत लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. वित्तीय वर्ष 2012-13 अखेर पाणीपटटी कराची थकबाकी रु.412.24 लक्ष इतकी आहे. सदर थकबाकी वसुलीकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 मधील प्रकरण 10 पाणीपुरवठा मधील अ. क्र. 12 नुसार नळजोडणी तोडून टाकण्याची किंवा पाणी पुरवठा बंद करण्याची कार्यवाही करण्यांत आली नाही. उपरोक्त थकीत रक्कम रु.412.24 लक्ष वसुल करण्यांत यावी. तसेच पाणीपुरवठयावरील खर्च उत्पन्नापेक्षा जास्त असल्याने एकुण तुट रु.1548.60 लक्ष इतकी आहे.
2. प्रत्येक प्रभागवार पाणीपटटी कराचे दर भीन्न भीन्न आकारण्यांत आले असुन सदर दर भुतपुर्व नगरपरिषद काळातील आहेत. वसई विरार शहर महानगरपालिका दिनांक 03/07/2009 पासुन अस्तीत्वात आली आहे. परंतु अदयापपर्यंत महानगरपालिका क्षेत्रात पाणीपटटी कराचे दरांत भीन्नता आहे.
3. वसई विरार शहर महानगरपालिका दिनांक 03/07/2009 पासुन अस्तीत्वात आली, त्यावेळी 4 नगरपरिषदा व 53 ग्रामपंचायती समाविष्ठ करण्यांत आल्या. ग्रामपंचायत क्षेत्रात राहणा-या रहीवाशांकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका (पाणी पुरवठा व विशेष पाणीपटटी) उपविधी, 2011 च्या सुधारीत दराने पाणीपटटी कराची वसुली केली नाही तर त्यांना सार्वजनिक नळाने पाण्याचे वितरण केले असल्याने फार कमी दराने पाणीपटटीची आकारणी केली आहे. (रु.5/-प्रमाणे) सदर दर निश्चीत केल्याबाबत कोणताही ठराव लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

DMEMRMM6801 (Ref No : 104, Hmm No : 183)

35 वसई-विरार मनपा अग्निशमन विभागामध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.

अग्निशमन फी

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : अग्निशमन विभाग मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 13000.00/-

अग्निशमन केंद्र विरार, नवघर व नालासोपारा या विभागाच्या जमा पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास अप्राप्त असून मे. डी. आर.कोटीस यांच्याकडून रु.13000/- ची कमी वसुली झाली आहे.

अग्निशमन विभागांतर्गत अग्निशमन केंद्र विरार, नवघर व नालासोपारा या केंद्राच्या अग्निशमन फी बाबतचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

1. अग्निशमन केंद्र विरार या विभागाची जमा पोटकिर्द तपासली असता दि.28.08.2012 पासूनच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. या आधीच्या नोंदी व पावती पुस्तक उपलब्ध करुन देण्यात न आल्यामुळे 27.08.2012 च्या जमा नोंदीचे लेखापरीक्षण करता आले नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक क्र. 44, दि. 16/07/2014 नुसार मागणी करण्यात आली होती.

2. मे.डि.आर.कोटीस प्रा.लि.,बोईसर या ठिकाणास लागलेली आग विझविण्यासाठी वसुल करण्यात आलेल्या शुल्कापोटी रु.13000 इतकी कमी वसुली केल्याचे निदर्शनास येते. याबाबतची माहिती खालील प्रमाणे

घटना स्थळ - डि.आर.प्रा.लि.,बोईसर.

आगीचा दिनांक - दि.27.10.2012.

गाडी क्रमांक - 1) MH48 J617 2) MH48 J1170

गाडी स्थानकातून निघण्याची वेळ 13.45.

गाडी स्थानकातून पोहचण्याची वेळ 23.35.

एकूण कालावधी 9 तास 50 मि.

सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 6 दि.15.02.2011 नुसार शुल्काची गणना पाहिल्या 3 तासासाठी रु.4000 तर पुढील प्रत्येक तासासाठी रु.1000 अशी आहे त्यानुसार एकूण पहिल्या 3 तासासाठी रु.4000 तर पुढील 6 तास 50 मि.साठी रुपये 7000 असे एकूण एक गाडीसाठी रुपये 11000 तर दोन गाडयांचे रुपये 22000 वसूल होणे आवश्यक होते. परंतू पावती पुस्तक क्रमांक 175, पावती क्रमांक 17404,दि.29.10.2012 नुसार रक्कम रुपये 9000 वसुल करण्यात आलेली आहे. उर्वरीत रक्कम रुपये 22000-9000=रु.13000 वसुल होणे आवश्यक आहे.

3. अग्निशमन केंद्र विरार, नवघर व नालासोपारा या विभागातील जमा पावतीपुस्तकाची साठा नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 44, दि.16.07.2014 कळविण्यात आले होते.

वरील अभिप्रायांसंदर्भात क्र. 44, दि. 16/07/2014 नुसार विभागास कळविण्यात आलेले होते. परंतु विभागाकडून खुलासा अप्राप्त आहे.

DVESMBM7301 (Ref No : 46, Hmm No : 44)

36 प्रभाग समिती कार्यालयामध्ये विविध तांत्रीक व कार्यालयीन कामे करण्यासाठी प्रभाग निहाय मनुष्यबळ पुरविणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 2446731.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 130500.00/-

निविदा प्रक्रियेमध्ये प्रभाग निहाय मनुष्यबळ पुरविणे या कामाची निविदा जाहिरात देतांना किती मनुष्यबळाची आवश्यकता अंदाजीत रक्कम, तरतूद व खर्चास मंजूरी संचिकेत आढळून आली नाही. निविदाधारकांसाठी आवश्यक अटी व शर्तीत अंतर्भाव न करता निविदा मागविण्यात आल्या असल्याचे दिसून येते. आवश्यकतेपेक्षा कमी निविदा शुल्क कमी वसुल केल्यामुळे रु.130500/- इतकी रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

वसई विरार महानगरपालिका आस्थापना विभागाकडून महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयामध्ये विविध तांत्रिक व कार्यालयीन कामे करण्यासाठी प्रभाग निहाय मनुष्यबळ पुरविणेसाठी खालील प्रमाणे निविदा मागविण्यात आली होती.

कामाचे नाव- प्रभाग समिती कार्यालयामध्ये विविध तांत्रीक व कार्यालयीन कामे करण्यासाठी प्रभाग निहाय मनुष्यबळ पुरविणे.

वृत्तपत्र- दि.29.03.2012 चे दै.सकाळ व दै.महाराष्ट्र बुलंद टाईम्स

(वृत्तपत्रांची कात्रणे लेखापरीक्षणास आढळून आले नाही)

निविदा शुल्क- रुपये 500

निविदा कालावधी- दि.29.03.2012 ते दि.16.04.2012

निविदा सुचना-वविशम/आस्था/897/2012-13,दि.29.03.2012

अंदाजपत्रकीय रक्कम - आढळून आली नाही.

खर्चास प्रशासकीय मान्यता- आढळून आली नाही.

निविदा अंतीमीकरणास मान्यता- ठराव क्रमांक 289, दि.06.06.2012.

उपलब्ध निविदा नस्ती व देयकांचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1)निविदा प्रक्रियेमध्ये प्रभाग निहाय मनुष्यबळ पुरविणे या कामाची निविदा जाहिरात देतांना किती मनुष्यबळाची आवश्यकता आहे याबाबत उल्लेख नाही. त्यामुळे अंदाजीत रक्कम, त्या रकमेची आवश्यकता व मंजुरी प्राप्त संचिकेत आढळून आले नाही.त्यामुळे नेमका खर्च किती होणार आहे

याबाबतची तरतूद व खर्चास मंजूरी घेण्यात आलेली प्राप्त संचिकेत आढळून आली नाही.

2)अंदाजपत्रकीय रक्कम,आवश्यक मनुष्यबळ पुरवठा व त्यावर होणारा खर्च संचिकेत नमूद नसल्यामुळे या कामाचे ठरविण्यात आलेले निविदा शुल्क,जाहिरातीसाठी वृत्तपत्राची निवड, इसारा शुल्काची निवड कशी करण्यात आली याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही.

3) निविदा जाहिरातीत मनुष्यबळ पुरविण्याबाबत नमूद आहे. कुशल अकुशल अशी वर्गवारी नसतांना कंत्राटदाराकडून कुशल अकुशल असे वेगवेगळे देण्यात आलेल्या दरास महानगरपालिकेकडून मंजूरी देण्यात येवून संबंधीतांना कार्यादेश देण्यात आलेले आहे.

4)पात्र निविदाधारकासाठी आवश्यक अटी व शर्तीचा उदा.व्हॅट क्लिअरन्स प्रमाणपत्र,लेबर कॉन्ट्रॅक्ट रजिस्टेशन मजूरांच्या संख्येसह, निविदाकाराची आर्थीक स्थिती वगैरे अटींचा निविदेत अतंर्भाव नमूद न करता निविदा मागविल्या निविदाकारांना पात्र ठरविले आहेत. निविदा प्रक्रिया सदोष झाली आहे.

5) प्रभाग निहाय कार्यादेश देण्यात आलेल्या पुरवठादारांकडून नियुक्त्ा करण्यात आलेल्या कर्मचा-यांची माहिती, त्यांचे नेमणूक आदेश, त्यांची निवड पदास अनुषंगिक शैक्षणिक पात्रता इत्यादीची माहिती प्राप्त संचिकेत आढळून आली नाही. तसेच मनुष्यबळाची आवश्यकता,त्यांचे हजेरी स्वाक्षरीत अहवाल नस्तीत वा प्रदान देयकासोबत आढळून आले नाहीत.

6) करारनाम्यातील अटीनुसार कामगारांचा पी.एफ.व ई.अेस.आय.सी.च्या रकमा संबंधीत खात्याकडे भरुन त्याच्या चलनाच्या प्रति महानगरपालिकेकडे सादर केल्यानंतरच त्या रकमेची बीले अदा करण्यात येतील. पुरवठादाराने ही अट पाळल्यानंतर त्यांना देयके अदा करण्यात आल्याच्या पृष्ठयार्थ आवश्यक दस्ताऐवज नस्तीत / देयकासोबत आढळून आले नाही.

7) प्रभाग समिती अ च्या निविदा प्रक्रियेबाबत-

प्रभाग समिती अ साठी मनुष्यबळ पुरविणेसाठी 1.मे.आकाश एंटरप्रायजेस 2.मे.आरती सुनिल वाडकर 3.मे.दिव्या एंटरप्रायजेस व 4.मे.ब्राईट इन्फासिस्टिम प्रा.लि. असे एकूण 4 निविदाकारांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या. किमान दर असलेले मे.दिव्या एंटरप्रायजेस यांना वविशम/आस्था/277/2012-13/31.07.12 नुसार व मे.औंकार एंटरप्रायजेस,विरार यांना वविशम/आस्था/2012-13/31.07.12 मनुष्यबळ पुरविण्याचे कार्यादेश देण्यांत आलेले होते. या कार्यादेशानुसार मुनष्यबळ पुरविणे कामी रक्कमेची गणना करता (रु. 11302800+ 8232810 = 19535610) एकूण रु.19535610/- साठी रु. 5000/- निविदा शुल्क आवश्यक होते. परंतु रु.500 निविदा शुल्क वसुल केल्यामुळे एकूण रु. 4500x4(निविदाकारांची संख्या)=18000/- इतके कमी निविदा शुल्क आकारण्यात आहे. सदर निविदा शुल्क सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्रमांक सीएटी-09/05/प्र.क्रमांक381/इमारत-2,दि.15.05.2007 नुसार वसुल करणे आवश्यक आहे.

याबाबतची उदाहरणादाखल देयके खालीलप्रमाणे

प्रमाणक क्र.व दि.	रक्कम रु.	कालावधी

वसई विरार मनपा

4228/16.03.13	79380	नोव्हें-12
4229/16.03.13	123450	नोव्हें-12
4230/16.03.13	100800	नोव्हें-12
4246/16.03.13	100800	ऑगस्ट-12
एकूण	404430	

8) प्रभाग समिती ब च्या निविदा प्रक्रियेबाबत-

प्रभाग समिती ब साठी मनुष्यबळ पुरविणेसाठी 1.मे.सिलेक्ट इंटरप्रायजेस 2.मे.स्वागत लेबर कॉन्ट्रक्टर 3.मे.आरती सुनिल वाडकर 4.मे.हिंद इलेक्ट्रिक अँड इंजि.कॉपे. 5.मे.युनिव्हर्सल एंटरप्रायजेस असे एकूण 5 निविदाकारांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या. यातील किमान दरधारक मे.युनिव्हर्सल एंटरप्रायजेस यांना वविशम/आस्था/332/ 2012-13/24.07.12 नुसार मनुष्यबळ पुरविण्यासाठी कार्यादेश देण्यात आलेले होते. या कार्यादेशानुसार मुनष्यबळ पुरविणे कामी रक्कमेची गणना रु. 5894320/- अशी आहे. रु. 5894320/-साठी रु.5000/- निविदा शुल्क आवश्यक होते. परंतु या निविदेसाठी रु. 500/- निविदा शुल्क वसुल केल्यामुळे एकूण रु. 4500x5(निविदाकारांची संख्या)=22500/- इतके कमी शुल्क आकारण्यात आलेले आहे. सदर निविदा शुल्क सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्रमांक सीएटी-09/05/प्र.क्रमांक381/इमारत-2,दि.15.05.2007 नुसार वसुल करणे आवश्यक आहे.

याबाबतची देयके लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

9) प्रभाग समिती क च्या निविदा प्रक्रियेबाबत-

प्रभाग समिती क साठी मनुष्यबळ पुरविणेसाठी 1.मे.युनिव्हर्सल एंटरप्रायजेस,विरार 2.मे.डॉ.विपीन उपाध्याय. 3.मे.डॉ.आरती सुनिल वाडकर 4.मे.स्वागत लेबर कॉन्ट्रक्टर 5.मे. हिंद इलेक्ट्रिक अँड इंजि.कॉपे. 6.मे.बी.पी.तांडेल 7.मे.सिध्दीविनायक एंटरप्राजेस, नालासोपारा असे एकूण 7 निविदाकारांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या. यातील किमान दर धारक i) मे.युनिव्हर्सल एंटरप्रायजेस यांना वविशम/आस्था/294/ 2012-13/07.07.12 व मे.डॉ.आरती सुनिल वाडकर यांना वविशम/आस्था/289/ 2012-13/09.07.12 नुसार मनुष्यबळ पुरविण्याचे कार्यादेश देण्यांत आले होते.या कार्यादेशातील मुनष्यबळ पुरविणे कामी रक्कमेची गणना करता (रु.12482720+448560=12931280) एकूण रु.12931280/- साठी रु. 5,000/- निविदा शुल्क आवश्यक होते. परंतु रु. 500/- निविदा शुल्क वसुल केल्यामुळे एकूण रु. 4500x7(निविदाकारांची संख्या)=31500/- इतके कमी शुल्क आकारण्यात आलेले आहे.याच निविदेतील दिवाबत्ती विभागाचे व्यवस्थापन करणेकामी तारतंत्री पुरविणे याबाबीसाठी मे.सिध्दी विनायक,एंटरप्रायजेस यांचे दर रुपये 8000 प्रती युनिट मासिक दर असून मे.युनिव्हर्सल एंटरप्रायजेस यांना रुपये 8190 प्रती युनिट मासिक दरास कार्यादेश देण्यात आलेले आहे म्हणजे मे. युनिव्हर्सल एंटरप्राजेस यांना कार्यालयीन आदेश क्रमांक वविशम/आस्था/294/ 2012-13/07.07.12नुसार

वसई विरार मनपा

10 तारतंत्री पुरविण्यासाठी 190 रुपये प्रती युनिट मासिक दर जादा देण्यात आल्याचे निदर्शनास येते.

10) प्रभाग समिती ड च्या निविदा प्रक्रियेबाबत-

प्रभाग समिती ड करीता मनुष्यबळ पुरविणेसाठी 1.मे.चिराग लेबर कॉन्ट्रॅक्टर 2.मे.जिवदानी फायर सर्व्हिसेस 3.मे.गजानन एंटरप्रायजेस 4.मे.क्लासिक एंटरप्रायजेस,वसई 5. मे.श्री.जी. एंटरप्रायजेस 6. मे.ओम साई एंटरप्रायजेस असे एकूण 6 निविदाकारांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

किमान दरधारक i) मे.क्लासिक एंटरप्रायजेस,वसई. यांना वविशम/आस्था/295,447/2012-13/09.07.12 नुसार मनुष्यबळ पुरविण्याचे कार्यादेश देण्यांत आले आहे.

ii) मे.गजानन प्रायजेस, अर्नाळा यांना वविशम/आस्था/284/ 2012-13/09.07.12 नुसार मनुष्यबळ पुरविण्याचे कार्यादेश देण्यांत आले आहे.

या कार्यादेशानुसार मुनष्यबळ पुरविणे कामी रक्कमेची गणना करता (रु.7756560 +1627920 =9384480) एकूण रु.9384480/- साठी रु. 5,000/- निविदा शुल्क आवश्यक होते. परंतु रु. 500/- निविदा शुल्क वसुल केल्यामुळे एकूण रु.4500x6(निविदाकारांची संख्या)=27000/- इतके कमी शुल्क आकारण्यात आलेले आहे. सदर निविदा शुल्क सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्रमांक सीएटी-09/05/प्र.क्रमांक381/इमारत-2, दि.15.05.2007 नुसार वसुल करणे आवश्यक आहे.

तसेच राष्ट्रीय कामाचे सर्वेक्षण करणे कामी मनुष्यबळ पुरविणे या कामासाठी दोन निविदाकारांनी दर भरलेले आहे. यासाठी पुरेशी स्पर्धा न होताच मे.गजानन यांना कार्यादेश देण्यात आलेले आहे.

प्रमाणक क्रमांक व दिनांक	रक्कम	कालावधी
4031/04.03.2013	106163	जुलै व डिसेंबर-2012
4032/04.03.2013	913018	जाने-2013
4083/07.03.2013	95760	जाने-2013
4082/07.03.2013	529200	जाने-2013
एकूण	1644141	

वरील देयकामध्ये भविष्य निर्वाह निधी रुपये (मुळ वेतनावर 13.61%) कामगार राज्य विमा रुपये (मुळ वेतन व घरभाडे भत्ता यावर 4.75%) कंत्राटदारास प्रदान करण्यात आले आहे. वस्तुत: याबाबतचे दायित्व महानगरपालिकेचे नसतांना सदर रक्कम प्रदान करण्यात आल्यामुळे या अतिप्रदान रकमेची वसुली होणे आवश्यक आहे.

11) प्रभाग समिती इ च्या निविदा प्रक्रियेबाबत-

प्रभाग समिती क साठी मनुष्यबळ पुरविणेसाठी 1.मे.वरद इंजिनिअरींग 2.मे.कल्पतरु एंटरप्रायजेस 3.मे.समिक्षा कन्स्ट्रक्शन 4.मे.युवराज लेबर कॉन्ट्रक्टर 5.मे. चिराग लेबर कॅन्टक्टर 6.मे.सौ.आरती

वसई विरार मनपा

सुनिल वाडकर 7.मे.श्री.अप्पासाहेब सालपूरे असे एकूण 7 निविदाकारांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या. किमान दर धारक मे.वरद इंजिनिअरींग यांना वविशम/आस्था/286/2012-13/09.07.12 अन्वये व मे.चिराग लेबर कॉन्ट्रक्टर यांना वविशम/आस्था/363/2012-13/01.08.12 नुसार मनुष्यबळ पुरविण्याचे कार्यादेश देण्यांत आले होते. या कार्यादेशातील मुनष्यबळ पुरविणे कामी रक्कमेची गणना करता (रु.5927040+6582400=12509440) एकूण रु.12509440/- साठी रु. 5,000/- निविदा शुल्क आवश्यक होते. परंतु रु. 500/- निविदा शुल्क वसुल केल्यामुळे एकूण रु. 4500x7(निविदाकारांची संख्या)=31500/- इतके कमी शुल्क आकारण्यात आलेले आहे. तसेच हलके वाहन चालविणे कामी वाहन चालक पुरविणे या कामासाठी दोन निविदाकारांनी दर भरलेले आहे. यासाठी पुरेशी स्पर्धा न होताच मे.वरद इंजिनिअरींग यांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

याबाबतची उदाहरणादाखल देयके खालीलप्रमाणे

प्रमाणक क्र.व दि.	रक्कम रु.	कालावधी
7171/13.03.2013	216720	ऑगस्ट-12
7174/13.03.2013	73080	नोव्हें-12
4326/29.03.2013	47250	डिसे-12
4332/26.03.2013	61110	डिसें-12
एकूण	398160	

एकूण आक्षेपाधीन रक्कम

प्रभाग अ	रु.404430
प्रभाग ड	रु.1644141
प्रभाग ई	रु.398160
एकूण आक्षेपाधीन रक्कम	रु.2446731

एकूण वसुलपात्र रक्कम

प्रभाग अ	रु.18000
प्रभाग ब	रु.22500
प्रभाग क	रु.31500
प्रभाग ड	रु.27000
प्रभाग ई	रु.31500
एकूण वसुल पात्र रक्कम	रु.130500

उपरोक्त अभिप्रायाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 115, दि. 12.09.2014 नुसार कळविण्यात

आले होते. परंतु विभागाकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झाले नाही.

DVESMBM7301 (Ref No : 73, Hmm No : 115)

37 प्रभाग समिती कार्यालयामध्ये मजूर पुरवठा करणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 20160.00/-

निविदा प्रक्रियेमध्ये प्रभाग निहाय मजुरांची आवश्यकता, अंदाजीत रक्कम, व त्याअनुषंगाने होणारा खर्च व त्याची तरतूद व त्या खर्चास घेण्यात आलेली मंजूरी प्राप्त संचिकेत आढळून आली नाही.निविदेमध्ये निविदाधारकासाठी आवश्यक अटी व शर्ती निविदेत अतंर्भाव नसल्यामुळे संपूर्ण निविदा प्रक्रियेत पात्र निविदाकार असल्याची खातरजमा करता आली नाही. तसेच कार्यादेश देण्यात आलेल्या पुरवठादारांकडून नियुक्त्‌करण्यात आलेल्या कर्मचा- यांची माहिती, त्यांचे नेमणूक आदेश, त्यांची निवड पदास अनुषंगिक शैक्षणिक अर्हता व प्रदान केलेल्या रकमाच्या अनुषंगाने स्वाक्षरीत हजेरी अहवाल नस्तीत वा प्रदान देयकासह आढळून आले नाहीत.

वसई विरार महानगरपालिका आस्थापना विभागाकडून महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयामध्ये मजूर पुरवठा करण्यासाठी प्रभाग निहाय निविदा मागविण्यात आली होती.

कामाचे नाव - प्रभाग समिती कार्यालयामध्ये मजुर पुरवठा करणे.

वृत्तपत्र - दि.29.03.2012 चे दै.सकाळ व दै.महाराष्ट्र बुलंद टाईम्स (वृत्तपत्रांची कात्रणे लेखापरीक्षण आढळून आले नाही)

निविदा शुल्क - रुपये 5000

निविदा कालावधी - दि.29.03.2012 ते दि.16.04.2012

निविदा सुचना - वविशम/आस्था/897/2012-13,दि.29.03.2012

अंदाजपत्रकीय रक्कम – आढळून आली नाही.

वसई विरार मनपा

खर्चास प्रशासकीय मान्यता- आढळून आली नाही.

निविदा अंतीमीकरणास मान्यता- ठराव क्रमांक 289, दि.06.06.2012.

प्रदान रक्कम	- प्रमाणक क्रमांक व दिनांक	रक्कम	कालावधी
	4055/04.03.2012	20160	डिसेंबर-2012.

उपलब्ध निविदा नस्ती व देयकांचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) प्रभाग निहाय मजुर पुरविणे या कामाची निविदा जाहिरात देतांना किती मजुरांची आवश्यकता आहे याबाबत उल्लेख नाही. त्यामुळे अंदाजीत रक्कम, त्या रकमेची आवश्यकता व मंजुरी प्राप्त संचिकेत आढळून आले नाही.त्यामुळे नेमका खर्च किती होणार आहे याबाबतची तरतूद व खर्चास मंजूरी घेण्यात आलेली प्राप्त संचिकेत आढळून आली नाही.

2) अंदाजपत्रकीय रक्कम, आवश्यक मजुर पुरवठा व त्यावर होणारा खर्च संचिकेत नमूद नसल्यामुळे या कामाचे ठरविण्यात आलेले निविदा शुल्क,जाहिरातीसाठी वृत्तपत्राची निवड, इसारा शुल्काची निवड कशी करण्यात आली याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही.

3) पात्र निविदाधारकासाठी आवश्यक अटी व शर्तीचा उदा.व्हॅट क्लिअरन्स प्रमाणपत्र,लेबर कॉन्ट्रॅक्ट रजिस्टेशन मजूरांच्या संख्येसह, निविदाकाराची आर्थीक स्थिती वगैरे अटींचा निविदेत अतंर्भाव नमूद न करता निविदा मागविल्या असून निविदाकारांना पात्र ठरविले आहेत. निविदा प्रक्रिया सदोष झाली आहे.

4) प्रभाग निहाय कार्यादेश देण्यात आलेल्या पुरवठादारांकडून नियुक्त्ाि करण्यात आलेल्या कर्मचा-यांची माहिती, त्यांचे नेमणूक आदेश, त्यांची निवड पदास अनुषंगिक शैक्षणिक पात्रता इत्यादीची माहिती प्राप्त संचिकेत आढळून आली नाही. तसेच मजुरांची आवश्यकता,त्यांचे हजरी स्वाक्षरीत अहवाल नस्तीत वा प्रदान देयकासोबत आढळून आले नाहीत.

वरील मुदयांच्या प्रकाशात लेखापरीक्षण प्रदानाची रक्कम रु.20160 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त अभिप्रायाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 116,दि.12.09.2014 नुसार कळविण्यात आले होते. पंरतु विभागाकडून अनुपालन अप्राप्त आहे.

DVESMBM7301 (Ref No : 74, Hmm No : 116)

38 विविध प्रभागामधील विकास कामांसाठी अभियांत्रिक सेवा पुरविणे कामी अभिकर्ता नेमणे कामातील अनियमितांबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 429000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 8100.00/-

अभियंत्यांची आवश्यक संख्या, अंदाजीत खर्चाची रक्कम, त्याची तरतूद व त्या खर्चाची मंजूरी प्राप्त संचिकेत आढळून आली नाही. निविदेमध्ये निविदाधारकासाठी आवश्यक अटी व शर्ती विहीत करुन निविदेत अतंर्भाव केला नाही. तसेच कार्यादेश देण्यात आलेल्या पुरवठादारांकडून नियुक्त् करण्यात आलेल्या कर्मचा- यांची माहिती, त्यांचे नेमणूक आदेश, त्यांची निवड पदास अनुषंगिक शैक्षणिक अर्हता व प्रदान केलेल्या रकमाच्या अनुषंगाने स्वाक्षरीत हजेरी अहवाल नस्तीत वा प्रदान देयकासह आढळून आले नाहीत. देयकांमधून आवश्यक टीडीएस कपात न केल्यामुळे रु.8100 या रकमेची वसुली होणे आवश्यक आहे.

वसई विरार महानगरपालिका आस्थापना विभागाकडून महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयामध्ये विविध कामांसाठी अभियंते पुरविणे संदर्भात निविदा मागविण्यात आली होती. उपलब्ध निविदा नस्ती व देयकांचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

निविदा फार्म फी	- रु. 5000/-
अंदाजपत्रकीय /निविदा रक्कम	- आढळून आली नाही.
प्रशासकीय मंजूरी	- आढळून आली नाही.
इसारा रक्कम	- रु. 50,000/-
वृत्तपत्रे	- दि. 11/01/2012, दै.पुण्यनगरी दि. 11/01/2012, दै. नरवीर चिमाजी व सकाळ (प्रत आढळून आली नाही)
निविदा कालावधी	- 19/01/2012 ते 23/01/2012
निविदा सुचना	- वविशम/आस्था/719/11-12, दि. 09/01/2012
निविदा अंतीमीकरणास मान्यता	- स्थायी समिती ठराव 49, दि. 02/04/12
निविदाकार	- 1) मे. दिव्या एंटरप्रायझेस 2) मे. आकाश एंटरप्रायझेय

3) मे. बाईट इन्फ्रासिस्टिम प्रा.लि.

L1 - 1) मे. दिव्या एंटरप्रायझेस

B.E. Civil - नविन 17,000/-

- 5 वर्ष अनु. 22,000/-

Diploma - नविन 12,000/-

- 5 वर्ष अनु. 15,000/-

- 10 वर्ष अनु.18,000/-

- 15 वर्ष अनु. 22,000/-

करारनामा मुद्रांक शुल्क - रु. 5500/-

कार्यादेश - 1) वविशम/आस्था/72/2012-13,दि.30/04/2012

2) वविशम/आस्था/156/2012-13,दि. 31/05/12

3) वविशम/आस्था/233/2012-13,दि.29/06/12

4) वविशम/आस्था/353/2012-13,दि. 31/07/12

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम
4433	26.3.13	रु. 12000/-
4434	26.3.13	रु. 12000/-
4134	13.3.13	रु. 89000/-
4135	13.3.13	रु. 74000/-
4136	13.3.13	रु. 17000/-
4137	13.3.13	रु. 152000/-
4138	13.3.13	रु. 73000/-

1) निविदा प्रक्रियेमध्ये प्रभाग निहाय मनुष्यबळ पुरविणे या कामाची निविदा जाहिरात देतांना किती मनुष्यबळाची आवश्यकता आहे याबाबत निविदेत उल्लेख नाही. त्यामुळे अंदाजीत रक्कम, त्या रकमेची आवश्यकता व मंजुरी प्राप्त संचिकेत आढळून आले नाही. त्यामुळे नेमका खर्च किती होणार आहे याबाबतची तरतूद व खर्चास मंजूरी प्राप्त संचिकेत आढळून आली नाही.

2) अंदाजपत्रकीय रक्कम, आवश्यक मनुष्यबळ पुरवठा व त्यावर होणारा खर्च संचिकेत नमूद नसल्यामुळे या कामाचे ठरविण्यात आलेले निविदा शुल्क,जाहिरातीसाठी वृत्तपत्राची निवड, इसारा शुल्काची निवड कशी करण्यात आली याची लेखापरीक्षणास खातरजमा करता आली नाही.

3) निविदा जाहिरातीत अभियंते पुरविण्याबाबत B.E. व Diploma अर्हता नमूद आहे. नविन व अनुभवी अशी वर्गवारी नसताना कंत्राटदाराकडून नविन व अनुभवी असे वेगवेगळया देण्यात आलेल्या दरास मंजूरी देण्यात येवून संबंधीतांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

4) निविदाधारकासाठी आवश्यक अटी व शर्ती उदा.व्हॅट क्लिअरन्स प्रमाणपत्र,लेबर कॉन्ट्रॅक्ट रजिस्टेशन

मजूरांच्या संख्येसह, निविदाकाराची आर्थीक स्थिती इत्यादी निविदेत नमूद केल्या नाहीत. त्यामुळे निविदा प्रक्रिया सदोष झाली असून पारदर्शक झाली नाही.

5) निविदेतील अट क्र. 4 अभियांत्रिकी सेवेसाठी पुरवठा करण्यात येणाऱ्या अभियंत्यांची अभियांत्रीकी पदवी/पदवीका ही शैक्षणिक अर्हता असणे बंधनकारक राहील. तसेच पुरवठा केलेल्या युनिटची शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रके सादर करणे बंधनकारक राहील. या अटीच्या पृष्ठयर्थ तसेच पुरविण्यात आलेल्या अभियंत्यांची माहिती व आवश्यक दस्ताऐवज लेखा परिक्षणास आढळून आले नाही.

6) करार नाम्यातील अट क्र. 4 संबंधित अभिकर्त्याने कार्यादेशानुसार अभियंते पुरवठा न केल्यास वार्षिक ठेक्याच्या 10% रक्कम नुकसान भरपाई म्हणून वसुल करण्यात येईल. याबाबत ठेकेदाराने कार्यादेशानुसार अभियंत्याचा पुरवठा केला किंवा नाही याबाबतची माहिती लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही.

7) प्रदान रकमेबाबत अभियंत्याचे स्वाक्षरित हजेरी अहवाल देयकासह व नस्तीमध्ये आढळून आले नाही.

8) खालील देयकातून 2% आयकर कपात करण्यात आलेला नाही.

प्रमाणक क्रमांक व दिनांक	रक्कम	2%TDS
4134/13.03.13	89000	1780
4135/13.03.13	74000	1400
4136/13.03.13	17000	340
4137/13.03.13	152000	3040
4138/13.03.13	73000	1460
एकूण		8100

सबब रु.8100 रक्कमेची वसुली होणे आवश्यक आहे.

वरील मुदयांच्या प्रकाशात लेखापरीक्षण प्रदानाची रक्कम रु.429000 आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

एकूण वसुलपात्र रक्कम रु.8100

वरील अभिप्रायाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 118,दि.12.09.2014 नुसार कळविण्यात आले होते. पंरतु विभागाकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झाले नाही.

DVESMBM7301 (Ref No : 76, Hmm No : 118)

39 महापालिकेच्या नवघर प्रभागातील आस्थापना विभागाच्या अनियमितता

प्रभाग कार्यालये

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

वसई विरार मनपा

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 208224.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 208224.00/-

अतिरिक्त पदे भरणे, आकृतीबंधामध्ये मंजूर नसताना पदे भरणे, बिंदू नामावली व सेवापुस्तकातील नियुक्त दिनांकामध्ये तफावत असणे , महापालिकेच्या निवासस्थानामध्ये राहात असलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून अनुज्ञप्ती शुल्क व सेवाकरांची वसूली न करणे

वसई विरार शहर महानगरपालिका सन 2009 मध्ये आस्तित्वात आली असून महापालिकेचा नवीन आकृतीबंध मंजूर झालेला दिसून येत नाही. सध्या प्रभागामध्ये नवघर माणिकपूर नगरपरिषदेचा क्र.नपप्रसं2005/1/1टिएच/8/प्रलंबित पदनि/प्र.क्र.870/2006/का-24 दिनांक 16/09/06 चा आकृतीबंध वापरण्यात येतो. सदर आकृतीबंधानुसार एकूण 39 संवर्गामध्ये 237 स्थायी व 174 अस्थायी पदे अशी एकूण 371 पदांना मंजूरी देण्यात आली आहे. उक्त प्रभागातील आस्थापना विभागातील लेख्यांची तपासणी केली असता खालील अनियमितता आढळून येत आहेत.

1) प्रभागाच्या बिंदूनामावली नोंदवहीचे अवलोकन करण्यात आले असता नोंदवहीमध्ये खालीलप्रमाणे अ.क्र. 1 व 4 च्या संवर्गामध्ये अतिरिक्त कर्मचारी भरण्यात आले आहेत.

अ.क्र.	पदनाम	मंजूर पदे	भरलेली पदे	अनुषेश	अतिरिक्त्
1	लिपिक-टंकलेखक	32	64	05	37
2	वाहन चालक	02	02	01	01
3	लघुटंकलेखक	02	02	0	01
4	शिपाई	15	22	03	10
5	व्हॉल्व्मन	03	03	02	02

उपरोक्त संवर्गातील पदे ही आरक्षणाच्या प्रवर्गांच्या टक्केवारीनुसार भरण्यात न आल्याने अ.क्र. 1,2,4 व 5 या संवर्गामध्ये अनुषेश असल्याचे दिसून येत आहे तसेच सर्व संवर्गामध्ये एकूण मंजूर पदांपेक्षा जास्त पदे भरण्यात आली आहेत. सहाय्यक आयुक्त (मावक), कोकण विभाग यांनी सन 2008 मध्ये बिंदूनामावली नोंदवही तपासली असून उपरोक्त अनुषेशाबाबत तसेच अतिरिक्त भरण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांबाबत खुलासा सादर करण्याबाबत सूचित केले होते. सदर बाबत खुलासा करण्यात आलेला नाही.

2) मंजूर आकृतीबंधानुसार वेतनपटांची पडताळणी केली असता आकृतीबंधामध्ये मंजूर नसताना प्लंबर 1 पद व अंगणवाडी सेविका 1 पद अशा दोन पदांचे वेतन काढण्यात येत आहे त्यामुळे (4400+1300)x12x02=137760 इतका किमान वार्षिक अतिरिक्त खर्च नियमबाहय केला जात आहे. सदर रकमेची वसूली करुन लेखापरिक्षणास दाखवावे.

वसई विरार मनपा

3) प्रभागामध्ये ठेवण्यात आलेल्या बिंदूनामावली नोंदवही तसेच कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांची पडताळणी केली असता काही कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांमध्ये नोंद असलेला नियुक्ती दिनांक व बिंदू नामावलीमध्ये नोंदविलेला नियुक्ती दिनांक यामध्ये तफावत आढळून येत आहे. सदर कर्मचारी खालीलप्रमाणे

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	लिपिक पदनाम	सेवापुस्तकातील नियुक्ती दिनांक	बिंदूनामावली नोंदवहीनुसार नियुक्ती दिनांक
1	श्रीम.रमिला रामअवतार गुप्ता	लिपिक	5/5/1994	2/1/1992
2	श्री.निलेश द. म्हात्रे	लिपिक	5/5/1994	2/11/1992
3	श्री.कॅजिटन लि. वाझ	शिपाई	5/5/1994	1/10/1991
4	श्री.दत्ता रामा दिवा	--	5/5/1994	1/8/1992
5	श्रीम.मनाली मनोज शिंदे	लिपिक	5/5/1994	2/11/1992
6	श्री.जोजफ पिटर डिकॉस्टा	लिपिक	1/5/1994	17/7/1992
7	श्री.जितेंद्र हरेश्वर नाईक	लिपिक	5/5/1994	2/11/1992
8	श्री.व्हिक्टर अंतोन डिसोझा	लिपिक	5/5/1994	17/7/1992
9	श्री.जोजफ मिनिजिस	लिपिक	5/5/1994	1/11/1991
10	श्री.बाळकृष्ण चौकेकर	--	5/5/1994	2/11/1992

बिंदूनामावली नोंदवहीमध्ये नोंदविण्यात आलेल्या संबंधित कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती दिनांकाबाबत ठराव अथवा इतर कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

4) कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाबाबत माहिती मागविली असता निवासस्थानाची नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही. नस्ती व वेतनपटांची पडताळणी केली असता खालील कर्मचारी महापालिका निवासस्थानात राहात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. वित्त विभाग शासन निर्णय क्र.घभाभ-1088/805/सेवा-5,मंत्रालय,मुंबई 32 दिनांक 30 मे 1989 नुसार सदर कर्मचाऱ्यांस वेतनामध्ये घरभाडे भत्ता अनुज्ञेय नाही.

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	पदनाम	अनुज्ञप्ती शुल्क	सेवाकर	एकूण वार्षिक वसूली
1	रमेश हरी कवळे	सफाईगार	120	80	2400
2	शंकर सदु हडळ	सफाईगार	120	80	2400
3	नंदकुमार नायगावकर	सफाईगार	120	80	2400
4	महेंद्र इम्रत तुसान	सफाईगार	120	80	2400
5	मनुभाई डायाभाई हरीजन	सफाईगार	120	80	2400
6	तुळशी छगन सोलंकी	सफाईगार	120	80	2400
7	शेख्या माघो कैरे	सफाईगार	120	80	2400
8	शांतीलाल सी. सोलंकी	सफाईगार	120	80	2400
9	अंबालाल रतिलाल महिडा	सफाईगार	120	80	2400

10	राजेश मोहन महिडा	सफाईगार	120	80	2400
11	कन्नुभाई कालिदास सोलंकी	सफाईगार	120	80	2400
12	चंदुभाई एच.हरीजन	सफाईगार	120	80	2400
13	कमलेश रमेश सोलंकी	सफाईगार	120	80	2400
14	गिता बोकाडे	सफाईगार	120	80	2400
15	मनुभाई मावजी हरीजन	सफाईगार	120	80	2400
16	संध्या दळवी	सफाईगार	120	80	2400
17	रतन मगन सोलंकी	सफाईगार	120	80	2400
18	सुनंदा रामचंद्र धरत	सफाईगार	120	80	2400
19	नुरजहा चिंधे	सफाईगार	120	80	2400
20	शांताबाई ईश्वर गोयल	सफाईगार	120	80	2400
21	आनंद सौदानसिंह वाल्मिकी	सफाईगार	120	80	2400
22	अरविंद ईश्वरलाल महिडा	सफाईगार	120	80	2400
23	गणेश हंकारे	फायरमन	260	176	5232
24	एस.एल.पवार	पंप चालक	260	176	5232
25	सुनिल कळसकर	सफाईगार	120	80	2400
26	चिमर झवेर सोलंकी	सफाईगार	120	80	2400
27	दशरथ हरीजन	सफाईगार	120	80	2400
		एकूण	3520	2352	70464

निवासस्थान नस्तीतील नोंदीनुसार कर्मचारी महापालिका निवासस्थानात राहात असून सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनपटांची पडताळणी केली असता त्यांच्या वेतनातून घरभाडे भत्त्ता प्रदान केलेला नाही. परंतू शासन निर्णय आरएफएल-1009/प्र.क्र.188/मि.व्य-2 दि.5/7/2001 तसेच सुधारीत शासन निर्णय वित्त विभाग क्र.घभाव-2010/प्र.क्र.4/सेवा-5 दिनांक 19/04/2011 नुसार अनुज्ञप्ती शुल्क तसेच सेवाकराची रक्कम कर्मचाऱ्याच्या वेतनातून वसूल करणे अनिवार्य असून उक्त वसूली न केल्याने महापालिकेस 2012-2013 या वर्षासाठी एकूण 70464 इतका आर्थिक तोटा झाला आहे. संबंधित कर्मचाऱ्यांकडून सदर रक्कम वसूल करण्यात यावी.

तसेच उपरोक्त सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतनातून त्यांना महापालिकेने निवासस्थान दिल्याच्या दिनांकापासून अनुज्ञप्ती शुल्क तसेच सेवाकराची वसूली करण्यात यावी. अशाप्रकारे महापालिकेच्या इतर सर्व प्रभागामधील निवासस्थानामध्ये कर्मचारी राहात असल्याने त्यांच्या वेतनामधून अनुज्ञप्ती शुल्क व सेवाकराची वसूली नियमित होते किंवा नाही याची मुख्य लेखापरीक्षकांनी तपासणी करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

या कामी लेखापरीक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.157 दि.30/10/2014 अन्वये खुलासा विचारला होता विभागाने कोणताही खुलासा केला नाही.

DMEMRMM6801 (Ref No : 98, Hmm No : 157)

40 महानगरपालिकेच्या मालमत्तांची निगा राखण्यासाठी शिपाई पुरविणे या कामातील अनियमिततांबाबत.

इमारत भाडे, गाळे भाडे.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 200228.00/-

निविदा प्रक्रियेमध्ये प्रभाग निहाय शिपायांची आवश्यकता, अंदाजीत रक्कम,त्याची तरतूद व त्या खर्चाची मंजूरी प्राप्त संचिकेत आढळून आली नाही.निविदेमध्ये निविदाधारकासाठी आवश्यक अटी व शर्ती विहीत केल्या नसल्यामुळे संपूर्ण निविदा प्रक्रियेत पात्र निविदाकार असल्याची खातरजमा करता आली नाही. तसेच कार्यादेश देण्यात आलेल्या पुरवठादारांकडून नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांची माहिती, त्यांचे नेमणूक आदेश, त्यांची निवड पदास अनुषंगिक शैक्षणिक अर्हता व प्रदान केलेल्या रकमाच्या अनुषंगाने स्वाक्षरीत हजेरी अहवाल नस्तीत वा प्रदान देयकासह आढळून आले नाहीत. महापालिकेचे दायित्व नसतांना प्रदान केलेली भविष्य निर्वाह निधी रक्कम रु.103138, कामगार राज्य विमा रक्कम रु.194523 कमी वसुल केले. तसेच कमी वसूल केलेली मुद्रांक शुल्क रक्कम रु.5705 वसुल होणे आवश्यक आहे.

वसई विरार महानगरपालिका आस्थापना विभागाकडून महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयामध्ये शिपाई पुरवठा करण्यासाठी प्रभाग निहाय निविदा मागविण्यात आली होती.

कामाचे नाव - महानगरपालिकेच्या मालमत्तांची निगा राखण्यासाठी शिपाई पुरविणे..

वृत्तपत्र - दि.29.03.2012 चे दै.सकाळ व दै. महाराष्ट्र बुलंद टाईम्स (लेखापरीक्षण आढळून आले नाही)

निविदा शुल्क - रुपये 5000

निविदा कालावधी - दि.29.03.2012 ते दि.16.04.2012

निविदा सुचना - वविशम/आस्था/897/2012-13,दि.29.03.2012

अंदाजपत्रकीय रक्कम - आढळून आली नाही.

खर्चास प्रशासकीय मान्यता- आढळून आली नाही.

निविदा अंतीमीकरणास मान्यता- ठराव क्रमांक 289, दि.06.06.2012.

उपलब्ध निविदा नस्ती व देयकांचे लेखापरीक्षण केले असता पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) प्रभाग निहाय शिपाई पुरविणे या कामाची निविदा जाहिरात देतांना किती शिपायांची आवश्यकता

आहे याबाबत निविदेत उल्लेख नाही. तसेच अंदाजीत रक्कम, त्या रकमेची आवश्यकता व मंजुरी प्राप्त संचिकेत आढळून आली नाही.त्यामुळे नेमका खर्च किती होणार आहे याबाबतची तरतूद व खर्चास मंजूरी प्राप्त संचिकेत आढळून आली नाही.

2) अंदाजपत्रकीय रक्कम, आवश्यक शिपाई पुरवठा व त्यावर होणारा खर्च संचिकेत नमूद नसल्यामुळे या कामाचे ठरविण्यात आलेले निविदा शुल्क, जाहिरातीसाठी वृत्तपत्राची निवड, इसारा शुल्काची निवड कशी करण्यात आली याची लेखापरीक्षणास खातरजमा करण्यात आली नाही.

3) निविदाधारकासाठी आवश्यक अटी व शर्ती उदा.व्हॅट क्लिअरन्स प्रमाणपत्र,लेबर कॉन्ट्रॅक्ट रजिस्टेशन मजूरांच्या संख्येसह, निविदाकाराची आर्थीक स्थिती इत्यादी निविदेत नमूद केल्या नाहीत. त्यामुळे निविदा प्रक्रिया सदोष झाली असून पारदर्शक झाली नाही.

4) प्रभाग निहाय कार्यादेश देण्यात आलेल्या पुरवठादारांकडून नियुक्त्ाे करण्यात आलेल्या कर्मचा-यांची माहिती, त्यांचे नेमणूक आदेश, त्यांची निवड पदास अनुषंगिक शैक्षणिक पात्रता इत्यादीची माहिती प्राप्त संचिकेत आढळून आली नाही. तसेच मजुरांची आवश्यकता,त्यांचे हजरी स्वाक्षरीत अहवाल नस्तीत वा प्रदान देयकासह आढळून आले नाहीत.

5) प्रभाग समिती क च्या निविदा प्रक्रियेबाबत-

प्रभाग समिती अ साठी मजुर पुरविणेसाठी 1.मे.बि.एल.हॉनेस्ट सेक्युरिटी फोर्स 2.मे.शॉर्प एंटरप्रायजेस व 3.मे.युनिव्हर्सल एंटरप्रायजेस असे एकूण 3 निविदाकारांच्या निविदा प्राप्त झालेल्या होत्या. उपरोक्त निविदाकारांपैकी मे. बि.एल.हॉनेस्ट या किमान दरधारकास वविशम/आस्था//2012-13/ 306 दि.10.09.2012 (25 शिपाई पुरवठा), 305 दि.10.09.12 (50शिपाई पुरवठा) व 306 दि.11.09.12 (05 शिपाई पुरवठा),299,दि.09.07.2012 (141 शिपाई पुरवठा) कार्यादेश देण्यात आलेले होते.

एकूण 25+50+5+141=221 शिपाई पुरवठयासाठी रु.8600 प्रति शिपाई प्रति महा प्रमाणे 8 महिन्यांची रक्कम एकूण रु.28483200 येते. या रकमेसाठी मुद्रांक शुल्क रु.14305 आवश्यक होते. परंतु मे.बि.एल.हॉनेस्ट यांचेकडून रु.8600 किंमतीच्या बॉंड पेपरवर करारनामा केल्यामुळे संबंधित पुरवठादाराकडून रु.5705/- इतके कमी शुल्क आकारण्यात आलेले आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 नुसार महसूल व वन विभाग अधिसूचना दि.23/04/2006 अन्वये व नगर विकास विभाग यांचे कडील पत्रक्र. संकीर्ण 2009/स.क.1794- नवि-20, दि.07/12/2009 अन्वये सदर मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

शिपाई पुरवठा या कामाचे देयक

प्रमाणक क्रमांक व दिनांक	रक्कम रु.	कालावधी
4151/13.03.2012	871914	फेब्रुवारी-2013.
4152/13.03.2012	715421	फेब्रुवारी-2013.

तसेच वरील देयकामध्ये भविष्य निर्वाह निधी (मुळ वेतनावर 13.61%) कामगार राज्य विमा (मुळ वेतन व घरभाडे भत्ता यावर 4.75%) कंत्राटदारास प्रदान करण्यात आले आहे. वस्तुत: याबाबत निविदा वा

इतर अनुषंगीक कोणत्याही अभिलेख्यामध्ये सदर भनिनि व कामगार राज्य विमा प्रदान करण्याबाबत उल्लेख नाही. त्यामुळे खालील प्रमाणे रु.194523 चे अतिप्रदान झालेले आहे.

वरील मुळ वेतन व इतर वेतनांच्या गणणेनुसार (प्रभाग निहाय) लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

प्रमाणक क्रमां	कपात भ.नि.नि. 13.61%	कामगार राज्य विमा	एकूण रु.
4151/3.03.12	76992	28209	105201
4152/13.03.1	63176	26146	89322
		एकूण	194523

तसेच 2012-2013 या वित्तिय वर्षात निविदाकांनी सादर केलेल्या दराव्यतिरिक्त किती रकमेचे प्रदान करण्यात आले याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

एकूण वसुलपात्र रक्कम रुपये	
भनिनि व राज्यकामगार विमा	रु.194523
मुद्रांक शुल्क	रु.5705
एकूण	रु.200228

उपरोक्त अभिप्रायाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रमांक 118,दि.12.09.2014 नुसार कळविण्यात आले होते. पंरतु विभागाकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झाले नाही.

DVESMBM7301 (Ref No : 75, Hmm No : 118)

41 प्रभाग समिती - अ - विरार विभागातील तलाव लिलाव प्रकरणांतील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :544-1412 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 116050.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 116050.00/-

प्रभाग समिती – अ – विरार विभागातील तलाव लिलाव प्रकरणांमधील लिलावाची रककम ठेकेदाराने विलंबाने जमा केल्याबाबत संबंधीत ठेकेदाराकडून व्याजाची रक्कम रुपये 1,16,050/- वसुल केली नाही.

करण्यात आलेला आहे. 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता तलाव लिलाव प्रकरणांमध्ये खालील तलावांबाबत अनियमितता आहेत.

1) **<u>सोनेरी तलाव</u> -**

1	मा.स्थायी समिती ठराव क्र. व दिनांक	6 / 1.6.2011
2	लिलावाचा कालावधी	1.6.2011 ते 31.5.2013
3	लिलावाची रक्कम	रुपये 9,500/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. ऑगस्टीन फ्रान्सीस बरबोज
5	करारनाम्याचा दिनांक	31.5.2011

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) करारनाम्यातील अट क्र. 2 नुसार लिलावाची उर्वरीत 50% रक्कम सहा महिन्याच्या आत भरणे आवश्यक असताना ठेकेदाराने सदर रक्कम सर्वसाधारण पावती क्रमांक 253120, दिनांक 14.6.2012 रोजी भरली आहे. म्हणजेच ठेकेदाराने 197 दिवस उशिराने रक्कम भरलेली आहे.

3) करारनाम्यातील अट क्र. 24 अन्वये ठरलेल्या तारखेस हप्ता न भरल्यास प्रतिदिन रुपये 100 प्रमाणे दंड आकारण्याची तरतुद करण्यात आलेली आहे, त्यानुसार **संबंधीत ठेकेदाराकडून 197 दिवसाचे रुपये 19,700/- इतकी रक्कम वसुल केलेली नाही.**

2) **<u>राम मंदिर तलाव</u> -**

1	मा.स्थायी समिती ठराव क्र. व दिनांक	6 / 1.6.2011
2	लिलावाचा कालावधी	1.6.2011 ते 31.5.2013
3	लिलावाची रक्कम	रुपये 42,000/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. ऑगस्टीन फ्रान्सीस बरबोज
5	करारनाम्याचा दिनांक	6.6.2011

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) करारनाम्यातील अट क्र. 2 नुसार लिलावाची उर्वरीत 50% रक्कम सहा महिन्याच्या आत भरणे आवश्यक असताना ठेकेदाराने सदर रक्कम सर्वसाधारण पावती क्रमांक 188483, दिनांक 2.2.2012 रोजी भरली आहे. म्हणजेच ठेकेदाराने 185 दिवस उशिराने रक्कम भरलेली आहे.

वसई विरार मनपा

3) करारनाम्यातील अट क्र. 24 अन्वये ठरलेल्या तारखेस हप्ता न भरल्यास प्रतिदिन रुपये 100 प्रमाणे दंड आकारण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार **संबंधीत ठेकेदाराकडून 185 दिवसाचे रुपये 18,500/- इतकी** दंडाची **रक्कम वसुल केलेली नाही.**

3) **<u>मनुकर्णिक तलाव</u> -**

1	मा.स्थायी समिती ठराव क्र. व दिनांक	6 / 1.6.2011
2	लिलावाचा कालावधी	1.6.2011 ते 31.5.2013
3	लिलावाची रक्कम	रुपये 20,000/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. ऑगस्टीन फ्रान्सीस बरबोज
5	करारनाम्याचा दिनांक	6.6.2011

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) करारनाम्यातील अट क्र. 2 नुसार लिलावाची उर्वरीत 50% रक्कम सहा महिन्याच्या आत भरणे आवश्यक असताना ठेकेदाराने सदर रक्कम सर्वसाधारण पावती क्रमांक 59744, दिनांक 23.6.2012 रोजी भरली आहे. म्हणजेच ठेकेदाराने 206 दिवस उशिराने रक्कम भरलेली आहे.

3) करारनाम्यातील अट क्र. 24 अन्वये ठरलेल्या तारखेस हप्ता न भरल्यास प्रतिदिन रुपये 100 प्रमाणे दंड आकारण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यानुसार **संबंधीत ठेकेदाराकडून 206 दिवसाचे रुपये 20,600/- इतकी दंडाची रक्कम वसुल केलेली नाही.**

4) **<u>रानपाडा तलाव</u> -**

1	मा.स्थायी समिती ठराव क्र. व दिनांक	4 / 16.7.2012
2	लिलावाचा कालावधी	1.6.2012 ते 31.5.2014
3	लिलावाची रक्कम	रुपये 11,201/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. केसरीनाथ अनंत मानकर
5	करारनाम्याचा दिनांक	13.6.2012

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) करारनाम्यातील अट क्र. 11 नुसार लिलावाची रक्कम समान दोन हप्त्यात सहा महिन्याच्या आत भरणे आवश्यक असताना ठेकेदाराने सदर रक्कम सर्वसाधारण पावती क्रमांक 253864, दिनांक 25.6.2012

व उर्वरित रक्कम सर्वसाधारण पावती क्रमांक 178825, दिनांक 20.2.2014 रोजी भरली आहे. म्हणजेच ठेकेदाराने 447 दिवस उशिराने रक्कम भरलेली आहे.

3) करारनाम्यातील अट क्र. 23 अन्वये ठरलेल्या तारखेस हप्ता न भरल्यास प्रतिदिन रुपये 100 प्रमाणे दंड आकारण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि **संबंधीत ठेकेदाराकडून 447 दिवसाचे रुपये 44,700/- इतकी रक्कम दंडाची वसुल केलेली नाही.**

5) **<u>धोबी तलाव / गणेश तलाव</u> -**

1	मा.स्थायी समिती ठराव क्र. व दिनांक	4 / 16.7.2012
2	लिलावाचा कालावधी	1.6.2011 ते 31.5.2013
3	लिलावाची रक्कम	रुपये 1,33,400/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. ऑगस्टीन फ्रान्सीस बरबोज
5	करारनाम्याचा दिनांक	5.4.2011

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार ठेकेदाराने लिलावाच्या रक्कमेच्या 25% रक्कम रुपये 33,350/- भरली असुन उर्वरित रक्कम आठ समान हप्त्यात भरावयाची आहे. परंतु ठेकेदाराने पहिल्या 02 हप्त्यांची रक्कम विलंबाने भरली असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हप्ते	**ठेकेदाराने रक्कम भरावयाचा महिना**	**रक्कम रुपये**	**ठेकेदाराने भरलेली रक्कम/दिनांक**	**विलंबाचा कालावधी**
1	जुन,2011	12,508/-	--	171 दिवस
2	सप्टेंबर,2011	12,506/-	--	80 दिवस
3	डिसेंबर,2011	12,506/-	रु. 50,026/19.12.2011	--
4	मार्च,2012	12,506/-		--

3) करारनाम्यातील अट क्रमांक 13 अन्वये रक्कम उशिराने भरल्याने प्रतिदिन रुपये 50/- प्रमाणे दंड आकारण्याची तरतुद करण्यात आली असुन त्याप्रमाणे ठेकेदाराने 251 दिवस विलंबाने रक्कम भरली असुनही प्रतिदिन रुपये 50/- प्रमाणे एकूण रुपये 12,550/- दंडाची रक्कम संबंधीत ठेकेदाराकडून वसुल करण्यात आलेली नाही.

उपरोक्तबाबत तलाव विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 148, दिनांक 18.10.2014 अन्वये कळविण्यात आले होते. परंतु विभागाने लेखापरीक्षण पथकास अनुपालन सादर केले नाही.

(एकूण वसुलपात्र रक्कम रुपये 1,16,050/-)

42 प्रभाग समिती - ई - वसई विभागातील तलाव लिलाव प्रकणांतील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :544-1412 मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 132750.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 132750.00/-

प्रभाग समिती – ई – वसई विभागातील तलाव लिलाव प्रकरणांमधील लिलावाची रक्कम ठेकेदाराने विलंबाने जमा करुनही व्याजाची रक्कम रुपये 1,16,050/- संबंधीत ठेकेदाराकडून वसुल केले नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती - ई - वसई विभागातील तलावांचा लिलाव करण्यात आलेला आहे. 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता तलाव लिलाव प्रकरणांमध्ये खालील तलावांबाबत अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) **<u>गिरीजा तलाव</u> -**

1	कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांक	क्र.वविशमपा, दिनांक निरंक
2	लिलावाचा कालावधी	1.8.2010 ते 31.7.2013
3	लिलावाची रक्कम	रुपये 3,35,000/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. मनिष प्रमोद पाटील
5	करारनाम्याचा दिनांक	निरंक

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) लिलावाच्या अटी व शर्तीनुसार लिलावाची रक्कम विहित महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत समान सहा हप्त्यात भरावायाची होती व ठेकेदाराने विहित कालावधीत रक्कम भरलेली नाही. ठेकेदाराने भरलेल्या हप्त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हप्ते	**ठेकेदाराने रक्कम भरावयाचा महिना**	**रक्कम रुपये**	**ठेकेदाराने भरलेली रक्कम/दिनांक**	**विलंबाचा कालावधी**

वसई विरार मनपा

1	नोव्हेंबर,2010	55,835/-	55,835/-, 6.11.2010	-
2	फेब्रुवारी,2011	55,833/-	55,833/-, 15.3.2011	15 दिवस
3	मे,2011	55,833/-	55,833/-, 11.1.2012	225 दिवस
4	ऑगस्ट,2011	55,833/-	55,833/-, 27.2.2012	180 दिवस
5	नोव्हेंबर,2011	55,833/-	55,833/-, 19.1.2013	415 दिवस
6	फेब्रुवारी,2012	55,833/-	55,833/-, 26.4.2013	422 दिवस
	एकूण	**3,35,000/-**		**1257 दिवस**

3) लिलावाच्या अटी व शर्तीमधील अट क्रमांक-12 अन्वये लिलावाची रक्कम समान सहा हप्त्यात भरावयाची होती. विहित मुदतीत रक्कम न भरल्यास प्रतिदिन रुपये 50/- एवढा दंड आकारण्याची तरतुद आहे. ठेकेदाराने लिलावाची रक्कम वरील प्रमाणे 1257 दिवस विलंबाने भरली असुनही रुपये 50/- प्रमाणे रुपये 62,850/- इतकी दंडाची रक्कम ठेकेदाराकडून वसुल करण्यात आलेली नाही.

2) **<u>उतळेश्वर तलाव</u> -**

1	कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांक	क्र.वविशमपा, दिनांक निरंक
2	लिलावाचा कालावधी	1.7.2010 ते 30.6.2013
3	लिलावाची रक्कम	रुपये 2,55,500/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. दिनेश जनार्दन पाटील
5	करारनाम्याचा दिनांक	निरंक

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) लिलावाच्या अटी व शर्तीनुसार लिलावाची रक्कम विहित महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत समान सहा हप्त्यात भरावयाची होती व ठेकेदाराने भरलेल्या हप्त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

हप्ते	**ठेकेदाराने रक्कम भरावयाचा महिना**	**रक्कम रुपये**	**ठेकेदाराने भरलेली रक्कम/दिनांक**	**विलंबाचा कालावधी**
1	ऑक्टोबर,2010	42,585/-	42,585/-, 23.3.2011	143 दिवस
2	जानेवारी,2011	42,585/-	42,585/-, 21.11.2011	294 दिवस
3	एप्रिल,2011	42,585/-	42,585/-, 21.11.2011	205 दिवस

4	जुलै,2011	42,585/-	42,585/-, 7.1.2012	161 दिवस
5	ऑक्टोबर,2011	42,585/-	42,585/-, 19.7.2012	261 दिवस
6	जानेवारी,2012	42,585/-	42,585/-, 31.12.2012	334 दिवस
	एकूण	**2,55,510/-**		**1398 दिवस**

3) लिलावाच्या अटी व शर्तीमधील अट क्रमांक-12 अन्वये लिलावाची रक्कम समान सहा हप्त्यात भरावयाची होती. विहित मुदतीत रक्कम न भरल्यास प्रतिदिन रुपये 50/- एवढा दंड आकारण्याची तरतुद आहे. तथापि ठेकेदाराने लिलावाची रक्कम वरील प्रमाणे 1398 दिवस विलंबाने भरली असुनही रुपये 50/- प्रमाणे 69,900/- इतकी दंडाची रक्कम ठेकेदाराकडून वसुल करण्यात आलेली नाही.

उपरोक्तबाबत तलाव विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 149, दिनांक 18.10.2014 अन्वये कळविण्यात आले होते. परंतु विभागाने लेखापरीक्षण पथकास अनुपालन सादर केले नाही.

(एकूण वसुलपात्र रक्कम रुपये 1,32,750/-)

DMASGDM7201 (Ref No : 81, Hmm No : 149)

43 प्रभाग समिती - ब - पेल्हार विभागातील तलाव लिलाव प्रकरणांतील अनियमितता.

तलाव लिलाव.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 18463.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 18463.00/-

प्रभाग समिती – ब – पेल्हार विभागातील तलाव लिलाव प्रकरणांमधील लिलावाची रक्कम ठेकेदाराने विलंबाने जमा करुनही व्याजाची अधिक लिलावाची रक्कम रुपये 18,463/- वसुल केली नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती - ब - पेल्हार विभागातील तलावांचा लिलाव करण्यात आलेला आहे. 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता तलाव लिलाव प्रकरणांमध्ये खालील तलावांबाबत अनियमितता.

1) **<u>नागेला तलाव</u> -**

वसई विरार मनपा

1	कार्यालयीन आदेश क्रमांक	प्रसब/साप्रवि/50/12-13, दिनांक 15.5.2012
2	लिलावाचा कालावधी	2.4.2012 ते 31.3.2014
3	लिलावाची रक्कम	रुपये 87,000/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. महेश शरद साळवी
5	करारनाम्याचा दिनांक	दिनांक 15.5.2012

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) उपरोक्त कार्यालयीन आदेशान्वये लिलावाच्या 50% रक्कम रुपये 43,500/- सर्वसाधारण पावती क्रमांक 234629, दिनांक 15.5.2012 अन्वये भरली असुन उर्वरित रक्कम दिनांक 1.4.2013 च्या पहिल्या हप्त्यात भरणे आवश्यक होते. तथापि ठेकेदाराने सदर रक्कम रुपये 43,500/- सर्वसाधारण पावती क्रमांक 91961, दिनांक 25.10.2013 रोजी भरणा केली आहे. सदर रक्कम ठेकेदाराने 07 महिले विलंबाने भरलेली आहे. **त्यामुळे करारनाम्यातील अट क्रमांक 15 अन्वये 16% प्रमाणे दंडाची रक्कम रुपये 4,060/- ठेकेदाराकडून वसुलपात्र आहे.**

2) **<u>सुकाळा तलाव</u> -**

1	कार्यालयीन आदेश क्रमांक	वविशम/पेल्हार/साप्रवि/129/12-13, दिनांक 8.6.2012
2	लिलावाचा कालावधी	1.6.2012 ते 31.5.2014
3	लिलावाची रक्कम	रुपये 73,000/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. रशीद हसन डबरे
5	करारनाम्याचा दिनांक	8.6.2012

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) उपरोक्त कार्यालयीन आदेशान्वये लिलावाच्या 50% रक्कम रुपये 36,500/- सर्वसाधारण पावती क्रमांक 234680, दिनांक 9.8.2012 अन्वये भरली असुन उर्वरित रक्कम दिनांक 1.6.2013 च्या

पहिल्या हप्त्यात भरणे आवश्यक होते. तथापि ठेकेदाराने सदर रक्कमेपैकी रुपये 26,500/- सर्वसाधारण पावती क्रमांक 91922, दिनांक 8.9.2013 रोजी म्हणजेच तीन महिने विलंबाने भरणा केली आहे. **परंतु करारनाम्यातील अट क्रमांक 15 अन्वये 16% प्रमाणे दंडाची रक्कम रुपये 1,060/- ठेकेदाराकडून वसुल केलेली नाही.**

3) तसेच उर्वरित लिलावाची रक्कम रुपये 10,000/- वसुल करण्यात आलेली नाही. त्यानुसार लेखापरीक्षणाच्या दिनांकापर्यंत माहे ऑक्टोबर, 2014 पर्यंत 17 महिन्यांचे करारनाम्यातील अट क्रमांक 15 अन्वये **16%** प्रमाणे व्याजाची रक्कम रुपये 2,267/- अधिक रुपये 10,000/- असे एकूण रक्कम रुपये 12,267/- वसुल करणे आवश्यक आहे.

3) **<u>घाणीचा तलाव</u> -**

1	कार्यालयीन आदेश क्रमांक	वविशम/प्रसब/साप्रवि/404/12-13,दिनांक 5.9.2012
2	लिलावाचा कालावधी	1.9.2012 ते 31.8.2014
3	लिलावाची रक्कम	रुपये 1,61,400/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. बाळकृष्ण् मोतीराम पाटील
5	करारनाम्याचा दिनांक	5.9.2012

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) उपरोक्त कार्यालयीन आदेशान्वये लिलावाच्या 50% रक्कम रुपये 80,700/- सर्वसाधारण पावती क्रमांक 234725, दिनांक 18.8.2012 अन्वये भरली असुन उर्वरित रक्कम दिनांक 1.6.2013 च्या पहिल्या हप्त्यात भरणे आवश्यक होते. तथापि ठेकेदाराने सदर रुपये 80,700/- सर्वसाधारण पावती क्रमांक 91915, दिनांक 18.7.2013 रोजी म्हणजेच एक महिने विलंबाने भरणा केली आहे.

परंतु करारनाम्यातील अट क्रमांक 21 अन्वये 16% प्रमाणे दंडाची रक्कम रुपये 1,076/- ठेकेदाराकडून वसुल केलेली नाही.

उपरोक्तबाबत तलाव लिलाव विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक: 137, दिनांक 04.10.2014 अन्वये निर्गमित करण्यात आले असुन विभागाकडून अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

(एकूण वसुलपात्र रक्कम रुपये 18,463/-)

44 प्रभाग समिती - ड, नवघर माणिकपूर विभागातील भाडयाने देण्यात आलेल्या मालमत्तांमधील त्रुटींबाबत.

गाळे भाडे.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 472321.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 472321.00/-

प्रभाग समिती – ड, नवघर माणिकपूर विभागातील भाडयाने देण्यात आलेल्या मालमत्तांपैकी 60 मालमत्तांची मागील थकबाकी तसेच चालू वर्षाच्या भाडयापोटी रुपये 4,72,321/- वसुल करण्यात आलेले नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती - ड, नवघर माणिकपूर विभागातील 120 मालमत्ता भाडयाने देण्यात आलेल्या असुन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) मागणी नोंदवही नमुना क्रमांक : 81 ची पडताळणी केली असता भाडयाने देण्यात आलेल्या मालमत्तेची मागील थकबाकी व चालू भाडयाची रक्कम अशी एकूण रक्कम रुपये 4,72,321/- असुन सदर रक्कम संबंधीतांकडून वसुल करण्यात आलेली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 439 (2) प्रमाणे मागणी करण्यात आल्यावर रक्कम देण्यात आली नाही, तर येणे असलेल्या रक्कमेची वसुली मालमत्ता कराची रक्कम समजुन वसुल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर रक्कम वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. (सोबत विवरणपत्र जोडले आहे)

2) विभागाने सादर केलेल्या अभिलेख्यांची पडताळणी केली असत भाडयाने देण्यात आलेल्या 120 मालमत्तांचा भाडे करारनामा केला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

3) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 139 (1)(अ) नुसार जागा प्रत्यक्ष (शासनाकडून) किंवा महानगरपालिकेकडून धारण केली असल्यास मालमत्ता कराची रक्कम प्रत्यक्ष भोगवटादाराकडून वसुल करण्याबाबत तरतुद आहे. परंतु आपल्या विभागाने भाडयाने देण्यात आलेल्या मालमत्तांचा मालमत्ता कर संबंधीतांकडून वसुल केला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

वसई विरार मनपा

उपरोक्तबाबत तलाव लिलाव विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 150, दिनांक 18.10.2014 अन्वये निर्गमित करण्यात आले असुन विभागाकडून सहा. आयुक्त (प्र), नवघर माणिकपूर यांचे पत्र क्रमांक : निरंक, दिनांक : 24.11.2014 अन्वये अनुपालन सादर करण्यात आले असुन ते समाधानकारक नसल्याने अमान्य करण्यात येत आहे.

(वसुलपात्र रक्कम रुपये 4,72,321/-)

DMASGDM7201 (Ref No : 107, Hmm No : 150)

45 प्रभाग समिती - क, नालासोपारा विभागातील भाडयाने देण्यात आलेल्या मालमत्तांच्या थकीत भाडयाबाबत.

गाळे भाडे.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : भाडे मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 53050.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 53050.00/-

प्रभाग समिती – क, नालासोपारा विभागातील भाडयाने देण्यात आलेल्या 03 मालमत्तांची मागील थकबाकी तसेच चालू वर्षाच्या भाडयापोटी रुपये 53,050/- वसुल करण्यात आलेले नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती - क, नालासोपारा विभागातील 03 मालमत्ता भाडयाने देण्यात आलेल्या असुन 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) नाळे / राजोडी विभागातील 03 मालमत्ता या भूतपूर्व ग्रामपंचायतीपासुन भाडेतत्वावर देण्यात आल्या असुन महानगरपालिका दिनांक 03/07/2009 रोजी स्थापन झाल्या पासून अदयाप कोणताही करारनामा केलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

2) मागणी नोंदवही नमुना क्रमांक : 81 ची पडताळणी केली असता भाडयाने देण्यात आलेल्या एकूण 03 मालमत्तांची भाडे थकीत असुन संबंधीतांकडून रुपये 53,050/- वसुल करण्यात आलेले नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 439 (2) प्रमाणे मागणी करण्यात आल्यावर रक्कम देण्यात आली नाही, तर येणे असलेल्या रक्कमेची वसुली मालमत्ता कराची रक्कम समजुन वसुल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर रक्कम वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

अ.क्र.	मालमत्तेचे नांव	भोगवटादाराचे नांव	भाडे		
			थकीत रुपये	चालू रुपये	एकूण रुपये
1	मार्केट गाळा	श्री.मोहम्द शेख	4300	3600	7900
2	मार्केट गाळा	श्री.सुरेश लाड	30750	3600	34350
3	मार्केट गाळा	श्री.किरण म्हात्रे	8400	2400	10800
	एकूण		**43450**	**9600**	**53050**

उपरोक्तबाबत तलाव लिलाव विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक : 178, दिनांक 07.11.2014 अन्वये निर्गमित करण्यात आले असुन विभागाकडून अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

(वसुलपात्र रक्कम रुपये 53,050/-)

DMASGDM7201 (Ref No : 108, Hmm No : 178)

46 प्रभाग समिती - ड - नवघर माणिकपूर विभागातील तलाव लिलाव प्रकरणांतील अनियमितता.

तलाव लिलाव.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 16949.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 16949.00/-

प्रभाग समिती – ड – नवघर माणिकपूर विभागातील तलाव लिलाव प्रकरणांमधील लिलावाची रक्कम ठेकेदाराने विलंबाने जमा करुनही व्याजाची रक्कम रुपये 16,949/- वसुल केले नाही. तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार लिलावाची रक्कम न भरुनही महानगरपालिकेने तलाव ताब्यात घेतलेला नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती - ड - नवघर माणिकपूर विभागातील

तलावांचा लिलाव करण्यात आलेला आहे. 2012-2013 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण केले असता तलाव लिलाव प्रकरणांमध्ये खालील तलावांबाबत अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) **<u>चुळणा तलाव</u> -**

1	कार्यालयीन आदेश क्रमांक	वविशम/साप्रवि/1205/11/12,दिनांक 7.7.2011
2	लिलावाचा कालावधी	15.6.2011 ते 14.6.2014
3	लिलावाची रक्कम	रुपये 1,71,000/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. बेरनाथ डिसा.
5	करारनामा	दिनांक 7.7.2011

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) उपरोक्त करारनाम्यातील अट क्रमांक 1 अन्वये निविदा रकमेच्या 50% रक्कम म्हणजेच रुपये 85,500/- त्वरीत भरणा करावयाची होती. परंतु ठेकेदाराने रुपये 50,000/- सर्वसाधारण पावती क्रमांक 20787, दिनांक 22.7.2011 रोजी भरली असुन रुपये 35,500/- कमी भरलेली आहे. तसेच उर्वरित 50% रक्कम माहे डिसेंबर, 2013 मध्ये भरणा करावयाची होती. ठेकेदाराने भरलेल्या रक्कमेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	**ठेकेदाराने रक्कम भरावयाचा महिना**	**<u>ठेकेदाराने भरलेल्या रक्कमेचा</u> पावती क्रमांक व दिनांक**	**रुपये**	**विलंबाचा कालावधी**	**विलंब आकार**
1	जुलै, 2011	206873 / 21.8.2013	25,000	26 महिने	8,667
2	जुलै, 2011 डिसेंबर, 2013	22717 / 11.10.2013	10,500 19,500	28 महिने --	3,920 --
3	डिसेंबर, 2013	110318 / 20.12.2013	26,000	--	--
4	डिसेंबर, 2013	110254 / 12.2.2014	25,000	02 महिने	667
5	डिसेंबर, 2013	110258 / 20.2.2014	15,000	02 महिने	400
	एकूण		**91,000**		**13,654**

3) ठेकेदाराने तलाव लिलावाची रक्कम विहित कालावधीत भरलेली नाही. त्याबाबत ठेकेदाराकडून विभागाने विलंब आकार रुपये 13,654/-वसुल केलेला नाही. ठेकेदाराबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्यामध्ये विलंब आकार वसुल करण्याबाबतच अट नमुद करण्यात आलेली नाही. तथापि तलाव लिलाव प्रकरणाबाबत प्रभाग समिती - ब, पेल्हार विभागाने त्यांचे करारनाम्यामधील अट क्रमांक : 21 अन्वये 16% प्रमाणे व्याजाची तरतुद केलेली आहे. त्यानुसार उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद विलंब आकार 16% प्रमाणे व्याज आकारण्यात आले असुन रुपये 13,654/- संबंधीत

वसई विरार मनपा

ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावे

2) **<u>भाबोळा तलाव</u> -**

1	कार्यालयीन आदेश क्रमांक	वविशम/साप्रवि/1204/11/12, दिनांक 7.7.2011
2	लिलावाचा कालावधी	15.6.2011 ते 14.6.2014
3	लिलावाची रक्कम	रुपये 66,650/-
4	ठेकेदाराचे नांव	श्री. किरण मोरेश्वर पाटील.
5	करारनामा	दिनांक 7.7.2011

1) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 122 नुसार विभागाने नमुना 71 मध्ये तलाव लिलावाच्या रक्कमेबाबत मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2) उपरोक्त करारनाम्यातील अट क्रमांक 1 अन्वये निविदा रकमेच्या 50% रक्कम म्हणजेच रुपये 33,350/- त्वरीत भरणा करावयाची होती. परंतु ठेकेदाराने रुपये 30,000/- सर्वसाधारण पावती क्रमांक 20793, दिनांक 22.7.2011 रोजी भरली असुन रुपये 3,550/- कमी भरलेली आहे. उर्वरित 50% रक्कम माहे डिसेंबर, 2013 मध्ये भरणा करावयाची होती. ठेकेदाराने भरलेल्या रक्कमेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र.	**ठेकेदाराने रक्कम भरावयाचा महिना**	**<u>ठेकेदाराने भरलेल्या रक्कमेचा</u> पावती क्रमांक व दिनांक**	**रुपये**	**विलंबाचा कालावधी**	**विलंब आकार**
1	जुलै, 2011 डिसेंबर, 2013	118001 / 2.4.2014	3,350 16,650	34 महिने 04 महिने	1,519 888
2	डिसेंबर, 2013	118008 / 28.4.2014	16,650	04 महिने	888
	एकूण		**66,650**		**3,295**

3) ठेकेदाराने तलाव लिलावाची रक्कम विहित कालावधीत भरलेली नाही. त्याबाबत ठेकेदाराकडून विभागाने विलंब आकार वसुल केलेला नाही. ठेकेदाराबरोबर करण्यात आलेल्या करारनाम्यामध्ये विलंब आकार वसुल करण्याबाबतच अट नमुद करण्यात आलेली नाही. तथापि तलाव लिलाव प्रकरणाबाबत प्रभाग समिती – ब, पेल्हार विभागाने त्यांचे करारनाम्यामधील अट क्रमांक : 21 अन्वये 16% प्रमाणे व्याजाची तरतुद केलेली आहे. त्यानुसार उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद विलंब आकार 16% प्रमाणे व्याज आकारण्यात आले असुन रुपये 3,295/- संबंधीत ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावे.

उपरोक्तबाबत तलाव लिलाव विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक:139, दिनांक 04.10.2014 अन्वये निर्गमित करण्यात आले असुन विभागाकडून अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

(एकूण वसुलपात्र रक्कम रुपये 16,949/-)

DMASGDM7201 (Ref No : 118, Hmm No : 139)

47 प्रभाग समिती - अ, बोळींज विभागातील मालमत्ता भाडयाने देण्यातील अनियमितता.

गाळे भाडे.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता मनपा निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 78815.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 78815.00/-

प्रभाग समिती – अ, बोळींज विभागातील भाडयाने देण्यात आलेल्या तीन मालमत्तांची मागील थकबाकी तसचे चालू वर्षाच्या भाडयापोटी रुपये 78,815/- वसुल करण्यात आलेले नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेचे 2012-13 या वित्तीय वर्षातील गाळेभाडयांच्या अभिलेख्यांबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक: 95, दिनांक 27.8.2014 निर्गमित करण्यात आले होते. त्यानुसार मालमत्ता विभागाने जा.क्र. वविशम/गाळे विभाग/1372014, दिनांक 11.9.2014 अन्वये विहित नमुन्यात माहिती लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेख्यानुसार सदर प्रकरणांचे लेखापरीक्षण केले असता लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) विरार विभागातील मागणी नोंदवही नमुना क्रमांक: 81 ची पडताळणी केली असता महानगरपालिकेच्या एकूण 99 मालमत्ता असुन सदर मालमत्ता भाडेतत्वावर देण्यात आल्या असुन त्याबाबत महानगरपालिकेने केलेले करारनामे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

2) बोळींज विभागातील 15 मालमत्ता या भूतपूर्व ग्रामपंचायतीपासुन भाडेतत्वावर देण्यात आल्या असुन महानगरपालिकेने अदयाप कोणताही करारनामा केलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

3) बोळींज विभागातील मागणी नोंदवही नमुना क्रमांक: 81 ची पडताळणी केली असता भाडयाने देण्यात आलेल्या एकूण 15 मालमत्तांपैकी 05 मालमतांची मागील थकबाकी रुपये 60,475/- व चालू भाडयाची रक्कम रुपये 14,340/- अशी एकूण रक्कम रुपये 78,815/- असुन सदर रक्कम संबंधीतांकडून वसुल करण्यात आलेली नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 439 (2) प्रमाणे मागणी करण्यात आल्यावर रक्कम देण्यात आली नाही, तर येणे असलेल्या रक्कमेची वसुली मालमत्ता कराची रक्कम समजुन वसुल करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर रक्कम वसुलपात्र ठेवण्यात येत आहे. (सोबत विवरणपत्र जोडण्यात आलेले आहे.)

सदर बाबत मालमत्ता विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक: 177, दिनांक 7.11.2014 रोजी

वसई विरार मनपा

निर्गमित करण्यात आले असुन विभागाने उपायुक्त, पत्र क्रमांक: निरंक, दिनांक 27.11.2014 अन्वये अनुपालन सादर केले असुन सदर अनुपालनामध्ये बोळींज विभागातील 03 गाळेधारकांकडून गाळेभाडे घेण्याची तजवीज ठेवण्यात आली असल्याचे नमुद असुन सदर अनुपालन संयुक्तिक नाही.

(वसुलपात्र रक्कम रुपये 78,815/-)

DMASGDM7201 (Ref No : 119, Hmm No : 177)

48 पाणीपट्टी कर विभाग वसई प्रभागामधील अनियमितता

करनिर्धारण व संकलन

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : पाणीपटटी कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

वसई विरार शहर महापालिकेने 2011 च्या उपविधीनुसार मंजूर केलेल्या पाणीपटटी कराच्या दरांनुसार वसूली केली नाही. वसई नगर परिषदेच्या 2001 च्या ठरावानुसारचे दराने पाणीपटटी कराच्या रक्कमा वसूल केल्याने महापालिकेस आर्थिक नुकसान झाले आहे.

वसई विरार शहर महानगर पालिकेच्या पाणीपट्टी कराचे लेखापरीक्षणाच्या वेळी उपलब्ध करण्यात आलेल्या लेख्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 458(2), 459/460 नुसार वसई विरार शहर महानगर पालिका (पाणी पुरवठा व विशेष पाणीपट्टी) उपविधी, 2011 मंजूर करण्यात आले आहे. सदर उपविधी अंतर्गत पाणीपट्टी कर यांचे दर निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार महापालिका क्षेत्रामधील त्यासंबंधित आस्तित्वात असलेले सर्व नियम अधिक्रमित झालेले आहेत. असे असताना तत्कालीन वसई नगर परिषदेने केलेल्या ठराव क्रमांक 86 दिनांक 23/01/2001 नुसार वसई प्रभाग ई कडून पाणीपट्टी करांची वसूली करण्यात येत आहे. महापालिकेने निश्चित केलेल्या दरांपेक्षा वसई प्रभागामध्ये वसूली केलेले पाणीपट्टीचे दर खालीलप्रमाणे कमी आहेत. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

अ.क्र.	मालमत्तेचा प्रकार	सुधारीत उपविधीनुसार निश्चित करण्यात आलेले दर	वसूली केलेल्या पाणीपट्टीचे दर	तफावत
1	10 सदनिका पर्यंतची सोसायटी	रु120/- प्रती	रु100/- प्रती	रु.20/- प्रति

		सदनिका	सदनिका	सदनिका
2	आर.सी.सी. बंगला	रु.150/-	रु.125/-	रु.25/-
3	परमीट रुम	रु.3000/-	रु.1500/-	रु.1500/-
4	उपहार गृह	रु.3000/-	रु.1000/-	रु.2000/-
5	कँटीन	रु.3000/-	रु.500/-	रु.2500/-
6	कारखाने सर्व प्रकारचे	रु.3000/-	रु.1500/-	रु.1500/-
7	दुध डेअरी, आईस फॅक्टरी, मच्छिमार सोसायटी	रु.3000/-	रु.1500/-	रु.1500/-
8	हॉस्पिटल, नर्सिंग होम	रु.3000/-	रु.750/-	रु.2250/-
9	लग्न हॉल	रु.3000/-	रु.1000/-	रु.2000/-

वसई प्रभागाकडून नगरपरिषदेच्या 2001 च्या ठरावानुसारचे दराने पाणीपट्टी करांची वसूली करणे नियमबाहय आहे. यास्तव महापालिकेस मोठया प्रमाणावर आर्थिक तोटा झाला आहे. तसेच प्रभागामध्ये वरील प्रकारामध्ये समावेशित असलेल्या आस्थापनांचा तपशील उपलब्ध झाला नसल्याने याबाबत महापालिकेस होणाऱ्या आर्थिक नुकसानीची निश्चिती करता आली नाही. महापालिकेने मंजूर केलेल्या सन 2011 च्या उपविधीस पुढील कार्यवाही करण्याच्या दृष्टीने शासनाची मंजूरी घेण्याबाबतची कार्यवाही केली नाही.

या कामी लेखापरिक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.145, दि.17/10/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही.

DMEMRMM6801 (Ref No : 95, Hmm No : 145)

49 पाणीपटटी कराची वसूली मंजूर उपविधीनुसार न करणे

कर निर्धारण व संकलन

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : पाणीपटटी कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

वसई विरार शहर मनपातील प्रभाग अ विरार येथील पाणीपट्टीकरांची वसूली मंजूर करण्यात आलेल्या उपविधीनुसार केली नाही.

वसई विरार शहर मनपातील प्रभाग अ विरार येथील पाणीपट्टीकर विभागाचे लेखापरिक्षण केले असता उपलब्ध

झालेल्या लेख्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 458(2), 459,460 नुसार वसई विरार शहर महानगर पालिका (पाणी पुरवठा व विशेष पाणीपट्टी) उपविधी, 2011 मंजूर करण्यात आली आहे. सदर उपविधी अंतर्गत पाणीपट्टी कर यांचे दर निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार विशेष पाणीपट्टी दर भाग- एक नुसार निश्चित केलेल्या दरांपेक्षा विरार प्रभागामध्ये केलेल्या वसूलीचे दर कमी आहेत.

अ.क्र.	मालमत्तेचा प्रकार	उपविधीनुसार निश्चित करण्यात आलेले दर	वसूल करण्यात आलेले पाणीपट्टीचे दर	तफावत
1	परमिट रुम,लॉज,उपहारगृह,थिएटर, हॉटेल, सर्व्हिस सेंटर, लग्न्हॉल, डेअरी, हॉस्पिटल, नर्सिंग होम	रु.3000/- किमान किंवा रु.50/- प्रति हजार लीटर(मीटर नुसार) दरमहा यापैकी जे जास्त असतील ते	रु.1500/- किमान किंवा रु.25/- प्रति हजार लीटर(मीटर नुसार) दरमहा यापैकी जे जास्त असतील ते	रु.1500/-किमान किंवा रु.25/- प्रति हजार लीटर(मीटर नुसार) दरमहा
2	सर्व प्रकारचे कारखाने	रु.3000/- किमान किंवा रु.30/- प्रति हजार लीटर(मीटर नुसार) दरमहा यापैकी जे जास्त असतील ते	रु.1500/- किमान किंवा रु.15/- प्रति हजार लीटर(मीटर नुसार) दरमहा यापैकी जे जास्त् असतील ते	रु.1500/-किमान किंवा रु.15/- प्रति हजार लीटर(मीटर नुसार) दरमहा
3	व्यापारी संकुल/ खाजगी कार्यालये/ वाणिज्यिक आस्थापना	1) 1 ते 200 चौ.फुटापर्यंत रु.400/- किंवा रु.24/- प्रति हजार लीटर (मीटर प्रमाणे) प्रति मालमत्ता दरमहा	1) 1 ते 200 चौ.फुटापर्यंत रु.200/- किंवा रु.12/- प्रति हजार लीटर (मीटर प्रमाणे) प्रति मालमत्ता दरमहा	रु.200/- किमान किंवा रु.12 प्रति हजार लीटर (मीटर प्रमाणे)
		2) 200 चौ.फुटांहून अधिक परंतू 500 चौ.फुटांपर्यंत रु.800/- किमान किंवा रु.24/- प्रति हजार लिटर (मीटर प्रमाणे)प्रति मालमत्ता दरमहा	2)200 चौ.फुटांहून अधिक परंतू 500 चौ.फुटांपर्यंत रु.400/- किमान किंवा रु.12/- प्रति हजार लिटर (मीटरप्रमाणे) प्रति मालमत्ता दरमहा	रु.400/- किमान किंवा रु.12/- प्रति हजार लिटर(मीटरप्रमाणे)
		3)1001 चौ.फुटांहून अधिक परंतू 1600 चौ.फुटांपर्यंत रु.1600/- किमान किंवा रु.24/- प्रति हजार लीटर (मीटर	3)1001चौ.फुटांहून अधिक परंतू 1600चौ.फुटांपर्यंत रु.800/- किमान किंवा रु.12/- प्रति हजार लीटर	रु.800/- किमान किंवा रु.12/- प्रति हजार लीटर (मीटरप्रमाणे)

		प्रमाणे) प्रति मालमत्ता दरमहा	(मीटरप्रमाणे) प्रति मालमत्ता दरमहा	
4	शासकीय कार्यालय	रु.240/- किमान किंवा रु.16/- प्रति हजार लीटर	रु.120/- किमान किंवा रु.8/- प्रति हजार लीटर	रु.120/- किमान किंवा रु.8/- प्रति हजार लीटर

सन 2011 च्या उपविधीनुसार दर मंजूर करण्यात आल्यावर तद्नंतर कमी दराने वसूली केलेल्या पाणीपट्टीकराच्या ठरावाची साक्षांकित प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. तसेच प्रभागामध्ये वरील प्रकारामध्ये समावेशित असलेल्या आस्थापनांचा तपशील उपलब्ध झाला नसल्याने याबाबत महापालिकेस झालेल्या आर्थिक नुकसानीची निश्चिती करता आली नाही.

या कामी लेखापरिक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन क्र.146 दि.17/10/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विरार प्रभागाने कोणताही खुलासा केला नाही.

DMEMRMM6801 (Ref No : 96, Hmm No : 146)

50 जुन्या मालमत्तांच्या करांची थकबाकी रक्कम वसुली न केलेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 84537346.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 84537346.00/-

नालासोपारा प्रभाग हद्दीतील जुन्या इमारती, मालमत्ता मोडून त्याजागी नवीन इमारत, बांधकाम केले आहे, अशा जुन्या मालमत्तांच्या कराची प्रलंबित थकबाकी रक्कम रु. ८,४५,३७,३४६/- असून सदर थकबाकी रक्कमांची वसुली होत नसल्याने निर्लेखित करण्याचे प्रस्तावित आहे.

'क' नालासोपारा प्रभागाचे मालमत्ता कर विभागाचे लेखा परीक्षणात, प्रभाग हद्दीतील जुन्या इमारती, मालमत्ता मोडून त्याजागी नवीन इमारत, बांधकाम केले आहे, अशा जुन्या मालमत्तांच्या कराची प्रलंबित थकबाकी निर्लेखित करावयाच्या मालमत्ताची नस्ती तपासून अर्धसमास पत्र १०७ दिनांक ०६/०९/२०१४ अन्वये खालील मुद्यांबाबत विचारणा केली असता विभागाने याबाबत कोणताही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) 'क' नालासोपारा प्रभागाचे मालमत्ता कर विभागाचे लेखा परीक्षणात निर्लेखित करावयाच्या मालमत्ताची नस्ती व यादी तपासता एकूण १०१३ मालमत्तांची प्रलंबित कराची रक्कम रु.८,४५,३७,३४६/- (सोबत परिशिष्ट

जोडले आहे) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार निर्लेखित करावयाची असल्याचे दिसून आले. सदरची रक्कम ही नालासोपारा प्रभाग हद्दीतील जुनी मालमत्ता मोडून त्याजागी नवीन इमारत, बांधकाम केले आहे अशा जुन्या मालमत्तांच्या कराची प्रलंबित व चालू रक्कमेची आहे. जुनी मालमत्ता विकसित करताना मागील शिल्लक कराच्या थकबाकी रक्कमांची वसुली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १४० नुसार करणे आवश्यक होते. तथापि संबंधित मालमत्ता भोगवटा धारकांकडून कराच्या थकबाकी रक्कमांची वसुली वेळीच वसुल केली नसल्याने थकबाकी रक्कम दिवसेंदिवस वाढत आहे. तरी संबंधित मालमत्ताधारकांचा शोध घेऊन कराच्या थकबाकी रक्कमांची वसुली करावी.

DGPVTTM7001 (Ref No : 123, Hmm No : 107)

51 क प्रभाग नालासोपारा मालमत्ता कर विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 48350.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 48350.00/-

मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या नमुन्यांत ठेवले नाहीत. रामा अपार्टमेंट 'बी' विंग तुळींज १ या अनधिकृत इमारतीचे मालमता भोगवटादार शिव बहादूर रघुनाथसिंग यांचे प्रतिज्ञापत्रानुसार मालमत्ता दुकान या व्यापारी कारणासाठी इमारतीचा वापर करीत असताना इमारतीस वाणिज्य दराने कर आकारणी केली नाही. जी.एस.बी.कॉलनी, आचोळे-९ मालमत्ता क्र. ६१९ या अनधिकृत इमारतीची कर आकारणी तक्त्यात वर्ष २०११-१२ ची परिगणना केली आहे. परंतु प्रत्यक्षात कर आकारणी २०१२-१३ या वर्षाची केली आहे. कर आकारणीचे परिगणना तक्ते संबंधित प्रकरण मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याने/कर्मचाऱ्याने स्वाक्षरीत केलेले नाहीत. सदनिका, दुकाने, चाळीतील खोल्या यांची मोजमापे सर्वेक्षणात बरोबर असल्याची स्वाक्षरी करून प्रमाणित केलेली नाहीत.

प्रभाग कार्यालय क नालासोपारा कडील मालमत्ता कर विभागाचे लेखा परीक्षणात खालील मुद्यांबाबत अर्धसमास पत्र क्र. १०७ दिनांक ०६/०९/२०१४ अन्वये लेखी खुलासा विचारणा केला असता प्रभाग कार्यालयाने याबाबत कोणताही खुलासा केला नाही.

१) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

(१) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

(२) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

(३) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

(४) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

(५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

(६) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

(७) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

(८) परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

(९) परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

(१०) काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच याव्यतिरिक्त

(११) Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)

(१२) Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)

(१३) Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property & Other Taxes (नमुना P&OT-3)

(१४) Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि वरीलप्रमाणे प्रभागाचे लेखे विहित नमुन्यात ठेवल्याचे लेखा परीक्षणात आढळून आले नाही.

२) रामा अपार्टमेंट 'बी' विंग तुळींज १ या अनधिकृत इमारतीची कर आकारणी नस्ती तपासता असे दिसून आले की, सर्वेक्षण अहवालात निवासी रहिवास क्षेत्र १४४० चौ.फुट दर्शवून निवासी दराप्रमाणे कर आकारणी केली आहे. परंतु सदर इमारतीचे मालमता भोगवटादार शिव बहादूर रघुनाथसिंग यांचे दिनांक १/१०/२०१२ चे प्रतिज्ञापत्रानुसार ते दुकान या व्यापारी कारणासाठी वापर करीत असल्याचे तर सर्वेक्षण अहवालात रहिवास क्षेत्र निवास नमूद केले आहे. परंतु सदर इमारतीस वाणिज्य दराने कर आकारणी करणेत आली नाही. वाणिज्य दराप्रमाणे कराची आकारणी करून वसुली न केल्याने महानगरपालिकेचे रक्कम रु. १६८५६/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

३) जी.एस.बी.कॉलनी, आचोळे-९ मालमत्ता क्र. ६१९ या अनधिकृत इमारतीची कर आकारणी नस्ती तपासता असे दिसून आले की, संबंधित इमारतीच्या कर आकारणी तक्त्यात वर्ष २०११-१२ ची परिगणना केली आहे. परंतु प्रत्यक्षात कर आकारणी २०१२-१३ या वर्षाची केली आहे. त्यामुळे आर्थिक वर्ष २०११-१२ ची मालमत्ता कर रक्कमेची आकारणी होऊन मागणी नोंदवहीत नोंद करून वसुली केली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे वर्ष २०११-१२ ची कर आकारणी रक्कम रु.३१,४९४/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी रक्कम रु.

३१,४९४/- ची वसुली करणे आवश्यक आहे.

४) तसेच लेखा परीक्षणात वर्ष २०१२-१३ मध्ये कर आकारणी केलेल्या नस्तीचे लेखा परीक्षणात सर्वसाधारणपणे असे दिसून आले की, बहुतांशी अनधिकृत इमारतीना कर आकारणी केल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४ अन्वये विकास शुल्क व इतर करांची वसुली झालेली नाही. संबंधित इमारतींच्या मालक / बिल्डर यांचेवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ नुसार दंड आकारणे, ५३ नुसार अनधिकृत बांधकाम काढून टाकणे, ५४ अन्वये अनधिकृत बांधकाम बंद करणे, व ५७ अन्वये झालेल्या खर्चाची वसुली करणे अशी कारवाई केली नाही. कर आकारणीचे परिगणना तक्ते संबंधित प्रकरण मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याने/कर्मचाऱ्याने स्वाक्षरीत केलेले नाहीत. सदनिका, दुकाने, चाळीतील खोल्या यांची मोजमापे सर्वेक्षणात बरोबर असल्याची स्वाक्षरी करून प्रमाणित केलेली नाहीत. त्यामुळे केलेली कर आकारणी क्षेत्रफळानुसार बरोबर असल्याचे मानता येत नाही.

५) मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० मधील कलम ६ अन्वये लेखा परीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने अर्धसमास पत्र क्र. १०७ दिनांक ०६/०९/२०१४ अन्वये मालमत्ता हस्तांतरण प्रकरणाची नोंदवही लेखा परीक्षणात मागणी केली असता सदरची नोंदवही लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम २ अन्वये केलेले हस्तांतरण शुल्क वसुलीच्या कार्यवाहीबाबत खात्री करता आली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 124, Hmm No : 111)

52 मालमत्ता कराच्या थकीत रक्कमाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 317233133.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 317233133.00/-

महानगरपालिका क्षेत्रात मोकळया जमिनीवर कर लावला नसून मालमत्ता कराची मागणी वसुली व थकबाकी नोंदवही ठेवली नाही. मोबाईल टॉवर्स/मोकळ्या जमिनी/इमारती/मालमत्ता यांपोटी वित्तीय वर्ष २०११-२०१२ मध्ये कराची आकारणी करुन वसुली करावयाची असलेली एकूण प्रकरणे संख्या कर विभागाकडे नसून अशा प्रकरणांचे बाबत कर आकारणी/मागणी केलेली नाही. कर थकबाकीदारांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम ४२ ते ४८ नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे, लिलाव करणे इ—सारखी कामे महानगरपालिकेने केलेली नाहीत. कर वसूलीचे कामाबाबत वसुली, मागणी, थकबाकी, वाढ-घट केलेल्या प्रकरणांच्या नोंदी, कमी केलेल्या रक्कमा यांचा ताळमेळ

वसई विरार मनपा

विभागाकडून प्रभागनिहाय घेतला गेला नाही. धनादेशाद्वारे वसूल केलेल्या रकमांपैकी न वटलेले धनादेशात गुंतलेली रक्कम व महापालिका क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर थकीत रक्कम असलेल्या मालमत्ता धारकांची रक्कमेसह माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही.

वर्ष **२०१२-२०१३** चे लेखा परिक्षणात मालमत्ता कराच्या खालीलप्रमाणे रकमा थकित असल्याचे दिसून आले आहे.

अ.क्र.	थकित रकमेचा प्रकार	जमिनी/मालमत्ता मिळकती संख्या	थकित रक्कम रुपये
१	मोकळया जमिनीवरील कराच्या थकित रकमा	माहिती अप्राप्त	माहिती अप्राप्त
२	इमारती, घरे, मिळकती वरिल थकित रकमा	-	३१,७२,३३,१३३
३	मोबाईल टॉवर थकित रकमा	माहिती अप्राप्त	माहिती अप्राप्त
४	मनपा क्षेत्रातील मोकळया जमिनी/ मालमत्ता इमारती अदयाप आकारणी केली नाही. त्याची संख्या	माहिती अप्राप्त	माहिती अप्राप्त
एकुण			३१,७२,३३,१३३

वर्ष २०१२-१३ चे लेखा परिक्षणात मालमत्ता कराच्या थकीत रकमांबाबत अर्धसमास पत्र क्र. १९२ दिनांक ०९/१२/२०१४ अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) महानगरपालिका क्षेत्रात मोकळया जमिनीवर लावलेल्या मालमत्ता कराची मागणी वसुली व थकबाकी नोंदवही ठेवलेली नाही. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार लेखा परीक्षणास अभिलेखे, आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देणे बंधनकारक असताना अर्धसमास पत्र क्र. १९२ दिनांक ०९/१२/२०१४ अन्वये मोकळ्या जमिनी जागांची एकूण संख्या व थकबाकी रक्कमेची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. तसेच महानगरपालिकेने मोबाईल टॉवर्स, मोकळ्या जागा-जमिनी इत्यादींची थकबाकी रक्कमेची माहिती उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे महानगरपालिकेची कराची एकूण मागणी, वसुली, थकबाकीवर अभिप्राय देता येत नाही.

२) मोबाईल टॉवर्स/मोकळ्या जमिनी/इमारती/मालमत्ता यांपोटी वित्तीय वर्ष २०११-२०१२ मध्ये

कराची आकारणी करुन वसुली करावयाची असलेली एकूण प्रकरणे संख्या कर विभागाकडे नाही. मोबाईल टॉवर्स/मोकळ्या जमिनी प्रकरणांचे बाबत मोजमापे घेवून हरकती मागवून, बिले पाठविणे ही कामे विभागाने केली नसल्याने आकारणी /मागणी त्या त्या वित्तीय वर्षात झाली नाही असे दिसून आले. परंतू अशा मालमत्ताना कर आकारणी वेळीच न केल्याने मनपाचे उत्पन्नाचे महत्वाचे साधन असलेल्या कराच्या उत्पन्नापासून महापालिकेस वंचित रहावे लागले आहे.

३) मोबाईल टॉवर्सची कर आकारणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७(१)(अ) नुसार आकारणी करून प्रकरण क्रमांक ८ कराधान नियम ४२ ते ४८ नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे, लिलाव करणे अशा प्रकारची कार्यवाही महानगरपालिकेने केलेली नाहीत.

४) कर निर्धारक व संकलक यांनी लेखा परिक्षणांस सादर केलेल्या विवरणपत्रानुसार, अभिलेख्यानुसार सन २०१२-२०१३ करीता एकुण मागणी रक्कम रुपये ९५,२३,१८,२२९/- एकुण वसूली रुपये ६३,३६,३३,६८७/- एकुण थकबाकी रुपये ३१,७२,३३,१३३/- इतकी दर्शविली आहे. म्हणजेच वसूलीची टक्केवारी सुमारे ६६.५३% आहे. एकंदरीत वसूलीचे प्रमाण फारच कमी आहे. थकबाकीदारांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम ४२ ते ४८ नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे, लिलाव करणे इ–सारखी कामे महानगरपालिकेने केलेली नाहीत. कर वसुली संदर्भात अशी कारवाई न केल्याने वसुली थकीत राहिली आहे.

५) कर विभागात नोंदलेल्या मालमत्ता कमी करणे, संगणकांवर डिलीट करणे, त्यांत वाढ-घट करण्यांची कामे नेहमी केली जातात. ती अधिकृत असलेबाबत संबंधित नोंदवहीत (वाढ/घट नोंदवही) नोंदी केल्या जात नाहीत. वेळीच करदात्यांस देयके पाठविली जात नाहीत. एकंदरीत कर वसूलीचे कामाबाबत वसुली, मागणी, थकबाकी, वाढ-घट केलेल्या प्रकरणांच्या नोंदी, कमी केलेल्या रक्कमांचा ताळमेळ/साक्षांकन सक्षम प्राधिकारी यांनी महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ मधील नियम ७५(७) अन्वये घेणे आवश्यक असताना ते केले जात नाही. त्यामुळे एकंदरीतच कर विभागाचे कामकाजाबाबत Internal Checks, Internal Audit, Internal Control चा अभाव असून वसूलीचे प्रमाण फारच कमी आहे. या प्रकरणी महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधिल प्रकरण ८ कराधान नियम ४२ ते ४८ नुसार नोटीस पाठवणे, मालमत्ता ताब्यात घेणे/जप्त करणे, लिलाव करणे इ–सारखी योग्य ती कार्यवाही करून कर वसुलीचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे.

६) तसेच सन २०११-१२ अखेर मालमत्ता करापोटी धनादेशाद्वारे वसूल केलेल्या रकमांपैकी एकूण किती धनादेश न वटलेले होते व त्यात किती रक्कम गुंतलेली होती. याबाबतची माहिती व महानगरपालिका क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर थकीत रक्कम असलेल्या मालमत्ता धारकांची माहिती मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार अर्धसमास पत्र क्र.१९२ दिनांक ०९/१२/२०१४ अन्वये मागणी करूनही परीक्षणास उपलब्ध करून दिली नाही. सबब अशाप्रकारे एकूण थकीत असलेल्या मालमत्तांबाबत लेखा परीक्षणात अभिप्राय देता आले नाही.

53 'अ' प्रभाग विरार विभागाचे मालमत्ता कर लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितताबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 564108.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 564108.00/-

मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या नमुन्यांत ठेवले नाहीत. हरी गोविंद अपार्टमेंट व अहिर निवास या इमारतीस अनुक्रमे वर्ष २०११-१२, वर्ष २०११-१२ व २०१२-१३ ची मालमत्ता कराची आकारणी केली नाही. धनादेशाद्वारे स्विकारलेली रक्कम रु.५६४१०८/- च्या पावत्या संबंधित भोगवटाधारकास निर्गमित केल्या असताना पोटकिर्दीस संबंधित दिवशी जमा रक्कम शून्य दर्शविली आहे. अनधिकृत इमारतीच्या कर आकारणीबाबत मागणी, वसुली, थकबाकी नोंदवही लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७ नुसार मोकळ्या जागा-जमिनी, मोबाईल टॉवर्स इत्यादींवर कर आकारणी केली नाही.

१) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

(१) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

(२) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

(३) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

(४) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

(५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

(६) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

(७) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

(८) परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

(९) परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

(१०) काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच याव्यतिरिक्त

(११) Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)

(१२) Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)

(१३) Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property & Other Taxes (नमुना P&OT-3)

(१४) Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि वरीलप्रमाणे प्रभागाचे लेखे ठेवल्याचे लेखा परीक्षणात आढळून आले नाही. विभागाने याबाबत अर्धसमास पत्र क्र. १८६ दिनांक २९/११/२०१४ चे अनुषंगाने सादर केलेल्या पत्र क्र.२७६४ दिनांक १०/१२/२०१४ अन्वये महापालिका स्थायी समितीने आदेशित केल्यास त्याप्रमाणे लेखे ठेवण्यात येतील असे नमूद केले आहे. प्रत्यक्ष लेखे नमुन्यात ठेवले नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

२) हरी गोविंद अपार्टमेंट इमारतीस कर आकारणी साठी प्रणव कन्सट्रक्शन यांचा अर्ज महापालिकेत आवक क्रमांक ९३४० दिनांक २५/१०/२०११ अन्वये आला असताना मालमत्ता कराची आकारणी वर्ष २०११-१२ या वर्षापासून न करता वर्ष २०१२-१३ पासून केली आहे. तरी वर्ष २०११-१२ ची आकारणी करून रक्कम रु. २,४३,६४४/- ची वसुली करावी. विभागाने याबाबत अर्धसमास पत्र क्र. १८६ दिनांक २९/११/२०१४ चे अनुषंगाने सादर केलेल्या पत्र क्र.२७६४ दिनांक १०/१२/२०१४ अन्वये खात्री करून रक्कम वसुलीची कार्यवाही करण्यात येईल असे कळविले आहे. सबब आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

३) अहिर निवास इमारतीस वर्ष २०१२-१३ ची कर आकारणी केली आहे. विशालदिप कन्सट्रक्शन तर्फे शशी मिश्रा यांनी प्रतिज्ञापत्रात वर्ष २०१० मध्ये अनधिकृत बांधकाम केले असून ते खरेदीदारांस विकले आहेत. सबब वर्ष २०१०-११ व २०११-१२ या वित्तीय वर्षाची कर आकारणी करणे आवश्यक असताना केली नसल्याने वर्ष २०१०-११ व २०११-१२ या वर्षांची आकारणी करून रक्कम वसुली करावी. विभागाने याबाबत अर्धसमास पत्र क्र. १८६ दिनांक २९/११/२०१४ चे अनुषंगाने सादर केलेल्या पत्र क्र.२७६४ दिनांक १०/१२/२०१४ मध्ये खुलासा सादर केला नाही. सबब आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

४) माहे मार्च २०१२-१३ मधील माहे मार्च २०१३ या निवड महिन्यातील मालमत्ता कर वसुली जमा पावत्यांची पोटकिर्दीसोबत तपासणी केली असता धनादेशाद्वारे स्विकारलेली रक्कम रु.५६४१०८/- च्या पावत्या संबंधित भोगवटाधारकास निर्गमित केल्या आहेत. परंतु पोटकिर्दीस संबंधित दिवशी धनादेश न वटल्याने जमा रक्कम शून्य दर्शविली आहे ही कार्यपद्धती चुकीची आहे. संगणकीय प्रणालीत धनादेश रद्द नोंद करणेची सुविधा नसून संगणकीय प्रणालीतील मागणी नोंदवहीत तेवढ्या रक्कमेने संबंधित भोगवटाधारकाची मागणी रक्कम अधिक होण्याची सुविधा उपलब्ध नाही. विभागाने लेखा परीक्षणास मागणी नोंदवही उपलब्ध केली नाही त्यामुळे सदर धनादेशाद्वारे स्विकारलेली रक्कम रु.५६४१०८/- ची मागणी नोंदवहीत मागणी रक्कम कमी केली आहे किंवा कसे याबाबत लेखा परीक्षणात खात्री करता आली नाही. विभागाने अर्धसमास पत्र क्र. १८६ दिनांक २९/११/२०१४ चे अनुषंगाने सादर केलेल्या पत्र क्र.२७६४ दिनांक १०/१२/२०१४ मध्ये याबाबत खुलासा सादर केला नाही. सबब आक्षेप कायम ठेवण्यात

येत आहे.

५) तसेच लेखा परीक्षणात वर्ष २०१२-१३ मध्ये कर आकारणी केलेल्या नस्तीचे लेखा परीक्षणात सर्वसाधारणपणे असे दिसून आले की, बहुतांशी अनधिकृत इमारतीना कर आकारणी केल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४अ नुसार विकास कराच्या रक्कमा वसूल झाल्या नाहीत. संबंधित इमारतींच्या मालक / बिल्डर यांचेवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ नुसार दंड आकारणे, ५३ नुसार अनधिकृत बांधकाम काढून टाकणे, ५४ अन्वये अनधिकृत बांधकाम बंद करणे, व ५७ अन्वये झालेल्या खर्चाची वसुली करणे अशी कारवाई करण्यात आली नाही. कर आकारणीचे परिगणना तक्ते संबंधित प्रकरण मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याने/कर्मचाऱ्याने स्वाक्षरीत केलेले नाहीत. सदनिका, दुकाने, चाळीतील खोल्या यांची मोजमापे सर्वेक्षणात बरोबर असल्याची स्वाक्षरी करून प्रमाणित केलेली नाहीत. त्यामुळे केलेली कर आकारणी क्षेत्रफळानुसार बरोबर असल्याचे मानता येत नाही. विभागाने याबाबत अर्धसमास पत्र क्र. १८६ दिनांक २९/११/२०१४ चे अनुषंगाने सादर केलेल्या पत्र क्र.२७६४ दिनांक १०/१२/२०१४ मध्ये खुलासा सादर केला नाही. सबब आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

६) मागणी, वसुली, थकबाकी नोंदवही लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे वर्ष २०१२-१३ मध्ये वसुली केलेल्या रक्कमांचा, नवीन मालमत्ता कर आकारणी केलेल्या रक्कमांचा, मागील वित्तीय वर्षाची थकबाकी रक्कम व २०१२-१३ या वित्तीय वर्षाअखेर शिल्लक असलेल्या थकबाकी रक्कमांचा मेळ, तपासणी लेखा परीक्षणात करता आली नाही. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ अन्वये लेखा परीक्षणास अभिलेखे उपलब्ध करणे बंधनकारक आहे असे असताना विभागास अभिलेखे उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास पत्र क्र. १८६ दिनांक २९/११/२०१४ निर्गमित केले होते. त्यास अनुसरुन विभागाने सादर केलेल्या पत्र क्र.२७६४ दिनांक १०/१२/२०१४ मध्ये वर्ष २०१२-१३ ची मागणी वसुली थकबाकी नोंदवही ठेकेदाराकडून प्राप्त होताच उपलब्ध करण्यात येईल असे कळविले आहे. सबब आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

७) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७(१)(अ) मधील तरतुदीनुसार महापालिकेच्या अ प्रभाग बोळींज क्षेत्रातील मोबाईल टॉवर्स, मोकळ्या जागा-जमिनी इत्यादींवर कर आकारणी केली नसल्याने अधिनियमातील तरतुदींचे पालन केले नसल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. विभागाने याबाबत अर्धसमास पत्र क्र. १८६ दिनांक २९/११/२०१४ चे अनुषंगाने सादर केलेल्या पत्र क्र.२७६४ दिनांक १०/१२/२०१४ मध्ये नगररचना विभाग व अनधिकृत बांधकाम विभाग यांचेकडून माहिती प्राप्त करून कार्यवाही करण्यात येईल असे कळविले आहे. सबब आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

54 'अ' प्रभाग बोळींज विभागाचे मालमत्ता कर आकारणीत आढळून आलेल्या अनियमितताबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 369369.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 369369.00/-

इमारतींना मालमत्ता कर आकारणीत मागील वर्षांची कर आकारणी केली नाही. बहुतांशी अनधिकृत इमारतीना कर आकारणी केल्याने विकास कराच्या रक्कमा वसूल झाल्या नाहीत. संबंधित इमारतींच्या मालक/बिल्डर यांचेवर एमआरटीपी कायद्यान्वये अनधिकृत बांधकामासाठी कारवाई केली नाही. कर आकारणीचे परिगणना तक्ते संबंधित प्रकरण मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याने/कर्मचाऱ्याने स्वाक्षरीत केलेले नाहीत. सदनिका, दुकाने, चाळीतील खोल्या यांची मोजमापे सर्वेक्षणात बरोबर असल्याची स्वाक्षरी करून प्रमाणित केलेली नाहीत. अनधिकृत इमारतीना कर आकारणी केल्याने महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४ अन्वये मिळणारे उत्पन्न विकास शुल्क व इतर करांच्या रक्कमा वसूल झाल्या नाहीत. मोकळ्या जागा-जमिनी, इमारतीवरील मोबाईल टॉवर्स इत्यादींवर कर आकारणी केल्याची माहिती उपलब्ध झाली नाही.

अ' प्रभाग बोळींज विभागाचे मालमत्ता कर आकारणीत खालीलप्रमाणे कमी कर आकारणी केल्याचे आढळून आले आहे. त्याबाबत अर्धसमास पत्र क्र.१८५ दिनांक २८/११/२०१४ अन्वये कळविले असता प्रभाग कार्यालयाने/विभागाने त्याबाबत कोणताही खुलासा केला नसल्याने खालील आक्षेप लेखा परीक्षणात कायम ठेवण्यात येत आहेत.

१) विकासक शिवसाई बिल्डींग & डेव्हलपर्स यांच्या याज्ञी अपार्टमेंट या इमारतीच्या सदनिकांना वर्ष २०१२-१३ या वर्षाचा मालमत्ता कर आकारणी केला आहे. संबंधित आकारणी नस्तीतील सर्वेक्षण अहवालात इमारतीचा वापर सुरु झाल्याचे वर्ष २०११-१२ आहे तर टिप्पणीत वर्ष २०११-१२ उपरीलेखनाने २०१२-१३ केले आहे त्यामुळे वर्ष २०११-१२ ची कर आकारणी केलेली नाही. तरी वर्ष २०११-१२ ची कर आकारणी रक्कम वसुलीची कार्यवाही करावी.

२) वार्ड क्र.३ मालमता क्रमांक ३०४ अमिना रियाज शेख यांचे वाणिज्य गाळ्यास वर्ष २०१२-१३ या वर्षाची कर आकारणी केली आहे. त्यांचे प्रतिज्ञापत्रात सदर बांधकाम वर्ष २०११ मध्ये केल्याचे नमूद असल्याने कर आकारणी वर्ष २०११-१२ पासून करणे आवश्यक होते. तथापि तसे केले नसल्याने वर्ष २०११-१२ ची कर आकारणी रक्कम रु. २८१/- ची वसुली करावी.

३) वार्ड क्र.३ मालमता क्रमांक ३०२/२ अब्दुल हमीद युनुसमिया शेख यांचे वाणिज्य गाळ्यास वर्ष २०१२-१३ या वर्षाची कर आकारणी केली आहे. त्यांचे प्रतिज्ञापत्रात सदर बांधकाम वर्ष २०११ मध्ये केल्याचे नमूद असल्याने कर आकारणी वर्ष २०११-१२ पासून करणे आवश्यक होते. तथापि तसे केले नसल्याने वर्ष २०११-१२ ची कर

आकारणी रक्कम रु. ४२८/- ची वसुली करावी.

४) विश्वनाथ मधुकर भोईर यांचे झोपडीस वर्ष २०१२-१३ या वर्षाची कर आकारणी केली आहे. त्यांचे अर्जात ते कायमचे रहिवासी असून मागील २५ वर्षापासून राहत असल्याने महानगरपालिका स्थापना वर्षापासून कर आकारणी करावी.

५) किरण सुधाकर चौधरी वार्ड क्र.५ मालमत्ता क्रमांक ३४३ यांचे झोपडीस वर्ष २०१२-१३ या वर्षाची कर आकारणी केली आहे. त्यांचे दिनांक १३/०९/२०१२ चे अर्जात ते कायमचे रहिवासी असून मागील २० वर्षापासून राहत असून मागील कित्येक वर्षे कर आकारणी मंजूर झाली नाही असे नमूद आहे. तरी मागील वर्षांची कर आकारणी रक्कम वसुली केली नाही. तरी महानगरपालिका स्थापना वर्षापासून कर आकारणी करून वसुली करावी.

६) सिल्वस्टा लुईस परेरा व इतर वार्ड क्र. १ मालमत्ता क्र. २६३ यांचे दिनांक १८/०४/२०१२ चे अर्जानुसार घराचे क्षेत्रफळ ३० X २० = ६०० चौ. फुट असताना कर आकारणी ४०० फुट क्षेत्रफळास केली आहे. सर्वेक्षण अहवालात संबंधित कर्मचाऱ्याने तपासणीनंतरचे क्षेत्रफळ नमूद केले नाही. तरी अतिरिक्त २०० चौ.फुटाची कर आकारणी रक्कम रु. ३००/- वसुली करावी.

७) सुरज मधुकर जाबर वार्ड क्र.५ मालमत्ता क्रमांक ३४२ यांचे झोपडीस वर्ष २०१२-१३ या वर्षाची कर आकारणी केली आहे. त्यांचे अर्जात ते कायमचे रहिवासी असून मागील २५ वर्षापासून राहत असून मागील कित्येक वर्षे कर आकारणी मंजूर झाली नाही असे नमूद आहे. तसेच सोबत प्रतिज्ञापत्र मुद्रांक पेपर कोरा जोडला आहे. तरी मागील वर्षांची कर आकारणी रक्कम वसुली केली नसल्याने महानगरपालिका स्थापना वर्षापासून कर आकारणी करून रक्कम वसुली करावी.

८) शेरली क्रझीना कार्मोजॉनी मेडिस वार्ड क्र.३ मालमत्ता क्र. २९४ यांनी त्यांचे दिनांक ०७/०७/२०१२ चे अर्जात वर्ष २००० साली ग्रिनफिल्ड बंगला क्र. ८ खरेदी केला त्याची कर आकारणी झालेली नाही असे नमूद केले आहे त्यासोबत दिनांक ०९/११/२००० चे खरेदीखत जोडले आहे. असे असताना मागील वर्षांची कर आकारणी रक्कम वसुली केली नाही. तरी महानगरपालिका स्थापना वर्षापासून कर आकारणी रक्कम वसुली करावी.

९) विकासक मेफेअर हौसिंग यांच्या अबोली, सनफ्लावर, तुळीप, व झिनिया या ४ अधिकृत इमारतीच्या २०० सदनिकांना वर्ष २०१२-१३ पासून कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०११-१२ मध्ये क्र.VVCMC/TP/OC/VP-0179/114/2011-12 दिनांक १४/०२/२०१२ अन्वये निर्गमित केले असल्याने वर्ष २०११-१२ मधील तिमाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने रक्कम रु. २७८३१/- ची वसुली करावी.

१०) विकासक विवा वृंदावन बिल्डर्स यांच्या क्रिष्णा गार्डन/ क्रिष्णा रेसिडेन्सी या अधिकृत इमारतीच्या शॉप ८ व ३७१ सदनिकांना वर्ष २०११-१२ पासून कर आकारणी करण्यास टिप्पणीत मंजुरी प्राप्त केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०१०-११ मध्ये क्र. VVCMC/TP/OC/VP-0388/W/229 दिनांक २९/०३/२०११ अन्वये निर्गमित केले असल्याने वर्ष २०११-१२ मधील वार्षिक कराची आकारणी मागणी नोंदवहीत नोंद करून वसुली करणे आवश्यक असताना मागणी नोंदवहीत वर्ष २०१२-१३ ची आकारणी नोंदवून वसुली केली आहे. तरी वर्ष २०११-१२ ची कर आकारणी रक्कम रु.२२६५७८/- ची वसुली करावी.

११) विकासक विनय युनिक कन्सट्रक्शन यांच्या विनय युनिक रेसिडेन्सी वार्ड क्र. ६ मालमत्ता क्र. २११ या अधिकृत इमारतीच्या शॉप गाळे १६ व २८ सदनिकांना वर्ष २०१२-१३ पासून कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०११-१२ मध्ये क्र.VVCMC/TP/OC/VP-0607/545/2011-12 दिनांक २८/०२/२०१२ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०११-

१२ मधील तिमाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने रक्कम रु. ४६३६/- ची वसुली करावी.

१२) विकासक पूनम आदिनाथ इन्फ्रा यांच्या पूनम ऑरा वार्ड क्र.३ मालमत्ता क्रमांक २९५ या अधिकृत इमारतीचे ८ वाणिज्य गाळे, १०१ सदनिका व २ रो हाउस यांना वर्ष २०१२-१३ पासून कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०११-१२ मध्ये महापालिकेने क्र.VVCMC/TP/POC/VP-0758/535/2011-12 दिनांक ०८/०२/२०१२ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०११-१२ मधील तिमाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने रक्कम रु. १४६८३/- ची वसुली करावी.

१३) वार्ड क्र. २ मालमत्ता क्र. २१६ प्रशांत सुरेश चव्हाण व मालमत्ता क्र. २१७ प्रसाद मुरलीधर लडबे यांच्या अधिकृत बंगल्यांना वर्ष २०१२-१३ पासून कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०११-१२ मध्ये क्र. VVCMC/TP/OC/VP-0080/618/2011-12 दिनांक ३०/०३/२०१२ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०११-१२ मधील तिमाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने दोन्ही बंगल्यांची एकूण रक्कम रु. ८४६/-(४६८+३७८) ची वसुली करावी.

१४) विकासक चावरे असोसिएट्स यांच्या सफल-१ वार्ड क्र.३ मालमत्ता क्रमांक २९३ या अधिकृत इमारतीचे ७ वाणिज्य गाळे, २८ सदनिका यांना वर्ष २०१२-१३ पासून कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०११-१२ मध्ये महापालिकेने क्र.VVCMC/TP/OC/VP-0629/599/2011-12 दिनांक २८/०३/२०१२ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०११-१२ मधील तिमाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने रक्कम रु. ४१३६/- ची वसुली करावी.

१५) विकासक विनय युनिक कन्सट्रक्शन यांच्या विनय युनिक रेसिडेन्सी इमारत क्र. २ व ३ वार्ड क्र. ६ मालमत्ता क्र. २०९ व २१० या अधिकृत इमारतीच्या शॉप गाळे २१ व ९८ सदनिकांना वर्ष २०१२-१३ पासून कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०११-१२ मध्ये क्र.VVCMC/TP/OC/VP-0607/545/2011-12 दिनांक २८/०२/२०१२ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०११-१२ मधील तिमाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने इमारत क्र. २ ची रक्कम रु. ८०७६/- व इमारत क्र. ३ ची रक्कम रु. १०६४२/- ची वसुली करावी.

१६) विकासक महालक्ष्मी इंटरप्रायजेस यांच्या श्री विनायक अपार्टमेंट वार्ड क्र. ७ मालमत्ता क्र. २६४ या अधिकृत इमारतीच्या २५ सदनिकांना वर्ष २०१२-१३ पासून कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०११-१२ मध्ये क्र.VVCMC/TP/POC/VP-0849/491/2011-12 दिनांक १७/०१/२०१२ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०११-१२ मधील तिमाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने कर आकारणीची रक्कम रु. ३८१०/- ची वसुली करावी.

१७) विकासक ओम डेव्हलपर्स यांच्या गोकुळ सॉलीटेअर वार्ड क्र. ६ मालमत्ता क्र. २१३ या अधिकृत इमारतीच्या १०० सदनिकांना व २ रो हाउस चे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०११-१२ मध्ये क्र. VVCMC/TP/POC/VP-0369/367/2012-13 दिनांक २६/१२/२०१२ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०१२-१३ मधील सहामाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने कर आकारणीची रक्कम रु. १६६०५/- ची वसुली करावी.

१८) विकासक मे. सुरभि डेव्हलपर्स यांच्या गोकुळ सफायर या इमारतीस व सुरभि रो हाउस वार्ड क्र. ६ मालमत्ता क्र. २०६, २०७, २०८ या अधिकृत इमारतीचे ३३ गाळे, ६४ सदनिकांना व २ बंगले यांना वर्ष २०१२-१३ ची कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०११-१२ मध्ये क्र. VVCMC/TP/POC/BP-362,3357,3393/VP-0369/W/2011-12 दिनांक २५/११/२०११ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०११-१२ मधील सहामाही कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने कर आकारणीची रक्कम रु. १७०२३/- ची वसुली करावी.

१९) विकासक मे. परिवार बिल्डर्स & डेव्हलपर्स यांच्या साई उपहार या अधिकृत इमारतीतील गाळा क्र. ८ वार्ड क्र. ७ मालमत्ता क्र. २२८/३६ या गाळ्याला वर्ष २०१२-१३ ची कर आकारणी केली आहे. सदर इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २०१०-११ मध्ये क्र. CIDCO/VVSR/POC/BP-3486/W/331 दिनांक २०/०५/२०१० अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत असल्याने वर्ष २०१०-११ व २०११-१२ या २ वर्षांची मालमत्ता कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने कर आकारणीची रक्कम रु. ३९६/- ची वसुली करावी.

२०) मनिषा माधव कल्याणकर, विष्णू पार्क-४ वार्ड क्र.७ मालमता क्रमांक ६५/२५ यांचे सद्निकेस वर्ष २०१२-१३ पासुन कर आकारणी केली आहे. सदर इमारतीस सिडकोने त्यांचे भोगवटा प्रमाणपत्र वर्ष २००३-०४ मध्ये क्र. CIDCO/VVSR/POC/BP-2231/W/2240 दिनांक ०५/०२/२००४ अन्वये निर्गमित केले असल्याने तेव्हापासून इमारत रहिवास व्याप्त होत आहे. परांजपे बिल्डर्स यांचे दिनांक २१/०९/२००९ चे ताबा पत्रान्वये सदनिकेचा ताबा २१/०९/२००९ रोजी दिला असल्याने वर्ष २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या ३ वर्षांची मालमत्ता कराची आकारणी करणे आवश्यक असताना ती केली नसल्याने कर आकारणीची एकूण रक्कम रु. १८००/- ची वसुली करावी.

२१) वार्ड क्र.३ मालमत्ता क्रमांक ३००/७ मोहन ज्योतिबा कोळेकर यांच्या सद्निकेस वर्ष २०१२-१३ या वर्षाची कर आकारणी केली आहे. श्री साई बिल्डर & डेव्हलपर्स यांनी त्यांचे दिनांक ०१/०५/२०११ चे पत्रान्वये सदनिकेचा ताबा दिला आहे. त्यामुळे वर्ष २०११-१२ या वर्षाची कर आकारणी करून वसुली करणे आवश्यक असताना तसे केले नाही. तरी वर्ष २०११-१२ ची मालमत्ता कराची रक्कम रु.१४३०/- ची वसुली करावी.

२२) वार्ड क्र.३ मालमत्ता क्रमांक ३००/१७ जशोदा मणिलाल वाघेला, ओम साई विहार-१ या अनधिकृत इमारतीतील त्यांच्या सद्निकेस वर्ष २०१२-१३ या १ वर्षाची कर आकारणी केली आहे. त्यांनी बिल्डर यांचेसोबत खरेदी करारनामा दिनांक ०१/१०/२०१० रोजी केला आहे. त्यामुळे वर्ष २०१०-११ व २०११-१२ या वर्षाची कर आकारणी करून वसुली करणे आवश्यक असताना तसे केले नाही. तरी वर्ष २०१०-११ व २०११-१२ या २ वर्षांची मालमत्ता कराची रक्कम रु.३६६४/- ची वसुली करावी.

२३) वार्ड क्र.७ विष्णू पार्क मालमत्ता क्रमांक ६६/६९ विणा राजेश कुलकर्णी, मालमत्ता क्रमांक ६६/३३ व ३४ सपना अमर राऊत व सुमित पटकुरे, मालमत्ता क्रमांक ६६/३५ विणा राजेश कुलकर्णी या अधिकृत इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र सिडकोचे क्र. CIDCO/VVSR/POC/BP/२२३१/W/२२४० दिनांक ०५/०२/२००४ अन्वये दिला असून सदर दिनांकापासून मालमत्ता रहिवास व्याप्त होतात. परंतु सदर मालमत्तांना वर्ष २०१२-१३ या १ वर्षाची कर आकारणी केली आहे. मागील वर्षांची कर आकारणी केली नसल्याने महानगरपालिका स्थापनेपासून कराची थकबाकी रक्कम वसुली करावी.

२४) वार्ड क्र.३ अनधिकृत मालमत्ता क्रमांक ३००/१६ महम्मद रफिक एन अन्सारी सदनिका क्र. ३०४ यांचा कर आकारणीचा अर्ज ०१/११/२०१२ चा असून खरेदी करारनामा दिनांक ०७/१०/२०१० चा आहे असे असताना २०१२-

१३ या १ वर्षाची कर आकारणी केली आहे. मागील वर्षांची कर आकारणी रक्कम वसुली केली नाही. तरी वर्ष २०१०-११ व २०११-१२ या वर्षांची कराची रक्कम रु.३५०८/- वसुली करावी.

२५) वार्ड क्र.३ अनधिकृत मालमत्ता क्रमांक ३०१/५ समिरा बलदिश सावंत, ओम साई विहार-२, सदनिका क्र. ४०१ यांचा खरेदी करारनामा दिनांक ०३/०५/२०११ चा आहे असे असताना २०१२-१३ या १ वर्षाची कर आकारणी केली आहे. मागील वर्षांची कर आकारणी केली नाही, तरी वर्ष २०११-१२ या वर्षांची कराची रक्कम रु. १०३४/- ची वसुली करावी.

२६) विकास महावीर असोसिएट्स यांनी महावीर प्लाझा या इमारतीस कर आकारणी करणेचा अर्ज दिनांक २४/०२/२०११ रोजीचा असून कार्यालयाचा आवक क्रमांक ४०६३ दिनांक २१/०३/२०११ हा आहे. नस्तीतील कर आकारणी सर्वेक्षण अहवालात इमारतीचा वापर सुरु झाल्याचे वर्ष २०१०-११ नमूद केले आहे. महापालिकेकडे कर आकारणी अर्ज प्राप्त झाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र उशिराने म्हणजे दिनांक २८/०३/२०१३ चे आहे. अशा वेळी वापर सुरु केल्याचे वर्ष २०१०-११ व २०११-१२ या दोन वर्षांची शास्तीसह कर आकारणी करणे आवश्यक होते. तथापि तसे केलेले नसून २०१२-१३ या वर्षाची कर आकारणी केली आहे. तरी सदरच्या २ वर्ष २०१०-११ व २०११-१२ ची कर आकारणीची रक्कम रु.२९७३८/- ची वसुली करावी.

२७) तसेच लेखा परीक्षणात वर्ष २०१२-१३ मध्ये कर आकारणी केलेल्या नस्तीचे लेखा परीक्षणात सर्वसाधारणपणे असे दिसून आले की, बहुतांशी अनधिकृत इमारतीना कर आकारणी केल्याने महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४ अन्वये मिळणारे उत्पन्न विकास शुल्क व इतर करांच्या रक्कमा वसूल झाल्या नाहीत. संबंधित इमारतींच्या मालक/बिल्डर यांचेवर एमआरटीपी कायद्यान्वये अनधिकृत बांधकामासाठी कारवाई केली नाही. कर आकारणीचे परिगणना तक्ते संबंधित प्रकरण मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याने/कर्मचाऱ्याने स्वाक्षरीत केलेले नाहीत. सदनिका, दुकाने, चाळीतील खोल्या यांची मोजमापे सर्वेक्षणात बरोबर असल्याची स्वाक्षरी करून प्रमाणित केलेली नाहीत. त्यामुळे केलेली कर आकारणी क्षेत्रफळानुसार बरोबर असल्याचे मानता येत नाही.

२८) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२९ व १३२ मधील तरतुदीनुसार मोकळ्या जागा-जमिनी, इमारतीवरील मोबाईल टॉवर्स इत्यादींवर कर आकारणी करणे आवश्यक आहे. तथापि महानगरपालिकेच्या अ प्रभाग बोळींज क्षेत्रात मोकळया जमिनीवर लावलेल्या मालमत्ता कराची आकारणी, मागणी वसुली व थकबाकी नोंदवही ठेवली नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे अ प्रभागातील मोकळ्या जमिनी-जागा, त्यांची एकूण संख्या व आकारणी, वसुली व थकबाकी रक्कमेची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 141, Hmm No : 185)

55 जाहिरात कराबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : जाहिरात मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

वसई विरार मनपा

गुंतलेली रक्कम रु. 4362590.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4362590.00/-

महानगरपालिका क्षेत्रात पाच प्रभाग आहेत. जाहिरात कराचे दर पुर्वीच्या नगर परिषदांनी मंजूर केल्यानुसार आहेत. ते प्रभागनिहाय भीन्न आहेत. महानगरपालिका अस्तीत्वात आल्यापासुन त्या सुधारणा केली नाही.

महाराष्ट्र शासन राजपत्र भाग 1 मध्ये उपविभाग नगरविकास विभाग दि. 3/7/2009 अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिका स्थापन झाली असून त्यात 4 नगरपरिषदां व 53 गावे समाविष्ट केली आहेत असे दिसून येते. तत्कालीन चार नगरपरिषदांनी स्थायी समितीच्या मंजुरीने ठरविल्या दरानेच महापालिका अस्तित्वात आल्यानंतरही जाहिरात कराची वसुली केली जात आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.181, दिनांक 21/11/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. विभागाचा खुलासा अप्राप्त.

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यांत येत आहेत.

1. वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात विरार, वसई गाव, नालासोपारा व नवघर-माणिकपुर या प्रभागात तत्कालीन नगरपरिषदांच्या स्थायी समितीने मंजूरी दिलेल्या दराने जाहिरात कराची आकारणी करण्यांत येत आहे. जाहिरात कराचे दर प्रभागनिहाय भिन्न भिन्न आहेत. त्यात एकसमानता नाही. म्हणजे महानगरपालिका दिनांक 3/7/2009 पासुन अस्तित्वात येवूनही 2012-13 पर्यंत जाहिरात कराचे दर भिन्न भिन्न आहेत.

2. मुंबई प्रांतिक अधिनियम, 1949 मधील कलम 245 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 2011 नुसार जाहिरात कर लावुन त्याचे दर ठरविण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत. परंतु तशी कार्यवाही महानगरपालिकेने केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होत आहे.

DATBBPM6301 (Ref No : 111, Hmm No : 181)

56 विरार पूर्व व पश्चिम आठवडे बाजार व दैनंदिन बाजार फी वसुली ठेका लिलावाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बाजार कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

वसूलपात्र रक्कम रु. 17400.00/-

आठवडे बाजार व दैनंदिन बाजार फी वसुली ठेका निविदा प्रसिध्दीस तीन आठवडयाचा पुरेसा कालावधी दिला नाही. तीनपैकी दोन निविदाधारक हे एकच असल्याचे लेटरहेडवरील फोन नंबर वरुन दिसून आले. करारनाम्यासाठी रक्कम रुपये ७,१००/- इतका मुद्रांक शुल्क कमी वापरले आहे. करारनाम्यावर महापालिकेचा शिक्का ठसवून स्थायी समितीचे दोन सदस्यांची स्वाक्षरी घेतली नाही. लिलाव रक्कमा नियत दिनांकास

म्हणजे विहीत मुदतीत भरणा केल्या नसल्याने विलंब दिवस २ ते ३१ दिवसांची विलंब दंड रक्कम रुपये १७,४००/- ची वसुली केली नाही.

बोळींज प्रभाग समितींतर्गत विरार पूर्व व पश्चिम आठवडे बाजार व दैनंदिन बाजाराचा वसुली ठेका लिलाव पध्दतीने मागील वर्षाच्या बोली रक्कम रुपये ९०.०० लक्षवर १० टक्के रक्कम वाढ करुन लिलावाची अंदाजित रक्कम ठरवून निविदा मागविली आहे. निविदा विक्री कालावधी दिनांक ११/०५/२०१२ ते १७/०५/२०१२ होता. सदर कालावधीत एकुण तीन निविदा (१) सिमरन एंटरप्रायजेस, भाईंदर (२) रॅचेल ट्रेडींग कंपनी, भाईंदर व (३) सुनिल राजाराम येवले, भाईंदर प्राप्त झाल्या. सदर प्राप्त निविदांपैकी सर्वोत्तम जादा दराची मे. १) सिमरन एंटरप्रायजेस, भाईंदर रुपये ९९.०९ लक्ष स्थायी समिती ठराव क्रमांक २७१, दिनांक ०६/०६/२०१२ अन्वये मंजुर करुन कार्यादेश क्रमांक वविशम/ बाजार/१८८/१२-१३, दिनांक ०६/०६/२०१२ अन्वये दिला. सदर निविदा प्रक्रिया व बाजार लिलाव ठेक्याबाबत आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्रमांक १४२, दिनांक ०९/१०/२०१४ अन्वये विचारणा केली असता विभागाने कोणताही खुलासा केला नाही. सबब, लेखापरीक्षणात खालील अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1. शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक भाखंस-१०८८/(२५१२)/उदयोग-६, दिनांक ०२/०१/१९९२ मधील तरतुदीनुसार निविदा प्रक्रियेसाठी निविदा सुचना प्रसिध्दी कालावधी किमान तीन आठवडे देण्याचा असतांना प्रत्यक्षात एकच आठवडा दिल्याने निविदा प्रसिध्दीस पुरेसा कालावधी दिला नाही.
2. सिमरन एंटरप्रायजेस, भाईंदर व रॅचेल ट्रेडींग कंपनी, भाईंदर यांनी निविदा फॉर्म मागणी केलेल्या लेटरहेडवर फोन नं.२८१४३२४५ हा दोन्ही लेटरहेडवर एकच आहे. त्यामुळे दोन्ही निविदाकार हे आपापसात एकच असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर निविदा प्रक्रियेत पुरेशी व पारदर्शी स्पर्धा झाली नसुन किंबहुना सदर निविदा प्रक्रियेत त्यांनी भरलेले दर हे संगनमताने भरले असल्याचे शक्यता आहे.
3. मुद्रांक शुल्क अधिनियमानुसार सदर ठेक्याचा करारनामा करण्यासाठी रक्कम रुपये ९,१००/- इतक्या रकमेचा मुद्रांक पेपर वापरण्याचा असतांना रक्कम रुपये २,०००/- इतक्या रकमेच्या मुद्रांक पेपरवर करारनामा केला आहे. तरी कमी वापरलेले मुद्रांक शुल्क फरक रक्कम रुपये ७,१००/- संबंधितांकडून वसुल करुन शासन खाती भरणा करावी.
4. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ५ मधील नियम १(२) नुसार करारनाम्यावर महापालिकेचा शिक्का ठसवून स्थायी समितीचे दोन सदस्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केली नाही.
5. करारनाम्यातील अट क्रमांक ५ नुसार मंजुर निविदाकाराने लिलाव रकमेच्या २५% रक्कम रुपये २४,७७,२५०/- दिनांक ०७/०६/२०१२ पर्यंत व उर्वरित ७५% रक्कम रुपये ८,२५,७५०/- च्या ९ समान हप्त्यात प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेच्या आत भरणा करावयाची होती. तथापि सदर रक्कमा विहीत मुदतीत भरणा केल्या नसल्याने अटी व शर्तीनुसार प्रतिदिन रुपये २००/- प्रमाणे एकूण ८७ दिवसांची एकूण दंडनीय रक्कम रु.१७,४००/- ची वसुली करणे आवश्यक असताना वसुली केली नाही. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

पावती क्रमांक	दिनांक	भरणा रक्कम	भरणा नियत दिनांक	विलंब दिवस	दंड रक्कम
238311	05/07/2012	2477250	07/06/2012	31	6200

वसई विरार मनपा

238312	07/07/2012	825750	05/07/2012	02	400
238313	16/08/2012	825750	05/08/2012	11	2200
238314	11/09/2012	825750	05/09/2012	06	1200
238315	10/10/2012	825750	05/10/2012	05	1000
238316	10/11/2012	825750	05/11/2012	05	1000
238317	10/12/2012	825750	05/12/2012	05	1000
238318	11/01/2013	825750	05/01/2013	06	1200
238319	14/02/2013	825750	05/02/2013	09	1800
238320	12/03/2013	825750	05/03/2013	07	1400
	एकुण	**9909000**			**17400**

तरी वरीलप्रमाणे विलंबाने भरणा केल्याबाबतची दंडनीय रक्कम रुपये १७,४००/- संबंधीत ठेकेदार मे. सिमरन एंटरप्रायजेस, भाईंदर यांचेकडून वसुल करावी.

DGPVTTM7001 (Ref No : 145, Hmm No : 142)

57 खर्च प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्याबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :अनधिकृत बांधकामे तोड मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 1801778.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1801778.00/-

अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण विभागाचे लेखा परीक्षणात विभागांतर्गत केलेल्या खर्चाची रक्कम रु. १८,०१,७७८/- मुळ प्रमाणके मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार लेखा परीक्षणास सादर करणे बंधनकारक असताना मागणी करूनही प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण नियंत्रण विभागाचे लेखा परीक्षणात अर्धसमास पत्र क्र. ७३ दिनांक ११/०८/२०१४ व ८७ दिनांक २२/०८/२०१४ अन्वये प्रमाणके लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून देणेबाबत मागणी करण्यात आली होती. सदर प्रमाणकांपैकी खालील रक्कम रु. १८,०१,७७८/- ची मुळ प्रमाणके लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिली नाहीत. व विभागाने याबाबत कोणताही खुलासा सादर केला नाही.

प्रमाणक	दिनांक	कोणास प्रदान	प्रभाग समिती	रक्कमेचा तपशिल	रक्कम रु.

क्र.					
19	12/04/2012	श्री. समर्थ एंटरप्रायझेस	प्रभाग समिती (ब)	व्हिडिओ चित्रिकरण पेल्हार येथील अतिक्रमण निष्कासित करतांना केलेल्या व्हिडिओ चित्रिकरण	36980/-
319	16/05/2012	कमल ट्रेडिंग कं.	प्रभाग समिती (अ)	अतिक्रमण हटविणे, अनधिकृत बांधकाम तोडणेसाठी वाहन भाडे व इतर खर्च मोठी घण खरेदी देयक दि. 29/03/2011	49500/-
632	01/06/2012	आकाश एंटरप्रायझेस	प्रभाग समिती (ड)	अतिक्रमण हटविणे, अनधिकृत बांधकाम तोडणेसाठी वाहन भाडे व इतर खर्च दि. 29/03/2011 चहा पाणी व कॉफी व्यवस्था देयक	2490/-
774	13/06/2012	श्री. समर्थ एंटरप्रायझेस	प्रभाग समिती (क)	फोटोग्राफी व व्हिडिओ चित्रिकरण अतिक्रमण निष्कासित करतांना व्हिडिओ चित्रिकरण केल्याचे बिल	20900/-
775	13/06/2012	श्री. समर्थ एंटरप्रायझेस	प्रभाग समिती (क)	फोटोग्राफी व व्हिडिओ चित्रिकरण अतिक्रमण निष्कासित करतांना व्हिडिओ चित्रिकरण केल्याचे बिल	74000/-
1343	04/08/2012	श्री. समर्थ एंटरप्रायझेस	प्रभाग समिती (क)	फोटोग्राफी व व्हिडिओ चित्रिकरण अतिक्रमण विभागात अनधिकृत बांधकामे निष्कासित करणे कामी देयक अदा, दि. 03/05/2012 ते 05/06/2012 या कालावधीचे	148820/-
2254	20/10/2012	श्री.सदगुरु ट्रेडिंग कं.	प्रभाग समिती (क) मजूर प चौकिदार पुरविणे. माहे जून,जुलै, ऑगस्ट 2012	अनधिकृत बांधकाम तोडणे, नो पार्किंग क्षेत्रातील वाहने उचलणे	534888/-
2274	20/10/2012	मे. पाईप डिस्ट्रिब्युटर्स	प्रभाग समिती (ड) नवघर-माणिकपूर	अतिक्रमण हटविणे अनधिकृत बांधकाम तोडणेसाठी वाहन भाडे व इतर खर्च	3750/-
2299	22/10/2012	मे. पाईप डिस्ट्रिब्युटर्स	पेल्हार पाईप खरेदी दि. 22/06/12	अतिक्रमण हटविणे अनधिकृत बांधकाम तोडणेसाठी वाहन भाडे व इतर खर्च	4900/-
2300	22/10/2012	महाराणी प्रिंटर्स	प्रभाग समिती (अ) स्टेशनरी छपाई दि.	अतिक्रमण हटविणे अनधिकृत बांधकाम तोडणेसाठी वाहन भाडे	280800/-

			16/5/2012	व इतर खर्च	
3025	01/12/2012	एन.एस. टान्सपोर्ट	प्रभाग समिती (क) नालेसफाई कामी फॉकलँड मशिन	अतिक्रमण हटविणे. अनधिकृत बांधकाम तोडणेसाठी वाहन भाडे	165000/-
3860	15/02/2013	श्री. समर्थ इंटरप्रायझेस	प्रभाग 'क' अतिक्रमण विभाग अनधिकृत बांधकाम चित्रिकरण दि. 1/07/12 ते 31/10/12	फोटोग्राफी व व्हीडीओ चित्रिकरण	206700/-
3861	15/02/2013	श्री. समर्थ इंटरप्रायझेस	प्रभाग 'क' अतिक्रमण विभाग अनधिकृत बांधकाम चित्रिकरण दि. 18/07/12 ते 31/07/12	फोटोग्राफी व व्हीडीओ चित्रिकरण	48270/-
4047	04/03/2013	युनिवर्सल एंटरप्रायझेस	प्रभाग (क) नोंव्हेंबर 2012	जे.सी.बी. वाहन	180810/-
4048	04/03/2013	युनिवर्सल एंटरप्रायझेस	प्रभाग (क) डिसेंबर 2012	जे.सी.बी. वाहन	25200/-
4235	16/03/2013	आकाश एंटरप्रायझेस	प्रभाग (अ) नोंव्हेंबर 2012	जे.सी.बी. वाहन व्यवस्था	8820/-
4272	16/03/2013	सुहास एंटरप्रायझेस	प्रभाग (ई) 23/07/ 2012	बांधकाम विभाग अतिक्रमण हटविणे व तोडण्यासाठी वाहन भाडे	9950/-
				एकूण	1801778

याबाबत लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०७अ नुसार लेखा परीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देणे बंधनकारक असताना उपरोक्त नमूद रु. १८,०१,७७८/- खर्चाची एकूण १७ मुळ प्रमाणके लेखा परीक्षणासाठी अर्धसमास पत्राद्वारे मागणी करूनही उपलब्ध केली नाहीत. त्यामुळे केलेल्या खर्चाची सत्यता लेखा परीक्षणात तपासता आली नाही. सबब उपरोक्त एकूण खर्च रक्कम रु. १८,०१,७७८/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DGPVTTM7001 (Ref No : 126, Hmm No : 87)

58 ड प्रभाग पे आणि पार्क ठेक्याबाबत.

लेखा शीर्ष : वाहनतळ व्यवस्था, नोप मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 214000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 214000.00/-

नवघर पूर्व रेल्वे पॉवर हाउस ते सब वे पार्किंग व्यवस्था व विभाग क्र. १ मुख्य कार्यालय ते पांचाळनगर इमारत व दुसऱ्या बाजूस धुरी इलेक्ट्रॉनिक पर्यंत या पे आणि पार्क वाहन ठेक्यांच्या निविदा प्रक्रियेतील प्राप्त निविदा दरात खाडाखोड/उपरीलेखन केल्याने कमी दराच्या ठेकेदारास ठेका दिल्याने महानगरपालिकेचे रक्कम रु. २,१४,०००/- रक्कमेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

वसई विरार महानगरपालिकेच्या ड प्रभाग कार्यालयाचे लेखा परीक्षणात पे & पार्क ठेक्यांची नस्ती तपासता त्यात खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.१८८ दिनांक ०४/१२/२०१४ अन्वये कळविले असता प्रभाग कार्यालयाने/विभागाने त्याबाबत कोणताही खुलासा केला नसल्याने लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) नवघर पूर्व रेल्वे पॉवर हाउस ते सब वे पार्किंग व्यवस्था.

सदर ठेक्याची नस्ती तपासता असे दिसून आले कि, सदर ठेक्याकरीता जाहीर निविदा सूचना प्रसिद्धी देण्यात आली होती त्यास अनुसरून एकूण ३ निविदा (१) स्टार ग्रुप इस्टेट, (२) शिखा इंटरप्रायजेस व (३) ओम मजूर कामगार सहकारी संस्था प्राप्त झाल्या होत्या. त्यातील मे. स्टार ग्रुप इस्टेट यांची रक्कम रु. ४५,०००/- ची निविदा मंजूर करून कार्यादेश दिला आहे. परंतु मे.शिखा इंटरप्रायजेस यांच्या निविदा फॉर्ममध्ये देकार किंमत अंकात रक्कम रु. ६२,०००/- खाडाखोडीने रक्कम रु.३९,०००/- बदलली आहे, अक्षरी रक्कम एकोणचाळीस हजार मात्र नमूद आहे. त्यामुळे सदर प्रकरणी मे.शिखा इंटरप्रायजेस यांच्या देकाराची किंमत जास्त असताना द्वितीय क्रमांकावरील स्टार ग्रुप इस्टेट यांना पे & पार्क ठेका दिल्याने सदर प्रकरणी रक्कम रु.२३,०००/- इतक्या रक्कमेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

२) विभाग क्र. १ मुख्य कार्यालय ते पांचाळनगर इमारत व दुसऱ्या बाजूस धुरी इलेक्ट्रॉनिक पर्यंत.

सदर ठेक्याची नस्ती तपासता असे दिसून आले कि, सदर ठेक्याकरीता जाहीर निविदा सूचना प्रसिद्धी देण्यात आली होती त्यास अनुसरून एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या होत्या, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	निविदाधारकांचे नांव	निविदा प्राप्त दर
०१	स्टार ग्रुप इस्टेट कंन्सट्रक्शन	४,८१,०००
०२	वन वे ऑटो	४,६१,०००
०३	ओम साई ग्रुप	४,३५,३७७
०४	संतोष वनमाळी	६,७२,००० (खाडाखोडीने ४७२०००)
०५	मग्नेट्स सिस्टिम	४,६५,४३२

०६	कैलास पाटील	४,३२,७९९

उपरोक्त निविदा धारकांपैकी मे. स्टार ग्रुप इस्टेट यांची रक्कम रु. ४,८१,०००/- ची निविदा मंजूर करून कार्यादेश दिला आहे. परंतु संतोष वनमाळी यांच्या निविदा फॉर्ममध्ये मूळ देकार किंमत रक्कम रु. ६,७२,०००/- अंकी खाडाखोडीने रक्कम रु. ४,७२,०००/- बदलली आहे, अक्षरी नमूद नाही. दरातील केलेली खाडाखोड साक्षांकित केलेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणी मे. संतोष वनमाळी यांची देकार किंमत रक्कम रु. ६,७२,०००/- ही जास्त असताना द्वितीय क्रमांकावरील स्टार ग्रुप इस्टेट यांचा देकार दर रु. ४,८१,०००/- किंमतीस पे & पार्क ठेका दिल्याने सदर प्रकरणी रक्कम रु.१,९१,०००/- इतक्या रक्कमेचे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

वरीलप्रमाणे पे & पार्क कंत्राटात एकूण रक्कम रु.२,१४,०००/- चे झालेले आर्थिक नुकसान रक्कमेची वसुली करून अनुपालन करावे.

DGPVTTM7001 (Ref No : 144, Hmm No : 188)

59 नवघर-माणिकपुर प्रभाग समिती "ड" मधील कला क्रिडा महोत्सव कार्यक्रम.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 2129427.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2129427.00/-

कला क्रीडा महोत्सवाचे इतिवृत्त उपलब्ध झाले नाही. चुन्याची दराची निविदा मंजुर करतांना बाजारभावासोबत तुलना केल्याचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

नवघर-माणिकपुर प्रभाग समिती "ड" कला क्रिडा महोत्सवासाठी वित्तीय वर्ष 2012-13 मधील खर्चासाठी प्रशासकीय मान्यता स्थायी समिती ठराव क्र.31, दि.12/03/2012 अन्वये दिली आहे. जाहिर निविदा मागवुन त्या दरास मान्यता स्थायी समिती ठराव क्र.525 दि.17/09/2012 अन्वये दिली आहे. ड प्रभागाचा खर्च पुढील प्रमाणे आहे.

		वर्ष 2012-13 मध्ये कला क्रीडा महोत्सव नवघर माणिकपुर प्रभागात झालेला खर्च				
प्रमाणक क्रमांक	**दिनांक**	**स्थुल रक्कम रु.**	**वजाती रु.**	**निव्वळ रक्कम रु.**	**प्रदानीत रक्कम रु.**	**प्रयोजन**
4670	30-3-2013	581235	23250	557985	557985	भोजन शाकाहारी व अल्पोपहार/शार्वी कॅटरर्स

4640	30-3-2013	876595	17532	859063	859063	किरकोळ स्टेशनरी साहित्य/साई स्पोर्टस.
4606	30-3-2013	224180	4484	219696	219696	चहा, कॉफी, बिसलेरी/ आकाश एंटरप्रायजेस.
4605	30-3-2013	103850	2077	101773	1010773	फोटोग्राफी व व्हीडीओ शुटींग/ आकाश एंटरप्रायजेस
4431	26-3-2013	34000	---	34000	34000	छपाई करणे/ मे. अनिरुध्दाय इंप्रेशन.
4394	26-3-2013	100837	---	100837	100837	छपाई करणे / महाराणी प्रिंटर्स
4182	13-3-2013	15330	307	15023	15023	स्टेशनरी साहित्य खरेदी/ सिलेक्ट एंटरप्रायजेस.
3833	13-3-2013	193400	---	193400	193400	स्टेशनरी साहित्य खरेदी / एचएमपी एंटरप्रायजेस.
	एकुण ..	2129427	47650	2081777	2081777	

याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.193, दि. 09/12/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र.निरंक, दिनांक 11/12/2014 अन्वये केलेल्या खुलाशानुसार या महोत्सवात सहभागी पंच निरीक्षक, शिक्षक, मैदानावर काम करणारे कर्मचारी, पदाधिकारी, पाहुणे यांना जेवण पुरविण्यांत आल्याचे नमुद केले आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. नवघर-माणिकपुर प्रभाग कार्यालयाने दिनांक 6-12-2012 ते 9-12-2012 या कालावधीत आयोजित केलेल्या कला क्रीडा महोत्सवासाठी मे. शार्वी कॅटरर्स यांनी 2897 व्यक्तींना रुपये 155/- या दराने जेवणे पुरविल्याचे दिसून येते. 2897 संख्येबाबत तपशील उपलब्ध झाला नाही. तसेच जेवणाच्या खर्चाची पडताळणी करता आली नाही.

2. प्रभाग समिती नवघर-माणिकपुर आयोजित कला क्रीडा महोत्सव 2011-12 करीता प्रमाणक क्रमांक 4183, दिनांक 13-3-2013 अन्वये रक्कम रुपये 2,35,620/- मे. सिलेक्ट एंटरप्रायजेस, वसई यांचेकडून खरेदी केलेल्या साहित्याचे उप प्रमाणक अ.क्र.10 पाहता चुना रुपये 10/- प्रति किलो या दराने 4000 किलो खरेदी केला आहे. तर सन 2012-13 मध्ये प्रमाणक क्रमांक 3833, दिनांक 13-3-2013 अन्वये रक्कम रु.1,93,400/- या प्रमाणकासोबत जोडलेली उपप्रमाणके तपासता त्यात अ.क्र.10 वर मे. एच एम पी एंटरप्रायजेस, नालासोपारा यांचेकडून रुपये 18.50 प्रति किलो या दराने 4000 किलो चुन्याची खरेदी करण्यांत आलेली आहे. म्हणजेच सन 2011-12 व 2012-13 या दोन वर्षातील दरातील वाढ रुपये 8.50 इतकी आहे. सदर दरवाढ सुमारे 85 टक्के इतकी आहे. निविदा मागवितांना अंदाजपत्रक तयार करण्यांत आले नव्हते. निविदा मंजुर करणा-या समितीने बाजारभावाचा विचार करुन निविदा स्वीकृत केल्याचे दिसुन येत नाही.

आक्षेपाधीन रक्कम रु. 2129427/-

DATBBPM6301 (Ref No : 139, Hmm No : 193)

60 प्रभाग 'क' कला क्रिडा महोत्सव खर्चाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :आंतर शालेय क्रिडा मह मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 4154748.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4104909.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 49839.00/-

प्रभाग कार्यालयाने वित्तीय मर्यादेपेक्षा जास्त खर्च केला आहे. स्टेज मंडप डेकोरेशन, विद्युतीकरण व ध्वनीप्रक्षेपण व इतर व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. कार्यान्वित करून मनुष्यबळासह ऑपरेटरसह भाड्याने पुरवठा करणे करीता निविदा/दरपत्रकातील न्युनतम खरेदी दरास स्थायी समितीची मंजुरी घेतली नाही. आयकराच्या रकमा पुरवठाधारकांच्या देयकातुन वजाती केल्या नाहीत. मुख्य लेखा परीक्षक यांनी सदर देयकांचे पूर्व लेखा परीक्षण करताना कोणतेही आक्षेप नोंदविलेले नाहीत.

प्रभाग 'क' नालासोपारा विभागाने वर्ष २०१२-१३ या वित्तीय वर्षात खालीलप्रमाणे कला क्रिडा महोत्सव कार्यक्रमावर खर्च केला आहे.

वर्ष २०१२-१३ कला-क्रिडा महोत्सव नालासोपारा प्रभागाने केलेला खर्च						
प्रमाणक क्र.	दिनांक	स्थूल रक्कम रु.	वजाती रु.	निव्वळ रक्कम रु.	कोणास प्रदान	कशासाठी
७८२	०१.१२.२०१२	१७००००	०	१७००००	संध्या पाटील	अग्रिम
७९४	०७.१२.२०१२	९६००	०	९६००	मे.साक्षी इंटरप्रायजेस	फुले,तोरणमाळ
७९९	०७.१२.२०१२	५०१६	०	५०१६	मे.प्रिमिअर ॲडस	वर्तमानपत्र जाहिरात
८६८	३.०१.२०१३	२८८०	०	२८८०	मे.स्वप्न ॲडस	वर्तमानपत्र जाहिरात
८६९	०३.०१.२०१३	३२६४	०	३२६४	मे.एस.आर.पब्लिकेशन्स	वर्तमानपत्र जाहिरात

८८३	०३.०१.२०१३	४६००३०	९२०१(IT)	४५०८२९	मे.राजकुमार इलेक्ट्रिकल्स	मंडप डेकोरेशन
९०३	२१.०१.२०१३	४०२५००	८०५०(IT)	३९४४५०	मे.साई डेकोरेटर्स & सर्व्हीसेस	स्टेज मंडप डेकोरेशन
९०४	२१.०१.२०१३	३६५५००	७३१०(IT)	३५८१९०	मे.साई वैभव इलेक्ट्रिकल	ध्वनी प्रक्षेपण व विद्युत व इतर व्यवस्था
१०२६	०१.०२.२०१३	१९९८२८	१७००००	२९८२८	संध्या पाटील	अग्रिम समायोजन
१०८९	०२.०३.२०१३	११५०००	०	११५०००	मे.समर्थ इंटरप्रायजेस	फोटोग्राफी व व्हिडीओ चित्रीकरण
१०९०	०२.०३.२०१३	४००००	०	४००००	मे. बी. जे. आटोमेशन	सी.सी.टी.व्ही. यंत्रणा
१०९१	०२.०३.२०१३	४००००	०	४००००	मे. बी. जे. आटोमेशन	सी.सी.टी.व्ही. यंत्रणा
	एकूण खर्च	**१६४३६१८**	**१९४५६१**	**१४४९०५७**		
विरार मुख्यालयाने वर्ष २०११-१२ च्या नालासोपारा कला क्रीडा महोत्सवसाठी वर्ष २०१२-१३ मध्ये केलेला खर्च						
२९९	१६.०५.२०१२	१३२८९०	०	१३२८९०	मे.आकाश इंटरप्रायजेस	चहा पान, बिसलरी पाणी,पेढे व्यवस्था
४९७	२४.०५.२०१२	५२५०	०	५२५०	मे.एच.एम.पी.इंटरप्राय जेस	स्टेशनरी छपाई
५३८	२८.०५.२०१२	४२५००	०	४२५००	मे.अनिरुद्धाय इम्प्रेशन	निमंत्रणपत्रिका छपाई
५९७	०१.०६.२०१२	४३३५८५	०	४३३५८५	मे.शार्वी कॅटरर्स	अल्पोपहार व भोजन
६३५		९२९०	०	९२९०	मे.आकाश इंटरप्रायजेस	किरकोळ स्टेशनरी साहित्य
७८५	१३.०६.२०१२	८३३८	०	८३३८	मे.अनिरुद्धाय इम्प्रेशन	किरकोळ स्टेशनरी साहित्य
७८७	१३.०६.२०१२	३६००	०	३६००	मे.अनिरुद्धाय इम्प्रेशन	घड्याळ खरेदी
१२३३	२५.०७.२०१२	११५२०००	२३०४०(IT)	११२८९९०	मे.विजय मंडप डेकोरेटर्स	मंडप स्टेज,ध्वनीक्षेपन व्यवस्था
	एकूण	**१७८७४५३**	**२३०४०**	**१७६४४४३**		
विरार मुख्यालयाने वर्ष २०१२-१३ च्या नालासोपारा कला क्रीडा महोत्सवसाठी वर्ष २०१२-१३ मध्ये केलेला खर्च						
३६०३	२३.०१.२०१३	१७१८७	३४४(LBT)	१६८४३	मे.व्हरायटी बुक सेंटर & स्टेशनरी	किरकोळ स्टेशनरी व साहित्य

३६०५	२३.०१.२०१३	१२५४७६	०	१२५४७६	मे.एच.एम.पी. इंटरप्रायजेस	किरकोळ स्टेशनरी व साहित्य
३६८९	३०.०१.२०१३	१२७५०	०	१२७५०	मे.महाराणी प्रिंटर्स	किरकोळ स्टेशनरी व साहित्य
३८३२	१३.०२.२०१३	२४०२४	०	२४०२४	मे.अनिरुद्धाय इम्प्रेशन	किरकोळ साहित्य
४१३३	१३.०३.२०१३	२३९६९५	०	२३९६९५	मे.साई स्पोर्ट्स	ट्रॉफी व मेडल्स साहित्य
४३२१	२१.०३.२०१३	२४५६०	०	२४५६०	मे.एच.एम.पी. इंटरप्रायजेस	किरकोळ स्टेशनरी व साहित्य
४३९३	२६.०३.२०१३	७१५६४	०	७१५६४	मे.महाराणी प्रिंटर्स	फ्लेक्स बोर्ड बनर
४४९५	३०.०३.२०१३	५१०००	०	५१०००	मे.अनिरुद्धाय इम्प्रेशन	निमंत्रणपत्रिका छपाई
४६००	३०.०३.२०१३	९६०५	१९२(LBT)	९४१३	मे.आकाश इंटरप्रायजेस	किरकोळ स्टेशनरी व साहित्य
४६०७	३०.०३.२०१३	१४७८१६	२९५६(LBT)	१४४८६०	मे.आकाश इंटरप्रायजेस	चहा पान, बिसलरी पाणी,पेढे व्यवस्था
	एकूण	**७२३६७७**	**३४९२**	**७२०१८५**		

उपरोक्त खर्चाबाबत लेखा परीक्षणात खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) नालासोपारा प्रभाग कार्यालयाने वर्ष २०१२-१३ मध्ये कला क्रिडा महोत्सव २०१२-१३ या कार्यक्रमावर एकूण रक्कम रु.१६४३६१८/- इतका खर्च केला आहे. आयुक्त यांचे आदेश क्र.आस्था/७३८/२०१२ दिनांक १७/०१/२०१२ महानगरपालिकेच्या ५ प्रभाग समितीना लेखा विषयी कामकाज सुरळीत पार पाडणेसाठी ५.२५ लाखांपर्यंतच्या खर्चामध्ये वेतन व भत्ते, शासकीय देणे, विद्युत, दुरध्वनी, डिझेल खर्च व इतर कामांचा खर्च याबाबत मर्यादा घालून दिल्या होत्या. परंतु प्रस्तुत प्रकरणी प्रभाग कार्यालयाने रक्कम रु.११,१८,६१८/- इतका खर्च वित्तीय प्राधिकारापेक्षा जादा केला आहे. याबाबतचे अर्धसमास पत्राचे उत्तरास प्रभागाने स्थायी समिती व आयुक्त यांचे क्षमापन घेतले जाईल असे सादर केले आहे. तरी त्याप्रमाणे कार्यवाही करणेत यावी

२) नालासोपारा प्रभाग कार्यालयाने वर्ष २०१२-१३ मधील कला-क्रिडा महोत्सव साजरा करणेसाठी १) स्टेज मंडप डेकोरेशन व इतर व्यवस्था २) विद्युतीकरण व ध्वनीप्रक्षेपण व इतर व्यवस्था ३)सी.सी.टी.व्ही. कार्यान्वित करून मनुष्यबळासह ऑपरेटरसह भाड्याने पुरवठा करणे करीता निविदा/दरपत्रक मागवून खर्च केला आहे. सदर बाबींकरिता प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव क्र.४९१ दिनांक १२/०९/२०१२ अन्वये निविदापूर्व मंजुरी प्राप्त केली आहे. परंतु निविदेत प्राप्त झालेल्या दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम ७३(ड) अन्वये सेवा संविदा करणेसाठी सदर प्रकरण १५ दिवसात स्थायी समितीपुढे ठेवणे आवश्यक होते. तथापि ते ठेवलेले नसल्याने सदर सेवा संविदेस, दरास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त नसल्याने केलेला एकूण खर्च रक्कम रु. १३,०८,०३०/- नियमबाह्य केला आहे. विभागाने अर्धसमास पत्र क्रमांक १९४, दिनांक ०९/१२/२०१४ च्या अनुषंगाने केलेल्या खुलाशात या कामासाठी मागविलेल्या निविदेस स्थायी समितीने प्रशासकीय व वित्तीय मंजुरी दिली आहे. खर्च रक्कम ५.०० लाखाचे मर्यादेत असल्याने आयुक्तांची मंजुरी घेतली आहे. तरी झालेल्या अनियमिततेस स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी/क्षमापन

घेण्यांत येईल असा खुलासा केला आहे. याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

३) नालासोपारा प्रभागाने (१) खानपान व्यवस्था, (२) नमुन्यानुसार छपाई, (३) स्टेज-मंडप/डेकोरेशन/ध्वनि प्रक्षेपण/लायटींग (४) बक्षीस साहित्य (५) उदघाटन साहित्य (६) किरकोळ साहित्य यांची अंदाजित संख्या नमुद करुन टिप्पणी सादर केली आहे. त्यास उपायुक्त यांनी मंजुरी दिली आहे. तथापि बाबनिहाय कोणत्या बाबीवर किती खर्च होणार आहे याचे नियोजन व त्याप्रमाणे तरतुद केली असल्याचे दिसून आले नाही. सदर टिप्पणीत नमुद केलेल्या साहित्याची मागणी संख्या कशा प्रकारे निश्चीत केली त्याचा तपशिल नाही. सदर बाबींच्या अनुषंगाने खरेदी करण्यांत आलेल्या साहित्यासाठी मुख्यालयाने वार्षिक निविदा मंजुर दराने व प्रभाग क कार्यालयाने स्टेज-मंडप/डेकोरेशन/ध्वनि प्रक्षेपण/लायटींग या बाबीकरीता जाहिर निविदा मागविल्या होत्या. कला क्रिडा महोत्सवाचे नियोजनात कोणकोणत्या ठिकाणी स्पर्धेचे आयोजन केले जाते, त्या ठिकाणी किती जागा उपलब्ध आहे, त्या ठिकाणी कोणकोणते खेळांचे प्रकार खेळले जाणार आहेत, कोणत्त्या ठिकाणी किती साईज मंडप उभारणी करावी लागणार आहे, याबाबतचे अंदाजित नियोजन केलेले नाही. निविदांतील प्राप्त झालेले सर्वात कमी दर हे बाजारभावाप्रमाणे योग्य व सुसंगत असल्याची खात्री करण्यासाठी बाजारातील दर मागविलेले नाहीत. विभागाने अर्धसमास पत्र क्रमांक १९४, दिनांक ०९/१२/२०१४ च्या अनुषंगाने केलेल्या खुलाशात सदर कामासाठी मागविलेल्या निविदेस स्थायी समितीने प्रशासकीय व वित्तीय मंजुरी दिली आहे. खर्च रक्कम ५.०० लाखाचे मर्यादेत असल्याने आयुक्तांची मंजुरी घेतली आहे. तरी झालेल्या अनियमिततेस स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी/क्षमापन घेण्यांत येईल असा खुलासा केला आहे. याबाबतची कार्यवाही अपूर्ण असल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

४) प्रमाणक क्रमांक १०२६ दिनांक ११/०२/२०१३ रक्कम रु. १,९९,८२८/- अन्वये पंच, परीक्षक, पाहुणे मानधन वाद्यवृंद व इतर साहित्य खर्च केला आहे. सदर खर्चासाठी श्रीमती संध्या पाटील यांना प्रमाणक क्र.७८२ दिनांक ०१/१२/२०१२ अन्वये रक्कम रु.१,७०,०००/- इतका अग्रिम दिला होता. सदर अग्रिमाचे समायोजन केले आहे. परंतु सदर प्रमाणकासोबत खर्चाची मूळ बिले, प्रदान पोचपावत्या प्रमाणकासोबत आढळून आल्या नाहीत. याबाबत अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने केलेल्या खुलाशात मुळ पावती शोधण्याचे काम चालु असुन प्राप्त होताच लेखा परीक्षणास दाखविण्यांत येतील. सबब मूळ प्रदान पोचपावत्या लेखा परीक्षणास उपलब्ध करून दाखविणे आवश्यक आहे. तोपर्यंत खर्च रक्कम रु.१,९९,८२८/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

५) प्रमाणक १०९० व १०९१ दिनांक ०२/०३/२०१३ अन्वये कला व क्रिडा प्रकारासाठी प्रत्येकी रु.४०,०००/- प्रमाणे एकूण रक्कम रु. ८०,०००/- मे. बी.जे.ऑटोमेशन कला क्रिडा महोत्सवाकरिता सी.सी.टी.व्ही. कार्यान्वित करून मनुष्यबळासह ऑपरेटरसह भाड्याने पुरवठा करणेसाठी प्रदान केले आहेत. सदर कामासाठी निविदा/दरपत्रक सूचना नोटीस बोर्डवर प्रसिध्दी केली आहे. त्याअनुषंगाने कला प्रकारासाठी ३, व क्रिडा प्रकारासाठी ३ वेगवेगळी दरपत्रके प्राप्त झाली असून त्यात मे. बी.जे.ऑटोमेशन यांचे सर्वात कमी दर रु.४०,०००/- ला उपायुक्त यांनी मंजुरी दिली आहे. व त्यानुसार मे.बी.जे. ऑटोमेशन यांना कार्यादेश क्र. वविशम/५३१/२०१२-१३ दिनांक ११/१२/२०१२ अन्वये ८ नग, आय आर सी सी टी व्ही. ८ चॅनेल डी.व्ही.आर. भाड्याने पुरविण्याचे आदेश दिले आहेत. उपरोक्त नमूद प्रमाणके तपासता कला स्पर्धेचे ठिकाण व क्रिडा स्पर्धेचे ठिकाण या दोन्ही वेगवेगळ्या ठिकाणी नमूद स्पेसिफिकेशनप्रमाणे प्रत्येकी ८ नग पुरवठा केल्याची देयके दिसून येतात. प्रत्यक्षात निविदा दरपत्रकात असे वेगवेगळ्या ठिकाणी सीसीटीव्ही. बसविण्याचे प्रस्तावित करून त्याप्रमाणे दरपत्रके मागविली आहेत. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र.

भांखस/२५१२/उद्योग-६ दिनांक ०२/०१/१९९२ ला अनुसरून दिनांक १६/०७/१९९३ च्या शासन निर्णयानुसार रक्कम रु.५०,०००/- वरील रक्कमेच्या खरेदी व सेवा पुरवठा करणेसाठी वर्तमानपत्रात जाहीर निविदा सूचना प्रसिध्दी करणे आवश्यक असता त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. व एकाच प्रकारच्या कामाचे दोन भाग पाडून दरपत्रके मागविल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झाला नाही. तसेच या दोन्ही ठिकाणचे सी.सी.टीव्ही.फुटेज सी.डी.मध्ये अथवा संगणकात उपलब्ध नाही. तसेच यासंदर्भात मे. बिजे ॲटोमेशन यांच्यासोबत केलेल्या करारनाम्यात सीसीटीव्ही फुटेज महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत, त्याचे परिमाण, संख्या व जतन कालावधी याबाबत आवश्यक ती अटी व शर्ती नमुद केल्या नाहीत. तसेच सदर देयकातून २% आयकर रक्कम रुपये १६००/- कपात केली नाही. सदरची रक्कम अर्धसमासास दिलेल्या उत्तरात नमुद केल्याप्रमाणे पावती क्रमांक २५४२९१, दिनांक ११/१२/२०१४ अन्वये वसुल केली आहे. सदरची रक्कम शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

६) प्रमाणक क्रमांक १०८९ दिनांक ०२/०३/२०१३ अन्वये रक्कम रु.१,१५,०००/- मे. समर्थ इंटरप्रायजेस यांना फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करणेकामी प्रदान केले आहेत. समर्थ इंटरप्रायजेस यांचे दर तत्कालीन नगरपरिषद ठराव क्र.७७ दिनांक ११/१०/२००७ अन्वये मंजूर केले असून त्यास नगरपरिषद नालासोपारा ठराव क्र. १९६ दिनांक २६/०३/२००८ व १५२ दिनांक ०७/०२/२००९ अन्वये मुदतवाढ दिली आहे. महानगरपालिका उपायुक्त यांनी आदेश क्र.साप्रवि/४७२/२०११-२०१२ दिनांक ३१/०३/२०१२ अन्वये मुदतवाढ दिली असून कार्यादेश क्र.वविशम/५१८/२०१२-१३ दिनांक १०/१२/२०१२ अन्वये मुदतवाढ दिली आहे. मे.समर्थ इंटरप्रायजेस यांना ४x६ साईजचे २२५० फोटो रु.दर २०/- प्रमाणे रक्कम ४५,०००/- व व्हीडीओ सुटिंग प्रती कमेरा रु.३५००/- प्रती दिवसाप्रमाणे कला व क्रिडा विभागासाठी प्रत्येकी २ कमेराची ५ दिवसाची रक्कम रु.७०,०००/- प्रदान केलेले आहेत. सदर २२५० फोटो व ५ दिवस कमेराद्वारे केलेल्या शुटींग फिल्मच्या एकूण किती सी.डी. महानगरपालिकेच्या दप्तरी उपलब्ध आहेत याबाबतची माहिती व साहित्य प्राप्तीची नोंद लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. याबाबत अर्धसमास पत्राचे उत्तरात फोटो व सीडी कार्यालयाकडे उपलब्ध आहे असे नमुद केले आहे. सदरच्या सीडी व फोटो यांची संख्या व साठा नोंद केलेली नाही. तसेच सदर देयकातून २% आयकर रक्कम रुपये २३००/- कपात केली नाही. सदरची रक्कम अर्धसमासास दिलेल्या उत्तरात नमुद केल्याप्रमाणे पावती क्रमांक २५४२९२, दिनांक ११/१२/२०१४ अन्वये वसुल केली आहे. सदरची रक्कम शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

७) वसई विरार मुख्यालयाने वर नमूद केल्याप्रमाणे नालासोपारा प्रभागात वर्ष २०११-१२ व २०१२-१३ या वर्षात झालेल्या कला क्रिडा महोत्सवात झालेल्या खर्चाची देयके वर्ष २०१२-१३ मध्ये खर्ची टाकली आहेत. सदर दोन वेगवेगळ्या वर्षात झालेल्या खर्च तुलनात्मकरित्या समान असलेल्या बाबींच्या दरातील तुलना करता खालीलप्रमाणे दरात मोठ्या प्रमाणावर तफावत दिसून आली आहे.

बाब	**११-१२ दर**	**१२-१३ दर**	**दर तफावत**	**खरेदी संख्या**	**तफावत रक्कम**	**जादा दराचे पुरवठादार**
रबर बँड	२९०	३६५	७५	२	१५०	एचएमपी. इंटरप्रायजेस
गोदरेज कुलूप	३४०	५५०	९०	१२	१०८०	आकाश इंटरप्रायजेस
लाईन दोरी	२०५	३५०	१४५	६	८७०	महाराणी प्रिंटर्स

सुतळी बंडल	९५	१२०	२५	२	५०	आकाश इंटरप्रायजेस
एकूण रक्कम					**२१५०**	

वरीलप्रमाणे वर्ष २०१२-१३ मध्ये मागील वर्ष २०११-१२ च्या खरेदी दरांपेक्षा १०% हून जादा दर मंजूर होऊन खरेदी झाली आहे. सदर प्राप्त जादा दरांची तुलना मागील वर्षाच्या खरेदी दराबरोबर, बाजारभावाबरोबर केली नाही त्यामुळे जादा दराने खरेदी झाली आहे. याबाबत अर्धसमास पत्रान्वये विचारणा केली असता विभागाने साहित्य खरेदीकामी मुख्यालयातुन मागविलेल्या वार्षिक दराच्या निविदामधुन साहित्य खरेदी केली असुन निविदा दरास स्थायी समितीची मंजुरी घेतली आहे. बाजारभावातील दरांबरोबर तुलना करुन दर योग्य असल्याची खात्री करुन मंजुर केले आहेत. परंतु बाजारभावातील दरपत्रके प्राप्त केल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

८) मे.एच.एम.पी.इंटरप्रायजेस यांचा वर्ष २०११-१२ निविदेमधील बाब निमंत्रणपत्रिका फोर कलर पाटपोट साईज ८x११ चा दर रु.७५० प्रती १०० कार्ड कमी असताना मे.अनिरुद्ध इम्प्रेशन यांचेकडून उपरोक्त प्रमाणक क्रमांक ५३८ व ४४९५ अन्वये दर रु.८५०/- प्रमाणे पुरवठा केल्याने एकूण ५०००+६०००=११००० कार्डपोटी रक्कम रु.११,०००/- जादा खर्च झाल्याने सदरची रक्कमेची वसुली करावी. याबाबत अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने केलेल्या खुलाशात मे.एच.एम.पी.इंटरप्रायजेस यांचा दर रुपये २६००/- होता व अनिरुध्द इंप्रेशन यांचा दर रु. ७५०/- स्थायी समिती ठरावान्वये मंजुर आहे. त्यामुळे जादा खर्च झालेला नाही. तथापि अनिरुध्द इंप्रेशन यांचेकडून दर रुपये ८५०/- प्रमाणे खरेदी केल्याने रक्कम रु.११,०००/- ची वसुली करणे आवश्यक आहे.

९) उपरोक्त प्रमाणक क्र.१२३३ दिनांक २५/०७/२०१२ अन्वये मे.विजय मंडप डेकोरेटर्स यांना मंडप, स्टेज, ध्वनीक्षेपण व इतर व्यवस्थासाठी रक्कम प्रदान केली आहे. सदरचे बिलातील बाब क्र.१३ जाजल (लाल कार्पेट) २ नग प्रती नग रु.७५००/-प्रती दिन याप्रमाणे ५ दिवसाची एकूण रक्कम रु.७५०००/- दर्शविली आहे. तथापि प्रत्यक्षात ५००० चौ.फुट कारपेट बसविण्याचे असताना क प्रभागाचे प्रत्यक्ष अहवालानुसार एकूण ४२०० चौ.फुट कारपेट बसविल्याने ८०० चौ.फुट कारपेट कमी बसविल्याने कमी बसविलेल्या कारपेटची रक्कम रु. १२,०००/- ची वसुली करावी. याबाबत अर्धसमास पत्रात विचारणा केली असता विभागाने करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे रक्कम वसुलीची तजवीज ठेवली आहे. सबब, रकमेची वसुली करणेत यावी.

१०) मे.सिलेक्ट इंटरप्रायजेस यांचा वर्ष २०११-१२ निविदेमधील बाब चुना प्रती किलोचा दर रु.१०/- इतका कमी असताना वर्ष २०१२-१३ चा मंजूर दर रु.१८.५० प्रमाणे चुना उपरोक्त प्रमाणक क्र. ३६०५ अन्वये ३५०० किलो चुना खरेदी केल्याने सदर प्रकरणी १०% पेक्षा अधिक दराने पुढील वर्षी खरेदी झाल्याने सदर खरेदीत महानगरपालिकेचे रक्कम रु. २९,७५०/- चे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. याबाबत अर्धसमास पत्रात विचारणा केली असता विभागाने सादर केलेल्या उत्तरात चुन्याचे दर हे स्थायी समितीने मंजुर केले होते. बाजारामधील डिझेलचे दरवाढीमुळे वाहतुकीचे दर वाढत असल्याने त्याचा दरावर परीणाम झालेला आहे. म्हणुन २०१२-१३ मध्ये दरवाढ झालेली आहे. बाजारातील दरांची चौकशी करुन तुलना करुन दर मंजुर केले होते असा खुलासा केला आहे. तथापि यासोबत बाजारातील दरपत्रके आढळून आली नाहीत. त्यामुळे खुलासा मान्य करता येत नाही.

११) वर्ष २०१२-१३ मध्ये नालासोपारा प्रभाग क कार्यालयाने कला क्रिडा महोत्सवासाठी मंडप, स्टेज, ध्वनीक्षेपण व इतर व्यवस्था यासाठी स्वतंत्रपणे निविदा मागवून उपरोक्त प्रमाणक क्र. ८८३, ९०३ व ९०४ अन्वये एकूण रक्कम रु.१२,२८,०३०/- इतका खर्च केला आहे. सदर निविदा प्रक्रियेत मंडप, स्टेज साहित्याच्या वेगवेगळ्या बाबींचे प्राप्त झालेले दर हे मागील वर्ष २०११-१२ पेक्षा तुलनात्मकरित्या कमी दर प्राप्त झाल्याचे दिसून आले.

तपशिल	वर्ष ११-१२ मधील दर रु.	वर्ष १२-१३ मधील दर रु.	दर फरक रु.	टक्केवारी
२० फुट उंचीचा मंडप कपडा	९.५० चौ.फुट	५	४.५०	४७% कमी
१२ फुट उंचीचे स्टेज मंडप	९.५० चौ.फुट	४	५.५०	५८% कमी
ध्वनीक्षेपक	५५० प्रति तास	२००० प्रति दिवस	--	--

सदर दरांची तुलना विभागाने केली नाही. याबाबत अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने केलेल्या खुलाशात २०११-१२ या वित्तीय वर्षाचे मुख्यालयाकडील निविदांचे वार्षिक दर हे सर्वात कमी होते. त्यास स्थायी समितीची मंजुरी घेण्यांत आली होती. नालासोपारा कला क्रिडा महोत्सवासाठी स्वतंत्रपणे काढलेल्या निविदांचे दर हे स्थानिक ठेकेदारामुळे कमी आहेत. विभागाने केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही.

१२) प्रमाणक क्र.५९७ दिनांक ०१/०६/२०१२ अन्वये मे.शार्वी कॅटर्स यांना ५८५७ अल्पोपहार प्लेट प्रती रु.२५/- प्रमाणे रु. १,४६,४२५/- व २३९३ शाकाहारी भोजन प्लेट प्रती प्लेट रु.१२०/- प्रमाणे रु.२,८७,१६०/- असे एकंदर रु.४३३५८५/- प्रदान केले आहेत. मे.शार्वी कॅटर्स यांना ५८५७ अल्पोपहार प्लेट व २३९३ शाकाहारी प्लेट भोजन पुरवठा करण्याचे कार्यादेश क्र. वविशम/भां/१०८०अ/११ दिनांक ०१/१२/२०११ दिले आहेत. कला क्रिडा महोत्सवाचा कालावधी दिनांक ०७/१२/२०११ ते ११/१२/२०११ हा असताना अल्पोपहार व भोजन कोणास दिले याबाबत अर्धसमास पत्राद्वारे विचारणा केली असता विभागाने दिलेल्या उत्तरात अल्पोपहार व भोजन व्यवस्था महोत्सवात सहभागी पंच, परीक्षक, शिक्षक, मैदानावरील कर्मचारी वर्ग, मान्यवर पाहुणे, पदाधिकारी यांना दिल्याचे नमुद केले आहे. पंच/परीक्षक यांची नियुक्ती केल्याचे आदेश दिलेले नाहीत. उपस्थित शिक्षक, मैदानावरील कर्मचारी वर्ग, मान्यवर पाहुणे, पदाधीकारी यांची उपस्थिती नोंद ठेवलेली नाही. व कला क्रीडा महोत्सवाचे इतिवृत्त उपलब्ध झाले नाही. तसेच सदर देयकातून २% आयकर रक्कम रुपये ८,६७२/- कपात केली नाही. तरी सदरची रक्कम वसुल करून शासनखाती भरणा करावी.

१३) उपरोक्त प्रमाणकात नमुद केल्याप्रमाणे खालील पुरवठादारांच्या बिलांच्या रकमा प्रदान करतांना त्यातुन आयकर रक्कम दोन टक्के प्रमाणे वसुल केली नाही.

अ.क्र.	**पुरवठादाराचे नांव**	**प्रमाणक क्रमांक**	**प्रदानाची एकुण रक्कम**	**2% आयकराची रक्कम**
1	मे.आकाश एंटरप्रायजेस	299, 635, 4600, 4607	299601/-	5992/-
2	मे.एच.एम.पी. एंटरप्रायजेस	497, 3605, 4321,	155286/-	3106/-
3	मे. अनिरुध्द इंप्रेशन	538, 785, 787,3832, 4495	129462/-	2589/-
4	मे. महाराणी प्रिंटर्स	3689, 4393,	84314/-	1686/-
5	मे. साई स्पोर्टस	4133	239695/-	4794/-
	एकुण ...			**18167/-**

याबाबत अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने केलेल्या खुलाशात आयकराची रक्कम वसुली करण्यांत येईल असे कळविले आहे. तरी वरीलप्रमाणे संबंधीत पुरवठादारांकडून आयकराची रक्कम एकुण रक्कम रुपये १८,१६७/-

वसई विरार मनपा

वसुल करून शासनखाती भरणा करावी.

१४) नालासोपारा प्रभागाने होणा-या खर्चाबाबतचे बाबनिहाय अंदाज व्यक्त करुन अपेक्षित मागणीनुसार खर्च निश्चिती केला नाही.

१५) मुख्य लेखा परीक्षक यांनी सदर देयकांचे पूर्व लेखा परीक्षण करताना कोणतेही आक्षेप नोंदविलेले नाहीत असे दिसुन आले आहे.

DGPVTTM7001 (Ref No : 143, Hmm No : 201)

61 प्रभाग 'अ' बोळींज-विरार कला क्रिडा महोत्सव खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :आंतरशालेय क्रिडा महो मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

आक्षेपाधीन रक्कम रु. 1690960.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 35256.00/-

कला क्रिडा महोत्सवाच्या फोटो व शुटींग फिल्मच्या एकूण किती सी.डी. महानगरपालिकेच्या दप्तरी उपलब्ध आहेत याबाबत लेखा परीक्षणाची खात्री पटविली नाही. इलेक्ट्रोल पावडर २२ ग्रॅमचे पाकीटात तयार होत असतांना ५० ग्रॅम पाकीटाची मागणी करुन खरेदी झाल्याने यात ५० पाकीटे खरेदीत अंदाजे रक्कम रुपये ३०००/- चे आर्थिक नुकसान झाले आहे. चुना खरेदीत बाजारभाव दरपत्रके प्राप्त केली नाहीत. अल्पोपहार व भोजन खर्चाच्या अनुषंगाने कला क्रिडा महोत्सवाचे इतिवृत्त प्राप्त झाले नाही. देयकातुन आयकराच्या रकमा वसुल करण्यांत आलेल्या नाहीत

प्रभाग 'अ' बोळींज-विरार विभागाचा मुख्यालयाने वर्ष २०१२-१३ या वित्तीय वर्षात खालीलप्रमाणे कला क्रिडा महोत्सव कार्यक्रमावर खर्च केला आहे.

वर्ष २०११-१२ व २०१२-१३ कला-क्रिडा महोत्सव अ प्रभाग/विरार मुख्यालयाने केलेला खर्च						
प्रमाण क क्र.	दिनांक	स्थूल रक्कम रु.	वजाती रु.	निव्वळ रक्कमरु.	प्रदान	कशासाठी
६१९	०१.०६.२०१२	१३००००	०	१३००००	मे.आकाश इंटरप्रायजेस	चहा व कॉफी
६२०	०१.०६.२०१२	१०२०००	२०४०(IT)	९९९६०	मे.आकाश इंटरप्रायजेस	विद्युत जनरेटर

१९४३	२०.०९.२०१२	३०५९००	०	३०५९००	मे.आकाश इंटरप्रायजेस	फोटोग्राफी,व्हिडीओग्राफी,लाइव्ह टेलिकास्ट
२४४४	३१.१०.२०१२	३०७५७५	०	३०७५७५	मे.शार्वी कॅटर्स	अल्पोपहार, भोजन
२५७१	०६.११.२०१२	१३१८२०	२६३६(LBT)	१२९१८४	मे.आकाश इंटरप्रायजेस	स्टेशनरी,किरकोळ साहित्य
३६५८	२९.०१.२०१३	६०८२१२	१२१६४(IT)	५९६०४८	मे.विजय मंडप डेकोरेटर्स	मंडप,स्टेज,साउंड सिस्टीम व इतर
४१०९	०७.०३.२०१३	२६६८	०	२६६८	मे.महाराणी प्रिंटर्स	फ्लेक्स बोर्ड, प्रसिद्धी खर्च
४१८१	१३.०३.२०१३	९०४०	१८१(LBT)	८८५९	मे.सिलेक्ट इंटरप्रायजेस	किरकोळ स्टेशनरी साहित्य
४२११	१६.०३.२०१३	९२९५०	०	९२९५०	श्री.प्रेमसिंग जाधव	पंच परीक्षक मानधन
४३९१	२६.०३.२०१३	१११२४४	०	१११२४४	मे.महाराणी प्रिंटर्स	फ्लेक्स बोर्ड
४४००	२६.०३.२०१३	५६३९४	०	५६३९४	मे.महाराणी प्रिंटर्स	फ्लेक्स बोर्ड
४४२८	२६.०३.२०१३	११७८५	२३६(LBT)	११५४९	मे.व्हरायटी बुक सेंटर & स्टेशनरी	किरकोळ स्टेशनरी साहित्य
४५४८	३०.०३.२०१३	१३७६५२	०	१३७६५२	मे.अनिरुद्धाय इम्प्रेशन	किरकोळ स्टेशनरी,क्रीडा साहित्य व इतर
४६३९	३०.०३.२०१३	४०३०५०	८०६१(LBT)	३९४९८९	मे.साई स्पोर्ट्स	मेडल व ट्रॉफी साहित्य
४६४१	३०.०३.२०१३	४७८५६	९५७(LBT)	४६८९९	मे.साई स्पोर्ट्स	मेडल व ट्रॉफी साहित्य
४६४२	३०.०३.२०१३	५९४६९	११८९(LBT)	५८२८०	मे.एचएमपी इंटरप्रायजेस	किरकोळ स्टेशनरी साहित्य
	एकूण खर्च	**२५१७६१५**	**२७४६४**	**२४९०१५१**		

उपरोक्त खर्चाबाबत लेखा परीक्षणात अर्धसमास पत्र क्र. १९५, दिनांक ०९/१२/२०१४ अन्वये खालील अनियमीततांबाबत विचारणा केली असता विभागाने दिनांक निरंक नुसार केलेला खुलासा विचारात घेता खालील अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) प्रमाणक १९४३ दिनांक २०/०९/२०१२ अन्वये रक्कम रु.३,०५,९००/- मे. आकाश इंटरप्रायजेस यांना फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी व लाइव्ह टेलिकास्ट यावर खर्च कला आहे. एकूण १६०० फोटो वर रक्कम रु.३०,४००/- व ३५ व्हिडीओ शुटींग फिल्मच्या कॅसेटवर रक्कम रु.१,१५,५००/- खर्च केला आहे. महानगरपालिकेच्या दप्तरी एकूण किती फोटो व सी.डी. उपलब्ध आहेत याबाबत लेखा परीक्षणाची खात्री पटविली नाही. तसेच सदर देयकातून २% आयकर रक्कम रुपये ६,११८/- कपात केली नाही. सदरची रक्कम ठेकेदाराकडून वसुल करण्यांत येईल असा खुलासा विभागाने केला आहे. तरी सदर रक्कम वसुल करुन

संबंधीत अभिलेखे लेखापरीक्षणास दाखवावे.

२) प्रमाणक क्र.४५४८ दिनांक ३०/०३/२०१३ अन्वये रक्कम रु.१३७६५२/- मे. श्री.अनिरुद्ध इम्प्रेशन याना किरकोळ स्टेशनरी साहित्य व क्रीडा साहित्य खरेदीवर खर्च केला आहे. सदर देयकात इलेक्ट्रोल (ओआरएस) पावडर ५० ग्रॅम पावडरची एकूण ५० पाकीटे रु.८० या दराने खरेदी केली आहेत. वस्तुतः इलेक्ट्रोल (ओआरएस) पावडरचे ५० ग्रॅमची पॅकिंगचे उत्पादन बनविले जात नसून मार्केटमध्ये २२ ग्रॅमची पाकीटे उपलब्ध असून त्याची किंमत रु. १७/- आहे. मे. अनिरुद्ध इम्प्रेशन हे निविदाधारक असून वैद्यकीय साहित्य व औषधे विक्रेते नाहीत. निविदेतील अर्हता नुसार पुरवठादार याची स्थानिक संस्था कर नोंदणी प्रमाणपत्र, विक्रीकर प्रमाणपत्र, अनुभव असणे अर्हता होती. त्यानुसार मे. श्री.अनिरुद्ध इम्प्रेशन यांनी निविदा प्रक्रियेत भाग घेतला आहे. त्यांचा इलेक्ट्रोल (ओआरएस) पावडरचा मंजूर दर हा बाजारभावाचा विचार करता खूपच अधिक असल्याचे दिसून येते. त्यांचा मालाचा पुरवठा पोच लक्षात घेता एका पाकिटाची किंमत रक्कम रु.२०/- असणे वाजवी आहे. परंतु सदर प्रकरणी रु.८०/-ने खरेदी केल्याने अंदाजित रु.६०/- याप्रमाणे ५० पाकिटे खरेदीवर रक्कम रु.३०००/- इतका जादा खर्च होऊन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी सदरची रक्कम रु.३०००/- वसुली करणे आवश्यक आहे. तसेच सदर देयकातुन २% आयकर रक्कम रुपये २७५३/- कपात केली नाही. विभागाने केलेल्या खुलाशात इलेक्ट्रोल पावडर ५० ग्रॅमचा दर मागविला होता. परंतु महोत्सवात पॅकेट २२ ग्रॅमच्या पटीत पुरविले आहे असे अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने केलेल्या खुलाशात नमुद केले आहे. हा खुलासा संयुक्तिक नसल्याने सदरची रक्कम व आयकर रक्कम वसुलीची कार्यवाही करावी.

३) मे.सिलेक्ट इंटरप्रायजेस यांचा वर्ष २०११-१२ निविदेमधील बाब चुना प्रती किलोचा दर रु.१०/- इतका कमी असताना वर्ष २०१२-१३ चा मंजूर दर रु.१८.५० प्रमाणे मे. एच.एम.पी. इंटरप्रायजेस यांचेकडून उपरोक्त प्रमाणक क्र. ४६४२ अन्वये २००० किलो चुना खरेदी केल्याने सदर प्रकरणी मागील वर्षाच्या मंजूर दरापेक्षा १०% हून अधिक दराने पुढील वर्षी खरेदी झाल्याने सदर खरेदीत महानगरपालिकेचे रक्कम रु. १७,०००/- चे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. तसेच सदर देयकातुन २% आयकर रक्कम रुपये ११८९/- कपात केली नाही. याबाबत अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने केलेल्या खुलाशात प्राप्त न्युनतम दर रुपये १८.५० हा स्थायी समितीने मंजुर केला होता. सर्व प्रकारच्या वस्तुंचे दर वाहतुकींचे दरवाढीमुळे वाढले आहेत. बाजारभाव दरांशी तुलना चौकशी करुन दर मंजुर केले आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झाले नाही असा खुलासा करण्यांत आला आहे. तथापि प्रत्यक्षात बाजारातील चुना खरेदी दरपत्रके प्राप्त करुन नस्तीत जोडली नाहीत. त्यामुळे सदर खुलासा मान्य करता येत नाही.

४)प्रमाणक क्र. २४४४ दिनांक ३१/१०/२०१२ अन्वये मे. शार्वी कॅटरर्स यांना दिनांक २६/११/२०११ ते ०३/१२/२०११ या कालावधीत पुरविलेल्या अल्पोपहार व भोजन खर्चाचे देयक रक्कम रुपये ३,०७,५७५/- प्रदान केले आहे. मे.शार्वी कॅटरर्स यांना अल्पोपहार प्लेट व शाकाहारी/मांसाहारी प्लेट भोजन पुरवठा करण्याचे कार्यादेश क्र. वविशम/भां/१०१७अ/२०११ दिनांक १०/११/२०११ अन्वये दिले आहेत. दिनांक २६/११/२०११ ते ०३/१२/२०११ पर्यंत कला क्रिडा महोत्सवाचा कालावधी असताना सदर अल्पोपहार व भोजन कोणास दिले व त्याबाबतची उपस्थिती संख्याप्रमाणे बिलात नमूद असलेल्या प्लेटच्या संख्याबाबत लेखा परीक्षणाची साधार अहवालासह खात्री पटली नाही. तसेच सदर देयकातून २% आयकर रक्कम रु. ६१५२/- कपात केली नाही. याबाबत अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने केलेल्या खुलाशात कला क्रिडा महोत्सवात सहभागी पंच, परीक्षक, शिक्षक, मैदानावरील कर्मचारीवर्ग, मान्यवर पाहुणे, पदाधिकारी यांना अल्पोपहार, भोजन व्यवस्था केली होती असे नमुद केले आहे. विभागाने याबाबत महोत्सवाचे इतिवृत्त लेखापरीक्षणास सादर केले नाही, त्यामुळे उपस्थिती संख्या समजली नाही. आयकर २% रक्कम रु.६१५२/- ची वसुली करून रक्कम शासनखाती

भरणा करावी.

५) प्रमाणक क्रमांक ६१९ रक्कम रुपये १,३०,०००/-, प्रमाणक क्रमांक २५७१ रक्कम रुपये १,३१,८२०/-, प्रमाणक क्रमांक ४३९१ रक्कम रुपये १,११,२४४/-, प्रमाणक क्रमांक ४४०० रक्कम रुपये ५६,३९४/-, प्रमाणक क्रमांक ४६३९ रक्कम रुपये ४,०३,०५०/-, प्रमाणक क्रमांक ४६४१ रक्कम रुपये ४७,८५६/-, प्रमाणक क्रमांक ४६४२ रक्कम रुपये ५९,४६९/- या प्रदान देयकातुन आयकराची रक्कम २% कपात केली नाही. याबाबत अर्धसमास पत्राच्या अनुषंगाने केलेल्या खुलासात आयकर रक्कम संबंधित पुरवठादारांकडून वसुल करण्यांत येईल असे नमुद केले आहे. तरी सदरच्या देयकातील एकुण आयकर रक्कम रुपये १८,७९७/- वसुल करावी.

DGPVTTM7001 (Ref No : 148, Hmm No : 195)

62 वाहन भाडयाने घेण्यांबाबत ठेकेदारास झालेल्या अतिप्रदानाबाबत ...

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ब

गुंतलेली रक्कम रु. 810809.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 790109.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 20700.00/-

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या "क" पभाग कार्यालयातील वाहने भाडयाने घेण्यांबाबतच्या देयकात नोंदविलेल्या मागणी दिवसापेक्षा लॉग बुकातील प्रत्यक्ष फिरतीचे दिवस कमी असल्याने ठेकेदारास रु.20700/- चे अतिप्रदान झाले. तसेच 16 वाहनांची लॉग बुक लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध झाली नाहीत.

वसई विरार महानगरपालिकेच्या "क" प्रभाग कार्यालयातील वाहन भाडयाने घेण्यांबाबत जाहिर निविदा मागवुन मे. शिवशंभु यांना काम देण्यांत आले. ठेकेदारासोबत प्रभागाने दि.03/05/2012 रोजी करार केला असुन त्यातील अट क्र.08 नुसार भाडयाची रक्कम प्रतिदिन रु.900/- प्रमाणे मान्य केली आहे. प्रभागाची देयके व संबंधीत महिन्यातील लॉग बुक, वाहने भाडयाने पुरविण्याचा कार्यादेश, करारनामा यांच्या तपशीलाची पडताळणी करण्यांत आली असता देयकात नोंदविलेली मागणी व लॉग बुकामधील प्रत्यक्ष फिरतीचे दिवस यांचेत तफावत आढळून आली. याबाबत लेखापरीक्षणाचे अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक 80, दिनांक 19/08/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला असता विभागाने कोणताही खुलासा सादर केला नाही. लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1.तफावतीचा तपशील -

देयकाचा प्रमाणक	ठेकेदाराचे नांव	पुरविलेल्या वाहनाचा क्रमांक	फिरतीचा	लॉगबुकातील	देयकात	भाडयाचा दर	अदा केले	अनुज्ञेय	अतिप्रदानीत रक्कम

क्रमांक व दिनांक			महिना	नोंदीनुसार फिरतीचे दिवस	मागणी केलेले दिवस	प्रतिदिन	ली रक्कम रु.	रक्कम रु.	रु.
4747/30.3.13	शिवशंभु	एमएच.04/सीझेड-6992	11/12	24	25	900	22500	21600	900
--//--	शिवशंभु	एमएच.04/सीझेड-6992	01/13	23	26	900	23400	20700	2700
4753/30-3-13	शिवशंभु	एमएच.04/सीडी 6096	12/12	24	25	900	22500	21600	900
--//--	शिवशंभु	--//--	11/12	23	24	900	21600	20700	900
--//--	शिवशंभु	--//--	01/13	24	25	900	22500	21600	900
4213/16-3-13	शिवशंभु	एमएच.04/सीडी 6096	4/12	25	27	900	24300	22500	1800
4756/30.3.13	शिवशंभु	एमएच.05/एफ.1633	8/12	23	25	900	22500	20700	1800
--//--	शिवशंभु	--//--	9/12	23	26	900	23400	20700	2700
--//--	शिवशंभु	--//--	10/12	25	26	900	23400	22500	900
4755/30.3.13	शिवशंभु	एमएच04/बीबी.3454	8/12	23	25	900	22500	20700	1800
--//--	शिवशंभु	--//--	10/12	25	26	900	23400	22500	900
4750/30.3.13	शिवशंभु	एमएच.04/सीडी.6096	9/12	21	25	900	22500	18900	3600
4745/30.3.13	शिवशंभु	एमएच.04/व्ही.3429	9/12	27	28	900	25200	24300	900
	एकुण.....								20700

2. तसेच खालील तक्त्यातील वाहने भाडयाने घेंण्याबाबतच्या देयकात दर्शविण्यांत आलेली वाहनांची लॉग बुक लेखापरीक्षणास मागणी करुनही उपलब्ध करुन देण्यांत आली नाहीत. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधीनियम अध्यादेश, 2011 मधील कलम 6 नुसार लेखापरीक्षणास दप्तरी अभीलेखे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्तांची आहे. परंतु विभागाने अभीलेखे उपलब्ध् करुन दिले नाहीत. त्याचा तपशील पुढील प्रमाणे -

अ.क्र.	देयकाचा प्रमाणक क्रमांक व दिनांक	देयकाची स्थुल रक्कम	वाहन क्रमांक
1	4751/30-3-2013	21600	एमएच-04/बीबी-3454
2	4744/30-3-2013	23400	एमएच-04/व्ही-3429

3	4736/30-3-2013	118800	एमएच-04/बीबी-2446
4	4735/30-3-2013	95409	एमएच-04/सीडब्ल्यू-8469
5	4734/30-3-2013	131600	एमएच-04/एफए-1207
6	4741/30-3-2013	62100	एमएच-04/एआर-4607
7	4740/30-3-2013	62100	एमएच-04/एई-4639
8	4748/30-3-2013	21600	एमएच-04/सीझेड-6992
9	4216/16-3-2013	23400	एमएच-04/सीझेड-5478
10	4215/16-3-2013	23400	एमएच-04/सीझेड-5478
11	4214/16-3-2013	23400	एमएच-04/सीझेड-5478
12	4212/16-3-2013	24300	एमएच-04/सीडी-6096
13	4754/30-3-2013	22500	एमएच-04/बीबी-3454
14	4767/30-3-2013	46500	एमएच-48/4-737
15	4766/30-3-2013	45000	एमएच-48/4-737
16	4765/30-3-2013	45000	एमएच-48/4-737
	एकुण ...	**790109**	

क्र. 1 मध्ये दर्शविलेले ठेकेदार शीवशंभो यांना अतिप्रदान केलेली रक्कम रु.20700/- वसुलपात्र आहे. तसेच अ.क्र. 2 बाबत संबंधीत वाहनांची लॉग बुक उपलब्ध न करुन दिल्याने रक्कम रुपये 790109/- चा खर्च आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

DATBBPM6301 (Ref No : 140, Hmm No : 80)

कलम ९ क खालील आक्षेप

वसई विरार मनपा

---------- निरंक ----------

भाग दोन

सर्वसाधारण अनियमितता

कलम ९ ड खालील आक्षेप

63 ड प्रभागातील कोल्ही (ग्रापं)उपविभागाच्या कामातील अनियमितता.

ड प्रभागातील कोल्ही उपप्रभागाच्या कामातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : कर निर्धारक व संकलन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 688347.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 20000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 668347.00/-

ड प्रभागातील उपप्रभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियम पुस्तिके प्रमाणे ठेवले नाहीत, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 कलम 128 नुसार एकत्रित मालमत्ता कराची आकारणी केली नाही, दोन स्वतंत्र रोख वह्या ठेवून अनेक बँक खाती ठेवली आहेत, MRTP ACT 1966 नुसार विकास शुल्काची आकारणी केली नाही, नविन आकारणी नियमानुसार केली नाही, पावती साठा नोंदवही नाही,इत्यादी...

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ड प्रभागातील कोल्ही (ग्रापं) उपविभागाचे कर विभागाचे लेखापरिक्षण केले असता त्यात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 03, दि. 09/06/14 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने दि. 20/06/14 रोजी खुलासा सादर केला आहे. त्या अनुषंगाने लेखा परिक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका 2005 मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६)

तसेच याव्यतिरिक्त

Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)
Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)
Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property & Other Taxes (नमुना P&OT-3)
Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)
तथापि वरील विहीत नमुन्यात मालमत्ता कर वसुलीचे कोल्ही उपविभागाचे लेखे ठेवले नाहीत. विभागाने सदरचे लेखे ठेवण्याची तजविज घेण्यात येईल असा खुलासा केला आहे. सबब सदरचे लेखे ठेवून अनुपालन दाखवावे.

2) ग्रामपंचायत कोल्ही, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ- मध्ये उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक 31 मे, 2011 नुसार महानगरपालिकेत विलीन झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 नियम 128-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी केली नसुन आजतगायत कोल्ही उपविभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे. सदर उपविभागात महापालिका क्षेत्रातील दरानुसार आकारणी करून कर वसुली केली जात नसल्याने महानगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. तसेच कोल्ही उपविभागातील मालमत्ता धारकांकडून शिक्षण कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, विशेष स्वच्छता कर, अग्निशमन उपकर यांची वसूली केली जात नाही. शासनास देय असलेल्या शिक्षण, रोजगार हमी करांची देखील वसुली केली जात नसल्याने, शासनास या करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे.

याबाबत मुख्यालयात विचारणा केली असता 53 पैकी 35 गावांबाबत मा. न्यायालयाने - महानगरपालिकेच्या मालमत्ता कर दराने वसुली करण्यांस स्थगिती आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रचलित दराने (ग्रापं काळातील दराने) कराची वसुली करण्याचे आदेशित केले आहे. याबाबतचे आदेश उपलब्ध करुन देण्यासाठी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.03, दि. 09/06/2014 अन्वये मागणी केली होती. परंतु विभागाने संबंधीत आदेश उपलब्ध करुन दिले नाहीत. याबाबत सर्वसाधारण सभा ठराव क्र.1, दि. 18/02/12 अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 नुसार स्थायी समितीने 2012-13 या वर्षासाठी शिफारस केलेल्या दराचा विचार करून भुतपुर्व ग्रामपंचायत क्षेत्राला वगळून कराच्या आकारणीस मंजूरी दिली आहे. या प्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करुन अनुपालन दाखवावे.

3) ग्रामपंचायत कोल्ही उपविभागाने दैनंदिन वसुलीसाठी रोखवही ठेवली असून सदर रोखवहीत दैनंदिन वसुलीचा हिशेब लिहिला जात आहे. सदर रोखवहीतील 2012-13 वित्तीय वर्षाअखेरच्या शिल्लक रक्कमांचा मेळ घेतला असता 31/3/2013 अखेर पुढील प्रमाणे शिल्लक दाखवली आहे.

पोस्टात (पासबुक नाही)	10.77
को. ऑ.बँक (7/658)	547.01

वसई विरार मनपा

सिंडिकेट बँक (304/49)	6,75,513.62
FD	3,12,000.00
एकूण	9,88,071.40

पोस्टाचे पासबुक दप्तरी उपलब्ध झाले नाही. FD बाबत विचारणा केली असता त्या मुख्यालयात असल्यामुळे उपलब्ध झाल्या नाहीत. ग्रामीण स्तरावर फक्त वसुलीचे काम चालते. वसुली रक्कमा बँकेत भरल्यावर त्याची चलने अभिलेख्यात ठेवली जातात. खर्चाबाबतचे व्यवहार प्रभाग कार्यालय व मुख्य कार्यालयात चालतात. असे असताना ग्रामीण स्तरावर अनेक बँकांच्या शाखेत असणारी जुनी ग्रामपंचायत कालीन खाती अदयाप बंद केली नाहीत. तसेच वसुलीच्या रक्कमा मनपा खाती भरणा केल्या नंतर ग्रामीण स्तरावर शिल्लक रहात नाही. त्यामुळे रोखवहीत असलेली शिल्लक जुन्या ग्रामपंचायत काळातील आहे.

पाणी पट्टी रोकड वही 31/3/2013

सिंडिकेट बँक (220/20876)	रु.	18,221.01
FD	रु.	20,000.00
एकूण	रु.	38,221.01

FD तपासणीस उपलब्ध झाली नाही. त्यामुळे FD मध्ये शिल्लक दाखविलेली रक्कम रुपये 20,000/- लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

4) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (डिसेंबर 2012 पासून) मधील कलम 478, 479 व 480 नुसार कोणतेही बांधकाम लेखी परवानगी मिळाल्याशिवाय केले असेल तर अनधिकृत आहे असे समजण्यात यावे. या तरतुदीनुसार संबंधित मालकास/भोगवटा धारकास लेखी नोटीसी द्वारे ते काढून टाकण्यास किंवा पाडून टाकण्यास फर्मावणे आवश्यक आहे. संबंधितांने न ऐकल्यास असे बांधकाम महापालिकेच्या वतीने काढून टाकले जाईल. अशी अधिनियमात तरतुद असतांना उपविभागात कोणतीही परवानगी न घेता, इमारती, वाणिज्य इमारती बांधल्या जातात, आणि त्यास संबंधित उपविभागाचा लिपिक/समन्वयक टिपणी तयार करून त्यास प्रभागातील कर निरिक्षक/अधिक्षक व प्रभारी सहाय्यक आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानंतर काही प्रकरणात मुख्यालयातील उपायुक्तांची मंजूरी घेतली जाते. काही प्रकरणी आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानुसार ग्रामीण भागातील आकारणी नोंदवहीत मंजूरीचा क्रमांक व दिनांक किंवा टिपणीचा दिनांक नमुद केला जातो. संबंधितास घरपट्टीच्या दुप्पट शास्ती लावली जाते. परंतु आकारणी नोंदवहीत अनधिकृत बांधकाम असा शिक्का मारला जात नाही. अशा प्रकारे आकारणी केल्याने अनधिकृत कामावर नियंत्रण ठेवता येणार नाही. महापालिकेला MRTP ACT 1966 नुसार विकास शुल्कास मुकावे लागते. सबब महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

उदा - अ) मिळकत क्रमांक 683 सिमेंट/विटा, मालक चंद्रकांत गोविंद चौधरी, भोगवटादार राजेश हरिश्चंद्र गुप्ता 0.5 दराने 30 X 40 = 1200 घरपट्टी रु. 600 + दिवा 25 + पाणी 5 + शास्ती

1200 = एकूण कर रु.1830 क्रमांक 29/11-12, दि. 30/5/11 उपआयुक्त यांचे आदेशानुसार. प्रत्यक्षात आदेश उपलब्ध झाला नाही.

ब) मिळकत क्रमांक 606 जयंतीलाल पुरुषोत्तम पंचाल व सुभाष पुरुषोत्तम पंचाल क्षेत्र 900Xदर2=1800+25+5= एकूण कर रु. 1830 या प्रकरणी हस्तांतरण फी वसुल केली नाही. याबाबतचा दस्तऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिला नाही. उपनिबंधक यांच्याकडे केलेल्या करारनाम्याची प्रत उपलब्ध झालेली नाही. उपनिबंधकाकडे दस्तऐवजाची नोंद नसल्याने शासनाच्या मुद्रांक शुल्काचे नुकसान झाले आहे. मुद्रांक शुल्क अनुदानापोटी महापालिकेला मिळणाऱ्या अनुदानाचे नुकसान झाले. या प्रकरणी उपायुक्त यांचे मंजूरी आदेश प्राप्त झाले. परंतु उपनिबंधक यांच्याकडे केलेल्या करारनाम्याची प्रत उपलब्ध झाली नाही.

क) 2012-13 मध्ये वाढीव आकारणी मिळकत क्र. 718 ते 781 पर्यंत केली आहे. संबंधित नोंदवहीत उपप्रभागाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची किंवा अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

ड) नवीन मालमत्ता कर आकारणी प्रकरणांची तपासणी करता असे निदर्शनास आले की, महापालिकेच्यावतीने कर आकारणीच्या काही प्रकरणांच्या टिप्पणी उपायुक्त तर काही अतिरिक्त आयुक्त यांनी मंजुरी दिल्या आहेत, त्यामुळे कर निर्धारक व संकलक यांच्याऐवजी नेमके कोणास अधिकार आहेत याबाबतचे प्राधिकार लेखा परीक्षणास दाखविले नाहीत. तसेच कर आकारणी मंजूर केलेल्या प्रकरणांच्या आकारणी तक्त्यावर संबंधित उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांनी स्वाक्षरी केलेली नाही. सक्षम अधिकाऱ्याने कर आकारणी तक्ता मंजूर करून त्याची प्रत संबंधित भोगवटाधारकास निर्गमित केलेली नाही.

5) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 8 कराधान नियम व वेळोवेळी निर्गमित झालेले शासन निर्णयानुसार बांधकाम पुर्ण झाल्याचा दिनांक व प्रत्यक्षात वापर केल्याचा दिनांक यापैकी जी घटना आधी होईल त्या तारखेपासून/तिमाही पासून कर आकारणी करावयाची आहे. असे असताना पुढील वित्तीय वर्षाच्या सुरवाती पासून/ येणाऱ्या वित्तीय वर्षापासून आकारणी केल्याचे दिसून येते. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

6) उपविभागास कर वसुलीकरीता प्राप्त झालेली पावती पुस्तके, वापरलेली पुस्तके व शिल्लक पुस्तके यांची साठा नोंदवही ठेवलेली नाही.

7) कोल्ही उपप्रभागाचे वसुलीचे प्रमाण सुमारे 60% असुन घरपट्टी, दिवाबत्ती, पाणीपट्टी कराची 31/03/2013 अखेर एकूण थकबाकी रु. 6,68,347/- इतकी आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 प्रकरण 11- कराधान विभाग नियम 128, महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम, 2011नियम 128 नुसार थकबाकी त्वरीत वसुल करून महानगरपालिका फंडात जमा करावी.

64 ड प्रभागातील चिंचोटी (ग्रापं)उपविभागाच्या कामातील अनियमितता.

ड प्रभागातील चिंचोटी उपप्रभागाच्या कामातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : कर निर्धारक व संकलन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 52874.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 52874.00/-

ड प्रभागातील उपप्रभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियम पुस्तिके प्रमाणे ठेवले नाहीत, अधिनियमातील कलम 128 नुसार एकत्रित मालमत्ता कराची आकारणी केली नाही, दोन स्वतंत्र रोख वहया ठेवून अनेक बँक खाती ठेवली आहेत, MRTP ACT 1966 नुसार विकास शुल्काची आकारणी केली नाही, नविन आकारणी नियमानुसार केली नाही, पावती साठा नोंदवही नाही,इत्यादी...

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ड प्रभागातील चिंचोटी (ग्रापं) उपविभागाचे कर विभागाचे लेखा परिक्षण केले असता त्यात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 04, दि. 09/06/14 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने दि. 20/06/14 रोजी खुलासा सादर केला. त्या अनुषंगाने लेखा परिक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका 2005 मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)
दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)
मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)
मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)
बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)
नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)
नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)
परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)
परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)
काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६)
तसेच याव्यतिरिक्त
Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)
Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)
Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property & Other Taxes (नमुना P&OT-3)
Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि वरील विहीत नमुन्यात मालमत्ता कर वसुलीचे चिंचोटी उपविभागाचे लेखे ठेवले नाहीत. विभागाने सदरचे लेखे ठेवण्याची तजविज घेण्यात येईल असा खुलासा केला आहे. सबब सदरचे लेखे ठेवून अनुपालन दाखवावे.

2) ग्रामपंचायत चिंचोटी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक 31 मे, 2011 नुसार महानगरपालिकेत विलीन झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 नियम 128-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी केली नसुन आजतगायत कोल्ही उपविभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे. सदर उपविभागात महापालिका क्षेत्रातील दरानुसार आकारणी करून कर वसूल केला जात नसल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. तसेच चिंचोटी उपविभागातील मालमत्ता धारकांकडून शिक्षण कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, विशेष स्वच्छता कर, अग्निशमन उपकर यांची वसूली केली जात नाही. शासनास देय असलेल्या शिक्षण, रोजगार हमी करांची देखील वसुली केली जात नसल्याने, शासनास या करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे.

याबाबत मुख्यालयात विचारणा केली असता 53 पैकी 35 गावांबाबत मा.न्यायालयाने - महानगरपालिकेच्या मालमत्ता कर दराने वसुली करण्यांस स्थगिती आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रचलित दराने (ग्रापं काळातील दराने) कराची वसुली करण्याचे आदेशित केले आहे. याबाबतचे आदेश उपलब्ध करुन देण्यासाठी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.04, दि. 09/06/2014 अन्वये मागणी केली होती. परंतु विभागाने संबंधीत आदेश उपलब्ध करुन दिले नाहीत. याबाबत सर्वसाधारण सभा ठराव क्र. 1, दि. 18/02/12 अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 नुसार स्थायी समिती 2012-13 या वर्षासाठी शिफारस केलेल्या दराचा विचार करून भुतपुर्व ग्रामपंचायत क्षेत्राला वगळून कराच्या आकारणीस मंजूरी दिली आहे. या प्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करुन अनुपालन दाखवावे.

3) ग्रामपंचायत चिंचोटी उपविभागाने दैनंदिन वसुलीसाठी रोखवही ठेवली असून सदर रोखवहीत दैनंदिन वसुलीचा हिशेब लिहिला जात आहे सदर रोखवहीतील 2012-13 वित्तीय वर्षाअखेरच्या शिल्लक रक्कमांचा मेळ घेतला असता 31/3/2013 अखेर पुढील प्रमाणे शिल्लक दाखवली आहे.

सिंडिकेट बँक (6775)	66,279.87	
को. ऑ.बँक (7659)		538.30
FD	31,000.00	
एकूण		**97,818.17**

FD बाबत विचारणा केली असता त्या मुख्यालयात असल्यामुळे उपलब्ध झाल्या नाहीत. ग्रामीण स्तरावर फक्त वसुलीचे काम चालते. वसुली रक्कमा बँकेत भरल्यावर त्याची चलने अभिलेख्यात ठेवली जातात. खर्चाबाबतचे व्यवहार प्रभाग कार्यालय व मुख्य कार्यालयात चालतात. असे असताना ग्रामीण स्तरावर अनेक बँकांच्या शाखेत असणारी जुनी खाती ग्रामपंचायत कालीन अदयाप पर्यंत बंद न करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. तसेच वसुलीच्या रक्कमा मनपा खाती

भरणा केल्या नंतर ग्रामीण स्तरावर शिल्लक रहात नाही. त्यामुळे रोख वहीत शिलकेचा तपशिल लिहिण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

पाणी पट्टी रोकड वही 31/3/2013

सिंडिकेट बँक (220/20987)	6,835.95
FD	5,000.00
एकूण	**11,835.95**

FD तपासणीस उपलब्ध झाली नाही.

उपरोक्त FD 31000 + 5000 उपलब्ध न झाल्याने लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

4) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (डिसेंबर 2012 पासून) मधील कलम 478, 479 व 480 नुसार कोणतेही बांधकाम लेखी परवानगी मिळाल्याशिवाय केले असेल तर अनधिकृत आहे असे समजण्यात यावे. या तरतुदीनुसार संबंधित मालकास/भोगवटा धारकास लेखी नोटीसी द्वारे ते काढून टाकण्यास किंवा पाडून टाकण्यास फर्मावणे आवश्यक आहे. संबंधितांने न ऐकल्यास असे बांधकाम महापालिकेच्या वतीने काढून टाकले जाईल. अशी अधिनियमात तरतुद असतांना उपविभागात कोणतीही परवानगी न घेता, इमारती, वाणिज्य इमारती बांधल्या जातात, आणि त्यास संबंधित उपविभागाचा लिपिक/समन्वयक टिपणी तयार करून त्यास प्रभागातील कर निरिक्षक/अधिक्षक व प्रभारी सहाय्यक आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानंतर काही प्रकरणात मुख्यालयातील उपायुक्तांची मंजूरी घेतली जाते. काही प्रकरणी आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानुसार ग्रामीण भागातील आकारणी नोंदवहीत मंजूरीचा क्रमांक व दिनांक किंवा टिपणीचा दिनांक नमुद केला जातो. संबंधितास घरपट्टीच्या दुप्पट शास्ती लावली जाते. परंतु आकारणी नोंदवहीत अनधिकृत बांधकाम असा शिक्का मारला जात नाही. अशा प्रकारे आकारणी केल्याने अनधिकृत कामावर नियंत्रण ठेवता येणार नाही. महापालिकेला MRTP ACT 1966 नुसार विकास शुल्कास मुकावे लागते. सबब महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

उदा - अ) मिळकत क्रमांक 28 RCC रत्नदिप प्रॉपर्टिझ ॲण्ड प्रा.लि. स्वत: धरमेंद्र आर. पाल व इतर 7 यांचे नांवे फेरफार केला. 0.80 पैसे दर - 58 X 34 x 2 = रु.3944 म्हणून 0.80 पैसे दराने घरपट्टी 3154+25+25= एकूण कर रु. 3204 दिनांक 18/3/2013 पासून फेरफार मंजूर. या प्रकरणी हस्तांतरण फी वसुल केली नाही. उपनिबंधक यांच्याकडे केलेल्या करारनाम्याची प्रत उपलब्ध झालेली नाही. उपनिबंधकाकडे दस्तऐवजाची नोंद केली नाही. शासनाच्या मुद्रांक शुल्काचे नुकसान झाले व मुद्रांक शुल्क अनुदानापोटी महापालिकेला मिळणाऱ्या अनुदानाचे नुकसान झाले. या प्रकरणी सहाय्यक आयुक्तांचा आदेश नाही.

ब) 2012-13 मध्ये वाढीव आकारणी मिळकत क्र. 393 ते 411 पर्यंत केली आहे. संबंधित नोंदवहीत उपप्रभागाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची किंवा अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

क) नवीन मालमत्ता कर आकारणी प्रकरणांची तपासणी करता असे निदर्शनास आले की, महापालिकेच्यावतीने कर आकारणीच्या काही प्रकरणांच्या टिप्पणी उपायुक्त तर काही अतिरिक्त आयुक्त यांनी मंजुरी दिल्या आहेत

त्यामुळे कर निर्धारक व संकलक यांच्याऐवजी नेमके कोणास अधिकार आहेत याबाबतचे प्राधिकार लेखा परीक्षणास दाखविले नाहीत. तसेच कर आकारणी मंजूर केलेल्या प्रकरणांच्या आकारणी तक्त्यावर संबंधित उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांनी स्वाक्षरी केलेली नाही. सक्षम अधिकाऱ्याने कर आकारणी तक्ता मंजूर करून त्याची प्रत संबंधित भोगवटाधारकास निर्गमित केलेली नाही.

5) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 8 कराधान नियम व वेळोवेळी निर्गमित झालेले शासन निर्णयानुसार बांधकाम पुर्ण झाल्याचा दिनांक व प्रत्यक्षात वापर केल्याचा दिनांक यापैकी जी घटना आधी होईल त्या तारखेपासून/तिमाही पासून कर आकारणी करावयाची आहे. असे असताना पुढील वित्तीय वर्षाच्या सुरवाती पासून/ येणाऱ्या वित्तीय वर्षापासून आकारणी केल्याचे दिसून येते. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

6) उपविभागास कर वसुलीकरीता प्राप्त झालेली पावती पुस्तके, वापरलेली पुस्तके व शिल्लक पुस्तके यांची साठा नोंदवही ठेवलेली नाही.

7) चिंचोटी उपप्रभागाच्या वसुलीचे प्रमाण सुमारे 78 टक्के असुन - घरपटटी, दिवाबत्ती, पाणीपटटी कराची 31/03/2013 अखेर एकूण थकबाकी रुपये 52,874/- इतकी आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम,1949 प्रकरण 11- कराधान विभाग नियम 128, महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम, 2011नियम 128 नुसार थकबाकी त्वरीत वसुल करून महानगरपालिका फंडात जमा करावी.

DATPMVM6001 (Ref No : 2, Hmm No : 04)

65 ड प्रभागातील देवदळ (ग्रापं)उपविभागाच्या कामातील अनियमितता.

ड प्रभागातील देवदळ उपप्रभागाच्या कामातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : कर निर्धारक व संकलन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 3248905.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1225000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 2023905.00/-

ड प्रभागातील उपप्रभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियम पुस्तिके प्रमाणे ठेवले नाहीत, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 128 नुसार एकत्रित मालमत्ता कराची आकारणी केली नाही, दोन स्वतंत्र रोख वहया ठेवून अनेक बँक खाती ठेवली आहेत, MRTP ACT 1966 नुसार विकास शुल्काची आकारणी केली नाही, नविन आकारणी नियमानुसार केली नाही, पावती साठा नोंदवही नाही,इत्यादी...

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ड प्रभागातील देवदळ (ग्रापं) उपविभागाचे कर विभागाचे लेखा परिक्षण केले असता त्यात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 05,

दि. 09/06/14 अन्वये खुलासा विचारला होता.विभागाने दि. 20/06/14 रोजी खुलासा सादर केला आहे. त्या अनुषंगाने लेखा परिक्षणात पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका 2005 मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच

याव्यतिरिक्त

Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)

Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)

Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property &

Other Taxes (नमुना P&OT-3)

Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि वरील विहीत नमुन्यात मालमत्ता कर वसुलीचे देवदळ उपविभागाचे लेखे ठेवले नाहीत. विभागाने सदरचे लेखे दाखविण्याची तजवीज घेण्यात येईल असा खुलासा केला आहे.सदरचे लेखे ठेवून अनुपालन दाखवावे.

2) ग्रामपंचायत देवदळ, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ- मध्ये उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक 31 मे, 2011 नुसार महानगरपालिकेत विलीन झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 नियम 128-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी केली

नसुन आजतागायत देवदळ उपविभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे. त्यामुळे सदर विभागात महापालिका क्षेत्रातील दरानुसार आकारणी करून कर वसूल केला जात नसल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर देवदळ उपविभागातील मालमत्ताधारकांकडून शिक्षण कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, विशेष स्वच्छता कर, अग्निशमन उपकर यांची वसूली केली जात नाही. शासनास देय असलेल्या शिक्षण, रोजगार हमी करांची देखील वसुली केली जात नसल्याने, शासनास या करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे.

याबाबत मुख्यालयात विचारणा केली असता 53 पैकी 35 गावांबाबत मा.न्यायालयाने – महानगरपालिकेच्या मालमत्ता कर दराने वसुली करण्यांस स्थगिती आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रचलित दराने (ग्रापं काळातील दराने) कराची वसुली करण्याचे आदेशित केले आहे. याबाबतचे आदेश उपलब्ध करुन देण्यासाठी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.05, दि. 09/06/2014 अन्वये मागणी केली होती. परंतु विभागाने संबंधीत आदेश उपलब्ध करुन दिले नाहीत. याबाबत सर्वसाधारण सभा ठराव क्र. 1, दि. 18/02/12 अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 नुसार स्थायी समिती 2012-13 या वर्षासाठी शिफारस केलेल्या दराचा विचार करून भुतपुर्व ग्रामपंचायत क्षेत्राला वगळून कराच्या आकारणीस मंजूरी दिली आहे. या प्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करुन अनुपालन दाखवावे.

3) ग्रामपंचायत देवदळ उपविभागाने दैनंदिन वसुलीसाठी रोखवही ठेवली असून सदर रोखवहीत दैनंदिन वसुलीचा हिशेब लिहिला जात आहे. सदर रोखवहीतील वित्तीय वर्षाअखेरच्या शिल्लक रक्कमांचा मेळ घेतला असता 31/3/2013 अखेर पुढील प्रमाणे शिल्लक दाखवली आहे.

सिंडिकेट बँक (220/7020)	9,67,370.79
FD	12,25,000.00
एकूण	21,92,370.79

FD बाबत विचारणा केली असता त्या मुख्यालयात असल्यामुळे उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे FD म्हणून दाखविलेली रक्कम रु.12,25,000/-लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे. सिंडिकेट बँकेच्या पासबुकात रक्कम रु. 968347.79 आहे.म्हणजेच रोख वहीतील शिल्लक आणि पासबुकातील शिल्लक यामध्ये तफावत आहे. बँक बाकी मेळपत्रक तयार केलेले नाही. ग्रामीण स्तरावर फक्त वसुलीचे काम चालते. वसुली रक्कमा बँकेत भरल्यावर त्याची चलने अभिलेख्यात ठेवली जातात. खर्चाबाबतचे व्यवहार प्रभाग कार्यालय व मुख्य कार्यालयात चालतात. असे असताना ग्रामीण स्तरावर अनेक बँकांच्या शाखेत असणारी जुनी ग्रामपंचायत कालीन खाती अदयाप पर्यंत बंद केली नाहीत. तसेच वसुलीच्या रक्कमा मनपा खाती भरणा केल्या नंतर ग्रामीण स्तरावर शिल्लक रहात नाही. त्यामुळे रोख वहीत शिल्लकेचा तपशिल लिहिण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

4) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (डिसेंबर 2012 पासून) मधील कलम 478, 479 व 480 नुसार कोणतेही बांधकाम लेखी परवानगी मिळाल्याशिवाय केले असेल तर अनधिकृत आहे असे समजण्यात येते. या तरतुदीनुसार संबंधित मालकास/भोगवटा धारकास लेखी नोटीसी द्वारे ते काढून टाकण्यास किंवा पाडून टाकण्यास फर्मावणे आवश्यक आहे. संबंधितांने न ऐकल्यास असे बांधकाम महापालिकेच्यावतीने काढून टाकले जाईल.अशी अधिनियमात

तरतुद असतांना उपविभागात कोणतीही परवानगी न घेता, इमारती, वाणिज्य इमारती बांधल्या जातात, आणि त्यास संबंधित उपविभागाचा लिपिक/समन्वयक टिपणी तयार करून त्यास प्रभागातील कर निरिक्षक/अधिक्षक व प्रभारी सहाय्यक आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानंतर काही प्रकरणात मुख्यालयातील उपआयुक्तांची मंजूरी घेतली जाते. काही प्रकरणी आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानुसार ग्रामीण भागातील आकारणी नोंदवहीत मंजूरीचा क्रमांक व दिनांक किंवा टिपणीचा दिनांक नमुद केला जातो. संबंधितास घरपट्टीच्या दुप्पट शास्ती लावली जाते. परंतु आकारणी नोंदवहीत अनधिकृत बांधकाम असा शिक्का मारला जात नाही. अशा प्रकारे आकारणी केल्याने अनधिकृत कामावर नियंत्रण ठेवता येणार नाही. महापालिकेला MRTP ACT 1966 नुसार विकास शुल्कास मुकावे लागते. सबब महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

उदा - अ) मिळकत क्रमांक 341 अ -1 लकी कंपाउंड अब्दुल करीम व इतर 120 x 27 = 3240 x दर0.80 पैसे= 2595+38= 2630 कर. फेरफार क्र. 79/12-13, दि. 2/3/12 अन्वये मंजूर. या प्रकरणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949कलम 149 अ अन्वये हस्तांतरण फी वसुल केली नाही.उपनिबंधक यांच्याकडे केलेल्या करारनाम्याची प्रत उपलब्ध झालेली नाही. उपनिबंधकाकडे दस्तऐवजाची नोंद केली नाही. शासनाच्या मुद्रांक शुल्काचे नुकसान झाले आहे व मुद्रांक शुल्क अनुदानापोटी महापालिकेला मिळणाऱ्या अनुदानाचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी सहाय्यक आयुक्तांचा आदेश नाही.

ब) 2012-13 मध्ये वाढीव आकारणी मिळकत क्र. 629 ते 636 पर्यंत केली आहे. संबंधित नोंदवहीत उपप्रभागाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची किंवा अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.त्यामुळे जबाबदारी निश्चित करता येत नाही.

क) नवीन मालमत्ता कर आकारणी प्रकरणांची तपासणी करता असे निदर्शनास आले की, महापालिकेच्यावतीने कर आकारणीच्या काही प्रकरणांच्या टिप्पणी उपायुक्त तर काही अतिरिक्त आयुक्त यांनी मंजुरी दिल्या आहेत त्यामुळे कर निर्धारक व संकलक यांच्याऐवजी नेमके कोणास अधिकार आहेत याबाबतचे प्राधिकार लेखा परीक्षणास दाखविले नाहीत. तसेच कर आकारणी मंजूर केलेल्या प्रकरणांच्या आकारणी तक्त्यावर संबंधित उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांनी स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे सक्षम अधिकाऱ्याने कर आकारणी तक्ता मंजूर करून त्याची प्रत संबंधित भोगवटाधारकास निर्गमित केलेली नाही.

5) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 8 कराधान नियम व वेळोवेळी निर्गमित झालेले शासन निर्णयानुसार बांधकाम पुर्ण झाल्याचा दिनांक व प्रत्यक्षात वापर केल्याचा दिनांक यापैकी जी घटना आधी होईल त्या तारखेपासून/तिमाही पासून कर आकारणी करावयाची आहे. असे असताना पुढील वित्तीय वर्षाच्या सुरवाती पासून/ येणाऱ्या वित्तीय वर्षापासून आकारणी केल्याचे दिसून येते. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

6) उपविभागास प्राप्त झालेली कर वसुलीची पावती पुस्तके, वापरलेली पुस्तके व शिल्लक पुस्तके यांची साठा नोंदवही ठेवलेली नाही.

7) देवदळ उपप्रभागाच्या कराच्या वसुलीचे प्रमाण सुमारे 60 टक्के असुन घरपटटी, दिवाबत्ती व पाणीपटटी कराची 31/03/2013 अखेर एकूण थकबाकी रुपये 2023905 इतकी आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका

अधीनियम,1949 प्रकरण 11- कराधान विभाग नियम 128, महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम,2011 नियम 128 नुसार थकबाकी त्वरीत वसुल करून महानगरपालिका फंडात जमा करावी.

DATPMVM6001 (Ref No : 3, Hmm No : 05)

66 ई प्रभागातील नायगांव (ग्रापं)उपविभागाच्या कामातील अनियमितता.

ई प्रभागातील नायगांव उपप्रभागाच्या कामातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : कर निर्धारक व संकलन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1335150.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1335150.00/-

ई प्रभागातील उपप्रभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियम पुस्तिके प्रमाणे ठेवले नाहीत, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 कलम 128 नुसार एकत्रित मालमत्ता कराची आकारणी केली नाही, MRTP ACT 1966 नुसार विकास शुल्काची आकारणी केली नाही, नविन आकारणी नियमानुसार केली नाही, भुईभाडे, गाळाभाडे ची वसुली 13 टक्के आहे. मालकीच्या सभागृहाच्या भाडयाबाबत, कराच्या थकबाकीबाबत इत्यादी...

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ई प्रभागातील नायगांव (ग्रापं) उपविभागाचे कर विभागाचे लेखा परिक्षण केले असता त्यात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 06, दि. 09/06/14 अन्वये खुलासा विचारला होता.विभागाने दि. 14/06/14 रोजी खुलासा सादर केला आहे. त्या अनुषंगाने लेखा परिक्षणात पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका 2005 मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

वसई विरार मनपा

बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच

याव्यतिरिक्त

Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)

Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)

Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property &

Other Taxes (नमुना P&OT-3)

Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि वरील विहीत नमुन्यात मालमत्ता कर वसुलीचे नायगांव उपविभागाचे लेखे ठेवले नाहीत. विभागाने सदरचे लेखे ठेवले जातील असा खुलासा केला आहे.सबब सदरचे लेखे ठेवून अनुपालन दाखवावे.

2) ग्रामपंचायत नायगांव, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ- मध्ये उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक 31 मे, 2011 नुसार महानगरपालिकेत विलीन झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 नियम 128-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी केली नसुन आजतागायत कोल्ही उपविभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे.त्यामुळे सदर विभागात महापालिका क्षेत्रातील दरानुसार आकारणी करून कर वसूल केला जात नसल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर नायगांव उपविभागातील मालमत्ताधारकांकडून शिक्षण कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, विशेष स्वच्छता कर, अग्निशमन उपकर यांची वसूली केली जात नाही. शासनास देय असलेल्या शिक्षण, रोजगार हमी करांची देखील वसुली केली जात नसल्याने, शासनास या करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे.

याबाबत मुख्यालयात विचारणा केली असता 53 पैकी 35 गावांबाबत मा.न्यायालयाने – महानगरपालिकेच्या मालमत्ता कर दराने वसुली करण्यांस स्थगिती आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रचलित दराने (ग्रापं काळातील दराने) कराची वसुली करण्याचे आदेशित केले आहे. याबाबतचे आदेश उपलब्ध करुन देण्यासाठी अर्धसमास

ज्ञापन पत्र क्र.06, दि. 09/06/2014 अन्वये मागणी केली होती. परंतु विभागाने संबंधीत आदेश उपलब्ध करुन दिले नाहीत. याबाबत सर्वसाधारण सभा ठराव क्र. 1, दि. 18/02/12 अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 नुसार स्थायी समिती 2012-13 या वर्षासाठी शिफारस केलेल्या दराचा विचार करून भुतपुर्व ग्रामपंचायत क्षेत्राला वगळून कराच्या आकारणीस मंजूरी दिली आहे. या प्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करुन अनुपालन दाखवावे.

3) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (डिसेंबर 2012 पासून) मधील कलम 478, 479 व 480 नुसार कोणतेही बांधकाम लेखी परवानगी मिळाल्याशिवाय केले असेल तर अनधिकृत आहे असे समजण्यात येते. या तरतुदी नुसार संबंधित मालकास/भोगवटा धारकास लेखी नोटीसी द्वारे ते काढून टाकण्यास किंवा पाडून टाकण्यास फर्मावणे आवश्यक आहे. संबंधितांने न ऐकल्यास असे बांधकाम महापालिकेच्या वतीने काढून टाकले जाईल. अशी अधिनियमात तरतुद असतांना उपविभागात कोणतीही परवानगी न घेता, इमारती, वाणिज्य इमारती बांधल्या जातात, आणि त्यास संबंधित उपविभागाचा लिपिक/समनव्यक टिपणी तयार करून त्यास प्रभागातील कर निरिक्षक/अधिक्षक व प्रभारी सहाय्यक आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानंतर काही प्रकरणात मुख्यालयातील उपायुक्तांची मंजूरी घेतली जाते.काही प्रकरणी आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानुसार ग्रामीण भागातील आकारणी नोंदवहीत मंजूरीचा क्रमांक व दिनांक किंवा टिपणीचा दिनांक नमुद केला जातो. संबंधितास घरपट्टीच्या दुप्पट शास्ती लावली जाते. परंतु आकारणी नोंदवहीत अनधिकृत बांधकाम असा शिक्का मारला जात नाही. अशा प्रकारे आकारणी केल्याने अनधिकृत कामावर नियंत्रण ठेवता येणार नाही. महापालिकेला MRTP ACT 1966 नुसार विकास शुल्कास मुकावे लागते. सबब महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

उदा - अ) 2012-13 मध्ये वाढीव आकारणी मिळकत क्र. 440 ते 441 (क) पर्यंत 13 प्रकरणे आहेत. अशी आकारणी करताना दुप्पट शास्ती लावून घरपट्टी ची आकारणी केली आहे. फेरफार करतांना हस्तांतरण फी वसुल केली नाही.उपनिबंधक यांच्याकडे केलेल्या करारनाम्याची प्रत उपलब्ध झालेली नाही. उपनिबंधकाकडे दस्तऐवजाची नोंद केली नाही. शासनाच्या मुद्रांक शुल्काचे नुकसान झाले आहे व मुद्रांक शुल्क अनुदानापोटी महापालिकेला मिळणाऱ्या अनुदानाचे नुकसान झाले आहे.

ब) 2012-13 मध्ये वाढीव आकारणी मिळकत क्र.440 ते 441 (क) पर्यंत केली आहे. संबंधित नोंदवहीत उपप्रभागाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची किंवा अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. त्यामुळे जबाबदारी निश्चित करता येत नाही.

क) नवीन मालमत्ता कर आकारणी प्रकरणांची तपासणी करता असे निदर्शनास आले की, महापालिकेच्यावतीने कर आकारणीच्या काही प्रकरणांच्या टिप्पणी उपायुक्त तर काही अतिरिक्त आयुक्त यांनी मंजुरी दिल्या आहेत त्यामुळे कर निर्धारक व संकलक यांच्याऐवजी नेमके कोणास अधिकार आहेत याबाबतचे प्राधिकार लेखापरीक्षणास दाखविले नाहीत. तसेच कर आकारणी मंजूर केलेल्या प्रकरणांच्या

आकारणी तक्त्यावर संबंधित उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांनी स्वाक्षरी केलेली नाही. सक्षम अधिकाऱ्याने कर आकारणी तक्ता मंजूर करून त्याची प्रत संबंधित भोगवटाधारकास निर्गमित केलेली नाही.

4) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण 8 कराधान नियम व वेळोवेळी निर्गमित झालेले शासन निर्णयानुसार बांधकाम पुर्ण झाल्याचा दिनांक व प्रत्यक्षात वापर केल्याचा दिनांक यापैकी जी घटना आधी होईल त्या तारखेपासून/तिमाही पासून कर आकारणी करावयाची आहे. असे असताना सर्वच प्रकरणात पुढील वित्तीय वर्षाच्या सुरवाती पासून/ येणाऱ्या वित्तीय वर्षापासून आकारणी केल्याचे दिसून येते. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

5) नायगांव उपविभागात भुईभाडे, गाळाभाडे यांची वसुली नोंदवही पहाता 2012-13 मध्ये थकबाकी रु. 8,39,312 इतकी आहे. वसुलीचे प्रमाण सुमारे 13% आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 79 (अ) नुसार जुन्या काळाच्या भुईभाडे आणि गाळेभाडेच्या रक्कमा वसुली करण्याचा प्रयत्न उपविभागाने केला नाही.

6) उपविभागात ऋषी वाल्मिकी सभागृह नावाचे मंगल कार्यालय आहे. हे महापालिकेच्या मालकीचे आहे. त्याचा प्रतिदिन दर रु. 8,000 आहे. त्यासाठी अनामत रक्कम रु. 3,000 आहे. ग्रामपंचायत काळापासून म्हणजे 2007 पासून सदरच्या सभागृहाचा दर तोच आहे. सभागृहाची क्षमता सुमारे 800 ते 1000 लोकांची आहे. देखभाल दुरुस्ती, विद्युत पाण्याचा खर्च महापालिकेला करावा लागतो. महापालिकेच्या उत्पन्नाची साधन असूनही अद्याप पर्यंत म्हणजे सुमारे 7 वर्षे झाली तरी मंगल कार्यालयाच्या भाड्यात वाढ केली नाही. खर्चाच्या प्रमाणात भाडे वाढीचा विचार व्हावा.

7) नायगावं उपप्रभागाच्या कराच्या वसुलीचे प्रमाण सुमारे 70 टक्के असुन घरपटटी, दिवाबत्ती इ. कराची 31/03/2013 अखेर एकूण थकबाकी रुपये 495838 इतकी आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम,1949 प्रकरण 11- कराधान विभाग नियम 128, महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम,2011 नियम 128 नुसार थकबाकी त्वरीत वसुल करून महानगरपालिका फंडात जमा करावी.

DATPMVM6001 (Ref No : 4, Hmm No : 06)

67 ड प्रभागातील सातिवली (ग्रापं)उपविभागाच्या कामातील अनियमितता.

ड प्रभागातील सातिवली उपप्रभागाच्या कामातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : कर निर्धारक व संकलक मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 4711404.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 4711404.00/-

ड प्रभागातील उपप्रभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियम पुस्तिके प्रमाणे ठेवले नाहीत, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 कलम 128 नुसार एकत्रित मालमत्ता कराची आकारणी केली नाही, MRTP ACT 1966 नुसार विकास शुल्काची आकारणी केली नाही, नविन आकारणी नियमानुसार केली नाही, भुईभाडे, गाळाभाडे ची वसुली 13 टक्के आहे. मालकीच्या सभागृहाच्या भाडयाबाबत, कराच्या थकबाकीबाबत अनियमीतता

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ड प्रभागातील सातिवली (ग्रापं) उपविभागाचे लेखा परिक्षण केले असता त्यात आढळून आलेल्या अनियमिततेबाबत विभागाला अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.07, दि. 09/06/2014 अन्वये खुलासा विचारला होता.विभागाने दि. 20/06/2014 रोजी खुलासा सादर केला आहे. लेखा परिक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका 2005 मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच

याव्यतिरिक्त

Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)

Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)

वसई विरार मनपा

Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property &

Other Taxes (नमुना P&OT-3)

Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि वरील विहीत नमुन्यात मालमत्ता कर वसुलीचे सातिवली उपविभागाचे लेखे ठेवले नाहीत. विभागाने सदरची लेखे ठेवण्याची तजवीज घेण्यात येईल असा खुलासा केला आहे.सदरचे लेखे ठेवून अनुपालन दाखवावे.

2) ग्रामपंचायत सातिवली, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक 31 मे, 2011 नुसार महानगरपालिकेत विलीन झाली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 नियम 128-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी केली नसुन आजतगायत कोल्ही उपविभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे.त्यामुळे सदर विभागात महापालिका क्षेत्रातील दरानुसार आकारणी करून कर वसूल केला जात नसल्याने महानगरपालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर सातिवली उपविभागातील मालमत्ताधारकांकडून शिक्षण कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, विशेष स्वच्छता कर, अग्निशमन उपकर यांची वसूली केली जात नाही. शासनास देय असलेल्या शिक्षण, रोजगार हमी करांची देखील वसुली केली जात नसल्याने, शासनास या करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे.

याबाबत मुख्यालयात विचारणा केली असता 53 पैकी 35 गावांबाबत मा.न्यायालयाने - महानगरपालिकेच्या मालमत्ता कर दराने वसुली करण्यांस स्थगिती आदेश दिले आहेत.त्यामुळे प्रचलित दराने (ग्रापं काळातील दराने) कराची वसुली करण्याचे आदेशित केले आहे. याबाबतचे आदेश उपलब्ध करुन देण्यासाठी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.0७, दि. 09/06/2014 अन्वये मागणी केली होती. परंतु विभागाने संबंधीत आदेश उपलब्ध करुन दिले नाहीत. याबाबत सर्वसाधारण सभा ठराव क्र. 1, दि. 18/02/12 अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 नुसार स्थायी समिती 2012-13 या वर्षासाठी शिफारस केलेल्या दराचा विचार करून भुतपुर्व ग्रामपंचायत क्षेत्राला वगळून कराच्या आकारणीस मंजूरी दिली आहे. या प्रकरणी मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करुन अनुपालन दाखवावे.

3) ग्रामपंचायत सातिवली उपविभागाने दैनंदिन वसुलीसाठी रोखवही ठेवली असून सदर रोखवहीत दैनंदिन वसुलीचा हिशेब लिहिला जात आहे. सदर रोखवहीतील 2012-13 वित्तीय वर्षअखेरच्या शिल्लक रक्कमांचा मेळ घेतला असता 31/3/2013 अखेर पुढील प्रमाणे शिल्लक दाखवली आहे.

अ.क्र	योजनेचे नांव	बँकेचे नांव	खाते क्र.	रोकड वहीतील जमा रु.

	वसई-विरार शहर महानगरपालिका फंड	देना बँक, दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक डाक घर बचत (पोस्ट खाते)	100210001075 030/695 6400302	5735447.23 4419.95 1000
2	बारावा वित्त आयोग	देना बँक भारतीय स्टेट बँक	100210003630 3004307913-7	1205 1080
3	महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजना	देना बँक	100210003392	1080
4	दलित वस्ती सुधार योजना	देना बँक	100210001590	1066
5	ग्राम पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता समिती	देना बँक	100210002303	1145
एकूण				**5746443.18**

ग्रामीण स्तरावर फक्त वसुलीचे काम चालते. वसुली रक्कमा बँकेत भरल्यावर त्याची चलने अभिलेख्यात ठेवली जातात. खर्चाबाबतचे व्यवहार प्रभाग कार्यालय व मुख्य कार्यालयात चालतात. असे असताना ग्रामीण स्तरावर अनेक बँकांच्या शाखेत असणारी जुनी खाती अदयाप पर्यंत बंद न करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. तसेच वसुलीच्या रक्क्मा मनपा खाती भरणा केल्या नंतर ग्रामीण स्तरावर शिल्लक रहात नाही. उपरोक्त शिल्लक ही जुन्या काळातील आहे. याबाबत मुख्यालयातील लेखा शाखेकडे पत्रव्यवहार करुन उचित कार्यवाही करावी.

4) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (डिसेंबर 2012 पासून) मधील कलम 478, 479 व 480 नुसार कोणतेही बांधकाम लेखी परवानगी मिळाल्याशिवाय केले असेल तर अनधिकृत आहे असे समजण्यात येते. या तरतुदीनुसार संबंधित मालकास/भोगवटा धारकास लेखी नोटीसी द्वारे ते काढून टाकण्यास किंवा पाडून टाकण्यास फर्मावणे आवश्यक आहे. संबंधितांने न ऐकल्यास असे बांधकाम महापालिकेच्या वतीने काढून टाकले जाईल. अशी अधिनियमात तरतुद असतांना उपविभागात कोणतीही परवानगी न घेता, इमारती, वाणिज्य इमारती बांधल्या जातात, आणि त्यास संबंधित उपविभागाचा लिपिक/समन्वयक

टिपणी तयार करून त्यास प्रभागातील कर निरिक्षक/अधिक्षक व प्रभारी सहाय्यक आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानंतर काही प्रकरणात मुख्यालयातील उपआयुक्त दर्जाचे अधिकारी मंजूरी देतात. काही प्रकरणी आयुक्तांची मंजूरी घेतली जाते. त्यानुसार ग्रामीण भागातील आकारणी नोंदवहीत मंजूरीचा क्रमांक व दिनांक किंवा टिपणीचा दिनांक नमुद केला जातो. संबंधितास घरपट्टीच्या दुप्पट शास्ती लावली जाते. परंतु आकारणी नोंदवहीत अनधिकृत बांधकाम असा शिक्का मारला जात नाही. अशा प्रकारे आकारणी केल्याने अनधिकृत कामावर नियंत्रण ठेवता येणार नाही. महापालिकेला MRTP ACT 1966 नुसार विकास शुल्कास मुकावे लागते. सबब महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. अशी एकुण 113 प्रकरणे आहेत.

अ) 2012-13 मध्ये वाढीव आकारणी मिळकत क्र. 6731 ते 6843 पर्यंत 113 प्रकरणे आहेत. अशी आकारणी करताना दुप्पट शास्ती लावून घरपट्टी ची आकारणी केली आहे. फेरफार करतांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 149 अ अन्वये हस्तांतरण फी वसुल केली नाही.उपनिबंधक यांच्याकडे केलेल्या करारनाम्याची प्रत उपलब्ध झालेली नाही.उपनिबंधकाकडे दस्तऐवजाची नोंद केली नाही. शासनाच्या मुद्रांक शुल्काचे नुकसान झाले व मुद्रांक शुल्क अनुदानापोटी महापालिकेला मिळणाऱ्या अनुदानाचे नुकसान झाले आहे.

ब) 2012-13 मध्ये वाढीव आकारणी मिळकत क्र. 6731 ते 6843 पर्यंत केली आहे. संबंधित नोंदवहीत उपप्रभागाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची किंवा अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. त्यामुळे जबाबदारी निश्चित करता येत नाही.

क) नवीन मालमत्ता कर आकारणी प्रकरणांची तपासणी करता असे निदर्शनास आले की, महापालिकेच्यावतीने कर आकारणीच्या टिप्पणस उपायुक्त तर काही अतिरिक्त आयुक्त यांनी मंजुरी दिल्या आहेत. त्यामुळे कर निर्धारक व संकलक यांच्याऐवजी नेमके कोणास अधिकार आहेत याबाबतचे प्राधिकार लेखा परीक्षणास दाखविले नाही. तसेच कर आकारणी मंजूर केलेल्या प्रकरणांच्या आकारणी तक्त्यावर संबंधित उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांनी स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे सक्षम अधिकाऱ्याने कर आकारणी तक्ता मंजूर करून त्याची प्रत संबंधित भोगवटाधारकास निर्गमित केलेली नाही.

5) सातिवली उपप्रभागाच्या कराचे वसुलीचे प्रमाण सुमारे 70 टक्के असुन घरपटटी, दिवाबत्ती इ. कराची 31/03/2013 अखेर एकूण थकबाकी रुपये 4681204 इतकी आहे. तसेच भुईभाडे, मार्केट, गाळाभाडे करावी थकबाकी 31/03/2013 अखेर रुपये 30200/- आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम,1949 प्रकरण 11- कराधान विभाग नियम 128, महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियम, 2011 नियम 128 नुसार थकबाकी त्वरीत वसुल करून महानगरपालिका फंडात जमा करावी..

68 ई प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर सांडोर उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1803.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 1803.00/-

सांडोर विभागाचे मालमत्ता कर वसुलीचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात ठेवले नाहीत. रोखवहीतील शिल्लकेपेक्षा देना बँकेतील शिल्लक रक्कम रु.८५५८/- ने कमी आहे. उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन कर आकारणी तक्ता संबंधित भोगवटाधारकास निर्गमित करण्यात येत नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६०(२) नुसार अनधिकृत बांधकामे निष्कासित न करता कलम २६७अ नुसार शास्तीसह कर आकारणी केली आहे. श्रीमती. कल्पना शितला शर्मा यांचेकडून मागील ३ वर्षाची कर आकारणी रक्कम रु.१८०३/- वसूल केली नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिका ई प्रभाग कार्यालयातील ग्रामिणस्तर सांडोर उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे व इतर लेखे/नोंदवह्या कर आकारणी प्रकरणे तपासता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

१) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

(१) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

(२) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

(३) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

(४) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

(५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

(६) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

(७) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

(८) परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

(९) परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

(१०) काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच याव्यतिरिक्त

(११) Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)

(१२) Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)

(१३) Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property & Other Taxes (नमुना P&OT-3)

(१४) Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि वरील विहित नमुन्यात मालमत्ता कर वसुलीचे सांडोर विभागाचे लेखे ठेवले नाहीत.

२) ग्रामपंचायत सांडोर, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक ३१ मे,२०११ नुसार महानगरपालिकेत विलीन झाली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील नियम १२८-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी केली नसुन आजतागायत सांडोर विभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे. त्यामुळे सदर विभागात महापालिका क्षेत्रात महानगरपालिका विभागात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७(१) (अ) नुसार मालमता कर आकारणी करून कलम १२८अ नुसार मालमत्ता करात समावेश असलेल्या करांपैकी प्रामुख्याने १४८अ नुसार शिक्षण उपकर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, कलम १३१ अन्वये स्वच्छता कर, कलम १३७ अन्वये विशेष स्वच्छता कर १२९(क) अन्वये अग्निशमन उपकर दरानुसार आकारणी करून कर वसूल केला जात नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर सांडोर विभागातील मालमत्ताधारकांकडून शिक्षण कर, रोजगार हमी कर हे शासनास देय असलेल्या करांची देखील वसुली केली जात नसल्याने शासनास देखील सदर करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.०१ दिनांक ०९/०६/२०१४ च्या अनुसरून विभागाने सादर केलेल्या दिनांक १८/०६/२०१४ रोजीच्या उत्तरात सर्वसाधारण सभा ठराव क्र.०१ दिनांक १८/०२/२०१२ अन्वये तत्कालीन ग्रामपंचायत क्षेत्र वगळून महानगरपालिका क्षेत्रात ठरावात निश्चित केलेल्या नवीन दराने कर आकारणी करणेचा ठराव संमत केला आहे असे कळविले आहे. सदर ठरावाचे अवलोकन करता शासकीय कर रोजगार हमी कर व शिक्षण कर हे शासनास देय आहेत अशा करांचे संदर्भात शासनाचे अभिप्राय घेतले नसल्याने केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

३) ग्रामपंचायत सांडोर विभागाने दैनंदिन वसुलीसाठी रोखवही ठेवली असून सदर रोखवहीत दैनंदिन वसुलीचा हिशेब लिहिला जात आहे सदर रोखवहीतील वित्तीय वर्षाअखेरच्या शिल्लक रक्कमांचा मेळ देना बँकेतील शिल्लक रक्कमांशी घेता असे दिसून आले की, रोखवहीत देना बँक सांडोरची शिल्लक रक्कम रु.८५५९/-

दर्शविली आहे परंतु बँकेच्या पासबुकात फक्त रक्कम रु.१/- शिल्लक आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.०१ दिनांक ०९/०६/२०१४ च्या अनुसरून विभागाने सादर केलेल्या दिनांक १८/०६/२०१४ रोजीच्या उत्तरात बँक पासबुकानुसार ताळमेळ घेऊन सदरचे खाते बंद केले आहे असे कळविले आहे तथापि संबंधित रोखवहीत त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही केली नसून रोखवहीतील बँक ताळमेळपत्रक व शिल्लक रक्कमेचा तपशिल लेखा परीक्षणास अवगत केला नाही. त्यामुळे केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

४) नवीन मालमत्ता कर आकारणी प्रकरणांची तपासणी करता असे निदर्शनास आले कि, महानगरपालिकेच्या वतीने कर आकारणीच्या काही प्रकरणांच्या टिप्पणी उपायुक्त तर काही अतिरिक्त आयुक्त यांनी मंजुरी दिल्या आहेत तथापि मालमत्ता कर मंजुरीचा त्यांना अधिकार असल्याबाबतचे प्राधिकार लेखा परीक्षणास दर्शविले नाहीत. तसेच कर आकारणी मंजूर केलेल्या प्रकरणांच्या आकारणी तक्त्यावर संबंधित उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांनी स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे सक्षम अधिकाऱ्याने कर आकारणी तक्ता मंजूर करून त्याची प्रत संबंधित भोगवटाधारकास निर्गमित केलेली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.०१ दिनांक ०९/०६/२०१४ च्या अनुसरून सादर केलेल्या दिनांक १८/०६/२०१४ रोजीच्या उत्तरात संबंधित उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन कर आकारणी तक्ता संबंधित भोगवटाधारकास निर्गमित करण्यात येईल हा केलेला खुलासा कार्यवाही अपूर्ण असल्याने संयुक्तिक नाही.

५) नवीन मालमत्ता कर आकारणीच्या काही प्रकरणाना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६७अ नुसार शास्तीसह कर आकारणी केल्याचे आढळून आले त्यामुळे संबधित बांधकाम हे अनधिकृत असल्याचे दिसून येते. अनधिकृत बांधकामामुळे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४ अन्वये विकास शुल्क व इतर करांची वसुली झालेली नाही त्यामुळे महापालिकेचे व शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे. तरी ग्रामपंचायत सांडोर विभागाचे हद्दीत अशा अनधिकृत बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ नुसार दंड आकारणे, ५३ नुसार अनधिकृत बांधकाम काढून टाकणे, ५४ अन्वये अनधिकृत बांधकाम बंद करणे, व ५७ अन्वये झालेल्या खर्चाची वसुली करणे अशी कारवाई केली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.०१ दिनांक ०९/०६/२०१४ अन्वये खुलासा विचारला असता त्यास अनुसरून सादर केलेल्या दिनांक १८/०६/२०१४ रोजीच्या उत्तरात यापुढे अतिक्रमण विभागाशी समन्वय साधून अनधिकृत बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल, हा केलेला खुलासा संयुक्तिक नाही.

६) श्रीमती. कल्पना शितला शर्मा यांनी कर आकारणी लागू करणेसाठी केलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांनी सन १९९४-९५ मध्ये अनधिकृत बांधकाम केले आहे. परंतु सदर मालमत्तेस सन २०१२-१३ या १ वर्षाची नवीन कर आकारणी केली आहे. किमान महानगरपालिका स्थापनेपासून म्हणजे सन २००९-१० पासूनचा मागील थकीत कराची आकारणी करून वसुली करण्यात आली नाही. सन २००९-१० ते २०११-१२ या वर्षाची कर आकारणी रक्कम रु १८०३/- वसुली करणेबाबत अर्धसमास पत्र क्र.०१ दिनांक ०९/०६/२०१४ अन्वये कळविले असता त्यास अनुसरून सादर केलेल्या दिनांक १८/०६/२०१४ रोजीच्या उत्तरात बांधकाम पूर्ण झाल्याच्या किंवा प्रत्यक्षात बांधकामाचा जागेचा वापर करण्याच्या दिनांकापासून म्हणजे २०१२-१३ पासून कर आकारणी केली आहे. हा केलेला खुलासा श्रीमती शर्मा यांनी केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार वर्ष १९९४-९५ मध्ये अनधिकृत बांधकाम केले असल्याने मान्य करता येत नाही.

69 ड प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर वालीव उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

मालमत्ता कर विभागाने वसुलीचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात ठेवले नाहीत. उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन कर आकारणी तक्ता संबंधित भोगवटाधारकास निर्गमित करण्यात आले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६०(२) नुसार अनधिकृत बांधकामे निष्कासित न करता कलम २६७अ नुसार शास्तीसह कर आकारणी केली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम २ अन्वये हस्तांतरण शुल्क व फॉर्म फी वसुली केली नसल्याने आर्थिक नुकसान झाले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका ग्रामिणस्तर वालीव उपविभागाकडील मालमत्ता कर वसुलीचे लेखे/नोंदवह्या, कर आकारणी प्रकरणे तपासता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

१) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

(१) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

(२) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

(३) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

(४) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

(५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

(६) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

(७) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

(८) परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

(९) परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

(१०) काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच याव्यतिरिक्त

(११) Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)

(१२) Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)

(१३) Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property & Other Taxes (नमुना P&OT-3)

(१४) Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि वरील विहित नमुन्यात मालमत्ता कर वसुलीचे वालीव विभागाचे लेखे महानगरपालिकेने ठेवले नाहीत.

२) ग्रामपंचायत वालीव महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक ३१मे, २०११ नुसार महानगरपालिकेत विलीन झाली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ नियम १२८-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी केली नसुन आजतगायत वालीव विभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे. त्यामुळे सदर विभागात महापालिका क्षेत्रातील दरानुसार आकारणी करून कर वसूल केला जात नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच महानगरपालिका विभागात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७(१)(अ) नुसार मालमता कर आकारणी करून कलम १२८अ नुसार मालमत्ता करात समावेश असलेल्या करांपैकी प्रामुख्याने १४८अ नुसार शिक्षण उपकर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, कलम १३१ अन्वये स्वच्छता कर, कलम १३७ अन्वये विशेष स्वच्छता कर १२९(क) अन्वये अग्निशमन उपकर वालीव विभागातील मालमत्ताधारकांकडून वसूल केला जात नाही. शिक्षण कर, रोजगार हमी कर या शासनास देय असलेल्या करांचीदेखील वसुली केली जात नसल्याने शासनास देखील सदर करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.०२ दिनांक ०९/०६/२०१४ च्या अनुसरून सादर केलेल्या उत्तरात सर्वसाधारण सभा ठराव क्र.०१ दिनांक १८/०२/२०१२ अन्वये मागील दरानेच कर वसुली करण्यास मान्यता दिली आहे. मालमता कर वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासन नियमानुसार शिक्षण कर व रोजगार हमी कर वसूल करून शासनास भरणा करण्यात येईल असे कळविले आहे. सदर ठरावाचे अवलोकन करता शासकीय कर रोजगार हमी कर व शिक्षण कर हे शासनास देय आहेत अशा करांचे संदर्भात शासनाचे अभिप्राय घेतले नसल्याने विभागाने केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

३) ग्रामपंचायत वालीव विभागाने दैनंदिन वसुलीसाठी रोखवही ठेवली असून सदर रोखवहीत दैनंदिन वसुलीचा हिशेब लिहिला जात आहे. वर्ष २०१२-१३ मध्ये मालमत्ता कराची वसुली संगणकीकृत व हस्तलिखित पावतीद्वारे वसुली केली असून संगणकीकृत वसुलीच्या २ पोटकिर्द रोख व धनादेश व हस्तलिखित पावतीची १ पोटकिर्द ठेवली आहे. सदर ३ पोटकिर्दींचे एकत्रिकरण नोंदवहीत केले नाही. अगर वसुलीची एकत्रित रक्कम रोखवहीत न नोंदता उपशीर्षनिहाय रक्कमा रोखवहीत नोंदल्या आहेत, त्यामुळे वसुली रक्कमेची पडताळणी रोखवहीत करता आली नाही. सदरच्या रोखवही, पोटकिर्द, व इतर अभिलेखे यांवर संबंधित विभागाचे

समन्वयक यांनी स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे केलेल्या नोंदी अधिकृत असल्याचे लेखा परीक्षणात मानता येत नाही. वसुलीचे दैनंदिन चलन तयार करून मुख्यालयास अगर प्रभागास पाठविले जात नाही तर १५ दिवसांचे चलन प्रभागास पाठविले जाते व त्यानंतर ते मुख्यालयास पाठविले जाते यामुळे वेळच्या वेळी महानगरपालिकेच्या लेख्यात सदरच्या जमा रकमांचे लेखांकन होत नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.०२ दिनांक ०९/०६/२०१४ अन्वये विचारणा केली असता त्यास अनुसरून सादर केलेल्या उत्तरात संगणकीकृत व हस्तलिखित वसुलीच्या पोटकिर्दीच्या नोंदींचे मेळ घेतला असुन प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात येत असुन नमुना न.१३ मधील दैनंदिन चलन तयार करून मुख्यालयात पाठविण्याची दक्षता घेण्यात येईल असे कळविले आहे. परंतु प्रत्यक्षात एकत्रित गोषवारा प्रत सादर केली नाही. त्यामुळे केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

४) नवीन मालमत्ता कर आकारणी प्रकरणांची तपासणी करता असे निदर्शनास आले कि, महानगरपालिकेच्या वतीने कर आकारणीच्या काही प्रकरणांच्या टिप्पणी उपायुक्त तर काही अतिरिक्त आयुक्त यांनी मंजुरी दिल्या आहेत मालमत्ता कर मंजुरीचा अधिकार त्यांना असल्याबाबत प्राधिकार लेखा परीक्षणास दर्शविला नाही. तसेच कर आकारणी मंजूर केलेल्या प्रकरणांच्या आकारणी तक्त्यावर संबंधित उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांनी स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे सक्षम अधिकाऱ्याने कर आकारणी तक्ता मंजूर करून त्याची प्रत संबंधित भोगवटाधारकास निर्गमित केलेली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.०२ दिनांक ०९/०६/२०१४ अन्वये विचारणा केली असता, त्यास अनुसरून विभागाने सादर केलेल्या उत्तरात महानगरपालिकेच्या वतीने क्र.वविशम/आका/३९/२०१२ दिनांक ०७/०७/२०१२ अन्वये अतिरिक्त आयुक्त व उपायुक्त यांना अधिकार प्रदान केले असुन त्याची प्रत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे असे कळविले आहे तथापि प्रत्यक्षात प्रत सादर केली नाही. त्यामुळे केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

५) वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये नवीन मालमत्ता कर आकारणीची एकूण ६४० प्रकरणे असून त्यापैकी ४३४ प्रकरणाना शास्तीसह कर आकारणी केल्याचे आढळून आले त्यामुळे संबधित ४३४ बांधकामे ही अनधिकृत असल्याचे दिसून येते तरी अनधिकृत बांधकामामुळे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४अ अन्वये विकास शुल्क व इतर करांची वसुली झालेली नाही त्यामुळे महानगरपालिकेचे व शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे. तरी ग्रामपंचायत वालीव विभागाचे हद्दीत अशा अनधिकृत बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ नुसार दंड आकारणे, ५३ नुसार अनधिकृत बांधकाम काढून टाकणे, ५४ अन्वये अनधिकृत बांधकाम बंद करणे, व ५७ अन्वये झालेल्या खर्चाची वसुली करणे अशी कारवाई केली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.०२ दिनांक ०९/०६/२०१४ अन्वये विचारणा केली असता त्यास अनुसरून सादर केलेल्या उत्तरात अनधिकृत बांधकामावर एमआरटीपी कायद्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही ही बाब मान्य केली असुन यापुढे अशी कार्यवाही करण्यात येईल व महापालिकेचे व शासनाचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असा केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही.

६) ग्रामपंचायत वालीव विभागात सन २०१२-१३ मध्ये एकूण २८२ मालमत्तांचे फेरफार/हस्तांतरण सहाय्यक आयुक्त यांचे अधिकारात मंजूर झाले असून सदर प्रकरणांत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ कराधान नियम २ अन्वये हस्तांतरण फॉर्म फी, हस्तांतरण शुल्क वसूल केलेले नाही. महानगरपालिका क्षेत्रातील उमेळा, आगाशी-बोळींज व राजावली या ग्रामपंचायत विभागांनी सर्वसाधारणपणे हस्तांतरण शुल्क अनुक्रमे रु.१००, रु.५००, रु.१०००/- प्रमाणे वसूल केल्याचे आढळले आहे. त्यानुसार महानगरपालिकेस सदर बाबीपासून मिळणारे उत्पन्नास मुकावे लागले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.०२

वसई विरार मनपा

दिनांक ०९/०६/२०१४ अन्वये विचारणा केली असता त्यास अनुसरून सादर केलेल्या उत्तरात यापुढे मालमत्ता हस्तांतरण फी व फॉर्म फी वसूल करण्याची दक्षता घेण्यात येईल हा केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 34, Hmm No : 02)

70 ड प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर ससू नवघर उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

विभागाने मालमत्ता कर वसुलीचे लेखे नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात ठेवले नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२८अ नुसार शिक्षण कर, रोजगार हमी कर हे शासनास देय असलेल्या करांचीदेखील वसुली केली जात नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६०(२) नुसार अनधिकृत बांधकामे निष्कासित न करता कलम २६७अ नुसार शास्तीसह कर आकारणी केली आहे. मालमत्ता कर वसुलीच्या जमा रकमांची चलने वेळीच मुख्यालयात सादर न केल्याने जमा रक्कमांचे लेखांकन वेळीच झाले नाही.

वसई-विरार महानगरपालिका अ प्रभाग कार्यालयातील ग्रामिणस्तर ससू-नवघर उपविभागाकडील मालमत्ता कर वसुलीचे लेखे/नोंदवह्या व कर आकारणी प्रकरणे तपासता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

१) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

(१) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)
(२) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)
(३) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)
(४) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)
(५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)
(६) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

(७) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)
(८) परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)
(९) परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)
(१०) काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच याव्यतिरिक्त
(११) Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)
(१२) Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)
(१३) Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property & Other Taxes (नमुना P&OT-3)
(१४) Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि ससू-नवघर उपविभागाचे मालमत्ता कर वसुलीचे लेखे वरील विहित नमुन्यात महानगरपालिकेने ठेवले नाहीत.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक ३१ मे, २०११ नुसार ग्रामपंचायत ससू-नवघर महानगरपालिकेत विलीन झाली असून विलीनीकरणाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे सांगणेत आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नियम १२८-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी ससू-नवघर हद्दीत केली नसुन आजतगायत ससू-नवघर उपविभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे. सदर महानगरपालिका विभागात महानगरपालिका विभागात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७(१)(अ) नुसार मालमता कर आकारणी करून कलम १२८अ नुसार मालमत्ता करात समावेश असलेल्या करांपैकी प्रामुख्याने १४८अ नुसार शिक्षण उपकर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, कलम १३१ अन्वये स्वच्छता कर, कलम १३७ अन्वये विशेष स्वच्छता कर १२९(क) अन्वये अग्निशमन उपकर यांची आकारणी करून कर वसूल केला जात नसल्याने शासनाचे व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर ससू-नवघर उपविभागातील मालमत्ताधारकांकडून शिक्षण कर, रोजगार हमी कर हे शासनास देय असलेल्या करांचीदेखील वसुली केली जात नसल्याने शासनास देखील सदर करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.११ दिनांक १६/०६/२०१४ च्या अनुसरून सादर केलेल्या उत्तरात सर्वसाधारण सभा ठराव क्र.०१ दिनांक १८/०२/२०१२ अन्वये मंजूर दरानेच कर वसुलीचा निर्णय घेतला आहे. कराचे उत्पन्न वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासन नियमानुसार मालमत्ता धारकाकडून शिक्षण कर व रोजगार हमी कर वसूल करून शासनास भरणा करण्यात येईल असे कळविले आहे. सदर ठरावाचे व उत्तराचे अवलोकन करता शासकीय कर रोजगार हमी कर व शिक्षण कर हे शासनास देय आहेत अशा करांचे संदर्भात शासनाचे अभिप्राय घेतले नसल्याने केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

३) ग्रामपंचायत ससू-नवघर उपविभागाने दैनंदिन वसुलीसाठी रोखवही ठेवली असून सदर रोखवहीत दैनंदिन वसुलीचा हिशेब लिहिला जात आहे. सन २०१२-१३ मध्ये मालमत्ता कराची वसुली हस्तलिखित पावतीद्वारे वसुली केली आहे. वसुलीचे दैनंदिन चलन तयार करून मुख्यालयास अगर प्रभागास पाठविले जात नाही तर १५ दिवसांचे चलन प्रभागास पाठविले जाते व त्यानंतर ते प्रभागाकडून मुख्यालयास पाठविले जाते यामुळे वेळच्या वेळी महानगरपालिकेच्या लेख्यात सदरच्या जमा रकमांचे लेखांकन होत नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.११ दिनांक १६/०६/२०१४ च्या अनुसरून सादर केलेल्या उत्तरात जमा रक्कम जुचंद्र येथील बँक ऑफ इंडिया बँकेत दैनंदिन भरणा केली जाते सदर खात्याव्यतिरिक्त इतर खाती बंद करणेबाबत निर्णय मुख्य कार्यालयाकडून घेणे अपेक्षित आहे हे उत्तर जमा रकमांचे लेखांकन वेळीच होत नाही यांचेशी संबंधित नसल्याने

मान्य करता येत नाही.

४) वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये नवीन मालमत्ता कर आकारणीची एकूण ७ प्रकरणे असून त्यापैकी ७ प्रकरणाना शास्तीसह कर आकारणी केल्याचे आढळून आले त्यामुळे संबधित ७ बांधकामे ही अनधिकृत असल्याचे दिसून येते तरी अनधिकृत बांधकामामुळे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४अ अन्वये मिळणारे उत्पन्न विकास शुल्क व इतर करांची वसुली झालेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे व शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच ग्रापं ससू-नवघर विभागाचे हद्दीत अशा अनधिकृत बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ नुसार दंड आकारणे, ५३ नुसार अनधिकृत बांधकाम काढून टाकणे, ५४ अन्वये अनधिकृत बांधकाम बंद करणे, व ५७ अन्वये झालेल्या खर्चाची वसुली करणे अशी कारवाई करण्यात आली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.11 दिनांक 16/06/2014 च्या अनुसरून सादर केलेल्या उत्तरात अनधिकृत बांधकामावर एमआरटीपी कायद्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही ही बाब मान्य केली असुन यापुढे अशी कार्यवाही करण्यात येईल व महानगरपालिकेचे व शासनाचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असा केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 35, Hmm No : 11)

71 ड प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर बापाणे उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

ग्रामिणस्तर बापाणे उपविभागाने मालमत्ता कर वसुलीचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात ठेवले नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२८अ व महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर अधिनियमानुसार वसुली करावयाचे शिक्षण कर व रोजगार हमी कर या शासनास देय असलेल्या करांचीदेखील वसुली केली जात नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६०(२) नुसार अनधिकृत बांधकामे निष्कासित न करता कलम २६७अ नुसार शास्तीसह कर आकारणी केली आहे. मालमत्ता कर वसुलीच्या जमा रकमांची चलने वेळीच मुख्यालयात सादर न केल्याने जमा रक्कमांचे लेखांकन वेळीच झाले नाही.

वसई-विरार महानगरपालिका ड प्रभाग कार्यालयातील ग्रामिणस्तर बापाणे उपविभागाकडील मालमत्ता कर

वसुलीचे लेखे/नोंदवह्या व कर आकारणी प्रकरणे तपासता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

१) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

(१) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

(२) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

(३) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

(४) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

(५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

(६) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

(७) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

(८) परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

(९) परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

(१०) काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच याव्यतिरिक्त

(११) Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)

(१२) Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)

(१३) Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property & Other Taxes (नमुना P&OT-3)

(१४) Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि बापाणे उपविभागाचे मालमत्ता कर वसुलीचे लेखे वरील विहित नमुन्यात महानगरपालिकेने ठेवले नाहीत.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक ३१ मे, २०११ नुसार ग्रामपंचायत बापाणे महानगरपालिकेत विलीन झाली असून विलीनीकरणाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे सांगणेत आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नियम १२८-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी बापाणे हद्दीत केली नसुन आजतगायत बापाणे उपविभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे. सदर महानगरपालिका विभागात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७(१)(अ) नुसार मालमता कर आकारणी करून कलम १२८अ नुसार मालमत्ता करात समावेश असलेल्या करांपैकी प्रामुख्याने १४८अ नुसार शिक्षण उपकर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, कलम १३१ अन्वये स्वच्छता कर, कलम १३७ अन्वये विशेष

स्वच्छता कर १२९(क) अन्वये अग्निशमन उपकर यांची आकारणी करून कर वसूल केला जात नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर बापाणे उपविभागातील मालमत्ताधारकांकडून महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर अधिनियमानुसार शिक्षण कर व रोजगार हमी कर या शासनास देय असलेल्या करांचीदेखील वसुली केली जात नसल्याने शासनास शिक्षण कर व रोजगार हमी करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागल्याने शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.१२ दिनांक १६/०६/२०१४ च्या अनुषंगाने विभागाने सादर केलेल्या उत्तरात सर्वसाधारण सभा ठराव क्र.०१ दिनांक १८/०२/२०१२ अन्वये मंजूर दरानेच कर वसुलीचा निर्णय घेतला आहे. कराचे उत्पन्न वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासन नियमानुसार मालमत्ता धारकाकडून शिक्षण कर व रोजगार हमी कर वसूल करून शासनास भरणा करण्यात येईल असे कळविले आहे. सदर ठरावाचे व उत्तराचे अवलोकन करता शासकीय कर रोजगार हमी कर व शिक्षण कर हे शासनास देय आहेत अशा करांचे संदर्भात शासनाचे अभिप्राय घेतले नसल्याने केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

३) ग्रामपंचायत बापाणे उपविभागाने दैनंदिन वसुलीसाठी रोखवही ठेवली असून सदर रोखवहीत दैनंदिन वसुलीचा हिशेब लिहिला जात आहे. सन २०१२-१३ मध्ये मालमत्ता कराची वसुली हस्तलिखित पावतीद्वारे वसुली केली आहे. वसुलीचे दैनंदिन चलन तयार करून मुख्यालयास अगर प्रभागास पाठविले जात नाही तर १५ दिवसांचे एकत्रित चलन प्रभागास पाठविले जाते व त्यानंतर ते प्रभागाकडून मुख्यालयास पाठविले जाते त्यामुळे महानगरपालिकेच्या लेख्यात साधारणपणे १ महिना विलंबाने जमा रकमांचा रोखवहीत/ लेख्यात समावेश होतो. त्यामुळे दैनिक वसुली रक्कमाचे वेळीच लेखांकन होत नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.१२ दिनांक १६/०६/२०१४ च्या अनुषंगाने विभागाने सादर केलेल्या उत्तरात जमा रक्कम नायगाव येथील दि.ठाणे जिल्हा. मध्यवर्ती सहकारी बँकेत दैनंदिन भरणा केली जाते. सदर खात्या व्यतिरिक्त इतर खाती बंद करणेबाबत निर्णय मुख्य कार्यालयाकडून घेणे अपेक्षित आहे हे उत्तर, जमा रकमांचे लेखांकन वेळीच होत नाही यांचेशी संबंधित नसल्याने मान्य करता येत नाही.

४) वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये नवीन मालमत्ता कर आकारणीची एकूण ५ प्रकरणे असून त्यापैकी ५ प्रकरणाना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६७अ नुसार शास्तीसह कर आकारणी केल्याचे आढळून आले त्यामुळे संबधित ५ बांधकामे ही अनधिकृत असल्याचे दिसून येते तरी अनधिकृत बांधकामामुळे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४अ अन्वये मिळणारे उत्पन्न विकास शुल्क व इतर करांची वसुली झालेली नाही, त्यामुळे महापालिकेचे व शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच ग्रापं बापाणे विभागाचे हद्दीत अशा अनधिकृत बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ नुसार दंड आकारणे, ५३ नुसार अनधिकृत बांधकाम काढून टाकणे, ५४ अन्वये अनधिकृत बांधकाम बंद करणे, व ५७ अन्वये झालेल्या खर्चाची वसुली करणे अशी कारवाई करण्यात आली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र. १२ दिनांक १६/०६/२०१४ च्या अनुषंगाने विभागाने सादर केलेल्या उत्तरात अनधिकृत बांधकामावर एमआरटीपी कायद्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही ही बाब मान्य केली असुन यापुढे अशी कार्यवाही करण्यात येईल व महापालिकेचे व शासनाचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असा केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही.

72 ड प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर राजावली उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

ग्रामिणस्तर राजावली उपविभागाने मालमत्ता कर वसुलीचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात ठेवले नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२८अ व महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर अधिनियमानुसार वसुली करावयाचे कर शिक्षण कर, रोजगार हमी कर या शासनास देय असलेल्या करांचीदेखील वसुली केली जात नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६०(२) नुसार अनधिकृत बांधकामे निष्कासित न करता कलम २६७अ नुसार शास्तीसह कर आकारणी केली आहे. मालमत्ता कर वसुलीच्या जमा रकमांची चलने वेळीच मुख्यालयात सादर न केल्याने जमा रक्कमांचे लेखांकन वेळीच झाले नाही.

वसई-विरार महानगरपालिका ड प्रभाग कार्यालयातील ग्रामिणस्तर राजावली उपविभागाकडील मालमत्ता कर वसुलीचे लेखे/नोंदवह्या व कर आकारणी प्रकरणे तपासता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

१) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

(१) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

(२) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

(३) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

(४) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

(५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

(६) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

(७) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

(८) परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

(९) परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

(१०) काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच याव्यतिरिक्त

(११) Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)

(१२) Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)

(१३) Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property & Other Taxes (नमुना P&OT-3)

(१४) Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि राजावली उपविभागाचे मालमत्ता कर वसुलीचे लेखे वरील विहित नमुन्यात महानगरपालिकेने ठेवले नाहीत.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्ये उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक ३१ मे, २०११ नुसार ग्रामपंचायत राजावली महानगरपालिकेत विलीन झाली असून विलीनीकरणाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे सांगणेत आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ नियम १२८-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी राजावली हद्दीत केली नसुन आजतगायत राजावली उपविभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे. सदर महानगरपालिका विभागात महाराष्ट्र महानगरपालिका विभागात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७(१)(अ) नुसार मालमता कर आकारणी करून कलम १२८अ नुसार मालमत्ता करात समावेश असलेल्या करांपैकी प्रामुख्याने १४८अ नुसार शिक्षण उपकर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, कलम १३१ अन्वये स्वच्छता कर, कलम १३७ अन्वये विशेष स्वच्छता कर १२९(क) अन्वये अग्निशमन उपकर इत्यादी करांची वसुली केली जात नसल्याने शासनास देखील शिक्षण कर व रोजगार हमी करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.१३ दिनांक १६/०६/२०१४ च्या अनुषंगाने विभागाने सादर केलेल्या उत्तरात सर्वसाधारण सभा ठराव क्र.०१ दिनांक १८/०२/२०१२ अन्वये मंजूर दरानेच कर वसुलीचा निर्णय घेतला आहे. कराचे उत्पन्न वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासन नियमानुसार मालमत्ता धारकाकडून शिक्षण कर व रोजगार हमी कर वसूल करून शासनास भरणा करण्यात येईल असे कळविले आहे. सदर ठरावाचे व उत्तराचे अवलोकन करता शासकीय कर रोजगार हमी कर व शिक्षण कर हे शासनास देय आहेत अशा करांचे संदर्भात शासनाचे अभिप्राय घेतले नसल्याने केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

३) ग्रामपंचायत राजावली उपविभागाने दैनंदिन वसुलीसाठी रोखवही ठेवली असून सदर रोखवहीत दैनंदिन वसुलीचा हिशेब लिहिला जात आहे. वर्ष २०१२-१३ मध्ये मालमत्ता कराची वसुली हस्तलिखित पावतीद्वारे करून बँकेत रक्कम जमा केली आहे. परंतु वसुलीचे दैनंदिन चलन तयार करून मुख्यालयास अगर प्रभागास पाठविले जात नाही तर १५ दिवसांचे चलन प्रभागास पाठविले जाते व त्यानंतर ते प्रभागाकडून मुख्यालयास पाठविले जाते यामुळे वेळच्या वेळी महानगरपालिकेच्या रोकडवहीत/लेख्यात सदरच्या जमा रकमांचे वेळीच लेखांकन होत नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.१३ दिनांक १६/०६/२०१४ च्या अनुषंगाने विभागाने सादर केलेल्या उत्तरात जमा रक्कम नायगाव येथील दि. ठाणे जिल्हा. मध्यवर्ती सहकारी बँकेत दैनंदिन भरणा

केली जाते. सदर खात्या व्यतिरिक्त इतर खाती बंद करणेबाबत निर्णय मुख्य कार्यालयाकडून घेणे अपेक्षित आहे हे उत्तर जमा रकमांचे लेखांकन वेळीच होत नाही यांचेशी संबंधित नसल्याने मान्य करता येत नाही.

४) वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये नवीन मालमत्ता कर आकारणीची एकूण १८२ प्रकरणे नोंदवहीनुसार असून सर्व प्रकरणाना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६७अ नुसार शास्तीसह कर आकारणी केल्याचे नोंदवहीवरून दिसून आले. त्यामुळे संबधित सर्व बांधकामे ही अनधिकृत असल्याचे दिसून येते तरी अनधिकृत बांधकामामुळे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४अ अन्वये मिळणारे उत्पन्न विकास शुल्क व इतर करांची वसुली झालेली नाही त्यामुळे महापालिकेचे व शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच ग्रापं राजावली विभागाचे हद्दीत अशा अनधिकृत बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ नुसार दंड आकारणे, ५३ नुसार अनधिकृत बांधकाम काढून टाकणे, ५४ अन्वये अनधिकृत बांधकाम बंद करणे, व ५७ अन्वये झालेल्या खर्चाची वसुली करणे अशी कारवाई करण्यात आली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.१३ दिनांक १६/०६/२०१४ च्या अनुषंगाने विभागाने सादर केलेल्या उत्तरात अनधिकृत बांधकामावर एमआरटीपी कायद्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही ही बाब मान्य केली असुन यापुढे अशी कार्यवाही करण्यात येईल व महापालिकेचे व शासनाचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असा केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 37, Hmm No : 13)

73 अ प्रभाग कार्यालय ग्रामिणस्तर आगाशी उपविभागातील मालमत्ता कर वसुलीचे लेखे व इतर अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 980.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 980.00/-

ग्रामिणस्तर आगाशी विभागाचे मालमत्ता कर वसुलीचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००५ मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात ठेवले नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२८अ व महाराष्ट्र शिक्षण कर व रोजगार हमी कर अधिनियमानुसार वसुली करावयाचे कर शिक्षण कर, रोजगार हमी कर या शासनास देय असलेल्या करांचीदेखील वसुली केली जात नाही. जमा रकमांचे लेखांकन मुख्यालयात चलनाअभावी वेळीच होत नाही. बँक ताळमेळ पत्रके तयार केली नाहीत. मालमत्ता कराची रक्कम रु. ८७०/- कायमस्वरूपी लेख्याबाहेर ठेवली होती.

वसई-विरार महानगरपालिका अ प्रभाग कार्यालयाचे अधिनस्त ग्रामिणस्तर आगाशी उपविभागाकडील मालमत्ता कर वसुलीचे व इतर लेखे तपासता त्यात खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

१) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

(१) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

(२) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

(३) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

(४) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

(५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक ३१ मे, २०११ नुसार ग्रामपंचायत चंदनसार महानगरपालिकेत विलीन झाली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ नियम १२८-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी केली नसुन आजतगायत पेल्हार विभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या मंजूर दराने केली जात आहे. सदर महानगरपालिका विभागात महानगरपालिका विभागात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७(१)(अ) नुसार मालमता कर आकारणी करून कलम १२८अ नुसार मालमत्ता करात समावेश असलेल्या करांपैकी प्रामुख्याने १४८अ नुसार शिक्षण उपकर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, कलम १३१ अन्वये स्वच्छता कर, कलम १३७ अन्वये विशेष स्वच्छता कर १२९(क) अन्वये अग्निशमन उपकर इत्यादी उपकरांचीदेखील वसुली केली जात नसल्याने शासनास देखील शिक्षण कर व रोजगार हमी करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.२२ दिनांक २५/०६/२०१४ विचारणा केली असता त्यास अनुसरून सादर केलेल्या उत्तरात सर्वसाधारण सभा ठराव क्र.०१ दिनांक १८/०२/२०१२ अन्वये मागील दरानेच कर वसुली करण्यास मान्यता दिली आहे. मालमता कर वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासन नियमानुसार शिक्षण कर व रोजगार हमी कर वसूल करून शासनास भरणा करण्यात येईल असे कळविले आहे. सदर ठरावाचे व उत्तराचे अवलोकन करता शासकीय कर रोजगार हमी कर व शिक्षण कर हे शासनास देय आहेत अशा करांचे संदर्भात शासनाचे अभिप्राय घेतले नसल्याने केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

३) ग्रामपंचायत चंदनसार उपविभागाने दैनंदिन वसुलीसाठी रोखवही ठेवली असून सदर रोखवहीत दैनंदिन वसुलीचा हिशेब लिहिला जात आहे. सन २०१२-१३ मध्ये मालमत्ता कराची वसुली हस्तलिखित पावतीद्वारे वसुली करून रक्कम बँकेत त्याच दिवशी अगर लगतच्या दिवशी जमा केली आहे. वसुलीचे दैनंदिन चलन तयार करून मुख्यालयास अगर प्रभागास पाठविले जात नाही तर १५ दिवसांचे चलन प्रभागास पाठविले जाते व त्यानंतर ते मुख्यालयास पाठविले जाते यामुळे वेळच्या वेळी महानगरपालिकेच्या रोखवहीत/लेख्यात सदरच्या जमा रकमांचे लेखांकन वेळीच होत नाही. तसेच चंदनसार उपविभागाची सर्वसाधारण रोखवहीतील दिनांक ३१/०३/२०१३ रोजी दर्शविलेली शिल्लक व बँक पासबुकात दर्शविलेली शिल्लक यांत खालीलप्रमाणे तफावत दिसून आली आहे. याबाबतची बँक ताळमेळ पत्रके तयार केली नाहीत.

बँक तपशिल	रोखवहीतील शिल्लक	बँक पासबुक शिल्लक	दिनांक	तफावत रक्कम
दि ठाणे जि.म.स.बँक	९९३९५७.५५	११५९६५७.५५	२९/०१/२०१३	१६५७००.००
सेंट्रल बँक	७३७५१८६.००	६१०५१७७.००	३०/०३/२०१३	१२७०००९.००
सेंट्रल बँक पाणीपुरवठा	२२२६३६६.००	१५०२३०२.००	३०/०३/२०१३	७२४०६४.००

तसेच सन २०१२-१३ या वर्षाची सुरुवातीची शिल्लक रक्कम रु.५९,९५,२६३.२२ चा मेळ मागील वर्षाचे रोखवहीतील अखेरच्या शिल्लकेबरोबर घेता ती रु.५९,९५,४२९.२२ असल्याने रक्कम रु.१६६/- फरक दिसून आला आहे तरी फरकाबाबत खुलासा करणेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक २२ दिनांक २५/०६/२०१४ अन्वये विचारणा केली असता याबाबत काहीही खुलासा केला नाही. तर दैनंदिन चलन तयार करून पाठविण्याची दक्षता घेण्यात येईल व रोखवही व बँक पासबुकातील तफावतीचा मेळ घेण्यात आली असून त्याची प्रत जोडली

आहे असा खुलासा केला आहे परंतु प्रत्यक्षात प्रत सोबत जोडली नाही त्यामुळे केलेला खुलासा परिपूर्ण व समाधानकारक नसल्याने मान्य करता येत नाही.

४) साठा नोंदवहीत प्राप्त झालेली पाणीपट्टी वसुलीची पुस्तके अनुक्रमांकाने वापरली नसून वापरणेस दिलेल्या, विनियोगाच्या नोंदी नोंदल्या नाहीत. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक २२ दिनांक २५/०६/२०१४ अन्वये विचारणा केली असता यापुढे पावती पुस्तके अनुक्रमांकाने वापरणेत येतील, विनियोगाच्या नोंदींची नोंद घेतली जाईल हा केलेला खुलासा संयुक्तिक नसल्याने मान्य करता येत नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 44, Hmm No : 22)

80 वसई विरार मनपा प्रभाग अ मधील पाणीपटटी कर विभागातील अनियमितता

कर निर्धारण व संकलन

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : पाणीपटटी कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

वसई विरार मनपाअंतर्गत प्रभाग अ विरार येथील पाणीपटटी विभागामध्ये पावतीपुस्तकांची साठा नोंदवही ठेवली नाही. तसेच 30 समान क्रमांकाची छपाई केलेली पावती पुस्तके वापरात आणली आहेत.

वसई विरार शहर मनपाच्या प्रभाग अ (विरार) मधील पाणीपट्टीकर विभागातील लेखा परीक्षणाच्या दरम्यान पुढील उणिवा आढळून आल्या.

1) पाणीपट्टीकर विभागाकडून पावती पुस्तकांची साठा नोंदवही उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे मागील पावती पुस्तकांची शिल्लक, पावती पुस्तकांचे वितरण, पावती पुस्तके वापरण्यास सुरुवात केल्याचा दिनांक इ. बाबींची पडताळणी करता आली नाही.

2) भांडार विभागाकडून 2012-2013 या वर्षात प्राप्त झालेल्या एकूण 190 पावती पुस्तकांची पडताळणी भांडार विभागाच्या साठा नोंदवहीनुसार केली. अ.क्र.71 ते 100 अशा क्रमांकाची शृंखला असलेली प्रत्येक क्रमांकाची दोन पावती पुस्तके छपाई करुन ती पाणीपट्टीकर विभागास वितरीत करण्यात आली आहेत.

अशा एकूण 60 पावती पुस्तकांचा वापर 2012-2013 या वर्षात करण्यात आला आहे.

या कामी लेखापरीक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन क्र.123 दि.17/09/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही

DMEMRMM6801 (Ref No : 94, Hmm No : 123)

81 पाणीपटटी कराची वसूली करताना झालेल्या अनियमितता

कर निर्धारण व संकलन

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : पाणीपटटी कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

वसई विरार मनपाअंतर्गत पाण्याची उचल, वितरण् व वापर याचा तपशील उपलब्ध केला नाही, घरगुती, वाणिज्य तसेच सार्वजनिक नळ जोडण्यांची प्रभागनिहाय माहिती उपलब्ध केली नाही तसेच पाणीपट्टी कराची प्रभागनिहाय असमान दराने वसूली केली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेतील पाणीपट्टी कर विभागाचे लेखापरीक्षण केले असता खालील अनियमितता आढळून आल्या.

1) वसई विरार मनपा प्रतिदिनी 120 द.लि.लि. पाणी वापरासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून घेते. महापालिकेमध्ये विरार, पेल्हार, नालासोपारा, नवघर व वसई असे 5 प्रभाग असून काही ग्रामीण उपविभागही समावेशित आहे. संबंधित प्रभागांना दररोज किती पाणी वितरीत करण्यात येते, त्यांच्याकडून पाणीपट्टी कराची किती वसूली केली जाते, व त्यापोटी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्रदान केलेल्या रकमेचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

2) वितरीत करण्यात आलेल्या पाण्यापैकी किती पाण्याच्या देयकाची आकारणी केली याचा तपशील, एकूण पुरवठा व प्रत्यक्ष वितरण यांची टक्केवारी तसेच महापालिका क्षेत्रामध्ये किती सार्वजनिक नळ जोडण्या आहेत याचा प्रभागनिहाय तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही. त्यामुळे एकूण पाण्याची उचल व वितरण यामधील असलेल्या तफावतीचे मूल्यमापन करता आले नाही.

3) पाण्याचा खरेदी दर किती व त्याचा वितरणापोटी करण्यात आलेले पाणीपट्टीकर वसूली तसेच घरगुती व वाणिज्यदराने करण्यात आलेली आकारणी, महापालिकेच्या सर्व प्रभागांना पाणीपट्टीकराची वसूली समान दराने करण्यात आल्याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

या कामी लेखापरीक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.141 दिनांक 09/10/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही.

DMEMRMM6801 (Ref No : 103, Hmm No : 141)

82 ड नवघर प्रभाग मालमत्ता कर विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितताबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या नमुन्यांत मालमत्ता कराचे लेखे ठेवले नाहीत. कर आकारणीत बहुतांशी अनधिकृत इमारतीना कर आकारणी केल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४अ विकास कराच्या रक्कमा वसूल झाल्या नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२८अ, नुसार मोकळ्या जागा-जमिनी, मोबाईल टॉवर्स इत्यादींवर कर आकारणी अधिनियमातील तरतुदींनुसार केली नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

१) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

(१) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

(२) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

(३) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

(४) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

(५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

(६) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

(७) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

(८) परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

(९) परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

(१०) काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच याव्यतिरिक्त

(११) Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)

वसई विरार मनपा

(१२) Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)

(१३) Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property & Other Taxes (नमुना P&OT-3)

(१४) Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि वरीलप्रमाणे प्रभागाचे लेखे ठेवल्याचे लेखा परीक्षणात आढळून आले नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.१३४ दिनांक ३०/०९/२०१४ अन्वये खुलासा करणेबाबत कळविले असता प्रभाग कार्यालयाने त्याबाबत केलेल्या खुलाशात स्थायी समितीने लेखे कसे ठेवावेत याबाबत ठराव केला असून महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ नुसार लेखे ठेवण्यास परवानगी दिली आहे असे नमूद केले आहे. तथापि त्यासोबत ठरावाची प्रत जोडली नसल्याने खात्री करता आली नाही त्यामुळे खुलासा मान्य करता येत नाही.

२) लेखा परीक्षणात वर्ष २०१२-१३ मध्ये कर आकारणी केलेल्या नस्तीचे लेखा परीक्षणात सर्वसाधारणपणे असे दिसून आले की, बहुतांशी अनधिकृत बांधकामामुळे महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४अ अन्वये मिळणारे उत्पन्न विकास शुल्क व इतर करांची वसुली झालेली नाही. संबंधित अनधिकृत बांधकामासाठी इमारतींच्या मालक/बिल्डर यांचेवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ नुसार दंड आकारणे, ५३ नुसार अनधिकृत बांधकाम काढून टाकणे, ५४ अन्वये अनधिकृत बांधकाम बंद करणे, व ५७ अन्वये झालेल्या खर्चाची वसुली करणे अशी कारवाई करण्यात आली नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्र.१३४ दिनांक ३०/०९/२०१४ अन्वये खुलासा करणेबाबत कळविले असता प्रभाग कार्यालयाने याबाबत खुलासा केला नाही.

३) महानगरपालिकेच्या ड प्रभाग नवघर माणिकपूर क्षेत्रात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७(१)(अ) तरतुदीनुसार मोकळ्या जागा-जमिनी, मोबाईल टॉवर्स, इत्यादींवर कर आकारणी केली नसल्याने अधिनियमातील तरतुदींचे पालन केले नसल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.१३४ दिनांक ३०/०९/२०१४ अन्वये खुलासा करणेबाबत कळविले असता प्रभाग कार्यालयाने याबाबत केलेल्या खुलाशात अधिनियमातील तरतुदीनुसार मोकळ्या जागा, जमिनी यावरील कर आकारणी करण्याबाबत सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. प्रस्तावास मंजुरी मिळाल्यानंतर अधिनियमातील तरतुदीनुसार कराची वसुली केली जाईल असे कळविले आहे. प्रभाग कार्यालयाने सर्वसाधारण सभेसमोर ठेवलेल्या प्रस्तावाची प्रत सोबत सादर केली नाही तसेच प्रत्यक्षात कराची वसुली केली जात नसल्याने केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 125, Hmm No : 134)

83 प्रभाग 'ड' गोखिवरे विभागाचे मालमत्ता कर आकारणीत आढळून आलेल्या अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवले नाहीत. मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या वर्ष १९९९ च्या मंजूर दराने केली जात आहे. मालमत्ताधारकांकडून शिक्षण कर, रोजगार हमी कर या शासनास देय असलेल्या करांचीदेखील वसुली केली जात नसल्याने शासनास सदर करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे.

१) मालमत्ता कर विभागाचे लेखे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे विहित केलेल्या नमुन्यांत महानगरपालिकेचे लेखे ठेवणे आवश्यक आहे.

(१) वसुली नोंदवही (नमुना सर्वसा ११)

(२) दैनिक वसुली गोषवारा (नमुना सर्वसा १२)

(३) मागणी नोंदवही (नमुना सर्वसा २०)

(४) मागणी बिल नोंदवही (नमुना सर्वसा २१)

(५) बिलांचे गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २२)

(६) नोटीस फी, वारंट फी व इतर नोंदवही (नमुना सर्वसा २३)

(७) नोटीस फी, वारंट फी व इतर गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २४)

(८) परतावा, Remission व Write Off नोंदवही(नमुना सर्वसा २५)

(९) परतावा, व Remission गोषवारा विवरणपत्र (नमुना सर्वसा २६)

(१०) काढून टाकलेल्या मालमत्तांचे गोषवारा विवरणपत्रे (नमुना सर्वसा २६) तसेच याव्यतिरिक्त

(११) Summary Statement of Bills Raised (नमुना P&OT-1)

(१२) Summary Statement of Demand Adjustments Raised (नमुना P&OT-2)

(१३) Summary Statement of Year-wise, Head-wise collection of Property & Other Taxes (नमुना P&OT-3)

(१४) Summary Statement of Refunds and Remissions (P&OT-4)

तथापि वरील नमुन्यात मालमत्ता कर वसुलीचे गोखिवरे विभागाचे लेखे ठेवलेले नाहीत. विभागाने याबाबत अर्धसमास पत्र क्र. ७९ दिनांक १९/०८/२०१४ चे अनुषंगाने सादर केलेल्या खुलाशात नगरपरिषद लेखासंहिता १९७१ च्या लेख्यानुसार नमुन्यात ठेवण्यात येत आहेत. यापुढे राष्ट्रीय नगरपालिका लेखांश नियमपुस्तिका २००४ मधील तरतुदीनुसार लेखे ठेवण्यात येतील असे नमूद केले आहे. प्रत्यक्ष लेखे नमुन्यात ठेवले नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

२) ग्रामपंचायत गोखिवरे विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग नगरविकास विभाग अधिसूचना दिनांक ३१ मे, २०११ नुसार महानगरपालिकेत विलीन झाली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ नियम १२८-अ नुसार आकारणी करावयाच्या करांची आकारणी केली नसुन आजतगायत गोखिवरे विभागाची मालमत्ता कर वसुली घरपट्टी ही ग्रामपंचायतीच्या वर्ष १९९९ च्या मंजूर दराने केली जात आहे. त्यामुळे सदर विभागात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२७(१)(अ) नुसार मालमता कर आकारणी करून कलम १२८अ नुसार मालमत्ता करात समावेश असलेल्या करांपैकी प्रामुख्याने १४८अ नुसार शिक्षण उपकर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, कलम १३१ अन्वये स्वच्छता कर, कलम १३७ अन्वये विशेष स्वच्छता कर १२९(क) अन्वये अग्निशमन उपकर दरानुसार आकारणी करून कर वसूल केला जात नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. तसेच सदर गोखिवरे विभागातील मालमत्ताधारकांकडून शिक्षण कर, रोजगार हमी कर या शासनास देय असलेल्या करांचीदेखील वसुली केली जात नसल्याने शासनास देखील सदर करापोटी मिळणाऱ्या उत्पन्नास मुकावे लागले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र. ७९ दिनांक १९/०८/२०१४ चे अनुषंगाने सादर केलेल्या खुलाशात महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१ दिनांक १८/०२/२००९ अन्वये मागील दरानेच कर वसुलीस मान्यता दिली आहे, यापुढे शिक्षण कर व रोजगार हमी कर वाढविण्याचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर कर वसुली करून शासनास भरणा करण्यात येईल असे कळविले आहे. शिक्षण कर व रोजगार हमी कर वसुली केली जात नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 128, Hmm No : 79)

84 लेखा परिक्षणास अभिलेखे उपलब्ध न झालेबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : मालमत्ता कर, परिवहन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ङ

गुंतलेली रक्कम रु. 5858771.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5858771.00/-

मालमत्ता कर संगणकीकरण, मालमत्ता नामांतर जाहिरात प्रसिध्दी खर्च, परिवहन सेवा खर्च व दावे, खटले,

यावरील खर्च रक्कम रु. ५८,५८,७७१/- चे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

वसई-विरार शहर मनपाचे वर्ष २०१२-१३ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात असे दिसुन आले की वर्ष २०१२-१३ या वित्तीय वर्षात जमाखर्च पत्रकानुसार खालील बाबींवर खर्च केला आहे.

न.क्र.	खर्चाचा तपशिल	खर्च रक्कम रु.
१.	मालमत्ता कर संगणकीकरण	२६६२७७३
२.	मालमत्ता नामांतर जाहिरात प्रसिध्दी खर्च	१९२२९१४
३.	परिवहन सेवा खर्च	९६२७७१
४.	दावे, खटले, खर्च	३१०३१३
	एकूण	**५८५८७७१**

१) मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार अर्धसमास पत्र क्र. १६८ दिनांक ०५/१२/२०१४ अन्वये वरील खर्चा संबंधीचे लेखे, नस्ती, प्रमाणके इत्यादी अभिलेखे लेखा परिक्षणात मागणी करूनही लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाहीत. त्यामुळे सदर खर्च रक्कम रु. ५८,५८,७७१/- चे लेखा परीक्षण करता न आल्याने खर्चाची सत्यता लेखा परीक्षणात तपासता आली नाही. सबब खर्च रक्कम रु. ५८,५८,७७१/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे

DGPVTTM7001 (Ref No : 132, Hmm No : 168)

85 मालमत्ता विभागाची संगणक प्रणाली वापरून ठेका पद्धतीने दैनंदिन कामकाज व कर बिले वाटप खर्चाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : संगणकीकरण मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1011553.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1011553.00/-

मे.स्वस्तिक इंटरप्रायजेस यांना वर्ष २०११-१२ व २०१२-१३ मध्ये प्रदान केलेल्या एकूण रक्कमेची माहिती, प्रत्यक्ष तयार केलेल्या कामानुसारची बिले, अहवाल, नोंदवहया इत्यादीची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. संगणकात मागणी तयार करणे, नवीन मागणी नोंदविणे, नव्याने वाढ व घट झालेल्या मालमता, मागणी बिले, नोटीस बिले, जप्ती नोटीस, वारंट नोटीस, कराच्या वसुली पावत्या संख्या, मासिक पोटकीर्द संख्या, मागणी वसुली थकबाकी नोंदवहया इत्यादी प्रकारची कामे बिलात दर्शविली नाहीत. एकूण १,५९,५५१

मालमत्ताच्या संख्या आधारे रक्कमा प्रदान केल्या आहेत.

वसई-विरार शहर मनपाचे वर्ष २०१२-१३ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात असे दिसुन आले की, वर्ष २०१२-१३ या वित्तीय वर्षात नालासोपारा प्रभाग कार्यालयाने वर्ष २०११-१२ या वर्षाकरिता मालमत्ता विभागाची उपलब्ध असलेली संगणक प्रणाली व संगणक यंत्रणा मे.स्वस्तिक इंटरप्रायजेस यांनी देखभाल दुरुस्तीसह वापरून मालमत्ता कर विभागाचे दैनंदिन कामकाज विभागाकडील नमुन्यानुसार स्वत:चे स्टेशनरीसहित वापरून बिल नोटीस, जप्ती नोटीस, जप्ती मागणी, नोंदवही, आकारणी नोंद, प्रभाग पुस्तके, पावती दाखले, तपशिल अहवाल, ऑनलाईनवर काम करणे, बाईंडिंगसह ठेका पद्धतीने चालविणे, मागणी नोटीसा छपाई तसेच ठेका पद्धतीने मालमत्ता कराची बिले, थकबाकीच्या मागणी नोटीसा वाटपाचे कामकाज याकरिता वर्ष २०११-१२ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यापैकी मे.स्वस्तिक इंटरप्रायजेस यांची प्रति मालमत्ता रु.६.३४ दराच्या निविदेत मालमत्ता कर विभागाचे दैनंदिन कामकाज विभागाकडील नमुन्यानुसार स्वत:चे स्टेशनरीसहित वापरून बिल नोटीस, जप्ती नोटीस, जप्ती मागणी, नोंदवही, आकारणी नोंद, प्रभाग पुस्तके, पावती दाखले, तपशिल अहवाल, ऑनलाईनवर काम करणे, बाईंडिंगसह ठेका पद्धतीने चालविणे, मागणी नोटीसा छपाई तसेच ठेका पद्धतीने मालमत्ता कराची बिले, थकबाकीच्या मागणी नोटीसा वाटप करणे इत्यादी कामे पूर्ण करण्याची होती. सदरची निविदा स्थायी समिती ठराव क्र. ०३ दिनांक २३/०८/२०११ अन्वये मंजूर करण्यात आली होती. वर्ष २०१२-१३ या वर्षासाठी संबधित ठेकेदारास ठराव क्र. ३६५ दिनांक २०/०७/२०१२ अन्वये मुदतवाढ दिली असून पत्र क्र. वविशम/करवि/५४६/१२-१३ दिनांक १६/०८/२०१२ अन्वये कार्यादेश दिला आहे. वर्ष २०१२-१३ मध्ये संबंधित ठेकेदार मे.स्वस्तिक इंटरप्रायजेस यांना प्रमाणक क्र. ३४३० ते ३४३२ दिनांक ०८/०१/२०१३ अन्वये एकूण मालमत्ता १५९५५१ करीता प्रति मालमत्ता रु. ६.३४/- दराने खालीलप्रमाणे एकूण रक्कम रु.१०,११,५५३/- प्रदान केली आहे.

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल
३४३०	०८/०१/२०१३	२८४९२४	**१)मागणी नोटीस छपाई** --एकूण रक्कमेच्या १५% (मालमत्ता १४९८०२ X रु.६.३४ = ९४९७४५/-) १४२४६२/- **२)मागणी नोटीस वाटप** -- एकूण रक्कमेच्या १५% (मालमत्ता १४९८०२ X रु.६.३४ = ९४९७४५/-) १४२४६२/-
३४३२	०८/०१/२०१३	२८४९२४	**१)मागणी बिल वाटप** -- एकूण रक्कमेच्या १५% (मालमत्ता १४९८०२ X रु.६.३४ = ९४९७४५/-) १४२४६२/- **२)मागणी बिल छपाई** -- एकूण रक्कमेच्या १५% (मालमत्ता १४९८०२ X रु.६.३४ = ९४९७४५/-) १४२४६२/-
३४३१	०८/०१/२०१३	४४१७०५	**१)मागणी नोटीस वाटपाचे काम** -- एकूण रक्कमेच्या २०% (मालमत्ता १४९८०२ X रु.६.३४ = ९४९७४५/-) १८९९४९/- **२)अंतिम देयक** -- एकूण मालमता (मालमत्ता संख्या १५९५५१ X ६.३४ = १०११५५३- यापूर्वी दर्शविलेली प्रदान रक्कम रु.७५९७९७/-)

			=२५१७५६/-
	एकूण	**१०११५५३**	

वरील खर्चाबाबत लेखा परीक्षणात अर्धसमास पत्र क्र.१७३ दिनांक ०७/११/२०१४ अन्वये खालील अनियमितताबाबत कळविले असता प्रभाग कार्यालयाने/विभागाने त्याबाबत कोणताही खुलासा केला नसल्याने लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) उपरोक्त तिन्ही प्रमाणकांच्या बिलांची मागणी मे.स्वस्तिक इंटरप्रायजेस यांनी दिनांक नमूद नसलेल्या पत्राद्वारे केली असून पत्रांवरील आवक दिनांक अनुक्रमे १४/०३/२०१२, २०/१२/२०११ व १२/०४/२०१२ रोजीचे आहेत. त्यामुळे वर्ष २०११-१२ मधील केलेल्या कामाच्या रक्कमांचे मागणीनुसार प्रदान वर्ष २०१२-१३ मध्ये झालेले आहे. मे.स्वस्तिक इंटरप्रायजेस यांना वर्ष २०११-१२ या वित्तीय वर्षाच्या कामाचा कार्यादेश त्यांना वविशम/साप्रवि/१००९/११-१२ दिनांक ०९/०९/२०११ रोजी दिला आहे. त्यामुळे त्यांना वर्ष २०११-१२ मध्ये कार्यादेश दिनांकापासून वित्तीय दिनांक ३१/०३/२०१२ पर्यंतच्या ७ महिने कालावधीत एकूण किती मालमत्तांचे ऑनलाईन कामकाज केले होते व त्यापोटी वर्ष २०११-१२ व २०१२-१३ मध्ये किती रक्कमेचे प्रदान झाले याची माहिती तसेच याबाबतच्या प्रत्यक्ष तयार केलेल्या कामानुसारची बिले, अहवाल, नोंदवह्या इत्यादीची माहिती लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे वर्ष २०१२-१३ मधील ७ महिन्यांच्या कालावधीत ठेकेदाराने एकूण १,५९,५५१ मालमत्तांचे नमूद केलेले कामकाजाबाबत लेखा परीक्षणाची साधार खात्री पटली नाही.

२) संबंधित ठेकेदार मे.स्वस्तिक इंटरप्रायजेस यांना वर्ष २०१२-१३ मध्ये १,५९,५५१ मालमत्ताचे कामकाज केल्याचे दर्शवून त्यांना प्रती मालमत्ता दर रु. ६.३४/- ने एकूण रक्कम रु.१०,११,५५३/- चे प्रदान केले आहे. परंतु त्यांनी वर्षातील प्रत्येक महिन्यात/वर्षात किती मालमत्तांचे, मालमत्ता कर विभागाचे दैनंदिन कामकाज विभागाकडील नमुन्यानुसार स्वत:चे स्टेशनरीसहित वापरून बिल नोटीस, जप्ती नोटीस, जप्ती मागणी, नोंदवही, आकारणी नोंद, प्रभाग पुस्तके, पावती दाखले, तपशिल अहवाल, ऑनलाईनवर काम करणे, बाईंडिंगसह ठेका पद्धतीने चालविणे मागणी नोटीसा छपाई, ठेका पद्धतीने मालमत्ता कराची बिले, थकबाकीच्या मागणी नोटीसा वाटपाचे कामकाज केले याचा तपशिल, आकडेवारी दर्शविली नाही. उदा. संगणकात मागणी तयार करणे, नवीन मागणी नोंदविणे, नव्याने वाढ व घट झालेल्या मालमता, मागणी बिले, नोटीस बिले, जप्ती नोटीस, वारंट नोटीस, कराच्या वसुली पावत्या संख्या, मासिक पोटकीर्द संख्या, मागणी वसुली थकबाकी नोंदवह्या इत्यादी. प्रकारची कामे दर्शविली नसून केवळ एकूण वार्षिक मालमत्ताच्या संख्या आधारे प्रदान केल्याचे दिसून येते. तसेच वर्ष २०११-१२ मध्ये दिलेला ठेका दिनांक ०९/०९/२०११ पासून पुढे वर्ष २०१२-१३ या वर्षाच्या मुदतवाढ आदेश दिनांकापर्यंत म्हणजे दिनांक १६/०८/२०१२ पर्यंत चालू होता त्यामुळे २०११-१२ मधील दिनांक ०९/०९/२०११ ते १६/०८/२०१२ व पुढे २०१२-१३ मधील दिनांक १७/०८/२०१२ ते ३१/०३/२०१३ या कालावधीत केलेल्या मालमत्ताच्या कामांची विगतवारी त्या त्या आर्थिक वर्षनिहाय दर्शविली नाही त्यामुळे दिनांक १७/०८/२०१२ ते ३१/०३/२०१३ या कालावधीत संबंधित ठेकेदार यांनी एकूण १,५९,५५१ मालमत्तांचे कामकाज केल्याबाबतचे अभिलेखे उपलब्ध केले नाही. तसेच मालमत्तांपैकी काही मालमत्तांचे वर्ष २०११-१२ मधील ठेका कालावधी दिनांक ०९/०९/२०११ ते १६/०८/२०१२ मध्ये कामकाज करून त्याचे दुहेरी प्रदान झाले असणेची शक्यता आहे. त्यामुळे सदर प्रकरणी विभागाने संबंधित

वसई विरार मनपा

अभिलेख्यासह लेखा परीक्षणाची खात्री पटविली नसल्याने खर्च रक्कम रु.१०,११,५५३/- लेखा परीक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DGPVTTM7001 (Ref No : 133, Hmm No : 173)

86 घरपट्टी विभागाची संगणक प्रणाली वापरून ठेका पद्धतीने विभागाचे दैनंदिन कामकाज स्टेशनरीशिवाय करण्याचे कामाचे प्रदानातील अनियमितता.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : संगणकीकरण मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 347569.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 347569.00/-

मे.स्वॅप इन्फोसिस यांना दिलेला ठेका मालमता कर संगणक प्रणाली वापरून कामकाज करणे या ठेक्याची निविदा नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. ठेकेदार मे.स्वॅप इन्फोसिस यांनी वर्ष २०१२-१३ ची आकारणी, मागणी, वसुली थकबाकी नोंदवही तयार केली नसताना त्यांना रक्कम रु.३,४७,५६९/- प्रदान केली आहे. संगणकात मागणी तयार करणे, नवीन मागणी नोंदविणे, नव्याने वाढ व घट झालेल्या मालमता, मागणी बिले, नोटीस बिले, जप्ती नोटीस, वारंट नोटीस, कराच्या वसुली पावत्या संख्या, मासिक पोटकीर्द संख्या, मागणी वसुली थकबाकी नोंदवह्या इत्यादी. प्रकारच्या कामांचे मासिक अहवाल उपलब्ध नसताना रक्कमा प्रदान केल्या आहेत.

वसई-विरार शहर महानगरपालिका वर्ष २०१२-१३ या वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षणात असे दिसुन आले की वर्ष २०११-१२ या वित्तीय वर्षात विरार प्रभाग कार्यालयाने वर्ष २०११-१२ या वर्षाकरिता मालमत्ता विभागाची उपलब्ध असलेली संगणक प्रणाली व संगणक यंत्रणा वापरून मालमत्ता कर विभागाचे दैनंदिन कामकाज विभागाकडील नमुन्यानुसार स्वत:चे स्टेशनरीसहित वापरून संगणकावर मालमत्ता मागणी तयार करणे, नोटीस तयार करणे, ऑनलाईनवर बिले तयार करणे, ऑनलाईन पावती तयार करणे, मागणी नोंदवही, रोजकीर्द व चलन तयार करणे व संबंधित नोंदवह्या तयार करणेचे काम ठेका पद्धतीने चालविणेचे काम मे.स्वॅप इन्फोसिस यांना वर्ष २०११-१२ मध्ये दिले आहे. सदर प्रकरणी निविदा मागविण्यात आल्या होत्या. स्थायी समिती ठराव क्र. ०३ दिनांक २३/०८/२०११ अन्वये निविदा मंजूर करण्यात आली आहे. वर्ष २०१२-१३ या वर्षात संबधित ठेकेदारास खालील प्रमाणकान्वये कामकाजापोटी प्रदान केले आहे.

प्रमाणक क्र.	**दिनांक**	**रक्कम रु.**	**तपशिल**	**विभाग**
४०६	२२/५/१२	४९००४	संगणकावर मागणी तयार करणे	बोळींज
४०७	२२/५/१२	६८७१२	नोटीस तयार करणे	विरार

वसई विरार मनपा

४०८	२२/५/१२	१७४०३	मागणी नोटीस तयार करणे	बोळींज
४०९	२२/५/१२	३५०१६	ऑनलाईन बिले तयार करणे	बोळींज
१५२६	२७/८/१२	३१०८६	हस्तलिखित पावत्या व रोजकीर्द	विरार
१५२७	२७/८/१२	१४६३४८	ऑनलाईन पावती तयार करणे	विरार
एकूण		**३४७५६९**		

खालील त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.१७४ दिनांक ०७/११/२०१४ अन्वये कळविले असता प्रभाग कार्यालयाने/विभागाने त्याबाबत कोणताही खुलासा केला नसल्याने लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) उपरोक्त ठेक्याची निविदा नस्ती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे निविदा प्रक्रिया, मंजूर दर, निविदेची अनुषंगिक कागदपत्रे, करारनामा यांची तपासणी करता आली नाही.

२) संबंधित ठेकेदार यांनी वर्ष २०१२-१३ ची मागणी, वसुली थकबाकी नोंदवही, स्थायी समिती ठराव क्र.०३ दिनांक २३/०८/२०११ अन्वये तयार करणे आवश्यक असताना ती केली नसताना मे.स्वॅप इन्फोसिस यांना रक्कम रु.३,४७,५६९/- प्रदान करण्यात आली आहे. याबाबत विभागाने कोणताही खुलासा केला नाही.

३) संबंधित ठेकेदार मे.स्वॅप इन्फोसिस यांनी बिलात संगणकावर मागणी तयार करणे, नोटीस तयार करणे, मागणी नोटीस तयार करणे, ऑनलाईन बिले तयार करणे, हस्तलिखित पावत्या व रोजकिर्द तयार करणे, ऑनलाईन पावती तयार करणे या दर्शविलेल्या कामाचे अनुषंगाने वर्षातील प्रत्येक महिन्यात/वर्षात किती मालमत्तांचे, कोणत्या प्रकारचे कामकाज केले याचा तपशिल, लेखा परीक्षणास उपलब्ध झाला नाही. स्थायी समिती ठराव क्र.०३ दिनांक २३/०८/२०११ अन्वये घरपट्टी विभागाचे मागणी नोंदवही, मागणी बिले तयार करणे, मागणी नोटीस तयार काढणे, ऑनलाईन पावत्या, रोजकीर्द, चलन, वॉरंटपूर्व समज व दिनांक ३१/०३/२०१२ पर्यंतच्या वसुलीच्या नोंदी करून देणे इत्यादी प्रकारची कामे करणेची आहेत तथापि, अशी कामे केल्याबाबतचे मासिक अहवाल, अभिलेखे दप्तरी नाहीत. त्यामुळे केलेल्या कामाबाबत लेखा परीक्षणाची साधार खात्री पटली नाही. त्यामुळे केलेले प्रदान रक्कम रु.३,४७,५६९/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DGPVTTM7001 (Ref No : 134, Hmm No : 174)

87 केंद्र शासनाच्या सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा निर्माण करणेची योजना- भुयारी गटार मलनिस:रण

सॅटेलाईट सिटी भुयारी गटार/जलनि:सारण खर्च

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : नगररचना केंद्र/राज्य मनपा निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 114093372.00 /-

वसई विरार मनपा

वसूलपात्र रक्कम रु. 114093372.00/-

कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार केले नाही, मोबीलायजेशन ॲडवान्स दिल्याची नोंद मोजमाप पुस्तकात घेतली नाही.

केंद्र शासनाने सॅटेलाईट सिटींना पायाभुत सुविधा पुरविणे योजने अंतर्गत वसई-विरार महापालिकेची निवड झाली असून महापालिकेने नोडल एजन्सी मार्फत विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून राज्य शासना मार्फत केंद्र शासनाकडे पाठविला होता. केंद्र शासनाने घनकचरा व्यवस्थापन व भुयारी योजनेच्या कामास मंजूरी दिली आहे. या योजने अंतर्गत मिळणारे अनुदान-केंद्र हिस्सा 80%, राज्य हिस्सा 10%, मनपा हिस्सा 10% या प्रमाणे आहे. महापालिकेला 2011-12 व 2012-13 या वर्षात पुढील प्रमाणे अनुदान मिळाले आहे आणि त्यातुन महापालिकेने खर्च केला आहे.

(रक्कम रु. हजारात)

अनुदान	2011-12	2012-13	31/03/13 पर्यंत एकूण	खर्च	2011-12	2012-13	एकूण
घनकचरा व्यवस्थापन				घनकचरा व्यवस्थापन			
केंद्र हिस्सा	63453	-	79317		61251	18483	79734
राज्य हिस्सा	7932	-					
मनपा हिस्सा	7932	-					

	2011-12	2012-13	31/03/13 पर्यंत एकूण	खर्च	2011-12	2012-13	एकूण
भुयारी मलनि:सारण				भुयारी मलनि:सारण			
केंद्र हिस्सा	-	132452	165564	सल्लागार समिती सदस्यांना मनधन	-	300	125836
राज्य हिस्सा	-	16556					
मनपा हिस्सा	-	16556					
				मे. घारपुरे इं.	-	114093	
				मे. टंडन अर्बन प्रकल्प सल्लागार	11443	-	

<u>कामाचे नांव</u> :- वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात भुयारी गटार योजना संकलन प्रणाली प्रक्रिया केंद्र आणि पुर्नवापर, कार्यान्वयन आणि देखभाल दुरुस्तीसह टप्पा-1 व 2 विरार येथे राबविणे

प्राकलन :- (मुळ) 106.60 कोटी, (सुधारीत) 131.64 कोटी, सुधारीत 153.84 कोटी
प्रशासकीय मंजुरी :- सर्वसाधारण सभा ठराव 15, दि. 20/12/2010
तांत्रिक मंजूरी :- नगर अभियंता दि. 20/04/11, नगर अभियंता दि. 12/07/12
निविदा तारीख :- 22/03/12, दै. महाराष्ट्र टाईम्स, द इंडियन एक्सप्रेस.
दुरुस्ती 1द. 21/04/12, दै. महाराष्ट्र टाईम्स, द इंडियन एक्सप्रेस.
एल-1 निविदा :- मे. घारपुरे इंजिनिअरिंग ॲण्ड कंस्ट्रक्शन प्रा.लि. पुणे मुळ-189.98 कोटी (वाटाघाटीने रक्कम रु. 167.59 कोटी) प्रकल्प खर्चाच्या 8.9% जादा.
निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र. 1020, दि. 12/03/2013
करार :- 26/03/2013
कार्यादेश :- 26/03/2013
मुदत :- 22 महिने
काम :- काम अपुर्ण
खर्च :- प्रमाणक क्र. 22, दि. 30/03/2013 रु. 114093372/-

भुयारी मलनिस:रण टप्पा - 1 व 2 चे काम मे. घारपुरे इंजिनिअरिंग ॲण्ड कंस्ट्रक्शन प्रा.लि. यांना दिले आहे. याबाबत लेखा परीक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन क्र. 25, दि. 27/06/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र. निरंक, दि. 10/07/2014 अन्वये खुलासा सादर केला. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) भुयारी गटार योजना संकलन प्रणाली प्रक्रिया केंद्र आणि पुनर्वापर, कार्यान्वयन आणि देखभाल दुरुस्तीसह टप्पा-1 व 2 कामाचे मुळ प्राकलन 106.60 कोटी इतके होते. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व बांधकाम विभागाची जिल्हा दरसुची 2010-11 ची वापरली होती. यानंतर सुधारीत प्राकलन रक्कम रु. 131.64 कोटी चे केले. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व बांधकाम विभागाची जिल्हा दरसुची 2011-12 ची वापरली होती. त्यानंतर ठेकेदाराने कामाचे प्राकलन रु. 189.98 कोटी दाखविले, म्हणून सुधारीत प्राकलन ही महापालिकेने तयार केले ते रु. 153.84 कोटी. यात काही आयटम कमी/जास्त करण्यांत आले. त्यास स्थायी समितीने विभागाने केलेल्या प्राकलनास मंजुरी दिली आहे. केंद्र शासनाने मुळ प्राकलन रु. 106.60 कोटी च्या प्रकल्पास मंजुरी देऊन त्यानुसार अनुदानही टप्प्या टप्प्या ने वितरीत केले आहे. केंद्राकडून प्राप्त अनुदान 13.25 कोटी आहे. या प्रकरणी मुळ प्राकलन रु. 106.60 कोटी व सुधारीत रु. 153.84 कोटी चे दर पृथ:करण तांत्रिक सल्लागाराने केले आहे. ते बरोबर असल्याबाबत किंवा त्यास सहमती असल्याबाबत महानगरपालिका नगर अभियंता/आयुक्त यांची स्वाक्षरी नाही. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 च्या नियम 167 (2) नुसार मुळ अंदाजात 10% अधिक वाढ होण्याचा संभव असेल, संकल्प चित्रात फेरफार असेल तर सुधारीत अंदाज तयार केले पाहिजेत. परंतु सुधारीत अंदाज तयार करून त्यास मान्यता न घेतल्याने या कामात सुमारे 50% पर्यंत जादा होणाऱ्या खर्चासाठी केंद्र/राज्य शासनाचे रु.37.79 कोटी + रु.4.72 कोटी अनुदान प्राप्त होणार नाही. सदर जादा होणारा खर्च महापालिकेला करावा लागणार आहे. महापालिकेने हा जादा खर्च स्वत:च्या निधीतुन करण्यांसाठी मंजुरी दिली आहे.

याकामी सुधारीत प्राकलन तयार करून त्यास केंद्र शासनाची मंजुरी घेतली असती तर होणाऱ्या जादा खर्चाच्या 80+10% अनुदान प्राप्त झाले असते.

विभागाने केलेला खुलासा विचारात घेता जादा खर्चासाठी महापालिका खर्च करणार असले बाबत ठराव केलेला आहे. मुळ अंदाज 2010-11 चे होते. कामात सुधारणा केल्याने व जिल्हा दर सुचिचे भाव वाढल्याने अंदाजपत्रकात सुधारणा करावी लागली. प्रकल्प सल्लागाराने तयार केलेल्या दर पृथ:करणावर नगर अभियंता यांची स्वाक्षरी असल्याचे नमुद केले आहे. परंतु या प्रकरणी सुधारीत अंदाजपत्रक रु. 153.84 कोटी या रक्कमेस केंद्र शासनाची मंजूरी मिळाल्याची कागदपत्रे दाखविली नाहीत. तसेच केंद्र शासनाची सुधारीत मंजुरी घेतल्याचा

खुलासा विभागाने केला नाही.

2) निविदा नस्ती मधील अटी शर्ती पहाता मोबीलायजेशन ॲडवान्स बाबत उल्लेख आहे (14.2) टेंडर किमतीच्या 5% ॲडवान्स देण्याची तरतुद नमुद आहे. असे असतांना निविदा पुर्व बैठकीत महानगरपालिका आयुक्तांनी मोबीलायजेशन ॲडवान्स 10% मंजुर केला आहे. अशा प्रकारे निविदे मधील अटी शर्ती कोणत्या प्राधिकारान्वये बदलल्या याबाबतचे कागदपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. निविदा नस्तीमधील अटी शर्ती कोणत्या प्राधिकारान्वये बदलल्या याबाबत लेखापरीक्षणाची पुर्तता करावी.

मोबीलायजेशन ॲडवान्स पहिल्या 6 महिन्यापर्यंत बिनव्याजी देऊन पुढील काळात दर साल दर शेकडा 12% व्याजाने रक्कम वसुल करावयाची आहे. त्यासाठी महापालिकेने बँक गॅरेंटी घेतलेली आहे. बिन व्याजी अग्रीम दिल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. ठेकेदारास 26/03/13 रोजी कार्यादेश दिला असून 30/03/13 रोजी रु. 114093372/- अग्रीम दिला आहे. म्हणजे कार्यादेश दिल्यानंतर लगेचच 4 दिवसात मोबीलायजेशन ॲडवान्स दिला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता प्रकरण 10 बांधकाम लेखे (घ) कंत्राटदारांना आगाऊ रक्कमा देणे परिच्छेद क्र. 10.2.21, 10.2.22 नुसार- नियमानुसार कंत्राटदारांना आगाऊ रक्कमा देण्यांस मनाई आहे. जागेवर आणलेल्या सामानाच्या/ साहित्याच्या 75% पेक्षा अधिक नसेल, इतक्या आगाऊ रक्कमा मंजुर करता येतील. असे असतांना या प्रकरणी कार्यादेश दिल्यानंतर कोणतेही साहित्य साईट वर येण्यापुर्वीच ॲडवान्स दिलेला आहे.

याबाबत विभागाने केलेला खुलासा विचारात घेता विशेष प्रकल्पासाठी मोबीलायजेशन ॲडवान्स द्यावा लागतो जेणेकरून काम मोठ्या नामांकित एजन्सींना देऊन करून घेता येते. कामाच्या निविदेत 5% ॲडवान्सची तरतुद होती. निविदा पुर्व बैठकीत ती 10% करण्यांत आली. म्हणजेच निविदा जाहिरात दिल्यानंतर, निविदा प्राप्त झाल्यानंतर मोबिलायझेशन ॲडव्हान्समध्ये वाढ केली आहे. सदरची वाढ निविदा जाहीर करण्यापुर्वीच केली असती तर जादा निविदाधारकांनी या प्रक्रियेत भाग घेतला असता. परंतु तशी कार्यवाही महानगपालिकेने केली नाही.

मोबीलायजेशन ॲडवान्सची रक्कम सहा महिन्यांनंतर 12% व्याजाने दिली आहे असे नमुद केले आहे. परंतु ठेकेदाराने जागेवर आणलेल्या सामानाच्या/साहित्याच्या नोंदी घेऊन निविदेतील व करारातील अटी शर्ती नुसार मोबीलायजेशन ॲडवान्स दिल्याची नोंद मोजमाप पुस्तकात घेतली नाही. त्यामुळे अग्रीम वसुलीवर नियंत्रण राहिले नाही. याबाबत विभागाने आवश्यक ती खबरदारी घेऊन अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे.

उपरोक्त उणीवांची पुर्तता करेपर्यंत रक्कम रु.114093372/- लेखा परीक्षणात वसुलपात्र ठेवण्यांत येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 11, Hmm No : 25)

88 नगररचना विभागाकडील उपलब्ध न झालेल्या माहितीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :अनधिकृत मालमत्ता वाप मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

नगर रचना विभागाने लेखा परीक्षणास अर्धसमास पत्राद्वारे मागणी केलेली माहिती, अभिलेखे लेखा परीक्षणास

संबंधित विभागाकडून प्राप्त करून उपलब्ध केली नाही.

नगर रचना विभागास अर्धसमास पत्र क्रमांक ५४ दिनांक २१/०७/२०१४ अन्वये लेखा परीक्षणास आवश्यक असलेली महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत इमारत बांधकामापोटी दंडनीय रक्कम वसूलबाबतची माहिती, महाराष्ट्र प्रादेशिक शहर रचना अधिनियम १९६६ मधील परिशिष्ट W मधील अट क्र.१५ नुसार जमीन मालकाला TDR मंजूरीच्या मोबदल्यात महापालिकेस हस्तांतरीत करावयाच्या जागेभोवती १.५ मीटर उंचीचा कंपाऊंड वॉल व गेट विकासकाने स्वखर्चाने पूर्ण करून महानगरपालिकेकडे हस्तांतरित झालेल्या जागां, व केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती व अधिकृत/अनधिकृत मोबाईल टॉवर्सना परवानगी, विकास कर इत्यादीबाबतची माहिती व संबंधित अभिलेखे सादर करण्यांबाबत कळविले होते. तथापि नगररचना विभागाने याबाबतची माहिती विभागात नसल्याचे कळविले आहे. लेखा परीक्षणास आवश्यक असलेल्या मुददयांबाबतची माहिती प्राप्त होण्याकरीता अर्धसमास ज्ञापन पत्र मा. आयुक्त यांना देण्यांत येते. याबाबतची तात्काळ कार्यवाहीसाठी त्याची प्रत संबंधीत विभाग प्रमुखास अग्रेषित करण्यांत येते. सदर प्रकरणी उपसंचालक, नगररचना यांनी खालील मुददयांबाबत लेखा परीक्षणास केलेल्या खुलाशात संबंधित माहिती बांधकाम विभागाशी व अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण विभागाशी संबधित आहे हा परस्पर केलेला खुलासा उचित नाही. वास्तविक सदर प्रकरणी त्यांनी संबंधित विभागांकडून माहिती प्राप्त करुन घेवून ती संकलित स्वरुपात लेखा परीक्षणास मा. आयुक्त यांचेमार्फत सादर करणे आवश्यक होते. तथापि असे केलेले नाही. त्यानुसार खालील मुददयांबाबत संबंधितांकडून खुलासा प्राप्त करुन समन्वयकामार्फत एकत्रित माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.१८४ दिनांक २९/११/२०१४ अन्वये कळविले असता संबंधित विभागांनी याबाबत खुलासा अगर माहिती सादर केली नाही. तरी याबाबत लेखा परीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1)वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत इमारत बांधकामासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२४क(३) नुसार दंडनीय रक्कम वसूल करण्यात येत असल्यास वित्तीय वर्ष २०१२-२०१३ मध्ये एकूण किती दंडनीय रक्कम वसुली केली आहे, याबाबतची माहिती उपरोक्त अर्धसमासाद्वारे मागणी करूनही लेखा परीक्षणास उपलब्ध करून दिली नाही. त्यामुळे उपरोक्त अधिनियमातील कलमाप्रमाणे अनधिकृत बांधकामापोटी दंडनीय रक्कमा वसुली केल्याचे तपासता आले नाही. नगररचना विभागाने दिलेल्या खुलाश्यात अनधिकृत बांधकाम विभाग हा स्वतंत्र विभाग असुन याबाबतची माहिती संबंधीत विभागाकडून घ्यावी असे कळविले आहे. नगररचना / अनधिकृत बांधकाम विभागाने याबाबतची माहिती लेखा परीक्षणास सादर केली नाही.

2) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील परिशिष्ट W मधील अट क्र.१५ नुसार जमीन मालकाला TDR मंजूर करण्यात येतो. TDR च्या मोबदल्यात महापालिकेस हस्तांतरीत करावयाच्या जागेभोवती १.५ मीटर उंचीचा कंपाऊंड वॉल व गेट विकासकाने स्वखर्चाने पूर्ण करून जागा हस्तांतरित करावयाची आहे. त्याप्रमाणे मनपा कडे हस्तांतरित झालेल्या जागांबाबत केलेल्या कार्यवाहीसह सविस्तर माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्याबाबत कळविले असता, ती उपलब्ध न केल्याने अधिनियमातील उपरोक्त तरतुदीनुसार जागा हस्तांतरित झाल्याची तपासणी करता आली नाही. विभागाने केलेल्या खुलाशात

नगररचना विभागाने मान्यता दिल्यानंतर जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही बांधकाम विभागाकडून करण्यांत येते. त्यामुळे याबाबतची माहिती बांधकाम विभागाकडून घेण्यात यावी असा खुलासा केला आहे. नगररचना / बांधकाम विभागाने याबाबतची माहिती लेखा परीक्षणास सादर केली नाही.

3) महापालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवर्सना परवानगी नगर रचना विभागामार्फत करण्यात येते का?. महापालिका क्षेत्रात एकूण किती मोबाईल टॉवर्स आहेत यापैकी अधिकृत, अनधिकृत किती?, परवानगी दिलेले, न दिलेले किती? त्यांवर विकास कराची एकूण किती रक्कम वसुली केली आहे? किती रक्कम वसुली करणे बाकी आहे? याची माहिती संबंधित अभिलेख्यांसह उपलब्ध करून मोबाईल टॉवर्सचा ताळमेळ महानगर टेलिफोन विभागाकडील नोंदी/आकडेवारीसोबत घेतला आहे का? याबाबतची माहिती सादर करणेबाबत कळविले असता सदरची माहिती लेखां परीक्षणास उपलब्ध न केल्याने अधिकृत/अनधिकृत मोबाईल टॉवरच्या विकास कराची वसुली तपासता आली नाही. विभागाने केलेल्या खुलाश्यात नगररचना विभागाने अनधिकृत मोबाईल टॉवर्स बाबतची माहिती अनधिकृत बांधकाम विभागाकडून प्राप्त होईल असे कळविले आहे. नगररचना/ अनधिकृत बांधकाम विभागाने याबाबतची माहिती लेखा परीक्षणास सादर केली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 146, Hmm No : 184)

89 श्री.वाय.एस.रेड्डी उपसंचालक नगररचना यांचे नियुक्ती व वेतननिश्चितीबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : वेतन व भत्ते मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 179139.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 179139.00/-

श्री.वाय.एस.रेड्डी, उपसंचालक, नगररचना यांची नियुक्ती व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९ मधील नियम ८ अंतर्गत परिशिष्ट ३ नुसार उपसंचालक पदाच्या किमान वेतनावर वेतन निश्चिती न केलेबाबत.

श्री.वाय.एस.रेड्डी, सहयोगी नियोजनकार/उप नियोजनकार हे सिडको महामंडळाकडून दिनांक १३/०८/२०१० रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेत उपसंचालक, नगररचना या पदावर प्रतिनियुक्तीने १ वर्षाकरीता हजर झाले आहेत. श्री. रेड्डी हजर झाल्यानंतर त्यांनी मागील दिनांक २०/०५/२०१० रोजीचा अर्ज आवक क्रमांक १७५० दिनांक २१/०५/२०११ अन्वये वसई-विरार महानगरपालिकेत नियमित सेवेमध्ये उपसंचालक, नगररचना या पदावर सामावून घेणेबाबत अर्ज दिला आहे. महासभा ठराव क्र.०६ दिनांक ०७/०६/२०११ अन्वये श्री.रेड्डी यांना महानगरपालिका सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्यास मंजुरी दिली आहे. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी त्यांचे पत्र क्र. विशम/ आस्था/२३४/२०११-१२

दिनांक १०/०६/२०११ अन्वये सचिव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभागास श्री. रेड्डी याना सेवेत कायम स्वरूपी सामावून घेणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. तर आदेश क्र. वविशम/ आस्था /२८४/२०११-१२ दिनांक ०१/०७/२०११ अन्वये ६व्या वेतन आयोगाची उपसंचालक पदाची वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० मध्ये अटी व शर्तीनुसार कायम समायोजन आदेश निर्गमित केले आहेत. सदर आदेशातील--

१)अट क्र. १ नुसार ते आदेशाच्या दिनांकापासून ते सिडको प्राधिकरणातून निवृत्त झाले असे समजण्यात येईल.

२)अट क्र.२ नुसार आदेशाचे दिनांकास जमा असलेली भविष्य निर्वाह निधीची रक्कम वसई विरार शहर महानगरपालिकेत जमा करावी.

३)अट क्र.३ नुसार त्यांचे सध्याचे वेतन व एकूण वेतन संरक्षित करण्यात येत आहे असे नमूद केले आहे.

सिडको कडील पत्र दिनांक १४/१२/२०११ अन्वये श्री. रेड्डी यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक १२/०८/२०११ पासून पुढे ६ महिने तर पत्र दिनांक ०७/०६/२०१२ अन्वये दिनांक १२/०५/२०१२ पासून पुढे ६ महिने प्रतिनियुक्ती कालावधी वाढवून दिला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेतील उपसंचालक नगररचना हे पद सरळसेवेने भरणेसाठी दिनांक १२/०५/२०११ रोजी दैनिक लोकमत, दैनिक सामना व दैनिक नरवीर चिमाजी या वृत्तपत्रात जाहीर सूचना प्रसिद्ध करून अर्ज मागविणेत आले होते. सदर उपसंचालक पदाच्या भरती प्रक्रियेच्या निवड समितीने दिनांक ०६/०१/२०१२ रोजी श्री. रेड्डी यांची सरळसेवेने नेमणूक करण्यास शिफारस केली आहे.

सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ०६, दिनांक ०९/०२/२०१२ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपसंचालक नगररचना या रिक्त पदावर सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन १५६००-३९१०० ग्रेड वेतन ६६०० या वेतनश्रेणीत खालील अटी व शर्तीनुसार सरळसेवेने सामावून घेण्यास मान्यता दिली आहे. त्यास अनुसरून आयुक्त यांनी त्यांचे आदेश क्र. वविशम/आस्था/७८१/२०११-१२ दिनांक १०/०२/२०१२ अन्वये श्री रेड्डी, यांची उपसंचालक नगररचना या पदावर खालील अटी व शर्ती नमूद करून नेमणूक केली आहे.

१) नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येईल.

२) पदाचा परीविक्षाधीन कालावधी २ वर्षाचा राहील.

३) हजर झाल्यापासून ३० दिवसाचे आत वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करावे राहील.

४) त्यांच्या सेवा महाराष्ट्र नागरी सेवा नियमान्वये व शासन वेळोवेळी विहित करेल त्या अटीअन्वये नियंत्रित केल्या जातील.

५) शासन निर्णय दिनांक ३१/१०/२००५ नुसार परीभाषित अंशदायी निवृत्तीयोजना लागू राहील.

६) पोलीस स्टेशनचा चारित्र्याचा दाखला १ महिन्याचे आत सादर करावा.

७) शासनाचे/महापालिकेचे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश लागू राहतील.

श्री.रेड्डी यांचा दिनांक नसलेला अर्ज आवक क्रमांक १२६३३ दिनांक २३/०१/२०१३ अन्वये नेमणुकीचे पत्र दिनांक १०/१२/२०१२ (प्रत्यक्षात नेमणूक आदेश दिनांक १०/०२/२०१२) नुसार रुजू अहवाल स्वीकृत करून दिनांक १३ नोव्हेंबर २०१२ पासून महानगरपालिकेचा परीविक्षाधिन कर्मचारी म्हणून मानण्यात यावे. व सिडकोचे प्रतिनियुक्ती आदेश दिनांक १३/०८/२०१० मधील अट क्र. ६ नुसार जर संबंधित कर्मचाऱ्याची सेवा वसई-विरार महानगरपालिकेत सामावून घेण्याचा निर्णय घेतला गेला तर असा कर्मचारी ज्या तारखेपासून महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यात येईल त्या तारखेपासून सिडकोच्या सेवेतून अशा

कर्मचाऱ्याने राजीनामा दिला आहे असे समजण्यात येईल. असे आयुक्त, वसई विरार महानगरपालिका यांना कळविले आहे. श्री.रेड्डी यांना वर्ष २०१२-२०१३ मध्ये वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० मध्ये २८२४०/- या मूळ वेतनावर वेतन व भत्ते अदा केले आहेत. त्यांचे प्रदान वेतनाबाबत व नियुक्तीबाबत लेखा परीक्षणात अर्धसमास पत्र क्रमांक १९१ दिनांक ०८/१२/२०१४ अन्वये खालील त्रुटींबाबत विचारणा केली असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नाही. सबब लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५ब अन्वये प्रतिनियुक्तीवरील भरावयाची पदे अधिसूचित करण्याचा अधिकार शासनाचा आहे. तथापि, श्री. रेड्डी यांना महानगरपालिकेत सामावून घेण्यास शासनाने अद्यापपर्यंत मंजुरी दिल्याचे आढळून आले नाही.

२) शासन मंजुरीनुसार उपसंचालक, नगररचना हे पद सरळसेवा भरतीने भरावयाचे असल्याने याबाबत जाहीर सूचना वर्तमानपत्रात प्रसिद्धी दिली आहे. भरतीबाबतची कागदपत्रे, निकाल, जाहिरात इत्यादी कागदपत्रे लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाहीत.

३) सरळसेवेने नियुक्ती केलेल्या पदाची वेतननिश्चिती शासन अधिसूचना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००९ मधील नियम ८ अंतर्गत परिशिष्ट ३ नुसार उपसंचालक पदाच्या किमान वेतनावर वेतन निश्चिती करणे आवश्यक आहे. तथापि श्री.रेड्डी यांच्या सिडकोकडील सेवा ग्राह्य धरून त्यांचे नियमित वेतन काढणेत येत आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांना जादा वेतन व भत्ते प्रदान झाले असून त्याची रक्कम रु.१,७९,१३९/-ची वसुली करून लेखा परीक्षणास अनुपालन करावे. (परीशिष्ट प्रमाणे)

४) सर्वसाधारण सभा ठराव क्र.०६ दिनांक ०७/०६/२०११ व सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ०६ दिनांक ०९/०२/२०१२ अन्वये श्री.रेड्डी यांना महानगरपालिका सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्यास मंजूरी दिली आहे असा सभेचा निर्णय आहे. त्यात कुठेही श्री.रेड्डी त्यांचे वेतन संरक्षित करून नियुक्ती करावी असे नमूद नाही. त्यामुळे श्री. रेड्डी यांचे वेतन संरक्षित करून त्यांना वेतन प्रदान करणेत येते ही कार्यवाही चुकीची आहे.

५) महानगरपालिकेने श्री.रेड्डी यांना महापालिका सेवेत सामावून घेतल्यानंतर त्यांचे सेवापुस्तक हा महत्त्वाचा अभिलेख तयार केलेला नाही. व त्यांचे वेतन निश्चिती आदेश काढलेले नाहीत. ज्यावेळी सेवापुस्तक बनविले नसेल अगर वेतन निश्चिती करण्यात आली नसेल अशा प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्याच्या पदाच्या वेतनश्रेणीच्या किमान वेतनावर वेतन आहरीत करण्यात येते तथापि महानगरपालिकेने अशा प्रकारची कार्यवाही केली नाही. त्यामुळे श्री.रेड्डी यांना कशाचे आधारे, कोणत्या नियमान्वये वर्ष २०१२-१३ मधील माहे फेब्रुवारी २०१३ चे वेतन रु.२८२४०/- प्रदान करण्यात आले आहे? याबाबतचा साधार खुलासा लेखा परीक्षणास झाला नाही.

६) श्री.रेड्डी, यांचे दिनांक १३/०२/२०१२ ते १२/०५/२०१२ व दिनांक १३/१२/२०१२ पासून पुढच्या कालावधीचे प्रतिनियुक्ती आदेश सिडकोकडून प्राप्त झाले नसल्याने सिडकोने त्यांना मुदतवाढ दिली नसल्याचे दिसून येते. तरी सदर कालावधीत ते प्रतिनियुक्ती सेवेतून महानगरपालिका अधिकारी म्हणून सेवेत कार्यरत होते याबाबत लेखा परीक्षणाची खात्री पटली नाही.

90 अण्णासाहेब वर्तक चौक ते पी.डब्ल्यु.डी. ऑफिसपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.

विकास निधी अंतर्गत रस्ते बांधकाम

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1142269.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 54800.00/-

रस्ता डांबरीकरण कामाचे बाबत स्वामित्व धनाची रक्कम रु.54800/- वसुल केली आहे, परंतु शासन खाती भरणा केली नाही.

कामाचे नांव :- अण्णासाहेब वर्तक चौक ते पी.डब्यू.डी. ऑफिसपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.

प्राकलन :- 2491166/-

प्रशासकीय मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र. 09, दि 27/04/2011

तांत्रिक मंजूरी :- का.अ. 1/40 दि. 28/04/2011

निविदा तारीख :- 04/05/2011, पुण्य नगरी, खबरे आजतक,

एल-1 निविदा :- मे. ए.आर.सी कन्स्ट्रक्शन 4.98% जादा दराने

निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र. 11/2, दि. 25/05/2011

करार :- 27/05/2011

कार्यादेश :- 453, दि. 27/05/2011

मुदत :- 180 दिवस

मुदतवाढ :- 30/05/2012 पर्यंत

काम पुर्ण :- 09/05/2012

खर्च :- 1 ले धावते देयक रक्कम रु. 2211972/-

2 रे धावते प्रमाणक क्रमांक 936, दि. 29/06/2012 रु.1142269 (MB No.181 पृष्ठ क्र. 52 ते 58)

लेखा परीक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र. क्र. 30,दि. 08/07/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचेकडील पत्र.क्र. निरंक, दि. 15/07/2014 अन्वये खुलासा केला असून मे. ए.आर.सी. कन्स्ट्रक्शन यांचे कडून गौण खनिज उत्खनन नियमानुसार स्वामित्व धनाची रक्कम, सर्व साधारण पावती क्र. 197965, दि. 11/07/2014 रोजी रु. 54,800/- वसुल करून महापालिका फंडात जमा केल्याचे दाखविले. याबाबत लेखापरीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरात येणारे उत्खननाद्वारे किंवा गोळा करून काढलेले सर्व दगड, दगडाची भुकटी, गोटे, बारीक खडी, मुरूम, वाळू यावर स्वामित्व धनाची रक्कम प्रति ब्रास रु. 200 वसुल करून शासन खाती (महसूल व वन) भरणा करावयाची आहे.महापालिकेने कामाबाबत ठेकेदाराने जे खालील प्रमाणे 274 ब्रास साहित्य वापरले त्या साहित्यावरील गौण खनिजाची रक्कम रु. 54800/- वसुल केली आहे. परंतु शासन खाती भरणा केली नाही.

वसई विरार मनपा

80mm मेटल 542.80 Cum
हार्ड मुरूम 233.10 Cum
एकूण 775.90 / 2.83
म्हणजेच 274 ब्रास X 200 = 54800
सदरची रक्कम रु.54800/- शासन खाती (महसुल व वन) भरणा करून अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे.

DATPMVM6001 (Ref No : 12, Hmm No : 30)

91 वालीव येथे फणसपाडा (KT) ते गावदेवी वसाहत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे

विकास निधी अंतर्गत रस्ते बांधकाम.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1943044.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 73200.00/-

रस्ता डांबरीकरण कामाचे बाबत स्वामित्व धनाची रक्कम रु.73200/- वसुल केली असून शासन खाती भरणा केली नाही.

कामाचे नांव :- वालीव येथे फणसपाडा (KT) ते गावदेवी वसाहत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

प्राकलन :- 1775452/-

प्रशासकीय मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र. 6/22, दि 02/02/2011

तांत्रिक मंजूरी :- का.अ. 10/97 दि. 04/02/2011

निविदा तारीख :- 20/02/2011, नवाकाळ, आपलं महानगर,

एल-1 निविदा :- मे. रमेश ॲण्ड असोसिएट्स, कांदिवली (प) 7.90% जादा दराने

निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र. 3/15, दि. 16/03/2011

करार :- 26/04/2011

कार्यादेश :- 205, दि. 27/04/2011

मुदत :- 180 दिवस

काम पुर्ण :- 19/10/2011

खर्च :- प्रमाणक क्रमांक 872, दि. 22/06/2012 रु. 1943044 (MB No.182 पृष्ठ क्र. 38 ते 43)

लेखा परीक्षणास अर्धसमास ज्ञापन पत्र.क्र. 31, दि. 08/07/2014 अनवये खुलासा विचारला

होता. विभागाने त्यांचेकडील पत्र.क्र. निरंक, दि. 15/07/2014 अन्वये खुलासा केला असून ते. रमेश ॲण्ड असोसिएट्स यांचेकडून गौण खनिज उत्खनन नियमानुसार स्वामित्व धनाची रक्कम सर्व साधारण पावती क्र. 197975, दि. 14/07/2014 रोजी रु.73200/- वसुल करून महापालिका फंडात जमा केल्याचे दाखविले. याबाबत लेखापरीक्षणाचा अभिप्राय पुढील प्रमाणे आहे.

मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरात येणारे उत्खननाद्वारे किंवा गोळा करून काढलेले सर्व दगड, दगडाची भुकटी, गोटे, बारीक खडी, मुरूम, वाळू यावर स्वामित्व धनाची रक्कम प्रति ब्रास रु. 200 वसुल करून शासन खाती (महसूल व वन) भरणा करावयाची आहे. महापालिकेने कामाबाबत ठेकेदाराचे जे खालीलप्रमाणे ३66 ब्रास साहित्य वापरले त्या साहित्यावरील गौण खनिजाची रक्कम रु.73200/- वसुल केली आहे.

80mm मेटल	414.56 Cum
हार्ड मुरूम	103.69 Cum
40mm मेटल	414.56 Cum
6mm मेटल	103.69 Cum
एकूण	1036.50 / 2.83

म्हणजेच 366 ब्रास X 200 = 73200

सदरची रक्कम रु.73200/- शासन खाती भरणा करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

DATPMVM6001 (Ref No : 13, Hmm No : 31)

92 वॉर्ड नंबर 63 मध्ये सातीवली नाका ते कमळाकर गायकवाड यांचे घरापर्यंत संरक्षण भिंत बांधणे

इतर विकास कामे

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 3070525.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3070525.00/-

कामाची जाहीरात स्थानिक पातळीवर दिली, कामाची प्रशासकीय मान्यता व निविदा मंजूरी ठराव उपलब्ध झाले नाहीत.

कामाचे नांव:- वॉर्ड नंबर 63 मध्ये सातीवली नाका ते कमळाकर गायकवाड यांचे घरापर्यंत संरक्षण भिंत बांधणे

प्राकलन :- रु. 30,28,238/-

प्रशासकीय मंजुरी :- स्थायी समिती सभा ठराव 445, दि.17/08/2012

तांत्रिक मंजूरी :- 13/107 दि.17/08/2012

निविदा तारीख :- 27/08/2012 दै. शोषितांचे समर्थन

एल-1 निविदा :- मे.ओमकार कंस्ट्रक्शन- 4.98% जादा.

निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र.597, दि.19/10/2012

करार :- 31/10/2012

कार्यादेश :- 933 दिनांक-02/11/2012

मुदत :- 06 महिने

काम पूर्ण :- 27/12/2012

खर्च :- प्रमाण क्र. 3499, दि. 15/01/2013 रु.30,70,525/-

मोजमाप पुस्तक क्रमांक 194 पु.क्रमांक 44 ते 47

कामाबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.35, दि. 11/07/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत

1) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयसकर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा दै. शोषितांचे समर्थन, या स्थानिक स्तरावरील वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

2) या कामाची प्रशासकिय मान्यता व निविदा मंजुरी ठराव उपलब्ध झाले नाहीत.

उपरोक्त उणीवांची पुर्तता करेपर्यंत या कामावर खर्च केलेली रक्कम रु.3070525/- लेखा परीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 14, Hmm No : 35)

93 वॉर्ड नंबर 61 मध्ये वालीव येथे ब्रिगैन्झा यांचे घर ते सिल्हर अर्च बंगला नाला बांधणे.

इतर विकास कामे

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 3075629.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3075629.00/-

कामाची जाहीरात स्थानिक पातळीवर दिली, कामाची प्रशासकीय मान्यता व निविदा मंजूरी ठराव उपलब्ध झाले नाहीत, देयकातुन स्वामित्व धनाची रक्कम रु.35800/- वसुल केली परंतु शासन खाती रक्कम भरणा केल्याचे चलन दाखविले नाही.

कामाचे नांव:- **वार्ड नंबर 61 मध्ये वालीव येथे ब्रिगैन्झा यांचे घर ते सिल्हर अर्च बंगला नाला बांधणे.**

प्राकलन :- रु. 28,31,874

प्रशासकीय मंजुरी :-स्थायि समिती सभा ठराव- 425, दि.03/08/2012

तांत्रिक मंजूरी :-12/94 दि.03/08/2012

निविदा तारीख :- 27/08/2012 दै.शोषितांचे समर्थन

एल-1 निविदा :- मे.बालाजी कंस्ट्रक्शन- 4.99% जादा.

निविदा मंजुरी :- स्थायि समिती सभा ठराव- , दि.19/10/2012

करार :- 20/10/2012

कार्यादेश :- 870 दि.-25/10/2012

मुदत :- 06 महिने

काम पूर्ण :- 05/12/2012

खर्च :- प्रमाण क्र. 3300, दि. 24/12/2012 रु.30,75,629/-

मोजमाप पुस्त्क क्रमांक 177 पु.क्रमांक 45 ते 50

या कामाबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.36, दिनांक 11/07/2014 अन्वये खुलासा विचारला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालील प्रमाणे देण्यांत येत आहेत.

1) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयसकर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा दै. शोषितांचे समर्थन, या स्थानिक स्तरावरील वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

2) या कामाची प्रशासकिय मान्यता व निविदा मंजुरीचे ठराव उपलब्ध झाले नाहीत.

3) या कामासाठी ठेकेदाराने वापरलेले साहित्य (मेटल) 177.9 ब्रास वर गौण खनीजाची होणारी रक्कम रु.35580/- देयकातून वसूल केली आहे. सदरची रक्कम शासन खाती भरणा केल्याचे चलन लेखा परीक्षणास दाखविले नाही.

उपरोक्त उणीवांची पुर्तता करेपर्यंत या कामावर खर्च केलेली रक्कम रु. 3075629 लेखा परीक्षणास आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

94 वार्ड नंबर 58 मध्ये आचोळे गाव ते एव्हर शाईन सिटी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.

रस्ते दुरुस्ती

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1439095.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1419455.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 19640.00/-

कामाची जाहीरात स्थानिक पातळीवर दिली, स्वामित्व धनाची रक्कम रु.19640/- वसुल केली नाही.

कामाचे नांव:- वार्ड नंबर 58 मध्ये आचोळे गाव जे एव्हर शाईन सिटी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.

प्राकलन :- रु. 15,71,226

प्रशासकीय मंजुरी :- -

तांत्रिक मंजूरी :- का.अ.4/693/94 दि.22/12/2011

निविदा तारीख :- 13/01/2013 दै.महाराष्ट बुलंद टाईम्स

एल-1 निविदा:- मे.सुवर्णा एटरप्राईजेस कंस्ट्रक्शन- 5% जादा.

निविदा मंजुरी :- स्थायि समिती सभा ठराव- 09,दि.19/03/2012

करार :- 20/04/2012

कार्यादेश :- 161 दि.-25/04/2012

मुदत :- 90 दिवस

काम पूर्ण :- 31/05/2012

खर्च:- प्रमाणक क्र. 1802 दि. 12/09/2012 रु.14,39,095/-

याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.40, दिनांक 11/07/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे देण्यांत येत आहेत.

1) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयसकर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा दै. महाराष्ट बुलंद टाईम्स या स्थानिक स्तरावरील वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली

आहे. एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

2) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरात येणारे उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, दगडांची भुकटी, गोटे, बारीक खडी, मुरुम, वाळू यावर स्वामित्व धनांची रक्कम प्रति ब्रास रु 200 वसूल करुन शासन खाती महसूल व वन भरणा करावयाची आहे महापालिकेने कामाबाबत ठेकेदारांचे जे खालील प्रमाणे 98.20 ब्रास साहित्य वापरले त्या साहित्यावरील गौण खनिजांची रक्कम केलेली नाही असे दिसून आले. खालील दर्शविल्या प्रमाणे गौण खनिज स्वामित्व धनांची रक्कम (रॉयल्टी) वसूल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दाखवावे

80 mm मेटल	111.00 Cum
हार्ड मुरुम	27.96 Cum
40 mm मेटल	111.00 Cum
6 mm मेटल	27.96 Cum
एकूण	277.92 Cum
म्हणजे	98.20 ब्रास

रॉयल्टी रक्कम रु 19,640

उपरोक्त उणीवांची पुर्तता करेपर्यंत लेखा परीक्षणात रक्कम रु. 19640/- वसुल पात्र ठेवण्यांत येत आहे व रक्कम रु. 1419455/- आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 16, Hmm No : 40)

95 लोहिया नगर येथे नाला बांधणे.

इतर विकास कामे

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1723002.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1723002.00/-

मुळ कामात एक बाब राहून गेल्याने सुधारित प्राकलनाची केले नाही. काम 25% झाले असताना विभागाने 50% दाखविले आहे. अर्धवट कामाची मोजमापे घेऊन प्रदान केले आहे

कामाचे नांव :- लोहिया नगर येथे नाला बांधणे

प्राकलन:- रु. 63,58,781/-

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 17, दि. 29/06/2011

तांत्रिक मंजूरी:- श.अ. 02/17 दि. 15/09/2011

निविदा तारीख :- 05/10/2011, नवशक्ती

एल-1 निविदा:- मे. वरद इंजिनिअरिंग 4.99% जादा दराने

निविदा मंजुरी :- --

करार :- 26/11/2011

कार्यादेश:- 1586, दि. 12/12/2011

मुदत :- 180 दिवस

कामाची स्थीती :- अपुर्ण

खर्च: प्रमाणक क्रमांक 871, दि. 22/06/2012 रु. 1723002 (MB No.25 पृष्ठ क्र. 01 ते 09)

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.50, दिनांक 17/07/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. विभागाने दिनांक 19/07/2014 रोजी केलेल्या खुलाशानुसार प्रत्यक्षात जागेवरील कामाची स्थिती पाहिल्यावर RAFT ITEM राहुन गेल्याचे लक्षात आल्याचे नमुद केले आहे. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे देण्यात येत आहेत.

1) सदर कामाच्या प्राकलनास शहर अभियंता यांनी तांत्रिक मंजूरी दिली आहे. विभागाची दि. 02/06/2012 ची टिपणी पाहता कामाची जागा दलदलीची असून खाडीचे पाणी नाल्यात येते,त्यामुळे सुधारीत प्राकलन तयार करण्याची आवश्यकता नमुद केली आहे. दि. 01/06/2013 रोजीच्या टिपणी नुसार 50% काम पुर्ण झाल्याचे नमुद करून जागा दलदलीची असल्याने नव्याने प्राकलन करण्याचे नमुद केले आहे. आयुक्तांनी दि. 25/07/2013 रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार यापुर्वी केलेले काम वास्तवतेला धरून नव्हते का, आणि ठेकेदाराला परवडत नसल्यामुळे नविन प्राकलन, नवी निविदा करण्याचे काम चालु केले आहे असे नमुद केले आहे. याबाबत दि. 15/02/2013 च्या शहर अभियंता यांच्या अभिप्रायानुसार कामाचे बाबत RAFT ITEM राहुन गेला होता. त्यामुळे सुधारीत प्राकलन करण्याची आवश्यता आहे, असे नमुद केलेले आहे आणि त्यास आयुक्तांनी मंजूरी दिली आहे.

नाल्याच्या कामाचे प्राकलन तयार करताना एखादी बाब किंवा ITEM चुकुन राहुन गेला, हे कारण संयुक्तीक नाही, कारण प्राकलन कनिष्ठ अभियंता (ठेका) यांनी तयार केले असले तरी त्याची पडताळणी महानगरपालिकेच्या उपअभियंता, कार्यकारी अभियंता, शहर अभियंता यांनी केल्याशिवाय त्यास मंजूरी कशी देण्यांत आली, याचा खुलासा विभागाने केला नाही. कामाचे मुळ प्राकलन रु. 63,58,781/- रुपयांचे होते आणि हे काम 50% झाल्याचे नमुद केले आहे. विभागाने घेतलेल्या मोजमापानुसार केलेले प्रदान रु.1723002 इतके आहे. म्हणजेच काम 25% झाले असतांना विभागाच्या टिपणीनुसार काम 50% झाल्याचे दाखविले आहे. महाराष्ट्र नगर परिषद लेखा संहिता, 1971 मधील नियम क्रमांक 167(2) नुसार मुळ अंदाजात 10% पेक्षा अधिक वाढ-घट होण्याचा संभव असेल अथवा संकल्पचित्रात किंवा योजनेत फेरफार प्रस्तावित केला असेल तर सुधारीत अंदाज तयार केले पाहिजेत. परंतु तशी कार्यवाही विभागाने केली नाही.

2) अर्धवट कामाची मोजमापे घेऊन ठेकेदाराला प्रदान केले आहे आणि उरलेल्या कामासाठी नविन प्राकलन तयार करुन पुढील कार्यवाही करण्याचा प्रयत्न विभागाने केला आहे. त्यामुळे मुळ कामासाठी मागविण्यात

आलेल्या निविदा, ठेकेदार निश्चिती व इतर बाबींसाठी महापालिकेचा वेळ आणि पैसा खर्च झालेला आहे. ठेकेदाराला परवडत नसल्याने/ठेकेदाराचे हित लक्षात घेता विभागाने झालेल्या कामाचे प्रदान केले आहे ही गंभीर अनियमितता आहे.

उपरोक्त उणिवाची पूर्तता करेपर्यंत रक्कम रु. 1723002/- लेखा परिक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 17, Hmm No : 50)

96 सुयोग नगर स्मशानभूमी ते चुळणा ब्रिज रस्त्याची साईट पट्टी डांबरी करण करणे.

विकास निधी अंतर्गत रस्ते बांधकाम

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 4861822.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4861822.00/-

निविदा मागविताना प्रसिध्दी माध्यमाचा अधिकाधिक वापर केला नाही. कामाची प्रशासकीय मान्यता लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही.

कामाचे नांव :- सुयोग नगर स्मशानभूमी ते चुळणा ब्रिज रस्तयाची साईट पटटी डांबरी करण करणे

प्राकलन:- रु. 47,84,714/-

प्रशासकीय मंजुरी :- -

तांत्रिक मंजूरी:- का.अ. 8/87 दि. 27/02/2012

निविदा तारीख :- 10/03/2012, कराळे समाचार, पुढारी

एल-1 निविदा:- मे. एन.ए. कन्स्ट्रक्शन 4.95% जादा दराने

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 362, दि. 20/07/2012

करार :- 21/08/2012

कार्यादेश:- 623, दि. 22/08/2012

मुदत :- 6 महिने

काम पुर्ण :- 23/11/2012

खर्च: प्रमाणक क्रमांक 3705, दि. 30/01/2013 रु. 48,61,822/-

MB No.27 पृष्ठ क्र. 34 ते 52

या कामाबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.46, दिनांक 16/07/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे देण्यात येत आहेत.

1) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग 'खस 1088/(2512/)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी / निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा कराळे समाचार, पुढारी या स्थानिक स्तरावरील वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

2) कामाची प्रशासकिय मान्यता लेखापरिक्षणांस उपलब्ध झाली नाही.

उपरोक्त उणिवांची पुर्तता करेपर्यंत रक्कम रु.48,61,822/- लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे..

DATPMVM6001 (Ref No : 18, Hmm No : 46)

97 सातमादेवी किरवली रोड ते फलकाव घरापर्यंत (ब्रितम परेरा मार्ग) रस्ता डांबरीकरण करणे.

रस्ते बांधकाम

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1145489.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1145489.00/-

आयुक्तांनी मंजूर केलेली निविदा स्थायी समितीच्या अवलोकनार्थ ठेवली नाही. मुळ अंदाजात 10% पेक्षा जास्त वाढ झाल्यानंतर सुधारित अंदाज तयार केला नाही.

कामाचे नांव :- सातमादेवी किरवली रोड ते फलकाव घरापर्यंत (ब्रितम परेरा मार्ग) रस्ता डांबरीकरण करणे

प्राकलन :- 9,99,187

प्रशासकीय मंजुरी:- आयुक्त मंजूरी दि. 04/02/2010

तांत्रिक मंजूरी:- का.अ. 15/140 दि. 09/02/2010

निविदा तारीख :- 23/02/2011,नरवीर चिमाजी, लोकमत

एल-1 निविदा :- साईदत्त एन्टरप्रायझेस 4.95% जादा दराने

निविदा मंजुरी:- आयुक्त मंजूरी दि. 21/04/2011

करार :- 28/04/2011

कार्यादेश:- 215, दि. 28/04/2011

मुदत :- 60 दिवस, मुदतवाढ नोव्हेंबर 2011 पर्यंत

काम पुर्ण :- 28/11/2011

खर्च: प्रमाणक क्रमांक 63, दि. 20/04/2012 रु. 1145489/-

MB No.16 पृष्ठ क्र. 15 ते 19

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 48, दिनांक 16/07/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे देण्यात येत आहेत.

1) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 73 (ड) नुसार 10 लाखापर्यंतच्या निविदेस आयुक्तांनी मंजूरी देऊन 15 दिवसाचे आत स्थायी समितीच्या अवलोकनासाठी ठेवणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार डिसेंबर 2012 पासून संविदेच्या बाबतचे अधिकार रु. 25 लाखपर्यंत झाले आहेत. या कामाचे बाबत आयुक्तांनी प्रशासकीय, वित्तीय मंजूरी दिली, निविदा मंजूर केली, खर्चास मंजूरी दिली. परंतु सदरची बाब स्थायी समिती च्या अवलोकनार्थ ठेवली नाही.

2) कामाचे प्राकलन रु. 9,99,187/-, कामावरील एकूण खर्च 1145489/- म्हणजेच खर्च प्राकलनाच्या 10% पेक्षा जास्त झालेला आहे.देयका सोबत जोडलेल्या वाढ-घट दाखल्यानुसार प्राकलन रक्कम 4.95% जादा दाखवून खर्चाची आकडेवारी नमुद केलेली आहे.महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम क्र.167 (2) नुसार मुळ अंदाजामध्ये 10% पेक्षा अधिक वाढ-घट होण्याचा संभव असेल अथवा संकल्प चित्रात किंवा योजनेत फेरबदल प्रस्तावीत केला असेल तर सुधारीत अंदाज तयार केलेल पाहिजेत. परंतु तशी कारवाई विभागाने केलेली नाही. त्यामुळे प्रदान करतांना 10% च्या मर्यादेपर्यंत म्हणजे रक्कम 1099106 पर्यंत प्रदान करणे अपेक्षित होते. तथापि उर्वरित प्रदान करण्यासाठी आवश्यक ती मंजूरी घेतली नाही.

उपरोक्त उणिवांची पुर्तता करेपर्यंत रक्कम रु. 11,45,489/- लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 19, Hmm No : 48)

98 पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पुर्व येथील प्रेसिला अपार्ट ते मुख्य रस्त्यापर्यंत पाईप गटार बांधणे.

गटार बांधणे

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1778771.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1726091.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 52680.00/-

मुद्रांक शुल्क कमी रक्कमेचे वापरले. स्वामित्व धनाची रक्कम रु. 30080/- वसुली केली नाही. विलंब शुल्काची

आकारणी केली नाही.

कामाचे नांव :- पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पुर्व येथील प्रेसिला अपार्ट ते मुख्य रस्त्यापर्यंत पाईप गटार बांधणे
प्राकलन:- रु. 36,12,394/-
प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 06, दि. 02/02/2011
तांत्रिक मंजूरी:- का.अ. 528 दि. 31/03/2011
निविदा तारीख :- 19/04/2011, नवाकाळ
एल-1 निविदा:- मे. एकविरा कन्स्ट्रक्शन अंदाज पत्रकाचे दराने
निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 03, दि. 11/05/2011
करार :- 11/05/2011
कार्यादेश:- 588, दि. 18/05/2011
मुदत :- 120 दिवस
कामाची स्थीती :- काम लेखा परिक्षण काळात अपुर्ण
खर्च : प्रथम धावते देयक
प्रमाणक क्रमांक 45, दि. 09/05/2012 रु. 1778771/-
MB No.11 पृष्ठ क्र. 01 ते 09

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.55, दिनांक 22/07/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे देण्यांत येत आहेत.

1) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.
कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-
त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/- (कमाल 5 लाख) उपरोक्त कामाचे प्राकलन रु. 3612394 असल्याने होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम 2800/- आहे. असे असतानां महापालिकेने रु. 100/- मुद्रांकावर करार केला आहे. म्हणजेच अनुज्ञेय असलेल्या मुद्रांक शुल्कापेक्षा रु. 2700/- कमी मुद्रांक शुल्क करारनाम्यासाठी वापरले आहे. सबब रक्कम रु. 2700/- संबंधिताकडून वसुल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दाखवावे.
2) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरात येणारे उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, दगडांची भुकटी, गोटे, बारीक खडी, मुरुम, वाळू यावर स्वामित्व धनांची रक्कम प्रति ब्रास रु 200/- वसूल करुन शासन खाती महसूल व वन भरणा करावयाची आहे महापालिकेने कामाबाबत ठेकेदारांचे जे साहित्य खालील प्रमाणे 150.40 ब्रास वापरले त्या साहित्यावरील गौण खनिजांची रक्कम रु.30080/- केलेली नाही असे दिसून आले खालील दर्शविल्या प्रमाणे गौण खनिज स्वामित्व धनांची रक्कम (रॉयल्टी) वसूल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दाखवावे

वसई विरार मनपा

दगड	192.70	Cum
खडी/रेती	65.58	Cum
खडी/रेती	167.37	Cum
एकूण	425.65	Cum
म्हणजे	150.40	ब्रास

रॉयल्टी रक्कम रु. 30,080/-

3) कार्यादेश दिनांक 18/05/2011 रोजी दिला असुन मुदत 120 दिवस आहे. म्हणजेच दिनांक 14/09/2011 रोजी मुदत संपत आहे. काम लेखापरीक्षण कालावधीत पुर्ण झालेले नाही. त्यामुळे दिनांक 15/09/2011 ते 31/03/2012 पर्यंत होणा-या 199 दिवसांसाठी, करारातील अटी नुसार दररोज रुपये 100/- प्रमाणे दंडाची एकुण रक्कम रुपये 19,900/- संबंधीतांकडून वसुल करुन महानगरपालिका फंडात जमा करावी. तसेच पुढील वित्तीय वर्षात काम पूर्ण होईपर्यंत दंडात्मक कारवाई करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

उपरोक्त उणिवांची पुर्तता करेपर्यंत रक्कम रु.52,680/- लेखा परिक्षणात वसुल पात्र ठेवण्यात येत आहे व रक्कम रु. 17,26,091/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 20, Hmm No : 55)

99 नालासोपारा पूर्व येथील डॉन लेन मुख्य रस्त्यालगत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे.

गटार बांधणे

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 2317291.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2276043.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 41248.00/-

निविदा मागविताना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर केला नाही. मुद्रांक शुल्क रक्कम रु.2,400/- चे कमी वापरले आहेत. स्वामित्व धनाची रक्कम रु. 38,848/- वसुल केली नाही.

कामाचे नांव:- नालासोपारा पुर्व येथील डॉन लेन मुख्य रस्त्यालगत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे.

प्राकलन:- रु. 37,34,110/-

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 06, दि. 02/02/2011

तांत्रिक मंजूरी:- का.अ. रु. 3563973,

निविदा तारीख :- 11/04/2011, महाराष्ट्र बुलंद टाईम्स

एल-1 निविदा:- मे. प्रणोती कन्स्ट्रक्शन 4.56% कमी दराने

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 03, दि. 11/05/2011

करार :- 11/11/2011

कार्यादेश:- 1136, दि. 25/11/2011

मुदत :- 120 दिवस

मुदतवाढ:- दिनांक 31/05/2012 पर्यंत.

काम पुर्ण:- पुर्ण, दि. 23/05/2012

खर्च: प्रथम धावते देयक रु. 12,79,616

दुसरे धावते देयक प्रमाणक क्रमांक 255, दि. 26/07/2012 रु. 10,37,675/-

MB No.09 पृष्ठ क्र. 22 ते 32

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.56, दिनांक 22/07/2014 अन्वये खुलासा विचारला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केला नाही. या कामाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग 'खस 1088/(2512/)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी / निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा महाराष्ट्र बुलंद टाईम्स, उपनगर या स्थानिक स्तरावरील वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

2) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/- (कमाल 5 लाख)

उपरोक्त कामाचे प्राकलन रु. 3734110/- असल्याने होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम 2900/- आहे. असे असतानां महापालिकेने 500/- रु.मुद्रांकावर करार केला आहे. महणजेच अनुज्ञेय असलेल्या मुद्रांक शुल्कापेक्षा कमी रु. 2400/- आहे. सबब रक्कम रु. 2400/- संबंधिताकडून वसुल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दाखवावे.

3) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरात येणारे उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, दगडांची भुकटी, गोटे, बारीक खडी, मुरुम, वाळू यावर स्वामित्व धनांची रक्कम प्रति ब्रास रु 200/- वसूल करुन शासन खाती महसूल व वन भरणा करावयाची आहे महापालिकेने कामाबाबत ठेकेदारांचे जे खालील प्रमाणे 194.24 ब्रास साहित्य वापरले त्या साहित्यावरील गौण खनिजांची रक्कम रु.38848/- वसुल केलेली नाही असे दिसून आले खालील दर्शविल्या प्रमाणे गौण खनिज स्वामित्व धनांची रक्कम (रॉयल्टी) वसूल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दाखवावे

दगड	244.11 Cum
खडी/रेती	68.27 Cum
20 mm खडी	230.55 Cum

वसई विरार मनपा

खडी/रेती	06.78 Cum
एकूण	549.71 Cum
म्हणजे	194.24 ब्रास
रॉयल्टी रक्कम	रु. 38,848/-

वसुलपात्र रक्कम - आक्षेपाधीन रक्कम रु.2276043/-

मुद्रांक शुल्क रु. 2400/-

गौण खनिज रु.38848/-

एकुण रु.41248/-

DATPMVM6001 (Ref No : 21, Hmm No : 56)

100 पेल्हार रस्त्यावरील पेट्रोलपंप ते ओम मेडीकल पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे.

गटार बांधणे

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 302431.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 6484.00/-

मुद्रांक शुल्क कमी रकमेचे वापरले आहेत. स्वामित्व धनाची रक्कम वसुल केली नाही.

कामाचे नांव:- पेल्हार रस्त्यावरील पेट्रोलपंप ते ओम मेडीकल पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे.

प्राकलन:- रु. 22,72,461/-

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 06, दि. 02/02/2011

तांत्रिक मंजूरी:- का.अ. क्र. 08/76, दि. 02/02/2011

निविदा तारीख :- 25/02/2011, सामना

एल-1 निविदा:- मे. सचिन एंटरप्रायझेस 4.99% जादा दराने

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 04, दि. 27/04/2011

करार :- 29/04/2011

कार्यादेश:- 529, दि. 02/05/2011

मुदत:- 120 दिवस, मुदतवाढ दि. 30/11/2012

कामाची स्थीती :- अपुर्ण,

खर्च: प्रथम धावते देयक. प्रमाणक क्रमांक 208, दि. 25/07/2012 रु. 3,02,431/-

वसई विरार मनपा

MB No.05 पृष्ठ क्र. 54 ते 60

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.57, दिनांक 22/07/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. परंतु विभागाने खुलासा केला नाही. या कामाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/- (कमाल 5 लाख)

उपरोक्त कामाचे प्राकलन रु. 2272461/- असल्याने होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम रु. 1300/- असतांना असतानां महापालिकेने रु.100/- मुद्रांकावर करार केला आहे. म्हणजेच अनुज्ञेय असलेल्या मुद्रांक शुल्कापेक्षा कमी रु. 1200/- आहे. सबब रक्कम रु. 1200/- संबंधिताकडून वसुल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दाखवावे.

2) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरात येणारे उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड, दगडांची भुकटी, गोटे, बारीक खडी, मुरुम, वाळू यावर स्वामित्व धनांची रक्कम प्रति ब्रास रु 200 वसूल करुन शासन खाती महसूल व वन भरणा करावयाची आहे महापालिकेने कामाबाबत ठेकेदारांचे जे खालील प्रमाणे 26.42 ब्रास साहित्य वापरले त्या साहित्यावरील गौण खनिजांची रक्कम रु.5284/- वसुल केली नाही असे दिसून आले. खालील दर्शविल्या प्रमाणे गौण खनिज स्वामित्व धनांची रक्कम (रॉयल्टी) वसूल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दाखवावे.

दगड	39.63 Cum
खडी/रेती	12.65 Cum
20 mm खडी	22.49 Cum
एकूण	74.77 Cum
म्हणजे	26.42 ब्रास
रॉयल्टी रक्कम	रु. 5,284/-

3) कामास मुदतवाढ 30/11/2012 पर्यंत दिली आहे. परंतु काम वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये अपूर्ण आहे. त्यामुळे करारातील अटी व शर्तीनुसार विलंब दंडाची रक्कम वसुल करुन अनुपालन दाखवावे.

वसुलपात्र रक्कम -

मुद्रांक शुल्क रु.1200/-

गौण खनिज रु.5284/-

एकुण रु.6484/-

DATPMVM6001 (Ref No : 22, Hmm No : 57)

101 अशोक सिंग चाळ ते धनंजय प्लॉट पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे.

विकास निधी अंतर्गत गटारे बांधणे

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 909415.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 908615.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 800.00/-

प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर केला नाही. मुद्रांक शुल्क कमी रकमेचे वापरले आहेत. निविदा मंजूरीचा ठराव उपलब्ध झाला नाही.

कामाचे नांव:- अशोक सिंग चाळ ते धनंजय प्लॉट पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे.

प्राकलन:- रु. 17,55,777/-

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 06, दि. 02/02/2011

तांत्रिक मंजूरी:- का.अ. क्र. 85/2010-11, दि. 07/02/2011

निविदा तारीख :- 25/02/2011, कराळे समाचार

एल-1 निविदा:- मे. बाबा कन्स्ट्रक्शन 5% जादा दराने

निविदा मंजुरी :- -

करार :- 19/04/2011

कार्यादेश:- 527, दि. 02/05/2011

मुदत :- 120 दिवस,

मुदतवाढ :- 30/09/2012 पर्यंत

काम पुर्ण:- पुर्ण, दि. 25/09/2012

खर्च: प्रमाणक क्रमांक 888, दि. 25/03/2013 रु. 9,09,415/-

MB No.02 पृष्ठ क्र. 16 ते 22

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास पत्र क्र.58, दिनांक 22/07/2014 अन्वये देण्यांत आले होते. परंतु विभागाने खुलासा केला नाही. या कामाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग 'खस 1088/(2512/)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी / निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयसकर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा कराळे समाचार या स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

वसई विरार मनपा

2) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/- (कमाल 5 लाख)

उपरोक्त कामाचे प्राकलन रु. 17,55,777/- असल्याने होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम 900/- असतानां महापालिकेने रु.100/- मुद्रांकावर करार केला आहे. महणजेच अनुज्ञेय असलेल्या मुद्रांक शुल्का पेक्षा कमी रु. 800/- आहे. सबब रक्कम रु. 800/- संबंधिताकडून वसुल करून शासन खाती भरणा करून अनुपालन दाखवावे.

3) निविदा मंजूरीचा ठराव उपलब्ध झाला नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधीनियम अध्यादेश, 2011 कलम 6.4 नुसार लेखापरीक्षणास अभीलेखे सादर करण्याची जबाबदारी महापालिका आयुक्तांची आहे. मागणी करुनही लेखापरीक्षणास अभीलेखे सादर केले नाहीत.

वसुलपात्र रक्कम - आक्षेपाधीन रक्कम रु.908615/-

मुद्रांक शुल्क रु.800/-

DATPMVM6001 (Ref No : 23, Hmm No : 58)

102 प्रभाग क्र. 6 श्री. देवराम शिनवार पाटील यांचे घर ते चिखल डोंगरी पाण्याची टाकी पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरी करण करणे.

विकास निधीतून रस्ता बांधकाम

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 4924537.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4924537.00/-

जागा महापालिकेच्या मालकीची असल्याचे प्रमाणित केले नाही. निविदा मंजूरीचा ठराव उपलब्ध झाला नाही. कामगार विमा/ कामगार कल्याण उपकर रक्कमेच्या वसुलीचे चलन लेखापरीक्षणास सादर केले नाही. देयकाची 25% रक्कम रोखून ठेवली होती – ती वितरीत करताना त्यातून उपकराची रक्कम रु. 16415/- वसुली केल्याची खात्री झाली नाही.

कामाचे नांव:- प्रभाग क्र. 6 श्री. देवराम शिनवार पाटील यांचे घर ते चिखल डोंगरी पाण्याची टाकी पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरी करण करणे.

प्राकलन:- रु. 62,47,724/-

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 04, दि. 12/03/2012

वसई विरार मनपा

तांत्रिक मंजूरी:- श.अ. क्र. 10/101, दि. 12/03/2012

निविदा तारीख :- 19/04/2012 मुंबई सकाळ

एल-1 निविदा:- मे. ॲसफाल्ट इंडिया कार्पो 4.99% जादा दराने

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 29, दि. 25/05/2012

करार :- 06/09/2012

कार्यादेश:- 833, दि. 07/09/2012

मुदत :- 240 दिवस,

काम पुर्ण :- 19/02/2013

खर्च: प्रमाणक क्रमांक - 4666, दिनांक 30/03/2013 रु. 49,24,537/-

मोजमाप पुस्तक क्र. 166 पृष्ठ क्र. 1 ते 10

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.62, दिनांक 02/08/2014 देण्यांत आले होते. परंतु विभागाने खुलासा केला नाही. या कामाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) रस्ता खडीकरण व डांबरीकरण केले ती जागा महापालिकेच्या मालकीची आहे, किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 209 नुसार सार्वजनिक रस्ते सुधारण्यासाठी जागा संपादन केली आहे, किंवा कलम 224 नुसार खाजगी रस्ता चांगला करण्यासाठी महानगरपालिकेने खर्च करुन तो रस्ता सार्वजनिक रस्ता म्हणून जाहीर केल्याचे अभीलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत.

2) या कामासाठी 3 निविदा प्राप्त् झाल्या. एल 1 निविदा म्हणून मे. ॲसफाल्ट इंडिया कार्पो. यांना 4.99% जादा दराने काम दिले आहे. परंतू निविदा मंजूरीचा ठराव मागणी करुनही नस्ती सोबत उपलब्ध झाला नाही.

3) कामाचे मोजमाप पुस्तक क्र. 166, पृष्ठ क्र. 1 ते 10 मधील नोंदी तपासता काम पूर्ण झाले असून एकूण रक्कम रु. 65,66,049/- खर्च झाला आहे. परंतू काम 50 लाखाचे वर असल्याने व त्याचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण न झाल्याने 25% रक्कम रु. 16,41,512/- रोखून ठेवली आहे. त्याचे प्रदान वित्तिय वर्ष 2013-14 मध्ये केले आहे आणि उपरोक्त प्रमाणकाव्दारे 75% रक्कम रु. 49,24,537/- प्रदान ठेकेदाराला केले आहे. कामाची नस्ती पाहता ठेकेदाराने संचालक विमा संचालनालय बांद्रा मुंबई यांचेकडे या कामाचा विमा काढला असून त्याच्या रक्कमेचे प्रदान केले आहे. असे असताना देयकात पुन्हा कामगार विम्याची रक्कम 1% रु.49,245/- वसुली केल्याची नोंद आहे. याबाबत संबंधिताकडे विचारणा केली असता सदरची रक्कम कामगार कल्याण उपकराची असल्याचे सांगण्यात आले. सदर रक्कम शासनाकडे संबंधीत लेखा शिर्षाखाती भरणा केल्याची चलने दाखविली नाहीत.

4) 25% राहिलेली रक्कम रु. 16,41,512/- चे प्रदान पुढील वित्तिय वर्षात 2013-14 मध्ये केलेले आहे. त्यातून उपकराची रक्कम रु.16415/- वसुल केल्याचे दाखविले नाही.

उपरोक्त उणिवांची पुर्तता करेपर्यंत रक्क्म रु. 49,24,537/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 24, Hmm No : 62)

103 देयके मंजूर करताना बांधकाम विभागातील मोजमाप पुस्तकात प्रतीसंदर्भ नमूद केला नाही व मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही.

बांधकाम

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

बांधकाम विभागाने केलेल्या कामाच्या नोंदी नमूना 139 मध्ये घेतल्याचे दाखविले नाही. विभागाची देयके मंजूर करताना मोजमाप पुस्तकात प्रतीसंदर्भ नमूद केला नाही. मोजमाप पुस्तकाची साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही.

बांधकाम विभागाचे कामाबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.63, दिनांक 06/08/2014 अन्वये देण्यांत आले होते. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) बांधकाम विभागाने केलेल्या कामाच्या नोंदी महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम क्र. 180 बांधकाम नोंदवही नमुना क्र. 139 मध्ये घेतल्या बाबत- सदरची नोंदवही लेखा परीक्षणास सादर केली नाही.

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम क्र. 180 नुसार मोजमाप पुस्तकात (M.B.) केलेल्या बांधकामाच्या नोंदी घ्यायच्या आहेत. नियम 180 (3) नुसार जेव्हां देयक मंजूर करण्यांत येईल, तेव्हां संबंधित नोंदीवर काट मारून देयकात व मोजणी पुस्तकात प्रतिसंदर्भ नमुद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट 24 मोजमापे नियम अ.क्र. (15) नुसार बिल संमत झाल्याबरोबर मोजमाप नोंदवहीतील नोंदी दुसऱ्या लाल शाईने कर्ण रेषेने खोडुन टाकणे आवश्यक आहे. गोषवाऱ्या खाली बिल संमत करण्यांत आले त्याची एकूण व निव्वळ रक्कम लिहून प्रमाणक क्रमांक व दिनांक दर्शविणारी नोंद लाल शाईने करणे आवश्यक आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका बांधकाम विभागाकडून देयके, मोजमापे, संबंधित नस्त्या पुर्व लेखा परीक्षणासाठी- लेखा परीक्षण विभागाकडे पाठविल्या जातात. अंतर्गत लेखा परीक्षण विभागाने देयक संमत/मंजूर केल्यावर मोजमाप पुस्तक व नस्ती परत विभागाकडे (बांधकाम) पाठविले जाते आणि देयक प्रदानासाठी लेखा शाखेकडे पाठविले जाते. महानगरपालिका संबंधित विभागाने मोजमाप पुस्तकातील नोंदी लाल शाईने कर्ण रेषेने खोडून टाकल्या आहेत. प्रधिकृत अधिकाऱ्याने नियम 180 (4) नुसार मोजमाप पुस्कातील नोंदींची तपासणी केल्या बद्दल स्वाक्षरी केली आहे. परंतु देयकावर आणि मोजणी पुस्तकात प्रतिसंदर्भ नमुद केला नाही. मोजमाप पुस्तकावर प्रमाणक क्रमांक व दिनांक याची नोंद नाही, त्यामुळे एखादे देयकाचे दुबार प्रदान झाले नसल्याची खात्री करता येत नाही.

3) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम क्र. 180 (5) नुसार मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही नमुना 137 मध्ये ठेवायची आहे. विभागाने साठा नोंदवही ठेवून त्याचा साठा दाखविणे आवश्यक आहे. परंतु विभागाने मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही लेखापरीक्षणास दाखविली नाही.

DATPMVM6001 (Ref No : 25, Hmm No : 63)

104 नालासोपारा पूर्व मनवेलपाडा तलाव ते साई प्लाझा अपार्टमेंट पर्यंतचा 40 मी. डी.पी.रोड खडीकरण करणे

रस्ता बांधकाम

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 8218882.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8218882.00/-

पूर्वी केलेल्या कामाचा दायित्व कालावधी संपल्याची खात्री केली नाही. जागा महापालिकेच्या मालकीची असल्याचे प्रमाणित केले नाही. शासन निर्णय दिनांक 02/01/1992 अन्वये प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर केला नाही. शासन निर्णय दिनांक 02/03/2009 नुसार कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण केले नाही.

कामाचे नांव:- नालासोपारा पूर्व मनवेलपाडा तलाव ते साई प्लाझा अपार्टमेंट पर्यंतचा 40 मी. डी.पी.रोड खडीकरण करणे.

प्राकलन:- रु. 74,72,862/-

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 564, दि. 05/10/2012

तांत्रिक मंजूरी:- श.अ. क्र. 17/143, दि. 17/09/2012

निविदा तारीख :- 10/10/2012 पुढारी

एल-1 निविदा :- मॅग्नम कनसट्रक्शन 4.99% जादा दराने

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 679, दि. 23/11/2012

करार :- 11/12/2012

कार्यादेश:- 1155, दि. 11/12/2012

मुदत :- 90 दिवस,

काम पुर्ण :- 09/03/2013

खर्च : प्रमाणक क्रमांक - 4779, दिनांक 31/03/2013

रु. 82,18,882/- (मोजमाप पुस्तक क्र. 208 पृष्ठ क्र. 1 ते 7)

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.68, दि. 07/08/2014 देण्यांत आले होते. विभागाने दि.16/09/2014 रोजी केलेला खुलासा विचारात घेता लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) यापुर्वी या रस्त्याचे खडीकरणाचे काम कधी केले होते, त्याचा दायित्व कालावधी संपला होता काय, याची खात्री विभागाने केल्याचे दिसून आले नाही.

2) रस्ता खडीकरण व डांबरीकरण केले ती जागा महापालिकेच्या मालकीची आहे, किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 209 नुसार सार्वजनिक रस्ते सुधारण्यासाठी जागा संपादन केली आहे, किंवा कलम 224 नुसार खाजगी रस्ता चांगला करण्यासाठी महानगरपालिकेने खर्च करुन तो रस्ता सार्वजनिक रस्ता म्हणून जाहीर केल्याचे अभीलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत.

3) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग. भांखस 1088/(2512/)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी / निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयसकर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा पुढारी या स्थानिक पातळीवरील वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

4) कामाचे मोजमाप पुस्तक क्र. 208, पृष्ठ क्र. 1 ते 7 मधील नोंदी तपासता काम पूर्ण झाले असून एकूण रक्कम रु. 82,18,882/- खर्च झाला आहे. शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र. संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नवि-20, दिनांक 02/03/2009 अन्वये विकास कामासाठी त्रयस्थ संस्थेकडून (Third Party Techincal Audit) तांत्रिक लेखा परिक्षण करुन घेण बंधनकारक आहे. सदरचे काम रक्कम रु. 50 लाखापेक्षा अधिक रकमेचे असल्याने त्याचे त्रयस्थ लेखा परिक्षण करुन घेणे आवश्यक आहे. परंतु या कामाचे तांत्रिक लेखा परिक्षण झालेले नाही.

उपरोक्त उणिवांची पुर्तता करेपर्यंत लेखापरिक्षणात रक्कम रु. 82,18,882/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 27, Hmm No : 68)

105 तुळींज मेन रोड ते विजयनगर रिक्षा स्टँड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.

विकास निधी अंतर्गत रस्ता बांधकाम

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 7997754.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7997754.00/-

पूर्वी केलेल्या कामाचा दायित्व कालावधी संपल्याची खात्री केली नाही. जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याचे प्रमाणित केले नाही. शासन निर्णय दि.02/01/1992 अन्वये प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर केला नाही. शासन निर्णय दि.02/03/2009 नुसार कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण केले नाही आणि खर्च 10% पेक्षा जास्त केला असुन लेखा संहिताचे कलम 167(2) नुसार सुधारीत प्राकलनास मंजुरी घेतली नाही.

कामाचे नांव:- तुळींज मेन रोड ते विजयनगर रिक्षा स्टँड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.

प्राकलन:- रु. 69,90,751/-

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 06, दि. 02/04/2012

तांत्रिक मंजूरी:- श.अ. क्र. 1/2, दि. 02/04/2012

निविदा तारीख:- 04/05/2012, दै. वृत्तमानस

एल-1 निविदा:- मे. एन.ए. कनसट्रक्शन 4.95% जादा दराने

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 314, दि. 20/07/2012

करार :- 21/08/2012

कार्यादेश:- 619, दि. 22/08/2012

मुदत :- 120 दिवस,

काम पुर्ण :- 15/11//2012

खर्च : प्रमाणक क्रमांक - 3285, दिनांक 21/12/2012

रु. 79,97,754/- (मोजमाप पुस्तक क्र. 2 पृष्ठ क्र. 50 ते 56)

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.69, दिनांक 07/08/2014 देण्यांत आले होते. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. या कामाबाबत लेखा परिक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) यापुर्वी या रस्ताचे डांबरीकरणाचे काम कधी केले होते, त्याचा दायित्व कालावधी संपला होता काय, याची खात्री विभागाने केल्याचे दिसून आले नाही.

2) रस्ता खडीकरण व डांबरीकरण केले ती जागा महापालिकेच्या मालकीची आहे, किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 209 नुसार सार्वजनिक रस्ते सुधारण्यासाठी जागा संपादन केली आहे, किंवा कलम 224 नुसार खाजगी रस्ता चांगला करण्यासाठी महानगरपालिकेने खर्च करुन तो रस्ता सार्वजनिक रस्ता म्हणून जाहीर केल्याचे अभीलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत.

3) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग 'खस 1088/(2512/)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी / निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयसकर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा दै. वृत्तमानस या स्थानिक स्तरावरील वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

4) कामाचे मोजमाप पुस्तक क्र. 02, पृष्ठ क्र. 50 ते 56 मधील नोंदी तपासता काम पूर्ण झाले असून एकूण

रक्कम रु. 79,97,754/- खर्च झाला आहे. शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र. संकीर्ण 2008/1338/प्र.क्र.171/08/नवि-20, दिनांक 02/03/2009 अन्वये विकास कामासाठी त्रयस्थ संस्थेकडून (Third Party Techincal Audit) तांत्रिक लेखा परिक्षण करुन घेण बंधनकारक आहे. सदरचे काम रक्कम रु. 50 लाखापेक्षा अधिक रकमेचे असल्याने त्याचे त्रयस्थ लेखा परिक्षण करुन घेणे आवश्यक आहे. परंतू या कामाचे तांत्रिक लेखा परिक्षण झालेले नाही.

5) कामाचे प्राकलन रु. 69,90,751/- असून त्यास शहर अभियंता यांनी तांत्रिक मंजूरी दिली आहे. कामावर खर्च रु. 79,97,754/- झाला आहे हा खर्च प्राकलनाच्या 10 % पेक्षा जास्त झाला आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 167 (2) नुसार मुळ प्राकलनात 10% पेक्षा जास्त वाढ होणार असेल तर सुधारीत प्राकलन तयार करणे आवश्यक आहे किंवा कामाच्या संकल्प चित्रात बदल झालेला नाही असे शहर अभियंता यांनी उपरोक्त नियमान्वये प्रमाणित करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

उणिवांची पूर्तता करेपर्यंत लेखापरिक्षणात रक्कम रु. 7997754 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 28, Hmm No : 69)

106 नालासोपारा (पू) येथील साई सुमन बिल्डिंग ते शिवम अपार्टमेंट (ओसवाल नगरी) पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

रस्ता बांधकाम

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 4756711.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4756711.00/-

पूर्वी केलेल्या कामाचा दायित्व कालावधी संपल्याची खात्री केली नाही. जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याचे प्रमाणित केले नाही. शासन निर्णय दि.02/01/1992 अन्वये प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर केला नाही. कामावर प्राकलनापेक्षा 10% जास्त खर्च केला आहे. परंतु महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 मधील नियम 167(2) नुसार सुधारीत प्राकलन तयार करुन त्यास मंजुरी घेतली नाही.

कामाचे नांव :- नालासोपारा (पू) येथील साई सुमन बिल्डिंग ते शिवम अपार्टमेंट (ओसवाल नगरी) पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

प्राकलन:- रु. 42,74,855/-

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 05, दि. 02/04/2012

तांत्रिक मंजूरी:- श.अ. क्र. 1/1, दि. 02/04/2012

निविदा तारीख:- 04/05/2012, दै. वृत्तमानस

एल-1 निविदा:- मे. एन.ए. कनसट्रक्शन 4.95% जादा दराने

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 317, दि. 20/07/2012

करार :- 21/08/2012

कार्यादेश:- 621, दि. 22/08/2012

मुदत :- 120 दिवस,

काम पुर्ण :- 07/12//2012

खर्च : प्रमाणक क्रमांक - 3747, दिनांक 08/02/2013

रु. 47,56,711/- (मोजमाप पुस्तक क्र. 109 पृष्ठ क्र. 45 ते 52)

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.74, दि. 11/08/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाचा खुलासा दि. 16/09/2014 रोजी प्राप्त झाला. तो विचारात घेवून लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) यापुर्वी या रस्ताचे डांबरीकरणाचे काम कधी केले होते, त्याचा दायित्व कालावधी संपला होता काय, याची खात्री विभागाने केल्याचे दिसून आले नाही.

2) रस्ता खडीकरण व डांबरीकरण केले ती जागा महापालिकेच्या मालकीची आहे, किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 209 नुसार सार्वजनिक रस्ते सुधारण्यासाठी जागा संपादन केली आहे, किंवा कलम 224 नुसार खाजगी रस्ता चांगला करण्यासाठी महानगरपालिकेने खर्च करुन तो रस्ता सार्वजनिक रस्ता म्हणून जाहीर केल्याचे अभीलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत.

3) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512/)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी / निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयसकर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा दै. वृत्तमानस या स्थानिक पातळीवरील वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

4) कामाचे प्राकलन रु. 4574855/- असून त्यास कार्यकारी अभियंता तांत्रिक मंजूरी दिली आहे. कामावर खर्च रु. 47,56,711/- झाला आहे हा खर्च प्राकलन रकमेपेक्षा 10% ने जादा झाला आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 167 (2) नुसार मुळ प्राकलनात 10% पेक्षा जास्त वाढ होणार असेल तर सुधारीत प्राकलन तयार करणे आवश्यक आहे किंवा कामाच्या संकल्प चित्रात बदल झालेला नाही असे शहर अभियंता यांनी उपरोक्त नियमान्वये प्रमाणित करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त उणिवांची पूर्तता करेपर्यंत लेखापरिक्षणात रक्कम रु.47,56,711 आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 29, Hmm No : 74)

107 नालासोपारा प्रभाग समिती (क) हद्दीतील विधि रस्त्यांचे डांबरीकरण व पॅचवर्क करणे.

रस्ते दुरुस्ती

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : बांधकाम विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 8587324.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 8575170.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 12154.00/-

पूर्वी केलेल्या कामाचा दायित्व कालावधी संपल्याची खात्री केली नाही. जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याचे प्रमाणित केले नाही. शासन निर्णय दि.02/01/1992 अन्वये प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर केला नाही. प्राकलनापेक्षा 10% जादा झालेल्या कामास महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 मधील नियम 167(2) अन्वये सुधारीत प्राकलन करुन त्यास मंजुरी घेतली नाही. स्वामित्व धनाची रक्कम रु.12,154/- वसुल केली नाही. प्राकलन करताना सर्व बाबींचा विचार केला नाही. त्यामुळे नियमानुसार काम झाले नाही.

कामाचे नांव:- नालासोपारा प्रभाग समिती (क) हद्दीतील विधि रस्त्यांचे डांबरीकरण व पॅचवर्क करणे.

प्राकलन:- रु. 74,55,481/-/-

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 12, दि. 30/04/2012

तांत्रिक मंजूरी:- श.अ. क्र. 01, दि. 30/04/2012

निविदा तारीख :- 04/05/2012 वृत्तमानस

एल-1 निविदा:- मे. एन.ए. कनसट्रक्शन 4.95% जादा दराने

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 313, दि. 20/07/2012

करार :- 21/08/2012

कार्यादेश:- 624, दि. 22/08/2012

मुदत :- एक वर्ष,

काम पुर्ण :- 29/10/2012

खर्च : प्रमाणक क्रमांक - 2724, दिनांक 09/11/2012

रु. 8587324/-/- (मोजमाप पुस्तक क्र. 184 पृष्ठ क्र. 04 ते 14)

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.75, दि.11/08/2014 निर्गमीत केले, विभागाने खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) यापुर्वी या रस्ताचे डांबरीकरणाचे काम कधी केले होते, त्याचा दायित्व कालावधी संपला होता काय, याची खात्री विभागाने केल्याचे दिसून आले नाही.

2) रस्ता खडीकरण व डांबरीकरण केले ती जागा महापालिकेच्या मालकीची आहे, किंवा मुंबई प्रांतिक

महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 209 नुसार सार्वजनिक रस्ते सुधारण्यासाठी जागा संपादन केली आहे, किंवा कलम 224 नुसार खाजगी रस्ता चांगला करण्यासाठी महानगरपालिकेने खर्च करुन तो रस्ता सार्वजनिक रस्ता म्हणून जाहीर केल्याचे अभीलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत.

3) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस/1088/(2512/)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी / निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयसकर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा दै. वृत्तमानस या स्थानिक पातळीवरील वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. एकाच व स्थानिक पातळीवरील प्रसिध्दीमुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

4) कामाचे प्राकलन रु. 74,55,481/- असून त्यास शहर अभियंता तांत्रिक मंजूरी दिली आहे. कामावर खर्च रु. 85,87,324/- झाला आहे हा खर्च प्राकलनाच्या 10% पेक्षा जास्त झाला आहे. महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 नियम 167 (2) नुसार मुळ प्राकलनात 10% पेक्षा जास्त वाढ होणार असेल तर सुधारीत प्राकलन तयार करणे आवश्यक आहे किंवा कामाच्या संकल्प चित्रात बदल झालेला नाही असे शहर अभियंता यांनी उपरोक्त नियमान्वये प्रमाणित करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

5) मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम साहित्य म्हणून वापरात येणारे उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड दगडांची भुकटी गोटे बारीक खडी मुरुम वाळू यावर स्वामित्व धनांची रक्कम प्रति ब्रास रु 200 वसूल करुन शासन खाती महसूल व वन भरणा करावयाची आहे महापालिकेने कामाबाबत ठेकेदारांचे जे खालील प्रमाणे 60.77 ब्रास साहित्य वापरले त्या साहित्यावरील गौण खनिजांची रक्कम रु.12154/- वसुल केली नाही. खाली दर्शविल्या प्रमाणे गौण खनिज स्वामित्व धनांची रक्कम (रॉयल्टी) वसूल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दाखवावे.

40 mm मेटल	132 Cum
06 mm मेटल	40 Cum
एकूण	172 Cum
म्हणजे	60.77 ब्रास
रॉयल्टी रक्कम रु. 12,154/	

6) प्रभागात असलेल्या पॅचवर्क बाबत एकच प्राकलन केले आहे. मोजमाप पुस्तकातील नोंदीनुसार प्रभागातील अनेक ठिकाणी असलेल्या खडडयांच्या लांबी-रुंदीनुसार प्राकलन तयार केले नाही. प्रभागानुसार साहित्याचे दर / वाहतुकीचे दर वेगवेगळे असतात. त्याचा विचार केला गेला नाही.

त्यामुळे पॅचवर्क कामाचे प्राकलनात उणिवा असल्याचे आढळून येते.

वसुलपात्र रक्कम आक्षेपाधीन रक्कम रु.8575170/-

गौण खनिज रु.12154/-

DATPMVM6001 (Ref No : 30, Hmm No : 75)

108 देयके मंजूर करताना पाणी पुरवठा विभागातील मोजमाप पुस्तकात प्रतीसंदर्भ नमूद केला नाही व मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही.

पाणी पुरवठा

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : पाणी पुरवठा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

पाणी पुरवठा विभागाने केलेल्या कामाच्या नोंदी महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 चे नियम 180 नुसार नमूना 139 मध्ये घेतल्याचे दाखविले नाही. विभागाची देयके मंजूर करताना मोजमाप पुस्तकात प्रतीसंदर्भ नमूद केला नाही. मोजमाप पुस्तकाची साठा नोंदवही उपलब्ध झाली नाही.

पाणी पुरवठा विभागाचे कामाबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.63, दिनांक 06/08/2014 अन्वये देण्यांत आले होते. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. सदर कामाबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) पाणी पुरवठा विभागाने केलेल्या कामाच्या नोंदी महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम क्र. 180 बांधकाम नोंदवही नमुना क्र. 139 मध्ये घेतल्या बाबत सदरची नोंदवही लेखा पराक्षणास सादर केली नाही.

2) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम क्र. 180 नुसार मोजमाप पुस्तकात (M.B.) केलेल्या बांधकामाच्या नोंदी घ्यायच्या आहेत. नियम 180 (3) नुसार जेव्हां देयक मंजूर करण्यांत येईल, तेव्हां संबंधित नोंदीवर काट मारून देयकात व मोजणी पुस्तकात प्रतिसंदर्भ नमुद करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिशिष्ट 24 मोजमापे नियम अ.क्र. (15) नुसार बिल संमत झाल्याबरोबर मोजमाप नोंदवहीतील नोंदी दुसऱ्या लाल शाईने कर्ण रेषेने खोडुन टाकणे आवश्यक आहे. गोषवाऱ्या खाली बिल संमत करण्यांत आले त्याची एकूण व निव्वळ रक्कम लिहून प्रमाणक क्रमांक व दिनांक दर्शविणारी नोंद लाल शाईने करणे आवश्यक आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका बांधकाम विभागाकडून देयके, मोजमापे, संबंधित नस्त्या पुर्व लेखा परीक्षणासाठी- लेखा परीक्षण विभागाकडे पाठविल्या जातात.

अंतर्गत लेखा परीक्षण विभागाने देयक संमत/मंजूर केल्यावर मोजमाप पुस्तक व नस्ती परत विभागाकडे (बांधकाम) पाठविले जाते आणि देयक प्रदानासाठी लेखा शाखेकडे पाठविले जाते. महानगरपालिका संबंधित विभागाने मोजमाप पुस्तकातील नोंदी लाल शाईने कर्ण रेषेने खोडून टाकल्या आहेत. प्रधिकृत अधिकाऱ्याने नियम 180 (4) नुसार मोजमाप पुस्कातील नोंदींची तपासणी केल्या बद्दल स्वाक्षरी केली आहे. परंतु देयकावर आणि मोजणी पुस्तकात प्रतिसंदर्भ नमुद केला नाही. मोजमाप पुस्तकावर प्रमाणक क्रमांक व दिनांक याची नोंद नाही, त्यामुळे एखादे देयकाचे दुबार प्रदान झाले नसल्याची खात्री करता येत नाही.

3) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 180 (5) नुसार मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही नमुना 137 मध्ये ठेवायची आहे. विभागाने साठा नोंदवही ठेवून त्याचा साठा दाखविणे आवश्यक आहे. परंतु विभागाने मोजमाप पुस्तकांची साठा नोंदवही लेखा परीक्षणास दाखविली नाही.

DATPMVM6001 (Ref No : 26, Hmm No : 63)

109 पाणी पुरवठा योजना - पाण्याचे देयकाबाबत

उसगांव व सुर्या योजना – पाण्याचे देयकाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : पा.पु. व मल: निसारण मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 18230978.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 18230978.00/-

पाणी पुरवठा योजनेच्या पाण्याची देयके (उसगांव व सुर्या) पाटबंधारे विभागाकडे भरणा केल्याच्या नोंदवहया उपलब्ध झाल्या नाहीत. महानगरपालिकेला प्राप्त् पाणी व त्याचे महानगरपालिकेने केलेल्या वितरणाबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. नळ जोडणी अनामतीचे अभिलेखे प्राप्त् झाले नाहीत.

सुर्या पाणी पुरवठा योजना व उसगाव पाणी पुरवठा योजनेकडुन पाण्याचा पुरवठा महानगरपालिका क्षेत्रात केला जातो. त्यासाठी कार्यकारी अभियंता, भातसा कालवा विभाग क्र. 1, शहापूर व कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे यांचेकडे पाण्याची बिले म्हणून भरणा केली आहेत. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे

1) सुर्या योजना पाण्याची देयके

प्रमाणक क्र.(जल मल प्रवाह निधी)	दिनांक	रक्कम रु.	कालावधी व तपशिल
135	21/06/12	4807975/-	मार्च व एप्रिल 2012 पाण्याचे देयक प्रति युनिटचा दर रु. 6.60
256	08/08/12	4798540/-	मे व जुन 2012
400	06/10/12	1104218/-	जुलै व ऑगस्ट 2012 पाण्याचे देयक प्रति युनिटचा दर रु. 1.50
616	10/12/12	3013185/-	सप्टेंबर व ऑक्टोबर 2012 पाण्याचे देयक प्रति युनिटचा दर रु. 4.20
717	15/02/13	3015220/-	नोव्हेंबर व डिसेंबर 2012
एकुण		**16739138/-**	

उसगाव योजना पाण्याची देयके

प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम	कालावधी व तपशिल
207	21/07/12	1491840/-	फेब्रुवारी ते जुन 2012 पाण्याचे देयक प्रति युनिटचा दर रु. 4.20

याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.126, दि.20/09/2014 निर्गमीत केले होते. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) महानगरपालिकेला पुरवठा केलेल्या पाण्याबाबतची देयके कार्यकारी अभियंता शहापुर व कार्यकारी अभियंता ठाणे यांनी वेळोवळी पाठविलेली आहेत. परंतु पाणी पुरवठा विभागाने या देयकांची परिपुर्ण नोंद संबंधीत देयक नोंदवहीत घेतली नाहीत. महानगरपालिका क्षेत्रात आलेल्या पाण्याची मीटर प्रमाणे रिडींगनुसार तपासणी केली नाही. पाण्याच्या युनिटचे दर वेळोवेळी बदलेले आहेत. परंतु त्याच्या आदेशाच्या प्रती विभागात उपलब्ध झाल्या नाहीत. संबंधीत अभियंत्याने प्राप्त झालेले पाणी व लघु पाटबंधारे विभागाने पाठविलेले देयक याची तपासणी केल्याचे दिसुन येत नाही.

2) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 134 ते 138 नुसार महानगरपालिकेला प्राप्त् झालेले पाणी, महापालिका क्षेत्रात वितरण केलेले पाणी, गळती, इत्यादी बाबींचा ताळमेळ पाणी पुरवठा विभागाने घेतल्याचे दिसुन येत नाही. याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.126, दि.20/09/201 अन्वये

वसई विरार मनपा

खुलासा विचारला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केला नाही.
3) महानगरपालिकेच्या वार्षिक जमा खर्चानुसार नळ जोडणी अनामत/आकार म्हणून 2012-13 या वित्तिय वर्षात रक्कम रु. 46,74,47,113/- जमा दिसुन येते. रक्कम अनामत आहे की आकार म्हणुन आहे. याचा खुलासा विभागाने केला नाही. तसेच अनामत असल्यास याबाबतची नोंदवही लेखा परिक्षणास दाखविली नाही.

पाण्याच्या देयकाची रक्कम रु. 16739138
----------//------- रक्कम रु. 1491840
एकुण रु. 18230978
तरी रक्कम रु. 18230978/- लेखापरीक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 70, Hmm No : 126)

110 कामाच्या नस्त्या, नोंदवहया, मोजमाप पुस्तके उपलब्ध करुन दिली नाही.

देखभाल दुरुस्ती

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : पा.पु. व मल: निसारण मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 25050327.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 25050327.00/-

जलमल प्रवाह निधीच्या रोखवहीतुन खर्च केलेल्या कामांच्या नस्त्या, नोंदवहया, मोजमाप पुस्तके उपलब्ध करुन दिली नाहीत.

लेखा परिक्षणाच्या वेळी निवडक प्रमाणकांची तपासणी करता - जल मल प्रवाह निधीच्या किर्दीतुन पुढील दर्शविलेल्या प्रमाणकाव्दारे खर्च केल्याचे दिसुन येते. परंतु त्याबाबतच्या नस्त्या, नोंदवहया, मोजमाप पुस्तके लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. अर्धसमास पत्र क्र.127, दि.20/09/2014 निर्गमीत केले होते. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) अभिलेखे उपलब्ध न झालेल्या प्रमाणकांचा तपशिल -

अ.क्र.	प्रमाणक क्र.	दिनांक	रक्कम रु.	तपशिल
1.	378 अ	18/09/12	451080/-	युवक प्रतिष्ठान विरार, निर्मल अभियान योजना खर्च
2.	449 अ	22/10/12	521061/-	युवक प्रतिष्ठान शौचालय मुतारी बांधकाम
3.	449 ब	22/10/12	325179/-	युवक प्रतिष्ठान शौचालय मुतारी बांधकाम
4.	449 क	22/10/12	261788/-	युवक प्रतिष्ठान शौचालय मुतारी बांधकाम
5.	482	31/10/12	1413083/-	के.आर.कन्स्ट्रकशन पाणी पुरवठा लाईन
6.	483	31/10/12	918071/-	के.आर.कन्स्ट्रकशन पाणी पुरवठा लाईन
7.	484	31/10/12	676391/-	होम इंटरप्रायझेस गटार
8.	492	01/11/12	414575/-	श्री.गणेश इंटरप्रायझेस, चेंबर कवर
9.	493	01/11/12	545800/-	श्री. गणेश इंटरप्रायझेस, चेंबर कवर
10.	499	05/11/12	2476218/-	विश्व उद्योग मजुर कामगार, गटार बांधकाम
11.	579	22/11/12	3090279/-	हमीद शेख उघाडीचे वाढीव काम
12.	612	18/12/12	492725/-	नितीन म्हात्रे-पारोळ जलशुध्दीकरण केंद्राचे काम
13.	627	24/12/12	1123078/-	प्रणोती कन्स्ट्रकशन गटार
14.	628	24/12/12	1063180/-	प्रणोती कन्स्ट्रकशन गटार
15.	736	15/02/13	1110000/-	विंद्या ट्रेडर्स कडुन पाणी पुरवठा अंतर्गत व्हॉल खरेदी
16.	869	18/03/13	10167819/-	एन.जी.प्रोजेक्ट प्रा.लि. प्रणाली गटार बांधकाम
एकुण			**25050327**	

उपरोक्त उणिवांची पूर्तता करेपर्यंत या कामी खर्च केलेली रक्कम रु. 25050327 लेखा परिक्षणास

वसई विरार मनपा

आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 71, Hmm No : 127)

111 स्टेशनरी खरेदी आणि छपाई विषयी अनियमीतता.

स्टेशनरी खरेदी आणि छपाई

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : भांडार विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 10275000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 10264700.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 10300.00/-

शासन निर्णय दि.02/01/1992 नुसार स्टेशनरी खरेदी आणि छपाई कामी बाजार भावासोबत तुलना केली नाही. मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 नुसार वापरावयाच्या मुद्रांकापेक्षा कमी रकमेचे मुद्रांक वापरले.

कामाचे नांव:- स्टेशनरी खरेदी आणि छपाई.

प्राकलन:- रु. 75 लक्ष+75 लक्ष अंदाजपत्रकीय एकूण तरतुद रु. 104.31 लक्ष. एकूण खर्च रु. 102.75 लक्ष.

प्रशासकीय मंजुरी:- सर्वसाधारण सभा ठराव क्र. 12, दि. 09/03/2012

निविदा तारीख:- नोटीस 270/12 दि. 23/05/2012. दि. 24/05/2012 दै. परशुराम समाचार व दै.

वसई विरार मनपा

सकाळ

एल-1 निविदा:- **<u>किरकोळ स्टेशनरी साठी-</u>** मे. महाराणी प्रिंटर्स, मे. सिलेक्ट ऐंटरप्रायझेस, मे. अनिरुध्दाय इंप्रेशन, मे. साई स्पोटर्स, मे. आकाश ऐंटरप्रायझेस, मे. व्हरायटी बुक सेंटर, मे. एच.एम.पी. ऐंटरप्रायझेस.

<u>छपाई साठी-</u> मे. अनिरुध्दाय इंप्रेशन, मे. मुकुंद प्रिंटर्स, मे. महाराणी प्रिंटर्स, मे. एच.एम.पी. ऐंटरप्रायझेस, मे. चंडिका प्रिंटर्स.

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 588, दि. 19/10/2012 व स्थायी समिती ठराव क्र. 739, दि. 20/12/2012

करार :- 13/12 - 2013 ते 13/19-2013

कार्यादेश:- वेळोवेळी आवश्यकतेनुसार कार्यादेश दिले आहेत.

मुदत :- 1 वर्ष

लेखापरीक्षणाचे वेळी निवडक प्रमाणके तपासली. त्याचा उदाहरणादाखल तपशील पुढीलप्रमाणे.

प्रमाणक क्रमांक 3826, दि. 13/02/13, रुपये 21,250/- मे. व्हरायटी बुक सेंटर.
3825, दि.13/02/13, रुपये 95,000/- ----//------
3503, दि.1501/13, रुपये 24,472/- मे. महाराणी पिंटर्स.

लेखा परिक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 88 दि. 25/08/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचेकडील पत्र क्र. 1431, दि. 12/09/2014 रोजी केलेला खुलासा व दाखविलेले दप्तरी अभिलेखे विचारात घेता, लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) **प्राप्त निविदांची छाननी करुन, तुलनात्मक तक्त्यावर बाजार भावासोबत तुलना करून निविदा मंजूरीची शिफारस मुख्य लेखा परीक्षकांनी केली आहे. तथापि प्रत्यक्षांत बाजार भाव किती होते याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. म्हणजेच शासन निर्णय दि.02/01/1992 नुसार बाजार भावासोबत तुलना केल्याची लेखापरीक्षणाची खात्री होत नाही.**

2) **मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 मधील कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.**

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/-(कमाल5 लाख) स्टेशनरी खरेदीचे काम 75 लाखाचे असल्याने त्यावर देय होणारी मुद्रांक शुल्काची रक्कम रु.6600/- असतानां 07 ठेकेदारांसोबत केलेल्या करारनाम्यासाठी 3600/- इतके मुद्रांक वापरले आहेत. सबब रक्कम रु.3000/- संबंधितांकडून वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. स्टेशनरी छपाई काम 88 लाखाचे असल्याने त्यावर देय होणारी मुद्रांक शुल्काची रु.7900/- असतानां 05 ठेकेदारांसोबत केलेल्या करारनाम्यासासठी 6000/- इतके मुद्रांक वापरले आहेत. सबब रक्कम रु.1900/- संबंधितांकडून वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) **प्रमाणक क्र. 603 दि. 01/06/2012 रक्कम रु. 2,70,000/-**

ठेकेदाराचे प्रदान करताना त्यातुन आगाऊ स्थानिक संस्था कराची वसुली करण्याची प्रचलित पध्दती आहे. परंतु या देयकातून सदरची वसुली केली नाही. सबब स्थानिक संस्था कराची रक्कम रु. 5400/- **संबंधीतांकडून वसुल करुन अनुपालन लेखा परिक्षणास दाखवावे. (अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.** 106, **दि.** 05/09/2014)

लेखा परिक्षणाच्या वेळी निवडक प्रमाणकाची तपासणी करता उपरोक्त बाब निदर्शनास आली. तरी अशा प्रकारे अन्य प्रकरणी स्थानिक संस्था कराची वसुली न केल्याची प्रकरणे तपासून अनुपालन लेखा परिक्षणास दाखवावे. तरी रक्कम रु. 10300/- **वसुल पात्र ठेवण्यात येत आहे व रक्कम रु.** 1,02,64,700/- **आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.**

वसुलपात्र रकमा **आक्षेपाधीन रक्कम रु.**10264700/-

मुद्रांक शुल्क रु.4900/-

स्थानिक संस्था कर रु.5400/-

एकुण रु. 10300/-

DATPMVM6001 (Ref No : 49, Hmm No : 88)

112 शहरातील पाणी पुरवठा क्लोरीनेशन व्यवस्था व ॲलम खरेदीविषयी अनियमीतता.

उसगांव क्लोरीनेशन व्यवस्था

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : भांडार विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 9408000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 9407100.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 900.00/-

बाजार भावासोबत तुलना केली नाही, करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 नुसार कमी रकमेचे मुद्रांक वापरले. पुनर्प्रत्ययी आदेश देताना बाजारातील भावाशी शहानिशा केली नाही.

कामाचे नांव:- ॲलम खरेदी (पाणीपुरवठा विभागासाठी जलशुध्दीकरणासाठी ॲलम (तुरटी) पुरवठा करणे) व क्लोरिन गॅस रिफिलींग करणे व साहित्य पुरवठा करणे.

योजना संकेतांक :- 310-2520-1 **योजनेचे नांव:-** उसगांव क्लोरिनेशन व्यवस्था

तरतूद:- रु. 90 लक्ष **खर्च:- रु. 79.35 लक्ष**

310-2511 **शहरातील पा.पु.क्लोरिनेशन व्यवस्था**

तरतूद:- रु. 9.50 लक्ष **खर्च:- रु. 3.00 लक्ष**

310-2512 **टि.सी.एल.व ॲलम खरेदी**

तरतूद:- रु. 16 लक्ष **खर्च:- रु. 11.73 लक्ष**

वसई विरार मनपा

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 31, दि. 12/03/2012
निविदा तारीख:- दि. 16/05/2012, फुलवारी, मुंबई तरुण भारत
एल-1 निविदा:- मे. ठक्कर दन ऑरगॅनिक्स प्रा.लि.
घटट तुरटी रु. 5950/- प्रति टन, द्रवरुप लिक्विड रु.4970/- प्रति टन
मे. एस.व्ही.एस. केमिकल कार्पोरेशन - जल शुध्दीकरणासाठी ॲल्युमिनिअम क्लोराईड **(P.A.C.)**
पुरवठा रु. 13,700/- प्रति टन
निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 439, दि. 9/08/2012
करार:- मे. एस.व्ही.एस. - 1306/13. रु. 3,600/-
मे. ठक्कर - 1307/13. रु. 2,100/-
कार्यादेश:- आवश्यकतेनुसार वेळोवेळी कार्यादेश दिले आहेत.
मुदत :- 1 वर्ष

लेखापरीक्षणाचे वेळी निवडक प्रमाणके तपासली. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे.

प्रमाणक क्रमांक 121, दि. 06/06/12, रुपये 6,63,080/- ॲलम खरेदी (तुरटी) मे. ठक्कर दन ऑरगॅनिक्स प्रा.लि व इतर
प्रमाणक क्रमांक 122, दि. 06/06/12, रुपये 4,46,655/- ----//-------
प्रमाणक क्रमांक 123, दि. 06/06/12, रुपये 8,09,435/- ---//-------

लेखा परिक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 89 दि. 26/08/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचेकडील पत्र क्र. 1431, दि. 12/09/2014 रोजी केलेला खुलासा व दाखविलेले दप्तरी अभिलेखे विचारात घेता, लेखा परीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.
1) तुलनात्मक तक्त्यावर बाजार भावासोबत तुलना करून निविदा मंजूरीची शिफारस मुख्य लेखा परीक्षकांनी केली आहे. परंतु प्रत्यक्षांत बाजार भाव किती होते याबाबतची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. म्हणजेच शासन निर्णय दि.02/01/1992 नुसार बाजार भावाशी तुलना केल्याची खात्री होत नाही.
2) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 मधील कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.
कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-
त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/-(कमाल5 लाख)
या कामासाठी निविदा मागविताना 75 लाखाची खरेदी अपेक्षित धरली होती. त्यामुळे मंद्रांक शुल्काची रु.6600/- असतानां प्रत्यक्षात दोन ठेकेदारांसोबत केलेल्या करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्क रु. 5700/- वापरले आहेत. सबब रक्कम रु. 900/- संबंधितांकडून वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.
3) टी.सी.एल. पावडर पुरवठा करणेसाठी - मे. रविराज केमिकल्स व क्लोरिन सिलेंडर रिफिलिंग करणेकामी - मे. जी.एस. कमर्शियल कार्पोरेशन यांना लेखा परिक्षण काळात रक्कम रु. 11.73 लक्ष प्रदान केलेले आहेत. प्रत्यक्षात या ठेकेदारांना टि.सी.एल. व क्लोरिन सिलेंडर रिफिलिंगचे काम सन 2010-11 देण्यात आले होते. त्यानंतर 2011-12, 2012-13 या दोन वर्षात मुदतवाढ देऊन काम करुन घेतले आहे.

शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्र. भांखस/1088/(2512)/उद्योग 6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 8.3 (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रीपीट ऑर्डर) देताना ते सहा महिन्याच्या अवधिकरिता द्यावयाचे आहे. सदरचे आदेश तात्कालीक/आकस्मीत स्वरुपाचे असावेत. असे आदेश देताना बाजारातील किमती मुळ आदेशापेक्षा कमी नसल्याचे, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने/निविदा मंजूरी समितीने मंजूर करणे आवश्यक आहे. असे असताना उचित कार्यवाही न करता मुदतवाढ दिल्याचे दिसून येते.
उपरोक्त अनियमीततांची पूर्तता करेपर्यंत लेखा परिक्षणात रक्कम रु. 900/- वसुल पात्र ठेवण्यात येत आहे व रक्कम रु. 94,07,100/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 50, Hmm No : 89)

113 दिवे व दिवाबत्ती साहित्य खरेदीविषयी अनियमीतता.

दिवे व दिवाबत्ती, इतर वस्तु खरेदी

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : भांडार विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 59641000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 59584900.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 56100.00/-

शासन निर्णय दि.02/01/1992 नुसार बाजार भावाशी तुलना केली नाही, मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 नुसार कमी रकमेचे मुद्रांक वापरले. पुनर्प्रत्ययी आदेश देताना बाजारातील भावाशी शहानिशा केली नाही.

कामाचे नांव:- वसई - विरार शहर महानगरपालिकेस दिवे व दिवाबत्ती साहित्य खरेदी करणे.
प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 3, **दि.** 22/12/2010
निविदा तारीख:- प्रसिध्दी 891/11,**दि.** 11/03/2011, **दि.** 12/03/2011 **लोकमत व नरवीर चिमाजी**
एल-1 निविदा:- मे. सदगुरु ट्रेडींग कं., मे. साई इंटरप्रायझेस,
मे. द.हिन्द.इले.ॲन्ड इंजिनिअरींग कॉर्पोरेशन.,
मे. व्हि.एम.ट्रेडर्स., मे. चामुंडा इंटरप्रायझेस., मे. सोनल इंटरप्रायझेस.
निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 16, **दि.** 27/04/2011 **ठराव उपलब्ध झाला नाही.**
करार:- उपरोक्त सहा ठेकेदारासोबत रु. 500/- **च्या मुद्रांकावर करार केले आहेत.**
कार्यादेश:- आवश्यकतेनुसार वेळोवेळी कार्यादेश दिले आहेत.
मुदत :- 1 **वर्ष**
मुदतवाढ सर्वसाधारण सभा ठराव क्र. 12, **दि.** 09/03/2012 **अन्वये** 2012-13 **या वित्तिय वर्षाकरिता दिलेली आहे.**

लेखापरीक्षणाचे वेळी निवडक प्रमाणके तपासली. त्याचा उदाहरणादाखल तपशील पुढील प्रमाणे - प्रमाणक क्रमांक 3834, **दि**. 13/02/13, **रुपये** 2,13,665/- **मे. सोनल एंटरप्रायजेस**.
3835, **दि**.13/02/13, **रुपये** 14,18,740/- **मे. चामुंडा एंटरप्रायजेस**.

लेखा परिक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 93 दि. 26/08/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचेकडील पत्र क्र. 1431, दि. 12/09/2014 रोजी केलेला खुलासा व दाखविलेले दप्तरी अभिलेखे विचारात घेता, लेखा परीक्षणात पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1) तुलनात्मक तक्त्यावर बाजार भावासोबत तुलना करून निविदा मंजूरीची शिफारस मुख्य लेखा परीक्षकांनी केली आहे. प्रत्यक्षांत बाजार भाव किती होते याबाबतची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. म्हणजेच बाजार भावासोबत तुलना केल्याची खात्री होत नाही.

2) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 मधील कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/-(कमाल5 लाख)

या कामासाठी निविदा मागविताना रु. 5 कोटीची खरेदी अपेक्षित धरली होती. प्रत्यक्षात या कामासाठी खर्च रु. 596.41 लक्ष झालेला आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्काची होणारी रक्कम रु. 59,100/- असताना प्रत्यक्षात सहा ठेकेदारांसोबत केलेल्या करारनाम्यासाठी एकूण मुद्रांक शुल्क रु. 3,000/- वापरले आहेत. सबब रक्कम रु. 56,100/- संबंधीतांकडून वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

3) दिवे व दिवाबत्ती, इतर वस्तु खरेदीबाबत सर्वसाधारण सभा ठराव क्र. 12, दि. 09/03/2012 अन्वये 2012-13 करिता मुदतवाढ दिलेली आहे.

शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्र. भांखस/1088/(2512)/उद्योग 6, दि. 02 जानेवारी, 1992 मधील परिच्छेद क्र. 8.3 (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारित मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते सहा महिन्याच्या अवधिकरिता द्यावयाचे आहे. सदरचे आदेश तात्कालीक/आकस्मीत स्वरुपाचे असावेत. असे आदेश देताना बाजारातील किमती मुळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने/निविदा मंजूरी समितीने मंजूर करणे आवश्यक आहे. असे असताना उचित कार्यवाही न करता मुदतवाढ दिल्याचे दिसून येते.

तरी रक्कम रु. 56,100/- वसुल पात्र ठेवण्यात येत आहे व रक्कम रु. 5,95,84,900/- आक्षेपाधिन

वसई विरार मनपा

ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम आक्षेपाधीन रक्कम रु.59584900/-

मुद्रांक शुल्क रु.56100/-

DATPMVM6001 (Ref No : 51, Hmm No : 93)

114 पाणी पुरवठा- वितरण व्यवस्था व देखभालीसाठी पाईप, प्लबिंग फिटींग साहित्य इत्यादी खरेदी

शहरांतर्गत वितरण व्यवस्था दैनंदिन देखभालीसाठी साहित्य खरेदी

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : भांडार विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 63407000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 62943000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 464000.00/-

बाजार भावासोबत तुलना केली नाही, मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 नुसार कमी रकमेचे मुद्रांक वापरले. शासन निर्णय दि.02/01/1992 नुसार पुनर्प्रत्ययी आदेश देताना बाजारातील भावाशी शहानिशा केली नाही.

कामाचे नांव :- पाणीपुरवठा विभागासाठी पाईप, प्लंबींग फिटींग साहित्य इत्यादी पुरवठा करणे
योजना संकेतांक :- 310-2510-2 **योजनेचे नांव:- शहरांतर्गत वितरण व्यवस्था दैनंदिन देखभालीसाठी साहित्य खरेदी**
तरतूद:- रु. 954 **लक्ष खर्च:- रु.** 252.91 **लक्ष**
111-4134-2 विकास निधी अंतर्गत पा.पु.योजना मुख्य जलवाहिनी व्यवस्था
तरतूद:- रु. 75 **लक्ष खर्च:- नाही.**
111-4198-2 विकास निधी अंतर्गत पा.पु.अंतर्गत शहरांतर्गत जलवाहिनी व्यवस्था
तरतूद:- रु. 821 **लक्ष खर्च:- रु.** 381.16 **लक्ष**
प्रशासकीय मंजुरी :- सर्वसाधारण सभा ठराव क्र. 12, **दि.** 09/03/2012
निविदा तारीख:- प्रसिध्दी 1126/12,**दि.** 30/08/2012, **दि.** 31/08/2012 **लोकराजा व सामना.**
एल-1 निविदा :- मे. पाईप डिस्ट्रीब्युटर्स., मे.मरिन इंजिनिअरींग., मे. कमल ट्रेडींग कं., मे. विद्या ट्रेडर्स., मे. रोहीत ट्रेडींग कं., मे. तन्वी कार्पोरेशन
निविदा मंजुरी :- स्थायी समिती ठराव क्र. 761, **दि.** 03/01/2013
करार:- उपरोक्त सहा ठेकेदारासोबत पुढील दर्शविल्याप्रमाणे मुद्रांकावर करार केले आहेत.
मे. पाईप डिस्ट्रीब्युटर्स करारासाठी मुद्रांक रु. 12,000/-

मे.मरिन इंजिनिअरींग करारासाठी मुद्रांक रु. 4,000/-
मे. कमल ट्रेडींग कं. करारासाठी मुद्रांक रु. 5,000/-
मे. विद्या ट्रेडर्स करारासाठी मुद्रांक रु. 5,000/-
मे. रोहीत ट्रेडींग कं. करारासाठी मुद्रांक रु. 5,000/-
मे. तन्वी कार्पोरेशन करारासाठी मुद्रांक रु. 5,000/-
म्हणजेच एकूण रक्कम रु. 36,000/- **चे मुद्रांक वापरले आहे.**
कार्यादेश:- आवश्यकतेनुसार वेळोवेळी कार्यादेश दिले आहेत.
मुदत :- 1 **वर्ष**
सदरची निविदा 03/01/2013 **रोजी मंजुर झाल्याने** 2012-13 **या वर्षातील सुमारे** 9 **महिन्याच्या कालावधीसाठी च्या जुन्या ठेकेदारास मुदतवाढ दिलेली आहे. (सर्वसाधारण सभा ठराव क्र.** 12 **दि.** 09/03/2012)

लेखापरीक्षणाचे वेळी निवडक प्रमाणके तपासली. त्याचा उदाहरणादाखल तपशील पुढीलप्रमाणे.

प्रमाणक क्रमांक 670, दि. 15/01/13, रुपये 5,83,500/- मे. रोहित ट्रेडींग कं., यांना पाणी पुरवठा साहित्य पुरविणेकामी.

668, दि.15/01/13, रुपये 3,39,000/- मे. विदया ट्रेडर्स, यांना पाणी पुरवठा साहित्य पुरविणेकामी.

667, दि. 15/01/13, रुपये 1,70,000/- मे. पाईप डीस्ट्रीब्युटर्स, यांना पाणी पुरवठा साहित्य पुरविणेकामी.

लेखा परिक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 94 **दि.** 26/08/2014 **अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.** 1431, **दि.** 12/09/2014 **रोजी केलेला खुलासा व दाखविलेले दप्तरी अभिलेखे विचारात घेता, लेखा परीक्षणात पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.**
1) **तुलनात्मक तक्त्यावर बाजार भावासोबत तुलना करून निविदा मंजूरीची शिफारस मुख्य लेखा परीक्षकांनी केली आहे. जलवाहिन्याचे पाईप व इतर साहित्य खरेदी करावयाचे असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील दर सूची सोबत प्राप्त् निविदेतील दराशी तुलना केली नाही. तसेच बाजार भाव किती होते याबाबतची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. म्हणजेच तुलना केल्याचे दिसून येत नाही. निविदा मंजूर करताना प्राप्त झालेले दर हे किफायशीर असल्याची खात्री न करता निविदा मंजुर केल्याचे दिसून येते.**
2) **मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम कलम** 03 **मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल** 1 **मधील** 63 **नुसार दि.** 01/05/2006 **पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.**

कामाची रक्कम 10 **लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू.** 100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 **लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू.** 100/-(**कमाल**5 **लाख**)

या कामासाठी निविदा मागविताना रु. 1650 **लाखाची खरेदी अपेक्षित धरली होती. त्यामुळे मुद्रांक शुल्काची होणारी कमाल रक्कम रु.** 5,00,000/- **असताना प्रत्यक्षात सहा ठेकेदारांसोबत केलेल्या करारनाम्यासाठी**

एकूण मुद्रांक शुल्क रु. 36,000/- **वापरले आहेत. सबब रक्कम रु.** 4,64,000/- **संबंधीतांकडून वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.**

3) **पाईप खरेदीसाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.** 12 **दि.** 09/03/2012 **अन्वये सन** 2012-13 **करिता मुदतवाढ दिलेली आहे. मागील वर्षाच्या ठेकेदारांना सुमारे** 9 **महिने पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्र. भांखस**/1088/(2512)/**उद्योग** 6, **दि.** 02 **जानेवारी**, 1992 **मधील परिच्छेद क्र.** 8.3 (**ह**) **पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारित मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते सहा महिन्याच्या अवधिकरिता द्यावयाचे आहे. सदरचे आदेश तात्कालीक/आकस्मीत स्वरुपाचे असावेत. असे आदेश देताना बाजारातील किमती मुळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने/निविदा मंजूरी समितीने मंजूर करणे आवश्यक आहे. असे असताना उचित कार्यवाही न करता मुदतवाढ दिल्याचे दिसून येते.**

उपरोक्त उणिवांची पूर्तता करेपर्यंत लेखा परिक्षणास रक्कम रु. 4,64,000/- वसुल पात्र ठेवण्यात येत आहे व रक्कम रु. 6,29,43,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 52, Hmm No : 94)

115 ई-गर्व्हनस अमंलबजावणी, मालमत्ता कराची डिमांड रजिस्टर, मागणी बिले, नोटीसा, पावत्या इत्यादी कामे.

ई-गर्व्हनस अमंलबजावणी

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : भांडार विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 3804120.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3804120.00/-

प्रसिध्दी माध्यमांचा पुरेसा वापर केला नाही. पुनर्प्रत्ययी आदेश देताना ठेकेदाराने दिलेल्या दराची बाजार भावासोबत तुलना केली नाही.

कामाचे नांव:- ई-गव्हर्नस अंमलबजावणी.

तरतूद:- रु. 42 **लक्ष** **खर्च :- निरंक**

योजना संकेतांक :- 910-4172 **योजनेचे नांव :- मालमत्ता कर संगणीकरण**

तरतूद:- रु. 27 **लक्ष** **खर्च:- रु.** 2662773

योजना संकेतांक :- 310-4172 **योजनेचे नांव :- आरोग्य व पाणीपुरवठा संगणीकरण**

वसई विरार मनपा

तरतूद:- रु. 143 **लक्ष** **खर्च:- रु.** 1141347

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती सभा ठराव क्र. 17, **दि.** 22/02/2012

निविदा तारीख:- नोटीस 1553-12/03/12, **दि.** 14/02/2012, **दै. वृत्तमानस व दै. शोषितांचे समर्थन**

एल-1 निविदा:- मे. स्वॅप इन्फोसिस

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 355, **दि.** 20/07/2012

करार:- ठेकेदारासोबत पुढील दर्शविल्याप्रमाणे मुद्रांकावर करार केले आहेत.

मे. स्वॅप इन्फोसिस करारासाठी मुद्रांक रु. 4,100/-

कार्यादेश:- 1086, **दि.** 13/08/2012

मुदत :- 1 **वर्ष**

2011-12 या वर्षात मालमत्ता कर व पाणीपट्टीचे संगणकीकरणासाठी निविदा मागविली होती. त्यास मुदतवाढ कार्यादेश क्र. 42/12, दि. 18/08/2012 अन्वये दिली आहे. मुदतवाढ स्थायी समिती ठराव क्र. 31, दि. 12/03/2012 अन्वये पुढील वर्षाची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दिली आहे.

लेखापरीक्षणाचे वेळी निवडक प्रमाणके तपासली. त्याचा उदाहरणादाखल तपशील पुढील प्रमाणे.

प्रमाणक क्रमांक 3430, दि. 08/01/13, रुपये 2,84,924/- मे. स्वस्तिक एंटरप्रायजेस.
3431, दि.08/01/13, रुपये 4,41,705/- -----//---------
3432, दि.08/01/13, रुपये 2,84,924/- ----//--------

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.100, दि.03/09/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र.1431, दि.12/09/2014 अन्वये केलेल्या खुलाशानुसार महापालिकेने प्रसिध्दी माध्यमांचा पुरेपुर वापर केला होता. मुदतवाढ देतांना आवश्यक ती काळजी घेतली होती असे नमुद केले आहे. परंतु याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केले नाहीत. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांसख 1088/(2512)/उद्योग-6. दि. 02/01/1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी/निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयसकर ठरते. अशा प्रसिध्दी द्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात त्यातुन दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपाकिलेने निविदा दै. वृत्तमानस व दै. शोषितांचे समर्थन या स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

2) याकामी महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. 31, दि.12/03/12 अन्वये मुदतवाढ दिलेली आहे. शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग क्र. भांखस/1088/(2512)/उद्योग 6, दि. 02 जानेवारी, 1992 मधील परिच्छेद क्र. 8.3 (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारित मार्गदर्शक तत्वे परिशिष्ट सात अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश देताना ते सहा महिन्याच्या अवधिकरिता द्यावयाचे आहे. सदरचे आदेश तात्कालीक/आकस्मीक स्वरुपाचे असावेत. असे आदेश देताना बाजारातील किमती मुळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने/निविदा मंजूरी समितीने मंजूर करणे आवश्यक आहे. ही कार्यवाही न करता मुदतवाढ दिली

वसई विरार मनपा

आहे.

उपरोक्त उणिवांची पुर्तता करेपर्यंत लेखा परिक्षणात रक्कम रु. 3804120/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 54, Hmm No : 100)

116 संगणक देखभाल दुरुस्ती बाबत

संगणक मशीन खरेदी व दुरुस्ती.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : भांडार विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 2523531.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2522731.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 800.00/-

शासन निर्णय दि.02/01/1992 अन्वये प्रसिध्दी माध्यमांचा पुरेसा वापर केला नसल्याने स्पर्धात्मक दराचा लाभ महानगरपालिकेस झाला नाही. मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 नुसार कमी रकमेचे मुद्रांक वापरल्याने रु.800/- वसुली करणे आवश्यक आहे.

कामाचे नांव :- संगणक देखभाल दुरुस्ती

तरतुद:- 26.50 **लक्ष खर्च:- रु.** 2523531

प्रशासकीय मंजुरी:- स्थायी समिती सभा ठराव क्र. 16, **दि.** 22/02/2012

निविदा तारीख:- प्रसिध्दी 1553, **दि.** 12/03/2012, **दि.** 14/03/2012**शोषितांचे समर्थन व वृत्तमानस**

एल-1 निविदा:- मे. सिक्युरिटी व्हिजन

निविदा मंजुरी:- स्थायी समिती ठराव क्र. 354, **दि.** 20/07/2012

करार:- मे. सिक्युरिटी व्हिजन करारासाठी मुद्रांक रु. 1,000/- **चे वापरले होते.**

कार्यादेश:- 991, **दि.** 30/07/2012

मुदत :- 1 **वर्ष**

लेखापरीक्षणाचे वेळी निवडक प्रमाणके तपासली. त्याचा उदाहरणादाखल तपशील पुढीलप्रमाणे.

प्रमाणक क्रमांक 3796, दि. 12/02/13, रुपये 2,40,188/- मे. सिक्युरीटी व्हीजन यांना देखभाल दुरुस्तीकामी.

3797, दि.12/02/13, रुपये 2,40,188/- -----//----------

वसई विरार मनपा

लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.103, दि.04/09/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र.1431, दि.12/09/2014 अन्वये केलेल्या खुलाशानुसार महानगरपालिकेने प्रसिध्दी माध्यमांचा पुरेपुर वापर केला होता. मुद्रांक शुल्काची रक्कम रुपये 800/- संबंधीतांकडून वसुल करण्यांत येईल असे कळविले आहे. परंतु सदरची रक्कम वसुल केली नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांसख 1088/(2512)/उद्योग-6. दि. 02/01/1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी/निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयसकर ठरते. अशा प्रसिध्दी द्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात त्यातुन दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपाकिलेने निविदा वृत्तमानस व शोषितांचे समर्थन या वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळटे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

2) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 मधील कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी- मुद्रांक शुल्क रू.100/- (कमाल 5 लाख)

या कामासाठी निविदा मागविताना रु. 26.50 लाखाची खरेदी अपेक्षित धरले होते. त्यामुळे मुद्रांक शुल्काची होणारी रक्कम रु. 1800/- असतान प्रत्यक्षात ठेकेदारांसोबत केलेल्या करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्क रु. 1000/- वापरले आहेत. सबब रक्कम रु. 800/- संबंधिताकडून वसुल करून शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त उणिवांची पुर्तता करेपर्यंत लेखा परिक्षणात रक्कम रु. 800/-- वसुल पात्र ठेवण्यात येत आहे. आणि रक्कम रु. 2522731/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम आक्षेपाधीन रक्कम रु.2522731/-

मुद्रांक शुल्क रु.800/-

DATPMVM6001 (Ref No : 55, Hmm No : 103)

117 जंगम मालमत्ता पुस्तकातील नोंदीबाबत.

विकास निधी अंतर्गत अग्निशमन व्यवस्था- वाहन खरेदी (टर्न टेबल लेडर खरेदी)

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : भांडार विभाग मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

जंगम मालमत्ता पुस्तकातील नोंदी सरसकट घेतल्या आहेत, सोपारा प्रभागाने जुन्या भांडाराच्या विक्रीची नस्ती लेखा परिक्षणाने सादर केली नाही.

महानगरपालिकेने लेखे महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नुसार ठेवले आहेत. लेखा संहिता नियम 144 नुसार महापालिकेच्या मालकीची, इंजिने, यंत्रे, साधने, वाहने, कचरा सफाई गाड्या, सिंचनाच्या गाड्या, दिवे, दिव्याचे खांब, मापके फर्निचर इत्यादी स्थायी व टिकाऊ स्वरुपाच्या जंगम मालमत्तेची सूची नमुना क्र.114 मध्ये म्हणजे जंगम मालमत्ता पुस्तकात, प्राधिकृत अधिकाऱ्या आद्याक्षरीनिशी नमुद केली पाहिजे. त्यानुसार महापालिकेच्या भांडार विभागाने जंगम मालमत्ता पुस्तकात नोंदी घेतल्या आहेत. मालमत्तेच्या विक्रिने, अथवा अन्य मार्गाने अंतिम निकालात काढलेल्या साहित्याची नोंद व विल्हेवाटीचा तपशिल स्तंभ क्र. 9 ते 14 मध्ये संबंधित अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीनिशी नमुद केला पाहिजे.

याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.108, दि.09/09/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र.1431, दि.12/09/2014 अन्वये केलेल्या खुलाशानुसार - जंगम मालमत्ता पुस्तकात एकत्रितरीत्या नोंदी न घेतल्याचे मान्य केले आहे. पुढील काळात प्रत्येक प्रकारच्या मालमत्तेसाठी पाने वाटून तशा नोंदी घेण्याची कार्यवाही करण्यांत येईल असे नमुद केले आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये जुन्या भांडाराच्या विक्रीच्या उत्पन्नापोटी महापालिकेला रक्कम रु. 3419427/- प्राप्त झाल्याची नोंद महापालिकेच्या वार्षिक जमा-खर्चानुसार दिसून येते. परंतु या विक्रीची नस्ती भांडार विभाग मुख्यालयात प्राप्त झाली नाही. सदरचे काम सोपारा प्रभाग कार्यालयाने केल्याचे सांगण्यात आले. संबंधित नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यांत यावी. प्रभाग कार्यालयाला किती रक्कमे पर्यंत भंगार/जुने भांडार विक्रीचं अधिकार प्रत्यार्पित केले आहेत, याबाबतचे प्राधिकार दाखविले नाहीत. तसेच या विल्हेवाटीचा तपशिल जंगम मालमत्ता पुस्तकाच्या स्तंभ क्र. 9 ते 14 मध्ये नमुद केलेला नाही.

2) जंगम मालमत्ता पुस्तकात निरनिराळ्या प्रकारच्या वस्तु सरसकट एकत्र न दाखवता, प्रत्येक प्रकारच्या मालमत्तेसाठी जरूरी प्रमाणे निरनिराळे पाने वाटून देणे आवश्यक असताना, विभागाने ठेवलेल्या नोंदवहीत सरसकट एकत्र नोंदी घेतल्या आहेत.

महानगरपालिकेने विकास निधी अंतर्गत अग्निशमन व्यवस्था म्हणुन (टर्न टेबल लेडर) शिडी वाहन खरेदी केले आहे. लेखापरिक्षणाच्या वेळी निवडक प्रमाणकाची तपासणी करता प्रमाणक क्र. 24, दि. 13/04/2012 अन्वये रक्कम रु. 12558053/- इतका खर्च या वाहन खरेदी कामी केल्याचे निदर्शनास आले. या वाहनासाठी एकुण खर्च रु. 55576958/- केल्याची नोंद जंगम मालमत्ता नोंदवहीत आहे. सदरचे वाहन मे. रोझ्न बॉर

इंटरनॅशनल अे. जी. ऑस्ट्रीया (युरोप) यांचकडुन खरेदी केले आहे. या वाहनाची नोंद जंगम मालमत्ता पुस्तकामध्ये घेण्यात आली आहे. परंतु अशा प्रकारची किंवा अन्य प्रकारची वाहने अग्निशमन विभागाकडे किती आहेत, यांचा तपशिल जंगम मालमत्ता पुस्तकात स्वतंत्र पृष्ठावर दिसुन येत नाही. सबब प्रत्येक प्रकारच्या मालमत्तेसाठी जरुरी प्रमाणे निरनिराळी पाने वाटुन देणे आवश्यक असुन त्याचा तपशिल अनुक्रमणीकेमध्ये नमुद करणे आवश्यक होते. या प्रकरणी कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

3) नवीन जंगम मालमत्तेचे पुस्तक उघडताना त्यात प्रथम आरंभीची शिल्लक म्हणजेच यापूर्वीच्या काळात खरेदी केलेल्या आणि भांडारात शिल्लक असलेल्या सर्व वस्तुची नोंद काळजीपुर्वक घेऊन त्याची पडताळणी महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 नियम 144 नुसार करणे आावश्यक आहे. परंतु विभागाने वित्तीय वर्ष 2012-13 पर्यंत पडताळणी केलेली नाही. महानगरपालिकेची स्थापना 03 जुलै 2009 रोजी झाली. त्यावेळी महापालिकेत समाविष्ट झालेल्या 4 नगरपरिषदा (वसई, नवघर,सोपारा,विरार) व 53 ग्रामपंचायती यांच्याकडे असलेली जंगम मालमत्ता, महापालिकेच्या एकत्रित जंगम नोंदवहीत घेऊन प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने पडताळणीची नोंद घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे महापालिकेची एकूण जंगम मालमत्ता किती हे समजू शकत नाही. सबब, मत्ता व दायित्व विवरणपत्रात याबाबतच्या नोंदी कशा घेतल्या, त्यात घसाऱ्याची नोंद कोणत्या आधारे दाखवली, हे समजू शकत नाही.

4) जंगम मालमत्ता नोंदवहीतील नोंदी व त्यातुन अंतिमत: निकालात काढलेली मालमत्ता नमुद करून 31/03/2013 अखेरच्या शिल्लकेची पडताळणी करून तसे प्रमाणपत्र प्राधिकृत अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने घेऊन लेखा परीक्षणास दाखविले नाही.

DATPMVM6001 (Ref No : 56, Hmm No : 108)

118 क प्रभाग अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :अनधिकृत बांधकाम तोडण मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

वसूलपात्र रक्कम रु. 956150.00/-

अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडील अभिलेखे कारवाई नोंदवही, सुनावणी नोंदवही, निष्कासित बांधकाम नोंदवही, निष्कासन खर्च मागणी व वसुली नोंदवही व महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांचे भू लेखा परीक्षण झाल्याबाबतचा अहवाल इत्यादी अभिलेखे मुंबई लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार मागणी केले असता सदरचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे अनधिकृत बांधकामा

संदर्भात केलेली कार्यवाही निष्कासित बांधकाम खर्चाची मागणी व वसुली याची तपासणी करता आली नाही. नालासोपारा अतिक्रमण विभागाने एकूण २८३ अतिक्रमण बांधकामांवर कारवाई केली नसल्याने मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन केले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४७९ अन्वये अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे दूर करण्यासाठी केलेला खर्च संबंधित इसमाकडून वसूल करावयाचा आहे. तथापि लेखा परीक्षणात नस्तीमधील उपायुक्त यांचे स्वाक्षरीत विवरणपत्रानुसार वर्ष २०१२-१३ मध्ये अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे दूर करण्यासाठी झालेला खर्च रक्कम रु. ९,५६,१५०/- इतक्या रक्कमेची वसुली करणे प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे.

नालासोपारा प्रभागाकडील अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या खालील अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. ७२ दिनांक ११/०८/२०१४ अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नसल्याने लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) महानगरपालिकेच्या नालासोपारा प्रभाग वर्ष २०१२-१३ या वित्तीय वर्षाचे अनधिकृत बांधकाम अतिक्रमण विभागाचे लेखा परीक्षणात विभागाकडे अनधिकृत बांधकाम नियंत्रणाचे संदर्भातील अभिलेखे, कारवाई नोंदवही, सुनावणी नोंदवही, निष्कासित बांधकाम नोंदवही, निष्कासन खर्च मागणी व वसुली नोंदवही इत्यादी अभिलेखे मुंबई लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार लेखा परीक्षणास सादर करणे बंधनकारक असताना अर्धसमास पत्र क्र. ७२ दिनांक ११/०८/२०१४ अन्वये मागणी करूनही लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही त्यामुळे अनधिकृत बांधकामा संदर्भात केलेली कार्यवाही निष्कासित बांधकाम खर्चाची मागणी व वसुली याची तपासणी करता आली नाही.

२) नालासोपारा प्रभाग क्षेत्रात अतिक्रमण झालेल्या खालील प्रकारच्या आरक्षित जमिनींचा तपशिल उपलब्ध करून देणेबाबत अर्धसमास पत्राद्वारे मागणी केली असता याबाबतची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे खालील प्रकारच्या आरक्षित भूखंडावर झालेले अतिक्रमण याबाबतची सद्यस्थिती लेखा परीक्षणास अवगत झाली नाही.

अ) सरकारी जागांवरील असलेली अतिक्रमण संख्या.

ब) वन विभागाचे जागांवरील असलेली अतिक्रमण संख्या.

क) महापालिका आरक्षित भूखंड संख्या.

ड) महापालिका आरक्षित भूखंडावरील असलेली अतिक्रमण संख्या.

इ) सार्वजनिक ठिकाणे/जागांवरील अतिक्रमण संख्या.

ई) सन ११९५ पूर्वीची अनधिकृत बांधकामे संख्या, सन १९९५ ते सन २००० पर्यंतची अनधिकृत बांधकामे संख्या व सन २००१ पासून ते सन २०१२ पर्यंतची अनधिकृत बांधकामे संख्या विवरणपत्र.

३) महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र.उच्चस्त २०१०/प्र.क्रमांक ६५/झापसू-१ दिनांक ०२/१०/२०१० अन्वये अनधिकृत बांधकामाचे संदर्भात विभागात प्रभाग स्तरावर बीट निहाय नोंदवही ठेवायची आहे. बीट निरीक्षक /मुकादम यांनी त्या नोंदवहीत त्यांच्या बीटमधील अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम इ. नागरी गुन्ह्याशी सबंधित घटनांची नोंद घ्यायची आहे. व तसे न केल्यास बीट निरीक्षकास/सबंधित कर्मचाऱ्यास जबाबदार धरावयाचे आहे. प्रभाग कार्यालयाने अनधिकृत बांधकामे निष्कासन कार्यवाहीचा दैनंदिन अहवाल मुख्यालयाकडे सादर करावयाचा आहे. व मुख्यालयात एकत्रित

नोंदवही ठेवून त्यात आतापर्यंत असलेल्या किती बांधकामावर कारवाई (हटविली) केली त्याची नोंद घ्यावयाची आहे. मुख्यालय स्तरावर तक्रार आल्यावर आवक नोंदवहीत नोंद घेऊन, प्रभागाकडे तक्रार पाठविली म्हणून जावक नोंदवहीत नोंद घ्यायची आहे. परंतू मुख्यालयात व प्रभाग क्षेत्रात अशी नोंदवही ठेवली नसल्याने हद्दीत एकूण किती अनधिकृत बांधकामे झाली व किती बांधकामे कारवाई करून हटविली व अशा हटविलेल्या बांधकामांवर झालेल्या खर्चाचा, वसुलीचा मेळ विभागाने नोंदवही ठेवली नसल्याने घेता आला नाही.

४) अनधिकृत बांधकामे /अतिक्रमण यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी अनधिकृत बांधकामे /अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन पथक व महापालिकेच्या नगर रचना विभागात समन्वयाची आवश्यकता असल्याने, याबाबत आवश्यक ती उपाययोजना करावयाची आहे. नगर रचना विभागाने बांधकाम परवानगी दिल्यानंतर त्याची माहिती प्रभाग अधिकाऱ्यांना/ बीट कर्मचाऱ्यांना त्वरित देणेची आहे परंतु अशी कार्यवाही झाल्याचे सन २०१२-२०१३ या वर्षात दिसून आले नाही. त्यामुळे विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांना अधिकृत व अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण/देखरेख ठेवण्यास सहकार्य झाले नाही.

५) महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र.उच्चस्त २०१०/प्र.क्रमांक ६५/झापसू-१ दिनांक ०२/१०/२०१० अन्वये अनधिकृत बांधकामे /अतिक्रमण यांवर विहित मुदतीत नोटीस न दिल्यास व त्यापुढील कारवाई न केल्यास संबंधित क्षेत्रातील/प्रभागातील संबधित अधिकारी / कर्मचारी यांना जबाबदार धरून त्यांचे विरुद्ध कारवाई करावयाची आहे. त्यानुसार मुदतीत नोटीस न दिलेली व त्यापुढील केलेल्या कारवाईची प्रकरणे लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे निष्कासनावर झालेल्या खर्चाचा मेळ घेता आला नाही. तसेच शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रभागातील बीट निरीक्षक, कर्मचारी/अधिकारी यांचेवर केलेली कारवाई लेखा परीक्षणास अवगत झाली नाही.

६) ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमणाचे संदर्भात जनहित याचिका कमांक १३५ व १३६/२००७ मध्ये उच्च न्यायालयात दिनांक १०.०६.२०१० रोजी सुनावणी झाली. त्यांत सार्वजनिक जागेवरील बांधकामे/ अतिक्रमण निष्कासित करण्याची शासनाची भूमिका असून उच्च न्यायालयाने दिनांक ३१/१२/२०१० पर्यंत अतिक्रमणे हटविण्यात यावी असे अपेक्षिले त्या अनुषंगाने मुख्य सचिवांना शपथपत्र सादर करण्याच्या सूचना दिल्या. दिनांक ३१/१२/२०१० ही शेवटची मुदत असल्याने जे अधिकारी उपरोक्त वेळापत्रकाचे पालन करणार नाहीत त्यांचे विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल व फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील असे आदेश दिले होते. तरी याबाबत महानगरपालिकेने केलेली कार्यवाही, संबंधित लेख्यांसह लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्याबाबत मागणी केली असता ती उपलब्ध केली नाही. लेखा परीक्षणास प्राप्त नस्तीतील विवरणपत्रानुसार नालासोपारा प्रभागात माहे मार्च २०१३ अखेर शासकीय जमिनीवर एकूण ४३० अतिक्रमणे असून सन १९९५ पूर्वीची १२०, दिनांक १/१/१९९५ ते ३१ डिसेंबर २००० पर्यंतची २७ व दिनांक ०१/०१/२००१ नंतरची २८३ अतिक्रमणे आहेत सक्षम अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर १४७ अतिक्रमणे पात्र ठरविली आहेत. त्यामुळे एकूण २८३ अतिक्रमणे यावर नालासोपारा विभागाने कारवाई केली नाही. यावरून मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन झाले नसल्याचे दिसून आले.

७) महाराष्ट्र शासन निर्णय गृह विभाग क्र. उच्चस्त २०१०/प्र.क्रमांक ६५/झापसू-१ दिनांक ०२/१०/२०१० अन्वये शासकीय/निमशासकीय जमिनीवरील अतिक्रमणाचे धोरण ठरविणेसाठी राज्यातील सर्व मोकळ्या जागा, भूखंड मैदान, पदपाथ यांचे नियमित भू-लेखा परीक्षण (Land Audit) करण्याची यंत्रणा निर्माण

करून वार्षिक अहवाल शासनास सादर करण्यासाठी उच्च स्तरीय समिती गठीत केली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांचे भू लेखा परीक्षण करुन अहवाल शासनास पाठविल्याची खात्री अहवालाअभावी करता आली नाही.

८) नालासोपारा प्रभाग क्षेत्रात सन २०११-१२ मध्ये तोडलेली/निष्कासित केलेली बांधकामे यांची नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४७९ अन्वये अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासन दूर करण्यासाठी केलेला खर्च संबंधित इसमाकडून वसूल करावयाचा आहे. त्यानुसार सन २०१२-१३ या वर्षामध्ये निष्कासित प्रकरणे किती होती, त्यासाठी वापरलेले मनुष्यबळ व यंत्रसामुग्री चे बिलांची मागणी रक्कम किती होती, त्यापैकी किती रक्कम वसूल केली आहे व किती रक्कम वसूल करावयाची बाकी आहे, याबाबतची खातरजमा संबधित नोंदवह्याअभावी लेखा परीक्षणात करता आली नाही.

९) नालासोपारा प्रभागाकडील तक्रार नोंदवही, व MRTP गुन्हे दाखल नोंदवही इत्यादी नोंदवह्या लेखा परीक्षणास उपलब्ध झाल्या. तथापि सदरच्या नोंदवह्यातील पृष्ठांना महापालिका शिक्का ठसविलेला नसून पृष्ठ क्रमांक टाकून नोंदवह्या सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या नाहीत. सदर नोंदवह्यातील नोंदलेल्या नोंदीबाबत संबंधित लिपिक, कनिष्ठ अभियंता, प्रभाग अधिकारी यांनी एकाही नोंदी समोर ती नोंद केल्याची, तपासल्याची, बरोबर असल्याची, कारवाई केल्याबाबत स्वाक्षरी करून संबंधित नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत. त्यामुळे त्या त्या नोंदवहीत नोंदलेल्या संबंधित सर्व नोंदी अचूक व बरोबर असल्याचे लेखा परीक्षणात मानता येत नाही. तसेच वर्ष २०१२-१३ च्या तक्रार नोंदवहीस अनधिकृत बांधकामाच्या एकूण १२१४ तक्रार अर्ज नोंदले आहेत. मासिक अहवाल माहे मार्च २०१३ अखेर ३८१ अनधिकृत बांधकाम प्रकरणांवर निष्कासनाची कारवाई केली आहे. एकूण ७९७ अनधिकृत बांधकामावर नोटीसा बजावल्या आहेत पैकी ३८१ अनधिकृत बांधकामे यावर कारवाई करणे प्रलंबित असताना वर्ष २०१२-१३ मध्ये २३० अनधिकृत बांधकामावर MRTP अंतर्गत गुन्हे दाखल केले असल्याचे नोंदवहीवरून दिसते. तरी उर्वरित बांधकामावर MRTP अंतर्गत गुन्हे दाखल केले नाहीत. तसेच याबाबतची मासिक अहवालातील आकडेवारी व वेगवेगळ्या नोंदवहीस नोंदलेल्या नोंदी याचा ताळमेळ जुळत नाही.

१०) लेखा परीक्षणात नस्तीमधील उपायुक्त यांचे स्वाक्षरीत विवरणपत्रानुसार वर्ष २०१२-१३ मध्ये अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे दूर करण्यासाठी झालेला खर्च रक्कम रु. ९,५६,१५०/- इतक्या रक्कमेची वसुली करणे प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे.

११) प्रभाग कार्यालयात प्राप्त झालेल्या सर्वच प्रकरणाची नोंद तक्रार व कारवाई नोंदवहीत होणे आवश्यक आहे. बीट निरीक्षकांचे अहवाल लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाहीत. संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी अनधिकृत बांधकामाची पाहणी करून तसे अहवाल सादर केले नाहीत किंवा तक्रार नोंदवहीत स्वतःच्या स्वाक्षरीने तसा अहवाल/अभिप्राय नोंदविले नाहीत. प्रभाग अधिकारी यांनी संबंधित अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत कोणते अभिप्राय दिले, व कोणती अंतिम कारवाई केली हे नमूद करून स्वतः स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे प्रभागाचे अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे कामकाजाचे लेखे एकंदरीत विस्कळीतपणे ठेवले असून विहित कार्यपद्धतीनुसार ठेवले नाहीत असे लेखा परीक्षणात आढळून आले आहे.

119 ब प्रभाग अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :अनधिकृत बांधकाम तोडण मनपा निधी निधी
अनियमितता कलम : 9ड

अनधिकृत बांधकाम नियंत्रणाचे संदर्भातील अभिलेखे, तक्रार नोंदवही, सुनावणी नोंदवही, निष्कासन खर्च मागणी व वसुली नोंदवही इत्यादी अभिलेखे व महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांचे भू लेखा परीक्षण झाल्याबाबतचा अहवाल लेखा परीक्षणास उपलब्ध झाला नाही. अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे कामकाजाचे लेखे एकंदरीत विस्कळीतपणे ठेवले आहेत.

पेल्हार प्रभागाकडील अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या त्रुटी/अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. ६५ दिनांक ०७/०८/२०१४ अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबत विभागाने सादर केलेले अभिलेखे तपासून लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) महानगरपालिकेच्या पेल्हार प्रभागाचे वर्ष २०१२-१३ या वित्तीय वर्षाचे अनधिकृत बांधकाम अतिक्रमण विभागाचे लेखा परीक्षणात विभागाकडे अनधिकृत बांधकाम नियंत्रणाचे संदर्भातील अभिलेखे सुनावणी नोंदवही, निष्कासन खर्च मागणी व वसुली नोंदवही उपलब्ध झाली नाही त्यामुळे वित्तीय वर्ष २०१२-१३ अखेर एकूण किती रक्कमेची वसुली होणे प्रलंबित आहे याची खात्री लेखा परीक्षणात करता आली नाही.

२) शासन निर्णय गृह विभाग क्र. उच्चस्त २०१०/प्र.क्रमांक ६५/झापसू-१ दिनांक ०२/१०/२०१० अन्वये शासकीय/निमशासकीय जमिनीवरील अतिक्रमणाचे धोरण ठरविणेसाठी राज्यातील सर्व मोकळ्या जागा, भूखंड मैदान, पदपाथ यांचे नियमित भू-लेखा परीक्षण (Land Audit) करण्याची यंत्रणा निर्माण करून वार्षिक अहवाल शासनास सादर करण्यासाठी उच्च स्तरीय समिती गठीत केली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांचे भू लेखा परीक्षणाचा अहवाल लेखा परीक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांचे भू लेखा परीक्षण करुन अहवाल शासनास पाठविल्याची अहवालाअभावी खात्री करता आली नाही.

३) प्रभाग कार्यालयात प्राप्त झालेल्या सर्वच प्रकरणाची नोंद तक्रार व कारवाई नोंदवहीत होणे आवश्यक आहे. बीट निरीक्षकांचे अहवाल लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाहीत. संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी अनधिकृत बांधकामाची पाहणी करून तसे तक्रार नोंदवहीत स्वतःच्या स्वाक्षरीने नोंदविले नाहीत. प्रभाग अधिकारी यांनी संबंधित अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत कोणते अभिप्राय

दिले, व कोणती अंतिम कारवाई केली हे नोंदवहीत नमूद करून स्वतः स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे प्रभागाचे अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे कामकाजाचे लेखे एकंदरीत विस्कळीतपणे ठेवले असून विहित कार्यपद्धतीनुसार ठेवले नाहीत.

DGPVTTM7001 (Ref No : 62, Hmm No : 65)

120 ई प्रभाग अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :अनधिकृत बांधकाम तोडण मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 551200.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 551200.00/-

अनधिकृत बांधकाम नियंत्रणाचे संदर्भातील अभिलेखे, तक्रार नोंदवही, MRTP नोंदवही, निष्कासन खर्च मागणी व वसुली नोंदवही व महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांचे भू लेखा परीक्षण झाल्याबाबतचा अहवाल इत्यादी अभिलेखे मुंबई लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार अर्धसमास पत्राद्वारे मागणी केले असता सदरचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे अनधिकृत बांधकामा संदर्भात केलेली कार्यवाही निष्कासित बांधकाम खर्चाची मागणी व वसुली याची तपासणी करता आली नाही. वसई विभागाने एकूण ४४२ अतिक्रमणे यावर कारवाई केली नसल्याने मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन केले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४७९ अन्वये अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे दूर करण्यासाठी केलेला खर्च संबंधित इसमाकडून वसूल करावयाचा आहे. तथापि लेखा परीक्षणात नस्तीतील उपायुक्त यांचे स्वाक्षरीत विवरणपत्रानुसार वर्ष २०१२-१३ मध्ये अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे दूर करण्यासाठी झालेला खर्च रक्कम रु. ५,५१,२००/- इतक्या रक्कमेची वसुली करणे प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे.

वसई ई प्रभागाकडील अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या त्रुटी/अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. ६६ दिनांक ०७/०८/२०१४ अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नसल्याने लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) महानगरपालिकेच्या वसई प्रभाग वर्ष २०१२-१३ या वित्तीय वर्षाचे अनधिकृत बांधकाम अतिक्रमण विभागाचे लेखा परीक्षणात विभागाकडील अनधिकृत बांधकाम नियंत्रणाचे संदर्भातील अभिलेखे तक्रार नोंदवही, MRTP नोंदवही, निष्कासन खर्च मागणी व वसुली नोंदवही इत्यादी अभिलेखे उपरोक्त अर्धसमास पत्राद्वारे मुंबई लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार लेखा परीक्षणास सादर करणे बंधनकारक असतांना अर्धसमास पत्र क्र. ६६ दिनांक ०७/०८/२०१४ अन्वये मागणी करून लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे अनधिकृत बांधकामा संदर्भात केलेली कार्यवाही निष्कासित बांधकाम खर्चाची मागणी व वसुली याची तपासणी करता आली नाही.

२) वसई ई प्रभाग क्षेत्रात अतिक्रमण असलेल्या जमिनींचा तपशिल याबाबतची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. खालील प्रकारच्या आरक्षित भूखंडावर झालेले अतिक्रमण याबाबतची सद्यस्थिती लेखा परीक्षणास अवगत झाली नाही.

अ) सरकारी जागांवरील असलेली अतिक्रमण संख्या

ब) वन विभागाचे जागांवरील असलेली अतिक्रमण संख्या

क) महापालिका आरक्षित भूखंड संख्या

ड) महापालिका आरक्षित भूखंडावरील असलेली अतिक्रमण संख्या

इ) सार्वजनिक ठिकाणे/जागांवरील अतिक्रमण संख्या.

३) महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र.उच्चस्त २०१०/प्र.क्रमांक ६५/झापसू-१ दिनांक ०२/१०/२०१० अन्वये अनधिकृत बांधकामाचे संदर्भात विभागात प्रभाग स्तरावर बीट निहाय नोंदवही ठेवायची आहे. बीट निरीक्षक /मुकादम यांनी त्या नोंदवहीत त्यांच्या बीटमधील अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम इ. नागरी गुन्ह्याशी सबंधित घटनांची नोंद घ्यायची आहे. व तसे न केल्यास बीट निरीक्षकास/सबंधित कर्मचाऱ्यास जबाबदार धरावयाचे आहे. प्रभाग कार्यालयाने अनधिकृत बांधकामे निष्कासन कार्यवाहीचा दैनंदिन अहवाल मुख्यालयाकडे सादर करावयाचा आहे. व मुख्यालयात एकत्रित नोंदवही ठेवून त्यात आतापर्यंत असलेल्या किती बांधकामावर कारवाई (हटविली) केली त्याची नोंद घ्यावयाची आहे. मुख्यालय स्तरावर तक्रार आल्यावर आवक नोंदवहीत नोंद घेऊन, प्रभागाकडे तक्रार पाठविली म्हणून जावक नोंदवहीत नोंद घ्यायची आहे. परतू मुख्यालयात/प्रभाग क्षेत्रात अशी नोंदवही ठेवली नसल्याने हद्दीत एकूण किती अनधिकृत बांधकामे झाली व किती बांधकामे कारवाई करून हटविली व अशा हटविलेल्या बांधकामांवर झालेल्या निष्कासन खर्चाचा, वसुलीचा मेळ विभागाने नोंदवही ठेवली नसल्याने घेता आला नाही.

४) अनधिकृत बांधकामे /अतिक्रमण यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी अनधिकृत बांधकामे /अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन पथक व महापालिकेच्या नगर रचना विभागात समन्वयाची आवश्यकता असल्याने, याबाबत आवश्यक ती उपाययोजना करावयाची आहे. नगररचना विभागाने बांधकाम परवानगी दिल्यानंतर त्याची माहिती प्रभाग अधिकाऱ्यांना/ बीट कर्मचाऱ्यांना त्वरित देणेची आहे. परंतु अशी कार्यवाही झाल्याचे सन २०१२-२०१३ या वर्षात आढळून आले नाही. त्यामुळे विभागाचे

अधिकारी/कर्मचारी यांना अधिकृत व अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण/देखरेख ठेवण्यास सहकार्य झाले नाही.

५) अनधिकृत बांधकामे /अतिक्रमण यांवर विहित मुदतीत नोटीस न दिल्यास व त्यापुढील कारवाई न केल्यास संबंधित क्षेत्रातील/प्रभागातील संबधित अधिकारी / कर्मचारी यांना जबाबदार धरून त्यांचे विरुद्ध कारवाई करावयाची आहे. त्यानुसार मुदतीत नोटीस न दिलेली व त्यापुढील केलेल्या कारवाईची प्रकरणे लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे निष्कासनावर झालेल्या खर्चाचा मेळ घेता आला नाही. तसेच शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रभागातील बीट निरीक्षक, कर्मचारी/अधिकारी यांचेवर केलेली कारवाई लेखा परीक्षणास अवगत झाली नाही.

६) ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमणाचे संदर्भात जनहित याचिका कमांक १३५ व १३६/२००७ मध्ये उच्च न्यायालयात दिनांक १०.०६.२०१० रोजी सुनावणी झाली. त्यांत सार्वजनिक जागेवरील बांधकामे/ अतिक्रमण निष्कासित करण्याची शासनाची भूमिका असून उच्च न्यायालयाने दिनांक ३१/१२/२०१० पर्यंत अतिक्रमणे हटविण्यात यावी असे अपेक्षिले त्या अनुषंगाने मुख्य सचिवांना शपथपत्र सादर करण्याच्या सूचना दिल्या. दिनांक ३१/१२/२०१० ही शेवटची मुदत असल्याने जे अधिकारी उपरोक्त वेळापत्रकाचे पालन करणार नाहीत त्यांचे विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल व फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील असे आदेश दिले होते. लेखा परीक्षणास प्राप्त नस्तीतील विवरणपत्रानुसार वसई ई प्रभागात माहे मार्च २०१३ अखेर शासकीय जमिनीवर एकूण ५१७ अतिक्रमणे असून सन १९९५ पूर्वीची ३६८, दिनांक १/१/१९९५ ते ३१ डिसेंबर २००० पर्यंतची ७२ व दिनांक ०१/०१/२००१ नंतरची ७७ अतिक्रमणे आहेत. एकूण ७५ अनधिकृत बांधकामावर निष्कासित कारवाई केली आहे. परंतु एकूण ४४२ अतिक्रमणे यावर वसई अतिक्रमण विभागाने कारवाई केली नसल्याने मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन झालेले नसल्याचे दिसून आले आहे.

७) महाराष्ट्र शासन निर्णय गृह विभाग क्र. उच्चस्त २०१०/प्र.क्रमांक ६५/झापसू-१ दिनांक ०२/१०/२०१० अन्वये शासकीय/निमशासकीय जमिनीवरील अतिक्रमणाचे धोरण ठरविणेसाठी राज्यातील सर्व मोकळ्या जागा, भूखंड मैदान, पदपाथ यांचे नियमित भू-लेखा परीक्षण (Land Audit) करण्याची यंत्रणा निर्माण करून वार्षिक अहवाल शासनास सादर करण्यासाठी उच्च स्तरीय समिती गठीत केली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांचे भू लेखा परीक्षण करुन अहवाल शासनास पाठविल्याची खात्री अहवालाअभावी करता आली नाही.

८) वसई ई प्रभाग क्षेत्रात सन २०१२-२०१३ मध्ये तोडलेली/निष्कासित केलेली बांधकामे यांची नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध झाली सदर नोंदवहीनुसार वर्ष २०१२-२०१३ मधील एकूण १८ अनधिकृत बांधकाम प्रकरणे आढळून आली. माहे मार्च २०१३ अखेरच्या मासिक अहवालानुसार एकूण २४९ अनधिकृत बांधकामे असून ९७ बांधकामे निष्कासित केली आहेत. तर १५२ अनधिकृत बांधकामे निष्कासित करावयाची शिल्लक आहेत. महानगरपालिका फंडातून निष्कासित केलेल्या ९७ बांधकामे तोडण्याचा/निष्कासित करण्याचा खर्च महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४७९ अन्वये अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे केलेल्या संबंधित इसमाकडून वसूल करावयाचा आहे. निष्कासन कारवाईसाठी वापरलेले मनुष्यबळ, पोलीस व यंत्रसामुग्री चा तपशिल निष्कासित बांधकामे नोंदवहीअभावी प्राप्त झाला नाही. त्यामुळे निष्कासनावर एकूण किती खर्च झाला याची खात्री करता आली नाही.

९) वसई ई प्रभागाकडील तक्रार नोंदवही, व MRTP गुन्हे दाखल नोंदवही इत्यादी नोंदवह्या लेखा परीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत. तथापि निष्कासन नोंदवही प्राप्त झाली सदर नोंदवह्यातील पृष्ठांना महापालिका शिक्का ठसविलेला नसून पृष्ठ क्रमांक टाकून नोंदवह्या प्रभाग अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त (प्रभारी) यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत. सदर नोंदवह्यातील नोंदलेल्या नोंदीबाबत संबंधित लिपिक, कनिष्ठ अभियंता, प्रभाग अधिकारी यांनी एकाही नोंदी समोर ती नोंद केल्याची, तपासल्याची, बरोबर असल्याची, कारवाई केल्याबाबत स्वाक्षरी करून संबंधित नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत. त्यामुळे नोंदवहीत नोंदलेल्या संबंधित नोंदी अचूक व बरोबर असल्याचे लेखा परीक्षणात खात्री मानता येत नाही. तसेच वर्ष २०१२-१३ च्या तक्रार नोंदवहीच्या अनुपलब्धतेमुळे अनधिकृत बांधकामाच्या एकूण किती तक्रारी प्राप्त झाल्या याची खात्री करता आली नाही. व माहे मार्च २०१३ अखेर एकूण २४९ पैकी वर्ष २०१२-१३ अखेर ९७ अनधिकृत बांधकाम प्रकरणांवर निष्कासनाची कारवाई केली आहे. एकूण २४९ अनधिकृत बांधकामावर नोटीसा बजावल्या आहेत पैकी १५२ अनधिकृत बांधकामे यावर कारवाई करणे प्रलंबित असताना वर्ष २०१२-१३ मध्ये केवळ १८ अनधिकृत बांधकामावर MRTP गुन्हे दाखल केल्याचे लेखा परीक्षणास सादर केलेल्या विवरणपत्रावरून दिसून आले आहे. उर्वरित बांधकामावर MRTP अंतर्गत गुन्हे दाखल केले नाहीत. याबाबतच्या वेगवेगळ्या नोंदवहीस नोंदलेल्या नोंदी याचा मेळ अहवालातील आकडेवारीशी जुळत नाही.

१०) लेखा परीक्षणात नस्तीमधील उपायुक्त यांचे स्वाक्षरीत विवरणपत्रानुसार वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे दूर करण्यासाठी झालेला खर्च रक्कम रु. ५,५१,२००/- इतक्या रक्कमेची वसुली करणे प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे.

११) प्रभाग कार्यालयात प्राप्त झालेल्या सर्वच प्रकरणाची नोंद तक्रार व कारवाई नोंदवहीत होणे आवश्यक आहे. बीट निरीक्षकांचे अहवाल लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाहीत. संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी अनधिकृत बांधकामाची पाहणी करून तसे तक्रार नोंदवहीत स्वतःच्या स्वाक्षरीने नोंदविले नाहीत. प्रभाग अधिकारी यांनी संबंधित अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत कोणते अभिप्राय दिले, व कोणती अंतिम कारवाई केली हे नोंदवहीत नमूद करून स्वतः स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे प्रभागाचे अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे कामकाजाचे लेखे एकंदरीत विस्कळीतपणे ठेवले असून महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र.उच्चस्त २०१०/प्र.क्रमांक ६५/झापसू-१ दिनांक ०२/१०/२०१० मध्ये नमूद केल्यानुसार विहित कार्यपद्धतीनुसार लेखे ठेवले नाहीत. त्यामुळे अनधिकृत बांधकामा संदर्भात केलेली कार्यवाही निष्कासित बांधकाम खर्चाची मागणी व वसुली याची तपासणी करता आली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 63, Hmm No : 66)

121 अ प्रभाग अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष :अनधिकृत बांधकाम तोडण मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 2294880.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 2294880.00/-

अ प्रभागाचे अनधिकृत बांधकाम नियंत्रणाचे संदर्भातील अभिलेखे, सुनावणी नोंदवही, निष्कासन खर्च मागणी, वसुली नोंदवही व महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांचे भू लेखा परीक्षण झाल्याबाबतचा अहवाल इत्यादी अभिलेखे मुंबई लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार अर्धसमास पत्राद्वारे मागणी केले असता सदरचे अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नसल्याने अनधिकृत बांधकामासंदर्भात केलेली कार्यवाही निष्कासित बांधकाम खर्चाची मागणी व वसुली याची तपासणी करता आली नाही. बोळींज विभागाने एकूण ११५ अतिक्रमणे यावर कारवाई केली नसल्याने मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन केले नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४७९ अन्वये अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे दूर करण्यासाठी केलेला खर्च संबंधित इसमाकडून वसूल करावयाचा आहे. तथापि लेखा परीक्षणात प्राप्त झालेल्या उपायुक्त यांचे विवरणपत्रानुसार वर्ष २०१२-१३ मध्ये अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे दूर करण्यासाठी झालेला खर्च रक्कम रु. २२,९४,८८०/- इतक्या रक्कमेची वसुली केली नाही.

बोळींज अ प्रभागाकडील अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. ७८ दिनांक १९/०८/२०१४ अन्वये विचारणा केली असता विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नसल्याने लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) महानगरपालिकेच्या बोळींज अ प्रभाग वर्ष २०१२-१३ या वित्तीय वर्षाचे अनधिकृत बांधकाम अतिक्रमण विभागाचे लेखा परीक्षणात विभागाकडे अनधिकृत बांधकाम नियंत्रणाचे संदर्भातील अभिलेखे सुनावणी नोंदवही, निष्कासन खर्च मागणी व वसुली नोंदवही इत्यादी अभिलेखे मुंबई लेखा परीक्षा अधिनियम १९३० चे कलम ६ नुसार लेखा परीक्षणास अभिलेखे सादर करणे बंधनकारक आहे असे असताना अर्धसमास पत्र क्र. ७८ दिनांक १९/०८/२०१४ अन्वये मागणी करूनही अभिलेखे लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे अनधिकृत बांधकामासंदर्भात केलेली कार्यवाही निष्कासित बांधकाम खर्चाची मागणी व वसुली याची तपासणी करता आली नाही.

२) बोळींज अ प्रभाग क्षेत्रात अतिक्रमण झालेल्या जमिनींचा तपशिल याबाबतची माहिती लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. खालील प्रकारच्या आरक्षित भूखंडावर झालेले अतिक्रमण याबाबतची सद्यस्थिती लेखा परीक्षणास अवगत झाली नाही.

अ) सरकारी जागांवरील असलेली अतिक्रमण संख्या

ब) वन विभागाचे जागांवरील असलेली अतिक्रमण संख्या

क) महापालिका आरक्षित भूखंड संख्या

ड) महापालिका आरक्षित भूखंडावरील असलेली अतिक्रमण संख्या

इ) सार्वजनिक ठिकाणे/जागांवरील अतिक्रमण संख्या.

३) महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र.उच्चस्त २०१०/प्र.क्रमांक ६५/झापसू-१ दिनांक ०२/१०/२०१० अन्वये अनधिकृत बांधकामाचे संदर्भात विभागात प्रभाग स्तरावर बीट निहाय नोंदवही

ठेवायची आहे. बीट निरीक्षक /मुकादम यांनी त्या नोंदवहीत त्यांच्या बीटमधील अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम इ. नागरी गुन्ह्याशी सबंधित घटनांची नोंद घ्यायची आहे. व तसे न केल्यास बीट निरीक्षकास/सबंधित कर्मचाऱ्यास जबाबदार धरावयाचे आहे. प्रभाग कार्यालयाने अनधिकृत बांधकामे निष्कासन कार्यवाहीचा दैनंदिन अहवाल मुख्यालयाकडे सादर करावयाचा आहे. व मुख्यालयात एकत्रित नोंदवही ठेवून त्यात आतापर्यंत असलेल्या किती बांधकामावर कारवाई (हटविली) केली त्याची नोंद घ्यावयाची आहे. मुख्यालय स्तरावर तक्रार आल्यावर आवक नोंदवहीत नोंद घेऊन, प्रभागाकडे तक्रार पाठविली म्हणून जावक नोंदवहीत नोंद घ्यायची आहे. परतू मुख्यालयात/प्रभाग क्षेत्रात अशी नोंदवही ठेवली नसल्याने हद्दीत एकूण किती अनधिकृत बांधकामे झाली व किती बांधकामे कारवाई करून हटविली व अशा हटविलेल्या बांधकामांवर झालेल्या खर्चाचा व वसुलीचा मेळ विभागाने नोंदवही ठेवली नसल्याने घेता आला नाही.

४) अनधिकृत बांधकामे /अतिक्रमण यांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी अनधिकृत बांधकामे /अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन पथक व महानगरपालिकेच्या नगर रचना विभागात समन्वयाची आवश्यकता असल्याने, याबाबत आवश्यक ती उपाययोजना करावयाची आहे. नगर रचना विभागाने बांधकाम परवानगी दिल्यानंतर त्याची माहिती प्रभाग अधिकाऱ्यांना/ बीट कर्मचाऱ्यांना त्वरित देणेची आहे परंतु अशी कार्यवाही झाल्याचे सन २०१२-२०१३ या वर्षात झाल्याचे लेखा परीक्षणास आढळून आले नाही. त्यामुळे विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांना अधिकृत व अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण/देखरेख ठेवण्यास सहकार्य झाले नाही.

५) अनधिकृत बांधकामे /अतिक्रमण यांवर विहित मुदतीत नोटीस न दिल्यास व त्यापुढील कारवाई न केल्यास संबंधित क्षेत्रातील/प्रभागातील संबधित अधिकारी / कर्मचारी यांना जबाबदार धरून त्यांचेविरुद्ध कारवाई करावयाची आहे. त्यानुसार मुदतीत नोटीस न दिलेली व त्यापुढील केलेल्या कारवाईची प्रकरणे लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे निष्कासनावर झालेल्या खर्चाचा मेळ घेता आला नाही. तसेच शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रभागातील बीट निरीक्षक, कर्मचारी/अधिकारी यांचेवर केलेली कारवाई लेखा परीक्षणास अवगत झाली नाही.

६) ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमणाचे संदर्भात जनहित याचिका कमांक १३५ व १३६/२००७ मध्ये उच्च न्यायालयात दिनांक १०.०६.२०१० रोजी सुनावणी झाली. त्यांत सार्वजनिक जागेवरील बांधकामे/ अतिक्रमण निष्कासित करण्याची शासनाची भूमिका असून उच्च न्यायालयाने दिनांक ३१/१२/२०१० पर्यंत अतिक्रमणे हटविण्यात यावी असे अपेक्षिले त्या अनुषंगाने मुख्य सचिवांना शपथपत्र सादर करण्याच्या सूचना दिल्या. दिनांक ३१/१२/२०१० हि शेवटची मुदत असल्याने जे अधिकारी उपरोक्त वेळापत्रकाचे पालन करणार नाहीत त्यांचे विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल व फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील असे आदेश दिले होते. लेखा परीक्षणास प्राप्त नस्तीतील विवरणपत्रानुसार बोळींज ई प्रभागात माहे मार्च २०१३ अखेर शासकीय जमिनीवर एकूण ४७३ अतिक्रमणे असून सन १९९५ पूर्वीची ३०८, दिनांक १/१/१९९५ ते ३१ डिसेंबर २००० पर्यंतची ५० व दिनांक ०१/०१/२००१ नंतरची ११५ अतिक्रमणे आहेत सक्षम अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर ३५८ अतिक्रमणे पात्र ठरविली आहेत. एकूण ११५ अतिक्रमणे यावर बोळींज अतिक्रमण विभागाने कारवाई केली नसल्याने मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन झालेले नसल्याचे दिसून आले आहे.

७) शासन निर्णय गृह विभाग क्र. उच्चस्त २०१०/प्र.क्रमांक ६५/झापसू-१ दिनांक ०२/१०/२०१० अन्वये

शासकीय/निमशासकीय जमिनीवरील अतिक्रमणाचे धोरण ठरविणेसाठी राज्यातील सर्व मोकळ्या जागा, भूखंड मैदान, पदपाथ यांचे नियमित भू-लेखा परीक्षण (Land Audit) करण्याची यंत्रणा निर्माण करून वार्षिक अहवाल शासनास सादर करण्यासाठी उच्च स्तरीय समिती गठीत केली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या जागांचे भू लेखा परीक्षण करुन अहवाल शासनास पाठविल्याची खात्री अहवालाअभावी करता आली नाही.

८) नवघर-माणिकपूर ड प्रभाग क्षेत्रात सन २०१२-२०१३ मध्ये तोडलेली/निष्कासित केलेली बांधकामे यांची नोंदवही लेखा परीक्षणास उपलब्ध झाली नाही. माहे मार्च २०१३ अखेरच्या मासिक अहवालानुसार एकूण ३७४ अनधिकृत बांधकामे असून ५० बांधकामे निष्कासित केली आहेत. तर ३२४ अनधिकृत बांधकामे निष्कासित करावयाची शिल्लक आहेत. निष्कासित केलेली ५० बांधकामे तोडण्याचा/निष्कासित करण्याचा खर्च महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ४७९ अन्वये अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे केलेल्या संबंधित इसमाकडून वसूल करावयाचा आहे. निष्कासन कारवाईसाठी वापरलेले मनुष्यबळ, पोलीस व यंत्रसामुग्री चा तपशिल निष्कासित बांधकामे नोंदवहीत नोंदला नसून निष्कासित केलेल्या बांधकामावरील खर्चाची/बिलांची मागणी करून खर्च रक्कम वसुली केली नाही. ९) बोळींज अ प्रभागाकडील तक्रार नोंदवही, व MRTP गुन्हे दाखल नोंदवही इत्यादी नोंदवह्या लेखा परीक्षणास उपलब्ध झाल्या. तथापि सदरच्या नोंदवह्यातील पृष्ठांना महापालिका शिक्का ठसविलेला नसून पृष्ठ क्रमांक टाकून नोंदवह्या सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या नाहीत. सदर नोंदवह्यातील नोंदलेल्या नोंदीबाबत संबंधित लिपिक, कनिष्ठ अभियंता, प्रभाग अधिकारी यांनी एकाही नोंदी समोर ती नोंद केल्याची, तपासल्याची, बरोबर असल्याची, कारवाई केल्याबाबत स्वाक्षरी करून संबंधित नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत. त्यामुळे त्या त्या नोंदवहीत नोंदलेल्या संबंधित नोंदी अचूक व बरोबर असल्याचे लेखा परीक्षणात खात्री करता येत नाही. तसेच वर्ष २०१२-१३ च्या तक्रार नोंदवहीस अनधिकृत बांधकामाच्या एकूण २५५ तक्रारी नोंदल्या आहेत. व माहे मार्च २०१३ अखेर एकूण ३७४ पैकी वर्ष २०१२-१३ अखेर ५० अनधिकृत बांधकाम प्रकरणांवर निष्कासनाची कारवाई केली आहे. एकूण ३७४ अनधिकृत बांधकामावर नोटीसा बजावल्या आहेत पैकी ३२४ अनधिकृत बांधकामे यावर निष्कासन कारवाई करणे प्रलंबित असताना वर्ष २०१२-१३ अखेर केवळ १५ अनधिकृत बांधकामावर MRTP गुन्हे दाखल केले आहेत. तरी उर्वरित बांधकामावर MRTP अंतर्गत गुन्हे दाखल केले नाहीत. याबाबतच्या वेगवेगळ्या नोंदवहीस नोंदलेल्या नोंदी याचा मेळ अहवालातील आकडेवारीशी जुळत नाही.

१०) तथापि उपायुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांचे विवरणपत्रानुसार अ प्रभागांतर्गत वर्ष २०१२-१३ ची एकूण निष्कासित केलेल्या बांधकामावरील झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मागणी रक्कम रु. २२,९४,८८०/- ची वसुली करणे आवश्यक आहे.

११) प्रभाग कार्यालयात प्राप्त झालेल्या सर्वच प्रकरणाची नोंद तक्रार व कारवाई नोंदवहीत होणे आवश्यक आहे. बीट निरीक्षकांचे अहवाल लेखा परीक्षणास प्राप्त झाले नाहीत. संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी अनधिकृत बांधकामाची पाहणी करून तसे तक्रार नोंदवहीत स्वतःच्या स्वाक्षरीने नोंदविले नाहीत. प्रभाग अधिकारी यांनी संबंधित अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत कोणते अभिप्राय दिले, व कोणती अंतिम कारवाई केली हे नोंदवहीत नमूद करून स्वतः स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे प्रभागाचे अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम विभागाचे कामकाजाचे लेखे एकंदरीत विस्कळीतपणे ठेवले असून महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र.उच्चस्त २०१०/प्र.क्रमांक ६५/झापसू-१ दिनांक

०२/१०/२०१० मध्ये नमूद केल्यानुसार विहित कार्यपद्धतीनुसार लेखे ठेवले नाही. त्यामुळे अनधिकृत बांधकामा संदर्भात केलेली कार्यवाही निष्कासित बांधकाम खर्चाची मागणी व वसुली याची तपासणी करता आली नाही.

DGPVTTM7001 (Ref No : 64, Hmm No : 78)

122 परिवहन ठेक्यातील अनियमितता

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : परिवहन सेवा शुल्क मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

वसूलपात्र रक्कम रु. 499600.00/-

परिवहन उपक्रमाच्या ठेक्यातुन संबधीत ठेकेदार मे. भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि. यांना पुढील १० वर्षात मागील ३ वर्षात प्राप्त झालेल्या जमा रकमेवरुन अंदाजे रु. ४५० कोटी अपेक्षित उत्पन्न मिळणार असताना सदर परिवहन ठेक्याचा करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्क रु.५,००,०००/- वापरण्याऐवजी करारनामा रक्कम रु. ५००/- च्या मुद्रांक पेपरवर केल्याने सदर ठेक्यात मुद्रांक शुल्क रु.४,९९,५००/- कमी वापरले आहे. बँक गॅरंटी करारनामा हा विहित रक्कमेच्या मुद्रांक शुल्क पेपरवर केलेला नाही. ठेकेदार मे. भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि. यांनी वेळोवेळी महानगरपालिकेस परिवहन उपक्रमात किती बस चालू केल्या याबाबत संबंधित नवीन बसचे रूट, क्रमांकासह कळविले नाही. विलंबाने भरणा केलेल्या रॉयल्टीच्या दंडात्मक रकमेची वसुली केली नाही.

महाराष्ट्र शासन गृह विभाग पत्र क्रमांक एमव्हीआर ०३११/प्र.क्र.७०/परि-२ दिनांक ०५ जुलै २०११ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमासाठी खाजगीकरणातून परिवहन सेवा सुरु करण्यास काही अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेकरिता PPP तत्वावर मागविलेल्या दिनांक २७/०७/२०१३ च्या निविदेस अनुसरून एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. निविदा फॉर्म फी रु.१०००/- अधिक रु. ५००/- व्हॅट कर संबंधित तिन्ही निविदाधारकांकडून वसुली केली आहे. प्राप्त निविदाधारकांपैकी मे. भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि. यांची उच्चतम रॉयल्टी दर रु.१०००/- प्रति बस प्रति वर्ष मंजूर करून त्यांना आदेश क्रमांक वाविशम/परिवहन/५९४/२०१२ दिनांक ०९/०९/२०१२ अन्वये कार्यादेश दिला आहे. स्थायी समितीने ठराव क्र.४३० दिनांक ०३/०८/२०१२ अन्वये संविदा करणेस मंजुरी दिली आहे. मे. भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि. यांचेसोबत रक्कम रु.५००/- च्या मुद्रांक पेपरवर दिनांक ०८/०८/२०१२ रोजी १० वर्षेसाठी करारनामा केला आहे. व सदरचा परिवहन सेवा उपक्रम दिनांक ०३/१०/२०१२ पासून सुरु केला आहे. लेखा परीक्षणात आढळून आलेल्या अनियमितताबाबत अर्धसमास पत्र क्र. ७० दिनांक ११/०८/२०१४ अन्वये विचारणा केली असता

विभागाने याबाबत काहीही खुलासा केला नसल्याने लेखा परीक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

१) सदर उपक्रम BOOM (PPP) तत्वावर असून सुरुवातीस ५० बसेस व पुढील ३ वर्षात ४०० बसेस कार्यान्वित करणेचे आहे. पावती क्रमांक १२८६४० दिनांक २९/१०/२०१३ अन्वये रु.८४,६५५/- रॉयल्टी भरणा ८६ बसची केली आहे. परिवहन उपक्रम चालू झाल्यापासून म्हणजे ऑक्टोबर २०१२ ते डिसेंबर २०१३ या १५ महिने कालावधीचे परिवहन उपक्रमाचे जमा प्रवासी भाडे उत्पन्न रक्कम रु.२८,२४,७४,२५१/- इतके असून त्यानुसार ८६ बसेसची उत्पन्नाची मासिक सरासरी रक्कम रु.१,८८,३१,६१७/- इतकी येत असल्याने ८६ बसेसचे १० वर्षाचे अंदाजित उत्पन्न रक्कम रु.११२,९८,९७,०२०/- येते. तसेच पुढील ३ वर्षात ४०० बसेस परिवहन उपक्रमात सूरु होणार असल्याने साधारणपणे अंदाजे ४५०/- कोटी इतके प्रवासी भाड्यापासून उत्पन्न मिळणार आहे. असे असताना संबंधित ठेकेदार यांचेसोबत १० वर्षासाठी केलेला करारनामा हा रक्कम रु. ५००/- च्या मुद्रांकावर केला आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ६३ ची दुरुस्ती/सुधारणा क्र. १२ दि. ०१/०५/२००६ नुसार विहित केलेल्या दरानुसार मूल्य रक्कम रु. १० लाखाकारीता रु.१००/- व त्यापुढील प्रति १ लक्ष रक्कमेस रु.१००/- व जास्तीत जास्त रु.५,००,०००/- इतक्या रक्कमेचे मुद्रांक शुल्क वापरणेचे आहे. त्यानुसार ठेक्यातून अंदाजे रु. ४५०/- कोटी उत्पन्न जमा होणार आहे. मुद्रांक शुल्क दरानुसार जास्तीत जास्त मुद्रांक शुल्क म्हणजे रक्कम रु.५,००,०००/- हे रक्कम रु. १००,०९,००००००/- इतक्या रक्कमेच्या करारनाम्यासाठी आहे व या करारनाम्यातील ठेक्याद्वारे ठेकेदारास अंदाजे ४५०/- कोटी रक्कम उत्पन्न जाहिरात कराचे उत्पन्न वगळून मिळणार आहे. त्यामुळे रक्कम रु. ५,००,०००/- इतक्या रक्कमेचे मुद्रांक शुल्क वापरून करारनामा करणे आवश्यक असताना रक्कम रु.५००/- चे मुद्रांक शुल्क वापरून करारनामा केल्याने सदर प्रकरणी रु. ४,९९,५००/- कमी रक्कमेचे मुद्रांक शुल्क करारनाम्यासाठी वापरले आहेत. त्यामुळे संबंधित ठेकेदार मे. भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि. यांचेकडून कमी वापरलेले मुदांक शुल्काची रक्कम रु. ४,९९,५००/- ची वसुली करून संबंधित लेखा शिर्षाखाली भरणा करून अनुपालन करावे.

२) सदर ठेक्यासाठी मे. भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि. यांनी रक्कम रु.१०,००,०००/- ची आयसीआय बँकेची परफॉरमन्स गॅरंटी बँकेच्या लेटरहेडवर दिली आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ६३ ची दुरुस्ती/सुधारणा क्र. १२ दि. ०१/०५/२००६ नुसार निविदा विहित दराने मुद्रांक शुल्क भरणे बंधनकारक असताना सदरचा बँक गॅरंटी करारनामा हा विहित रक्कमेच्या मुद्रांक शुल्क पेपरवर केलेला नसल्याने मुदांक शुल्क रक्कम रु. १००/- ची वसुली करून संबंधित लेखा शिर्षाखाली भरणा करून अनुपालन करावे.

३) परिवहन विभागाने निविदा तयार करताना निविदेत रॉयल्टीचा दर प्रति वर्ष प्रति बस असा नमूद केला आहे. म्हणजेच वर्ष २०१२ मध्ये १ बसची रॉयल्टी रु. १०००/- व १० वे वर्ष २०२२ मध्येदेखील १ बसची रॉयल्टी रु. १०००/- मिळणार आहे. वास्तविक पहाता रॉयल्टी ही दरवर्षी भरणा केली जाणार असल्याने व दर वर्षी तिकीट दरात वाढ होऊन उत्पन्न वाढणार असल्याने रॉयल्टीच्या दरात वार्षिक/द्विवार्षिक वाढ करणेबाबत निविदा अटी-शर्ती मध्ये बाब नमूद केली असती तर महापालिकेच्या उत्पन्नात वाढ झाली असती परंतु तसे केले नसल्याने महापालिकेस रॉयल्टीद्वारे १० वर्षात कमी उत्पन्न प्राप्त होणार आहे.

४) ठेकेदार मे. भागिरथी ट्रान्स कॉर्पो.प्रा.लि. यांनी वेळोवेळी महानगरपालिकेस परिवहन उपक्रमात किती बस चालू केल्या याबाबत संबंधित नवीन बसचे रूट, क्रमांकासह कळविलेचे लेखा परीक्षणात आढळून आले नाही. त्यामुळे वसूल केलेली रॉयल्टी बरोबर असल्याची खात्री लेखा परीक्षणात करता आली नाही.

५) निविदेतील स्पेसिफिकेशन ३.८(४) नुसार शहर परिवहन उपक्रमातील बसेसना जीपीएस सिस्टीम बसविण्याचे आहे. त्यानुसार जीपीएस सिस्टीम बसविलेबाबतची तांत्रिक अहवाल लेखा परीक्षणास उपलब्ध न झाल्याने याबाबत निविदेतील स्पेसिफिकेशननुसार कार्यवाही झाल्याची खात्री करता आली नाही.

६) निविदेत ऑपरेटर यांची जबाबदारी निविदेतील स्पेसिफिकेशन ३.११(३) नुसार बसेसचा विमा करारनामा कालावधीपर्यंत काढणेचा असून थर्ड पार्टी रिक्स कव्हरचा त्यांत समावेश असल्याची खात्री महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे तथापि अशी खात्री महानगरपालिकेने आवश्यक त्या कागदपत्रांच्या आधारे केलेली नाही.

७) निविदेतील ९.१(बी) नुसार रॉयल्टी फी उपक्रम सुरु झाल्यापासून ६ महिन्यानंतर भरणा करावयाची आहे. सदरची रक्कम देय झाल्यापासून ३ महिन्यात भरणा न केल्यास वार्षिक ६% दराने दंडनीय व्याजाची आकारणी करणेची आहे. परिवहन उपक्रम दिनांक ०३/१०/२०१२ रोजी सुरु झाला असून ६ महिने दिनांक ०२/०४/२०१३ रोजी पूर्ण होतात व त्यानंतर दिनांक ०२/०७/२०१३ पर्यंत रॉयल्टी फी रक्कमेचा भरणा करणे आवश्यक असताना तो दिनांक २९/१०/२०१३ रोजी उपरोक्त अनुक्रमांक १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे रक्कम रु. ८४,६५५/- भरणा केलेल्या रक्कमेच्या विलंबाबाबत दंडनीय व्याजाची रक्कम वसुली केली नाही. तरी याबाबत परिगणना करून दंडनीय व्याज रक्कम रु. १६४२/- (८४बस x रॉयल्टी १००० X ६% = वार्षिक व्याज ५०४०/३६५ दिवस = १३.८० प्रति दिवस x ११९ दिवस = १६४२) ची वसुली करावी.

८) निविदेत खालीलप्रमाणे पॅरामिटर्स आहेत.

Sr. No.	Parameters	Performance	Penalty for non meeting the Performance Standard
01.	Timeliness of Bus Services	Not more than +/-20 minutes from scheduled time	Rs.50/- for deviation, Rs.50 for non operation of a Bus whole day on particular Rou
02	Adherence to prescribed Route (Except the period of processions, festivals, temporary closing of roads etc.)	No deviations are permitted	Rs.500/- for each instance deviation.
03	Stopping at designated Bus Stops	No deviations are permitted	Rs.100/- for each instance deviation.
04	Sharing of ticket vending machine data	Daily or weekly Basis of as decided by time	Rs.100/- for each delay
05	Cleanliness of Bus	Bi-weekly cleaning of Bus from inside and outside	Rs.50/- for each instance a bus its put on road without cleaning
06	Periodic maintenance of Buses	As recommended by bus manufacturer	Rs.100/- for each day a bu put on road beyond the recommended scheduled

			maintenance
07	Valid fitness certified/ other certificates for operating the Bus on Road	No deviations are permitted	Rs.100/- for each day after 1st instance that a bus driver or a bus conductor is without prescribed uniform in a calendar month.
08	Prescribed uniforms of bus driver and bus conductor	Not more than one deviation in month for each bus	Rs.100/- for each day after 1st instance that a bus driver or a conductor is without prescribed uniform in a calendar month
09	Sharing of data with vasai-virar city municipal corporation	share data on monthly basis	Rs.100/- for delay beyond the time specified.
10		No deviations are permitted	No permitted to operate on the route.

वरीलप्रमाणे पॅरामिटर्स परफॉरमन्स स्टँडर्ड पाळले नाहीत तर निविदेत नमूद केलेल्या दराप्रमाणे ठेकेदाराकडून दंडनीय रक्कमेची वसुली करणेचे आहे. त्यानुसार पॅरामिटर्सप्रमाणे परफॉरमन्स स्टँडर्ड पाळले किंवा नाही याची खात्री महानगरपालिकेच्या वतीने उपायुक्त/अतिरिक्त आयुक्त यांनी केल्याचे आढळून आले नाही. व वरीलप्रमाणे दंड वसुलीचे अभिलेखे लेखा परीक्षणास सादर केले नाहीत.

DGPVTTM7001 (Ref No : 68, Hmm No : 70)

123 पेल्हार प्रभाग कार्यालय (ब) चे कामाबाबत.

प्रभाग कार्यालये

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालये मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

पेल्हार प्रभागाचे भ.नि.नि. चे लेखे ग्रामपंचायत काळापासुन अपूर्ण आहेत. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 मधील नियम क्र. 121 नुसार दावा/ खटला नोंदवही नमुना नं. 90 प्राप्त झाली नाही. जाहिरातीचे शासन मान्य दर उपलब्ध झाले नाहीत. सक्षम प्राधिकाऱ्याने महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधिल नियम

क्र. 62 (2) अन्वये वर्षभरात एकदाही रोख्वहीची शिल्लक पडताळुन पाहिली नाही.

आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र. आस्था/738/2012, दिनांक 17/01/2012 अन्वये महानगरपालिकेच्या 5 प्रभाग समित्यांना लेखा विषयक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार प्रभाग समिती निहायक लेखा विषयक कामकाज पार पाडण्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 84(1) नुसार लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीक यांना प्राधिकृत करण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील तरतुदीनुसार प्रभाग समितीचे संपुर्ण लेखा विषयक कामकाज प्रभाग समिती मार्फत पार पाडले जाईल. त्यासाठी मुख्य निधीतुन प्रत्येक प्रभागास वेळोवेळी ठराविक रक्कम वर्ग करण्यात आली आहे. प्रभाग समित्यांच्या अधिकाऱ्यांनी निधी निहायक स्वतंत्र लेखे ठेवायचे आहे. बँक खात्याचे व्यवहार प्रभाग कार्यालयापुरते मर्यादित ठेवले आहेत. बँक खात्याचे व्यवहार करण्याचे अधिकार संबंधीत उपायुक्त व प्रभागाचा लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीकास दिले आहेत. त्यासाठी वेतन भत्ते, शासकिय देणी, विद्युत दुरध्वनी, डिझेल खर्च, इतर कामांचा खर्च इत्यादी बाबत रक्कम रु. 5.25 लाख पर्यंतच्या खर्चाची मर्यादा घालुन दिली आहे. तसेच कोणत्याही कामाचे एकापेक्षा अधिक भाग करुन खर्च करता येणार नाही. स्थानिक संस्था कराचे काम पेल्हार कार्यालयाचे अधिनस्त् ठेवले आहे. नगररचना विभाग, सॅटे लाईट सिटी योजना व मुख्यालयातील आस्थापनेचे व्यवहार बोळींज कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे. अपरिहार्य परिस्थिती खेरिज सर्व प्रदाने ई.सी.एस. व्दारे करावयाची आहेत. रुग्णालय व्यवस्थापनाचे काम वसई कार्यालयाचे अधिनस्त् ठेवले आहे. मर्यादेत नसणारी सर्व प्रदाने मुख्य लेखाधिकारी व आयुक्त यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करावयाची आहेत. याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.130, दि.30/09/2014 अन्वये खुलासा विचारला होता. उपायुक्त, पेल्हार विभाग यांचे पत्र क्र.निरंक, दि.30/10/2014 अन्वये केलेला खुलासा, गुंतवणूक नोंदवही, बँक बाकी मेळपत्र तपासले, लेखा परिक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) भविष्य निर्वाह निधी - प्रभाग कार्यालयाच्या क्षेत्रात असलेल्या उपविभाग म्हणजे ग्रामपंचायत स्थरावरील जे जुने कर्मचारी आहेत आणि ज्यांची नेमणुक 01/11/2005 पुर्वीची आहे अशा खाती जुने भविष्य निर्वाह निधीची रक्कम कर्मचारी महानगरपालिकेकडे हंस्तातरण झाल्यानंतर हिशेबात घेतल्याचे दिसुन आले नाही. सदरची रक्कम लेखापरीक्षण तारखेपर्यंत तत्कालीन ग्रामपचांयत कर्मचारी व ग्रामसेवकाच्या संयुक्त खात्यावर शिल्लक आहे.

ग्रामपंचायत काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना होती. नगरपालिका/महानगरपालिका काळात अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना नाही. सद्यस्थितीत या ग्रामीण भागाबाबत याचिका मा. न्यायालयात आहे. ग्रामीण कर्मचाऱ्यांची किती भ.नि.नि.ची रक्कम महानगरपालिककडे प्राप्त झाली याचा हिशेब लेखा परिक्षणास दाखवला नाही. आस्थापनेवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची भ.नि.नि. वर्गणी वसुल केली जाते. परंतु नमुना 98 मधिल भ.नि.नि. खाते वही, नमुना नं. 99 मधिल बृहत पत्रक लेखा परिक्षणास प्राप्त झाले नाही. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधीनियम अध्यादेश, 2011 कलम 6 नुसार लेखापरीक्षणास अभीलेखे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महानगरपालिका आयुक्तांची आहे. परंतु संबंधीत अभीलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत.

2) प्रमाणक क्र. 560, दिनांक 21/03/2013 रु. 45800/- श्री. दिगंबर देसाई न्यायालयीन कामकाजासाठी

प्रदान. महाराष्ट्र नगरपालिक लेखा संहिता 1971 मधिल नियम क्र. 121 नुसार नमुना क्र. 90 मध्ये दावा, खटल्याचे पुस्तक ठेवायचे आहे आणि त्यात खटला चालविण्यासाठी दिलेल्या आगाऊ रकमा, कोर्टाच्या हुकूम नाम्यानुसार देय असलेल्या रकमांची वसुली व प्रदान दर्शवायचे आहे. परंतु याबाबतची नोंदवही उपलब्ध झाली नाही. ब प्रभागातील एकुण किती प्रकरणे न्यायालयात आहेत, त्यापैकी किती निकाल मनपाच्या बाजुने लागले, किती प्रलंबित आहेत याबाबतचे अभिलेखे अर्धसमास ज्ञापन पत्र देवूनही दाखविले नाहीत.

3) प्रमाणक क्र. 573, दिनांक 30/03/2013 रु. 10000/- मे. मयुरेश पब्लिसिटी यांना स्थानिक कराची अधिसुचना लोकसत्ता पेपर मध्ये दिनांक 03/03/2013 रोजी दिल्याबाबत दर रु. 100 प्रति चौ.सेमी. प्रमाणे प्रदान. शासन मान्य दराबाबतचे (माहिती व जन संपर्क विभाग) आदेश लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

4) प्रभाग कार्यालयाचे काम करण्यासाठी आयुक्तांचे आदेशानुसार/ लेखापाल/वरिष्ठ लिपीकाची नेमणुक केली आहे व उपायुक्तांना प्रतिस्वाक्षरीचे अधिकार दिले आहेत. प्रभाग कार्यालयात रोखवही लिहीण्याचे काम लेखापालाकडुन केले जाते. रोखवहीवर लेखापाल व सहाय्यक आयुक्तांची स्वाक्षरी आहे. सहाय्यक आयुक्तांना कोणतेही आर्थिक अधिकार दिले नाही. उपायुक्त धनादेशावर सही करतात. त्यामुळे लेखा संहिता 1971 मधिल नियम क्र. 62 (2) नुसार महिन्यातुन किमान एकदा तरी उपायुक्तांने रोखवहीतील शिल्लक पडताळुन पाहिली पाहिजे. परंतु वित्तिय वर्ष 2012-13 मध्ये उपायुक्ताने एकदाही रोखवहीतील शिल्लक पडताळुन पाहिली नाही. रोखवहीवर त्यांची स्वाक्षरी नसल्याचे निदर्शनास येते.

नियम 40 नुसार रोखडवहीतील जमा व संवितरणे यांचा मेळ जमा व खर्चाच्या मासिक गोषवाऱ्याबरोबर घेतला नाही. नियम 51 नुसार रोखडवहीतील लेखे बंद करुन त्यांचा ताळमेळ घेतला नाही.

DATPMVM6001 (Ref No : 77, Hmm No : 130)

124 नालासोपारा प्रभाग कार्यालय (क) चे कामाबाबत.

प्रभाग कार्यालये

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालये मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

नालासोपारा प्रभागाचे सर्व साधारण रोखवहीतील नोंदीवर प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. अतंर्गत लेखा परिक्षा विभागाचा तपासणीचा अहवाल अप्राप्त्. परिभाषिक निधीच्या रोखवहीत बँक ताळमेळ घेतला नाही. सक्षम प्राधिकाऱ्याने महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधिल नियम क्र. 62 (2) अन्वये वर्षभरात एकदाही रोखवहीची शिल्लक पडताळुन पाहिली नाही. सत्कार समारंभासाठी प्रभागातुन खर्च रु.195000/- केला आहे.

आयुक्त, वसई - विरार शहर महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र. आस्था/738/2012, दिनांक 17/01/2012 अन्वये महानगरपालिकेच्या 5 प्रभाग समित्यांना लेखा विषयक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार प्रभाग समिती निहाय लेखा विषयक कामकाज पार पाडण्याकरिता अधिनियम 1949 कलम 84(1) नुसार लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीक यांना प्राधिकृत करण्यात आले आहेत. तसेच लेखा संहिता 1971 मधील तरतुदीनुसार प्रभाग समितीचे संपुर्ण लेखा विषयक कामकाज प्रभाग समिती मार्फत पार पाडले जाईल. त्यासाठी मुख्य निधीतुन प्रत्येक प्रभागास वेळोवेळी ठराविक रक्कम वर्ग करण्यात आली आहे. प्रभाग समित्यांच्या अधिकाऱ्यांनी निधी निहाय स्वतंत्र लेखे ठेवायचे आहे. बँक खात्याचे व्यवहार प्रभाग कार्यालयापुरते मर्यादित ठेवले आहेत. बँक खात्याचे व्यवहार करण्याचे अधिकार संबंधीत उपायुक्त व प्रभागाचा लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीकास दिले आहेत. त्यासाठी वेतन भत्ते, शासकिय देणी, विद्युत दुरध्वनी, डिझेल खर्च, इतर कामांचा खर्च इत्यादी बाबत रक्कम रु. 5.25 लाख पर्यंतच्या खर्चाची मर्यादा घालुन दिली आहे. तसेच कोणत्याही कामाचे एकापेक्षा अधिक भाग करुन खर्च करता येणार नाही. स्थानिक संस्था कराचे काम पेल्हार कार्यालयाचे अधिनस्त् ठेवले आहे. नगररचना विभाग, सॅटे लाईट सिटी योजना व मुख्यालयातील आस्थापनेचे व्यवहार बोळींज कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे. अपरिहार्य परिस्थिती खेरिज सर्व प्रदाने ई.सी.एस. व्दारे करावयाची आहेत. रुग्णालय व्यवस्थापनाचे काम वसई कार्यालयाचे अधिनस्त् ठेवले आहे. मर्यादेत नसणारी सर्व प्रदाने मुख्य लेखाधिकारी व आयुक्त यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करावयाची आहेत. याबाबत लेखा परिक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.131, दि.30/09/2014 अन्वये खुलासा विचारला होता. उपायुक्त, नालासोपारा यांचे पत्र क्र.निरंक, दि.03/11/2014 अन्वये केलेला खुलासा, प्रभागाने केलेल्या गुंतवणूकीच्या पावत्या, अनुपालन व संबंधीत नोंदवहया तपासल्या. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

नालासोपारा प्रभाग कार्यालयाने वित्तिय वर्ष 2012-13 करीता पुढीलप्रमाणे रोखवहया ठेवल्या आहेत.

सर्व साधारण व पाणी पुरवठा रोखवही

अनामत रोखवही

भविष्य निर्वाह निधीची रोखवही

सेवा निवृत्ती वेतन रोखवही

परिभाषिक रोखवही

1) सर्व साधारण रोखडवही दिनांक 31/03/2013 अखेर शिल्लक रु. 54695414/-

इंडियन बँकेत बचत खाते (क्र. 6010648989) रु. 8557079/-

तफावत रु. 46138335/-

रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ लेखा संहिता 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही.

रोखवहीत 31 मार्च 2013 रोजी प्रभारी लेखापाल व प्रभारी सहाय्यक आयुक्त यांच्या सहया आहेत. परंतु नियम 51 नुसार रोखडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्यांने स्वाक्षरी केली नाही.

2) महानगरपालिका अंतर्गत लेखा परिक्षा विभागाने सदर रोखवहीतील तपासणी केल्याचे दिसुन येते. परंतु त्यांच्या कडील अहवाल अर्धसमास पत्र क्र.131, दि. 30/09/2014 अन्वये मागणी करुनही प्राप्त झाला नाही.

3) परिभाषिक निधी - दि. 31/03/2012 मुख्य कार्यालयाकडुन वर्ग रु. 79585/-
दि. 31/03/2013 अखेर शिल्लक रु. 96295/-
यापैकी रु. 75000/- गुंतवणुक इंडियन बँकत आहे आणि रु. 21295/- बचत खात्यात आहे.
प्रत्यक्षात रोखवही प्रमाणे बचत खात्यातील शिल्ल्क रु. 21295/-
इंडियन बँक खाते क्र. 925211558, रु. 51795/-
फरक रु. 30500/-
तफावतीबाबत ताळमेळ पत्रक तयार केले नाही.
रोखडवहीत दि. 31/03/2013 अखेर प्रभारी लेखापालाची सही आहे. रोजच्यारोज रोखवही बंद केल्यावर प्रभारी लेखापाल व प्राधिकृत अधिकाऱ्याची सही नाही.

4) प्रभाग कार्यालयाचे काम करण्यासाठी आयुक्तांचे आदेशानुसार/ लेखापाल/वरिष्ठ लिपीकाची नेमणुक केली आहे व उपायुक्तांना प्रति स्वाक्षरीचे अधिकार दिले आहेत. प्रभाग कार्यालयात रोखवही लिहीण्याचे काम लेखापालाकडुन केले जाते. रोखवहीवर लेखापाल व सहाय्यक आयुक्तांची स्वाक्षरी आहे. सहाय्यक आयुक्तांना कोणतेही आर्थिक अधिकार दिले नाही. उपायुक्त धनादेशावर सही करतात. त्यामुळे लेखा संहिता 1971 मधिल नियम क्र. 62 (2) नुसार महिन्यातुन किमान एकदा तरी उपायुक्तांने रोखवहीतील शिल्ल्क पडताळुन पाहिली पाहिजे. परंतु वित्तिय वर्ष 2012-13 मध्ये उपायुक्ताने कधीही रोखवहीतील शिल्ल्क पडताळुन पाहिली नाही. रोखवहीवर त्यांची स्वाक्षरी नाही.
नियम 40 नुसार रोखवहीतील जमा व संवितरणे यांचा मेळ जमा व खर्चाच्या मासिक गोषवाऱ्याबरोबर घेतला नाही. नियम 51 नुसार रोखवहीतील लेखे बंद करुन त्यांचा ताळमेळ घेतला नाही.

5) सत्कार समारंभासाठी केंद्रीय भांडार विभागाकडुन निविदा मागवुन मुख्यालयाकडुन खर्च केला जातो. 2012-13 या वर्षासाठी मे. आकाश एंटरप्रायझेस, मे. लवबर्ड मंडप, मे. शार्वी कॅटरर्स यांना काम दिले आहे. असे असताना प्रभाग कार्यालयाकडुन सत्कार समारंभ/उत्सव यासाठी खालील प्रमाणे खर्च केल्याचे लेखा परिक्षणाच्या वेळी आढळुन आले.
प्र. क्र. 1089, दि. 02/03/2013 रु. 115000/- मे. समर्थ एंटरप्रायझेस यांना कला, क्रिडा,व्हिडीओ शुटींग बाबत
प्र. क्र. 1090, दि. 02/03/2013 रु. 40000/- मे. बिजे ऑटोमेशन, सी.सी.टी.व्ही. कॅमेरा भाडे
प्र. क्र. 1091, दि. 02/03/2013 रु. 40000/- ---- //---------
लेखा परिक्षणाच्या वेळी काही निवडक प्रमाणके तपासता सत्कार समारंभ लेखा शिर्षाखाली कला /क्रिडा कामी खर्च झाल्याचे दिसुन आले. या खर्चाबाबतची निविदा नस्ती उपलब्ध् झाली नाही. खर्चाचा सविस्तर तपशिल उपलब्ध झाला नाही. कामासाठी दिलेला कार्यादेश, काम पुर्ण झाल्याचा अहवाल, इ. उपलब्ध झाला नाही. व्हि.डी.ओ. चित्रिकरणाची सी.डी. प्राप्त् झाल्याची नोंद साठा नोंदवहीत उपलब्ध झाली नाही. महापालिका क्षेत्रामध्ये अशा प्रकारचा खर्च करण्यासाठी मुख्यालयातुन स्वतंत्रपणे काम केले जात असताना पुन्हा प्रभागातुन खर्च करण्याचे प्रयोजन स्पष्ट झाले नाही.

125 बोळींज प्रभाग कार्यालय अ चे वित्तीय कामाबाबत

प्रभाग कार्यालये

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालये मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

बोळींज प्रभागाचे सर्व साधारण रोखवहीतील नोंदीवर प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. अतंर्गत लेखा परिक्षा विभागाचा तपासणीचा अहवाल अप्राप्त्. सर्व साधारण रोखवहीतील नोंदीवहीत परिपूर्ण नोंदी घेतल्या नाहीत. निवृत्ती वेतन निधी रोखवही, परिभाषिक रोखवही, भविष्य निर्वाह निधी रोखवही, जल-मल रोखवहीतील शिलकेचा पासबुकासोबत ताळमेळ घेतला नाही. सक्षम प्राधिकाऱ्यांने वर्ष भरात एकदाही रोकडवहीची शिल्लक पडताळून पाहिली नाही.

आयुक्त, वसई – विरार शहर महानगरपालिका यांचेकडील आदेश क्र. आस्था/738/2012, दिनांक 17/01/2012 अन्वये महानगरपालिकेच्या 5 प्रभाग समित्यांना लेखा विषयक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार प्रभाग समिती निहाय लेखा विषयक कामकाज पार पाडण्याकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 84(1) नुसार लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीक यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील तरतुदीनुसार प्रभाग समितीचे संपुर्ण लेखा विषयक कामकाज प्रभाग समिती मार्फत पार पाडले जाईल. त्यासाठी मुख्य निधीतुन प्रत्येक प्रभागास वेळोवेळी ठराविक रक्कम वर्ग करण्यात आली आहे. प्रभाग समित्यांच्या अधिकाऱ्यांनी निधी निहाय स्वतंत्र लेखे ठेवायचे आहे. बँक खात्याचे व्यवहार प्रभाग कार्यालयापुरते मर्यादित ठेवले आहेत. बँक खात्याचे व्यवहार करण्याचे अधिकार संबंधीत उपायुक्त व प्रभागाचा लेखापाल/वरिष्ठ लेखा लिपीकास दिले आहेत. त्यासाठी वेतन भत्ते, शासकिय देणी, विद्युत दुरध्वनी, डिझेल खर्च, इतर कामांचा खर्च इत्यादी बाबत रक्कम रु. 5.25 लाख पर्यंतच्या खर्चाची मर्यादा घालुन दिली आहे. तसेच कोणत्याही कामाचे एकापेक्षा अधिक भाग करुन खर्च करता येणार नाही. स्थानिक संस्था कराचे काम पेल्हार कार्यालयाचे अधिनस्त् ठेवले आहे. नगररचना विभाग, सॅटे लाईट सिटी योजना व मुख्यालयातील आस्थापनेचे व्यवहार बोळींज कार्यालयाचे अधिनस्त ठेवले आहे. अपरिहार्य परिस्थिती खेरिज सर्व प्रदाने ई.सी.एस. व्दारे करावयाची आहेत. रुग्णालय व्यवस्थापनाचे काम वसई कार्यालयाचे अधिनस्त् ठेवले आहे.विहीत वित्तीय मर्यादेत नसणारी सर्व प्रदाने मुख्य लेखाधिकारी व आयुक्त यांच्या संयुक्त स्वाक्षरीने करावयाची आहेत.

बोळींज प्रभाग कार्यालय (अ) चे कामाबाबत -
बोळींज प्रभाग कार्यालयाने वित्तिय वर्ष 2012-13 करीता पुढीलप्रमाणे रोखवहया ठेवल्या आहेत.
सर्व साधारण व अनामत रोखवही

भविष्य निर्वाह निधीची रोखवही
निवृत्ती वेतन रोखवही
परिभाषिक रोखवही
पाणी पुरवठा रोखवही
लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.143,दि. 09/10/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाचे पत्र क्र.निरंक, दि. 19/11/2014 नुसार केलेला खुलासा तपासला. प्रभागाने केलेल्या गुंतवणूकीच्या पावत्या तपासल्या. अनुपालनासंबंधी नोंदवहया तपासल्या. लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे देण्यांत येत आहेत.

1) सर्व साधारण रोखडवही दिनांक 31/03/2013 अखेर शिल्लक

बँकेचे नाव	रोखवहीतील रक्कम	पास बुकातील रक्कम	तफावत
इंडियन बँकेत बचत खाते (क्र. 6009864210)	रु. 208848.63	रु. 705160.03	रु.496311.40
युनियन बँक (क्र.410002010054204)	रु. 5334752.70	रु. 8117162.90	रु. 2782410.20
इंडियन बँक (सुरक्षा अनामत) (क्र. 6009864946)	रु. 473351	रु. 468351	रु. 5000.00
वसई विकास सहकारी बँक चालु खाते (क्र. CD 934)	रु. 1013866.49	रु. 1021824.93	रु. 7958.44
			रु. 7030818.82

रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही.
रोखवहीत 31 मार्च 2013 रोजी प्रभारी लेखापाल यांच्या सहया आहेत.परंतु महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 नियम 51 नुसार रोखडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्यांने स्वाक्षरी केली नाही.
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 83 नुसार सहकारी बँकेत महानगरपालिकेचा निधी ठेवण्यापुर्वी राज्य शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे. असे असतांना राज्य शासनाच्या मंजुरी शीवाय वसई विकास सहकारी बँकेत निधी ठेवला आहे.

2) महानगरपालिका अंतर्गत लेखा परिक्षा विभागाने सदर रोखवहीतील तपासणी केल्याचे दिसुन येते. परंतु त्यांच्या कडील अहवाल अप्राप्त आहे.

3) निवृत्ती वेतन निधी दिनांक 31/03/2013 अखेर शिल्लक रु. 5204285.70

बँकेचे नाव	रोखवहीतील रक्कम	पास बुकातील रक्कम	तफावत
इंडियन बँकेत बचत खाते(क्र. 6009866068)	रु. 787051.60	रु. 801227.67	रु.14176.07
दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक			

वसई विरार मनपा

(क्र.030/5713) रु. 9893.03 रु. 10502.03 रु. 609.00

विजया बँक

(क्र. 505201010001362) रु. 437764 रु. 462806 रु. 25042

मुदत ठेवी -

इंडियन बँक रु. 1446825

---//----- रु. 1000000

---//----- रु. 1000000

कार्पोरेशन बँक रु. 522752

रु. 5204285.63

रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही.

रोखवहीत 31 मार्च 2013 रोजी प्रभारी लेखापाल यांच्या सहया आहेत.परंतु नियम 51 नुसार रोखडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्यांने स्वाक्षरी केली नाही.

सहकारी बँकेत महानगरपालिकेचा निधी ठेवला आहे.

4) भविष्य निर्वाह निधी रोखवही दि. 31/03/2013 अखेर शिल्लक रु. 1155972.64

बँकेचे नाव	रोखवहीतील रक्कम	पास बुकातील रक्कम	तफावत
इंडियन बँकेत बचत खाते (क्र. 6009866524)	रु. 919615	रु. 849615	रु. 70000
दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँक	रु. 236357.64	रु. 245935.64	रु 9578
			रु. 1155972.64

रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 नियम 40 व 51 नुसार घेतलेला नाही.

रोखवहीत 31 मार्च 2013 रोजी प्रभारी लेखापाल यांच्या सहया आहेत.परंतु महाराष्ट्र नगर पालिका लेखा संहिता 1971 नियम 51 नुसार रोखडवहीतील लेखे रोजच्या रोज बंद करुन त्यावर प्राधिकृत अधिकाऱ्यांने स्वाक्षरी केली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 कलम 83 नुसार सहकारी बँकेत महानगरपालिकेचा निधी ठेवण्यापुर्वी राज्य शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे. असे असतांना राज्य शासनाच्या मंजुरी शीवाय ठाणे जिल्हा मध्यवर्ति बँकेत निधी ठेवला आहे.

5) परिभाषित रोखवही

सदरची रोखवही दि. 05/06/2012 रोजी सुरु केली असुन दि. 31/03/2013 अखेर शिल्लक रु. 332461 इंडियन बँक (क्र. 6040746162) मध्ये आहे.

अ प्रभागातील कर्मचाऱ्यांची वर्गणी जमा केली आहे. महापालिकेचा हिस्सा परिगणित केल्याचे दिसुन येत नाही. संबंधीत लेखे, व्याजाच्या नोंदी उपलब्ध झाल्या नाहीत.

6) जल-मल निधी रोखवही दि. 31/03/2013 अखेर शिल्लक रु.1164649

इंडियन बँक (क्र. 6009866954) मध्ये शिल्लक रु. 1933375. बँक ताळमेळ घेतला नाही.

7) प्रभाग कार्यालयाचे काम करण्यासाठी आयुक्तांचे आदेशानुसार/ लेखापाल/वरिष्ठ लिपीकाची नेमणुक केली आहे व उपायुक्तांना प्रति स्वाक्षरीचे अधिकार दिले आहेत. प्रभाग कार्यालयात रोखवही लिहीण्याचे काम लेखापालाकडुन केले जाते. रोखवहीवर लेखापालाची स्वाक्षरी आहे. सहाय्यक आयुक्तांना कोणतेही आर्थिक अधिकार दिले नाहीत त्यांची स्वाक्षरी रोखवहीत नाही. उपायुक्त धनादेशावर सही करतात. त्यामुळे लेखा संहिता 1971 मधिल नियम क्र. 62 (2) नुसार महिन्यातुन किमान एकदा तरी उपायुक्तांने रोकडवहीतील शिल्लक पडताळुन पाहिली पाहिजे. परंतु वित्तिय वर्ष 2012-13 मध्ये उपायुक्ताने कधीही रोकडवहीतील शिल्लक पडताळुन पाहिली नाही. रोकडवहीवर त्यांची स्वाक्षरी नाही. नियम 40 नुसार रोखडवहीतील जमा व संवितरणे यांचा मेळ जमा व खर्चाच्या मासिक गोषवाऱ्याबरोबर घेतला नाही. नियम 51 नुसार रोखडवहीतील लेखे बंद करुन त्यांचा ताळमेळ घेतला नाही.

DATPMVM6001 (Ref No : 87, Hmm No : 143)

126 वसई प्रभागातील आस्थापना विभागातील अनियमितता

प्रभाग कार्यालये

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 7120.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 7120.00/-

प्रभागातील आस्थापना विभागामध्ये संवर्गनिहाय बिंदूनामावली ठेवली नाही, अतिरिक्त पदे भरली असून त्याव्दारे वेतनावर अतिरिक्त खर्च झाला आहे, सेवाप्रवेश नियम डावलून नियमबाहय पदोन्नत्या दिल्या,आश्वासित प्रगती योजनेचा लाभ एक वर्ष अगोदर दिला, तसेच महापालिकेच्या मालकीच्या जागेत अनधिकृत निवास करीत असलेल्यांकडून भाडयाची वसूली केली नाही. इ.

वसई विरार शहर महानगरपालिकेतील वसई प्रभागातील आस्थापना विभागातील लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध लेख्याची तपासणी करता खालील अनियमितता आढळून आल्या. सदर अनियमिततांची पुर्तता करण्यासाठी अर्धसमास ज्ञापन क्र.154, दिनांक 29/10/2014 अन्वये खुलासा विचारला असता

विभागाने पत्र दिनांक 11/11/2014 व्दारे खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये खालील अनियमिततांपैकी अ.क्र.3 ची पूर्तता केली असल्याने खुलासा अंशत: मान्य करण्यात येत आहे.

1) प्रभागाच्या बिंदूनामावली नोंदीचे अवलोकन करण्यात आले असता केवळ 11 संवर्गाची बिंदूनामावली ठेवण्यात आली असून उर्वरीत 20 संवर्गांची बिंदूनामावली ठेवण्यात आली नाही. तसेच बिंदू नामावली नोंदवहीमध्ये खालील संवर्गामध्ये अतिरिक्त कर्मचारी भरण्यात आले आहेत.

अ.क्र.	पदनाम	मंजूर पदे	भरलेली पदे	अनुषेश	अतिरिक्त्
1	लिपिक-टंकलेखक	16	20	04	08
2	वाहन चालक	02	04	01	03
3	वाहन चालक कम ऑपरेटर	02	02	02	02
4	शिपाई	07	07	04	04
5	फायरमन	04	04	03	03

उपरोक्त संवर्गातील पदे ही आरक्षणाच्या प्रवर्गाच्या टक्केवारीनुसार भरण्यात न आल्याने अ.क्र.1 लिपिक-टंकलेखक तसेच अ.क्र.2 वाहन चालक या संवर्गामध्ये अतिरिक्त कर्मचारी दिसून येत आहेत. तसेच उपरोक्त तक्त्यामधील सर्व संवर्गामध्ये नियुक्त्या करताना आरक्षित बिंदूचा विचार करण्यात आला नसल्याने अनुषेश असल्याचे दिसून येत आहे. याबाबत विभागाने दिलेल्या खुलाशामध्ये महापालिकेसाठी नवीन आकृतीबंध मंजूर झाल्याचे नमूद करुन सदर आकृतीबंधानुसार आस्थापनेवर कर्मचारी कार्यरत असल्याचे नमूद केले आहे.सदर खुलशासोबत नव्याने मंजूर झालेला आकृतीबंध सादर करण्यात आला नाही. त्यामुळे कार्यरत असलेला कर्मचारीवर्ग मंजूर आकृतीबंधानुसार आहे याची शहानिशा करता आली नाही. तसेच कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या व पदोन्नत्या तत्कालीन नगरपरिषद आस्तित्वात असल्याच्या कालावधीमधील असून त्याविषयी समर्पक खुलासा केला नाही.

2) श्री.प्रदिप देऊ जाधव, सफाईगार व श्री.अजय शिवराम जाधव, सफाईगार यांना दिनांक 1.3.2006 रोजी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला तद्नंतर नियमानुसार त्यांची पुढील वेतनवाढ दिनांक 1.7.2007 रोजी देय असताना त्यांना पुढील वेतनवाढ दिनांक 1.7.2006 रोजी देण्यात आली आहे व त्यावर पुढील सर्व वेतनवाढी दिल्या आहेत. त्यामुळे उपरोक्त दोन्ही कर्मचाऱ्यांना एक वेतनवाढ जादा देण्यात आली असल्याने 2012-13 या वर्षासाठी खालीलप्रमाणे अतिरिक्त प्रदान झाल्याचे दिसून येते.

महिना	दिलेले वेतन रु.	देय वेतन रु.	फरक रु.
मार्च 12	7580+1600=9180	7290+1600=8890	290
एप्रिल 12	7580+1600=9180	7290+1600=8890	290

वसई विरार मनपा

मे 12	7580+1600=9180	7290+1600=8890	290
जून 12	7580+1600=9180	7290+1600=8890	290
जुलै 12	7860+1600=9460	7560+1600=9160	300
ऑगस्ट12	7860+1600=9460	7560+1600=9160	300
सप्टेंबर 12	7860+1600=9460	7560+1600=9160	300
ऑक्टोबर 12	7860+1600=9460	7560+1600=9160	300
नोव्हेंबर 12	7860+1600=9460	7560+1600=9160	300
डिसेंबर 12	7860+1600=9460	7560+1600=9160	300
जानेवारी 13	7860+1600=9460	7560+1600=9160	300
फेब्रुवारी 13	7860+1600=9460	7560+1600=9160	300
एकूण			3560

वरील प्रमाणे प्रत्येकी 3560 अशी एकूण रु.7120 इतकी रक्कम अतिप्रदान करण्यात आल्याने सदर रकमेची वसूली दोन्ही कर्मचाऱ्यांकडून करण्यात यावी. उपरोक्त फरकाची रक्कम फक्त 2012-13 साठीची दाखविली आहे. त्यापुर्वीच्या तसेच नंतरच्या कालावधीसाठी अतिप्रदानाची परिगणना करुन व अतिप्रदान झालेल्या रकमेची वसूली करुन लेखापरिक्षणास अनुपालन दाखवावे.

3) श्री.परवेज हाफीज भूरे,आरोग्य निरिक्षक यांच्या सेवापुस्तकात वेतननिश्चितीमध्ये खाडाखोड तसेच उपरीलेखन केले आहे. यास्तव वेतननिश्चितीच्या सुधारीत नोंदी घेऊन लेखापरीक्षणास दाखवावे.

4) कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाबाबत माहिती मागविली असता प्रभागातील पाण्याच्या साठवण टाक्यांखालील पंपहाऊस(होळी) तसेच तत्सम ठिकाणी काही कर्मचारी अनधिकृत राहात असल्याचे समजते. सदरचे कर्मचारी ठेकेदाराचे असले तरी त्यांच्याकडून निवासस्थान भाडयाची रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. याबाबत विभागाने दिलेला खुलासा कोणतेही कागदपत्रे, नोंदवहया उपलब्ध न केल्याने मान्य करता येत नाही.

DMEMRMM6801 (Ref No : 97, Hmm No : 154)

127 पेल्हार प्रभागातील कर्मचाऱ्यांना परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजना लागू न करणे

प्रभाग कार्यालये

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

वसई विरार मनपा

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालय मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

वसई विरार शहर महापालिकेमधील पेल्हार प्रभागामधील ऑक्टोबर 2005 नंतर सेवेत आलेल्या 35 कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली नाही.

वसई विरार शहर महानगरपालिका सन 2009 मध्ये आस्तित्वात आली असून महापालिकेचा नवीन आकृतीबंध मंजूर झालेला दिसून येत नाही. पेल्हार प्रभागामध्ये एकूण 12 ग्रामपंचायतींचा समावेश होत असून सदर गावे महापालिकेमध्ये सन 2011 मध्ये समावेशित करण्यात आली आहेत. पेल्हार प्रभाग समिती सन 2011 मध्ये गठीत करण्यात आली आहे. त्यामुळे तत्कालीन ग्रामपंचायतीमधील विविध संवर्गातील एकूण 67 पदे महापालिकेकडे वर्ग झालेली आहेत. उपरोक्त 67 कर्मचाऱ्यांपैकी एकूण 35 कर्मचारी दि.01/10/2005 नंतर महापालिकेच्या सेवेमध्ये कायम नियुक्त झाले असून शासन निर्णय क्र.अंनियो1005/126/सेवा-4 दिनांक 31/10/2005 नुसार सर्व कर्मचा-यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करणे आवश्यक असून तशा प्रकारची कार्यवाही प्रभागाकडून करण्यात आलेली नाही त्यामुळे सदर कर्मचारी योजनेच्या लाभापासून वंचित राहीले आहेत.

सदर बाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.158 दिनांक 30/10/2014 नुसार खुलासा मागविला असता विभागाने कोणताही खुलासा सादर केला नाही.

DMEMRMM6801 (Ref No : 99, Hmm No : 158)

128 महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाचे लेखा परिक्षण करताना सेवा पुस्तकात आढळुन आलेल्या उणीवाबाबत.

प्रभाग कार्यालये

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालये मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

श्री. राजेंद्र प्रभाकर लाड, प्र.कार्यकारी अभीयंता यांच्या सेवा पुस्तकात सुधारीत वेतन निश्चीतीच्या नोंदी घेतल्या नाहीत. वेतनवाढीच्या नोंदी घेतल्या नाहीत. विकल्पाच्या नोंदी घेतल्या नाहीत.

आस्थापना विभागाचे लेखा परिक्षण करताना काही निवडक सेवा पुस्तकांची तपासणी केली असता त्यात उणिवा आढळुन आल्या. त्याचा उदाहरणा दाखल तपशिल पुढील प्रमाणे

श्री. राजेंद्र प्रभाकर लाड यांची वैयक्तिक धारिका सेवा पुस्तक व शासन निर्णय यांची पडताळणी करता पुढील बाबी स्पष्ट होतात. श्री. लाड यांना दि. 01/04/1990 पासुन पदोन्नती दिल्या नंतर तत्कालीन वेतन श्रेणी रु. 6500 - 200 - 10500 योग्य होती. शासन निर्णय् वित्त विभाग क्र. वेपुर-1205/सुधारणा-114/2005/सेवा 9, दि. 09 मार्च 2005 अन्वये उप-अभियंता पदाची वेतन श्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने दि. 01/01/1996 पासुन पुढील प्रमाणे सुधारित करण्यात आली आहे.

विद्यमान वेतन श्रेणी	सुधारित वेतन श्रेणी
2000-60-2300-इबी-75-3200	2200-75-2800-इबी-100-4000

लेखा परिक्षणाच्यावेळी अर्ध समास ज्ञापन पत्र क्र. 182, दिनांक 24/11/2014 अन्वये खुलासा विचारला होता. प्र.सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती ई वसई यांनी पत्र क्र. वविशम/वसई/आस्था/1189/13-14, दिनांक 04/12/2014 अन्वये खुलासा सादर केला आहे. त्यानुसार शासनाची पूर्व मंजूरी मिळाल्यानंतर वेतन निश्चीती लागु करुन तदनंतर सेवा पुस्तकात नोंदी घेऊन अनुपालन केले जाईल, असा खुलासा केला आहे. परंतु सेवापुस्तकात वेतन निश्चीतीच्या नोंदी घेतल्या नाहीत. वेतनवाढीच्या नोंदी घेतल्या नाहीत. विकल्पाच्या नोंदी घेतल्या नाहीत. याबाबत भाष्य करण्यांत आले नाही. एकंदरीत विभागाचा खुलासा समाधानकारक नाही. लेखापरीक्षणाचा अभीप्राय पुढील प्रमाणे आहे.

शासन निर्णयानुसार श्री. लाड यांचे वेतन दि. 01/01/1996 पासुन प्रथम सुधारित वेतन श्रेणी निश्चित करणे क्रमप्राप्त् होते. तदनंतर या वेतन श्रेणीला समकक्ष वेतन श्रेणी रु. 8000-275-13500 मध्ये त्यांचे वेतन निश्चित करुन दि. 31/03/2002 पर्यंतच्या वेतनवाढी दयावे लागतील. त्यांनतर दि. 01/04/2002 रोजीची वार्षिक वाढ विचारात घेऊन उप-अभियंतापदावर त्यांची सलग 12 वर्ष सेवा झाल्यामुळे त्यांना वरिष्ठ वेतन श्रेणी 10000-325-15200 लागु करणे क्रमप्राप्त् आहे. दि. 01/04/2002 पासुन दि. 31/12/2005 पर्यत वेतन वाढी देऊन येणाऱ्या वेतनावर दि. 01/01/2006 रोजी सहाव्या वेतन आयोगानुसार समकक्ष वेतन बँड रु. 15600-39100+ ग्रेड वेतन रु. 6000 मध्ये निश्चित करणे योग्य होईल.

श्री. लाड, उप-अभियंता यांची फेर निश्चिती पुढील प्रमाणे होईल.

उप-अभियंता या पदाची पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी रु. 6500-200-10500 सुधारुन वेतन श्रेणी रु. 8000-275-13500 शासन निर्णय वेपुर-1205 / सुधारणा-114 / 2005/सेवा - 9, दि. 09 मार्च 2005 नुसार करण्यात आली म्हणून त्यांची प्रथम दिनांक 01/01/1996 ला वेतन निश्चिती करणे अनिवार्य आहे.

विद्यमान वेतन श्रेणी	सुधारित वेतन श्रेणी
वेतन श्रेणी (2000-60-2300-इबी-75-3200)	2200-75-2800-इबी-100-4000

वसई विरार मनपा

सदरहु वेतनश्रेणी शासन अधिसूचना क्र. वेपुर/1205/सुधारणा-114/2005/सेवा-9, दिनांक 09 मार्च 2005 अन्वये पुढील प्रमाणे -

दि. 01/01/1996 पासुन सुधारित केली आहे. म्हणून या श्रेणीला समकक्ष वेतन श्रेणीत वेतन निश्चित करणे आवश्यक.

प्रथम सुधारित वेतन श्रेणी रु. 2200-4000

मध्ये श्री. लाड यांचे वेतन रु. 2300 च्या

आधारे निश्चित करावे लागेल.

2350	8275
1.4.96	8550
1.4.97	8825
1.4.98	9100
1.4.99	9375
1.4.2000	9650
1.4.2001	9925
1.4.2002	10200

दि. 14 एप्रिल 2002 पासुन सेवेची सलग 12 वर्षे पूर्ण झाल्यामुळे तसेच उप-अभियंत्यापेक्षा वरिष्ठ पद महानगरपालिकेत उपलब्ध नसल्यामुळे त्यांना वरिष्ठ वेतन श्रेणी रु. 7450-225-11500 लागु करण्यात आली. परंतु वरील वस्तु स्थिती विचारात घेता रु. 8000-13500 च्या वरची वेतन श्रेणी रु. 10000-325-15200 ही लागु करणे आवश्यक होते. म्हणून फेर वेतन निश्चिती पुढील प्रमाणे होईल.

विद्यमान वेतन श्रेणी	सुधारित वरिष्ठ वेतन श्रेणी
8000-275-13500	10000-325-15200

दिनांक : 1.4.2002 ला 10200

+ 275

10475 म्हणून सुधारित वेतन 10650

1.4.2003	10975
1.4.2004	11300
1.4.2005	11625

दि. 01/01/2006 सुधारित वेतन बँड वेतन रु. 15600-39100 + ग्रेड पे 6600 मध्ये पुढील प्रमाणे निश्चित करावे लागेल.

शासन परिपत्रक क्र. 1209/प्र.क्र.69/सेवा-3, दि. 29 एप्रिल 2009 चे सहपत्र (ॲनेक्श्चर तीन, विवरण पत्र क्र. 17) अनुसार पुढील प्रमाणे

दिनांक 1/1/2006	21630 + 6600
1-7-2006	21630 + 850 = 22480 + 6600

वसई विरार मनपा

1-7-2007	22480 + 880 = 23360 + 6600
1-7-2008	23360 + 900 = 24260 + 6600
1-7-2009	24260 + 930 = 25190 + 6600
1-7-2010	25190 + 960 = 26150 + 6600
1-7-2011	26150 + 990 = 27140 + 6600
1-7-2012	27140 + 1020 = 28160 + 6600
1-7-2013	28160 + 1050 = 29210 + 6600
1-7-2014	29210 + 1080 = 30290 + 6600

श्री. लाड यांच्या सेवा पुस्तकातील नोंदी अपूर्ण आहेत. वेळीच वेतन निश्चिती केली नाही. तसेच वेतन निश्चितीच्या नोंदी घेतल्या नाहीत, असे दिसुन येते. सबब त्यांच्या सेवा पुस्तकात अनुज्ञेय व देय वेतनाच्या सुधारित नोंदी घेऊन अनुपालन लेखा परिक्षणास दाखवावे.

DATPMVM6001 (Ref No : 121, Hmm No : 182)

129 महानगरपालिकेच्या आस्थापना विभागाचे लेखा परिक्षण करताना सेवा पुस्तकात आढळुन आलेल्या उणीवा बाबत.

प्रभाग कार्यालये

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : प्रभाग कार्यालये मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

श्री.बिपीन अर्जुन गोहील, वाहन चालक यांच्या सेवा पुस्तकात वेतन निश्चीतीच्या नोंदी घेतल्या नाहीत. वेतनवाढीच्या नोंदी घेतल्या नाहीत.

आस्थापना विभागाचे लेखा परिक्षण करताना काही निवडक सेवा पुस्तकांची तपासणी केली असता त्यात उणिवा आढळुन आल्या. त्याचा उदाहरणा दाखल तपशिल पुढील प्रमाणे

श्री.बिपीन अर्जुन गोहील, वसई नगरपरिषदेमध्ये झाडु कामगार म्हणून दि. 02/07/1993 रोजी नेमणूक. वेतन श्रेणी 750-12-870 विस्तार – 14 – 940 या वेतन श्रेणीत त्यांना दि. 01/01/1994 पासुन रु. 750 वेतन दिल्याचे सेवा पुस्तकावरुन दिसुन येते. दिनांक 01/08/2004 पासुन त्यांना वाहन चालक या रिक्त पदावर (वेतन श्रेणी रु. 3050-75-3950-80-4590) पदोन्नती देण्यात आली. पदोन्नतीच्या वेळी त्यांची वेतन निश्चीती केली गेली नाही. लेखा परिक्षणाच्या वेळी अर्ध समास ज्ञापन पत्र क्र. 196,दिनांक 09/12/2014 अन्वये खुलासा

वसई विरार मनपा

विचारला होता. परंतु विभागाचे प्र. सहा.आयुक्त, प्रभाग समिती ई वसई यांनी कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचा अभीप्राय पुढील प्रमाणे आहे.

त्यांना नवीन वेतन श्रेणीतील सुरुवातीच्या वेतनावर निश्चीती केल्याचे दिसुन येते. वेतन वाढीची तारीख ही दि. 01 जानेवारी (जुनीच) ठेवली आहे. प्रत्यक्षात पुढील प्रमाणे वेतन निश्चीती करणे आवश्यक आहे.

	जुन्या पदाची वेतन श्रेणी	पदोन्नतीच्या पदाची वेतन श्रेणी	
	2550-55-2660-60-3200	3050-75-3950-80-4590	
01/01/04	3020		
01/08/04 (पदोन्नती) (3020 + 60)		3125	म.ना.से.नि 11(1)(अ)
01/08/05 (वेतन वाढ) (3080)		3200	म.ना.से.नि 39

या प्रमाणे वेतन निश्चीत करुन पुढील देय व अनुज्ञेय वेतनवाढीच्या नोंदी घेतल्या नाहीत. तसेच सहाव्या वेतन आयोगानुसार वाहन चालकास देय असलेल्या वेतन श्रेणीत वेतन निश्चीती करुन सेवा पुस्तक अद्ययावत केले नाही. वेतन निश्चीतीचे विवरणपत्र सेवा पुस्तका सोबत जोडले नाही. सुधारित नोंदी घेऊन अनुपालन लेखा परिक्षणास दाखवावे.

DATPMVM6001 (Ref No : 122, Hmm No : 196)

130 लेखा विभागाने ठेवलेल्या आगाऊ रकमा व ठेवींची नोंदवही नमुना नं. 147 बाबत

आगाऊ रकमा व ठेवी (जमा संकेतांक 043-3621,3620 / परताव संकेतांक 041-3600)

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 138253131.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 138253131.00/-

वर्ष भरात मिळालेल्या व परत केलेल्या ठेवींच्या एकुण रकमा वर्गीकरणातील लेखाशिर्षा सोबत जुळत नाहीत. तीन वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या शिलकी रकमा वर्षा अखेर व्यपगत केल्या नाहीत.

लेखा विभागाने ठेवलेल्या आगाऊ रकमा व ठेवींची नोंदवही नमुना नं. 147 तपासली. याबाबत लेखा परिक्षणात पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 नियम 189, 190 नुसार नमुना क्र. 147 मध्ये अग्रीम धन/आगाऊ रकमांची नोंदवही ठेवलेली आहे. महानगरपालिकेचे 5 प्रभाग असुन प्रभाग अ, ब, व मुख्यालय करिता एकत्रित नोंदवही व उर्वरित प्रभाग वसई, नालासोपारा, नवघर-माणिकपूर करिता स्वतंत्र नोंदवहया ठेवल्या आहेत. वर्षाअखेर उरणारी सर्व अदत्त बाकी पुढील वर्षाच्या पुस्तकात ओढली पाहिजे. परंतु महापालिका मुख्यालयात ठेवलेल्या आगाऊ रकमा व ठेवींच्या नोंदवहीचे एकत्रिकरण तपासता त्यात 2009-10 पासुनच्या बाकी रकमा पुढील वर्षात ओढल्या आहेत. त्यापुर्वीच्या शिल्लक रकमा ओढल्या नाहीत.

प्रत्यक्षात अभिलेखे तपासता पुढील प्रमाणे अदत्त् बाकी असल्याचे दिसुन आले.

प्रभागाचे नाव	वर्ष व शिल्लक रक्कम	वर्ष व शिल्लक रक्कम	एकुण रु.
विरार (अ,ब, व मुख्यालय)	05-06 ते 08-09 रु. 12818017	09-10 ते 12-13 रु. 478690641	.491508658
वसई	99-2000 ते 08-09 रु. 10119623	09-10 ते 12-13 रु. 8821701	. 18941324
नालासोपारा	02-03 ते 08-09 रु. 14260031	09-10 ते 12-13 रु. 40379528	. 54639559
नवघर-माणिकपूर	99-2000 ते 08-09 रु. 101055460	09-10 ते 12-13 रु. 28475476	.129530936
एकुण	**रु. 138253131**	**रु. 556367346**	**.694620477**

चार प्रभागांची 2008-09 पर्यंतची एकुण शिल्लक रक्कम रु.138253131/- अदत्त बाकी म्हणून पुढील वर्षात ओढलेली नाही. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 नियम 190 (2) नुसार वर्षभरात मिळालेल्या व ठेवींच्या एकुण रकमा व परत केलेल्या ठेवीच्या एकुण रकमा वर्गीकृत गोषवाऱ्यातील ठेवी या शिर्षाखाली यांच्या बरोबर जुळत्या असल्या पाहिजेत. परंतु प्रभागाचे लेखे प्रभागात असल्यामुळे सदरच्या रकमा वर्गीकरणातील लेखाशिर्षासोबत जुळत नाहीत.

3. नियम 190(3) नुसार 3 वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिल्लकी रकमा प्रत्येक वर्ष अखेर व्यपगत करावयाच्या असुन त्या "संकिर्ण - इतर बाबी- व्यपगत ठेवी" या शिर्षाखाली स्थानांतरीत करावयाच्या आहेत. तसेच नियम 190(4) नुसार महसुलात जमा केलेल्या ठेवी महापालिकेच्या मंजुरी विना परत करता येणार नाहीत. जेव्हा महापालिकेच्या मंजुरीने अशा व्यपगत ठे परत करण्यात येतील, तेव्हा व्यपगत झाल्याच्या मुळ नोंदी समोर तशी टिप लिहिणे आवश्यक आहे. महापालिकेने अनामत/ठेवीच्या नोंदवहया नुसार एकत्रित केलेल्या विवरण- पत्रात 2009-10 ते 2012-1 पर्यंत शिल्लक असलेली एकुण रक्कम रु. 556367346 दाखविली आहे. परंतु अभिलेख्या नुसार या 3

वर्षा पुर्वीच्या रकमा म्हणजे उपरोक्त विवरणपत्रात दाखवल्या नुसार 2003-04 पासुन 2008-09 पर्यंत असलेली एकुण रक्कम रु.138253131 2012-13 मध्ये व्यपगत केली नाही. आणि व्यपगत केल्याच्या नोंदीही वर्गीकरण नोंदवहीत दिसुन येत नाहीत.

लेखा परिक्षणाच्यावेळी अर्ध समास ज्ञापन पत्र क्र. 152, दि. 28/10/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र. निरंक, दि. 07/11/2014 अन्वये केलेला खुलासा तपासला. त्यानुसार 3 वर्षापूर्वीची ठेव परत करण्यासाठी सभागृहाची मंजूरी घेतली जाते. अनामत ठेवींसाठी स्वतंत्र रोकडवही ठेवण्यात येऊन त्यात नोंदी घेतल्या आहेत, असे नमूद केले आहे. परंतु लेखा परिक्षणाच्या वेळी सादर केलेले अभिलेखे तपासले असता सर्व साधारण रोकडवहीच अनामतीच्या जमा रकमा दाखविल्या आहेत. त्यासाठी स्वतंत्र रोखवही ठेवली नाही, असे दिसून आले. व्यपगत ठेवींची नोंद रोखवहीत जमेला घेतली नाही. वर्गीकरणात दिसत नाही. म्हणजेच 3 वर्षापूर्वीच्या ठेवी व्यपगत केल्या नाहीत. त्यामुळे विभागाचा खुलासा मान्य करता येत नाही. सबब उपरोक्त आक्षेपात दर्शविलेल्या उणिवांची पूर्तता करेपर्यंत रक्कम रु. 138253131 लेखा परिक्षणात आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 84, Hmm No : 152)

131 महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कडे प्रलंबित असलेली अग्रीम रक्कमाबाबत.

अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे प्रलंबित असलेल्या अग्रीम रकमा.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 64256014.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 64256014.00/-

कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिलेल्या जुन्या अग्रीमाचे सात वर्षापासुन समायोजन झाले नाही. ठेक्यावरील अधिकाऱ्यास दिलेल्या अग्रीमाची वसुली झाली नाही. एका कर्मचाऱ्याला मागील अग्रीम प्रलंबित असतांना पुन्हा अग्रीम दिले आहे. अनेक वेळा अग्रीम दिले आहे. थकबाकीची रक्कम वसुल केली नाही.

महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी कार्यालयीन कामासाठी अग्रीम देण्यांत आले आहे. प्रलंबित अग्रीमाची यादी अहवाला सोबत विवरणपत्र क्र.6 नुसार जोडली आहे. त्यांच्याकडे एकुण रक्कम रु. 64256014 इतके अग्रीम प्रलंबित आहे. अग्रीम मंजुर करताना विभागाच्या मागणीनुसार आयुक्तांचे मंजुरीने वेळोवेळी अग्रीम दिल्याचे दिसुन येते. लेखा शाखेने महाराष्ट्र नगरपालिका लेखा

संहिता 1971 मधिल नियम 189 नुसार नमुना 147 मध्ये ठेवलेल्या अग्रीम नोंदवहीतील नोंदी व्यवस्थीत व वेळीच घेतल्याचे दिसुन येते. लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास पत्र क्र.156, दि. 30/10/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने त्यांचेकडील पत्र क्र. निरंक,दि. 07/11/2014 नुसार खुलासा केला. त्यानुसार ही अग्रीमे वैयक्तीक स्वरुपाची नसल्याने वसुली करता येणार नाही असे कळविले आहे. परंतु या अग्रीमाचे समायोजन विभागाने केलेले नाही. त्यामुळे खुलासा मान्य करता येत नाही. लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1) अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळोवेळी दिलेल्या अग्रीमाची नोंदवही तपासली असता 2006-07 पासुनच्या अग्रीम रकमाचे मार्च 2013 अखेर पर्यंत एकुण रक्कम रु. 64256014 समायोजन झालेले नाही असे दिसुन येते.

2) दि. 02/07/2009 रोजी कार्यकारी अभियंता म.जि.प्रा. यांना रु.3 लाख अग्रीम दिल्याचे नोंदवहीवरुन दिसुन येते. कशासाठी अग्रीम दिले याची नोंद नोंदवहीत नाही. सदर अग्रीमाचे समायोजन मार्च 2013 अखेर पर्यंत झालेले नाही. अशा प्रकरणी संबंधीत विभागास कळवुन वसुली करावी. याबाबत विभागाने केलेल्या खुलाशानुसार सदरची रक्कम कार्यकारी अभियंता म.जि.प्रा. यांना तांत्रिक मंजुरीसाठी दिली असून वैयक्तिक स्वरुपाची नसल्याने वसुली करता येणार नाही, असे कळविले आहे. महानगरपालिकेत शहर अभीयंत्याचे पद नव्हते त्यावेळी कोणत्याही प्राकलनास तांत्रिक मंजुरी देण्याचे काम कार्यकारी अभीयंता, महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचेकडे होते. जीवन प्राधीकरणाकडून तांत्रिक मंजुरी देतांना प्राकलनाच्या 0.5% फी घेतली जात होती. अशा फी पोटी एकत्रीत अग्रीम दिले होते. परंतु सदर रकमेचे समायोजन विभागाने केलेले नाही. त्यामुळे खुलासा मान्य करता येत नाही.

3) महानगरपालिकेकडे वैद्यकिय अधिकाऱ्याचे मंजुर पद नसल्याने ठेक्याने वैद्यकिय अधिकारी घेण्यात येतात. अशा ठेक्यावरील अधिकाऱ्यास दि. 05/03/2011 रोजी रु. 45000 अग्रीम दिल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 मधील नियम 189 नुसार पहिले अग्रीम दिल्यानंतर त्याची वसुली झाल्याशिवाय दुसरे अग्रीम देय नाही. असे असताना एकाच अधिकाऱ्यास विभागीय कामासाठी वारंवार अग्रीम दिल्याचे दिसुन येते. (उदा. श्री. संखे यांना 3 वेळा अग्रीम दिलेले आहे.)

विभागाचा खुलासा पाहता - अग्रीम मंजुर करणे गैर नसून समायोजन करण्यात येत आहे, असे नमूद केले आहे. परंतु समायोजन केलेले नाही.

4)दि. 31/03/2013 अखेर एकुण 30 अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे अग्रीमाची रक्कम रु. 64256014/- थकीत असल्याची दिसुन येते. समायोजन किंवा वसुलीसाठी महानगरपालिकेने ठोस कार्यवाही केलेली नाही.

थकीत अग्रीमाची रक्कम रु. 64256014/- लेखा परिक्षणात वसुल पात्र ठेवण्यात येत आहे.

DATPMVM6001 (Ref No : 86, Hmm No : 156)

132 बँक बाकी ताळमेळ पत्रकाबाबत.

लेखा विभाग – बँक बाकी ताळमेळ पत्रकाबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

प्रत्येक महिना अखेरीस रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचे ताळमेळ पत्रक (Reconciliation Statement) तयार केले नाही. एकूण 428 बँक खात्यामध्ये निधी ठेवला आहे, त्यातील अनावश्यक असलेली किंवा व्यवहार न होणारी खाती बंद करण्याचा विचार केल्यास विभागाचे काम सुरळीत होईल. अनेक सहकारी बँकेत व खाजगी बँकेत महापालिकेची खाती आहेत, त्यास शासनाची मान्यता घेतली नाही.

बँक बाकी ताळमेळ पत्रकाबाबत -

महानगरपालिकेचा निधी एकुण 428 बँक खात्यामध्ये ठेवला आहे. दि. 31/03/2013 अखेरचे बँक बाकी ताळमेळ पत्रकाबाबत.

वसई - विरार शहर महानगरपालिकेचे 2012-13 चे वित्तिय वर्षाचे लेखा परिक्षण केले असता महानगरपालिका मुख्य रोखवही व इतर निरनिराळया निधी साठी ठेवलेल्या स्वतंत्र रोखवहया तपासता त्यात दाखविलेली अखेरची शिल्लक व संबंधीत बँक पासबुकात असलेली शिल्लक या मध्ये तफावत आढळुन आली आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे -

दि. 31/03/2013 अखेर शिलकेचा तपशिल

अ.क्र.	बँकेचे नाव / निधीचे नाव	खाते क्र.	एकुण खाती	दि. 31/03/2013 अखेर शिल्लक		
				रोखवही नुसार शिल्लक रु.	बँक पासबुकानुसार शिल्लक रु.	तफावत रु.
1	**2**	**3**	**4**	**5**	**6**	**7**
1.	सर्व साधारण रोखवही	एकुण खाती 1 ते 331	331	1409655173.74	1009027281.66	400627892.08
2.	निवृत्ती वेतन निधी	332 ते 336	5	प्रभागाकडे वर्ग केल्याने प्रभाग स्थरावर स्वतंत्र आक्षेप घेण्यात आला आहे.		
3.	सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना निधी	337 ते 345	9	20060563.10	23168176.10	- 3107613

4.	वेतन राखीव निधी	346 ते 350	5	1342926.36	1342926.36	0
5.	पा.पु. राखीव निधी	351 ते 354	4	51059.58	51059.58	0
6.	भ.नि.निधी	355 ते 360	6	11124	11184	- 60 (प्रभागाकडे वर्ग केल्याने)
7.	वृक्ष निधी	361 ते 365	5	6777336.10	4152931.10	2624405
8.	परिभाषित अंशदान	366 ते 367	2	प्रभागाकडे वर्ग केल्याने प्रभाग स्थरावर स्वतंत्र आक्षेप घेण्यात आला आहे.		
9.	प्राथमिक शिक्षण निधी	368 ते 371	4	8745341.23	8745341.23	0
10.	वैय्यक्तिक शौचकूप निधी	372	1	73921	73921	0
11.	घसारा निधी	373 ते 376	4	203120.83	203120.83	0
12.	कर्ज निवारण निधी	377 ते 381	5	582579.37	582579.37	0
13.	सॅटेलाईट सिटी	382 ते 383	2	105908056	105908056	0
14.	जल मल निधी	384 ते 428	45	136762692.55	371494976.89	- 234732284.34
एकुण			**428**	**1690173893.86**	**1524761554.12**	**165412339.74**

14 निधीसाठी एकुण 428 बँक/पोस्ट खात्यात रकमा ठेवल्या आहेत. या निधीच्या स्वतंत्र रोखवहया व बँक पासबुके तपासली असता 7 निधींच्या खात्यामध्ये बँक बाकी मेळ पत्रात तफावत असल्याचे आढळुन आले. 3 निधीच्या खात्यातील तफावत वजा असल्याचे दिसते. (म्हणजेच सुवर्ण जयंति, भ.नि.नि., जल-मल निधी या निधीच्या खात्यात रोखवहीतील शिल्लक बँकेतील शिल्लकेपेक्षा कमी असल्याचे दिसून येते.) एकुण तफावत रक्कम रु. 165412339.74 इतकी आहे. लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.166,दि. 05/11/2014 अन्वये खुलासा विचारला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे देण्यांत येत आहेत.

1) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 1971 मधील नियम क्र. 51(3) नुसार प्रत्येक महिना अखेर रोखवहीतील नोंदलेल्या जमा/खर्चाची पासबुकातील नोंदी बरोबर तुलना करुन फरक काढायचा आहे. म्हणजे बँक बाकी ताळमेळ पत्रक तयार करायचे आहे. दि. 31/03/2013 अखेर रोखवहीतील व बँक

पुस्तकातील शिल्लक यांचे ताळमेळ पत्रक (Reconciliation) विभागाने तयार केले आहे. परंतु ते परिपुर्ण नाही. लेखा संहितेमधील नियम 51(3) नुसार प्रत्येक महिन्याच्या अखेरीस रोखवहीतील शिल्लक व बँक पासबुकातील शिल्लक यांचे ताळमेळ पत्रक (Reconciliation Statement) तयार करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने लेखा संहितेमधील तरतुदीनुसार प्रत्येक महिना अखेरी ताळमेळ पत्रक तयार केले नाही. तफावतीबाबतचा तपशिल लेखा परिक्षणास सादर केला नाही. त्याचा परिणाम विभागीय लेखे म्हणजे जमा-खर्च, मत्ता-दायित्व, अचुक असल्याची खात्री करता आली नाही.

2) महापालिकेच्या स्वतंत्र निधीसाठी अनेक बँकांमध्ये खाती उघडुन त्यात निधी ठेवला आहे. सर्व साधारण निधीसाठी एकुण 331 बँक/पोस्ट खात्यात निधी ठेवला आहे. जल मल निधीसाठी एकुण 45 बँक खात्यात निधी ठेवला आहे. अनेक बँक खाती असल्याने त्यातील व्यवहाराचा ताळमेळ घेणे शक्य होत नाही. याचा विचार करुन अनावश्यक असलेली बँक खाती कमी करुन आवश्यक तेवढीच बँक खाती ठेवण्याचा प्रयत्न केल्यास विभागाचे काम सुरळीत होईल.

3) अनेक सहकारी बँकेत महापालिका निधीची खाती आहेत. तसेच सहकारी बँकेत व खाजगी बँकेत ही गुंतवणूक केल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 83 नुसार महापालिकेचा निधी राष्ट्रीयकृत बँकेत ठेवायचा आहे. परंतु महापालिकेमध्ये विलीन झालेल्या भुतपूर्व ग्रामपंचायतीची खाती टि.डी.सी. बँकेत होती, काही पतसंस्थेत होती, ती पुर्वीची खाती अद्याप महापालिकेने सुरु ठेवली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 मधील कलम 83 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 2011 कलम 83 नुसार सहकारी बँकेत गुंतवणूक करण्यापुर्वी राज्य शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केलेली नाही.

4) विरार विभागाच्या अनेक मुदत ठेवी ॲक्सीस बँकेत ठेवल्या आहेत. नालासोपारा विभागाच्या ठेवी एच.डी.एफ.सी. बँकेत ठेवल्या आहेत. याबाबत विभागाच्या अधिकाऱ्यासोबत चर्चा केली असता सदरच्या बँका जरी खाजगी असल्या तरी त्या जलद व चांगली सेवा महापालिकेला देत असल्याचे समजते. तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधीनियम, 1949 मधील कलम 83 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 2011 कलम 83 नुसार खाजगी किंवा सहकारी बँकेत बचत खाती किंवा गुंतवणूक करण्यासाठी व विहीत मर्यादेपर्यंत गुंतवणूक करण्यासाठी शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही महानगरपालिकेने केलेली नाही.

DATPMVM6001 (Ref No : 88, Hmm No : 166)

133 महानगरपालिकेने घेतलेल्या कर्जा बाबत.

कर्जफेड

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : लेखा विभाग मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

महापालिका दि. 03/07/2009 रोजी अस्तित्वात आली. त्यात 4 नगरपरीषदा व 53 ग्रामपंचायती समाविष्ट करण्यात आल्या. तत्कालीन नगरपरीषदा व ग्रामपंचायतींनी घेतलेल्या कर्जाची परतफेड महापालिकेकडून केली जात आहे. ग्रामपंचायतीने घेतलेल्या कर्जाबाबत- जिल्हा परीषदेकडून संबंधित ग्रामपंचायतीच्या जिल्हा ग्रामविकास निधीत असलेल्या शिल्लकेतून कर्जाची रक्कम वळती करण्याचा प्रयत्न केला नाही.

वसई - विरार शहर महानगरपालिका दि. 03/07/2009 रोजी अस्तित्वात आली. त्यात 4 नगरपरिषदा - वसई, नवघर-माणिकपूर, नालासोपारा, विरार समाविष्ट करण्यात आल्या. तसेच 53 ग्रामपंचायती समाविष्ट करण्यात आल्या. तत्कालीन नगरपरिषदांनी व ग्रामपंचायतींनी निरनिराळया कामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, उपसंचालक नगररचना, कोकण भवन, आयुर्विमा महामंडळ यांच्याकडुन कर्जे घेतली होती. तत्कालीन ग्रामपंचायतीने ग्रामविकास निधी - जिल्हा परिषदेकडुन कर्जे घेतली होती. त्या कर्जाचा, परत फेडीचा आणि थकबाकीचा तपशिल विवरण पत्र क्र. 3- कर्जाचे विवरण पत्र मध्ये दिलेला आहे. त्यानुसार दि. 31/03/2013 अखेर कर्जाची एकुण थकबाकी रु. 1192284891 इतकी आहे. याबाबत पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

तत्कालीन ग्रामपंचायतीने घेतलेल्या कर्जापैकी परत फेड करावयाची एकुण रक्कम रु. 34759422 इतकी दाखविली आहे. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधीबाबत नियम 1960 नुसार - प्रत्येक ग्रामपंचायतीने दरवर्षी आपल्या उत्पन्नाच्या प्रमाणात ठराविक रक्कम ग्रामविकास निधीमध्ये अंशदान म्हणून दयावे लागते. प्रत्येक ग्रामपंचायतीचे जिल्हा ग्रामविकास निधीत खाते असून त्यात त्यांची जमा रक्कम व व्याज तसेच कर्ज असल्यास त्याची रक्कम दाखविली जाते. तसेच नियम 9 नुसार निधीच्या हिशेबाचे विवरणपत्र "नमुना पी" वित्तिय वर्ष संपल्यानंतर संबंधीत ग्रामपंचायतीला पाठविण्याची तरतुद आहे. परंतु जिल्हा परिषदेने - महानगरपालिकेत विलीन झालेल्या ग्रामपंचायतीची शिल्लक दर्शविणारे विवरणपत्र मनपाला पाठविल्याचे दिसुन आले नाही. सबब जिल्हा परिषद ठाणे यांचेकडे पत्रव्यवहार करुन जिल्हा ग्रामविकास निधीतील संबंधीत ग्रामपंचायतीची शिल्लक, त्यातुन त्यावेळी दिलेले कर्ज याचा हिशेब घेऊन थकबाकीची रक्कम वळती करुन घेण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. जेणे करुन कर्जाचे दायित्व कमी होईल.

याबाबत लेखा परीक्षणाच्या वेळी अर्ध समास ज्ञापन पत्र क्र. 172, दि. 05/11/2014 अन्वये खुलासा विचारला होता. परंतु विभागाने कोणताही खुलासा केला नाही.

DATPMVM6001 (Ref No : 91, Hmm No : 172)

134 विरार प्रभागातील वाहन दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा झालेला जादा खर्च

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

वसई विरार मनपा

आक्षेपाधीन रक्कम रु. 283234.00/-

विरार प्रभागातील वाहन दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा रु. 2,83,234/- जादा खर्च केला आहे व वाहन वापरावरील शासनाने विहीत केलेली मर्यादा ओलांडूनही वाहने निर्लेखीत करुन त्यांची विल्हेवाट लावण्यांत आलेली नाही.

विरार विभागातील वाहन विभागाचे दुरुस्ती व देखभालीवर 2012-13 आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षण करण्यांत आले असता खाली निर्दिष्ट तपशीलानुसार वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा रु.2,83,234/- जादा खर्च झाल्याचे दिसून येते. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-10.08/प्र.क्र. 70/2008/विनियम, दिनांक 15-5-2009 मधील भाग पहिला, उपविभाग-2, अ.क्र. 19, नियम 69 मधील तरतुदीनुसार पेट्रोलवर चालणा-या वाहनांसाठी प्रतिवर्षी रु. 40,000/- व डीझेलवर चालणा-या वाहनांसाठी प्रतिवर्षी रु. 50,000/- दुरुस्ती व देखभालीकरीता वित्तीय मर्यादा विहीत करण्यांत आली आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.स्थस.१८ लेप/वसई - विरार मनपा/१२-१३/29, दिनांक 30/6/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. विभागाने सादर केलेल्या दिनांक 24/11/2014 रोजीच्या खुलाशामध्ये उपरोक्त वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्चास मंजूरी प्राप्त करुन घेवून तसा अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यांत येईल आणि शासनाने विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा वापरात असलेली जुनी वाहने निर्लेखन करण्यांबाबत कार्यवाही सुरु करण्यांत आलेली असुन कार्यवाही पूर्ण करुन अहवाल सादर करण्यांत येईल असे नमुद करण्यांत आलेले आहे.

याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1.

अ.क्र.	वाहन क्रमांक	इंधनाचा प्रकार	उत्पादन वर्ष	वित्तीय मर्यादा रु.	12-13 मध्ये वाहन दुरुस्तीवर झालेला प्रत्यक्ष खर्च रु.	वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्च रु.
1	एमएच-04/ 4497	डीझेल	1999	50,000/-	82030/-	32,030/-
2	एमएच-04-8059	डीझेल	1996	50,000/-	1,03,150/-	53,150/-
3	एमएच-04-2088	पेट्रोल	1996	40,000/-	56,425/-	16,425/-
4	एमजीआर-2423	डीझेल	1986	50,000/-	2,19,704/-	1,69,704/-
5	एमएच-04/508	डीझेल	1999	50,000/-	61,925/-	11,925/-
					एकुण..	2,83,234/-

उपरोक्त तपशीलात दर्शविण्यांत आलेल्या पाच वाहनांवर सक्षम प्राधिका-याच्या मंजूरीशिवाय वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्च केला आहे.

2) तसेच प्रचलित नियमानुसार शासकीय वाहने निरुपयोगी ठरविण्याकरीता मोटार वाहन/जीप यांचेकरीता धावसंख्या 2,40,000 कि.मी. व 10 वर्षे मर्यादा विहीत करण्यांत आली आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त नमुद

वाहनांची मर्यादा त्यांच्या उत्पादन वर्षापासुन पुर्ण झाली असुन सदर वाहने अदयापी वापरात आहेत. सदर वाहने निरुपयोगी ठरवुन निर्लेखीत करण्यांची कार्यवाही करण्यांत आली नाही.

शासन निर्णय दिनांक 15-5-2009 नुसार वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर विहीत करण्यांत आलेल्या वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्चास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त करुन तसा पुर्तता अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा. तसेच शासकीय वाहने निरुपयोगी ठरविण्याकरीता मोटार वाहन/जीप करीता वाहन वापर मर्यादा ओलांडून गेलेल्या वाहनांबाबत निर्लेखनाची कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

DATBBPM6301 (Ref No : 93, Hmm No : 29)

135 नवघर - माणिकपुर प्रभागातील वाहन दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा झालेला जादा खर्च

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 600800.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 600800.00/-

नवघर-माणिकपुर प्रभागातील वाहन दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा रु. 6,00,800/- जादा खर्च केला असुन वाहन वापरावरील शासनाने विहीत केलेली मर्यादा ओलांडूनही वाहने निर्लेखीत करुन त्यांची विल्हेवाट लावण्यांत आलेली नाही.

नवघर माणिकपुर प्रभागातील वाहन विभागाचे दुरुस्ती व देखभालीवर 2012-13 आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षण करण्यांत आले असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास पत्र क्र.स्थस.१८ ब/लेप/वसई - विरार मनपा/१२-१३/37, दिनांक 11/7/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. विभागाने सदर अर्धसमासास पत्र क्र.निरंक, दिनांक 20/07/2014 अन्वये उत्तर सादर केले आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभीप्राय खालील प्रमाणे आहेत.

खाली निर्दिष्ट तपशीलानुसार वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा रु.6,00,800/- जादा खर्च झाल्याचे दिसून येते. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-10.08/प्र.क्र. 70/2008/विनियम, दिनांक 15-5-2009 मधील भाग पहिला, उपविभाग-2, अ.क्र. 19, नियम 69 मधील तरतुदीनुसार पेट्रोलवर चालणा-या वाहनांसाठी प्रतिवर्षी रु. 40,000/- व डीझेलवर चालणा-या वाहनांसाठी प्रतिवर्षी रु. 50,000/- दुरुस्ती व देखभालीकरीता वित्तीय मर्यादा विहीत करण्यांत आली आहे.

अ.क्र.	वाहन क्रमांक	इंधनाचा प्रकार	उत्पादन वर्ष	वित्तीय मर्यादा रु.	12-13 मध्ये वाहन दुरुस्तीवर झालेला प्रत्यक्ष खर्च रु.	वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्च रु.
1	एमएच-04/ बी-1464	डीझेल	2007	50,000/-	78,460/-	28,460/-
2	एमएच-04-बी-1295	डीझेल	2006	50,000/-	61,220/-	11,220/-
3	एमएच-04 एएम-131	डीझेल	2002	50,000/-	1,96,090/-	1,46,090/-
4	एमएच-04 एच-8047	डीझेल	1995	50,000/-	4,56,710/-	4,06,710/-
5	एमएच-04/एएम-249	डीझेल	2007	50,000/-	58,320/-	8,320/-
					एकुण ..	6,00,800/-

उपरोक्त तपशीलात दर्शविण्यांत आलेल्या वाहनांवर सक्षम प्राधिका-याच्या मंजुरीविना वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्च केला आहे. शासन निर्णय दिनांक 15-5-2009 नुसार वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर विहीत करण्यांत आलेल्या वित्तीय मर्यादेपेक्षा रक्कम रुपये 6,00,800/- इतक्या जादा खर्चास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त करुन तसा पुर्तता अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा

तसेच प्रचलित नियमानुसार शासकीय वाहन निरुपयोगी ठरविण्याकरीता मोटार वाहन/जीप यांचेकरीता धावसंख्या 2,40,000 कि.मी. व 10 वर्षे मर्यादा विहीत करण्यांत आली आहे. त्याअनुषंगाने वाहन क्रमांक एमएच-04/एच-8047 या वाहनाची मर्यादा त्यांच्या उत्पादन वर्षापासुन पुर्ण झाली असुन सदर वाहन अदयापी चालु स्थितीत ठेवण्यांत आले आहे. सदर वाहन निरुपयोगी ठरवुन निर्लेखीत करण्यांची कार्यवाही करण्यांत आली नाही.

DATBBPM6301 (Ref No : 101, Hmm No : 37)

136 महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ब पेल्हार कार्यक्षेत्रासाठी महापालिकेच्या मालकीचे मैला टँकर चालविण्याच्या ठेक्यातील अनियमीततेबाबत.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ब पेल्हार कार्यक्षेत्रासाठी महापालिकेच्या मालकीचे मैला टँकर चालविण्यासाठी रॉयल्टी तत्वावर ठेका देण्यांत आला होता. ठेक्याचे कामात स्पर्धात्मक निविदेचा लाभ झाला नाही. प्रभागाच्या मालकीची वाहने किती याचा तपशील उपलब्ध झाला नाही. विहीत नमुन्यातील हालचाल रजिस्टर उपलब्ध झाले नाही. मैला टँकर सेवेबददल ठेकेदाराने नागरीकांकडून वसुल केलेल्या पावती पुस्तकाचे अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. कामाच्या तक्रारीबाबतची नस्ती उपलब्ध झाली नाही.

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ब पेल्हार कार्यक्षेत्रासाठी महापालिकेच्या मालकीचे मैला टँकर चालविण्यासाठी रॉयल्टी तत्वावर ठेका देण्यांत आला होता. याबाबत सन 2012-13 मधील निविदा प्रक्रियेची पडताळणी करण्यांत आली. याकामी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र. 34, दिनांक 10/07/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने पत्र क्र.वविशम/प्रसब/वाहन/ 496/ 2014-15, दिनांक 15/07/2014 अन्वये खुलासा सादर केला आहे. सदर खुलासा समर्पक नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे देण्यांत येत आहेत.

1. शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512/)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे स्पर्धात्मक दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु प्रभागाने निविदा "जनमुद्रा" व "हिंदुस्थान प्रहरी" या स्थानिक स्तरावरील वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली आहे. एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. व्यापक प्रसिध्दी अभावी स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

2. प्राप्त तीन निविदांपैकी मे. सुवर्णा एंटरप्रायजेस यांची निविदा व्दितीय लखोटा उघडण्यांस कोणत्या कारणास्तव अपात्र ठरविण्यांत आली याचा खुलासा लेखापरीक्षणास केला नाही.

3. 2011-12 मध्ये मैला टँकर चालविणा-या ठेकेदाराने महापालिकेस रॉयल्टी दयायची असुन त्याने संबंधीत नागरीकांकडून महापालिका दरानुसार रक्कम वसुल करण्यांबाबतचा ठेका (स्वामित्व धन) मे. रिलाएबल एजन्सी यांची प्रति वर्षासाठी रुपये 1,26,000/- या दराने मंजूर करण्यांत आला होता. 2012-13 मध्ये मे. साई गणेश एंटरप्रायजेस यांची निविदा वर्षासाठी रुपये 51,500/- दराची स्वीकारण्यांत आली आहे. सदर रॉयल्टी दरातील फरकाबाबत लेखापरीक्षणास समर्थनासह खुलासा करावा. "ई" प्रभागांतर्गत महापालिकेच्या मालकीच्या वाहनांचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिला नाही.

4. सदर कामाबाबत करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निविदाधारकाने केलेल्या कामाची नोंद महानगरपालिकेच्या विहीत नमुन्यातील हालचाल रजिस्टर (2012-13) मध्ये करावयाचे बंधनकारक होते, जेणेकरुन वर्षभरात ठेकेदाराने किती काम केले हे समजु शकणार होते. परंतु सदरचे रजिस्टर लेखापरीक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध करुन देण्यांत आले नाही.

5. महापालिकेच्या वतीने मैला टँकर सेवा उपलब्ध करुन दिल्यानंतर ठराविक दराने फी ची रक्कम वसुल करण्यांबाबत नागरीकांना पोचपावती देणेसाठी म्हणून निविदाधारकास पावती पुस्तके देणे आवश्यक असल्याचे करारनाम्यानुसार दिसून येते. सदरची पावती पुस्तके दिल्याची नोंद साठा नोंदवहीत नाही. त्यामुळे महापालिका दराने ठेकेदाराने रक्कम वसुल केल्याची खात्री करता आली नाही.

6. करारातील अटी शर्ती पाहता मैला टँकरच्या कामामध्ये नागरीकांच्या काही तक्रारी आल्यास, महापालिका दरापेक्षा जादा दराने वसुली केल्यास, सदरची बाब स्थायी समितीच्या निदर्शनास आणुन पुढील कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतु अशा तक्रारीबाबतची नस्ती लेखापरीक्षणास दाखविण्यांत आली नाही.

उपरोक्त उणीवांची पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

DATBBPM6301 (Ref No : 102, Hmm No : 34)

137 वसई "ई" प्रभागाकडील वाहन दुरुस्ती व देखभालीवर 2012-13 आर्थिक वर्षात वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्च केल्याबाबत...

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 68460.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 68460.00/-

वसई "ई" प्रभागातील वाहन दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा रु.68,460/- जादा खर्च झाला.

वसई "ई" प्रभागातील वाहन विभागाचे दुरुस्ती व देखभालीवर 2012-13 आथिक वर्षात केलेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षण करण्यांत आले असता खाली निर्दिष्ट तपशीलानुसार वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा रु.68,460/- जादा खर्च झाल्याचे दिसून येते. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-10.08/प्र.क्र. 70/2008/विनियम, दिनांक 15-5-2009 मधील भाग पहिला, उपविभाग-2, अ.क्र. 19, नियम 69 मधील तरतुदीनुसार पेट्रोलवर चालणा-या वाहनांसाठी प्रतिवर्षी रु. 40,000/- व डीझेलवर चालणा-या वाहनांसाठी प्रतिवर्षी रु. 50,000/- दुरुस्ती व देखभालीकरीता वित्तीय मर्यादा विहीत करण्यांत आली आहे.

वसई विरार मनपा

अ.क्र.	वाहन क्रमांक	इंधनाचा प्रकार	उत्पादन वर्ष	वित्तीय मर्यादा रु.	12-13 मध्ये वाहन दुरुस्तीवर झालेला प्रत्यक्ष खर्च रु.	वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्च रु.
1	एमएच-04/ बी-1074	डीझेल	2003	50,000/-	1,01,220/-	51,220/-
2	एमएच-04-862	डीझेल	2006	50,000/-	61,220/-	17,240/-
					एकुण ...	**68,460/-**

उपरोक्त तपशीलात दर्शविण्यांत आलेल्या दोन वाहनांवर वित्तीय मर्यादेपेक्षा रु.68,460/- जादा खर्च झाला असल्याने सक्षम प्राधिका-याची जादा खर्चास मंजूरी प्राप्त करणे आवश्यक आहे.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.स्था-18ब/लेप/वसई-विरार मनपा/12-13/38,दिनांक 11-07-2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. विभागाने सदर अर्धसमासास कोणतेही उत्तर सादर केले नाही. याबाबत खालील प्रमाणे अभीप्राय देण्यांत येत आहेत.

शासन निर्णय दिनांक 15-5-2009 नुसार वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर विहीत करण्यांत आलेल्या वित्तीय मर्यादेपेक्षा रक्कम रुपये 68,460/- इतक्या जादा खर्चास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त करुन तसा पुर्तता अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा.

DATBBPM6301 (Ref No : 110, Hmm No : 38)

138 वसई विरार महानगरपालिका अंतर्गत पेल्हार "ब" प्रभागाकडील वाहन दुरुस्ती व देखभालीवर 2012-13 मधील वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्चाबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

आक्षेपाधीन रक्कम रु. 125095.00/-

पेल्हार प्रभागातील वाहन दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा रु.1,25,095/- जादा खर्च झाला असून वाहन वापरावरील शासनाने विहीत केलेली मर्यादा ओलांडूनही वाहने निर्लेखीत करुन त्यांची विल्हेवाट लावण्यांत आली नाही.

पेल्हार "ब" प्रभागाकडील वाहन विभागाचे दुरुस्ती व देखभालीवर 2012-13 आर्थिक वर्षात केलेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षण करण्यांत आले असता खाली निर्दिष्ट तपशीलानुसार वाहनांच्या दुरुस्ती व देखभालीवर वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्च झाल्याचे दिसून येते.

याबाबत अर्धसमास पत्र क्र.स्था.18ब/लेप/वसई-विरार मनपा/12-13/39, दिनांक 11/07/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. तथापि विभागाचा खुलासा प्राप्त झाला नाही.

लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-10.08/प्र.क्र. 70/2008/विनियम, दिनांक 15-5-2009 मधील भाग पहिला, उपविभाग-2, अ.क्र. 19, नियम 69 मधील तरतुदीनुसार पेट्रोलवर चालणा-या वाहनांसाठी प्रतिवर्षी रु. 40,000/- व डीझेलवर चालणा-या वाहनांसाठी प्रतिवर्षी रु. 50,000/- दुरुस्ती व देखभालीकरीता वित्तीय मर्यादा विहीत करण्यांत आली आहे.

अ.क्र.	वाहन क्रमांक	इंधनाचा प्रकार	उत्पादन वर्ष	वित्तीय मर्यादा रु.	12-13 मध्ये वाहन दुरुस्तीवर झालेला प्रत्यक्ष खर्च रु.	वित्तीय मर्यादेपेक्षा जादा खर्च रु.
1	एम.एक्सटी-5583	डीझेल	1982	50,000/-	1,75,095/-	1,25,095/-
					एकुण ..	**1,25,095/-**

उपरोक्त तपशीलात दर्शविण्यांत आलेल्या वाहनावर सक्षम प्राधिका-या मंजूरीशिवाय वित्तीय मर्यादेपेक्षा रु.1,25,095/- जादा खर्च केला आहे.

प्रचलित नियमानुसार शासकीय वाहने निरुपयोगी ठरविण्याकरीता मोटार वाहन/जीप यांचेकरीता धावसंख्या 2,40,000 कि.मी. व 10 वर्षे मर्यादा विहीत करण्यांत आली आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त नमुद वाहनाची मर्यादा त्यांच्या उत्पादन वर्षापासुन पुर्ण झाली असुनही सदर वाहन अदयापी वापरात आहे.

DATBBPM6301 (Ref No : 113, Hmm No : 39)

139 प्रभाग समिती "ई" वाहने साहित्यासह दुरुस्ती करण्याबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : वाहन मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 101120.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 101120.00/-

महानगरपालिकेच्या प्रभाग समिती "ई" वाहने साहित्यासह दुरुस्ती करण्यांबाबतच्या निविदा मागवितांना व्यापक प्रसिध्दी देण्यांत आली नाही. महानगरपालिकेकरीता एकत्रित निविदा प्रक्रिया न राबविता प्रभागाकरीता स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविण्यांत आली आहे.

महानगरपालिकेच्या वाहन विभागांतर्गत प्रभाग समिती "ई" मधील वाहनांच्या सुटया भागांच्या दुरुस्तीसाठी वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये निविदा प्रक्रिया करुन दुरुस्ती करण्यांत आली. याकामी वित्तीय वर्षात एकुण खर्च रु.101120/- झाला आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे वेळी अर्धसमास पत्र क्र.32,दि. 10/07/2014 अन्वये विचारणा केली होती. विभागाने कोणताही खुलासा केला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1.शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार कल्याण विभाग, भांखस-**1088/(2512)/**उदयोग-**6,** दिनांक 2 जानेवारी, 1992 मधील परिच्छेद क्र.**10.8** नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता राज्य पातळीवर व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. अशा प्रसिध्दीव्दारे स्पर्धात्मक दरपत्रके प्राप्त होतात. त्यातुन दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा "समाज दिग्गज" व "आपला महानगर" या स्थानिक स्तरावरील वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक दराचा लाभ झालेला नाही.

2.वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात सर्व प्रभागांकरीता एकत्रित निविदा प्रक्रिया न राबविता "ई" प्रभागाकरीता स्वतंत्ररीत्या निविदा प्रक्रिया राबविण्यांत आली. महानगरपालिकेसाठी एकत्रीत निविदा मागविल्या असत्या तर स्पर्धात्मक दराचा निश्चीत लाभ झाला असता. या अनियमीततेबाबत विभागाने कोणताही खुलासा केला नाही.

3. ई" प्रभागांतर्गत महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांचा तपशील लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिला नाही. त्यामुळे प्रत्यक्ष किती वाहनांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे याची खातरजमा करता आली नाही.

4. मे. युनिव्हर्सल ऑटोमोबाईल यांची कमी दराची निविदा असल्याने त्यांना कार्यादेश क्र.वविशम/ भांडार/2479, दिनांक 27/12/2012 अन्वये देण्यांत आला. म्हणजेच वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये माहे एप्रिल, 12 ते नोव्हेंबर, 12 पर्यंत वाहन देखभाल व दुरुस्तीवरील खर्च करतांना मागील निविदादारास मुदतवाढ दिली असल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास दाखविले नाहीत.

5. निविदा अट क्र.31 नुसार मंजुर निविदाधारकास अंदाजपत्रकीय रकमेच्या 10% सुरक्षा अनामत ठेवणे बंधनकारक होते. त्यापैकी **3%** रोखीने व उर्वरित 7**%** देयकातुन वसुल करण्याची तरतुद आहे. त्यानुसार करारातील अट क्र.**5** मध्ये तरतुद करण्यांत आली आहे. ठेकेदाराच्या सर्व देयकातुन अशा प्रकारे सुरक्षा अनामत

वसुल केल्याची खात्री करता आली नाही. वर्षभरात वसुल केलेली सुरक्षा अनामत संबंधीत नोंदवहीत नोंदविल्याचे अभिलेखे अर्धसमास पत्र क्र.32, दि. 10/07/2014 अन्वये मागणी करुन दाखविले नाहीत. आक्षेपाधीन रक्कम रु.101120/-

DATBBPM6301 (Ref No : 136, Hmm No : 32)

140 वसई विरार शहर मनपामधील जन्म मृत्यू नोंदणी विभागातील अनियमितता

जन्म् मृत्यु नोंदणी

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : जन्म् मृत्यु नोंदणी मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 591624.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 591624.00/-

वसई विरार शहर महापालिकेच्या 2012-13 मधील अर्थसंकल्पामध्ये जमाखर्चाच्या नोंदीनुसार जन्म मृत्यु नोंदणी विभागामध्ये खर्चाच्या बाबीवर नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी संबंधित अभिलेख, नस्त्या व प्रमाणके लेखापरीक्षणास उपलब्ध केला नाही.

वसई विरार शहर मनपाच्या 2012-13 मधील अर्थसंकल्पीय जमा खर्चाच्या नोंदीनुसार जन्म मृत्यु नोंदणी विभागाच्या खर्चाच्या बाबींवर खालील खर्च नोंदविण्यात आला आहे.

अ.क्र.	खर्चाची बाब	रक्कम
1	स्टेशनरी खर्च	4800/-
2	छपाई खर्च	95150/-
3	जन्म मृत्यु दप्त्र संगणकीकरण	491674/-
	एकूण	591624/-

उपरोक्त खर्चाशी संबंधित लेखे,नस्ती, प्रमाणके इ.अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. संबंधित लेखे, नस्ती, नोंदवहया, प्रमाणके इ.अभिलेख उपलब्ध् करण्याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.169 दिनांक 3/11/2014 अन्वये खुलासा मागविला असता विभागाने उपरोक्त अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध केला नाही. त्यामुळे मुंबई स्थानिक लेखापरिक्षा अधिनियम 1930 चे कलम 6 नुसार लेखापरीक्षणास आवश्यक अभिलेखे सादर करण्याची जबाबदारी ही संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची आहे. याबाबत विभागप्रमुखांनी पुर्ततेसह अनुपालन सादर केले नाही.लेखापरीक्षणास माहिती उपलब्ध करुन न देणे व अभिलेख सादर न करणे ही अतिशय गंभीर बाब आहे. याकरीता मुंबई स्थानिक लेखापरीक्षा अधिनियम 1930 चे कलम 7 अन्वये दंडात्मक कार्यवाहीची तरतूद आहे. सबब जन्म मृत्यु नोंदणी विभागाने 2012-13 मध्ये केलेला खर्च रु.591624/- अभिलेख अनुपलब्धतेमुळे लेखापरिक्षणात आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DMEMRMM6801 (Ref No : 100, Hmm No : 169)

141 मुंबई नर्सिंग होम ॲक्ट, 1949 अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रुग्णालये व चिकित्सालये इ. यांच्या नोंदणीबाबत ...

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : वैदयकीय आरोग्य मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 352000.00 /-

वसूलपात्र रक्कम रु. 352000.00/-

मुंबई नर्सिंग होम ॲक्ट, 1949 अंतर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रुग्णालये व चिकित्सालये इ. ची नोंदणी न केल्याने नोंदणी फी व्दारे महापालिकेस मिळणारी रक्कम रु.1,76,000/- प्रलंबित राहिली. तसेच नोंदणीचे नुतनीकरण न केल्याने त्यापासुन मिळणारी रक्कम रु. 1,76,000/- प्रलंबित राहिली.

मुंबई नर्सिंग होम ॲक्ट, 1949 मधील सेक्शन 3 आणि मुंबई प्रांतिक अधिनियम, 1949 चे कलम 386 च्या तरतुदीनुसार महानगरपालिका हददीतील रुग्णालये, दवाखाने, चिकित्सालये यांनी महानगरपालिकेकडे रीतसर अर्ज दाखल करुन व्यावसायिक परवान्याकरीता नोंदणी करणे आवश्यक आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 5, दिनांक 19-1-2011 नुसार महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णालये/शुश्रुषालये/ प्रसुतिगृहे नोंदणी व नुतनीकरण करण्यांबाबत खाटांच्या क्षमतेनुसार फी निश्चित करण्यांस मान्यता देण्यांत आली आहे. तसेच सदर ठरावानुसार आरोग्य सेवेशी संबंधीत सेवा उदा. खाजगी दवाखाने, पॉलीक्लिनीक, डेंटल क्लीनीक, पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरी, ब्लडबँक, डायग्नोस्टीक सेंटर, एक्सरे/सोनोग्राफी सेंटर, सीटी/एम आर आय सेंटर, फिजिओथेरपी सेंटर व इतर यांची नोंदणी व नुतनीकरणासाठी फी निश्चितीस मान्यता देण्यांत आली आहे.

अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.162, दिनांक 30/10/2014 अन्वये 2012-13 पर्यंत महानगरपालिकेकडे नोंदणी न केलेल्या रुग्णालये, शुश्रुषालये, प्रसुतिगृहे, ब्लडबँक, डायग्नोस्टीक सेंटर, एक्सरे/सोनाग्राफी सेंटर, सीटी/एमआरआय सेंटर, फिजीओथेरपी सेंटर यांची माहिती, तसेच नुतनीकरण न केलेल्या रुग्णालये, शुश्रुषालये, यांची माहिती मागविली होती.

वैदयकीय आरोग्य अधिकारी, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी त्यांचे पत्र क्र.निरंक, दिनांक 26-11-2014 व्दारे सादर केलेल्या खुलाशात महानगरपालिका क्षेत्रातील 176 रुग्णालये, चिकित्सालये व दवाखाने यांनी अदयापी महानगरपालिकेकडे नोंदणी केली नसल्याबाबत माहिती सादर केली आहे. त्यांना नोटीसा देण्यांत आल्या असुन याबाबत कार्यवाही पूर्ण करुन अहवाल सादर करण्यांत येईल असे नमुद केले आहे. म्हणजेच खुलासा संयुक्तीक नाही. याबाबत लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. नोंदणी न केलेली रुग्णालये, दवाखाने इ. 176 X 1000/-= 1,76,000/- इतकी रजिस्ट्रेशन फी म्हणून वसुलपात्र ठरते.

वसई विरार मनपा

2. सर्वसाधारण सभा ठराव क्र.5, दि.19/01/2011 नुतनीकरण फी प्रतिवर्षी रु.1000/- वसुल करावयाची आहे. 176 X 1000/-= 1,76,000/- वसुलपात्र ठरते.

3. लेखापरीक्षण काळातील नोंदणी फी व नुतनीकरण फीच्या रकमा वसुलपात्र दाखविल्या आहेत. परंतु सर्वसाधारण सभा दि.19/01/2011 नुसार नोंदणी फी व नुतनीकरण फीच्या दराला मंजुरी दिली आहे. त्यामुळे 2011-12 पासुन नोंदणी फीची वसुली करणे आवश्यक आहे. 2011-12 या वित्तीय वर्षात नोंदणी फी ची वसुली केल्याची लेखापरीक्षणाची खात्री झाली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.352000/-

DATBBPM6301 (Ref No : 105, Hmm No : 162)

142 कत्तलखाने व पशु-आवारे यावर दुकान-भाडे, भाडे आणि फी बसविणे.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : कोंडवाडे/कत्तलखाने मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिका क्षेत्रातंर्गत पशु आवारातील गाळा, दुकाने कोंडवाडा इ. मध्ये जनावरांची कत्तल करण्याबाबत आकारावयाच्या भाडे/फी बाबत स्थायी समितीने मान्यता दिलेल्या ठरावाची प्रत उपलब्ध झाली नाही, पशु कत्तलखाने/दुकाने किती आहेत याची माहिती उपलब्ध झाली नाही. ईदच्या कालावधीखेरीज अन्य काळात अशा प्रकारची वसुली केली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम 332 अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील पशु आवारातील कोणताही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा, छपरी किंवा कोंडवाडा किंवा अन्य इमारत यांचा भोगवटा किंवा वापर करण्याबददल आणि महानगरपालिका बाजारात विक्रीसाठी माल मांडण्याच्या अधिकाराबददल आणि अशा कोणत्याही बाजारात विकलेल्या मालाचे वजन करण्याबददल व तो मोजण्याबददल आणि कोणत्याही महानगरपालिका कत्तलखान्यात जनावरांची कत्तल करण्याच्या अधिकाराबददल स्थायी समितीच्या मान्यतेने, तो वेळोवेळी ठरवील असे दुकान-भाडे, भाडे आणि फी आकारण्यांबाबत तरतूदी आहेत. याबाबत लेखापरीक्षणाच्या वेळी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.180, दिनांक 20/11/2014 अन्वये खुलासा विचारला होता. विभागाने कोणताही खुलासा केला नाही.

लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. महानगरपालिकेने अशा प्रकारच्या पशु आवारातील गाळा, दुकाने कोंडवाडा इ. मध्ये जनावरांची कत्तल करण्याबाबत आकारावयाच्या भाडे/फी बाबत स्थायी समितीने मान्यता दिलेल्या ठरावाची प्रत

लेखापरीक्षणास सादर केली नाही.

2. महानगरपालिका क्षेत्रात किती पशु कत्तलखाने-कोंबडी कापण्याची दुकाने, बकरी बोकड मटणाची दुकाने आहेत, याबाबतची माहिती सादर करण्यासाठी अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.180,दि. 20/11/2014 अन्वये विचारणा करुनही माहिती उपलब्ध झाली नाही.

3. सदरचे काम आरोग्य विभागामार्फत केले जात आहे, परंतु संबंधीत विभागाकडून कोणताही खुलासा प्राप्त झाला नाही.

4. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नालासोपारा प्रभागामार्फत - ईदच्या कालावधीत अशा प्रकारची कत्तल करणा-या दुकानदारांकडून वसुली केल्याची पावती पुस्तकावरुन दिसून आले. म्हणजेच अशा प्रकारची वसुली केली आहे. त्यामुळे अन्य कालावधीमध्ये व प्रभागात कलम 332 नुसार अशा प्रकारची वसुली होणे अपेक्षीत आहे. परंतु तशी कार्यवाही महानगरपालिकेने केलेली नाही.

उपरोक्त उणीवांची पुर्तता करुन अनुपालन लेखा परीक्षणास दाखवावे.

DATBBPM6301 (Ref No : 112, Hmm No : 180)

143 वसई येथील रुग्णालयातील पॅथॉलॉजिकल सेवा कंत्राटी पध्दतीवर पुरविणेबाबत...

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : पॅथॉलॉजी सेवा मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

महानगरपालिकेच्या वसई येथील रुग्णालयातील रुग्णांना पॅथॉलॉजिकल सेवा पुरविण्याकरीता सन 2008-09 मध्ये मागविण्यांत आलेल्या निविदा करीता व्यापक प्रसिध्दी देण्यांत आली नाही. तसेच सदर पॅथॉलॉजिकल सेवा पुरविण्याकरीताचे ठेक्यास सन 2009-10 ते 2012-13 या चार वर्षे नियमबाहय कालावधीत मुदतवाढ देण्यांत आली.

वैदयकीय आरोग्य विभागांतर्गत वसई रुग्णालयातील पॅथॉलॉजी विभाग कंत्राटी पध्दतीने चालविणे बाबतची नस्ती तपासली. या कामी 2009-10 ते 2012-13 या कालावधीत मुदतवाढ दिली आहे. याबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.स्था.18ब/लेप/वसई विरार मनपा/12-13/160, दिनांक 30/10/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. विभागाने याबाबत कोणताही खुलासा केला नाही. याबाबत लेखापरीक्षणाचे अभीप्राय पुढील प्रमाणे आहेत.

1. शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार कल्याण विभाग- भाखंस/2512/1088/उदयोग-6, दिनांक 2-1-1992 मधील परिच्छेद क्र.10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी /निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधीकाधीक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील,

राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणे अधीक श्रेयस्कर ठरते. अशा प्रसिध्दीव्दारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातुन दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा दैनिक लोकमत, दैनिक महाराष्ट्र बुलंद टाईम्स या स्थानिक स्तरावरील वृत्तपत्रात दिनांक 17-03-2008 प्रसिध्द केली असल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दरांचा फायदा झाला नाही.

2. या कामासाठी कार्यादेश क्र.वनम/दवा/426/08, दिनांक 25/4/2008 अन्वये सन 2008-09 करीता निर्गमीत करण्यांत आले होते. तदनंतर वसई विरार महानगरपालिका प्रशासकीय ठराव क्र.66, दिनांक 4-12-2008 अन्वये 2009-10 करीता मुदतवाढ देण्यांत आली होती. तसेच सर्वसाधारण सभा ठराव क्र.338, दिनांक 31-3-2010 अन्वये 2010-11 करीता मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. त्याचप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र.3, दिनांक 22-12-2010 अन्वये 2011-12 करीता व 2012-13 करीता स्थायी समिती सभा ठराव क्र.1019, दिनांक 12-3-2013 अन्वये मुदतवाढ देण्यांत आलेली आहे. अशी एकुण चार वर्षपर्यंत मुदतवाढ दिली आहे. शासन निर्णय क्र. भाखंस/2512/1088/उदयोग-6, दिनांक 2-1-1992 मधील परिच्छेद क्र.8.3 (ह) पुनर्प्रत्ययी आदेश (रिपीट ऑर्डर) सुधारित मार्गदर्शक तत्वे परिशीष्ठ सात अन्वये पुनर्प्रत्ययी आदेश देतांना ते सहा महिन्याच्या अवधीकरीता दयावयाचे आहे. सदरचे आदेश तात्कालीक/ आकस्मीक स्वरुपाचे असावेत. असे आदेश देतांना बाजारातील किमती मुळ आदेशापेक्षा कमी नसल्याची, त्या स्थिर असल्याची शहानिशा करणे आवश्यक आहे. तसेच पुनर्प्रत्ययी आदेशाचे प्रस्ताव खरेदी समितीने/निविदा मंजुरी समितीने बाजारभावाशी तुलना करुन मंजुर करणे आवश्यक आहे. या कामी प्रतिवर्षी चार वेळा मुदतवाढ दिली आहे. सदर नियमबाहय मुदतवाढी दिल्याचे दिसून येते.

DATBBPM6301 (Ref No : 117, Hmm No : 160)

144 आरसीएच कार्यक्रमांतर्गत ठेवण्यांत आलेल्या रोखवही, उपयोगिता प्रमाणपत्र, इ. बाबतची अनियमीतता.

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : वैदयकीय आरोग्य मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

गुंतलेली रक्कम रु. 1305064.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 134860.00/-

वैदयकीय आरोग्य विभागांतर्गत ठेवण्यांत आलेल्या आरसीएच कार्यक्रमाविषयीचे रोखवहीत विभाग प्रमुखाने महिन्यातुन एकदा रोखवहीत दर्शविलेली शिल्लक रक्कम प्रत्यक्ष पडताळून तत्संबंधीचे अभीप्राय नोंदले नाहीत. उपयोगिता प्रमाणपत्र मा. आयुक्तांच्या सहीने शासनास सादर केले नाही. पल्स पोलिओ कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नेमण्यांत आलेल्या कंत्राटी कर्मचा- यांचे वेतनातुन वसुल करण्यांत आलेली व्यवसाय कराची रक्कम रु. 67370/- शासकीय कोषागारात चलनाव्दारे भरणा केली नाही. बँक बाकी ताळमेळपत्रक

उपलब्ध झाले नाही. लेखापरीक्षणासाठी रु.67490/- ची उपप्रमाणके उपलब्ध झाली नाहीत.

वैदयकीय आरोग्य विभागांतर्गत आरसीएच कार्यक्रमाविषयी रोखवही, लेखे यांची पडताळणी करण्यांत आली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत अर्धसमास क्र.स्था.18ब/लेप/वसई विरार मनपा/12-13/161, दिनांक 30-10-2014 अन्वये खुलासा मागविण्यांत आला होता. विभागाने दिनांक 11-12-2014 रोजी खुलासा सादर केला असुन त्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता, 1971 मधील नियम 51 नुसार विभाग प्रमुखाने महिन्यातुन एकदा रोखवहीत दर्शविलेली शिल्लक रक्कम प्रत्यक्ष पडताळून तत्संबंधीचे अभिप्राय रोखवहीत नमुद करणे आवश्यक आहे. तथापि 2012-13 मध्ये कोणत्याही महिन्याअखेर वैदयकीय आरोग्य अधिकारी यांनी अशी पडताळणी करुन तत्संबंधीचे अभिप्राय रोखवहीत नोंदविलेले नाहीत.

2. आरसीएच कार्यक्रमासाठी 2012-13 मध्ये निधी प्राप्त झाला नाही. मागील वर्षाची शील्लक रक्कम रु.12904084/- असुन त्यातुन वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रक्कम रु.4020450/- खर्च केला आहे. 31/03/2013 अखेरची शील्लक रु.8883634/- आहे. 2012-13 मध्ये खर्च झालेल्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्र मा. आयुक्त यांच्या स्वाक्षरीने वरीष्ठांना सादर न करता ती वैदयकीय आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीने केली आहेत.

3. आरसीएच/पल्स पोलिओ कार्यक्रमांतर्गत कंत्राटी पध्दतीवर नेमण्यांत आलेल्या कर्मचा-यांकडून 2012-13 मध्ये त्यांचे मासिक वेतनातून रक्कम रुपये 67,370/- इतकी वसुल करण्यांत आलेली आहे. तथापि सदर रकमेचा भरणा शासकीय कोषागारात चलनाव्दारे अदयापी करण्यांत आलेला नाही. तरी सदर वसुल करण्यांत आलेली व्यवसाय कराची रक्कम तात्काळ चलनाव्दारे शासकीय कोषागारात भरणा करुन चलनांच्या प्रतीसह लेखापरीक्षणास अनुपालन दाखवावे.

4. दिनांक 31-03-2013 रोजी रोखवही व बँक पासबुक यांच्या नोंदीप्रमाणे अखेरची शिल्लक खालील प्रमाणे आहे.

रोखवहीतील शिल्लक रक्कम - रु. 1,19,21,675/-

आयसीआयसीआय बँक पासबुकाप्रमाणे - रु. 1,32,26,739/-
शिल्लक रक्कम

तफावत - रु. 13,05,064/-

रोखवहीतील शिल्लक व बँकेच्या पासबुकातील शिल्लक यांचा ताळमेळ लेखा संहिता 1971 मधील नियम 40
व 51 नुसार घेतलेला नाही.

5.लेखापरीक्षणाकरीता खालील उपप्रमाणके अर्धसमासाव्दारे मागणी करण्यांत येवूनही उपलब्ध करुन देण्यांत आली नाहीत.

अ.क्र.	**दिनांक**	**फर्मचे नांव**	**रक्कम**
1	30-3-2013	वैदयकीय अधिकारी, चंदनसार	65,000/-
2	30-3-2013	अभिव्यक्ती मिडीया	1,075/-

3	30-3-2013	राजहंस प्रकाशन	1,195/-
4	30-3-2013	प्रतिक प्रकाशन	220/-
		एकुण ...	**67,490/-**

DATBBPM6301 (Ref No : 138, Hmm No : 161)

145 स्थानिक संस्था कराबाबत

लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013

लेखा शीर्ष : स्थानिक संस्था कर मनपा निधी निधी

अनियमितता कलम : 9ड

वसूलपात्र रक्कम रु. 5200.00/-

निविदा मागविताना व्यापक प्रसिध्दी देण्यांत आली नाही. करारनाम्यासाठी रुपये 5,200/- कमी मुद्रांक शुल्क वसुल केले. स्थानिक संस्था कर नोंदणीधारक यांच्या विवरणपत्रांच्या तपासणीबाबत ठरविण्यांत आलेल्या फीचा दर कोणत्या आधारे ठरविण्यांत आला त्याची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिली नाही. ठेकेदारांना विवरणपत्रांच्या तपासणीचे काम कशा प्रकारे वाटप करण्यांत आले व त्यांना करण्यांत आलेली प्रदानाची रक्कम याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही.

शासनाच्या आदेशानुसार दिनांक 1-4-2011 पासुन वसई-विरार शहर महानगरपालिका हददीमध्ये स्थानिक संस्था कर लागु झालेला आहे. स्थानिक संस्था कराच्या 2011-12 मध्ये प्राप्त विवरणपत्रांची संख्या 15000 आहे.

स्थानिक संस्था कराच्या प्राप्त विवरणपत्रांच्या तपासणीकरीता व निर्धारणाकरीता सनदी लेखापाल यांची पॅनेल पध्दतीने नियुक्ती करणेकरीता स्थायी समिती सभा दिनांक 20-12-2012 ठराव क्रमांक 736 अन्वये मंजुरी देण्यांत आली. याविषयीच्या नस्तींबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्र.स्था.18ब/लेप/वसई-विरार मनपा/12-13/110, दिनांक 09/09/2014 अन्वये खुलासा विचारण्यांत आला होता. विभागाने त्यांचे पत्र क्र.वविशम/स्था सं.कर/ 1071/2014,दिनांक 27-11-2014 अन्वये खुलासा सादर केला आहे. सदर खुलाशात विभागाने भविष्यामध्ये योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल, कमी भरणा केलेले मुद्रांक शुल्क संबंधीतांकडून वसुल करुन कोषागारात भरणा करण्यांत येईल असा खुलासा केला आहे. ठेकेदारांनी दिलेल्या कामापैकी किती काम पूर्ण केले आहे याची माहितीही सादर केलेली नाही. लेखापरीक्षणाचे अभीप्राय खालील प्रमाणे आहेत.

1. शासन निर्णय उद्योग ऊर्जा व कामगार कल्याण विभाग भांखस 1088/(2512/)/उद्योग-6, दि. 02 जानेवारी 1992 मधील परिच्छेद क्र. 10.8 नुसार वस्तु खरेदी करण्यासाठी निविदा मागवितांना व्यापक

प्रसिध्दीकरीता माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. केवळ स्थानिक पातळीवर प्रसिध्दी न देता स्थानिक पातळीवरील, राज्य पातळीवरील व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे अधिक श्रेयस्कर ठरते. अशा प्रसिध्दीद्वारे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात. त्यातून दर्जेदार व स्पर्धात्मक दराचा लाभ होतो. परंतु महानगरपालिकेने निविदा लोकराजा, पुढारी, वसई समता या स्थानिक स्तरावरील वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे स्पर्धात्मक / किफायतशीर दराचा लाभ झालेला नाही.

2. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, 1958 कलम 03 मधील तरतूदीनुसार कामाच्या मक्त्याच्या संबंधित ठेकेदाराकडून या अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील 63 नुसार दि. 01/05/2006 पासुन संबंधिताकडून पुढीलप्रमाणे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे.

कामाची रक्कम 10 लाखापर्यंत - मुद्रांक शुल्क रू. 100/-

त्यानंतर प्रत्येकी 1 लाखासाठी - मुद्रांक शुल्क रू. 100/- (कमाल 5 लाख)

स्थानिक संस्था कराविषयी 2011-12 व 2012-13 वर्षात प्राप्त झालेल्या विवरणपत्रांच्या तपासणीकरीता 1) मे. फाउटन हेड, 2) मे. गौरांग शाह, 3) मे. हार्वेस्ट रिसर्च, 4) मे. सतीश नागरे, 5) मे. शुभम कॉमर्स, 6) मे. संदीप शाह व 7) मे. ए.डी. अंजीकर या सनदी लेखापालांची निवड करण्यांत येवून त्यांचेशी रुपये 100/- चे स्टँप पेपरवर करारनामा करण्यांत आलेला आहे. सदर कामाच्या खर्चाची रक्कम रुपये 68.00 लक्ष असुन करारनाम्यासाठी रुपये 5,900/- मुद्रांक वापरणे आवश्यक होते. तथापि प्रत्यक्षात रुपये 700/- चे मुद्रांक शुल्क उपयोगात आणण्यांत आले असल्याने रुपये 5,200/- चे कमी मुद्रांक शुल्क वापरले आहे. मुद्रांक शुल्काची रक्कम रु.5200/- संबंधीताकडून वसुल करुन शासनाच्या महसुल मुद्रांक खाती भरणा करावी.

